देवीसिंग चौहान



भारत ईराणी संश्लेष

या पुस्तकास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाकडून आर्थिक अनुदान मिळालेले आहे.

भारत ईराणी संश्लेष

(लेखसंग्रह)

भाग १

लेखक

श्री देवीसिंग व्यंकटसिंग चौहान

बी. ए., (ऑनर्स); एल्‌एल्. बी.
भूतपूर्व सदस्य, महाराष्ट्र लोकसेवा आयोग

शक १८९५

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे

मुद्रक :
गो. प. नेने
राष्ट्रभाषा मुद्रणालय,
३८७ नारायण पेठ,
पुणे ३०.

शक १८९५ (१९७३)

प्रती : १०००

मूल्य रु. १५

प्रकाशक :
ग. वा. करमरकर
सचिव, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा,
राष्ट्रभाषा भवन, नारायण पेठ,
पुणे ३०

प्रकाशकाचे हृद्गत

'भारत-ईराणी संश्लेष भाग १' हे श्री. देवीसिंग चौहान यांचे पुस्तक प्रसिद्ध करण्याची संधी महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेस मिळाली याचा आम्हांस अभिमान वाटतो. विद्वानांच्या विचारांना चालना देणारी अशा प्रकारची अनेक पुस्तके यापूर्वीही सभेने प्रसिद्ध केली आहेत आणि विद्वज्जनांनी त्या पुस्तकांची स्तुतीही केली आहे.

यापूर्वी सभेने श्री. चौहान यांची 'फूलबन', 'जंगनाम-ए-आलिम अलीखान', 'तारीखे इस्कंदरी', 'पर्णालपर्वतग्रहणाख्यान', ही हिंदी पुस्तके व 'मराठी आणि दक्खिनी हिंदी' व 'तारीखे-इस्कंदरी' ही मराठी पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. 'मराठी आणि दक्खिनी हिंदी' या पुस्तकास मागील वर्षी महाराष्ट्र राज्याचा, व्याकरण व भाषाविज्ञान विभागात पुरस्कारही मिळाला आहे. आता 'भारत-ईराणी संश्लेष, भाग १' हे पुस्तक प्रकाशित होत आहे.

श्री. चौहान यांनी मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, अरबी, फारसी, संस्कृत इत्यादि भाषांवर प्रभुत्व मिळविले आहे. 'दक्खिनी हिंदी' चे एक तज्ज्ञ संशोधक असा त्यांचा लौकिक आहे. 'मराठी आणि दक्खिनी हिंदी' व 'भारत-ईराणी संश्लेष' या पुस्तकांतील विविध विषयावरील त्यांचे विवेचन पाहिल्या-नंतर त्यांचे सखोल ज्ञान व संशोधन यांची खात्री पटावी.

'भारत-ईराणी संश्लेष' या संग्रहातील सर्व लेख वाचल्यानंतर असे दिसून येते की, गेली २५०० वर्षे भारत व ईराण यांचे संबंध आहेत. येथे 'ईराण' या शब्दाचा प्रयोग आताच्या 'ईराण' या राष्ट्रापुरता मर्यादित नसून 'ईराणी उपभाषा कुल' अशा अर्थाने केला आहे. ईराणी भाषेतून आलेले अनेक शब्द भारताच्या जुन्या वाङ्मयात आढळतात. या संदर्भात त्यांनी खोंड, चाळ, गार, कलत्र इत्यादि शब्दांचा ऊहापोह केला आहे. पुस्तकाच्या शेवटी शब्दकोश दिला असून त्यात असलेल्या शब्दांची व्युत्पत्तिही दिली आहे. तसेच व्यक्ति-स्थल-सूचीही दिली आहे.

या पुस्तकात समाविष्ट असलेले सर्व विषय विद्वज्जनांच्या विचार-मंथनास चालना देतील अशी आशा आहे. आम्ही श्री चौहान यांचे आभारी आहोत.

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा
राष्ट्रभाषा भवन, नारायण पेठ पुणे ३०

ग. वा. करमरकर
सचिव

ते सद्यश्चिन्तयन्तः कविमननमयं त्वाशयं भिन्नभिन्नं
एको धीरेकतोऽन्योऽन्यत इति हि विमूढौ विविक्षू ह्यपि द्वौ।
गूढा जिज्ञासवस्ते शतविधमपि पश्यन् कृमिं, भावयन्तः
ज्ञातुं वा क्षुद्ररूपं ह्यतिशयघनमाधारभूतं हि रिक्थम्॥

— लेखक

समर्पणम्

हत्वा द्वेष्टृबलं ददर्श हि धिया राष्ट्रं नवं बाङ्गलं
सामर्थ्येन नवेन राष्ट्रनिचये देशाय दत्ताऽस्मिता ।
नेहरूणां च ललामभूतसुकुले जाता द्विषद्ध्वंसिनी
गार्गी सा खलु मन्त्रणैककुशला भूरत्नभूतेन्दिरा ।। १

विद्युच्छक्तिमयं नियोजनपरं विद्यार्द्धिसंवर्धितं
सद्यःसन्ततनब्धकासनयुतं[1] सम्पत्तिमद्भारतम् ।
रम्यं देशमदेवमातृकमयं कृत्वा हि नेतुं सुखं
प्राप्तुं साऽत्र समाजवादजनताध्येयं समागच्छति ।। २

भारतेराणसंश्लेषरूपं पुष्पमिदं मया ।
इन्दिरायै समर्प्यते प्रत्न-रिक्थ-दिदृक्षुणा ।। ३

— चौहानदेवीसिंहो व्यङ्कटसिंहात्मजः

---

[1] नब्ध = ईराणी नफ़्त, इंग्रजी नापता, क्रूडाईल, सं. धातु नभ्.

भारेराणीसंश्लेषः

मध्याशियानिवासिनः प्रवैदिकार्यजा[1] जनाः ।
गाथा[2]–वेदांश्च संगृह्य दाक्षिणायां हि प्रसृताः ।।

ईराना अवगाणाश्च कुभागन्धारवासिनः ।
बाह्लीका दरदाश्चैव तथा सिन्धुकुशाश्रिताः[3] ।।

पारसीकशकाह्वास्ते पक्थूनाः[4] पक्थसंज्ञिताः ।
तुखाराश्चूलिकाश्चैव[5] स्वरस्थानाः[6] पह्लवाश्च वै ।।

आर्यगोत्रोद्भवाश्चैते प्रत्नास्ते चार्यभाषिकाः ।
प्रतीच्यां आ प्रयागात्तु बभूवुः क्षात्रजीविनः ।।

क्षत्रपाख्याः कनिष्काद्याः बुद्धादिपर्युपासकाः ।
भारते चार्यकृष्टिषु रूपैकत्वं समागताः ।।

तेषां चिह्नपदाङ्किता पैशाची वाक् समुद्गता ।
पश्चात्का समहिन्द्युर्दूः[7] ईरानभूप्रभावजा ।
भारतेरानसंश्लेषः समन्वयो महानभूत् ।।

अल्पीयांश्च प्रयत्नोऽयं चिह्नपन्निर्णयावहः ।
प्रत्नरिक्थार्थदर्शित्वाद् धर्ममूलोपवाहकः ।।

महाराष्ट्राख्यभूभागे बालाघाटेतिसंज्ञिके
औसादुर्गसुसन्निधे वञ्जुलातटदक्षिणे ।।

आशीवग्रामवासिना राजकारणधूरिणा
कृतोऽद्य चाहुवाणेन यद्देवीसिंहवर्मणा ।।

वेदनन्दाहिभूशाके (१८९४) कुम्भोऽयं हि स्वलङ्कृतः ।
इतिहासाध्वपाथेयं आनीतो ज्ञानवर्धनः ।।

---

१. ऋग्वेदपूर्व आर्य. २. ईराणी लोकांच मन्त्र. ३. हिन्दुकुशपर्वतीय, ४. पठाण लोक. ५. सुग्द देशातले लोक. ६. खोतन देशवासी. ७. एकच असलेल्या हिंदी-उर्दू या भाषेसारखी.

डॉं. सु. मं. कत्रे यांचा पुरस्कार

Telephone : 23374
Telegrams : Deccolinst

Director : **S. M. Katre**
M. A., Ph. D. (London)

Deccan College
Postgraduate and
Research Institute, Poona 6
Registered Post No. 1/1922
28 May, 1971

Sri **D. Y. Rajadhyaksha**
Secretary, Maharashtra Rajya Sahitya va Sanskriti Mandala
Sachivalaya, Bombay 32

Dear sir,

Kindly refer to your letter no Praam. 1071/2448 dated 22 April 1971 enclosing a copy of the manuscript of Sri Devisingh Chauhan's book, "Bharerani Samshlesha". I regret the delay in sending my opinion of the book. I have gone through the collection of papers carefully. Sri Chauhan has summarised much of the salient research in field of Modern Linguistics as applied to the Indo-Iranian branch. Since the originals (books as well as ournals) are not easily available to scholars in India, this is a welcome attempt to popularise the modern knowledge in a very specialised field. The individual contributions of Sri Chauhan, in so far as they apply to Marathi words, may be questioned by competent authorities, but he has shown a general mastery over the available materials and hence in consequence applied the technique to Modern Marathi. The book is valuable in the sense that it popularises recent research in the field of Indo-Iranian studies, and from this point of view, deserves early publication.

I, therefore recommend that a suitable grant be made towards its publication. I am returning herewith the manuscript which may kindly be acknowledged.

Thanking you

Yours faithfully
(Sd.)

S. M. Katre

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मण्डळाच्या सकृप सम्मतीने)

FOREWORD

The Indo–Iranian Relations is a collection of 25 articles written by Shri Devisingh Chauhan at different times, some of them already published and others appearing for the first time in print, dealing with diverse and varied aspects of the long and deeprooted relations between India and the Iranian nations of Central Asia during the ancient, medieval and recent periods of their history. Though they are primarily of historical interest, the author has taken history in a very wide sense, emphasizing the cultural aspects more than the merely political ones. The main theme of his historical studies, which runs as an under-current in all these studies, pertains to the deep influence of the various ancient and medieval Iranian nations, which can be traced in the historical development of the political and social aspects of western India, and more particularly of Maharashtra. A good picture of this situation is given in the first article which serves as an introduction for the whole collection.

The articles of Shri Chauhan are not meant so much to recount historical facts and events as to attempt a kind of reconstruction of the possible interrelations and mutual influences among India and Iranian nations. As such he has to utilise both historical and literary sources and make use of philological and linguistic interpretations for this purpose, no other evidence being available for such an undertaking. This material which is found written in a large number of old and medieval Iranian languages like Khotanese (Saka), Sogdian, Pehlavi, and other well known languages like Avesta, Old Persian, Sanskrit, Prakrits, Pali and the Northwestern Indo-Iranian languages like Pashto and Dardic, has been scanned by him with great care and immense labour to glean whatever little traces are found there-in and he has built out of them a succinct and readable account of the cultural history of this period, for which no book is available today in any language, much less in Marathi.

Some of the articles are in the nature of reviews like the one on Indians and Balts which give to the Marathi reader information which he is not likely to know but which is only marginal to the main theme of the book. Some of them are

mostly informative like the study of the systems of dating books and events or the provenance of a phrase like 'to hold a blade of grass in one's mouth' to indicate submission in different languages, or the idea of measuring distance by the range of an arrow-shot, and which are in themselves of cultural interest. But most of the articles are devoted to trace the influence of the Saka tribes found in the culture and history of Maharashtra. Naturally the author has to use the evidence of the language and the interpreta- tion of the etymologies of many obscure Marathi words, besides trying to settle the relation of Marathi language with others like Pashto, Khotanese, Paisaci, Culika Paisaci etc. A linguist is likely to object to some of the attempts to connect one word with another with the use of a large number of sound changes based on a couple of similar examples, but it must be remem- bered that what is attempted is not the history of a language, but the effects of cultural borrowings confined to a few isolated words where regular changes are out of question and where sporadic changes and sound substitution play a big role. More- over all such culturally important words remain isolated in the borrowed language and hence make any attempt to interpret them a very difficult task. But the cumulative effect of a large number of such obscure words cannot be denied and the result cautiously drawn from them may become acceptable to the historian. This appears to me the case in the present studies which have done an extremely difficult but useful job in tracing the origins and ramifications of some of the obscure words and associated ideas belonging to the medieval history of Maharashtra.

Difference of opinion in a field of this nature is inevitable but it is equally undeniable that a new and important field of cultural history of Maharashtra has been brought into focus in this collection of essays which merits very careful study on the part of historians and linguists and offers them a provoking challenge.

Joint Director
Deccan College, Poona
Chief Editor
Samskrit Historical Dictronary
November 18, 1973

A. M. Ghatage

लेखकाचे मनोगत

१. भारत ईराणी संश्लेष हा माझ्या लेखांचा तिसरा संग्रह प्रकाशित होत आहे. दक्खिनी हिंदीतील इतिहास हा दुसरा लेखसंग्रहही मुंबईच्या इतिहास संशोधन मंडळाकडून नुकताच प्रकाशित झालेला आहे. प्रस्तुत संग्रहातील २५ निबंधांपैकी बहुतेक सर्व लेख पूर्वप्रकाशित आहेत. यापैकी १० लेख मूलतः इंग्रजीतील निरनिराळी त्रैमासिके व इतिवृत्तांतून प्रकाशित झालेले आहेत. शेष लेख मराठी त्रैमासिकांतून वाचकांसमोर आलेले आहेत.

२. या संग्रहातील सगळ्या लेखांतून भारत व ईराण यांच्या गेल्या २५०० वर्षांतील परस्पर संपर्काचे, कमी अधिक प्रमाणात, विवरण असलेले दिसून येईल. ईराण या संज्ञेचा वापर ही भाषावैज्ञानिक सन्दर्भातून केलेला आहे. ईराण म्हणजे केवळ भौगोलिक व राजकीय ईराणच नव्हे. ईराणी हे एक उप-भाषाकुल आहे. या भाषाकुलात सोग्दिया (चूलिक) देशाच्या सुग्द-चूलिक, शूलिक, खोतन देशाच्या खोतनी शक, अफगाणिस्तानच्या पश्तो व बलूचिस्तानच्या बलूची या उपभाषांचा प्रामुख्याने समावेश आहे. या सर्व भाषांना मातृभूत ती ईराणी भाषा व त्या भाषेचा प्रदेश तो ईराण देश. या थोड्याशा वेगळ्या अर्थाने ईराण शब्द वापरण्यात आलेला आहे. ईराणविद्या Iranology या क्षेत्रात ही परिभाषा वापरण्यात येते.

३. भारतीय व ईराणी आर्य हे शतकानुशतके एकत्र कुटुंबात वावरून, नंतर विभक्त झाले. अनेक शतकांनंतर त्यांचे संबंध पुनश्च स्थापित झाले. ही संबंधस्थापना किमान इ. सनपूर्व ५०० वर्षांपासून ज्ञात आहे. पुढे कालांतराने या संबंधात घनिष्ठता निर्माण झाली. हे इ. सनपूर्व शेदीडशे वर्षांपासून स्पष्टतया दिसून येते. पिशाचपूर येथून चाललेली सम्राट् कनिष्काची अधिसत्ता ही, एका दृष्टीने या संबंधातील महत्त्वाचा दुवा होय. या साम्राज्याच्या फलस्वरूप या शकादि ईराणी लोकांची राजकीय सत्ता समग्र पश्चिम भारतात, कमी अधिक प्रमाणात, पुढे चार पाचशे वर्षे चालत राहिली. या दीर्घकालीन सम्पर्काचे अनेक राजकीय, भाषिक, वास्तुविषयक अवशेष या प्रदेशात विखुरलेले आपणाला दिसून येतात. या ईराण संपर्कातून, ईराणी भाषेच्या टंकशाळेतून बाहेर पडलेले अनेक शब्द भारताच्या जुन्या साहित्यांतून आढळतात. त्यांची नाणी सर्वत्र सापडतात. ईराणी जीवनाच्या द्योतक अनेक वास्तु, पाटलीपुत्र, कोशांबी, सांची, नासिक आदि प्राचीन स्थळी दिसून येतात.

या संपर्काचा अत्यंत मोठा परिपाक म्हणजे तत्कालीन प्राकृत भाषेची निर्माण झालेली पैशाची प्राकृत ही उपभाषा. या भाषेचा पगडा वायव्य भारत, माळवा आदि प्रदेशात कविवर्य राजशेखराच्या (शक ८७२) काळापर्यंत स्पष्टपणे जाणवत

होता. हा प्रभाव शब्दांच्या उसनवारीपर्यंत (Diffusional Impact) मर्यादित होता असे नाही, तर त्याने भाषेच्या व्याकरणात्मक गर्भगृहात (Structural Impact) प्रवेश केलेला होता. हे प्रस्तुत संग्रहातील प्रबंधांवरून दिसून येईल. उभयान्वयी अव्यय कि, की हे निरपवादपणे ईराणी भाषोत्पन्न. हे अव्यय इस्लामाबरोबर आलेल्या ईराणी भाषेच्या आगमनापूर्वी मराठीत रूढ होते. च-वर्गातील दंत्यवत्स्यं उच्चार हे या संपर्काचे फलित होय. तुकाई, तुळजा ही महाराष्ट्राची कुलदेवता ईराणी-पैशाच सांस्कृतिक वस्त्रप्रावरणात आपल्यासमोर उभी आहे. महाराष्ट्रधर्माचा आमचा मागोवा विद्वन्मान्य ठरल्यास, आपल्या सांस्कृतिक ठेव्याचा एक वेगळा दुवा आपल्यासमोर येईल. भारत ईराण सम्पर्काची खोली अशा प्रकारे मोठी व बहुविध असल्याचे दिसून येते.

अफगाणिस्तानची प्राचीन सांस्कृतिक प्रतिमा भारताने जवळून पाहण्यासारखी आहे. इ. सनपूर्व काळात अफगाणिस्तान भारताला फारच जवळचा होता. पाणिनि हा अफगाण देशातला. गांधारी गंधार देशाची राजकन्या. कैकेयीची तीच गत. अफगाण हा शब्दही भारतीयांनी घडविलेला. इण्डिया शब्द ईराण देशाने भारताला दिला व भारताने अफगाण हे एका ईराणविभागाचे नामकरण केले. बुखारा हे नाम भारतीय प्रभावाची गुढी होय. तसेच नव्याने जन्माला आलेले हरियाना, हरीआण हे एक नवीन भारतीय घटक राज्य ईराण या संज्ञेचे स्मारक आहे. काबूलच्या उत्तर व ईशान्येकडील ईराणी भाषा काफिरी म्हणविल्या जातात. त्यांत भारतीय भाषांचा प्रभाव अधिक दिसतो. चूलिक, खोतनी शक, पष्तो, दरदीय भाषा यांनी पैशाची प्राकृताला जन्म दिला. अशी या संपर्काची देवाण घेवाण आहे. दांती तृण धरणे व बाणाचे अन्तर या संज्ञा भारत व ईराण यांच्या समाईक वारशाकडे अंगुलिनिर्देशन करीतात.

४. या संग्रहातील लेखांतून कांही गोष्टी पहिल्यांदाच लोकांसमोर येत आहेत. कि, की हे उभयान्वयी अव्यय ईस्लामाच्या आगमनापूर्वी मराठीत होते, याची मीमांसा व मागोवा येथे आढळेल. जउव्ल म्हणजे जाबूल ही सइस्तानची राजधानी होय. तुकाई, तुकाराम यांचे सांस्कृतिक आवरण पहिल्यांदाच स्पष्ट होत आहे. नवाईत, नाइता, नाखवा या संज्ञेवर नवीन प्रकाश पडलेला दिसेल. अमीर खुस्रौवरील संस्कृत प्रभाव पहिल्यांदाच स्पष्ट होत आहे.

५ ज्ञात इतिहासकालात ईराण देशाचा भारताशी दोनदा घनिष्ठ सम्बन्ध आला. कनिष्कादि शक गटांचा पहिला सम्पर्क व इस्लामाच्या आगमनाचा दुसरा. पहिल्या सम्पर्काने, प्राकृत भाषची पैशाची प्राकृत अशी किंचित् भिन्न अशी बोली निर्माण झाली. ती काही शतके जीवित राहून इतिहासजमा झाली. इस्लामाच्या आगमनाने दिल्लीच्या आसमन्तातील खडीबोलीपासून दक्खिनी हिन्दी व कालान्तराने उर्दू अशी थोडीशी भिन्न अशी नव्य आर्य भारतीय भाषा विकसित झाली. ती

वस्तुतः हिन्दीच होय. पण अरबी-ईराणी लिपीमुळे तिला एक वेगळेपण प्राप्त झालेले आहे. कालान्तराने ती हिन्दीला अधिकाधिक जवळ येत जाईल, असे म्हणण्यास हरकत नाही.

६- या संग्रहातील लेखांच्या परिशीलनानंतर संग्रहाला घेतलेले भारत ईराणी संश्लेष हे नाव सार्थ ठरेल अशी अपेक्षा आहे. या संश्लेष अभ्यासात मराठी जीवनाचे धागेदोरे कसे गुंतलेले आहेत, हेहि चांगल्या प्रकारे दिसून येईल. मराठी भाषेच्या अध्ययनाला वरील विषयाच्या अभ्यासाची जोड असणे किती आवश्यक आहे, याची जाणीव या संग्रहाच्या वर वर पाहाण्यानेही होईल असे वाटते. या संग्रहाला मी पहिला भाग असे म्हटलेले आहे. दुसऱ्या भागाचे बरेचसे साहित्य तयार आहे. थोड्याच अवधीत भारत ईराणी संश्लेषाचा दुसरा भाग उजेडांत येईल अशी अपेक्षा आहे. हा सर्व प्रयत्न मराठी भाषेच्या अभ्यासाला उपयुक्त ठरेल अशी मी आशा बाळगतो.

७. भारत, ईराण इत्यादि देशांच्या प्राचीन इतिहास-संस्कृतीची सूत्रे हाताळीत असतानांच भारत राष्ट्राच्या कीर्तीत मोठी भर पडली, त्याची प्रतिमा उजळून निघाली. यामुळे भारताला जगाच्या प्रभावळीत मानाचे स्थान मिळण्याची शक्यता अधिक बद्धमूल झाली. हे सर्व घडवून आण ण्याचे श्रेय भारत राष्ट्राच्या आजच्या प्रधान मंत्री महामना श्रीमती इन्दिराजी गांधी यांचे आहे. यामुळेच माझा हा अल्पसा प्रयत्न त्यांना अर्पण करावा असे मनाने घेतले. यासाठी त्यांची संमति घेणे इष्ट वाटले. त्याप्रमाणे मी त्यांना विनंती केली. त्यांनी मोठ्या उदार बुद्धीने मला अशी सम्मति दिली. याबद्दल मी त्यांचा मनसा आभारी आहे.

८. या माझ्या लेखसंग्रहरूप पुस्तकास, डॉ. अ. मा. घाटगे, डेक्कन कॉलेजचे जॉइंट डायरेक्टर व संस्कृत ऐतिहासिक शब्दकोशाचे प्रमुख संपादक, यांनी प्रस्तावना लिहावी अशी मी त्यांना विनंती केली. याचे कारणही आहे. कारण पुण्यात वा संबद्ध विषयाशी असलेल्या विषयावर झालेल्या माझ्या एका व्याख्यानाचे अध्यक्षपद-ही त्यांनी भूषविले होते. तसेच ते माझ्या विचारसरणीशी पूर्वीपासूनच चांगले परिचित होते. या विषयाचे ते अधिकारी विद्वानही आहेत. त्यांनी माझी विनंती मान्य केली. कामाचा फार मोठा ताण असतांनाही, त्यातही वेळ काढून, त्यांनी अशी प्रस्तावना लिहिली याबद्धल मी त्यांचा आभारी आहे.

९. या संग्रहाच्या प्रकाशनाला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने अनुदान दिलेले आहे. हे अनुदान भाषाविज्ञानाचे महान् पंडित डॉ. सुमित्र मंगेश कत्रे यांच्या शिफारशीने वरील मंडळाने दिलेले आहे. डॉ. कत्रे यांनी

माझ्या प्रयत्नांचा गौरवपूर्ण उल्लेख केला व अनुदानाची सूचना केली या बद्दल मी डॉ. कत्रे यांचा ऋणी आहे. या संग्रहात डॉ. कत्रे यांच्या छोटयाशा पत्राचा समावेश करणे इष्ट होईल अशी विनंती मी, साहित्य आणि संस्कृती मंडळाचे विद्वद्वर्य अध्यक्ष श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याकडे केली. ती त्यांनी अत्यन्त उदारबुद्धीने मान्य केली. त्यांच्या व मंडळाच्या अनुमतीने डॉ. कत्रे यांचे पत्र या पुस्तकात प्रकाशित करण्यात येत आहे. या अभिप्रायाच्या प्रकाशनाची त्यांनी सम्मति दिली याबद्दल मी मंडळ व त्यांचे अध्यक्ष यांचा मनःपूर्वक आभारी आहे. मंडळाच्या अनुदानाबद्धलही मी आभारी आहे.

या पुस्तकाच्या मुद्रणाचे काम जिकीरीचे व मेहनतीचे. फार्सी वर्णोच्चाराचे व दन्त्यवत्सर्य च-वर्गीय उच्चाराचे टाईप मिळणे कठिण. ते मिळवून, पुस्तक शक्य तो बिनचूक बनविण्यासाठी, राष्ट्रभाषा मुद्रणालयाचे श्री. मु. सा. जगताप व श्री. मु. शं. देशपांडे यानी अतोनात कष्ट घेतले, या बद्दल मी त्यांचा आभारी आहे. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेने, मराठी, हिन्दी, संस्कृत व फार्सी सम्बन्धित आन्तरभारतीच्या सेवेची जबाबदारी आत्मीयतेने स्वीकारली, याबद्दल मी सभेचा आभारी आहे. काळजी घेतली तरी काही मुद्रणदोष राहिले. काही ढोबळ दोष दुरुस्त करणारे शुद्धिपत्र जोडलेले आहे. पुस्तकाच्या भौगोलिक पार्श्वभूमीची कल्पना स्पष्ट व्हावी या साठी सम्बन्धित प्रदेशाचा नकाशा दिलेला आहे.

७ आश्विन, शक १८९५

देवीसिंग चौहान


अनुक्रमणिका

भारत ईराणी संश्लेष

मुद्रणशुद्धि

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३३	११	सारंगदेर	सारंगदेव
	१८	केवलावार	केवलाधार
३५	५	मक़्फ़्फ़ा	मुक़्फ़्फ़ा
३६	१९	लोयकान	लवीकान
३८	१०	नायगांव	नागांव
४०	१२	ख़्शीयथियानाम्	ख़्शायथियानाम्
	१६	ख़्शायथिम:	ख़्शायथिय:
४२	खालून १२	पूरन-दुख़्त	पूरान-दुख़्त
	,, २	राजा	राजांचा राजा
४४	६	कथ	कय
	खालून ४	परम्परा	परम्परांत
	,, ३	आहे.	आहे, या गोष्टीचे स्मरण ठेवलेले दिसत नाही.
४७	१२	नव्या	नव्य
५०	१४	प्रजार्थं	प्रजार्थं
६७	१८	synhestis	synthesis
७२	१६	पतयश्वान्ये	पतयश्चान्ये
७९	१३	विनयनिभृता	विनयनिभृता:
९१	४	पह्ववव	पह्लव
१०३	१८ नंतर	—	ओळ वाढवा– पोकोर्नी-इण्डो-जर्मानिश्चे एटिमालिजिश्चे वोर्टरबुक्.
१०८	खालून ११	एरानक	एराँनक
११०	७	गोष्ट	गोष्ठ
१११	१	सुखावान	सुखावदान
	२	उदर	उदार
११४	१५	चिन्ह	चिह्न

११९	११	सशास्त्र	सशस्त्र
१२४	खालून ७	ज्ञान	ज्ञात
१२५	७	आंध्र पंथातील	आंध्र प्रांतातील
१३२	खालून ३	टेलनगर	टेलरनगर
१८०	खालून ८	हृवन	ह्वन
१८९	२२	चाळ	चुाळ
	२४	चाळी	चुाळी
	२७	चाळा	चुाळा
१९१	खालून २, ३	क्ट	क्ट
१९२	३	क्टं	क्ट
२३५	खालून ८	वली	वेली
२४२	२	सापेक्षी	साक्षेपी
२५५	१६	मखा	मला
२५७	६	शवाजी	शिवाजी



BHARAT IRANI SAMSLESA

१ : भारत आणि ईराण

आजच्या प्रसंगासाठी, भारतीय इतिहासात अत्यन्त महत्त्वाच्या असलेल्या पण दुर्दैवाने उपेक्षित राहिलेल्या, **भारत-ईराण** संबंध या इतिहासकथनाची मी निवड केलेली आहे. इतिहास-लेखन हा प्राचीन भारतीयांचा आवडीचा विषय नव्हे. भारतीयांनी प्राचीन वा मध्यकालात इतिहास लिहिला असे म्हणता येत नाही. ईराण या आपल्या पश्चिमेला, आशियाच्या पश्चिम टोकापर्यंत पसरलेल्या देशाचा, आपल्या इतिहासाशी फार प्राचीन कालापासून संपर्क आलेला आहे. ज्ञात भारतीय इतिहासाची सुरुवातच ईराणच्या साहचर्याने झालेली आहे, हे विद्वज्जनांस ठाऊक आहे. विक्रमसंवत् आणि शक कालगणना यांचे आरम्भ ईराणच्या संपर्कातून निर्माण झालेले आहेत हे सर्वमान्य आहे. म्हणजे हा मागोवा दोन हजार वर्षे मागे जातो. शक, कुषाण, मग, पह्लव, दरद, पारद, खश, तुषार इत्यादी ईराणी लोकांचे उल्लेख महाभारत व पुराणे यांत सापडतात. शकाच्या पाचव्या शतकापर्यंत शकांचे राज्य पश्चिम भारताच्या कोणत्याना कोणत्या भागात सातत्यपूर्णतेने राहिलेले आहे. हैद्राबाद, म्हैसूरपासून पुष्पपुर या पाणिनीच्या जन्मभूमीपर्यंतच्या सर्व पश्चिम भारतात शकांचा संचार झालेला आहे. त्याच्या खुणा कान्हेरी, नाणेघाट, एलापूर येथील पर्वतराजीत.

प्राप्तकाल हा विशाल भूधर
सुन्दर लेणीं तयांत खोदा
निजनामें त्यांवरती नोंदा.

या न्यायाने, आजपर्यंत आपल्या प्राचीन इतिहासात आढळून येतात.

उपरिनिर्दिष्ट शकादि सर्व परकीय लोक भारतीय समाजगंगेत समावेश पावून एकरूप झालेले आहेत. भारतीय संस्कृतीची विशालता व उत्तुंगता दाखविण्यासाठी काही श्रेष्ठ विद्वानांनी यांना विदेशी अनार्य ठरविलेले आहे. शक इत्यादी आर्यवंशीय होते याची दखल अशा विद्वानांनी घेतलेली नाही. हे आर्यच होते हे आम्ही मराठी विद्वानांच्या नजरेस आणून दिले आहे. अनार्य विदेशी समाज भारतीय समाजात विलीन झाला असे ठरविल्याने, अज्ञानमूलक कमीपणा पदरी येतो हे ध्यानात घ्यावयास हवे.

कुषाण टोळयांचे फार मोठे साम्राज्य शक-संवताच्या आरंभापासून दोन-तीनशे वर्षे, वायव्य व पश्चिम भारतात पसरले होते हे सर्वांना माहीत आहे. खरोष्ठी लिपी व प्राकृत भाषा यात लिपिबद्ध झालेले, शिला, ताम्र, मृत्तिकापात्रे,

धातुपात्रे यावरील लेख आता अभ्यासिले गेले आहेत. विद्वानांनी आता हेही निश्चयपूर्वक सांगितलेले आहे की हे कुषाणवंशी लोक ईराणी लोकांचाच एक समूह होता. त्यांनी बौद्धधर्माचा स्वीकार केलेला होता. कुषाणवंशीय कनिष्क सम्राटाचा उल्लेख अशोक, अकबराच्या बरोबरीने करावा लागेल. शे-दोनशे वर्षांच्या अवधीत या आर्यवंशीय कुषाणांनी, भारतीयांना अपरिचित असणारी थोडीशी अलग वाटणारी, आपली ईराणी नावे सोडून देऊन, बौद्ध व वासुदेव यासारखी संपूर्णतया भारतीय अशी नावे धारण केली. एकवंशत्व व समान सांस्कृतिक आणि भाषिक परंपरा या कारणांमुळे हा विदेशी वाटणारा आक्रमक समाज कालांतराने भारतीय आर्यवंशीय समाजात मिसळून गेला.

प्रागितिहास

भाषा व शिला ताम्रादीवरील इतिहासलेखनांमुळे उजेडात आलेला वरील इतिहास झाला. समाजाची वरील सांस्कृतिक साधनांपर्यंत प्रगती होण्याच्या अगोदरच्या काळातही आता पुरातत्त्वकोविदांनी प्रवेश केलेला आहे. खापरांच्या ठिकऱ्यांच्या सहाय्याने मानवेतिहासाची उकल आता होऊ लागली आहे. मोहोंजोदारो व हरप्पा येथे उपलब्ध झालेल्या सिंधु संस्कृतीच्या पूर्वी भारतात व पश्चिम भारतात वसत असलेल्या मनुष्य समाजाचे वंशीय व सांस्कृतिक अवशेष आता उजेडात येऊ लागलेले आहेत. अंधुक आणि दूरकालगत असे अश्मयुग सहस्त्रावधी वर्षे पसरलेले होते. परंतु या कालात अखिल भारतात विश्वास न बसण्यासारखी अशी मानवाची एकमुखी व समान संस्कृती पसरलेली होती. उपलब्ध अश्मावशेषांवरून हे दिसून येते. मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, बंगाल, आंध्र किंवा ओरिसा या प्रदेशात सर्वत्र मारखीच हत्यारे उपलब्ध होतात. हा काल शक संवत्पूर्व दहा हजारांपासून तीन हजार वर्षापूर्वीपर्यंतचा आहे. तदनंतर शक सन पूर्व २५०० वर्षांपासून मात्र हे चित्र बदलत असल्याचे पुरातत्त्वकोविद सांगत आहेत. या कालखंडात आजच्या भारताच्या भाषिक राज्यांच्या सांस्कृतिक अवशेषांचे दर्शन व्हायला लागते. सर्व सिंध, पंजाब, कच्छ, सौराष्ट्र आणि उत्तरप्रदेशचा बराचसा भाग सिंधुसंस्कृतीने व्यापलेला होता. भारताला ज्ञात असलेली ही सर्वात विस्तीर्ण संस्कृती असली तरी, ती सर्वप्राचीन नव्हे. आता ही गोष्ट उजेडात आलेली आहे की, या सिंधु संस्कृतीच्यापूर्वी एक संस्कृती नांदत होती आणि ती ईराणी संस्कृतीच्या पंखाखाली वाढलेली होती. ही संस्कृती सिंध, पंजाब, आणि राजस्थान या प्रदेशात पसरलेली होती. तिचा आविष्कार वैदिक सरस्वती आणि दृशद्वती (पूर्वीचे बिकानेर राज्य) या नद्यांच्या खोऱ्यांतून दिसून येतो. या नागरी संस्कृतीचे जनक कोण होते याचा मागोवा पुरातत्त्वकोविदांना अद्यापि लागलेला नाही. तसेच त्यांचे उत्तराधिकारी कोण होते हेही उजेडात आलेले नाही.

सिंधमध्ये (खोत दिजी आणि आमरी) आणि उत्तर राजस्थानात (काली-बनगन) झालेल्या उत्खननातून असे निष्पन्न झाले आहे की या सिंधुपूर्व संस्कृतीच्या लोकांना नगरयोजना चांगली ज्ञात होती. त्यांच्या नगराभोवती संरक्षणाचे तट होते. ते फिकट तांबड्या रंगाची मृत्तिकापात्रे वापरीत. त्यांच्यावर ते प्रसंगोपात्त उत्तम प्रकारचे रंगकाम करीत असत. ते आपली पिके कापण्यासाठी व घरकामासाठी दगडी पात्यांचा उपयोग करीत. अनेक प्रकारे या संस्कृतीचे बलुची आणि ईराणी संस्कृतीशी घनिष्ठ साहचर्य दिसून येते. या संस्कृतीच्या ग्रामीण समाजाचे चित्रही पाहावयास मिळते. सिंधू किंवा हरप्पा संस्कृतीच्या लोकांनी या लोकांना तेथून हुसकल्यानंतर त्यांच्यापैकी काही निर्वासित राजस्थानातून मध्य भारतात प्रविष्ट झाल्याचे दिसून येते. अशीच गोष्ट ऐतिहासिक कालातही घडून आलेली आहे. तत्कालीन मृत्पात्रावरून दिसून येते की या निर्वासितांनी कदाचित आपल्या दूरस्थ बांधवगणांशी संपर्क कायम ठेवलेला होता, किंवा ते तिकडून येत असलेल्या ईराणी आणि पश्चिम आशियातील लोकांच्या प्रभावात वाढत होते. ही गोष्ट मोठी आश्चर्यकारक आहे की चाल्कोलिथिक प्रत्यक्ष अवशेषस्थानावर किंवा समीपच्या स्थानी वसलेल्या आजच्या खेड्यातून साधारणतः ४००० वर्षांच्या अखंड इतिहासाचा पुरावा उपलब्ध होतो. या सिंधुसंस्कृतिपूर्व संस्कृतीची माहिती डॉ. सांकलिया यांनी भारताचे सांस्कृतिक विभाग या आपल्या एका इंग्रजी लेखात दिलेली आहे.

शकांचा-इतिहास

विद्वद्रत्न डॉ. केतकरांनी शकांच्या इतिहासावर पुष्कळच प्रकाश टाकलेला आहे. शकांचे आगमन वेदोत्तरकाळी झाले असेलच पण त्यांची काही वसती वेदपूर्वकालीन असली पाहिजे. शक आले ते मग ब्राह्मणाबरोबर आपली उपासना घेऊन आले आणि जेव्हा वैदिक आर्य आले तेव्हा त्यांना शक व मग हे अगोदरच आलेले लोक भिन्नसंस्कृती वाटले. ही गोष्ट डॉ. केतकरांनी वारंवार अनेक ठिकाणी सांगितली आहे. जे डॉ. केतकरांनी सांगितले नाही ते केवळ एवढेच की शक व त्यांचा उपाध्यायरूप मग हा वर्ग हे दोन्ही आर्यवंशीय होते. मग केवळ वैदिक संस्कृतीचे शत्रू नव्हते तर ते अगोदर जरी भिन्न असले तरी मागाहून त्या संस्कृतीचे घटक झाले व त्या दृष्टीने पाहिले तर वैदिक संस्कृतीची घटना ज्या लोकांनी केली त्यातील अत्यंत प्राचीन लोक म्हणजे मग आणि शक हेच आहेत. कारण हेच अत्यंत पूर्वेकडील म्हणजे मगधातील लोक आहेत. अलीकडे उपलब्ध झालेल्या व वर निर्दिष्ट केलेल्या सिंधुसंस्कृतिपूर्व ईराणी संस्कृतिप्रभावित भारतीय लोकसमूहांच्या संस्कृतीचा हा दुवा जुळण्यासारखा आहे. मगांच्या भारतातील सांस्कृतिक अस्तित्वाचा व महत्त्वाचा मागोवा पूर्वसूरींनी बराच घेतलेला आहे, हे सर्वांना ठाऊक आहेच.

ईराणात बुद्धपूर्व स्थापन झालेल्या हखामनी (Achaemenian) राजवंशाचा इतिहास सर्वश्रुत आहे. या वंशातील दारयवहू (Darius) या सम्राटाने (इ. स. पूर्व ५२१ ते ४८६) अनेक शिलालेख उंच-उंच पर्वतांवर कोरलेले आहेत. हे लेख भारतीय इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. दारयवहूचा बेहिस्तून (विस्थूण) पर्वतातील लेख अशोक सम्राटाच्या लेखांइतकाच महत्त्वाचा आहे. हे लेख भूपृष्ठापासून ५०० फूट उंच असलेल्या कड्यांवर खोदले गेले आहेत. ते इ. स. पूर्व ५१६ मध्ये किंवा तत्पूर्वी कोरले गेले आहेत. दारयवहूच्या नक्शे-रुस्तुम पर्वतलेखात, त्याचे साम्राज्य अफगानिस्तान, पंजाब व सिंधवर स्थापन झाल्याचे नमूद आहे. दारयवहूने हा प्रदेश इ. स. पूर्व ५१६ ते ४८६ च्या कालात जिंकला होता. या दारयवहूने एकशिलास्तंभ कोरून त्यावर सिंहाकृति कोरलेल्या आहेत. दारयवहूच्या या पर्वतलेखांचे व स्तंभाचेच अनुकरण मागाहून झालेल्या भारतीय अशोक सम्राटाने केलेले आहे, असे विद्वानांनी सांगितले आहे व त्याला कोणाचा विशेषसा आक्षेप नाही.

याच्या उलटही चित्र बलूचिस्तान, अफगानिस्तान व मध्यआशियात दिसून येते. अशोकाच्या आगे-मागे या प्रदेशात बौद्धधर्म पोचलेला होता. बुद्धधर्मीय अवशेष तेथे प्राचुर्याने दिसून येतात. खुद्द अफगानिस्तानात अशोकाचे दोन शिलालेख कंधार (गंधार) आणि दुरंत येथे उपलब्ध (इ. स. पूर्व २५०) आहेत. शक सनाच्या पहिल्या दुसऱ्या शतकात कुषाण गटाच्या आर्यवंशीय ईराणी लोकांनी येथे राज्य केले; ते बौद्धधर्मी होते. कनिष्क हा त्यांच्यापैकी मोठा सम्राट् होता. त्याने बौद्ध-धर्माचा चहूकडे प्रसार केला. प्राचीनकाळी या देशाला हे नाव नव्हते. हा प्रदेश बॅक्ट्रिया (बाल्हिक) आणि खुरासान (स्वरास्थान) या दोन प्रदेशांत मोडत होता. अवगान हा शब्द अफगान या अर्थी प्रथमतः ईराणवंशीय वराहमिहिराने आपल्या सूर्यसिद्धांत ग्रंथात शक ४७२ च्या सुमारास वापरलेला आहे. अफगानिस्तान हे बौद्धधर्माचे एक प्रमुख केंद्र राहिलेले आहे. शककालाच्या ६ व्या शतकात बामियान खोऱ्यात बुद्धाचे कोरलेल्या प्रस्तरमूर्ति अद्यापि उपलब्ध आहेत. शकाच्या ९ व्या शतक अखेरपर्यंत बौद्धधर्म अफगानिस्तानात नांदत होता. त्याला मुसलमानां-कडून शह मिळाला.

इस्लाम संपर्क

शकाच्या सहाव्या शतकाच्या आरम्भी मुहम्मद बिन अब्दुल्ला या कुरयश जमातीच्या अरब धर्मप्रवर्तकाने इस्लाम धर्माची स्थापना केली व स्वतःला पैगंबर–ईश्वराचा सन्देश पोचविणारा–अशी उपाधि धारण केली. या नवीन इस्लाम धर्माच्या प्रेरणेने उत्स्फूर्त झालेल्या अरबांनी ईराणी सासान साम्राज्याला शेवटचा धक्का देऊन शक ५७४ त ते साम्राज्य नामशेष करून टाकले. शकाच्या ७ व्या शतकाच्या अखेरीस

खुरासान, अफगानिस्तान इत्यादी पौर्वात्य भाग खलीफांच्या राज्यात सामील झाला. शंभर दीडशे वर्षांच्या अल्पावधीत जरथुष्ट्रधर्म, पहलवी लिपी इत्यादींचा नाश होऊन इस्लाधर्म व अरबी भाषेचे साम्राज्य सुरू झाले. शक १० व्या शतकाच्या अखेरीस अफगानिस्तानातील मुसलमान आक्रमकांनी भारतावर हल्ले सुरू केले. हा सर्व-साधारण इतिहास सर्वत्रास ठाऊक असला तरी इस्लाम, अरब व मुसलमान म्हणून समजल्या जाणाऱ्या आक्रमकांची संस्कृति यांच्याकडे बारकाईने भारतीय इतिहास तज्ञांनी पाहिलेले आहे असे म्हणावेसे वाटत नाही. मुसलमानांची भारतातील सत्ता कमी-अधिक विस्ताराने शक १६२९ पर्यंत जोमाने वाढत होती. पुढच्या काळात ती केवळ नाममात्र राहिली.

शक ५५४ मध्ये आपला देहान्त होईपर्यंत मुहम्मद पैगंबराने धर्मस्थापना करून तिच्या पाठीमागे राजसत्तेचे बळ उभे केले होते. धर्म हा राजसत्तेच्या शक्तीवर उभा करावयाचा ही गोष्ट अरबांनी ईराणी सासानी साम्राज्यापासून उचललेली आहे. मुहम्मदाने धर्मस्थापना व खिलाफत उभी केली तरी, २९ वर्षांच्या आतच मुहम्मद व त्याचे सच्चे अनुयायी यांचा पराभव झाला. पुढे करबलाच्या मैदानावर, नाममात्र धर्म स्वीकारलेल्या उमय्य गटाच्या यज़ीद सरदाराने मदीना शहरावर नांगर फिरविला व कुराण तोंडपाठ असलेल्या ७० इस्लाम भक्तांची कत्तल करण्यात आली. या उमय्य खलीफांनी आपली राजधानी मदीनेहून हलवून दमश्क (दमस्कस) या सीरियामधील शहरात नेली. शक ६७१ पर्यंत उमय्य खलीफांची राजधानी हेच नगर होते. या वर्षी सफ्फ़ाह बिन मुहम्मद या अब्बासी वंशातील सरदाराने, ईराणी शियापंथी मुसलमानांच्या सहायाने, उमय्य खलीफाचा पराभव करून गादी हस्तगत केली. राजधानी दमश्कहून बगदाद येथे हलविण्यात आली. बगदाद येथून खिलाफतीचे राज्य शक ६७१ पासून शक ७६९ पर्यंत चालले. शक ७६९ पासून हे अब्बासी खलीफा केवळ नामधारी होते. दिल्लीचा मुगल सम्राट शाह-आलम (जगाचा राजा) हा केवळ नाममात्र राजा होता व त्याचे राज्य दिल्लीपासून पालमपर्यंत (सध्याचा पालम विमान तळ) संकुचित झालेले होते. या मुगल राजासंबंधी दिल्लीच्या परिसरात एक फार्सी म्हण प्रचलित झाली होती.

हुकूमते-शाहे-आ़लम अज़ दिल्ली ता पालम

अब्बासी खलीफांची बगदादमध्ये तीच अवस्था होती. शक ८५४ पासूनच्या एका दशकात मुस्तवफी या खलीफाला बुवया या ईराणी वंशाच्या व शियापंथी राज-वंशाने नामोहरम करून खलीफाची गादी बळकावली. खलीफांची ही नाममात्र सत्ता शक ११८० मध्ये मुगल हुलागूच्या हातून औपचारिकरीत्या नष्ट होईपर्यंत चालू होती. खिलाफतीच्या एकूण ६०० वर्षांच्या कालखंडापैकी ३३६ वर्षेपर्यंत खलीफा केवळ नाममात्र होते.

उमय्य खिलाफतीच्या नाशाची कारणे अशी होती. : (१) परतंत्र ईराणी लोकात अरब आक्रमकांबद्दल पराकाष्ठेचा द्वेष व तिरस्कार भरलेला होता. (२) या तिरस्कारातून सर्व ईराणभर शियापंथाचा (अलीच्या पाठिराख्यांचा) प्रसार झालेला होता. या पंथाने ही राज्यक्रान्ती घडवून आणली. (३) ईराणी लोकात आपला परित्राता पैगंबर अवतार घेणार आहे अशी समजूत बद्धमूल झालेली होती. तिच्यातून अरबांचा तिरस्कार वाढत गेला. या राज्यक्रांतीमुळे, जरी अरबांची खिलाफत कायम राहिली तरी तिच्यामुळे ईराणी लोकांच्या दर्जात मात्र जमीनअस्मानाचे अंतर पडले. आतापर्यंत ईराणी लोक तिरस्कृत, पददलित व सत्ताहीन होते. शक ६७० पासून पुढे त्यांच्या हातात सत्तेची सूत्रे हस्तांतरित झाली. सर्व ईराणमध्ये अरबांचा दर्जा व स्थान नाहीसे झाले. ईराणी लोकांच्या तलवारीनेच ही राज्यक्रान्ती घडून आली होती. आता परिणामकारक सत्ता त्यांच्या हाती गेली. अल्बीरूनीने, ही खरोखरच खुरासानी सत्ता होती, पूर्व ईराणी राजघराणे होते असे या अब्बासी खिलाफतीचे वर्णन केलेले आहे. क़ादिसिया आणि नहावंद येथे ईराणी साम्राज्याच्या झालेल्या पराभवांचे उट्टे झाब येथील युद्धात घेण्यात आले. उमय्य खिलाफतीचा अन्त म्हणजेच खऱ्याखुऱ्या, निर्भेळ अरबी साम्राज्याचा अन्त होय असे अल्बीरूनीने म्हटलेले आहे.

उमय्य राजवटीची वैशिष्टये अशी होत. 'अल्बीरूनीचा भारत' या ग्रंथाच्या संपादनात एडवर्ड सचौ याने म्हटले आहे की दमश्क (दमस्कस) येथून राज्य चालविणाऱ्या उमय्य खलिफांना साहित्याची आवड असल्याचे दिसून येत नाही. आपल्या राज्यव्यवहाराच्या व्यवहारी गरजेखेरीज, ग्रीस, ईजिप्त किंवा ईराण येथील संस्कृतींचे ज्ञान करून घेण्याची त्यांना इच्छा नव्हती. त्यांचे सर्व लक्ष युद्धे, राजकारण आणि वैयक्तिक श्रीमंती यांच्यातच संपूर्णपणे केंद्रित झालेले होते. सर्व अरबांमध्ये दिसून येणारी काव्याची गोडी मात्र त्यांच्यात दिसून येत होती. पण त्यांनी इतिहासलेखनाला कधीच प्रोत्साहन दिले नाही. कारण त्यामुळे त्यांचे नुकसानच होणार होते. हे अरब राजेरजवाडे नुकतेच हिजाजच्या डोंगराळ व वालुकामय प्रदेशातून साम्राज्य पदाच्या सिंहासनावर आरूढ झालेले होते. त्यांच्या मूळ अरबस्वभावात वसत असलेला शेख-पणा शिल्लक राहिलेला होता. त्यांच्यापैकी बहुतेकांना दमस्कसच्या वातावरणात राहण्यापेक्षा, आपल्या वालुकामय मायभूमीत निवास करणे अधिक पसंत होते. त्यांच्या घरीदारी साहित्याला काही स्थान होते असे मुळीच दिसत नाही. अरबस्थानातील सुखवस्तू अरबांच्या घरी आज देखील हेच दृश्य दिसते. अरबी साहित्याचे माहेरघर दमस्कस नसून ते बगदाद येथे आहे. साहित्यसृजनाला आवश्यक असलेले संरक्षण व प्रोत्साहन अब्बासी खलीफांच्या आश्रयाने प्राप्त झाली. या अब्बासी खलीफांचा

स्वभाव, त्यांच्या खुरासानमधील दीर्घकालपर्यंत घडलेल्या वास्तव्यामुळे, ईराणी संस्कृतीच्या प्रभावामुळे परिवर्तित झालेला होता.

अरबी साहित्यनिर्मितीचा पाया शक ६७२ व ७७२ च्या दरम्यान घातला गेला. धार्मिक परंपरा, मुहम्मद पैगंबर आणि काव्य हे अरबांचे वैशिष्टच होय. याशिवाय अन्य सर्व परदेशी साहित्य अरबेतरांकडून विकसित झालेले आहे. समृद्ध साहित्याचा विकास आणि त्यातील विविध दालने ही प्रामुख्याने अरबेतर विदेशीयांची कृति होय. त्यातील सर्व मालमसाला परकीय देशांचाच होता. रोमने देखील आपल्या साहित्याची उभारणी ग्रीसच्या ज्ञान, संस्कृती व साधने यावर केलेली होती. अरबांच्या निःसृजनशील मनाला संपन्न करण्यासाठी ग्रीस, ईराण आणि भारत यांच्याकडून करभार वसूल करण्यात आला.

ईराण देशाने, खरे म्हणजे अरब आक्रमकांनी नामशेष केलेल्या सासानी साम्राज्याने, या आक्रमकांना व विजेत्यांना साहित्य क्षेत्रात काय दिले ? (उमय्य) खिलाफतीच्या पूर्वप्रदेशात राज्यव्यवहाराची भाषा प्रदान केली. हीच भाषा पुढे येणाऱ्या अनेक शतकांत चालू राहिली. ती सासानी साम्राज्यात विकसित झालेली राज्यव्यवहाराची फार्सी भाषा होय. ती भाषा अब्बासी खलीफांच्या आधिपत्याखाली ईराणच्या पूर्वप्रदेशातील छोटचा छोटचा राज्यांत हळूहळू प्रसृत झाली होती. तीच भाषा अनेक अरब दरबारांची भाषा होती. ट्रान्सऑक्झियाना व खुरासान मधील सामानी राजवटीने तिला खतपाणी दिले.

अरबी भाषेतील बव्हंशी कथावाङमय, गोष्टी, दंतकथा, कादंबऱ्या इत्यादी फार्सी भाषेतून भाषांतरित होऊन आलेली आहेत. उदाहरणार्थ एक हजार आणि एक रात्री, कलीला व दमनामधील (पंचतंत्राचे अरबी भाषांतर) पशुपक्ष्यांच्या तोंडून ऐकविलेल्या गोष्टी, खुदाई-नामक सारख्या (यावरच पुढे फिर्दौसीने शाहनामा हे अमर महाकाव्य लिहिले) ईराणच्या राष्ट्रीय साहित्यातून केलेली भाषान्तरे आणि प्रेमकथा ही सर्व फार्सी भाषेतून केलेले अनुवाद होत. अब्बासी खलीफांच्या राजवटीत ही जणू काय प्रथाच निर्माण झाली होती. मुक्तदिर या खलीफाच्या काळात (शक ८३० ते ८५४) ही प्रथा परमोच्च बिंदूला पोचली होती. बोधकथात्मक श्लेषपर साहित्यनिर्मिती लोकादरास पात्र ठरलेली होती. तिचे स्वरूप सासानी राजवंशातील अनुशीरवान खुस्रौ किंवा त्याचा मुख्यमंत्री बुजुर्जमिहर (संस्कृत पंचतन्त्राचा पहलवीत अनुवाद करणारा आद्य भाषान्तरकार) यांच्यासारख्या ऐतिहासिक व्यक्ती किंवा तत्कालीन साधुसन्त यांच्यासंबंधी नीतिपर साहित्य निर्माण करणे असे होते. हे सर्व साहित्य फार्सी भाषेतून अरबी भाषेत भाषान्तरित वा अनुवादित स्वरूपाचे होते. तसेच फार्सी भाषेतून युद्धशास्त्रविषयक ग्रंथ, शास्त्रासंबंधी पुस्तके, पशुसंवर्धनकला, कपोतपालनकला, भविष्यवर्तनाच्या विविध पद्धती, रोगनिदानपद्धती इत्यादीचे अरबी भाषेत अनुवाद करण्यात आले.

ही गोष्टही लक्षणीय आहे की उलटपक्षी, गणितशास्त्र, खगोलशास्त्र या निर्भेळ शास्त्राविषयी सासानकालीन ईराणी लोकांच्या पहलवी भाषेत ग्रंथनिर्मिती झालेली नसल्याने, तत्कालीन अरबी भाषेत त्यांचा मागमूसही पाहण्यास मिळत नाही.

भारताकडून अरबांची उसनवारी

या पुढील एडवर्ड सचौ यांचे म्हणणे असे आहे. भारताने भिन्न भिन्न मार्गांनी बगदाद येथील अरबांना काय-काय दिले ? काही भाग प्रत्यक्ष संस्कृत ग्रंथांच्या भाषान्तर रूपाने अरबी भाषेत आलेला आहे. काही भाग प्रथम फार्सी भाषेत ईराणी लोकांनी उतरविला आणि नंतर त्याचा अनुवाद अरबी भाषेत करण्यात आला. या दुसऱ्या मार्गाने कलीला व दमना (पंचतंत्रातील करटक व दमनक) यांच्या कथा अरबांकडे पोचलेल्या आहेत. त्याचप्रमाणे वैद्यकशास्त्रावरील चरक ग्रंथ अरबी भाषेत अवतरलेला आहे. भारत आणि बगदाद (सं. भगधात) यांच्या संपर्कात भिन्न मार्गाबरोबर भिन्न कालखंडही दिसून येतात. सिंध प्रांत प्रत्यक्ष मन्सूर खलीफाच्या (शक ६७५ ते ६९६) अमलाखाली असल्यामुळे, सिंधमधून बगदादकडे वकिलाती येत असत. त्यांच्याबरोबर विद्वानही आले. त्यांनी संस्कृत ग्रंथ आणले. अशा रीतीने ब्रह्मगुप्ताचा ब्रह्मसिद्धान्त (सिंदहिंद) आणि त्याचे खंडखद्यक (अरकंद) हे ग्रंथ अरबी भाषेत अवतरले. भारतातून आलेल्या या पंडितांच्या सहायाने अल्फजरी, तसेच कदाचित, याकूब इब्न तारीक यांनी त्यांची भाषान्तरे केली. या दोन्ही ग्रंथाचा उपयोग फार मोठ्या प्रमाणावर करण्यात येतो. त्यांचा मोठा प्रभावही पडलेला दिसून येतो. याच प्रसंगी अरबांना सर्वप्रथम खगोलशास्त्राची सुसंगत अशी ओळख झाली. टालेमीचा परिचय करून घेण्यापूर्वी अरबांनी ब्रह्मगुप्तापासूनच ज्ञान मिळविले होते.

हारून अर-रशीद या खलीफाच्या काळात (शक ७०८ ते ७३०) भारतीय ज्ञानगंगेचा ओघ अरबांकडे वाहात राहिला. या काळात बल्ख़ (बॅक्ट्रिया, अफगानिस्तान) मधून आलेले बरमक (परमक, प्रमुख) हे घराणे आपल्या मुख्य मंत्रिपदाच्या प्रभावशिखरावर आरूढ होते. या बरमकांचा खलीफांवर चांगलाच प्रभाव होता. या बरमकाचे पूर्वज बल्ख़मधील नौबिहार (नव विहार) या बौद्ध देवस्थानाचे प्रमुख अधिकारी होते. बरमक हे नाव भारतीय असून ते परमक, प्रमुख शब्दापासून निघालेले असून त्याचा अर्थ श्रेष्ठ (विहाराचा अधिकारी) असा आहे. बरमक हे धर्मान्तरित मुसलमान होते, परंतु त्यांच्या समकालीनांनी इस्लाम धर्माची कधीच तमा बाळगली नाही. त्यांनी इस्लामाला खरा धर्मही मानले नाही. आपल्या घराण्याच्या परम्परेला अनुसरून, त्यांनी विद्यार्जनासाठी विद्वानांना भारतात रवाना केले. तेथे त्यांनी वैद्यक व आनुषंगिक शास्त्रांचा अभ्यास केला. शिवाय त्यांनी अनेक भारतीय पंडित बगदादला आणवून घेतले.

त्यांना आपल्या औषधालयांचे प्रमुख नेमले. या विद्वानांकडून वैद्यक शास्त्र, औषधिनिर्माण शास्त्र, विषशास्त्र, तत्त्वज्ञान, ज्योतिषशास्त्र, इत्यादी शास्त्रीय विषयांवरील संस्कृत ग्रंथांचे अरबी भाषेत, त्यांनी अनुवाद करवून घेतले. तदनंतरच्या काही शतकांत इस्लामी विद्वानांनी, बरमकचे प्रतिनिधी या नात्याने, दूरदूरचे प्रवास केले. याचे उदाहरण म्हणजे अल्बीरूनी याच्या काही काल अगोदर होऊन गेलेल्या अल्-मुवफ्फ़क़चे देता येईल.

यानंतर थोड्याच काळात सिंध बगदादच्या राजकीय वर्चस्वातून मुक्त झाला. त्यामुळे हा चालू असलेला संपर्क संपुष्टात आला. त्यामुळे अरबी साहित्याने एक दुसरी दिशा स्वीकारली. बगदादमध्ये संस्कृत विद्यांच्या पंडितांची नावे किंवा त्यांनी केलेल्या अनुवादांची चर्चा ऐकू येत नाही. ग्रीकांच्या विद्याधनाचा अरबांच्या मनःपटावर जबरदस्त पगडा पूर्वीपासूनच असल्याचे दिसून येते. ग्रीक विद्या अरबांपर्यंत पोचविण्याचे कार्य नेस्टोरियन वैद्य, हर्रम येथील तत्त्वज्ञानी आणि सीरिया आणि साम्राज्याच्या इतर भागातील ख्रिस्ती विद्वान यांनी केलेले दिसून येते. प्राचीन काली किंवा भारतीय-अरब संपर्कातून, निर्माण झालेले अरबी शास्त्रीय साहित्य आज आपणांस उपलब्ध झालेले नाही. या ग्रंथांची फक्त नावे काही ग्रंथातून आढळून येतात. त्यांची नावे सुद्धा अशा भ्रष्ट व परिवर्तित स्वरूपात मिळतात की त्यांचा नीटसा उलगडा करणेही आज दुरापास्त काम होऊन बसलेले आहे.

ईराणमधील अरबांच्या आधिपत्याखाली असलेल्या निरनिराळ्या राजवटींपैकी सामानी राजवंशाचा (शक ८१४ ते ९२१) अमल सर्व पूर्व ईराण आणि खुरासान प्रदेशावर चाललेला होता. या सामानी राजांचे आपल्या पूर्वेकडील हिंदूंशी फारच सलोख्याचे संबंध होते. असे हिंदू काबूल, पंजाब आणि सिंध या प्रांतात राहात असत. त्यांचा वज़ीर अल्जैहानी याने भारताविषयी अनेक प्रकारची विपुल माहिती मिळविल्याचे दिसून येते.

अरबी संस्कृतीची घडण

अनेक विद्वानांनी ही गोष्ट स्पष्टपणे मांडलेली आहे की अरबांचा ईराणशी संपर्क आला त्या वेळी अरबांमध्ये विद्या, शास्त्रे व राज्यशास्त्र यांचे ज्ञान फार कमी प्रमाणात होते. उमय्य खलीफांची गादी शंभर वर्षे चालली, परंतु पहिल्या अर्ध्या-शतकात त्यांनी सासानी सम्राटांचाच शिक्का चालविला होता. या शिक्क्या-वर पहलवी भाषेतील मजकूर पहलवी लिपीतच लिहिलेला दिसून येतो. अरबांनी केंद्रीय सरकार कधीच चालविलेले नव्हते. आजदेखील–साडे तेराशे वर्षांनंतर आफ्रिका, आशियातील अरब-देशात केंद्रीय सरकार स्थापन होऊ शकले नाही. अरबांना

या क्षेत्रातील मार्गदर्शनासाठी ईराणच्या तोंडाकडे पाहावे लागले. त्या काली ईराणला मध्यवर्ती सत्ता चालविण्याचा किमान हजार वर्षांचा, चार साम्राज्ये चालविण्याचा, अनुभव होता. अरबांनी आपल्या राजकाजासाठी सासानी राजवटीतील परम्परा जशाच्या-तशाच उचलल्या. दरबारात वागण्याची व बोलण्याचालण्याची पद्धत अरबांनी ईराणी लोकांकडून घेतलेली आहे. एकूण एक, सर्व क्षेत्रांत अरबांनी ईराणी सुप्रतिष्ठित परम्परांचे केवळ अनुकरण केलेले आहे. डॉ. ख्रिस्टनसेन या डेन्मार्क देशाच्या विद्वानाने आपल्या फ्रेंच भाषेतील ग्रंथात या परम्परांचा इत्थंभूत पाढा वाचलेला आहे. **अरब आणि ईराणी यांच्यात वंश, धर्म, भाषा व संस्कृति यांची मूलभूत भिन्नता असूनसुद्धा ईराणी संस्कृतीचा अरबांवर मौलिक असा सांस्कृतिक प्रभाव पडलेला आहे.** मुहम्मद पैगम्बराच्या मृत्यूनंतर केवळ १०-१२ वर्षांतच म्हणजे उमर हा खलीफा असताना या प्रभावाची पावले दिसू लागली होती. राज्यशासनाची सर्व खाती ईराणी पद्धतीने सुरू झाली होती. या अन्धानुकरणाचा कळस, अब्बासी खलीफांची सत्ता बगदाद येथून चालू लागल्यानंतर, परिपूर्ण झाला. हे अनुकरण आपादमस्तक होते, असे म्हणावे लागते. तेच दरबारी रीतिरिवाज, त्याच रूढी, तीच अधिकारपदे, तीच राज्यपद्धति. किंबहुना कसल्याही आक्षेपाची भीती न बाळगता असे म्हणता येते की सासानी राजवंशच अब्बासी खलीफांच्या रूपाने पुनश्च अवतरलेला आहे. आणखी ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे की अरबांच्या उत्कर्षकाली जी गोष्ट बगदाद येथे पिकावयाची तीच त्यांच्या सर्व साम्राज्यभर विकावयाची. अर्थातच जेथे-जेथे अरब सत्ता गेली तेथे बगदादच्या अर्थातच ईराणी परम्परा पोंचल्या. बगदादची परम्परा सर्वत्र शिरोधार्य होती. याच परम्परा इस्लामी जगतात स्थिर व रूढ झाल्या. अल्जेरिया, मोरोक्को, स्पेन, भारत या देशातील इस्लामी परम्परा म्हणजे ईराणी संस्कृतीचेच प्रतिबिम्ब होय. अकबर आणि शाहजहान यांचे दरबार खुस्रौ अनुशीरवान आणि खुस्रौ पर्वीज या सासानी सम्राटांचेच दरबार होते, यांत तिळमात्र संशय नाही.

भारतीय मुसलमानांच्या सांस्कृतिक प्रतिनिधि असलेल्या जुन्या पिढीतील मौलाना शिबली नुअ़मानी यांनाही वरील निष्कर्ष स्वीकार्यच वाटले. त्यांच्या मते ईराणी नेहमीच संस्कृती, सामाजिक परम्परा आणि विद्या व कला यात अग्रेसर व श्रेष्ठ राहिलेले आहेत. आज सर्व इस्लामी जगतात ईराणच्याच सांस्कृतिक परम्परा चालत आहेत. तुर्क व मोंगोल लोकांनी मोठमोठी राज्ये व साम्राज्ये स्थापन केली. परंतु त्यांच्या सर्व जीवनाचा पाया ईराणी संस्कृतिच होती. त्यांच्या दरबाराची भाषा फार्सी आणि त्यांच्या समाजनियंत्रणाचे कायदेकानू व विधिनियम हे सामग्र्याने ईराणीच होते. (पाहा शिअ़रुल-अ़जम, मौलाना शिबली नुअ़मानी, खण्ड १, प्रास्ताविक.)

ही इस्लामी नव्हे, ईराणी संस्कृति

अरबांनी स्थापन केलेले राज्य दोनशे वर्षांच्या आतच ईराणी संस्कृतिमय झाले. खिलाफत नामधारी बनून आणखी काही काल टिकली. अरबांच्या सत्तेचा प्रसार पश्चिमेकडे उत्तर सूदान, ईजिप्त, अल्जेरिया, मोरोक्को, स्पेन इत्यादि पाश्चात्य देशांत झाला. पूर्वेकडे अरब येऊ शकले नसले तरी इस्लामधर्माचा स्वीकार केलेल्या मुसलमानांनी-ईराणी, तुर्क व मुगल लोकांनी, भारतात आपली सत्ता कायम केली. ती भारतात कमीअधिक प्रमाणात चारपांचशे वर्षे टिकली. अर्थात या राजकीय सत्तेमुळे भारतीय आर्यसंस्कृतीला इस्लामी संस्कृतीचे साहचार्य प्राप्त झाले. भारतीय संस्कृतीवर या इस्लामी संस्कृतीचे काय परिणाम झाले हे पडताळीत असतांना इस्लामी संस्कृती म्हणजे काय याची छाननी भारतीय विद्वानांनी पुरेशी केलेली आहे असे म्हणणे सत्याला धरून होणार नाही. वरील चर्चेवरून ही गोष्ट सूर्य प्रकाशाइतकी स्पष्ट आहे की ही इस्लामी संस्कृति म्हणजे केवळ ईराणी संस्कृतिच होय. परंतु भारतीय मुसलमान व मुसलमान विद्वान यांना, जगातील अखिल मुसलमान समाजाशी भ्रातृभाव साधण्यासाठी इस्लामी संस्कृति असा शब्द वापरावासा वाटतो. त्यांनी आजपर्यंत तो तसाच वापरला आहे, आणि कसोशीने वापरलेला आहे. पण वरील विश्लेषणावरून ही इस्लामी संस्कृति म्हणजे मुहम्मद पैगंबर व त्याची अरब संस्कृति हे समीकरण चुकीचे आहे, हे दिसून येते.

तुर्कस्थान, ईराण व अफगानिस्थान या देशांत चालू शतकाच्या आरंभापासून आपल्या वंशीय व सांस्कृतिक परंपराबद्दल नवीन दृष्टिकोन निर्माण झालेला आहे. या देशांनी आपल्या तुर्की व फार्सी भाषांतून अरबी शब्दांची उचलबांगडी केलेली आहे. ईराण व अफगानिस्तान या देशांतून आर्यवंशीयत्वाचा स्वाभिमान जागृत झालेला आहे. त्यांना आपल्या आर्य संस्कृतीचा आता मोठा अभिमान वाटत आहे. इस्लामी संस्कृति हा शब्दप्रयोग त्यांना आता तिरस्करणीय वाटू लागला आहे. ईराणी विद्वान आपल्या प्राचीन संस्कृतीचा सखोल अभ्यास करीत आहेत. सईद नफीसी या ईराणी पंडिताने तर इस्लामी संस्कृती हा शब्दप्रयोगच चुकीचा असून त्याचे वास्तव नाव ईराणी संस्कृति होय असे साग्रह प्रतिपादिले आहे. तो म्हणतो— “ **ब-हमीं जिहत ईं इस्तिलाह व तअ़बीरे– ‘ तमद्दुने-अ़रब ’ या तमद्दुने-इस्लाम ब-कुल्ली बातिल व ख़तास्त व बायद ‘ तमद्दुने-ईराण ’ नामेद.** ” या सर्व कारणांवरून ‘ अरबी संस्कृती ’ वा ‘ इस्लामी संस्कृती ’ ही परिभाषा व अर्थ सर्वस्वी निरर्थक व चुकीची आहेत. तिचे नाव ‘ ईराणी संस्कृती ’ असे पाहिजे.

ईराणी संस्कृतीचा प्रभाव

मुसलमानांच्या काळात भारतीय इतिहासावर काही विशिष्ट परिणाम

दिसून आले. त्यांच्याकडे वरील पार्श्वभूमीच्या प्रकाशात पाहिले तर काही गोष्टी ठळकपणे नजरेत भरतात. त्यापैकी एक गोष्ट अशी की चार-पाचशे वर्षे मुसलमानांचे राज्य व साम्राज्य भारतात असून देखील येथील भारतीय समाज भारतीय आर्यसंस्कृतीचे याही परिस्थितीत जतन करू शकला आणि बहुधा सर्वच समाज आर्य, हिंदूच राहू शकला. ईराणचे लोकही आर्यवंशीय व त्यांची संस्कृतिही भारतीय संस्कृति इतकीच प्राचीन व प्रतिष्ठित. असे असूनसुद्धा अरबांच्या आक्रमणामुळे शंभर वर्षांच्या आतच संपूर्ण ईराणचे इस्लामीकरण पूर्ण झाले. शक ५७४ त सासानी साम्राज्य अंतिमतः नष्ट झाले आणि ईराणच्या आर्य संस्कृतीचे प्रतिनिधि असलेले ज़रतुष्ट्रधर्मी पारसी लोक शक ६७२ च्या सुमारास भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर उतरले. हे वर्ष ईराणच्या इस्लामीकरणाचा शेवटचा काल समजण्यास हरकत नाही. माझ्या मते हे इस्लामीकरण इतक्या झपाट्याने होण्याची मुख्यतः दोन कारणे आहेत. एक तर रानटी किंवा अर्धरानटी अवस्थेतून नुकत्याच सम्राटपदावर आरूढ झालेल्या अरबांचा धार्मिक कडवटपणा. दुसरे अरबांचा सर्वाधिकारी साम्राज्यवाद. या कारणांची व इतिहासघटनांची छाननी प्राचीन ईराणी संस्कृतीच्या अभ्यासकांनी केलेली आहेच. त्यांच्या चर्चेत शिरण्याचे येथे कारण नाही. ईराण देश तसा बराच विस्तीर्ण आहे. परंतु आज ईराणची लोकसंख्या केवळ दोन कोटींच्या जवळपास आहे. त्यावेळी बरीच कमी असावी. या दोन प्रमुख कारणांमुळेच ईराणचे इस्लामीकरण अनपेक्षितरीत्या लौकर झालेले आहे. परंतु भारतात मात्र तसे झालेले नाही. भारतातही हिंदूंचे इस्लामीकरण झाले. पण त्यात अरबांनी ईराणात दाखविला तसा जोर व कडवटपणा दिसत नाही. याचा मुख्य पुरावा म्हणजे आज भारतात असलेली आर्य भारतीय संस्कृती आणि हिंदू समाज ही होत. पंजाब, सिंध, बलुचिस्तान हा प्रदेश गेल्या दोन अडीच हजार वर्षांत नेहमीच ईराणी किंवा भारतीय राज्यात सामील राहिलेला दिसून येतो. तेथील हिंदू समाजास प्रारंभी भारतीयेतरांचा व गेल्या हजार वर्षांत मुस्लिम विदेशीयांचा संपर्क बाधलेला दिसून येतो. पूर्वीचा ब्रह्मावर्त किंवा आजचा भारतीय पंजाब, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश इत्यादि प्रांत मुसलमानी राज्यात शतकानुशतके राहूनही त्या प्रांतात मुसलमानांची संख्या १०-१५ टक्क्यांहून अधिक दिसून येत नाही. याचे मुख्य कारण, माझ्या मते **भारतात आलेल्या मुसलमानांच्या संस्कृतीची जडण-घडण वेगळ्या प्रकारची होती. ती ईराणचे इस्लामीकरण घडवून आणणाऱ्या अरब संस्कृतीहून अगदीच भिन्न आहे.** ही गोष्ट प्रामुख्याने येथे लक्षात ठेवली पाहिजे. येथे आलेले मुसलमान बहुधा ईराणी मुसलमान होते. त्यांच्यातील काही तुर्क व काही मुगल होते; हे दोन्ही गट परवा-परवापर्यंत बौद्धधर्मीय होते. शक १२०० च्या सुमारास ईराणमधील चंगीज़खानाच्या राज्यकर्त्या वंशजांनी इस्लामधर्माचा स्वीकार केलेला

होता. त्याचे इस्लामपण कडवटपणापासून बरेच मुक्त होते, असे ईराणच्या इतिहासात देखील अनेक ठिकाणी प्रत्ययास आलेले आहे.

ईराणी मुसलमान हे अगदी आरम्भापासून अरबांचा मनात हेवा करणारे व आपले सांस्कृतिक व भाषिक श्रेष्ठत्व न विसरणारे असे आहेत. ईराणी अस्मितेच्या जाणिवेचा मागोवा सातत्याने मिळतो. शाहनामा ग्रंथात अरबांच्या आक्रमणाचा तिरस्कारच केलेला दिसून येतो. तेथे ईराणी राजवंश, संस्कृती व भाषा यांचे श्रेष्ठत्व वर्णिलेले दिसून येते. मुहम्मद पैगम्बर, इस्लाम किंवा अरब संस्कृती यांचे गोडवे गाईलेले शाहनाम्यात पाहावयास मिळत नाहीत. ईराणच्या श्रेष्ठ-ज्येष्ठ कवींनी ईराणी राष्ट्रपुरुषांनाच आपली काव्यसुमने वाहिलेली आहेत. तेथे अरब-प्रशस्ती मुळीच दिसून येत नाही. ईराणच्या मुसलमानांनी, अरब मुहम्मद पैगम्बराचे खरे राजकीय वारस दमस्कसमधील उमय्य खलीफा यांना खाली ओढण्यासाठी आरम्भापासून शियापंथाची जोपासना केलेली आहे. शिया धार्मिक पंथ असूनही तो राजकीय क्रांतीचे प्रभावी साधन राहिलेला आहे. म्हणून शिया व सुन्नी यांचे अंतर्गत कलह आजदेखील भारतातही सर्वत्र पाहावयास मिळतात.

शक १५०० ते १६०० हे शतक भारतीय मुसलमानांच्या परमोत्कर्षाचा काळ होय. समग्र भारत या शतकात मुसलमानी राज्यसत्तेखाली आलेला होता. विरोधी गोटात सर्वत्र बहुधा सामसूम होती. परंतु या समग्र शतकात भारतात आपणाला धर्म वेडाचे थैमान माजलेले होते असे म्हणता यावयाचे नाही. मुगल सम्राट अकबर, जहांगीर व शाहजहान यांना माथेफिरू धर्मवेडयात काढणे कठीण. याच काळात दक्षिण भारतात नांदत असलेली दोन मोठी राज्ये, आदिलशाही व कुतुबशाहीची. आदिलशाही घराणे ईराणातील तुर्की मुसलमानांचे होय. आदिल-शाहीच्या आद्य संस्थापक यूसुफ आदिलखानाने एका मराठी स्त्रीशी लग्न करावे व ती पट्टराणी व्हावी, तिचाच वंश राज्याचा स्वामी बनावा ही गोष्ट विचारणीय आहे. माझ्या जन्मगावी नागरसोगा येथे (हे गाव औसा किल्ल्यापासून ४ मैल) काही अरबांची कुटुंबे आहेत. त्यांची नांवे उमर बिन उस्मान, गालिब बिन ताहिर, फरज बिन सालम अशी आहेत. या अरबांच्या व्यक्तिनामात शम्सुद्दीन सारख्या नामात आढळणारा दीन (धर्म) हा शब्द आढळत नाही. दीन शब्द हा धर्मान्तरित मुसलमानांत अधिक आढळतो. भारतात हा प्रघात जास्त प्रमाणात दिसून येतो. हे अरब भारतीय मुसलमानांशी बेटीव्यवहार करीत नाहीत. आज देखील हेच चालू आहे. त्यांच्या भारतातील वास्तव्याला २।३ शतके होऊन गेली असावीत. पण हा अरबांचा वंशीय वेगळेपणा अजूनही शिल्लक आहे. याच्या उलट अकबराचे व यूसुफ आदिलशाहाचे हिंदू स्त्रियांशी लग्न करण्याचे मर्म लक्षात येत नाही. हैद्राबादचे कुतुबशाही राजघराणेही तुर्की मुसलमानांचे आहे. कुतुबशाहांनी हिंदू स्त्रियांशी लग्ने केल्याचे नमूद आहे.

शकाच्या या १६ व्या शतकात भारतातील मुसलमान राज्यकर्ते बऱ्याच अंशाने धर्मसहिष्णू होते, ते इस्लाम धर्माचे धर्मवेडे नव्हते, असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा. अकबर, जहांगीर, शाहजहान व औरंगजेबही यांच्या सैन्यात हिंदू अधिकाऱ्यांचे व सेनानींचे वाढते प्रमाण आता संशोधकांनी समोर मांडलेले आहे. ही गोष्ट एका दृष्टीने भारतीयांनी मुसलमानाशी केलेल्या सहकार्याची द्योतक असली तरी, त्यातून शासकांच्या भूमिकेचीही थोडीशी कल्पना येतेच. विद्यापूर (बीजापूर) येथे इब्राहीम आदिलशाहाची कारकीर्द (शक १५०२ ते १५४९) सुमारे पन्नास वर्षे चालली होती. या कालात मुसलमान शासकांचे चित्र वेगळेच दिसते. पैठण हे विद्येचे व शास्त्रीवर्गाचे माहेरघर. तेथे न्यायनिवाडा चांगला होतो, म्हणून बादशाहाने आपल्या राज्यातील कांही भांडणप्रकरणे पैठणास पाठवून दिली. इब्राहीम बादशाह सरसुती, गणपती, राम-सीता यांना पूज्य मानणारा व स्वतः जगद्गुरू म्हणवून घेणारा. गोवलकोंडयाच्या अब्दुल्ला कुतुबशाहाची कारकीर्दही (शक १५४८ ते १५९४) दीर्घकालीन. त्याच्याही बाबतीत काहीसा असाच अनुभव येतो. अब्दुल्ला कुतुबशाहाने रामाचे गुणगानही केलेले दिसते.

रख इश्क पो दिल की आंक बनवास
सीता की तरफ़ थे राम लेता।

ईराणमध्ये याच कालखंडात सफ़वी हे तुर्कवंशीय राजघराणे सर्व देशभर सत्ता गाजवीत होते. शाह अब्बास सफ़वी याची कारकीर्द (शक १५१२ ते १५५१) दीर्घ कालपर्यंत चालली. हे घराणे जरी तुर्क असले तरी ते ईराणी संस्कृतीत इतके एकरूप बनले होते की ईराणी लोकांना त्याचा परकेपणा मुळीच जाणवला नाही. या सफवी घराण्याचा काल (शक १४२४ ते १६५८) दोनशे वर्षांहून अधिक आहे. या कालात ईराणी कला, विद्या, शिल्प इत्यादींचा चांगलाच उत्कर्ष झाला. शिवाय याच कालात ईराणमध्ये शियापंथाची जोपासना राजकीय आश्रयाखाली झाली. एकूण हे राजघराणे ईराणी राष्ट्राच्या इच्छा-आकाक्षांशी एकरूप झाले.

उत्तम राज्यकर्ते

उत्तमोत्तम राज्यकर्ते निर्माण करण्याची ईराणची प्राचीन परंपराच दिसून येते. अब्बासी खलीफांचे मुख्य मंत्री किंवा वज़ीर या पदावर असलेल्या बरमकाचा उल्लेख यापूर्वी आलेला आहे. न्यायप्रिय खुस्रौ अनुशीरखान याचा भव्य राजवाडा पाडू नये असा सल्ला त्यानेच दिलेला होता. बगदादमध्ये विद्या, कला, शास्त्रे यांच्या अभ्यासाची परंपरा सुरू करण्याचे श्रेय बरमकालाच आहे. ईराणी इतिहासातील श्रेष्ठ दर्जाचा दुसरा वजीर म्हणजे अबू अली बिन इसहाक़ उर्फ निज़ामुल्मुल्क हा होय. तो सलजुक या तुर्कवंशीय राजघराण्याचा बगदाद येथे वजीर होता. तो २–३ राजांचा वजीर राहिला. त्याची विद्याभिरुचि इतिहासप्रसिद्ध आहे. त्याने

निज़ामिया विद्यापीठांची वगदाद व नैशापूर (खुरासाना)येथे स्थापन केली. नैशापूर येथील विद्यापीठात उमर ख़य्याम हा रुबाई गाणारा कवी व प्रसिद्ध गणितज्ञ प्राध्यापक होता. निजामुल्मुल्क हा उत्तम राज्यकर्ता, राजकार्यधुरंधर, शिक्षणप्रेमी आणि विद्वानांचा आश्रयदाता होता. त्याचा जन्म दहक़ान म्हणजे ईराणी श्रीमंत शेतकरी घराण्यात झालेला होता. ईराणी, संस्कृतीचे तो फळ होता असे समजले जाते. त्याने सियासत-नामा (राज्यशास्त्र) नावाचा ग्रंथ लिहिला; तो प्रकाशित झालेला आहे. त्याचा जन्म शक ९३९ व मृत्यू शक १०१४ मधील आहेत. सियासत-नामा हा ग्रंथ फार्सी गद्याचा एक उत्तम ग्रंथ समजण्यात येतो.

या संदर्भात बहमनी राजाचा प्रमुख वज़ीर महमूद गावान याची आठवण होते. मलिक अंबराप्रमाणे गावानने देखील मोडकळीस येत चाललेली आपल्या स्वामीची राजसत्ता सुस्थिर केली व वाढविली. गावानने देखील बीदर येथे मदरसा म्हणजे विद्यापीठ स्थापिल्याचे प्रसिद्धच आहे. त्याच्या पत्रांचा रियाजुल्-इनशा हा ग्रंथ प्रसिद्ध झालेला आहे.

वरील कथनाचा हेतू असा की अशाप्रकारचे चांगले राज्यकर्ते व सत्ताधारी संस्कृतीच्या खालच्या पातळीवर असलेल्या तुर्क, मुगल आदीमध्ये कसे निर्माण होऊ शकले? राज्यकर्ते वरील गुणांनी संपन्न असण्याची घटना संस्कृतीच्या एका विशिष्ट पातळीवर पोचलेल्या लोकांमध्ये निर्माण होणे शक्य असते. भारतात असे विद्याभिरुचिसंपन्न, लोकहितकर्ते राज्यकर्ते व राजे निर्माण झाल्याची परंपरा फार प्राचीन आहे. त्यांची उदाहरणे येथे देण्याची गरज नाही. पण ही परंपरा मुसलमान राज्यकर्त्यांना कळणे व त्याप्रमाणे त्यांनी कार्यप्रवण होणे, हे त्यांच्या भाषा-संस्कृतिभिन्नत्वामुळे कठीण व दुरापास्त होते. म्हणून अकबरासारखे धर्मसहिष्णु, विद्याधन व विशालदृष्टि राजे, शेरशाह सूर-सूरी-सारखे नवोदित, सामान्य पण प्रजाहितदक्ष राज्यकर्ते, तसेच महमूद गावानसारखे धोरणी, विद्यासंपन्न मुत्सद्दी वज़ीर यांच्या अद्वितीयत्वाचे मर्म, हे सर्व ज्या सामाजिक वातावरणात वाढले, मोठे झाले त्या ईराणी संस्कृतीच्या पार्श्वभूमीत आहे असे मला आवर्जून सांगावयाचे आहे.

या ईराणी संपर्कामुळे भारतात इतिहासलेखनाचे रोप काही विद्वानांनी लावले. परंतु ते जगले नाही आणि त्याचा फारसा प्रसार झाला नाही असेच म्हणावे लागते. तसे पाहिले तर भारतात इतिहासलेखन परंपरा नव्हतीच. निदान पाश्चात्य पद्धतीने तर ती मुळीच नव्हती. भारतातील पहिला इतिहासकार कल्हण होय असे वाटते. त्याने आपला राजतरंगिणी ग्रंथ शक १०७० मध्ये पूर्ण केला. हा काश्मीरी पंडित. याच काळात काश्मीरी विद्वानांना इतिहास लिहावासा वाटला हे देखील लक्ष्य आहे. अल्बीरूनी याने आपला भारत व इतर ग्रंथ एका

शतकाच्या अगोदर लिहिले होते. त्याचा मृत्यू शक ९७० मध्ये वयाच्या ७५ व्या वर्षी झाला. तसेच महाभारतरूप फार्सी शाहनामा ग्रंथाच्या कर्त्या फिर्दौसीचा देहान्त शक ९५४ मध्ये झाला. त्याने आपला इतिहास ग्रंथ शक ९३२ मध्ये पूर्ण केला होता. गरदेज़ी याचा ज़ैनुल्-अखबार हा अफ़गानिस्तानचा इतिहास ग्रंथ शक ९७२ त लिहिलेला होता. एका अज्ञात लेखकाचा, 'सइस्तानचा इतिहास' हा इतिहास ग्रंथ शक ९७६ मध्ये पूर्ण झालेला होता. ज्ञात ईराणी इतिहासलेखनाची परंपरा आणखी शेदोनशे वर्षे मागे जाईल. पण कल्हणासारख्या विद्वानाच्या कल्पनेला फिर्दौसी, बीरूनी आणि गरदेज़ी यांच्या विद्वत्तासंपन्न लेखनाने चालना मिळणे शक्य आहे. कल्हणाने सुव्रत, क्षेमेन्द्र (ग्रंथ नृपावली), पद्ममिहिर आणि छविल्लाकर या इतिहास-लेखकांचा उल्लेख आपल्या ग्रंथात केलेला आहे. पद्ममिहिर याच्या नावावरून तो ईराणी संस्कृत पंडित दिसतो. वराहमिहिर सर्वपरिचित आहेच. ही काश्मीरमध्ये सुरू झालेली परंपरा भारतात इतरत्र क्वचितच पोचली. याच सुमाराचा बिल्हणाचा दक्षिणेत लिहिला गेलेला इतिहास, 'विक्रमांकदेवचरित' उपलब्ध व प्रकाशित आहेच. असेच अन्य किरकोळ प्रयत्न झालेले दिसतात. यानंतर फक्त छत्रपति शिवाजी महाराजांनी कवीन्द्र परमानन्द याच्याकडून आपला इतिहास लिहवून घेतला. हे झालेले चारदोन प्रयत्न ईराणी इतिहासलेखन परंपरेचाच परिणाम होय.

आपल्या उपलब्ध साहित्याचा इतिहास लिहिण्याची चाल, मला वाटते जगात सर्वप्रथम ईराणी लोकांनी केलेली असावी. फार्सी साहित्याचा पहिला इतिहास शक ७६७ च्या सुमारास लिहिला गेला. तो उपलब्ध नाही. लुग़ाते-फ़र्स या ग्रंथात ७६ कवींच्या काव्यांतील अवघड, जुन्या व आर्ष शब्दांचे अर्थ दिलेले आहेत. हा एका अर्थाने साहित्येतिहासही ठरतोच. हा ग्रंथ असदी तूसी याने शक ९८२ मध्ये लिहिला. निज़ामी आ़रूज़ी याचा चहार-मक़ाला हा ग्रंथ शक १०७७ मध्ये लिहिला गेला. असे अनेक उत्तम कनिष्ठ साहित्येतिहास फार्सी भाषेत विखुरलेले सापडतात. जुन्या परंपरेतील शेवटचा प्रसिद्ध साहित्येतिहास रज़ा कुली ख़ान याने शक १८०० मध्ये लिहिलेला आहे. फार्सीच्या या सहवासाने उर्दू व दक्खिनी हिंदीच्या लेखकांनी, इतर आर्यभारतीय भाषातल्यापेक्षा बरेच अगोदर साहित्येतिहास लिहिलेले आढळून येतात. शक १३५० च्या सुमारास लिहिल्या गेलेल्या, 'स्मृतिस्थळास' देखील एका अर्थाने मराठीचा साहित्येतिहास म्हणता येते.

शक १८८६ मध्ये दिल्ली येथे प्राच्यविद्या विश्वसंमेलन भरले होते. त्या संदर्भात मुस्लिम वैयक्तिक कायद्यातील परिवर्तन हा परिसंवाद घडून आला. त्याचे प्रतिवृत्त त्याच वर्षी प्रसिद्ध झाले आहे. मुसलमानांच्या वैयक्तिक कायद्यात ईराण, तुर्कस्थान, संयुक्त अरब गणराज्य, इत्यादि देशातील प्रतिनिधींनी त्या त्या देशात झालेल्या परिवर्तनांचा उल्लेख करून अशी परिवर्तने व्हावीत, कुरानात

त्याला प्रतिबंध नाही, असे प्रतिपादिले. परंतु भारतातील न्या. छगला व हुमायून कबीर यांच्याखेरीज अन्य प्रतिनिधींनी अशा परिवर्तनास धर्मग्रंथाचा विरोध असल्याचे प्रतिपादिले. एकाने तर मी स्व. अबूल्कलाम आज़ाद यांचा वैयक्तिक कार्यवाह होतो, या भांडवलावरच अपरिवर्तनीयता प्रतिपादिली. आजकाल कोणीही सुजाण हिंदू वेदांना अपौरुषेय मानीत नाही. तसेच बायबल ईश्वरप्रेरित व ईश्वर-प्रेषित असल्याचे कोणीही सश्रद्ध ख्रिश्चनसुद्धा प्रतिपादीत नाही. हिंदू आणि ख्रिश्चन वैयक्तिक कायद्यात परिवर्तने यथासांग होत आहेत. उपरिनिर्दिष्ट मुसलमानी देशातसुद्धा आजही डोळ्यादेखत परिवर्तने घडत आहेत. पाकिस्तानात संततिनियमन व एकपत्नीत्व कायदेशीर ठरलेच आहे. तर भारतातील मुसलमानाची ही प्रतिगामी वृत्ति का? ईराण, तुर्किस्तान, इजिप्त, अफगाणिस्तान इत्यादि स्वतंत्र देशातील मुसलमानांकडे पाहिले म्हणजे भारतीय मुस्लिमांच्या या वृत्तीचे कोडेच पडते. असे का घडले याचा उलगडा होण्यास वरील देशांचे इतिहास उपयुक्त ठरतील. ईराणबद्दलच्या थोड्याशा माहितीवरून मला पुढील गोष्टी मांडाव्याशा वाटतात.

अरब, अरबी इस्लाम व कुरानाचे अनाठायी स्तोम यांच्या आहारी ईराणी मुसलमान कधीच गेला नाही. इस्लामाच्या ऊर्जितावस्थेचा पहिला तडाखाच ईराणला लागला. ईराणी समाज जरी इस्लामधर्मी बनला तरी त्याने स्वतःला आपल्या प्राचीन संस्कृतीचा कधीच विसर पडू दिला नाही. अरब आणि अरबी संस्कृतीच्या पक्षपाती ब्राऊनला देखील मोकळ्या मनाने ईराणी संस्कृती व ईराणी विद्वानांचे कौतुक मुक्तकंठाने करावे लागले. हे अरबी नव्हे, हे ईराणी आहे असे तोही वारंवार म्हणतो. ईराणमधील इस्लाम हा अरबी इस्लामापेक्षा वेगळ्या प्रकारचा आहे, हे ईराणी शासनाच्या खालील कथनावरूनही कळण्यासारखे आहे. The philosophic trend which produced the peculiar form of Persian Islam had started long before the new era of Persian literature began but was towards the end of the 10th Century that it began to take shape and expression by Poets.

भूतकालीन सांस्कृतिक अभिनिवेश वरील विधानात फारच अंधुक व पुसट रीतीने व्यक्त झालेला आहे. डॉ. इब्राहीम पूरे-दावूद सारख्या स्वतंत्रप्रज्ञ ईराणी संस्कृतीच्या प्रतिनिधीतून तो यापेक्षा किती तरी पटीने अधिक असा व्यक्त होतो. वरील प्रकारचा प्राचीन भूतकालीन अभिमान भारतीय मुसलमानांना वाटत असल्याचे दिसून येत नाही. येथील मुसलमानांना वाटते की भारतीय इतिहास १० व्या, ११ व्या शतकापासूनच सुरू झाला. ईराण इत्यादि स्वतंत्र राष्ट्रांतील मुसलमान, भारतातील हिंदूंप्रमाणेच.

आपल्या धर्माकडे समाजविकासाचे, देशाच्या उन्नतीचे प्रभावी साधन अशा दृष्टीकोनातून पाहातात. याच्या उलट भारतीय मुसलमानांना इस्लाम हे त्यांच्या स्वतंत्र अस्मितेचे साधन आहे असे वाटते. समाजोपयोगी बदल वा परिवर्तन ऐतिहासिक दृष्टीने सर्वच नव्या व जुन्या धर्मांत होत आलेले आहे. पण भारतीय मुसलमान हे, धर्मातील सामाजिक अंगांना देखील अपरिवर्तनीय असे मानतात. त्यातूनच वैयक्तिक धर्मशास्त्राच्या अपरिवर्तनीयतेची बाब पुढे आलेली आहे. त्या बदलामुळे आपल्या एकात्मतेत ढिसूळपणा येईल असे मुसलमानांना वाटते. जसे वेद मनुष्यनिर्मित तसे कुरान हे मुहम्मदासारख्या विद्वान व विशालदृष्टी मनुष्याने लिहिले वा लिहविले असे मानणे त्यांच्या जिवावर येते. त्यामुळे मुसलमान समाज विस्कळीत होईल असे त्यांना वाटत असावे.

भारतीय मुसलमानाला येथील हिंदूंच्या संख्याधिक्याचे नेहमीच भय वाटत आलेले आहे. या भयाच्या छायेतच वेगळेपणाची भावना परिपुष्ट होत आलेली आहे. याची प्रतिक्रिया म्हणून बहुसंख्य समाजाने उर्दू-फार्सीविषयी उदासीनता दाखविलेली आहे. मुसलमानांच्या सत्ताकालातदेखील, कायस्थांखेरीज, अन्य हिंदूंनी दक्खिनी व फार्सीच्या विकासात संपूर्ण असहयोग केलेला दिसून येतो. त्या काळी राजकीय दृष्टिकोनातून हिंदूची ही वृत्ति बळावलेली होती.

"**हुब्बुल्वतन मिनुल्ईमान**" म्हणजे आपल्या देशावर प्रेम करणे हा धर्मनिष्ठेचाच भाग आहे, असा आदेश हदीसमध्ये दिलेला आढळतो. कुरान हे अरब राज्याचा अरब साम्राज्यात विकास होण्याच्या अगोदर लिहिलेले आहे. मुहम्मद पैगंबरांच्या हयातीपर्यंत (शक ५५४) साधारणतः सर्व अरब देश मुहम्मदांच्या राजकीय वर्चस्वाखाली आला होता. या सर्व अरबांना देशप्रेमाच्या धाग्यानेही बांधावे असा मुहम्मदाचा हेतू या विधानात दिसतो. परंतु वरील आदेश देतांना मुहम्मदाला त्याचे सर्व अभिप्रेत अर्थ (Implications) कळले होते, असे पुढील इतिहासावरून म्हणता येत नाही. कारण अरब सत्तेचा पुढे साम्राज्यात विस्तार झाला. आता सीरीया वा ईराकमधून चाललेल्या मध्यवर्ती सत्तेला ईजिप्त, अल्जेरिया, मोरोक्को, ईराण, भारत येथील निवासी मुसलमानांनी साम्राज्यभक्ती कशी दाखवावयाची ? हदीसच्या या आदेशाची अरबांनी पायमल्ली केली अशी तक्रार ईराणी राष्ट्रभक्त कवि-साहित्यकांनी केलेली इतिहासात नमूद आहे. ईराणच्या वादविवादपटू विद्वानांनी मुहम्मदाच्या या आदेशाचा वापर आक्रमक अरब साम्राज्यवाद्यांच्या विरुद्ध केलेला दिसून येतो. तसेच मुहम्मदाने ईराणमध्ये जन्मलेल्या ज़रतुष्ट्रधर्मीय लोकांना अहले-किताब ठरविलेले आहे. अहले-किताब (धर्मग्रंथ असलेल्या) लोकांना काही करांतून मुक्त करावे असा आदेश कुरानात आहे. पण शासनाच्या कोशावर याचा अनिष्ट परिणाम होतो म्हणून ही करमाफी पहिल्या चार धर्मनिष्ठ खलीफांच्या काळातदेखील मिळालेली नाही, अशी ईराणी लोकांची तक्रार आहे.

वरील आदेशाचा तिसरा एक अभिप्रेत अर्थ आहे. तो म्हणजे बहुसंख्य अन्य-धर्मीय व अल्पसंख्य मुसलमान असलेल्या देशातील मुसलमानांच्या धर्मादेशपालनाचा. आजच्या बदललेल्या लोकशाही व राष्ट्रीयहित सर्वमान्यता पावलेल्या काळात कदाचित आज समजण्यात येते त्याप्रमाणे, मुसलमानांनी त्या त्या देशाचा अभिमान बाळगावा हे ठीक आहे. परंतु राष्ट्रीयत्वाची ही कल्पना उदय पावलेली नव्हती त्यावेळी सत्ताहीन मुस्लिम अल्पसंख्याकांची विशेषतः मुस्लिम आक्रमणाच्या प्रसंगी मोठी अडचण झालेली असावी.

आणखी एक विचार समोर मांडावासा वाटतो. भारतीय आर्य संस्कृतीवर इस्लामी संस्कृतीचा दूरगामी परिणाम झालेला आहे, असे काही विद्वानांनी प्रमेय मांडलेले आहे. वास्तविकरीत्या या प्रश्नाची अधिक खोल जाऊन शहानिशा करावयाला पाहिजे. प्रथम ही गोष्ट लक्षात असावी की इस्लामी संस्कृतीचे मूलतः स्वरूप काय आहे, आणि तिचा भारतीय संस्कृतीवर काय परिणाम झालेला आहे. इंग्रजी भाषेत कल्चर आणि सिव्हिलायझेशन असे दोन शब्द संस्कृतीचा आशय व्यक्तविण्यासाठी वापरण्यात येतात. त्याचाच अनुवाद फार्सी वा उर्दू भाषेत तमद्दुन व तहज़ीब या शब्दांमध्ये केलेला दिसून येतो. कल्चर शब्दामध्ये सहवासाने, अनुकरणाने उतरलेल्या गोष्टी येतात. दोन सामाजिक गट ऐतिहासिक कारणांमुळे एकत्र नांदू लागले तर एकाच्या सहवासाने दुसरा परिणामित होणे सहज शक्य असते. अशा काही गोष्टी इस्लामी अर्थातच ईराणी संस्कृतीच्या साहचर्याने भारतीय आर्य-समूहात समाविष्ट झाल्या हे खरे आहे. तसेच भारतीय आर्य समाजांच्याही अनेक गोष्टी इस्लामी समाजात शिरल्याचे उर्दू व फार्सी साहित्यांवरूनही दिसून येते. इंग्रजांच्या सहवासाने अशा कितीतरी बारीकसारीक गोष्टी भारतीय हिंदू मुसलमानांत आलेल्या आहेत. त्यांची नोंद करणे हे कठीण काम आहे. परंतु त्यामुळे भारतातील आर्य व इस्लामी संस्कृति सर्वस्वी बदलली किंवा त्यांच्यात आमूलाग्र बदल झाला असे म्हणता यावयाचे नाही. संस्कृती ही त्या त्या मानव-समूहांचा मानसिक, वैचारिक परम्परागत आलेला ठेवा असतो. भारतीय आर्यांचे पिंडदान, स्वर्गप्राप्ती यावर आधारलेले दत्तकविधान हे सांस्कृतिक आशयाचे प्रतीक आहे. पिंडदान व स्वर्ग यांवर आज कोणीही विश्वास ठेवीत नाही. परंतु या दोन गोष्टींवरच आधारलेले दत्तक विधान आजच्या हिंदू कोड विधानात स्वीकारलेले आहे. हिंदूंचे धर्मशास्त्र, त्यांचे तत्त्वज्ञान, त्यांची सामाजिक परम्परा या गोष्टी संस्कृतीचा आत्मा होत. इस्लामच्या साहचर्याने त्यात किती बदल झाला म्हणून विचारल्यास त्याचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. काही किरकोळ प्रथा, चालीरीती नवीन आल्या, त्यामुळे भारतीय आर्यसंस्कृतीचा आत्माच बदलला असे म्हणणे कठीण आहे. एका महान् जुनाट विस्तीर्ण अशा वृक्षाची सर्व पाने शिशिर ऋतूत गळून गेली, वृक्ष अगदी खराट्यासारखा व निष्पर्ण

झाला तरी वृक्ष मेला असे कोणीही मानीत नाही. योग्य वेळी तो फलपुष्पांनी पुनः मोहोरतो. प्रसंगोपात्त आलेल्या बारीकसारीक चालीरीतींचे असेच आहे असे मला वाटते. इस्लामी संस्कृतीच्या साहचर्याने भारतीय आर्य संस्कृतीचा आत्मा पार बदलून गेला असे मानणे युक्त होणार नाही. भारतीय संस्कृतीला संमिश्र Composite Culture म्हणणे हेही तितकेसे युक्तिसंगत वाटत नाही. तिचा आत्मा आर्य संस्कृतीचाच आहे हे विसरता यावयाचे नाही.

संदर्भ ग्रंथ

१. **सिलेक्ट इन्स्क्रिप्शन्स,** दीनेशचंद्र सरकार, कलकत्ता, १९६५.
२. **ए.–सचौः–अल्बेरूनीचा भारत** (इंग्रजी), लाहोर १९६२.
३. **ए लिटररी हिस्टरी ऑफ पर्सिया,** ई. जी. ब्राऊन, खण्ड १, लंदन १९०२.
४. **शिअ़रुल-अ़जम, शिबली अ़मानी, खण्ड १,** आज़मगड़, १९४०.
५. **डी. जे. ईरानी मेमोरियल व्हाल्यूम,** मुंबई १९४३, पृ. ३३ ते ५२.
६. **ख्रिस्टनसेनकृत ईरान ब-अ़हदे-सासानियान,** डॉ. इक़बाल, दिल्ली १९४१.

◆◆◆

२ : तारीखे मआसरे ईराण

ईराणी (फार्सी) भाषेत लिहिलेला हा आधुनिक ईराण देशाचा इतिहास. डॉ. मीर्ज़ा सईदखान नफीसी या विद्वानाने लिहिलेला, शाहनशाह रज़ाशाह पहलवी, सध्याचे शाहनशाह मुहम्मद रजाशाह, यांचे वडील, याच्या कारकीर्दीचा शक १८४३ ते १८६४ मधील वीस एकवीस वर्षांच्या ईराणमधील महत्त्वाच्या राजकीय घटनांचा इतिहास आहे. पुस्तकाची ही दुसरी आवृत्ती आहे. ती सौर हिजरी १३४५ म्हणजे शक १८८८ साली तिहरान शहरातून काढलेली आहे. पहिली आवृत्ती केव्हा प्रसिद्ध झाली हे कळू शकले नाही. परंतु ती शक १८६४ च्या नंतर निघालेली असावी.

सईद नफीसी हे मोठे विद्वान गृहस्थ होते. त्यांचा, हे पुस्तक प्रसिद्ध होण्याच्या सुमारास देहान्त झाला. त्यांचे अनेक शोधप्रबंध प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांनी अनेक ग्रंथांचे सम्पादनही केलेले आहे. पैकी भारतीयांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा त्यांनी लिहिलेला ग्रंथ म्हणजे सरचश्मए-तसव्वुफ दर ईराण, म्हणजे ईराणमधील तसव्वूफ अर्थात् भक्तिमार्गाची भागीरथी. प्रस्तुत ग्रंथ रजाशाह पहलवी यांच्या शासक या नात्याने दिलेल्या शासकीय आज्ञेने लिहिला गेलेला आहे. रज़ाशाह हा ईराणी सेनेत तिहजारी 'सरतीप' (३००० सेनेचा संचालक) होता. दुसऱ्या जागतिक महायुद्धात काजार या ईराणमधील तुर्क राजवंशाची सत्ता कोलमडली. रजाशाहाने आपल्यापुरतीच सत्तेची सूत्रे हाती घेऊन रशियन सेनेस शक १८४३ त पिटाळून लावले. त्याने राज्यसूत्रे हाती घेतली. शक १८४८ मध्ये ईराणी प्रतिनिधींनी त्याची शाहनशाह म्हणून स्थापना केली. आपल्या कारकीर्दीचा इतिहास लिहावा म्हणून शक १८५६ मध्ये सईद नफीसी यास शाहनशाहाच्या अनुज्ञेने मंत्र्याकडून आज्ञा मिळाली. हा इतिहास शाहनशाहाची कारकीर्द संपल्यानंतरच पुरा व्हावयाचा. विश्वासार्हता येण्यासाठी नफीसी यांना सरकारी सर्व कागदपत्रे पाहता येतील असे फर्मानात नमूद आहे.

ग्रंथाची पाने १८५ आहेत. संपूर्ण अशी विषयनामसूची दिलेली आहे. पहिल्या प्रकरणात काजार राजांची सर्वत्र दिवाळखोरीची राजवट थोडक्यात सांगून, रजाशाह पहलवीच्या राजकालातील घटनांचा कालपट देण्यात आलेला आहे. पुढील प्रकरणात ईराण राष्ट्राच्या राजकीय स्थैर्याचा आढावा घेतलेला आहे. नंतर देशात शांततेचे महत्त्व सांगून, अशांततेमुळे लोकजीवन व समृद्धी कशी उद्ध्वस्त होतात, हे ईराणी इतिहासाच्या सन्दर्भाने सांगितलेले आहे.

यानंतरच्या १२ प्रकरणांतून शाहनशाह आर्यामिहिर रजाशाह याने केलेल्या सुधारणांची विभाग–खातेवारीने चर्चा केलेली आहे. त्यात राज्यव्यवस्था, राजस्व, न्यायविभाग, समाजकल्याण, नागरीजीवन (Urban development), अर्थविभाग, कृषिविकास, उद्योगधंदे, शिक्षण व विद्याविकास, दळणवळण, लोहमार्ग (राहे–आहन) आणि सार्वजनिक आरोग्य यांची चर्चा केलेली आहे. महाराष्ट्र वा भारत शासनाच्या वृत्तांतातून जसे विकासकार्यासंबंधी आकडे येतात, त्याप्रमाणे ईराणात चालू राजवटीत झालेल्या विकासकार्यासंबंधी तद्देशीय नाणे रियाल (आजचा बाजार भाव १ रियाल म्हणजे भारतीय १५ पैसे) मध्ये आयव्ययाचे आकडे दिलेले आहेत. हे वर्णन अर्थात शक १८६४ पर्यंत म्हणजे रजाशाह पहलवीने राज्यत्याग करीपर्यंतचे आहेत. राज्यत्यागानंतर रजाशाह आफ्रिकेत राहण्यास गेले. काहरा (कैरो) येथे त्यांचा वयाच्या ७२ व्या वर्षी शक १८७३ मध्ये स्वर्गवास झाला. त्यांच्या शवाला तिहरान शहरात भूसमर्पित करण्यात आले.

सईद नफीसी हे आधुनिक पद्धतीने युरोपीय वातावरणात, विशेषतः फ्रेंच मार्गदर्शनाने प्रशिक्षित झालेले मोठे पंडित होते. ग्रंथात साध्या साध्या वर्ण्यविषय-वर्णनातही त्यांच्या विद्वत्तेची छाया पडलेली दिसून येते. साधा शेतीचा विषय वर्णितानाही त्यांची दृष्टी दूरगत भूतकालाकडे वळते. विषय आरंभ करतानाही "नियागाने मा आर्याने ईरानी अज़ कोह–हाए पामीर व–दस्त–हाए आसियाई-मर्कज़ी फ़रोद आमदा–अन्द, उसूले–मख़्सूसी दर आब–यारी व–कार बुर्दा–अन्द" म्हणजे आम्हा ईराणी आर्यांचे पूर्वज (नियागान∠ सं. नि+आ+क्र = पूर्वज) केंद्रीय आशियातून पामीरची जंगले तुडवीत आले. तेव्हा जलसिंचनाची विशेष तत्त्वे त्यांनी कृतीत उतरविली होती. अशा प्रकारची माहिती ते सहज देऊन जातात. शाहनशाह रजाशाह पहलवी याने जलसिंचनाच्या भव्य योजना हाती घेऊन, कालव्याने पाणभांडे करण्याची सोय शेतकऱ्यांना करून दिली असे सांगताना, दारा, दारियस म्हणजे पहिला दारयवहू या हखामनशी (सखामनस्) राजवंशाच्या राजाने ईजिप्त देशात नाईल नदीवर कालवा खोदून ती तांबडया समुद्राला जोडली व वाहतुकीची सोय केली असे आवर्जून सांगण्यास ते विसरत नाहीत.

शिक्षण व विकासाची माहिती देतानाही विद्वान् सईद नफीसी यांची दृष्टी निरोगी समाजासाठी आवश्यक असलेल्या निरोगी व पुष्टिदायक भाषेकडे वळते. ते म्हणतात :– भाषा ही समाजाच्या व राष्ट्राच्या श्रेष्ठत्वाची प्रतीक आहे, यात कोणालाही आक्षेप घेता येणार नाही. भाषा ही राष्ट्राच्या आत्म्याची प्रतिनिधि होय. ती समाजमनाला पुष्ट व जयिष्णु बनविणारी पाहिजे, अशी प्रस्तावना करून, ईराणी भाषेत शिरलेल्या परकीय शब्द, वाक्प्रचार आदींपासून तिला मुक्त करण्याच्या व ईराणी शब्दसंभाराने तिची जोपासना करण्याच्या शासनाच्या प्रयत्नाकडे त्यांनी

अंगुलिनिर्देश केलेला आहे. गेल्या दुवीस्त (सं. द्विशत) म्हणजे दोनशे वर्षांच्या कालावधीत ईराणी भाषेची झालेली दुरवस्था दूर करण्याचा शासनाने कसून प्रयत्न केला, असे त्यांनी प्रतिपादिले आहे.

राज्यव्यवहारात हिजरी कालगणनेच्या ऐवजी रजाशाहाने सौर हिजरी कालगणना सुरू केली. ती हिजरी आरंभकालापासूनच आरंभ होते. परंतु नंतर ती सर्व दृष्टीने सौर कालगणना, भारताच्या सौर कालगणनेप्रमाणेच आहे. हिजरी वर्षात ६२१·५४ ही संख्या मिळविली म्हणजे इसवी कालगणना प्राप्त होते. या वर्षी ईराणचे १३४७ हिजरी हे वर्ष चालू आहे. ही सुधारणा वर्णीत असतानाही सईद नफीसी यांनी मागील कालगणना-सुधारणेचा आढावा घेतलेला आहे. सासानी साम्राज्याचा अंतिम राजा तृतीय यज्दगिर्द याने कालगणना सुधारण्याचा प्रयत्न केलेला होता. तसाच प्रयत्न सल्जूकी राजवंशातील मलिकशाह बादशाहाने शक ११५३ त केलेला होता. मलिकशाहाने नैशापूर येथील विद्यापीठातील प्राध्यापक, प्रसिद्ध खगोलज्ञ उमर खय्याम (रुबाया लिहिणारा हाच) याला कालगणना सुधारणा समितीवर नेमलेले होते. ही सुधारित कालगणना जलाली समजली जाते. या कालगणनेत रजाशाह पहलवीने सुधारणा घडवून आणली. हे वर्ष मार्चच्या २१–२२ तारखेस सुरू होते. प्लुत वर्षास ईराणीत साले–कबीसा म्हणतात. ही सर्व माहिती देण्यास सईद नफीसी विसरत नाही.

शक १८८५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या ईराण या इंग्रजी पुस्तिकेत शक १८६३ पर्यंत राज्यव्यवस्थेची अन्य माहिती दिलेली आहे. या पुस्तिकेवरून आजच्या ईराणच्या राज्यव्यवस्थेची व ईराणी राष्ट्राच्या मनोभूमिकेची थोडीशी कल्पना येऊ शकेल. ईराणवर एखादे मराठी पुस्तक असल्याचे आढळत नाही.

ईराणमधील राजांच्या इतिहास लिहून घ्यावयाच्या प्राचीन परंपरेचा थोडासा उल्लेख करणे योग्य होईल. फिर्दोसी याने शाहनामा लिहिण्यापूर्वी, त्याला मार्गदर्शक होणारे दोन तीन इतिहासग्रंथ होते, याची चर्चा नोल्डेके याने शाहनाम्याच्या प्रास्ताविकात केलेली आहे. ईराणी राजे आपला इतिहास लिहून घेत असत, असा पुरावा सासान वंशातील खुस्रौ अनुशीरवान याच्या उदाहरणावरून दिसून येतो. त्याने शक ५१८ मध्ये असा इतिहास लिहविला होता. तसेच त्याच वंशातील शेवटचा राजा यज्दगिर्दने शक ५५४ मध्ये असा इतिहास लिहिण्याची आज्ञा केल्याचा सुगावा लागतो. ईराणच्या मुसलमानांनी हीच सासान राजाची परंपरा पुढे चालविली. भारतात व महाराष्ट्रात आलेले मुसलमान हीच ईराणी परंपरा घेऊन येथे आले. त्यांनी आपापल्या कारकीर्दीचे इतिहास लिहवून घेण्याची परंपरा चालू ठेवली. म्हणून मुसलमान कालातील अनेक इतिहास ग्रंथ उपलब्ध आहेत. रज़ाशाह पहलवीनेसुद्धा आपली जुनी राष्ट्रीय परंपरा चालू ठेवली.

ईराण देशात राजेशाही वावरत असली तरी तेथील राजवट किती लोकाभिमुख आहे व तिचा पाया स्वर्गीय रज़ाशाह पहलवीने कसा घातला हें या आधुनिक ईराणच्या इतिहासावरून दिसून येते. आधुनिक राष्ट्र म्हणून ईराण पावले टाकीत आहे. शक १८४५ मध्येच, सत्ता हाती येताच रज़ाशाहाने हवाई दल सुरू केले व शक १८५२ मध्ये आरमाराची स्थापना केली. शक १८५५ त तिहरान विद्यापीठाची (दानिशगाह) स्थापना केली. त्याच वर्षी शाहनामा हा पुराणेतिहास ग्रंथ लिहिणाऱ्या फिर्दोसीची राष्ट्राने सहस्राब्दि साजरी केली. पुढील वर्षी बादशहाच्या फर्मानाने महिलांतील पडदापद्धती नष्ट करण्यात आली. अशा रीतीने ईराण हे आर्यवंशीय व आर्यभाषिक राष्ट्र नव्या जोमाने व प्राचीन संस्कृतीचा अभिमान उराशी बाळगून मार्गक्रमणा करीत आहे. नफीसीने ही पार्श्वभूमी साक्षेपाने व संयमाने मांडलेली आहे.

◆◆◆

३ : भारत-अरब संबंध

भारत-अरब संबंध[1] हे छोटेसे इंग्रजी पुस्तक मकबूल अहमद या विद्वानाने लिहिलेले असून ते अलीगढ येथे प्राध्यापक व पश्चिम आशिया अभ्यास केंद्राचे संचालक आहेत. लेखकाने आतापर्यंत पश्चिम आशियाई प्रश्न, इस्लाम आदीवर बरीच पुस्तके लिहिलेली आहेत. पुस्तकाची चार प्रकरणे असून पहिल्या प्रकरणात भारताच्या अरब जगताशी आलेल्या संबंधाची रूपरेषा दिलेली आहे. दुसऱ्या प्रकरणात राजनैतिक आणि राजकीय संबंधाचा आढावा घेतलेला असून तिसऱ्या प्रकरणात व्यापारी संबंध वर्णिलेले आहेत. चौथ्या शेवटच्या प्रकरणात अरबी साहित्यात पडलेल्या प्राचीन व मध्ययुगीन भारतीय प्रतिबिंबाकडे अंगुलिनिर्देश करण्यात आलेले आहेत. पुस्तकात भरपूर आधार दिलेले असून ते शास्त्रशुद्ध व शक्य तो अनाक्षेपार्ह करण्याचा प्रयत्न झालेला आहे. पुस्तक इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स, दिल्ली संस्थेच्या वतीने प्रकाशित झालेले आहे.

भारत-अरब संबंधात इसवी सनाच्या सातव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंतचा ५०० वर्षांचा काल लेखकाच्या दृष्टीने सुवर्णकाल आहे. हे खरेही आहे. या काळात ईराणात उमय्या खिलाफ़तीचा अंत होऊन अब्बासी हे राजघराणे खलिफांच्या गादीवर स्थानापन्न झाले. पूर्वीची दमस्कस (दमश्क) ही राजधानी बदलून बगदाद राजधानी झाली. हे सन ७५० इसवीमध्ये घडून आले. सन ७११ त मुहम्मद बिन कासिम या खलिफाच्या सरदाराने सिंधवर स्वारी केली. तेव्हापासून अरबांनी भारतीय विद्या व ज्ञान संपादन करण्यास सुरुवात केली. भारतीय पंडित-गणितज्ञ, खगोलज्ञ, ज्योतिषी, वैद्य यांची बगदाद येथे आवक सुरू झाली. याच काळात संस्कृत ग्रंथांचे अनुवाद करण्यास आरंभ झाला. हा देवाण-घेवाणीचा काळ साधारणतः चार-पाचशे वर्षे टिकला असे लेखकाने नमूद केले आहे. ते योग्यच आहे.

भारत-अरब संबंध हे परस्पर देवाण-घेवाणीचे होते, असे लेखकाने आवर्जून सांगितले आहे. असे लिहिण्यात सर्वच मुसलमान लेखकांचा हातखंडा आहे. परंतु भारताने ज्ञानक्षेत्रात अरबाकडून काही उसनवारी केली, याचा फारच कमी दाखला इतिहासात सापडतो. अमीर खुस्रौ (मृत्यू शक १२४७) याने स्पष्ट सांगितलेले आहे की, भारताने तत्कालपर्यंत उसनवारी केलेली नाही. सिंधवर एकदा स्वारी झाली. परंतु ते राज्य मुहम्मद गोरी किंवा महमूद गज़नवी यांच्या कालापर्यंत टिकले असे सांगण्याचा आग्रह सर्वच मुसलमान लेखकांचा असतो. हे खरे नसल्याचे अनेक

---

१. भारत-अरब संबंध (इंग्रजी), मक़बूल अहमद, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६९. पाने १६९, मूल्य २० रुपये.

लेखकांनी सांगितलेले आहे. या पुस्तकात अप्रत्यक्ष रीतीने हे म्हटलेले आहे. सिंध-मध्ये अरबी भाषा प्रचलित होती असेही विधान या पुस्तकात केलेले आहे. परंतु कोठे व कोणत्या काळी याचा तपशील मात्र नाही. सामोपचाराची व देवाण-घेवाणीची भाषा वापरीत भारताने अरबांकडून निरनिराळी शास्त्रे व विद्या यांचे ज्ञान घेतले असे म्हटलेले (पान १६५) आहे. परंतु अरबी ग्रंथाचे भारतीय भाषांतील अनुवाद वा अन्य रूपांतरे याचा कोठेही उल्लेख नाही. अल्बेरुनी हा प्रसिद्ध ईराणी विद्वान, परंतु अरबी भाषेत लेखन करणारा लेखक तो भारतात आला होता असे म्हटलेले (पा. २८)आहे. तो भारतात कधीही आला नाही. महमूद गजनी याने जिंकलेल्या प्रदेशापर्यंतच त्याची मजल होती, हे आता अंतर्गत पुराव्यांवरून पुढे आलेले आहे. याची दखल लेखकाने घेतलेली नाही.

अरबांनी भारतीय गणितशास्त्र आत्मसात केले हे ग्रंथात सांगितलेले आहे. परंतु हे गणितशास्त्र, भारतात भारतीयांच्या दशांशलेखन पद्धतीचा प्रसार होण्यापूर्वीचे होते, हा मुद्दा लेखकाने स्पष्ट केलेला नाही. भारतात ही अंक-लेखन पद्धती शक ६०० च्या सुमारास सर्वप्रसृत झाली. तत्पूर्वी भारतातही १५ लिहावयाचे झाल्यास १० ५ (म्हणजे १०+५) असे लिहीत असत. ही जुनीच पद्धती अरबांना ठाऊक होती. नवीन दशांश पद्धतीने लेखन करणारा पहिला अरबी गणितज्ञ अहमद नसवी (मृत्यू साधारणतः श. ९६२) हा होय (पान १४), असे लेखकाने म्हटले आहे. परंतु हेही तितकेसे खरे नाही. दशांश पद्धतीने अरबी ग्रंथातून संख्यालेखन करणारा अबू रैहान अल्बेरुनी होता असे दिसून येते. कारण त्याने भारत हा आपला ग्रंथ आक्टोबर १०३० इसवीच्या (शक ९५२) अगोदर लिहून पुरा केला होता. त्यात त्याने ही भारतीय दशांशपद्धती संख्यालेखनात वापरलेली आहे. म्हणजे निदान सीमेवरून का होईना भारताचे दर्शन घेणाऱ्या अल्बेरूनी यालाच ते श्रेय जाते. हे सांगितले असते तर बरे झाले असते. अरबांच्या संपर्काने हीच जुनी पद्धती युरोपात पसरली होती.

पुस्तकाचा विषय भारत-अरब संबंध असा आहे. परंतु सर्व ग्रंथात अरब म्हणजे कसलाही व कोणताही इस्लामधर्मीय हा अर्थ सर्वत्र अभिप्रेत आहे. तसेच अरबी भाषेत लिहिलेले ते सर्व अरबांचे हाही गृहीतार्थ सर्वत्र दिसून येतो. परंतु या दोन्हीही गोष्टी सत्य नव्हेत. शक ६७२ म्हणजे ७५० इ. सनानंतर बगदाद येथील खलीफांच्या दरबारात सर्वत्र ईराणी मुसलमान मुत्सद्दी व सेनापती यांचा बोलबाला होता. या कालानंतरचा इस्लामचा भारताशी आलेला संबंध हा एका दृष्टीने ईराणी मुसलमानांचा संबंध होय. तसेच वरील कालानंतरच अरबी भाषेत शास्त्रीय व साहित्यिक वाङ्मयनिर्मिती झाली. त्यातील बव्हंश ईराणी लोकांनी अरबी भाषेतून केलेले लेखन होय असे गोल्डझिहर, ब्राऊन आदि विद्वानांनी आवर्जून व वेळोवेळी सांगितलेले आहे. पण या गोष्टींचा इशाराही या ग्रंथात आढळत नाही.

परंतु एक गोष्ट जाता जाता सांगितली आहे की, इसवीच्या अकराव्या शतकात भारतामध्ये इस्लाम संपर्क स्थापण्यात तुर्क, अफगान, मुगल आदि इस्लामी जमाती (पान ३४) होत्या.

पंचतंत्राच्या फार्सी व संस्कृत मूळ प्रती नष्ट झाल्या असे लेखकाने म्हटले आहे. (पान १९, पादटीपा). परंतु हे अर्धसत्य आहे. बुजुर्जमिहिर याने (शक ४९२ च्या सुमारास) केलेले पहलवीतील भाषांतर नष्ट झाले, हे खरे. अरबीत इब्न मुक़फ्फ़ा याने केलेला अनुवाद (६७२ शक) हा सीरियाकी भाषेतील अनुवादाचा अनुवाद होता. परंतु संस्कृतमधील पंचतंत्र नष्ट व्हायला काय झाले, ते आजही उपलब्ध व प्रसिद्ध आहे.

रोहिणखेडचाचा ज्योतिषरत्नाकरकार श्रीपतिभट्ट (जीवित शक ९७५) व खुरासानची प्रसिद्ध मुनित्रयी-सियासतनामा (राज्यशास्त्र) ग्रंथाचा कर्ता तूसनिवासी निजामुल्मुल्क (मृ. श. १०१४), नैशापूरचा प्रसिद्ध गणितज्ञ व रुबाईलेखक उमर खय्याम (मृ. शक अंदाजे १०००) आणि तत्त्ववेत्ता मुहम्मद गज़ाली (मृ. शक १०३३) हे साधारणतया समकालीन होत. बीजगणित व भूमितीवरील ग्रंथांचा लेखक उमरखय्यामचा सहाध्यापक असूनही मुहम्मद गज़ाली याने ज्ञानविकास व ज्ञानार्जनाची, आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेने सर्व दिशाच बदलून टाकली. विद्यापीठातून शास्त्राध्ययनापेक्षा धर्म व तत्त्वज्ञान यालाच महत्त्व असावे असा दृष्टिकोन त्याने प्रतिपादिला. त्यामुळे इस्लामी जगतात शास्त्राध्ययनाला गेल्या दोनअडीच शतकांत जो पाया लाभलेला होता तो ढासळला व धर्मप्रधान तत्त्वज्ञान हा मुसलमानांच्या शिक्षणाचा आधार निश्चित झाला. ही घटना इस्लामी समाजाला मारक झाली असे विवेचन मक्बूल अहमद यांनी (पाने ३३ ते ३९) केलेले आहे. भारतात व सर्व इस्लामी जगतात हा प्रभाव घडून आला. जर्मन पंडित एडवर्ड सकौ याचे मत लेखकाने उद्धृत केले आहे की, जर अ़शरी आणि गज़ाली यांनी शिक्षणाला असे धार्मिक व तत्त्वज्ञाननिष्ठ वळण दिले नसते तर अरबांचे राष्ट्र हे ग्यालिलियो, केप्लर आणि न्यूटनांचे राष्ट्र बनले असते. भारतात सुलतानांच्या व नंतर मुगल सम्राटांच्या काळात या प्रतिगामी विचारसरणीची पाळेमुळे कशी खोल गेली व मुस्लिम समाज शास्त्राध्ययनास कसा वंचित झाला याचे वर्णन लेखकाने केले आहे. ज्यांना मुसलमान समाजाच्या मानसिक ठेवणीचा विचार कर्तव्य आहे व जे निधर्मीयत्वाच्या भूमिकेवर मुसलमानांना आणू पाहतात त्यांच्यासाठी हा भाग अत्यंत वाचनीय व मननीय असा आहे. या प्रतिगामी प्रवृत्तीचा प्रेरक मुहम्मद गज़ाली होय. ही मनोवृत्ती व प्रवृत्ती गेल्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत सर सय्यद अहमदखान याच्या उदयापर्यंत अखंडितपणे चालू होती. याची खंतही लेखकाने नोंदविली आहे (पान ३८). ही अलअक्साच्या प्रेमाची मूलभूत भूमिका आज देखील मुस्लिम समाजात सर्वत्र दिसून येते. सारांश हा भाग आजच्या जिवंत प्रश्नांच्या दृष्टीने सुद्धा अत्यंत मननीय असा आहे.

दुसऱ्या एका अत्यंत महत्त्वाच्या व जिवंत प्रश्नाची चर्चा लेखकाने (पान ७० ते ७६) केलेली आहे. ती म्हणजे महमूद गज़नीपासून हिंदुस्थानात मुगल साम्राज्य स्थिर होईपर्यंत, भारतातील झाडून एकूण एक सुलतानांनी, आपण बगदादच्या ख़लिफांचे अंकित व राजनिष्ठ आहोत यासाठी, कसून प्रयत्न करून मिळविलेल्या सनदा व प्रमाणपत्रे. हा दृष्टिकोन लेखकाने मोठ्या आपुलकीने व आत्मीयतेने प्रतिपादिलेला आहे. This legal sanction made their rule acceptabl to the Muslims and established them as an integral force in the political set-up of the Islamic world of the time.

या वैधानिक प्रमाणपत्राने या सुलतानांच्या राज्यसत्तेला मुस्लिमांची मान्यता लाभली आणि तत्कालीन इस्लामी जगतातील राज्यव्यवस्थेतील एक जिवंत व प्रभावी अंगभूत शक्ती म्हणून त्यांना स्थैर्य प्राप्त झाले (पा. ७१). अशा प्रकारची प्रेरणा व फलश्रुती लेखकाने वर्णिलेली आहे. हा भागही मुसलमान समाजाच्या अन्तःप्रेरणांचा मागोवा घेण्यास अत्यंत उपयुक्त आहे. ४०—५० वर्षांपूर्वी भारतात झालेली खिलाफतीची चळवळ आणि काल झालेल्या अल-अक़्साचा आविष्कार ही एका विशिष्ट विचारसरणीची फळे होत याची संगती मक़बूल अहमद यांच्या वरील विवेचनावरून लागते हे लक्ष्य आहे.

शक ६७२ मध्ये बगदादमध्ये स्थापन झालेल्या अब्बासी खलीफांच्या कारकीर्दीपासूनच्या इस्लामी संस्कृतीचे स्वरूप व तोंडवळा ईराणी संस्कृतीचा आहे. या अनेक जगन्मान्य विद्वानांनी मांडलेल्या प्रमेयाचा या ग्रंथात कोठेही वास लागू देण्यात आलेला नाही ही गोष्ट फार थोड्यांच्या ध्यानी येईल. या प्रश्नाची थोडीशी चर्चा आम्ही महाराष्ट्रेतिहास परिषदेच्या विभागीय अध्यक्षीय भाषणात केलेली आहे. त्याचा पुनरुच्चार अनावश्यक होय. येथे लक्ष्य मुद्दा असा की, लेखकाने जेवढे म्हणून इस्लामविषयक, मग ते ईराण, खुरासान, अफगानिस्तान वा समरकंद-बुखाराचे असो ते सर्वच अरबी, अरबांचे होय असे गृहीत धरण्याचा, एका दृष्टीने, प्रमाद लेखकाने केलेला आहे. लखनौमध्ये परवा झालेल्या शिया व सुनी वादाची ऐतिहासिक पार्श्वभूमी व पाळेमुळे दिसू नयेत याची काळजी, कदाचित अभावितपणे, लेखकाने घेतलेली आहे. हा सर्वच मुसलमान विद्वानांचा दंडक वा हातखंडाच, बनलेला आहे. ही गोष्ट या ग्रंथातही दिसून येते असो.

एकूण हे छोटेसे पुस्तक अत्यंत वाचनीय आहे. ग्रंथलेखनाचा एक शास्त्रीय प्रयत्न म्हणूनही हे स्तुत्य आहे. ग्रंथांत चार सूची दिलेल्या आहेत. व्यक्तिनामे स्थलनामे, विषय व उद्धृत प्राचीन ग्रंथ. याशिवाय आधुनिक आधारग्रंथांची सूची चार पाने भरून दिलेली आहे. ग्रंथ विश्वासपात्र व शास्त्रीय बनविण्याचा श्लाघ्य प्रयत्न केलेला आहे.

मुंबई, १७ आश्विन १८९१.

४ : नवाईत, नाइता व नाखवा

कदम्बवंशीय प्रथम जयकेशी यांचा पणजी येथील ताम्रपट स्व. डॉ. मोरेश्वर गं. दीक्षित यांनी दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, खण्ड ४ मध्ये, शक १८७३ त प्रकाशित केलेला आहे. हा ताम्रपट शक ९८१ चा असून त्यात च्छडम या ताजियवंशी इसमास काही भूमिदान केल्याचे हे शासन आहे. च्छडम हा अरब असून त्याच्या बापाचे नाव आलियम असे ताम्रपट संहितेत दिलेले आहे. कै. डॉ. दीक्षित यांनी ते अलिय आहे असे लिहिले. पण खरे नाव आलिम असे आहे. वृत्तासाठी किंवा अपभ्रष्ट रूप अलियम झालेले आहे. च्छडमच्या आजाचे नाव मधुमद असे आले आहे. वस्तुतः हे नाव मुहम्मद असून त्यांचे संस्कृतीकरण मधुमद झालेले आहे. डॉ. दीक्षिताच्या मते च्छडम हा अरबी शब्द आहे. परंतु अरबी वर्णमालेत महाप्राण वर्णच नाहीत. मग छ असणे शक्य कसे ? तसेच अरबी फार्सी वर्णमालेत ट-वर्ग मुळीच नाही; म्हणून ड वर्णही अरबी असणे अशक्य आहे. असो. मुद्याची गोष्ट अशी की, या ताम्रपटात अलियम या ताजियवंशीयास **नौवित्तक** असे विशेषण वापरलेले आहे. यात व्यक्तिविषयक उल्लेख असे आहेत :–

श्रीचेमूल्यपुरोत्पत्तिः शान्तस्ताजियवंशजः ।
आसीन्नौवितको धीमाञ्श्रीमानालियमाख्यया ॥ २१ ॥

अजायत ततः पुत्रो नाम्ना मधुमदो मुदे ।
योऽभवल्लोकनेत्राणां सकलश्चंद्रसंन्निभः ॥ २२ ॥

ततोऽप्येष समुत्पन्नः सूनूच्छडमसंज्ञकः ।
केशिराजाह्वरक्षाणां योऽभूत्प्रतिबलो बली ॥ २३ ॥

येथे च्छडम शब्दाचा पाठ चुकलेला असावा असे वाटते. प्रस्तुत प्रसंगी नौवित्तक शब्दांचीच आपणाला चर्चा करावयाची असल्याने अन्य बाबींचा विचार कर्तव्य नाही. या शब्दांची डॉ. दीक्षितांची छाननी अशी आहे– ' नौवित्तक ह्या शब्दाचा अर्थ दोन्ही प्रकारांनी करता येणे शक्य आहे. एक सर्वसाधारणपणे सहज लक्षात येईल असा म्हणजे " नाव हीच ज्याची संपत्ति आहे " असा, किंवा दुसऱ्या प्रकारे तो " नवायत " ह्याचे संस्कृत रूपान्तर असाही होऊ शकेल. ' नवायत ' ही हिंदुस्थानांत येऊन राहिलेल्या मुसलमानांची मिश्र संतती होय व ह्या नावाने ओळखले जाणारे अरब सिराफ, ओमान वगैरे बंदरावरून हिंदुस्थानात मलबार, दक्षिण कानरा व विशेषतः मलबार आणि कोकण ह्या विभागात सुमारे

९४३-९५५ इसवीच्या सुमारास स्थायिक झाले असल्याचे प्रसिद्ध अरब भूवर्णनकार अल्‌मसूदी याने लिहून ठेवले आहे.' (पृ. ३२) या ताम्रलेखाचा काल इसवी सन् १०५९ असा येतो. म्हणजे मसूदी यांच्या म्हणण्याप्रमाणे या प्रदेशात नौवित्तक किंवा नवायताची वस्ती या लेखाच्या साधारणतः शे-सवाशे वर्षे अगोदरपासून होती हे म्हणणे इतिहासाला सुसंगतच आहे. परंतु डॉ. दीक्षितांच्या वरील विधानातून नौवित्तक संज्ञेचा नक्की आशय काय हे लक्षात येत नाही. नाखवा, नवाइत वा नाइता शब्दाची जी चर्चा पुढे करण्यात आली आहे त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होईल. नौवित्तक ही संज्ञा नवाइत शब्दाचे संस्कृतीकरण आहे असे म्हणणे योग्य होणार नाही; परंतु पटलेखकाने नवाइताच्या साम्पत्तिक व भौतिक स्थितीचे वस्तुनिष्ठ वर्णन करण्यासाठी नौवित्तक असा सुयोग्य शब्द वापरलेला आहे असे दिसते. ज्याची सर्व संपत्ति नौ, नाव यापासून आहे असे हे घराणे होते असे म्हणता येईल. नवाइत या नावाला जवळचा पर्याय म्हणून नौवित्तक शब्द वापरलेला असावा.

महिकावतीची बखर नावाचा ग्रंथ इतिहासाचार्य राजवाडे यांनी आपल्या मृत्यूपूर्वी दोन वर्षे म्हणजे शक १८४६ मध्ये प्रकाशित केला. बखर या बदनाम झालेल्या शब्दामुळे किंवा काय न कळे, विद्वानांचे या साधनाकडे विशेष लक्ष गेलेले नाही. या ग्रंथातील साधनांची मागाहून चिकित्सा झालेली नाही. जुन्या मराठी भाषेचा एक चांगला नमूना म्हणूनही या ग्रंथातील भाषेचे महत्त्व भरपूर आहे परंतु याकडे लक्ष गेलेले नाही असे म्हणावे लागते. या ग्रंथात अनेक प्रकारचे धागेदोरे-ऐतिहासिक, भाषिक, सामाजिक व समाजशास्त्रीय-इतस्ततः विणलेले आढळतात. डॉक्टर हं. धी. सांकलिया यांना, नेवासे येथील उत्खननात कापसाचा धागा मिळाला व त्यांनी त्या आधारे तत्कालीन समाज जीवनाचे धागेदोरे विणून दाखविले. त्याप्रमाणे शक १४०० पूर्व चार-पाच शतकातील वरील प्रकारचे अनेक धागेदोरे या बखरीतील विधानांवरून हाती घेण्यासारखे आहेत.

उत्तरेतून राज्यसत्तेबरोबर दक्षिणेत उतरलेल्या महाराष्ट्रातील मुस्लिमसंपर्कापूर्वी, महाराष्ट्राच्या समुद्रकिनाऱ्यावर आढळणाऱ्या इस्लामधर्मीयांना नवाईत, नायता, नाखवा हे शब्द मराठी व संस्कृत साहित्य, प्रत्नलेखादीत आढळून येते. (असा एक लेख वरती आला आहे). परंतु या तिन्ही शब्दांचा नक्की अर्थ आणि कुळीमुळी यांची नक्की उकल आतापर्यंत झालेली आढळत नाही. महिकावती बखरीत (शक १३७०) या शब्दांचा वापर मुसलमानी नावाबरोबर करण्यात आलेला आहे. राजवाड्यांनी छापलेल्या या बखरीच्या संहितेत पानांबरोबर ओळीचे आकडे-संख्यांकन दुर्दैवाने दिलेले नाही. पुढील उल्लेखात पहिला अंक पानाचा व दशांशोत्तर आंकडा ओळीचा आहे. नाखवा शब्दाचा वापर बखरीत असा आला आहे,
(१) "त्या माग राज्य लाहुरस्यासि जालें ॥ राजा माहिमासि आला ।

लाहुरस्यें (राज्य) केले वरुषें ९ ॥ मग ते राज्य आलि नाखवासि दिधले ॥ आलि नाखवा चापाणिर सांवंत-राज्य माहिमचें करो लागले " ॥ (पृ. ५०·२०)

(२) "आता नाईत्या रायाचि कुळि सांगेन ॥ आबु नाखवे कोकणि राज्य केले वरुषें १२ " ॥ (पृ. ६३·८)

(३) "तेधवां केशव राउत बोलता जाला ॥ जर खत राया बिंबाचे स्वहस्ताक्षरि स्वसिक्यासि आहे तें साष्टि येरंगळा राहिले ॥ तेधवां हर ठाकुर बोलता जाला ॥ खत आलजी नाखवा हस्तिचें मजंवळ आहे ॥ जर प्रथम निशाण सर्वा मोहोरे शेश-वंशाचे ॥. . . . . .तें खत वाचोनि पहातां निवाडा शेषवंशाचे निशाण मोहोरे सीका **आल नाखवा नवाईत** माहिमचा राजा, " (७०.१३ ते १६)

नाखवा, नवाईत

नाखवा शब्दाच्या अर्थाचा व व्युत्पत्तीचा मागोवा आजपर्यन्त कोणीही घेतल्याचे आढळत नाही. राजवाडे यांनी बखरीच्या प्रदीर्घ प्रस्तावनेत अर्थोत्पत्तीचा उहापोह केलेला नाही. तसेच ताम्रपटात आलेल्या या शब्दांची अशा प्रकारची दखल स्वर्गीय मो. गं. दीक्षित आदींनी घेतलेली नाही. नाखवा हा शब्द फार्सी नाखुदा शब्दापासून निघालेला आहे. नाखुदा हा फार्सी शब्द, ना म्हणजे नाव, नौ आणि खुदा या दोन शब्दांचा सामासिक शब्द आहे. नाव, नौ म्हणजे नाव, होडी, जहाज, होडके असा आहे. नाव शब्दाचे अपभ्रष्ट व संक्षिप्त रूप ना होय. खुदा हा शब्द वैदिक स्वधा शब्दापासून व्युत्पन्न आहे. त्याचा अर्थ स्वामी, मालक, ईश्वर, परमेश्वर असा होतो. खुदा म्हणजे अल्ला हे सर्वपरिचित आहेच. ही व्युत्पत्ति आता विद्वन्मान्य झालेली आहे. याची ओळख आणखी काही फार्सी शब्दांबरोबर आम्ही मराठी वाचकांना करून दिलेली आहे. (पाहा मराठी साहित्यपत्रिका, पुणे, क्रमांक १५६ शक १८८८). या नाखुदा शब्दाचा अर्थ मूलत: नौ, नावेचा स्वामी, मालक असा होतो. स्टीनगास याने आपल्या फार्सी-इंग्रजी कोशात नाखुदा शब्दाच्या अन्य अर्था-बरोबर जहाजाचा स्वामी असाही अर्थ दिलेला आहे.

अरब या इस्लामधर्मीयांना ईरान देश शक ५७४ च्या सुमारास जिंकिला. तेथे अरबी लिपी आणि भाषेचे साम्राज्य पसरले. तेव्हा या नाखुदा शब्दावरही याचा प्रभाव पडला. अरबी भाषेच्या स्वभावानुसार नाखुदा शब्दाचे रूपांतर नाखज़ा असे झाले. या भाषेच्या नियमानुसार त्याचे अनेकवचन नवाखिज़, नवाखि-ज़ह असे करण्यात आले. मुस्लिम अरब व्यापारी भारताच्या पश्चिम समुद्र-किनाऱ्यावर शक कालाच्या ८ व्या ९ व्या शतकात आढळून येतात. ते भारतात घोडे पुरवीत. ताज़ी म्हणजे त्यांचा घोडा. तेजी (म्हणजे अरबी घोडा) हा शब्द आद्य मराठीत सर्वत्र आढळतो. ते या देशातून कापड नेत. त्यांनी पोत म्हणजे कपडा यापासून फुतह म्हणजे कापड असा भारतीय शब्द अरबी वाङमयात नेला. ही

गोष्टही आम्ही मराठी वाचकांसमोर मांडली आहे. महाराष्ट्रातील अरब लोकांच्या वास्तव्याचा उल्लेख वरती आलेला आहेच.

प्रस्तरलेखात नाखुदा

नवाखिज़, नवाखिह म्हणजे नौस्वामी असे समुद्रमार्गाचे मोठेमोठे व्यापारी नवाखिज़ हा शब्द प्रारंभीच्या अरबी व तदनंतरच्या फार्सी भाषेतील मुसलमानांच्या दगडावर कोरलेल्या लेखातून आलेला आहे. असे प्रस्तर लेख बहुधा मसिदी, दरगा अथवा मोठ्या लोकांची थडगी यात सापडतात.

अखंड भारतातील सर्वात जुन्या मुसलमान जेत्यांचा शिलालेख वायव्य सरहद्द प्रांतातील तोखी खोऱ्यात सापडला असून तो अरबीच्या कूफी लेखनशैलीत आहे. याचा काल शक ७८० (हिजरी २४३) असून त्याच्या जोडीला शारदा लिपीत त्याच आशयाचा संस्कृत शिलालेखही आहे. दुसरा शिलालेख शक १०१२ मधील (हिजरी ४८२) असून तो सिंधू नदीच्या काठावरील हुंद या गावी पेशावरच्या नजीकच्या भागातील आहे. तो सध्या पेशावर पुराणवस्तुसंग्रहालयात ठेवलेला आहे. हे दोन्ही लेख एपिग्राफिया इण्डो-मोस्लेमिका या ग्रंथात अनुक्रमे इसवी सन १९२५-२६ आणि १९२१-२२ मध्ये प्रकाशित केलेले आहेत. यानंतर मुसलमानांचा सर्वात प्राचीन प्रस्तरलेख गुजराथमधील भद्रेश्वर या गावातील असून तो शक १०८१ (हिज़री ५५४) तील होय. भद्रेश्वर येथील आणखी दोन कालोल्लेख असलेले लेख शक १०९६ (हिजरी ५६९) आणि शक १०९९ (हिजरी ५७३) मधील आहेत. हे तीन व इतर काही शिलालेख डॉ. ज़ियाउद्दान देसाई यांनी इ. स. १९६५ च्या एपिग्राफिया इण्डिका-अरबी-परिशिष्टात प्रकाशित केले आहेत.

(१) कालक्रमानुसार वरील पाच शिलालेखानंतरचा लेख क्रमांक १ गुजरात-मधील, मुसलमानी राजसत्ता तेथे पोचण्याचा अगोदरचा आणि खंबायतमधील राजपूत राजा चालुक्य वंशीय सिद्धराज जयसिंहाच्या कारकीर्दीतील शक ११४० (हिजरी ६१५) मधील आहे. हा लेख अत्यंत महत्त्वाचा व उद्‌बोधकही आहे. मुसलमानांची असलेली मसीद लोकांनी पाडल्यामुळे या जयसिंहाने मुसलमान खतीबास अभय तर दिलेच, पण नवीन मसीद बांधण्यासाठी त्याला एक लाख बालोत्र नाणी देण्यात आली. ही हकीकत औफी यांच्या इतिहासाच्या सहाय्याने आता उजेडात आली आहे. गुजरातमधील राजपूतकालीन असे ९ शिलालेख डॉ. ज़ियाउद्दीन देसाई यांनी ए. इं. अरबी-फार्सी परिशिष्टात इ. स. १९६१ मधे प्रकाशिले आहेत. या संचातील चौथ्या क्रमांकाच्या शक ११८६. (हिजरी ६६२) मधील लेखात, अबू इब्राहीम याचा पुत्र नूरुद्दीन पीरोज़ याने मसीद बांधल्याचे वर्णन २८ ओळींच्या अरबी लेखात केलेले आहे. हा नूरद्दीन पीरोज़ फार मातबर आणि बडी असामी असल्याचे लेखातील त्याला प्रयुक्त विशेषणांवरून सहजतया दिसून

येते. हा पीरोज़ ईराणातील हीरमुज़ बन्दराचा रहिवासी असून सोमनाथ देवस्थानच्या नगरात त्याचा मोठा व्यापार होता. तेथे त्याने एक जमीन विकत घेऊन तीवर एक मसीद उभारली. या पीरोजच्या मोठेपणाच्या वर्णनात त्याला **मलिकुत्तुज्जार आणि सुल्तानुन्नवाखिज़** अशी दोन विशेषणेही लावलेली आहेत. मलिकुत्तुज्जार म्हणजे व्यापाऱ्यांचा राजा आणि **सुल्तानुन्नवाखिज़** म्हणजे नौपतींचा राजा. ही दोन विशेषणे मोठी साभिप्राय व अर्थगर्भ आहेत. या दोन्ही विशेषणांमुळे नुरुद्दीन पीरोज़ याच्या सम्पत्तिशक्तीची कल्पना येते. आजच्या टाटा, बिर्लाच्या सार्वजनिक सत्कार्याच्या उत्तेजनाची अशावेळी आठवण येते.

(२) या लेखसंचातील सातच्या लेखात अबूलकासीम बिन अली या ईरज येथे राहाणाऱ्या ईराणी गृहस्थाने शक १२०८ (हिजरी ६८५) मध्ये जुनागड येथे मसीद बांधली. सौराष्ट्रात या समयी राजपूत वंशातील चूडासमा सारंगदेराचे राज्य चालू होते. सौराष्ट्र हा प्रदेश शक १३९४ त गुजरातचा मुसलमान बादशहा प्रथम महमूदशाह याने जिंकला. जुनागड शहराचे नाव त्याने मुस्तफाबाद ठेवले. तोपर्यंत सौराष्ट्रात राजपुतांचीच सत्ता होती. या लेखात अबूलकासिम बिन अली या मातबर असामीला '**मलिकुस्सुदूर व अन्नवाखोज़**' आणि '**इमादुल-हाज व हरमैन**' अशी तीन विशेषणे लावलेली आहेत अबूलकासिम हा श्रेष्ठांचा आणि **नवाखोज़** म्हणजे नौस्वामी यांचा राजा होता. तसेच तो हज्जची आणि मक्कामदीनेची यात्रा करणाऱ्यांचा केवलावार (इमाद) होता.

(३) शेवटचा शिलालेख शक १२१३ (हिजरी ६९०) मधला असून तो खंबायत मधील पर्वीज शहीद या मसिदीतील दगडावर कोरलला आहे. या वेळीही या प्रदेशावर सारगदेव वाघेला या राजपूत राजाचे राज्य चालू होते. या लेखात हज्ज करणाऱ्या इब्राहीम बिन मुहम्मद या व्यक्तीच्या मृत्यूचा उल्लेख केलेला आहे. हे घराणे मोठे गबर होते असे दिसते कारण याच घराण्यातील आणखी दोन व्यक्तीची नावे दुसऱ्या दोन लेखात खंबायतमध्ये सापडलेली आहेत. या इब्राहिमाला '**मलिकुतुज्जार सुल्तानुन्नवाखिज़ह**' ही विशेषणे लावलेली आहेत. तो व्यापाऱ्यांचा राजा आणि नौस्वामीपति अथवा पोतवणिकांचा राजा होता. तो धार्मिक असल्याचेही लेखात सांगितले आहे.

थोडासा इतिहास

उपरिनिर्दिष्ट कूफी लेखनशैलीतील अरबी शिलालेखांचे संपादन करीत असताना डॉ. देसाई यांनी, इस्लामी राज्यसत्ता भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर पोचण्यापूर्वी, वरील प्रकारच्या, इस्लाम धर्मीयांच्या वास्तव्यासंबंधी खालील निवेदन केलेले आहे :–

'Historically too, these epigraphs are of sufficient interest. Ranging in dates from 1159-60 to 1228 A. D., they indicate, like some few more records, studied in a previous issue of this Journal, the extent of the permeation of the Muslims in Gujarat, corroborate the statements of early Arab travellers about the Muslim settlements in various towns and cities and also provide, however indirectly, evidence of the relations between Western India and other Islamic countries. True, they do not contain such information–they merely give the dates of demise of some persons as might throw light on the exact nature of these relations. Nevertheless, they provide valuable evidence that long before the Muslim conquest of Gujarat, the Muslims had long inhabited this part of the country. It may be futile to speculate about the profession etc. of these people, about whom no information is forthcoming from other sources, but it stands to reason to infer that they were not invaders but men of peaceful pursuits who had made the province their permanent home.,

Epigraphia Indica - Arabic and Persian supplement, 1965.

वरील उताऱ्यातील काही विधानांचा विचार होणे इष्ट वाटते. शके १०८१ पासून पुढे पश्चिम किनाऱ्यावर, इस्लामी राज्यसत्ता येथे स्थापन होण्यापूर्वी, तेथे काही मुसलमानांचे वास्तव्य होते, हे डॉ. देसाई यांचे म्हणणे निर्विवाद आहे. वस्तुतः संस्कृत प्रत्नलेखांवरून असे दिसून येते की ही कालमर्यादा शक ९७५ पर्यंत मागे जाते. हे लेखाआरंभीच्या चर्चेवरून सहज दिसून येते. नेहमीच्या सरावाप्रमाणे डॉ. देसाई यांनी केवळ अरबी फार्सी लेखच पाहिलेले दिसतात. संस्कृत प्रत्नलेखांकडे त्यांनी दृष्टि वळविलेली दिसत नाही. त्यांच्या एकदोन विधानांचा अधिक विचार होणे जरूर आहे. डॉ. देसाई म्हणतात की, या इस्लामधर्मीयांच्या व्यवसायादींची चिकित्सा करणे व्यर्थ आहे, कारण तशी माहिती उपलब्ध नाही. परंतु डॉ. देसाई यांनी वरती उद्‌धृत केलेल्या व त्यांनीच संपादिलेल्या तीन शिलालेखांतील काही विशेषणांकडे त्यांनी लक्ष दिलेले नाही असे दिसते. या इस्लामधर्मीयांचा व्यवसाय, त्यांची वृत्ती वाणिज्य होती. हे वरील उद्‌धृत केलेल्या विशेषणांवरून स्पष्ट होते. विशेषतः या बाबतीत **मलिकुत्तुज्जार व सुल्तानुत्रवाखिज़** ही विशेषणे सार्थ व इस्लाम धर्मीयांची वृत्तिदर्शक आहेत. हे ध्यानी घेणे जरूर आहे. ही गोष्ट डॉ. देसाई यांनी ध्यानी घेतलेली नाही, असे आढळून येते.

दुसरा एक गैरसमज आजपर्यंत या कालासंबंधी असलेल्या ऐतिहासिक लेखनांतून रेंगाळत आलेला दिसून येतो. तो म्हणजे **हे सर्व अरब होते. हा**

गैरसमज होय. सर्व इस्लामधर्मीय होते हे नक्की. कारण शककालाच्या आठव्या शतकाअखेरपर्यंत ईराण देशाचे इस्लामीकरण पूर्ण झालेले होते. म्हणून ईराणची बहुतेक लोकवस्ती इस्लामधर्मीय होती. या लोकांच्या नावावरून त्यांच्या राष्ट्रीयत्वाची कल्पना करणे अगदीच चूक आहे. धर्मान्तरित लोकांनी शुद्ध व अरबी व्यक्तिनामे धारण करण्याची ही परम्परा फार जुनी आहे. इब्न मक्फ़्फ़ा हे नाम केवळ शुद्ध अरबी. परंतु या ईराणी विद्वानाचा तो सच्चा मुसलमान नाही म्हणून वध करण्यात आला होता. अबू रैहान अल्बेरूनी हाही ईराणी, पण अरबी भाषेचा महान् पंडित. हीच गोष्ट प्रस्तुतच्या भारतातील इस्लामधर्मीय व्यापाऱ्यांची होय, परंतु हे सगळेच अरब होते असे मुळीच नाही. ईराणमधील होरमूज, बम्म आदि प्रसिद्ध नगरांतील रहिवासी होते असे दिसून येते. त्यांपैकी काही केवळ अरबही असू शकतील. हा प्रश्न त्या त्या व्यक्तीच्या अधिक माहितीवरून ठरवावा लागेल.

स्वतः डॉ. जियाउद्दीन देसाई यांनीही वरील ९ लेखांच्या अध्ययनावरून या नवाखिज़ व्यापाऱ्यांच्या राष्ट्रीयत्वाचा प्रश्न चर्चिला आहे. हे व्यापारी प्राधान्येन ईराणी होते असे त्यांनी प्रतिपादिले आहे. (पाहा पृ. २)

" Almost all the persons mentioned in these records were connected, either by birth or by origin, with Persia ond in fact, two of them have parental names which definitely indicate Zoroastrian lineage."

डॉ. देसाई म्हणतात की या लेखातून फक्त मृत्यूचेच उल्लेख आहेत. हेही तितकेसे खरे नाही. काही लेखांतून अनेक ऐतिहासिक घराणी व व्यक्ती यांचे उल्लेख सापडतात, सोमनाथ येथील एका शिलालेखात तत्कालीन ग्रामस्थ हिंदू प्रतिष्ठित लोकांची नावेही आलेली आहेत. तसेच या इस्लामधर्मीयांनी तत्कालीन इस्लामेतर राज्यसत्तेच्या अनुमतीने आपल्या मसिदी ठिकठिकाणी उभ्या केलेल्या होत्या. हे अरबी, पार्सी, तसेच संस्कृत शिलालेखांवरूनही कळून येते. म्हणजे ह्या लोकांना मसिदी उभ्या करण्याची मोठी हौस होती, हेही कळून येते. हे लोक आक्रमक नव्हते हे डॉक्टर–देसाई यांचे म्हणणे रास्त असले, तरी त्यांचे जीवनमार्ग केवळ शांततामय होते हे सांगणे कठीण आहे. या व्यापाऱ्यांजवळ भरपूर पैसा होता. त्या त्या जागी मसिदी उभारण्याजोगी त्यांची एकाच गावी राहणारी लोकसंख्या होती, त्यांच्याजवळ पैशाची ऐपतही होती. काही संस्कृत शिलालेखांवरून दिसते की ते एतद्देशीय राजाच्या मंत्रिपदापर्यंतच्या मोठ्या हुद्यावर चढलेले होते. पुढील इतिहासकालात अशा व्यापाऱ्यांनी राजकारणातही खूप उलाढाली केल्याचे दिसून येते. महमूद गावान हा देखील **मलिकुत्तुज्जार** म्हणजे मोठा व्यापारी होता. तसेच अब्दुल्ला कुतुबशहाचा मुख्यमंत्री मीर जुमला हाही फार मोठा व्यापारी होता. मुद्दा

एवढाच की हे इस्लामधर्मीय मोठमोठे व्यापारी हे केवळ व्यापारीच राहिले असे इतिहासावरून दिसून येत नाही.

नवाईत-व्युत्पत्ति

नवाखिज़, नवाखीज़, नवाखिज़ह या शब्दांचा अर्थ अरबीपार्सी, संस्कृत लेखांच्या आधारे आपण वरती पाहिलेला आहे. आता नवाईत हा शब्द मराठी भाषेत कसा आला याचा बोध सहज होतो, नवाखिज़ हे शुध्द अरबी अनेकवचनी रूप आहे. या नवाखिज़ शब्दाचे भारतीय भाषेतील नवाईत हे अपभ्रष्ट रूप होय. अरबी भाषेतील **ज़** ध्वनीचा मराठीत व अन्य भारतीय भाषांत **द** ध्वनी बनतो. कागद शब्दांचे फार्सीअरबी रूप कागज़ असे आहे. उर्दू भाषेत आजही कागज़ रूपच रूढ आहे. तसेच अरबी तकाज़ा शब्दाचे मराठी सारूप्यीकृत रूप तगादा असे आहे. नवाखिज़ शब्दातील ज़ ध्वनीचे रूपांतर द होऊन मराठीत ते त ध्वनीत परिर्वतित झाले. खुद्द महिकावती बखरीत देखील अरबी शब्दांतील ज ध्वनीचा दाखवल्याची उदाहरणे सापडतात. मदलिस (मूळ अरबी शब्द मज्लिस ६७·३०, ३२०, ६८·२). द-डफ्रखान (ज़फ़र खान ६३·१८, १९, २०), मुदफर (मुज़फ्फ़र ६३·२५) इत्यादी. मस्जिद या अरबी शब्दाचे मराठी अपभ्रष्ट रूप मिजिगिति आहे. हे कदम्ब जयकेशी याच्याच शक ९७५ मधील लेखावरून आढळते. शक १२६९ च्या नागांवच्या मराठी लेखातही हे रूप प्रयुक्त आहे. गमतीची गोष्ट ही की याच काळातील पार्सी आणि पष्तो भाषांतही मिजगित असे रूप आढळते (पाहा स्टीनगास व अब्दुल-हई हबीबी-लोयकान व पष्तो, पृ. ५०). प्राकृतच्या स्वभावानुसार ख व्यंजनध्वनीचा लोप झाला. नवाईत असे मराठी रूप सिध्द झाले. तेच मराठीत रूढ व अवगत आहे. ही गोष्ट ध्यानी घेतली तर नाखुदा, नाखुज़ा या फार्सी अरबी शब्दरूपांचे मराठीतील रूपांतर नाखुआ असे होणे तिच्या दैनंदिन व्यवहारातलेच आहे, हे सांगणे नलगे. ही रूपांतरे ८–९ शे वर्षापूर्वी झालेली आहेत. नाखुआ शब्दावरून नाखवा रूप बनणे हा मराठीचा स्वभाव आहे. नाईता हा शब्दही मराठीत रूढ आहे. तो महिकावती बखरीच्या जुन्या भागात आलेला आहे. नवाईत शब्दाचे आणखी प्राकृतीकरण ध्यानी घेतले तर नवाईत शब्दापासून नआईत, नाईत, नाइता, हे रूप सहजतया सिध्द होते. म्हणून हे तिन्ही शब्द–नाखवा, नवाइत व नाइता हे नाखुदा व नवाखिज़ या शब्दांची प्राकृत म्हणजे मराठी रूपे होत हे सिध्द होते. येथे मुंबईकरांना ही एक गोष्ट गमतीची वाटेल. ती म्हणजे मुंबईत, समुद्रकिनाऱ्यावर होडकी व छोट्या बोटी चालवणारे नाखवे लोक आजही बोटी चालविण्याचा व्यवसाय करतात. लोकमान्यांच्या चौपाटीवरील पुतळचाशेजारी, 'चौपाटी नाखवा संघ' अशी पाटी छोटचाशा घरासमोर लावलेली आजही आढळते.

नाखवा आदि शब्दांच्या प्रचार व प्रसार बाहुल्याने ही गोष्ट सिध्द होते की

या इस्लामधर्मीय ईराणी, अरब लोकांची वृत्ती, निदान सोपारा, दाभोळ, गोवा, सौराष्ट्र या प्रदेशात तरी, केवळ पोतवाणिज्य हीच होती. प्राचीन कालापासून या अरब, ईराणी व्यापाऱ्यांचे वास्तव्य आपणाला पश्चिम किनाऱ्यावर दिसून येते. शिवकालाच्या उषःकाली या ईराणी अरब व्यापाऱ्यांच्या आणि युरोपीय पोतवणिकांचा संघर्ष इतिहासांत सर्वज्ञात असा आहे. शिवाजी महाराजांना राज्याभिषेकपूर्व कालीसुध्दा या समुद्रव्यापाऱ्यांकडून चांगले उत्पन्न होते, हे कवींद्र परमानन्दाच्या शिवभारतातील खालील वर्णनावरून दिसून येते—

> **हत्वा म्लेच्छबलं स्वबाहुविभवैराक्रम्य तन्मंडलं**
> **शक्रश्रीः शरणागताय सदयः सद्यः प्रदायाभयम् ॥**
> **धत्ते पोतवणिग्जनैर्धनदतां यस्यान्तिके सागरः**
> **तस्मिन् राजपुरे व्यराजततरां राजाधिराजः शिवः ॥ २९·८९ ॥**

या इस्लामधर्मीयांचा व्यवसाय पोतवाणिज्यच होता असे म्हणण्यास आणखी एक छोटासा मुद्दा पुढे आणता येईल. मुंबई शहरात मुहीयुद्दीन हारिस नावाचे एक राजकीय पुढारी आजही आहेत. त्यांच्या हारिस नावाचे इंग्रजी वृत्तपत्रातील रूप Haris किंवा Harris असे असावयाचे. म्हणून प्रत्यक्ष परिचयाअभावी कोणीतरी इस्लामातून ख्रिस्ती धर्मात गेलेले गृहस्थ असावेत असे वाटावयाचे; परंतु ते इस्लामधर्मीय आहेत. हारिस शब्दाचा अर्थ कळल्यानंतर या नावातील वेगळा आशय ध्यानी आला. हारिस या अरबी शब्दाचा धात्वर्थ शेतकरी, कृषीवल असा आहे. हिर्स धातूचे ते कर्तृवाचक रूप आहे. यावरून अनुमान असे निघते की उपरिनिर्दिष्ट व्यक्तीचे घराणे, या भागात वा परदेशी, प्रामुख्याने शेतीचा व्यवसाय करणारे होते. ते फार प्राचीन काळी येथे आलेले असले तरी हे घराणे शेती करणारे म्हणून हारिस ठरले. हे वृत्तिवाचक नाम आहे. पोतवाणिज्याच्या समाजात शेती करणारे कुटुंब निघाले म्हणून हे नाव रूढ होणे सहज आहे. मुसलमानांच्या व्यापारी वृत्तीशी हे नाव अशा रीतीने जुळणारे आहे असे वाटले.

स्वतः राजवाडे यांनी नवाईत आदि शब्दांच्या व्युत्पत्तीचा प्रपंच केलेला नाही; परंतु प्रस्तावनेत मोठे धाडसाचे विधान केलेले आहे. " लाहूरशाच्या नऊ वर्षांच्या अमदानीनंतर, निका मलिकाने माहिमचे राज्य शक १२७९ त नायत्या राजांच्या स्वाधीन केले. हे राजे मूळचे प्रतिलोम हिंदू होते, परंतु ते पुढे मुसलमान बनले. जन्माने व कुळाने देशी आणि धर्माने मुसलमानी असे हे दुरंगी राजे हिंदू देसल्यांसहि मानवले व निका मलिकासही आवडले" (पृ. ६१) राजवाडे यांनी आपल्या या प्रदीर्घ प्रस्तावनेत अनेक धाडसाची विधाने व कपोलकल्पित चर्चा केलेल्या आहेत. नवीन उपलब्ध इतिहासाच्या प्रकाशात व ईराण, अफगणिस्तान येथील इतिहासांची दीपिका

हाती घेऊन या बखरीकडे पाहिले पाहिजे. परंतु या गोष्टी राजवाडेकालात अनुपलब्ध होत्या असे म्हणावे लागते. म्हणून या प्रस्तावनेंतील राजवाडे यांनी सिद्ध केलेली विधानेही फारच पडताळून घेतली पाहिजेत. या संबंधात पृष्ठ ७८, ८९, ९४, ९९, १००, १०३, १०४, १०५, इत्यादीवरील चर्चा निव्वळच दिशाभूल करणाऱ्या आहेत. वर निर्दिष्ट केलेले विधानही याच धर्तीचे व म्हणून त्याज्य होय. बखरीच्या आधारे नायत्यांचे राज्य शक १११६ मध्ये सुरू झाले, असे बखरीआधारे राजवाडे यांनी नोंदविले आहे. परंतु बखरीच्या या म्हणण्याला प्रत्नलेख वा अन्य कसलाच पुरावा मिळत नाही. त्याच्या उलट ठाणे प्रांतात हिंदूचे राज्य शक १२०० च्या नंतरही बरीच वर्षे चालू होते असे दिसून येते. आता दोन शिलालेख उपलब्ध झाले आहेत. शक १२६९ च्या नायगांवच्या मराठी शिलालेखात मुसलमान अधिकारी व मिजिगिति म्हणजे मसीद बांधल्याचे वर्णन आहे. आता शक १२९९ चा अंधेरी (मुंबई) येथे सापडलेला शिलालेख विद्यारत्न श्री. वि. भि. कोलते संपादित आहेत. अलाउद्दीन खिलजीच्या पूर्वी या प्रदेशात मुसलमानांची सत्ता स्थापन झाल्याचे आढळत नाही. वरील दोन्ही लेख बरेच उत्तरकालीन आहेत. नायत्यांचा शेवटचा अधिकारी मकसीदसीर अरबाह शक १३१६ त राज्यकर्ता कार्य पाहू लागला. चहूकडे मुसलमानांची सत्ता आल्याने, सर्वत्र तुर्काण झाल्याने हे शक्य आहे. नायते हे समुद्रकिनाऱ्यावरील व्यापारी होते. शक १२५० च्या सुमारास गुजरात, महाराष्ट्रात मुसलमानी सत्ता पसरली, तेव्हा या नायत्यांनी नवीन आलेल्या राजकीय सत्तेचा उपयोग करून घेणे सहजप्राप्त आहे. म्हणून ते स्थानिक सरदारांच्या नात्याने कोठेकोठे अधिकारावर असणे शक्य आहे. परंतु नाखवा, नवाईत वा नायते मुस्लिम गटाचे स्वतंत्र राज्य कोणत्याही तत्कालीन फार्सी वा अरबी इतिहासग्रंथातही उल्लेखिलेले आढळत नाही. स्वतंत्र पुराव्याखेरीज बखरीतील हे वर्णन इतिहास म्हणून मान्य करता येत नाही, असे राजवाडे यांनीही नोंदविले आहेच.

नायते, नाखवे हे जन्माने व कुळाने देशी व धर्माने मुसलमान होते, हे राजवाडे यांचे विधान तर्कदुष्ट व चुकीचे आहे. ते अरब व ईराणी लोक होते व ते धर्माने मुसलमान होते. शतकानुशतके निरनिराळ्या भाषाक्षेत्रात गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक व केरळ–राहिल्याने त्यांच्या भाषेत, राहणीत व संस्कृतीत फरक झालेला आढळतो. या संबंधात हैद्राबादचे एक विद्वान अज़ीज़ यार जंग यांचा उर्दू भाषेतील तारीखुन्नवायित हा ग्रंथ अत्यंत उपयोगी आहे. जंग याने नवाईत हा शब्द अरबी असल्याचे निवेदिले आहे. परंतु ते योग्य नव्हे, हे वरील चर्चेवरून दिसून येते. वरील पुस्तक शक १८२६ मधील आहे. जंग स्वतः नाइता जमातीचे आहेत. त्यामुळे एका दृष्टीने ग्रंथ अत्युपयुक्त आहे. त्यात नाइता जमातीच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक चालीरीती वर्णिल्या आहेत. त्यात नाइता जमातीच्या ३३२ प्रमुख ऐतिहासिक व्यक्तींची संक्षिप्त चरित्रे दिली आहेत. त्यातील विजापूरच्या अली

आदिलशाहांचा प्रधान मुल्ला अहमद नाइता, त्रिचनापल्लीचा चंदासाहेब म्हणून प्रसिद्ध असलेला नवाब हुसेन दोस्त खान, म्हैसूरचा बादशहा हैदर अ़ली खान, अर्काटचा नवाब असलेला सआ़दतुल्ला खान नायती कोकणी, तसेच सालारजंग म्हणून प्रसिद्ध असलेला हैद्राबादचा मुख्य प्रधान तुराब अ़ली खान प्रसिद्ध होते. नाइता जमातीत विधवा पुर्नविवाहाची बंदी, हिंदू स्त्रियाप्रमाणेच नाइता महिलेचा पोशाख व अलंकार, एकाच जमातीतील लग्नाची परंपरा (कफू), नाइता जमातीच्या निर-निराळ्या प्रादेशिक असलेल्या मातृभाषा इ. गोष्टी या पुस्तकात अत्यंत महत्त्वाच्या आहेत. थोडक्यात नायते, नाखवे हे अरब, ईराणी, वंशातील मुसलमान पोतवाणि-ज्याची वृत्ती बाळगणारे होते. त्यांचा समुद्रव्यापार भारतात मुसलमानी सत्ता स्थिर होईपर्यंत चालला होता. तदनंतर हे लोक राजकारणात शिरले. त्यांचा व्यापार बुडाला. नाइते मिश्रसंतती आहेत असे म्हणणे अनैतिहासिक आहे.

◆◆◆

५ : शाहान्शाह गटातील शब्दांची परम्परा

फार्सी भाषेत शब्दांचा एक गट शतकानुशतके शाहान्शाह या शब्दाच्या व्याकरणाच्या नमुन्यानुसार बनत आलेला आहे. शाहान्शाह किंवा शहन्शाह हा शब्द फार्सी भाषेत जन्मलेला असून त्याचा अर्थ राजांचा राजा, सम्राट् असा आहे. भारतात हा शब्द सामान्य शिक्षण झालेल्या माणसालासुद्धा अवगत आहे; याचे कारण असे की ही मुगल सम्रटांची साम्राज्यवाचक पदवी होती. सामान्य फार्सी भाषेत शाहेशाहान म्हणजे राजांचा राजा हा शब्द सम्राटासाठी असावयास पाहिजे होता. परंतु तसे कधीही होत नाही. शाहान्शाह शब्दाची बनावट ही अगदी भिन्न टंकशाळेतून झालेली आहे.

या शब्दाचा इतिहास साधारणतः २५०० वर्षांचा आहे. हखामनिश (Achaemenian) राजवंशातील सम्राट दारयवहु Darius (इ. स. पूर्व ५२१–४८६) याने ख्शीयथियानाम् ख्शायथिय अशी उपाधी आपल्या, पश्चिम ईराणातील विहिस्तून येथील पर्वतराजीत कोरलेल्या प्रत्नलेखात, स्वतःला लावलेली आढळून येते. प्रत्नलेखातील पहिले वाक्य असे आहे (पाहा–केंट, पृ. ११६)

अदम्: दारयवउश्: ख्शायथियः वज्रकः
ख्शायथिमः ख्शायथियांनाम्: ख्शायथियः ।।
पार्सॅय्: ख्शायथियः दह्यूनाम्: विश्तास्पह्याः
पुत्रः अर्शामह्याः नपाः हखामनिशियः ।।

स्वर्गीय शापूरजी कावसजी होडीवाला यांनी हा भाग संस्कृत भाषेत असा अनुवादिला आहे. (पहा–होडीवाला)–

अहं दारयवहुः क्षत्रियः वज्रकः क्षत्रियः
क्षत्रियाणां क्षत्रियः पार्से क्षत्रियः दस्यूनां
विस्तास्पस्य पुत्रः अर्शामस्य नप्ता
हखामनिशियः ।

डॉ. आर. जी. केंट याने हे पर्वतप्रत्नलेख नव्याने संपादित केलेले आहेत. त्याने ख्शायथियानाम् ख्शायथिय हा शब्दसमूह क्षत्रियाणां क्षत्रिय या संस्कृत शब्दांपासून व्युत्पादिलेला नाही (पाहा, केंट, पृ. ५२.) परंतु तोलमन याने तसे केलेले आहे. (पाहा, तोलमन, पृ. ८४.) लुई ग्रे याने फार्सी शाह हा शब्द संस्कृत **क्षत्र** शब्दापासून व्यूत्पादिलेला आहे. (पाहा–ग्रे, परिच्छेद ३४६, ४८८.) अशाप्रकारे,

शाहान्शाह हा शब्द प्रयत्यक्षः संस्कृत क्षत्रियाणां क्षत्रिय या शब्दसमूहापासून व्युत्पन्न आहे. ही वस्तुस्थिती ईराणविद्येच्या संशोधन क्षेत्रात मान्यता पावलेली आहे. हुब्ब-ई-वतन अथवा अहल-ई-इल्म या शब्दात प्रयुक्त फार्सी भाषेतील इज़ाफ़त साध्य करण्याचा आधुनिक फार्सी भाषेतील सामान्य व सर्वप्रचलित नियम शाहान्शाह या सामासिक शब्दाला लागू पडत नाही, हे निर्विवाद आहे.

मौबदान्-मौबद हा शब्द देखील याच टंकशाळेत घडलेला आहे. स्वर्गीय डॉ. इब्राहीम पूरे-दावूद हे आधुनिक ईराण देशातील एक प्रकाण्ड पंडित होते. स्व. रवीन्द्रनाथ ठाकूर यांच्या आमंत्रणावरून ते इसवी १९२७-२८ मध्ये, ईराण देशाचे सांस्कृतिक प्रतिनिधी व राष्ट्रीय प्राध्यापक म्हणून एक वर्षभर शांतिनिकेतन येथे होते. वरील शब्दाविषयी ते म्हणतात. (पहा–पूरे–दावूद, पृ. ६१) " उच्च प्रमुख उपाध्यायाला **मुपतान् मुपत** (मौबदान्–मौबद) असे नामाभिधान प्राप्त होते. " मौबदान्–मौबद हा सामासिक शब्द **मगपतीनाम् मगपती** या शब्दाचे परिवर्तित व झिजलेले रूप आहे. असे विद्वानांचे मत आहे. मौबदान्–मौबद हा मोबदांचा सर्वोच्च मौबद होता, ही गोष्ट येथे ध्यानात ठेवण्यासारखी आहे. एका अर्थाने हा अधिकारी धर्मविषयक विभागाचा प्रमुख होता. हे अधिकारपद ईराण देशात सासान राजवंशाच्या अंतापर्यंत (शक ५७४) चालू होते व त्याचा अधिकारी आपली कर्तव्ये पाळीत होता, ही गोष्ट आता स्पष्ट झालेली आहे. (पाहा–ख्रिस्टनसेन पृ. १५२) मौबद हा शब्द मगपती शब्दाचे अपभ्रस्ट रूप आहे. मग हे शक गणाचे उपाध्याय होते. हे शक इसवीपूर्व शेदीडशे वर्षापासून इसवीच्या चौथ्या शतकापर्यंत पश्चिम भारतात वावरताना दिसतात. उपरोक्त दोन्ही विद्वानांनी **हरपतान्-हरपत** (हरबूदान–हरबूद) या अधिकारपदाचाही उल्लेख केलेला आहे. डॉ. ख्रिस्टनसेन याने कृषिकर्म विभागाच्या प्रमुखांचा **वास्तर्योशान–सालार** असा उल्लेख केलेला आहे. येथे या सामासिक शब्दातीत पूर्वपद संस्कृतमधील षष्ठीचे अनेकवचन आहे. (पाहा–ख्रिस्टनसेन, पृ. १५८). दबीर, दिबीर हा फार्सी शब्द भारतीय ऐतिहासिक साहित्यात नित्य वावरणाऱ्या लिपिकर शब्दाचा नात्याने सगोत्र संबंधित आहे. भारतीय प्रत्नलेखनात दिविरपति हा शब्द चिरपरिचित असा आहे. (पाहा–एइं, खण्ड ८, पृ. १९४, १९९, ख. ३५ पृ. २९१). राजांची स्मारके आणि महत्त्वपूर्ण घटनांची नोंद या कामासाठी उपयोजिल्या जाणाऱ्या प्रत्नलेखकलेची आयात ईराणी आर्यांच्याकडून झाली अशी या शब्दावरून सूचना मिळते. **डॉ. ख्रिस्टनसेन** याने **दिबिहीरान्-बद, दिबिहीरान्–महीश्त** या शब्दांचे अनेक उल्लेख केलेले आहेत. (पाहा. ख्रिस्टनसेन पृ. १७५). प्रथम शब्द दिविराणाम्–पति असून द्वितीय दिविराणाम्-महिष्ठ असा आहे. ही दोन्ही अधिकारपदे लेखकांच्या गटांवर प्रभुत्व चालविणारी आहेत. याच विद्वानाने **दादवरान्–दादवर** या अधिकारपदाची चर्चा केलेली आहे. (पाहा–पृ. १७५). प्रथम शब्द दिविराणाम्–पति असून द्वितीय दिविराणाम्–महिष्ठ

असा आहे. ही दोन्ही अधिकारपदे लेखकांच्या गटांवर प्रभुत्व चालविणारी आहेत. याच विद्वानाने **दादवरान्–दादवर** या अधिकारपदाची चर्चा केलेली आहे. (पाहा, पृ. ३९३). हे पद राज्यातील न्याय व्यवस्थेचे आहे. सासानी साम्राज्यात धर्म, नीती आणि न्याय यांची सांगड घातलेली असल्यामुळे, वरील अधिकारपदाचा उल्लेख मौबदान्–मौबद आणि इतर पदांच्या संलग्नतेने करण्यात येतो.

पूरान दूख्त अथवा **बूरान दूख्त** (हे पूर्वशब्दाचे अरबीकरण त्या भाषेत पाहा, ध्वनी नाही) हे राजघराण्यातील एका प्रतिष्ठित महिलेचे नाव होय. पूर किंवा बूर हे त्या राजघराण्याचे नाव. या शब्दाचे संस्कृत **पुरु** शब्दाशी सगोत्रत्वाचे नाते असणे संभवते. पूरान् हे पूर शब्दाचे षष्ठीचे अनेकवचनी रूप आहे. दुख्त किंवा दुख्तर हा शब्द, भाषावैज्ञानिकांच्या मते, संस्कृत दुहितृ शब्दापासून व्युत्पन्न आहे किंवा तो त्याचा सगोत्र आहे. पूरान-दूख्त ही खुस्रौ पर्वीज़ (राज्यकाल शक ५१२ ते ५४९) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या द्वितीय खुस्रौ या सासानी सम्राटाची कन्या होती (पाहा–ब्राऊन खंड १, पृ. १८२). पूरे-दावूद (जन्म शक १८०८, मृत्यु शक १८८८) हे आधुनिक ईराण देशाचे मोठे प्रतिष्ठित व मान्यवर विद्वान होते. ईराण देशाच्या प्राचीन परम्परा, चालीरीती आणि धर्म यांच्या अभ्यासाला त्यांनी आपल्या अभ्यासाने नवीन प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. ज्यांनी ईराण देशाच्या प्राचीन वैभवाचा समूळ नाश केला त्या अरबांच्या धर्मात जन्म पावून, पूरे-दावूद यांनी प्राचीन परम्परा पुनरुज्जीवित करण्यात आयुष्य वेचिले. भविष्यकाळातील धर्मा-विषयीची परस्पर सहिष्णुता आणि सद्बुद्धि यांचे ते ईराणमधील उद्गाते मानण्यात येतात. प्राचीन आर्यांच्या ईराण देशाची परम्परा पुढे चालवीत त्यांनी आपल्या एकुलत्या एक कन्येचे नाव **पूरान-दुख्त** असे ठेविलेले आहे. त्यांच्या उत्तमोत्तम कवितांच्या संग्रहाचे नांव त्यांनी पूरन-दुख्त नामा असे ठेविले आहे (पाहा ईरानी). हा ग्रंथ स्वतः कवीच्या प्रस्तावनेसह मुंबईतून प्रकाशित झालेला आहे. याच पार्श्व-भूमीवरून हफ्तान-बोख्त (मुक्त झालेले सात) या शब्दाकडे पाहाणे अत्यंत समर्पक होईल असे वाटते (पाहा-ब्राउन खण्ड १, पृ. १४५).

अरबांच्या मनावर शाहान-शाह या शब्द व संज्ञेने आपला स्वतःचा असा परिणाम घडवून आणलेला आढळतो. पहलवी भाषेतील शाहानशाह या शब्दाचा आशय व्यक्त करण्यासाठी विजेत्यांच्या अरबी भाषेत शब्द नव्हता आणि आजही आढळून येत नाही. अरबी भाषेतील मलिक म्हणजे राजा या शब्दावरून अरबी विद्वानांनी समानान्तर व समानाशय असा **मलिकान्-मलिका** हा नवीन शब्द घडविला (पाहा तोलमन पृ. ४३). अरब समाजपुरुषाने फक्त मलिक याचा अनुभव घेतलेला होता. त्याला राजा म्हणजे शाहनशाह याचा परिचय नव्हता. हा नवीन शब्द घडविताना त्यांना ईराणी आणि संस्कृत टंकशाळेचा उपयोग

करावा लागला. मलिकान-मलिका या शब्दातील मलिकान हे भारेराणी परम्परेतील षष्ठीच्या अनेकवचनाचे रूप आहे. शब्द अरबी असले तरी त्याची व्याकरण प्रक्रिया मात्र संस्कृतची आहे.

ही गोष्टही अत्यंत आकर्षक आहे. मुगल सम्राट अकबराने अहमदनगरची निजामशाही सत्ता खालसा करण्याचा प्रयत्न केल्यानंतर, निजामशाही सत्तेची नव्याने प्राणप्रतिष्ठा करणाऱ्या मलिक अंबराने (मृत्यु शक १५४८-हिजरी १०३५) स्वत:साठी **मलिकाने मलिक** ही सम्राटवाचक उपाधि धारण केलेली होती. ही गोष्ट त्याच्या एका शक १५२९ च्या मराठी कागदावरून स्पष्टपणे कळून येते (पाहा राजवाडे खण्ड ८, पृ. ४०४). शाहनशाह या चालू आणि सहज सोप्या शब्दाच्या ऐवजी, उत्खनन करून हा अडगळीत पडलेला शब्द हुडकून काढण्यामागे, अहमदनगरच्या या पोलादी अबिसिनियन पुरुषाच्या मनात, उत्तरेतील शाहानशाच्या मनात परिहार्य आणि अनावश्यक कटुता निर्माण करण्याचे टाळावे, अशी इच्छा असणे शक्य दिसते.

इस्लामाच्या राजकीय परमोत्कर्षाच्या काळात समीपपूर्व देश आणि भारता-सहित मध्य आशियात फार्सी भाषेला आंतरराष्ट्रीय भाषेचा दर्जा प्राप्त झालेला होता, ही गोष्ट निर्विवाद आहे. ही वस्तुस्थिती कमीअधिक एका सहस्रकापर्यंत चालत आलेली होती. यामुळे अरबी, तुर्की, इतर मध्य आशियायी भाषांत आणि भारत या उपखंडातील बहुतेक सर्व भाषांवार फार्सी भाषेचा कमीअधिक प्रभाव दिसून येतो. अरबांप्रमाणे तुर्क लोक हे ईराण देशाचे जेते असले तरी ईराणी लोकांनी आपल्या श्रेष्ठ सांस्कृतिक आणि साहित्यिक संपन्नतेने, अरबाप्रमाणेच, आपल्या अर्धसंस्कृत तुर्क विजेत्यांना, आपल्या परिपाठानुसार सुसंस्कृत केले. **तुर्कान खातून** हा शब्द, तुर्कवंशीय सलजूक राजघराण्यातील प्रसिद्ध मालिकशाह या ईराणी बादशाहाच्या राणीचे नाव आहे. मालिकशाहाचा राज्यकाल शक ९९४ ते १०१४ होय. या काळापर्यंत तुर्कांनी ईराणी लोकांचे साहचार्य लाभून शतके गुजरलेली होती. तुर्कान-खातून या शब्दाची जडणघडण पूरान-दुख्त या शब्दानुसारच आहे, हे अगदी स्पष्ट आहे. (पाहा, ब्राउन खण्ड २. पृ. १८२)

जानान-बेगम ही अकबराचा सेनापती खाने-खानान याची कन्या होती (पाहा, अवस्थी, पृ. ४९२). तिचा विवाह अकबराचा तिसरा कनिष्ठ मुलगा दानियाल याच्याशी झालेला होता. 'जानान-बेगम हा शब्ददेखील पूरान-दुख्त शब्दाच्या पावलावर पाऊल टाकीत जन्मलेला आहे, असे दिसून येते.

कयान्-खुर

कयान-खुर अथवा कयान्-ख्वुर हा शब्द फार्सी कोशातून सर्वत्र दिलेला आढळून येतो (पाहा–स्टीन्गास्र, पृ. १०६८). या शब्दाचा अर्थ दैवीप्रकाश असा

असून त्यापासून राज्यांना शुभ आणि लोकांना शिस्त प्राप्त होते असा समज आहे. प्राचीन ईराण देशातील कयान् किंवा कयानियान हा दुसरा प्रसिद्ध राजवंश असून त्याचा काल पौराणिक असला तरी तो ईराण देशाच्या इतिहासात अंगभूत असा आहे. फिर्दौसी याने या राजघराण्यातील चार प्रसिद्ध राजांचे वर्णन केलेले आहे. त्याचे वर्णन बरेच तपशीलवार असले तरी ते बिनचूक आहे असे विद्वान् मानीत नाहीत. **कयान** हा शब्द कथ, कइ शब्दांचे अनेकवचन असून हा मूळ शब्द संस्कृत कवि शब्दाचा समांतर व सगोत्र आहे. त्याचा अर्थ शूर पुरुष, योद्धा, मन्त्रणा कुशल असा असून तो यमक जुळविणारा या अर्थी कवि नव्हे. कविता रचणारा हा अर्थ फार उशीरा भारतीय आर्यांच्यामध्ये मागाहून चिटकलेला आहे. कयान् हा शब्द कय्, कइ शब्दाची अनेकवचनी षष्ठी असावी असे वाटते. परंतु कयान्–खुर शब्दातील पहिले पद अनेकवचनी षष्ठीचे रूप आहे, असे वाटते. ही गोष्ट सुद्धा सर्वमान्य आहे की **खुर** किंवा **ख्वुर** हा शब्द वैदिक स्वर् म्हणजे सूर्य या शब्दाचा सगोत्र आहे. दख्खिनी हिंदीतील नित्यप्रयुक्त शब्द सूर् हा देखील या वैदिक स्वर् शब्दापासूनच व्युत्पन्न आहे, सूर्य शब्दापासून नव्हे. खुर अथवा हूर हे दुसरे दोन शब्दही स्वर् शब्दापासून व्यत्पन्न आहेत. कयान्–खुर याचा मूलतः अर्थ कइ यांचा, कइ वंशीयांचा सूर्य असा असावा. कालांतराने गर्भितार्थाने या शब्दाला दैवी प्रकाश, भाग्यवान् राजांचा पथप्रदर्शक असा अर्थ मागाहून प्राप्त झाला. शब्दाच्या व्युत्पतीच्या अज्ञानामुळे, किंवा अवेस्ता आणि पहलवीच्या अपरिचयामुळे मध्ययुगीन ईराणी लोकांनी या शब्दाचा उच्चार कियान् असा केलेला आहे कयान् जाद (ह) म्हणजे कय वंशाचा राजपुत्र, भाग्यपुरुष असाही दुसरा एक शब्द फार्सीत रूढ आहे.

कइसर

कइसर हा पुराण शब्द प्राचीन भारतीयांना ज्ञात होता. महाराजा कनिष्क याचा नातू असलेल्या द्वितीय कनिष्क याच्या राज्यकालातील आरा प्रत्नलेखात तो वापरलेला आहे. या लेखातील ४१ हे वर्ष शककालाचे (इसवी ११९) मानतात. या **कइसर** शब्दाचे मूळ आणि त्याच्या प्रवासाबद्दल काहीसा गैरसमज पसरलेला आहे असे दिसून येते. येथे स्टेन कोनौयानें असे प्रतिपादिले आहे (पाहा–कोनौ पृ. १६५) की रोमच्या राजांची सम्राटवाचक उपाधि असलेल्या रोमन सीझर शब्दापासून हा शब्द उसनवारीने आलेला आहे. परंतु लुडर्स, कोनौ इत्यादी विद्वानांनी प्राचीन ईराणी सांस्कृतिक परम्परा वाढलेल्या ईराणी वंशाच्या लोकांनी कुशाण साम्राज्याची उभारणी केलेली आहे. ईराणी लोकाचा कयान्, कयानियान् हा राजवंश, साम्राज्यपभोक्ते रोमन सीझर यांच्या किती तरी अगोदर होऊन गेलेला आहे. हा शब्द प्राचीन ग्रीक भाषेत प्रयुक्त होता व त्याचे उच्चारण **कईसर** असे

होते हे कोशग्रंथावरून कळते. जर्मन लोकांतही हा शब्द कइसर रूपानेच वावरतो. सीझर हे मूळ व प्राचीन उच्चारण नव्हे हे या शब्दाच्या Caesar या लेखानावरून आढळून येते. याचा उच्चार कइसर असाच आहे. नंतर त्याचे अपभ्रंशन सीझर उच्चारात झाले. उत्तरकालात अरबांनी त्याला **अरबाळण्यासाठी** (अरबी शब्द मअ्रब–अरबी पेहराव देणे, याच्या धर्तीवर), क ध्वनीचा उच्चार जिव्हामूलीय करून कयसर असा उच्चार रूढ केला. एका रशियन राजवंशाचे झार हे नावसुद्धा याच शब्दापासून उत्पन्न आहे. ऑगस्टस या पुढे रोमन सम्राट झालेल्या मुलाच्या जन्माच्या वेळी त्याची आई अडवली आणि शस्त्रक्रिया करून मूल बाहेर काढले, म्हणून या मुलाला पुढे सीझर असे नाव पडले ही केवळ उत्तरकालीन दंतकथा असून रतिमात्र विश्वासार्ह नाही, असा विल डयुरंट आदि विद्वानांचा निर्वाळा आहे.

कयान राजवंश हा अत्यंत प्राचीन, एका अर्थी पौराणिक, असल्यामुळे आणि त्याचा मातृदेश खुरासान, नैॠत्य अफगाणिस्थान असल्यामुळे कइसर हा शब्द सीझर शब्दाचा पूर्वज असणेच अधिक संभवनीय आहे. प्राचीन अवेस्ता, पहलवी साहित्यात त्याची मुळे सापडणे शक्य आहे. रोमन लोकांनी साम्राज्यसत्ता स्थापन केल्यानंतर, ईराणात विकसित व कालपरिपूत झालेली कईसर उपाधि स्वतःकरिता स्वीकारणे, वापरणे हेच अधिक संभवनीय वाटते. Caesar शब्दाच्या जडणघडणी-वरून तो प्राच्य आहे असेच दिसून येते. रोमन राज्यातील कइसर ही उपाधी म्हणून कुषाण राजाने वापरली असे फ्लीट म्हणतात (पाहा–रॉएसो, पृ. १०४), तेव्हा त्यांनी ईराणी प्राचीन परम्परा ध्यानी घेतली नाही. त्याचे हे म्हणणे केवळ तर्कावर आधारलेले आहे. कवि आणि ईश्वर म्हणजे कवि, कइ वंशातील मोठा राजा, या सामासिक शब्दापासून अपभ्रष्ट रूपानें कइसर शब्द बनलेला असावा.

यज़्दान्दाज़

फिर्दौसीच्या शाहनामा ग्रंथाची ऐतिहासिक पूर्वपीठिका नोअल्डेके यांनी आपल्या ईराणी राष्ट्रीय महाकाव्य या प्रबंधात दिलेली आहे (पहा–नोअल्डेके पृ. २६). या पूर्वपीठिकेचा मागोवा घेताना, शाहनामा ग्रंथाला आधारभूत असलेल्या **ख्वताइनामक** किंवा त्याचे **अरबाळलेले** रूप **खुदाइ–नामह** या ग्रंथाच्या चौघा सहग्रंथकारांचा उल्लेख केलेला आहे. त्या चौघापैकी एकाचे नाव यज़्दान–दाज़ असे आहे. या शब्दातील शेवटचा ज ध्वनी हा मूळ त किंवा द वर्णाचे अरबाळलले रूप आहे. ही अरबी भाषेची परम्परा किंवा खोड आहे. म्हणून यज़्दान्दात किंवा यज़्दान्दाद हे मूळ नाम आहे. लुई ग्रे याने यज़्दान हा शब्द यज़्द (म्हणजे देवदूत) या शब्दाचे षष्ठीचे रूप आहे अस हेरले व प्रतिपादिले आहे (पाहा–ग्रे,

परिच्छेद १२). हा यज़्द शब्द वैदिक यज्ञ शब्दाचा सगोत्र असणे सहज संभवनीय आहे. यज्ञ शब्दाचा अर्थ पूजा, प्रार्थना असा असून, त्याचा अर्थ पूजा करणारा, यज्ञ करणारा असाही आहे. यज़्दान्दाज़ हा शब्द शाहान्शाह या शब्दाच्या प्रक्रियेतूनच निर्माण झालेला आहे, हे स्पष्टपणे दिसून येते.

मर्दान-शाह (पाहा ब्राउन, खण्ड १, पृ. २००, २०५) हे भारत आणि ईराणी मुसलमानात अत्यंत लोकप्रिय असे व्यक्तिनाम चालत आलेले आहे. मर्द हा शब्द संस्कृत मर्त्य शब्दापासून व्युत्पन्न असून त्याचा अर्थ मनुष्य, मानव असा आहे. मर्दान्शाह हा शब्द संस्कृत षष्ठीविभक्तियुक्त आहे, हे उघड आहे. मर्दान्-सीना हा आणखी एक शब्द आहे, असे दिसून येईल (पाहा ब्राउन, ख. १, पृ. १२९).

जे. बर्जेस आणि पण्डित भगवानलाल इंद्रजी यांनी ईराणी भाषा आणि पहलवी लिपीत उट्टंकित झालेले तीन प्रत्नलेख प्रकाशित केलेले आहेत (पाहा बर्जेस, पृ. ६२ व पुढे). या लेखांचे वाचन आणि विवेचन म्युनिक येथील प्रसिद्ध ईराणविद्याकोविद डॉ. ई. डब्ल्यू वेस्ट यांनी केलेले आहे. हे तीन लेख ईराणातील यज़्दकर्द कालगणनेनुसार अनुक्रमे ३७८, ३७८ आणि ३९० (शक ९३१,९३१ आणि ९४३) मध्ये कोरलेले होत. एका ज़रतुष्ट्र धर्मीयाचे यज़्दान्–पानक असे नाव पहिल्या प्रत्नलेखात (ओळ ५) आलेले आहे. ते दुसऱ्या लेखातही (ओळ ४) आढळते. मर्दान शाह हे जरतुष्ट्रीय व्यक्तिनाम पहिल्या लेखात दोनदा (ओळी ६ व ७), दुसऱ्या लेखात दोनदा (ओळी ६ व ७) आणि पुनः तिसऱ्या लेखात एकदा (ओळ ६) असे आलेले आहे. अशारीतीने या नावाची पाच माणसे येथे उल्लेखिलेली आहेत. तिसऱ्या प्रत्नलेखात जावीदान-बूदो (ओळ ८) हे व्यक्तिनाम आढळते. ही सर्व नावे शाहान्शाह शब्द प्रक्रियेच्या परम्परेतीलच होत. यावरून ईराणांतील या प्राचीन धर्माच्या अनुयायांत, आपली प्राचीन परम्परा आणि संस्कृती यांचे जतन करण्याची किती प्रबल प्रवृत्ती होती हे निदर्शनास येते.

मीराँ किंवा मीराँजी हे भारतातील मुसलमानात अतिरूढ असे व्यक्तिनाम आहे. शाह मीराँजी शम्सुल-उश्शाक (मृत्यु शक १४८५–हिजरी ९७०) हा विजापूर येथील एक सूफी साधू आणि दक्खिनी हिंदीचा एक कवि होता. फार्सी भाषेत गुपचूप रूढ असलेल्या संस्कृतच्या उपरिनिर्दिष्ट षष्ठीच्या रूपाचा मीराँ शब्दात सुगावा लागतो. अमीर या अरबी शब्दाचे वरील प्रकारे अमीरान् हे रूप आहे. शब्दारम्भीचा अ हा ध्वनि लुप्त करण्याची प्रक्रिया फार्सी भाषेच्या दैनंदिन व्यवहारात दिसून येते. मीराँ या शब्दाचा मूळ उगम अमीरान्-अमीर या नावात असला पाहिजे असे वाटते. हा शब्द आम्हांला आढळला नसला तरी **मियाँ-मीर** हे व्यक्तिनाम आढळते (पाहा फीरोज कावसजी दावर लिखित (इंग्रज़ी)–ईराण

ॲण्ड इण्डिया थ्रू द एजेस, मुंबई, १९६२, पृ. १९१). काव्यहेतुपूर्तीसाठी इब्राहीम हा शब्द **बिराहीम** असा प्रयुक्त करण्यात येतो. दिल्लीच्या हिंदी, हिंदूई भाषेचा कवि अब्दुल याने आपल्या इब्राहीमनामा या (लेखन शक १५२५–हिजरी १०१२) मूळ इब्राहीम या शब्दाचे सारूप्यीकृत बिराहीम असे रूप वापरलेले आहे. तो म्हणतो—

> **लक़ब शाह-आदिल बिराहीम मिलाए**
> **किया हर्फ नौ रूप मिलाकर खुदाई–७३**

ग्रंथोल्लेख करताना कवीने बिराहीम हेच रूप वापरले आहे.

> **वचन फूल गुंद यों बिराहीम नाम**
> **किया सहस पर बर्स बारा तमाम–७११**

(पाहा : चौहान)

नव्या फार्सी भाषेतील याद, यादगार हे शब्द ज़रतुष्ट्री पहलवी भाषेतील अबियात, अबियातकर या शब्दापासून उत्पन्न आहेत. (पाहा भाण्डारकर, पृ. ७३) त्याचप्रमाणे नव्य फार्सी यार हा शब्द यहूदनिष्ठ फार्सी भाषेतील अयार आणि ज़रतुष्ट्रीय पहलवीतील अदियावार या शब्दापासून निष्पन्न आहे. फार्सीतील शब्दारम्भीच्या अ ध्वनीचा लोप करण्याची ही प्रथा, संस्कृत भाषेतील काही विशिष्ट परिस्थितीत शब्दारम्भीच्या अ ध्वनीचा लोप करण्याच्या परम्परेशी सुसंगत अशीच आहे. आणखीही मुसलमानातील मियाँ (मूळ मीयाँ) हे नाव भारतातील प्राकृत भाषेच्या मूळ प्रवृत्तीनुसार मीराँ या शब्दाचे घृष्ट व अपभ्रष्ट रूप आहे, असे दिसून येते. अन्यथा मियाँ शब्दाचा मागोवा लागत नाही. मुसलमानांची अशी प्राकृतनिष्ठ अनेक नावे, फार्सी प्रत्नलेखातून आढळतात, उदा० शेखा, शेखू, राजन खान, मल्लू खान, पीरन (पीरान शब्दाचे घृष्ट रूप). इत्यादी. मियाँ हे घृष्ट रूप शक १४२०, (हिजरी ९०४ च्या) एका फार्सी प्रत्नलेखात प्रयुक्त आहे, (पाहा– एइंफा, १९६३, पृ. ३७).

वरील सर्व चर्चेवरून हा निष्कर्ष अपरिहार्य आहे असे दिसून येते. उपरिनिर्दिष्ट शब्दांची बनावट आणि त्यांची वीण यांच्यात संस्कृत भाषेतील अनेकवचनी षष्ठीचा अवशेष जीव धरून सुप्तपणे वास करीत आहे असे दिसून येते आणि या शब्दांच्या अस्तित्वावरून ईराणी आर्यांच्या प्राचीन परम्परेचाही बोध होतो.

संक्षेप आणि सन्दर्भ

अवस्थी : अकबर, ए. एल. अवस्थी, खण्ड १
ईरानी : पूरान्दूख्त नामा: डी. जे. ईरानी, मुंबई १९२८
एइं : एपिग्राफिया इण्डिका, खण्ड ८
एइंफा : एपिग्राफिया इण्डिका, अरबी व फार्सी परिशिष्ट
केंट : ओल्ड पर्सियन : आर. जी. केंट, १९५०
कोनौ : कार्पस इन्स्क्रिप्शनम् इण्डिकारम्, खण्ड २, भाग २
ख्रिस्टनसेन : ईरान ब-अ़हदे–सासानियान, डॉ. इक़बाल (उर्दू), दिल्ली १९४१
ग्रे : इण्डो-ईरानियन फोनॉलॉजी, कोलंबिया, १९०२
चौहान : अब्दुलक़्त इब्राहीमनामा (हिन्दी), मुंबई (मुद्रणाधीन)
तोलमन : एन्शट पर्सियन: तोलमन, १९०८
नोअल्डेके : शाहनामा, के. आर. कामा संस्था, बुलेटिन क्रमांक ६
पूरे-दाऊद : होली गाथाज्, पूरे-दाऊद मुंबई १९२७
बर्जेस : केव्ह टेम्पल्स ऑफ वेस्टर्न इण्डिया, बर्जेस व इंद्रजी
ब्राउन : ए लिटररी हिस्टरी ऑफ पर्सिया, ई. जी ब्राउन, लंडन
भाण्डारकर : भाण्डारकर ओरिएंटल रिसर्च संस्था, अनल्स, खण्ड ४८–४९
रॉएसो : रॉयल एशियाटिक सोसायटी, जर्नल, १९१४
राजवाडे : मराठ्यांच्या इतिहासाची साधने खण्ड ८, पुणे १९२२
स्टीन्गास : पर्सियन–इंग्लिश कोश स्टीन्गास, लंदन, १९५७
होडीवाला : के. आर. कामा संस्था, मुंबई, बुलेटिन क्रमांक १९

(भारतीय इतिहास काँग्रेस, भागलपूर, १८९० इतिवृत्तातून भाषान्तरित)

◆◆◆

६ : भारतीय फार्सी प्रत्नलेखात जुम्मल आणि दशमान पद्धती

अल-जुम्मल किंवा अबजद म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पद्धतीचा आणि दशमान लेखनाचा अरब आणि ईराणी लेखकांनी केलेला वापर फारच उशीराचा आहे. सनातनी खलीफांपैकी अली या शेवटच्या खलीफाला (हत्याकाल, जानेवारी २५, ६६१ इ.) अरबी वर्णमालेत अकार-उकारादींची अक्षरचिन्हे सर्वप्रथम समाविष्ट करण्याचे श्रेय दिले जाते. त्याचप्रमाणे या भाषेच्या व्याकरणाचे नियम सूत्रबद्ध करण्याची कामगिरीही त्यानेच पार पाडलेली आहे. अंकगणितातील संख्या दर्शविण्यासाठी अरबी वर्णमालेतील अक्षरांना मूल्ये निश्चित करण्याची कामगिरी अली, या खलीफाचा अन्तेवासी अबू इद्रीस बिन अहमद कूफी (कूफा नगरचा रहिवासी) याने बजावलेली आहे. या पद्धतीला अबजद (पहिली चार अक्षरे अलिफ, बे, जीम, दाल यांवरून) पद्धती किंवा हिसाब अल-जुम्मल असे म्हणतात (पाहा, एइ–पृ. ४६८). ही पद्धती अशी आहे– "एखाद्या वैशिष्टचपूर्ण किंवा मार्मिक शब्दात किंवा एखाद्या वाक्प्रचारात अक्षरांची जुळणी अशी करावयाची की त्यांच्या अक्षरमूल्यांची बेरीज केली असता, त्यावरून एखाद्या गतकालीन किंवा वर्तमान घटनेचा कालोल्लेख प्राप्त होतो. अशा कालोल्लेखास रम्ज़ म्हणतात. तुर्की भाषेत त्याला लरीख असे नाव आहे. असे कालोल्लेख साधारणतया प्रत्नलेखात (विशेषेकरून काव्यरूप) वापरतात. त्यांवरून सामान्यतः एखाद्या घटनेची स्थापना सूचित होते. त्यांचा वापर बहुधा उपदेशात्मक ऐतिहासिक लिखाणांतून, विशेषतः मृत्यूलेखांतून केलेला आढळतो."

जुम्मल पद्धती

ऐतिहासिक घटनांचे कालोल्लेख दर्शविण्यासाठी या अल-जुम्मल पद्धतीचा अरबी साहित्यात उपयोग फारच उशीरा सुरू झाला. ही फार आश्चर्याची गोष्ट आहे असे मानता येत नाही. पैगम्बराच्या मृत्यूनंतरच्या नजीकच्या काही वर्षांत, कालोल्लेख करण्यासाठी अरबांनी ग्रीक अक्षरमूल्यांचा वापर केल्याचे आढळून येते (पाहा संक्षेप, सहीफा, पृ. ५३). मुहम्मद पैगम्बराला त्याच्या आणीबाणीच्या काळात मदीना शहराच्या ज्या प्रमुख व्यक्तींनी बिनधोक सहाय केले, त्यांना अन्सार म्हणतात. अशा एका हजरत अयूब अन्सारी याच्या थडग्यावरील, त्याच्या मृत्युलेखाच्या कालोल्लेख प्रत्नलेखात ग्रीक अक्षरांचा वापर करण्यात

आलेला आहे. सहीफा त्रैमासिकातील निबंधाचे लेखक श्री कसरा मिनहास यांनी, अल-जुम्मल पद्धती म्हणजे नक्की काय याचा बारकाव्याने विचार केलेला नाही असे वाटते. अशा कालोल्लेखाचे एक उदाहरण म्हणून त्यांनी फ़िर्दौसी याच्या खालील श्लोकाचा उल्लेख केलेला आहे.

जि हिजरत शुदह पंज हश्ताद बार
कि मन् गुफ़्तम् ईन् नामए-नामदार

येथे जुम्मल पद्धतीचा सर्वप्रथम उल्लेख म्हणून या वाक्याचा निर्देश केलेला आहे. येथे प्राप्त झालेला उल्लेख हिजरी ४०० (शक ९३२) असा आहे. परंतु **पंज हश्ताद बार** याचा अर्थ ८० संख्येच्या ५ वेळा म्हणजे ४०० असा होतो. येथे ८० आणि ५ या दोन संख्यांचा गुणाकार कर्तव्य आहे. ही जुम्मल पद्धती नव्हे. अशा पद्धतीने संख्या व्यक्त करण्याची पद्धती संस्कृत साहित्यात फारा वर्षांपासून रूढ होती. कालिदासाने या पद्धतीचा उपयोग खालील श्लोकात (रघुवंश २.२५) केलेला आढळतो :–

इत्थं व्रतं धारयतः प्रजार्थं समं महिष्या महनीयकीर्तेः ।
सप्त व्यतीयुस्त्रिगुणानि तस्य दिनानि दीनोद्धरणोचितस्य ॥

कसरा मिनहास यांनी दुसरीही भूल केलेली आहे. फार्सी किंवा अरबी साहित्यातील शतक, दशक आणि सुटे यांच्या सहाय्याने कालाचा उल्लेख करण्याची पद्धती हीच अल-जुम्मल आहे असे म्हटलेले आहे. हे खरे नव्हे. मिनहास याने, उदाहरण म्हणून, गरशास्प नामा ग्रंथातील असदी याचा खालील कालोल्लेख दिला आहे :–

जि हिजरत बि-दौर-ई-सिपिहरी कि गश्त ।
शुद् चार सद साल व पंजाह व हश्त ॥

या पद्धतीत संख्येतील शतक आणि सुटे यांचा वेगवेगळा उल्लेख करितात व वाक्य 'व' या अव्ययाने जोडले जाते. वरील श्लोकात चार शते, पंजाह म्हणजे पन्नास आणि हश्त म्हणजे अष्ट, आठ यांचा वापर करून ४५८ हिजरी (शक ९८८) ही संख्या सांगितली आहे. परंतु अबजद ही रीती नव्हे. या पद्धतीतसुद्धा अरबी आणि ईराणी वापरात थोडासा भेद आहे. ईराणी विद्वान फार्सी भाषेतील शब्द शतक, दशक व सुटे यासाठी वापरतात आणि दुसरा भेद म्हणजे शतक, दशक व सुटे अशा उतरत्या क्रमाने संख्या सांगतात. याच्या उलट अरबी भाषेतील पद्धती अशी. पहिली गोष्ट अरबी शब्दांचा संख्यावाचकांसाठी उपयोग आणि सुटे, दशक आणि शतक अशा चढत्या क्रमाने त्यांची मांडणी. हाच केवळ गौण असा दोन्हीतील भेद होय. वस्तुतः दोन्ही पद्धतीत विशेष फरक नाही. दोन्ही पद्धती जुम्मल सदरात, बसू शकत नाहीत.

भारतात

शतक, दशक व सुटे यांच्या सहाय्याने, महत्त्वाच्या घटनांचे कालोल्लेख करण्याची पद्धती इसवी कालगणनेच्या आरम्भी भारतात प्रचलित होती. भारताने तो वेळपर्यंत दशमान पद्धतीचा विकास केलेला नव्हता. अशोकाच्या प्राकृत भाषेतील प्रत्नलेखांत देखील अशा कालोल्लेखांचा मागोवा लागतो. दिल्ली-तोप्रा या अशोकाच्या प्रथम स्तंभलेखात खालील निर्देश उपलब्ध आहे. (पाहा, सरकारसि पृ. ५३)

> **देवानांपिये पियदसि लाज हेवं आहा।**
> **सडवीसति-वस-अभिसित्तेन मे इय**
> **धम-लिपि लिखापिता।**

येथे सांगितलेली संख्या सव्वीस असून ती इ. स. पूर्व २४३ वर्षी येते. अधिक उदाहरणांची येथे आवश्यकता नाही. ही पद्धती भारतात बद्धमूल झालेली होती आणि तिचा वापर आपल्या प्राकृत भाषा आणि खरोष्ठी लिपीत उत्कीर्ण प्रत्नलेखात भारतीय शक गणांनी केलेला आहे. विक्रम संवत् आहे असे निर्णीत झालेल्या ७८ वर्षीच्या पतिक याच्या तक्षशिला ताम्रप्रत्नलेखामधील असा शक गणांनी केलेला एक उलेल्ख आढळतो (पाहा, सरकारसि, पृ. १२४). लेखातील संबंधित भाग असा—

> **संवत्सरयै अठसततिमये** २० (+) २० (+) २० (+) १० (+) ४ (+) ४ **महरयस महंतस मोगस पनमस मसस पंचमे** ४ (+) **१ एतये पुर्वये** ....

येथे वर्षांची संख्या अष्टयाहत्तर अशी असून ती अक्षरी आणि आकड्यात दिलेली आहे. इतिहासातील महत्त्वाच्या घटनांचा उल्लेख करण्याची ही पद्धती मागाहूनच्या काळातही रूढ होती. येथे अक्षरात सांगितलेली संख्या अष्ट आणि सप्तति (म्हणजे ७८) यांच्या प्राकृत रूपात सांगितली आहे. लक्ष्य गोष्ट ही की ७ दशक व ८ सुटे यांनी ती व्यक्त करण्यात आली आहे. ही संख्या आजच्या पद्धतीने लिहिण्याची पद्धत फारच उशीरा आली.

अरबी आणि ईराणी भाषात हीच पद्धत अमलात आली असे दिसून येते. ईराणात ही पद्धत अगोदर वापरात आली असे दिसून येते. भारतामध्ये ही पद्धती मुसलमान जेत्यांनी कशी व केव्हा वापरली हे पाहणेच येथे प्रस्तुत आहे. आजच्या परिस्थितीत पाहाता, वस्तुतः भारतात नसले तरी पूर्वीच्या वायव्य सरहद्द प्रांतातील तोची खोऱ्यात कोरलेला सर्वप्रथम शिलालेख शक १८२९ मध्ये उपलब्ध झालेला

आहे (पाहा, एइंमो, १९२५–२६, पृ. २८). सध्या तो पेशावर येथील पुराणवस्तु संग्रहालयात सुरक्षित आहे. तो प्रत्नलेख, आरंभीच्या रिवाजाप्रमाणे, अरबी भाषेत असून त्याचा लेखनकाल हिजरी २४३ (शक ७८०) असा आहे. त्याचे शब्द असे आहेत– सुल्स व अरबैन व मायतैन. याचा अर्थ आहे– तीन व चाळीस व दोनशे. हे लेखन अरबी परंपरेनुसार आहे. याच लेखाचा आशय संस्कृत भाषेत आणि शारदा लिपीत त्याच दगडावर कोरलेला आहे, ही गोष्टही मोठी लक्ष्य आहे. अरबीतील संहिता कूफी लेखन धाटणीत आहे. भारतात उपलब्ध असलेला दुसरा प्रत्नलेख, पेशावरजवळील हुंद या खेड्यात सापडला असून त्याचे वर्ष हिजरी ४८२ (शक १०१२) आहे. त्यात वर्ष संख्या अशी दिलेली आहे– असना व समानैन व अरबामायत. दोन व ऐंशी व चारशे म्हणजे ४८२ हिजरी असे वर्ष आहे. या लेखाची लेखनकामाठी कूफीच आहे (पाहा, एइंमो, १९२१–२२, पृ. ७). आताच्या बदललेल्या परिस्थितीत भारतातील प्रथम शिलालेख कच्छ प्रदेशातील भद्रेश्वर या गावचा असून त्यावेळी तेथे हिंदू राजे राज्य करीत होते. कूफी कामाठीमध्ये लिहिलेल्या भद्रेश्वर येथील प्रत्नलेखांचे अध्ययन डॉ. ज़ियाउद्दीन देसाई यांनी प्रकाशित केले आहे. त्यातील पहिला लेख हिजरी ५५४ (शक १०८१) मधील असून त्याचे मूळ शब्द असे आहेत– अरबत व खमसैन व खमसमायत म्हणजे चार व पन्नास व पाचशे (पाहा, एइंफा– १९६५, पृ. ४). यापुढील दोन प्रत्न लेख हि. ५६९ (शक १०९६) आणि हि. ५७३ (शक ११००) चे असून अरबी शैलीने वरील प्रकारेच वर्षांची संख्या सांगण्यात आलेली आहे. अधिक उदाहरणे अनावश्यक होत.

थोडक्यात सांगायचे म्हणजे अरब आणि ईराण देशात, हजार आणि शतके यांनी बनलेल्या संख्या दशमान पद्धतीने लिहिण्याची परंपरा अद्यापि सुरू व्हावयाची होती. अबजद किंवा जुम्मल पद्धतीनेही इतिहासलेखन आणि प्रत्नलेखन या क्षेत्रात प्रवेश केलेला नव्हता. जुम्मल पद्धति जुन्या भारतीय पद्धतीचाच विकास असून या पद्धतीत दशमान पद्धतीचे दर्शन झालेले नसते. ईराणी आणि अरब पंडितांनी अरबी आणि ईराणी भाषात निर्मिलेल्या सर्व इतिहासविषयक ग्रंथात घटनांचे वर्ष अरबी परम्परेनुसार उल्लेखिल्याचीच उदाहरणे सर्वत्र दिसून येतात. ईराणच्या भूमीतच सर्वप्रथम जुम्मल पद्धतीचा अवलम्ब तूसी कवीने केलेला आढळतो (पाहा, सहीफा, पृ. ५७). अब्बासी राजवंशातील शेवटचा खलीफा मुस्तसिम बिल्ला याच्या वधाची घटना व वर्ष **खून** या शब्दाने उद्धृत करण्यात आली आहेत. खून शब्दातील खाय, वाव आणि नून या अक्षरांच्या मूल्याची बेरीज ६५६ येते. ही हिजरी कालगणना असून हे वर्ष शककालगणनेचे ११८० वर्ष होते. भारतात अमीर खुस्रो (मृत्यु हिजरी ७२५–शक १२४७) याने जुम्मल पद्धतीचा वापर केल्याचे आढळात नाही.

भारत-ईराणी (= भारेराणी) प्रत्नलेखनात, तौलनिक दृष्टया पाहाता, जुम्मल पद्धतीने फार उशीरा प्रवेश केला असे आढळते. शककालाच्या बाराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास मुसलमानांची राजकीय सत्ता भारतात स्थापन झालेली होती, तिने मूळ धरले होते. अशा प्रकारचा ऐतिहासिक व प्रत्नलेखीय भरपूर पुरावा उपलब्ध आहे. परंतु मुगल साम्राज्याचा संस्थापक बाबुर याच्या आगमनापूर्वी, प्रत्नलेखनात जुम्मल पद्धतीचा प्रवेश क्वचित्प्रसंगीच झालेला होता, अशा प्रकारचा पुरावा दिसून येतो, हे आश्चर्यकारक आहे. दुसऱ्या शब्दात असेही म्हणता येईल की हिजरी कालगणनेच्या नवव्या शतकात जुम्मल पद्धतीचा आरम्भ मात्र झालेला होता आणि तिचा वापर सार्वत्रिक झालेला नव्हता. याच शतकात भारत–ईराणी प्रत्नलेखनाचे माध्यम अधिकाधिक ईराणी बनत चाललेले होते. अरबी भाषेचा मुसलमानावरील पगडा कमी होत होता. ईराणी म्हणजेच फार्सी भाषा मुसलमानाची राजदरबारातील भाषा बनत चाललेली होती. परिणामरूपाने कालगणनेचे संख्यालेखन शब्दाच्या वापराने ईराणी पद्धतीने होऊ लागले होते.

येथे ही गोष्ट नमूद करणे आवश्यक वाटते. अफगाणिस्तानातील गरदेज (गजना नगराच्या पूर्वेस) या नगराचा रहिवासी अब्दुलहय्य गरदेज़ी याने अल–जुम्मल पद्धतीचा वापर आपल्या ग्रंथात शक ९७२ च्या सुमारास केलेला आहे. हा वापर अनेक प्रकरणातून दिसून येतो. त्याने या ग्रंथात दशमान पद्धतीचे संख्यालेखनही केलेले आहे, आठव्या प्रकरणात असा वापर सर्वत्र आहे (पाहा, गरदेज़ी, पृ. २०७ व पुढे). जुम्मलचा वापर गद्यातही मुद्यांचा क्रम नोंदण्याकरिता केलेला आहे.

मुसलमानांनी भारतात वापरलेली सर्वप्रथम कालोक्ती अरबी भाषेत असल्याचे आढळते. (येथे कालोक्ती हा शब्द आम्ही पारिभाषिक अर्थाने वापरीत आहोत. तो आंग्ल शब्द क्रोनोग्राम याच्या समानार्थी आहे). हा प्रत्नलेख बंगालमधील (कलकत्ता, हुगली) त्रिबेनी खेड्यात सापडलेला असून, त्यात १६ बैत (श्लोक) आहेत. शेवटच्या बैतात लेखाचा काल ख़ाय, साद आणि हाय या अक्षरांनी व्यक्त केलेला आहे. या तीन अक्षरांच्या मूल्यांची बेरीज (६००+९०+८) ६९८ अशी येते. हे वर्ष शक १२२० होय (पाहा, एइंमो, १९१७–१८, पृ. १३). या लेखाची चर्चा करीत असताना, तबक़ाते–नासिरी या पार्सी इतिहासग्रंथाचे (लेखनकाल हि. ६५८-शक ११८२) लेखक मिन्हाजे–सिराज याने एक कालोक्ती प्रयुक्त केल्याचे सांगितलेले आहे. या कालोक्तीत ख़ाय, सीन आणि दाल या अक्षरांच्या सहायाने हिजरी ६६४ (शक ११८७-८८) हे वर्ष उल्लेखिले आहे. दोन शतकांचा काल ओलांडल्यानंतर, ग्वाल्हेरसमीपच्या नलवार या किल्ल्यातील एका मशिदीच्या कमानीत बसविलेल्या दगडावरील प्रत्नलेखात जुम्मल पद्धतीने लेखाचा काल दाखविलेला आहे (पाहा,

एइंफा, १९६५, पृ. ३२). या लेखाचा काल शुहूर ९०९ असा असून, तो 'बा अत्–ता व अज़्–ज़ा अख्ज' या वाक्याने दिग्दर्शित केला आहे. येथील ताय आणि ज़ाय या अक्षराच्या मूल्याने (९+९००) ९०९ ही संख्या मिळते. हे शुहूर वर्ष शक १४२९ चे येते.

शक १४४८ त बाबराने दिल्लीत आपली सत्ता स्थापन केली. या पहिल्याच वर्षी मुरादाबाद जिल्ह्यातील संभल गावी मशीद बांधण्यात आली. या लेखात म्हटले आहे की देशांत बाबराने आपल्या राज्याचा पाया घातला (ओळ ३). या वास्तूचे काम करवून घेणारा अधिकारी हिंदू बेग नावाचा होता. 'यकुम अज़ शहरे–रबीऊल–अव्वल' या वाक्यातील सर्व अक्षरमूल्यांची बेरीज ९३३ येते. हे हिजरी वर्ष होय (पाहा, एइंफा, १९६५, पृ. ५३). जुम्मल पद्धतीने उत्कृत्त प्रत्नलेख अजोध्या येथील बाबुरी मशिदीत हिजरी ९३५ मधील उपलब्ध आहे. 'बुवद ख़ैर बाक़ी' या वाक्यातील अक्षरमूल्याने ९३५ ही संख्या मिळते (पाहा, एइंफा, १९६५, पृ. ५९).

दिल्ली नगरच्या उपनगरात आज समाविष्ट असलेल्या जुन्या पालम गावातील ग़ज़नफ़र मशिदीत बसविलेला आणखी एक प्रत्नलेख उपलब्ध आहे. त्या लेखातील "ज़ि ख़ैर-ई मसाजीद" यातील अक्षरमूल्यानेही ९३५ ही संख्या हस्तगत होते. अर्थात् ती हिजरी कालगणनेतील होय (पाहा, एइंफा, १९६५ पृ. ६३). या कालोक्तीविषयी एक गोष्ट मोठी लक्ष्य आहे. अरबी भाषेत मस्जिद शब्दाचे अनेकवचन मसाजिद असे आहे. तेच शुद्ध रूप होय. कालोक्तीत अनेकवचनी रूपच प्रयुक्त आहे. परंतु तेच शुद्ध रूप वापरले असते तर ९२५ ही संख्या प्राप्त झाली असती. ती वास्तव संख्येपेक्षा १० ने कमी भरते. म्हणून वास्तव कालोल्लेख साधण्यासाठी मसाजिद हा शब्द अशुद्ध रीतीने मसाजीद असा लिहून युक्तीने ती संख्या १० ने वाढविली आहे. हा अनियमितपणा मुद्दाम केलेला आहे, हे उघड आहे. मुद्दाम अशुद्ध रूप अशाच कारणासाठी वापरल्याचे आणखीही एक उदाहरण सापडते (पाहा, एइंफा, १९६३, पृ. ७१). या लेखात हेतुपूर्वक मस्जिद या शुद्ध अरबी शब्दाचे भारतीय अपभ्रष्ट **मशीद** हे रूप वापरण्यात आलेले आहे. मस्जिद हा शुद्ध शब्द वापरला असता तर केवळ १०७ या संख्येची लब्धि झाली असती. परंतु हे अपुरे होते. म्हणून मशीद हा शब्द वापरून ३५४ ही इष्ट संख्या हस्तगत करून घेतलेली आहे.

हिसाब अल–जुम्मल या पद्धतीची चर्चा करीत असताना एन्सायक्लोपीडिया ऑफ इस्लाम या ग्रंथात असे म्हटले आहे (पाहा, एइ, पृ. ४६८) की ही पद्धती आफ्रिकेतील देशातही वापरली जात होती. परंतु हा वापर भारत, अफगणिस्तान आणि ईराण देशांच्या मानाने फारच उशीरा आलेला आहे. त्यात म्हटले आहे

की– "मोरोक्को देशात, सदीद या राजघराण्याच्या काळात या पद्धतीचा वापर हिजरीच्या अकराव्या (इसवी सतरावे) शतकात करण्यात आलेला होता. स्मारका-वरील प्रत्नलेख, तसेच मृत्युलेख यात कालोक्तीचा वापर विशेषेकरून दिसून येतो.

दुसऱ्या प्रकारातील प्रमुख लेखक मुहम्मद बिन अहमद अल्–मक्ताती असून (मृत्यु हिजरी १०४१–शक १५५३) हा चिटणीस आणि राजकवी होता. याने लामिया नावाचा ग्रंथ लिहिलेला आहे. हा ग्रंथ पूर्वी मुहम्मद बिन अली अल्–फिस्ताली (मृत्यू १०२१ हिजरी–शक १५३४) याने तशाच स्वरूपाच्या लिहिलेल्या ग्रंथाच्या अनुकरणरूप आहे. पुढील शतकात मुहम्मद बिन अल्–मदरा (मृत्यू हिजरी ११४७–शक १६५६) याने तशाच प्रकारच्या एका अर्जूज़ा नावाच्या ग्रंथाची रचना केली. यात फेज़ येथील प्रसिद्ध व्यक्तींची चरित्रे वर्णिली आहेत. यात प्रयुक्त असलेल्या काव्यरूप साधनांचा आणि कालोक्तींचा मोरोक्कोतील इतिहासलेखक आणि चरित्रलेखकांनी भरपूर उपयोग केलेला दिसून येतो. मुहम्मद बिन क़ादिरी (मृत्यू ११८७ हिजरी–शक १६९५) याने आपल्या नशर अल्–मसानी या ग्रंथात आणि मुहम्मद बिन ज़ाफर कत्तानी (मृत्यू हिजरी १३४९ शक १८४२) याने आपल्या सल्वत अल्–अनफास या ग्रंथात वरील साहित्याचा भरपूर उपयोग केलेला आहे."

दशमान पद्धति

दहा पेक्षा मोठ्या असलेल्या संख्या दशमान पद्धतीने लिहिण्याचा आरंभ, गणितशास्त्राच्या आणि ज्ञानाच्या इतिहासात एका परीने फारच उशीरा झालेला आहे. प्राचीन कालातील भारतीय पंधरा ही संख्या १० ५ अशी लिहीत. दहा करिता एक चिन्ह, आणि पाच करिता दुसरे चिन्ह, अशी एकापुढे एक लिहून त्यांची बेरीज म्हणजे पंधरा समजण्यात येई. मनुष्य जातीला आजच्या सारखे १५ म्हणजे पंधरा ही संख्या लिहिता येत नव्हती. दहापेक्षा मोठ्या असलेल्या संख्या या नवीन पद्धतीने लिहिण्याच्या परिपाठीस दशमान पद्धती असे नाव आहे. ही दशमान पद्धती पहिल्या आर्यभट्ट (मृत्यू शक ३९८) आणि वराहमिहिरास (मृत्यू शक ५०९ ?) ज्ञात होती. **अंकानां वामतो गतिः** या प्रसिद्ध नियमात दशमान पद्धतीचे ज्ञान गृहीत धरलेले आहे (पाहा–ओझा, पृ. १११). गणितशास्त्र आणि खगोलशास्त्र यांवरील ग्रंथलेखनांत दशमान पद्धतीचा अवलंब शककालाच्या पाचव्या शतकात उत्तम रीतीने स्थिर झालेला होता. पुढील शतकात या पद्धतीने प्रत्नकीर्ति Epigraphy प्रदेशात प्रवेश केलेला होता (पाहा, मिराशी, पृ. २४९). पुढील शतकात प्रत्नकीर्तनात या दशमान पद्धतीचा उपयोग नित्याची बाब होऊन बसलेली होती.

अरब आणि ईराणी लोकांना, आजकाल अरबी अंक म्हणून समजल्या-जाणाऱ्या अंकाची माहिती नव्हती. ग्रीक पद्धतीच्या अनुषंगाने, अरबी वर्णांना प्रदान केलेल्या मूल्यांच्या सहायाने अरब लोक आपले संख्यालेखन करीत असत. अब्बासी खलीफांच्या राज्यकालात अरबाना या अंकलेखनाचे ज्ञान भारतातून प्राप्त झाले. हा काळ शककालाचे सातवे शतक होय. एन्सायक्लोपीडिया ऑफ इस्लाम ग्रंथाच्या नवीन सुधारलेल्या आवृत्तीत असे निवेदन केलेले आहे (पाहा, एइ, पृ. ४६९) :–

> " काही असले तरी या पद्धतीचा अवलंब केवळ आकड्याचे ज्ञान हस्तगत झाल्यानंतरच शक्य होता. देवनागरी अंकांचा बगदाद नगरामध्ये हिजरी १५५ (शक ६९२) च्या आगेमागे प्रवेश झाला. मुहम्मद बिन मूसा अल्-ख्वारिज़्मी (मृत्यू साधारणत: हिजरी २६२–शक ७६८) याने या अल्–हिसाब अल्–हिन्दी (भारतीय अंकगणित) चा प्रसार करण्यास सहाय केले. तरी परंतु गणितशास्त्रज्ञ, खगोलज्ञ इत्यादि फार काळापर्यंत, वर्णमालेतील अक्षरांना दिलेल्या मूल्यांवरूनच संख्यालेखनाचे काम भागविणे पसंत करीत असत. याच्या उलटपक्षी अल्–हिसाब अल्–हिन्दी यापासून स्वीकृत गुबार अंक पश्चिमेकडे आणि स्पेन देशात अधिक लौकर पसरलेले दिसतात. या देशात गणितज्ञांनी त्यांचा अवलंब केलेला होता; आणि त्यांच्या विकासाचा इतिहास 'अरबी' म्हणून समजल्या जाणाऱ्या आणि युरोपात आज रूढ असलेल्या अंकपद्धतीत अन्तिमत: संमिश्र झालेला आहे. "

अरबांकडून भारतीय अंकपद्धतीच्या स्वीकरणाविषयी डॉ. मकबूल अहमद यांनी असा निष्कर्ष काढलेला आहे (पाहा, अहमद, पृ. १३–१८)– " खगोल शास्त्राप्रमाणेच, आठव्या शतकाच्या शेवटी (इसवी) भारतीय गणितशास्त्राशी अरबांचा परिचय घडून आला. अल्–फ़जरी याने संस्कृतमधील गणितशास्त्रीय ग्रंथांचा अरबी भाषेत अनुवाद केल्यामुळे, भारतीय अंकपद्धती (अरबी भाषेत हिंदी, आणि युरोपमध्ये अरबी) आणि शून्याचे तत्त्व अरबांना ज्ञात झाली. अल–ख्वारिज़्मी आणि हवश अल्–हसिब (मृत्यू शक ७८९ आणि ७९६ च्या आत) यांच्या कोष्टकांवरून " त्यांचा उपयोग अखिल अरब जगतात संभवत: प्रसृत झाला. "

परंतु हिट्टी याने दाखवून दिल्यानुसार, हिन्दूंच्या या सूक्ष्मबुद्धि संशोधनाचा, अरब देशस्थ खगोलज्ञ आणि गणितशास्त्रज्ञ यांनी फारच मंदगतीने अवलंब केलेला आहे. कारण शककालाच्या दहाव्या शतकाच्या मध्यावधीपर्यंत, अबू बकर मुहम्मद अल्–करजी (मृत्यू शक ९४१ व ९५१ च्या आत) याने आपल्या अल्-कफी

फिल–हिसाब या ग्रंथात व इतरांनी सर्व संख्या शब्दाक्षरांत लिहिलेल्या आहेत. परंतु अहमद अन्–नसवी (मृत्यू साधारणतः शक ९६२) याने आपल्या अल्–मुक़ना फिल–हिसाब अल–हिंदी या ग्रंथात भारतीय अंक वापरलेले आहेत. गुबार म्हणून ओळखले जाणारे अरबी अंक " उजवीकडून डावीकडे लिहिले जात आणि उजवीकडून त्यांच्या स्थानानुसार ते सुटे, दशक आणि शतक इत्यादि व्यक्त करीत. ज्यावेळी लिहावयाच्या संख्येत सुटे, दशक, शतक इत्यादीचा लोप असेल, तेव्हा त्यांच्या सुयोग्य जागी टिंब दिले जाई. हा दिलेला बिंदू म्हणजे आजचे शून्य होय."

अरब आणि ईराणी जीवनात संख्यालेखनाच्या स्थानमूल्य कल्पनेने, फार हळूहळू सम्मती आणि स्वीकार प्राप्त करून घेतला ही गोष्ट मुहम्मद इब्न अली रावंदी याने आपल्या राहतुस्–सुदूर या ग्रंथात (पाहा, रावंदी, पृ. ४३८) शक ११२६ त इतक्या उशीरा, या कल्पनेच्या केलेल्या चर्चेवरूनही दिसून येते. संख्यालेखनाची स्थान–मूल्यपद्धती भारतीय गणितज्ञांनी विकसित केली असा निर्वाळा त्यात दिलेला आहे. वर्तुळाच्या कल्पनेपासून शून्याची उत्पत्ती करण्यात आली. सुटे, दशके, शतके आणि सहस्रके (बि-मुक़ाम आहाद व अ़शरात व माआत व अलीफ अज़ आन् हिसाब कर्दन्द) यांच्या स्थानांची चर्चा केलेली आहे. ४९५१ या संख्येतील प्रत्येक अंकाचे स्थान–मूल्य समजवून सांगून त्याची शब्दात मांडणी करून दाखविली आहे. यानंतर, रावंदी याने जुम्मल पद्धतीचे स्पष्टीकरण केले आहे. या पद्धतीचा उपयोग करून, स्पर्धकांच्या परिणामाचे भविष्यवर्तन करण्याच्या लोकभ्रमाची त्याने नोंद केली आहे. संपादकाने (प्रस्तावना, पृ. २९) या सर्व मूर्खपणाच्या गोष्टी आहेत, असा अभिप्राय दिलेला आहे. यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की इसवीच्या तेराव्या शतकाच्या आरम्भी जुम्मल कल्पना आणि मोठ्या संख्यांच्या लेखनासाठी दशमान पद्धतीचा उपयोग ईराणी समाजांत त्याचे स्पष्टीकरण आवश्यक वाटण्याइतक्या नवीन होत्या.

भारतातील मुस्लिम प्रत्नलेखात दशमान पद्धतीचा सर्वप्रथम उल्लेख लखनौ पुरासंग्रहालयात ठेवलेल्या एका विटेवर करण्यात आलेला आहे (पहा, एइमो– १९३७–३८, पृ. ४१). या विटेवर दोन अरबी लेख लिहिलेले आणि निम्न टोकां-कडील भागात दोन संख्या ७३४ आणि ७१९ अशा कोरलेल्या आहेत. या संख्या हिजरी कालोल्लेखाच्या आहेत, असे समजण्यात येते. या संख्या अनुक्रमे शक १२५६ आणि शक १२४१ च्या होत. हिजरी कालगणनेच्या आठव्या शतकात याखेरीज अन्य पुरावा मिळालेला नाही. पुढील शतकाच्या मध्यात, माळव्यातील शिवपुरी येथील मशिदीच्या प्रवेशद्वारात बसविलेल्या एका शिलाखंडीय अरबी लेखात ८४५ असा, हा अर्थात् हिजरी सनाचा, उल्लेख सापडतो (पाहा एइंफा, १९६४, पृ. ५६). या लेखात अरबी परम्परेनुसार या कालोल्लेखाचा उच्चार शब्दात करण्यात आलेला असून, वरील संख्याही देण्यात आलेली आहे.

बीदर येथून राज्य चालविणाऱ्या अहमदशाह वली बहमनी याचा नातू हुमायून शाह याच्या राज्यकालात, परगी (जिल्हा महबूबनगर, आंध्रप्रदेश) या खेड्यातील मशिदीच्या बांधकामात एक शिलालेख बसविण्यात आलेला आहे. त्या मशिदीच्या बांधकामाचे वर्ष दशमान पद्धतीने ८६३ (हिजरी) असे दिलेले असून ते शकवर्ष १३८२ होय. (पाहा, एइंफा–१९६४, पृ. ४२). या निबंधाच्या लेखकाने असे म्हटले आहे की, " दशमान पद्धतीच्या यापूर्वीच्या कालोल्लेखाचा अन्य लेख आजपर्यंत सापडलेला नाही. " परंतु हे म्हणणे योग्य नव्हे. कारण याच पुस्तकात हिजरी ८४५ चा दशमान पद्धतीचा उल्लेख उपलब्ध असून त्याची चर्चा नुकतीच वरती करण्यात आलेली आहे. उपरिनिर्दिष्ट इष्टिकेवरील दशमान लेखनाचाही उल्लेख लेखकाने केलेला आहे. दशमान पद्धतीच्या अवलंबनाचा दुसरा उल्लेख याच स्थानी प्राप्त झालेला असून तो काल हिजरी ८६३ चाच आहे. हा प्रस्तरलेख दुसऱ्या एका मशिदीत बसविलेला असून तो अरबी भाषेतच आहे (पाहा, एइंफा १९६४, पृ. ४२). हे दोनच काय ते दशमान पद्धतीचे उल्लेख हिजरीच्या नवव्या शतकातील प्राप्त झालेले आहेत. अख्ख्या एका शतकामध्ये केवळ दोघाच विद्वानांनी नव्याने आलेल्या दशमान पद्धतीच्या संख्यालेखनांत रुचि दाखवावी आणि तीही इतक्या उशीरा, ही गोष्ट मोठी लक्ष्य आहे.

वरील चर्चेवरून ही गोष्ट दिसून आली की भारतीय, इस्लामी प्रत्नलेखनात हिजरी कालाच्या आठव्या शतकात (शक १२२३–२४ ते शक १३१९–२०) दशमान पद्धतीच्या संख्यालेखनाचा केवळ एकच चुकारीचा उल्लेख सापडलेला असून, पुढील शतकात सुधारणा होऊन असे तीन कालोल्लेख आतापर्यंत उजेडात आलेले आहेत.

हिजरी कालाच्या दहाव्या शतकाच्या आरम्भापासूनच दशमान पद्धतीने संख्यालेखनाची उदाहरणे अधिक प्रमाणात मिळू लागतात. हैद्राबाद (दक्षिण) येथील आरंभी, एका दरग्यात बसविलेला हिजरी ९१२ चा (शक १४२८–२९) प्रस्तरलेख, कदाचित प्रथम असू शकेल (पाहा, एइंमो. १९३९–४०, पृ. १३). दुसरा उल्लेख पैठण (औरंगाबाद) येथील मशिदीत बसविलेला हिजरी ९१३ (शक १४२९--३०) चा आढळून येतो (पाहा, एइंमो, १९४९–५०, पृ. २). हिजरी कालाच्या दहाव्या शतकाच्या प्रथमार्धात आपणाला दशमान पद्धतीने संख्या-लेखनाचे दहा बारा प्रत्नलेख असल्याचे आढळून येते. परंतु प्रत्नलेखांच्या एकूण संख्येचा विचार करिता, ही संख्या बरीच आहे असे म्हणवून घेण्यास अत्यंत तोकडी आहे. परंतु यापुढच्या काळात या लेखांचे प्रमाण झपाट्याने वाढलेले आढळते. शककालाचे साधारणतः पंधरावे आणि सोळावे शतक, हा दोन शतकांचा भारतातील मुसलमानी सत्तेचा परमोत्कर्षाचा काळ होय. या दोन शतकातच फार्सी

प्रत्नलेखसुद्धा फार मोठ्या संख्येने कोरले गेल्याचे दिसून येते. या लेखांतून बव्हंशतः फार्सी परम्परेनुसार, किंवा अल–जुम्मल पद्धतीने किंवा दोन्ही पद्धतीने कालोल्लेख केल्याचे आढळून येते आणि त्याबरोबरच दशमान पद्धतीचे उल्लेखही आढळतात.

आकर्षक वैशिष्ट्ये

भारतीय मुस्लिम प्रत्नलेखनाची काही अगदी आकर्षक वैशिष्ट्ये दिसून येतात. काही कालोक्ती अल्-मुज़य्यल रूपाने आढळतात. म्हणजे दोन वेगवेगळ्या कालोक्तीने प्राप्त होणाऱ्या संख्यांच्या बेरजेने इष्ट संख्या प्राप्त करण्याची पद्धत-उदाहरण सांगावयाचे झाल्यास एक प्रत्नलेख पाहावा (पाहा, एइंमो, १९३५–३६, पृ. ३८). येथे १४५ आणि ८२८ या संख्या दर्शविणाऱ्या कालोक्तींनी इष्ट काल-संख्या ९७३ (शक १४८८) दाखविलेली आहे. दुसरे उदाहरण कोडंगल (महबूब-नगर, आंध्रप्रदेश) येथील मशिदीतील प्रत्नलेखाचे मिळते. येथे ८८५ आणि ३४ संख्यादर्शक दोन कालोक्तींनी इष्ट संख्येचा निर्देश केलेला आहे. हे वर्ष हिजरी ९१९ (शक १४३५) चे आहे (पाहा, एइंफा–१९५९–६०, पृ. ५८). अल-जुम्मल पद्धतीचा वापर दक्खिनी हिंदीच्या साहित्यात भरपूर सापडतो. कारण या भाषेचा विकास अरबी फार्सी लिपीत मुसलमानांकरवीच झालेला आहे. मुज़य्यल पद्धती-चाही वापर दक्खिनी हिंदीतही सापडतो. हैद्राबाद येथील उत्तरकालीन कवि लछमीनारायण शफीक़ याच्या एका कथाकाव्यात याचा उपयोग केलेला आहे. येथे ८११ आणि ३७७ या दोन संख्या व्यक्त करणाऱ्या दोन कालोक्तींपासून इष्ट काल ११८८ हिजरी (शक १६९६) साध्य केला आहे (पाहा, संक्षेप लछमीनारायण पृ. ६९).

कधी-कधी इष्टसंख्यादर्शक कालोक्ती जुळविण्यासाठी शुद्ध अरबी वा फार्सी शब्द मिळत असतांनाही, इष्टसंख्येच्या सोईसाठी कालोक्तीत मूळ अरबी शब्दांचे अपभ्रष्ट आणि प्राकृत अर्थात सारूप्यीकृत रूप वापरण्यात आलेले आहे. अशा उपयोगांची उदाहरणे यापूर्वी सांगण्यात आलेली आहेतच.

कधी-कधी फार्सी प्रत्नलेखात देवनागरी अंक वापरण्यात आले आहेत [पाहा, एइंफा– १९६३, पृ. ५२, छाया १५ (क)] या लेखाचे लेखक श्री एस्. ए. रहीम यांना हे नागरी आकडे वाचता आले नाहीत. नागरीतील अंकांनी व्यक्तविलेली संख्या लेखात दोनदा लिहिलेली असली तरी येथे सगळा घोटाळा करून टाकला आहे. ते म्हणतात–" शेवटच्या चरणात शब्दात दिलेली संख्या १००६ हिजरी असली तरी दोन ठिकाणी अंकांनी दर्शविलेली संख्या १००७ हिजरी अशी आहे." संहितेच्या वाचनात त्यांनी ही संख्या ९००७ अशी वाचलेली असून त्याचे भाषांतर मात्र, " एकशे आणि सहा या वर्षी ?...वर्ष १००७ " असे केलेले आहे. हे आकडे देवनागरीत असून ती संख्या स्पष्टपणे १००६ अशी आहे. मधली दोन

शून्ये छोटी वर्तुळे असून ते बिन्दु नव्हेत. फार्सीतून " अलफ शश " १००६ हिजरी (शक १५२०) असा निर्देश आहे. दुसऱ्या प्रत्नलेखात १०९२ (हिजरी) ही संख्या देवनागरी अंकातून व्यक्तविलेली आहे (पाहा, एइंमो १९२९–३०; पृ. ६) आणखी एका लेखातील १००१ (हिजरी) या कालदर्शक संख्येतील मधली दोन शून्ये वर्तुळाकार आहेत. ती नागरी अंकांत लिहिलेली आहेत (पाहा, एइंमो १९३५ ३६, पृ. ११). अशाच प्रकारचे उदाहरण दुसऱ्या एका प्रत्नलेखात सापडते (पाहा, एइंमो–१९३५–३६, पृ. ५७, छाया ३७).

डॉ. दीनेशचंद्र सरकारने आपल्या ग्रंथांतील (पाहा, सरकार ए पृ. ३१–३८) इस्लामी प्रत्नकीर्तन या विषयाचा थोडक्यात पण सुंदर आढावा घेतलेला आहे. या प्रत्नकीर्तनात अनेक द्विभाषी प्रत्नलेख असतात. आरम्भीच्या काळापासून ही प्रथा दिसून येते. अशा द्वैभाषिक लेखातील संस्कृत किंवा अन्य प्रादेशिक भाषेतील भागात लेखाचे वर्ष दशमान पद्धतीने दिलेले असते. परंतु त्याच प्रस्तरावरील त्याच्या फार्सी प्रतिकृतीत मात्र, त्याच्या समान्तर हिजरी वर्षाचा उल्लेख फार्सी प्रथेनुसार किंवा अबजद पद्धतीने केलेला आढळून येतो. याचे अत्यंत आकर्षक उदाहरण म्हणजे शक ११८५ मधील सोमनाथपट्टण नगरांतील अरबी-संस्कृत प्रत्नलेख होय. अरबी भागाचे संपादन डॉ. झियाऊद्दीन देसाई यानी केले असून (पाहा, एइंफा–१९६१, पृ. १०) संस्कृत भाग डॉ. दीनेशचंद्र सरकार यांनी संपादिला आहे (पाहा, एइं, खण्ड ३४, पृ. १४१–१५०). पूर्वोक्तात ६६२ हिजरी वर्षाचा उल्लेख केवळ अरबी परम्परेनुसार फक्त शब्दांत केलेला असून अन्यपद्धतीने अथवा दशमान पद्धतीत उल्लेख नाही. उत्तरोक्तात मात्र चार निरनिराळया कालगणनांत उल्लेख असून प्रत्येकाचे वर्ष दशमान पद्धतीनेच नोंदविलेले आहे. येथे तिथीचा उल्लेख १३ आकड्यानेच (त्रयोदशी) केलेला आहे. मंगरोल (गुजरात) येथील फार्सी–संस्कृत प्रस्तरलेखात लेखाचे ७९७ हिजरी हे वर्ष फार्सी परम्परेनुसार नोंदविलेले असून, त्याच्या संस्कृत-प्रतिकृतीत मात्र विक्रम संवत् १४५२ आणि तिथि १५ यांचा दशमान पद्धतीने उल्लेख आलेला आहे (पाहा, एइंफा-१९६२, पृ. ३५). बीदर येथील शक १३६६ मधील द्वैभाषिक शिलालेखातही तसेच चित्र पाहावयास मिळते (पाहा, एइंफा–१९६२, पृ. ८२). ईराणी प्रत्नलेखात हिजरी सनाचा उल्लेख फार्सी परम्परेनुसार केलेला असून, संस्कृत लेखात मात्र दशमानातील संख्येच्या अतिरिक्त, अल–जुम्मल पद्धतीच्या एका मर्यादित अर्थाने, समकक्ष असलेल्या वामगती पद्धतीनेसुद्धा शककालाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. आणखी एक ईराणी–संस्कृत द्वैभाषिक प्रस्तरलेख बडोदा येथील होय (पाहा, एइंफा–१९६३, पृ. ४४). ईराणी–भागात अरबी परम्परेने हिजरी ९२१ चा उल्लेख केलेला असून, लेखाच्या संस्कृत प्रतिकृतीत मात्र विक्रम संवत् आणि शककालाचे वर्ष

१४३७ व तिथी शुक्ल १५ आहेत. या सर्वांचा उल्लेख दशमान पद्धतीने आलेला आहे. अशीच अवस्था फार्सी आणि अन्य देशी भाषातील द्वैभाषिक प्रत्नलेखांची दिसून येते. फार्सी–मराठीचे उदाहरण गाळणा (विशालगड) येथील शक १५०३ आणि शक १५०५ मधील दोन शिलालेखांचे सांगता येईल (पाहा, एइंफा– १९६७, पृ. ५३ व ५६). वरील द्वैभाषिक प्रत्नलेखांच्या आजपर्यंतच्या अध्ययनावरून दुर्दैवाने असे दिसून येते की, **मुस्लिम विद्वत्ता संस्कृत आणि अन्य भारतीय भाषांच्या अध्ययनाच्या क्षेत्रात अगदी अनिच्छ असते. वरीलपैकी एकाही द्वैभाषिक प्रत्नलेखाचे अध्ययन एकत्र झालेलें नाही. प्रत्येक वेळी संस्कृत किंवा अन्य प्रादेशिक भाषेचा भाग, काही किरकोळ उल्लेखांवरच सोडून देण्यात आलेला आहे. वेगवेगळ्या भाषांतील प्रत्नलेखाभ्यासाचे व प्रकाशनाचें कार्य जरी एकाच शासकीय विभागातर्फे होत असले तरी, फार्सी आणि संस्कृतादि दोन्ही पोट विभागाच्या कामात सुसूत्रता व सामंजस्य होत असल्याचे आजपर्यंतच्या साठ सत्तर वर्षांच्या कामावरून आढळून येत नाही. या विभागाच्या जन्मापासूनच ही अवस्था आहे असे दिसते. याच्या परिणामरूपी भारतीय प्रत्नविद्येच्या दोन्ही शाखांकडे पाहू इच्छिणाऱ्या अभ्यासकांच्या पदरी मोठे हाल व कुंचबणा पडतात.**

वरील चर्चेवरून असे दिसून येते की गणितशास्त्र, खगोल आणि शून्य व दशमान पद्धतीला जन्म देणाऱ्या या मायदेशात, भारतीय मुसलमानी प्रत्नविद्येला भारतीय जुन्या पद्धतीचे अनुकरण करणारी अल–जुम्मल पद्धती आणि संख्या-लेखनाची नवीन दशमान पद्धती यांचा स्वीकार व अमल करतांना फारच मंदगतीने पाऊल टाकावे लागले. या दोन्ही क्षेत्रांत तिने **शककालाच्या तेराव्या शतकाच्या मध्यात परिचय करून घेतला आणि दोन शतकांच्या दुडदुड वाटचाली-नंतर शककालाच्या सोळाव्या शतकाच्या शेवटी शेवटी या दोन्हींचा मनसा स्वीकार केला.** तत्कालोत्तर या दोन्ही पद्धती नियमितपणे व निर्वेध रीतीने वापरात आहेत. विसाव्या शतकात अबजद आणि जुम्मल या दोन्ही पद्धती आता अडगळीस पडलेल्या आहेत.

(भारतीय इतिहास काँग्रेस, जबलपूर, शक १८९२, येथे वाचलेल्या प्रबन्धाचा अनुवाद. तसेच भांडारकर प्राच्य संस्था जर्नल, खण्ड ५२, १९७१).

संक्षेप आणि संदर्भ

अहमद– **इण्डो–अरब रिलेशन्स्**, मकबूल अहमद, मुंबई १९६९.
एइ– द **एन्सायक्लोपीडिया ऑफ इस्लाम**, नवीन आवृत्ती, खण्ड ३, १९६७.

एइं– एपिग्राफिया इंण्डिका
एइंफा– एपिग्राफिया इंण्डिका–अरबी फार्सी सप्लीमेंट
एइंमो– एपिग्राफिया इण्डो–मोस्लेमिका
ओझा– भारतीय प्राचीन लिपिमाला, गौरीशंकर हि. ओझा
गर्देज़ी– ज़ैनुल्–अख़बार, गर्देज़ीकृत अ. ह. हबीबी, तिहरान, १३४७ सौर (१९६८)
मिराशी– स्टडीज इन इण्डॉलॉजी, वा. वि. मिराशी, खं. २, नागपूर १९६१.
रावंदी– राहतुस्सुद्दूर, रावंदीकृत : मु. इकबाल, लंदन, १९२१.
लछमीनारायण– तस्वीरे जानान, लछमीनारायण शफीक़कृत, शाहिद, हु. हैद्राबाद १९५७.
सरकारए– इण्डियन एपिग्राफी, दीनेशचंद्र सरकार, कलकत्ता, १९६५.
सरकारसि– सिलेक्ट इन्स्क्रिप्शन्स्, दीनेशचंद्र सरकार, कलकत्ता, १९६५.
सहीफा– सहीफा त्रैमासिक (उर्दू), लेखक कसरा मिनहास, लाहोर, एप्रिल १९६७.

✦✦✦

७ : अमीर खुस्रौवरील संस्कृतचा प्रभाव

१·१ : अमीर खुस्रौ (मृत्यु शक १२४७–७२५ हिजरी) हा फार्सी साहित्य-क्षेत्रातील साहित्य-सम्राट आहे. त्याने आपल्या अर्धशतकाच्या अनेक महत्त्वपूर्ण घटनांनी गजबजलेल्या आयुष्यात १०–१२ श्रेष्ठ प्रतीचे ग्रंथ लिहिलेले आहेत. हे ग्रंथ प्रामुख्याने साहित्यिक असले तरी त्यातून अप्रत्यक्ष रीतीने तत्कालीन पुष्कळ इतिहासही आलेला आहे. त्याचे प्रमुख लेखनक्षेत्र फार्सी भाषेतून असले तरी, त्याच्या स्वतःच्या निवेदनानुसार, त्याने अरबी-फार्सी लिपीतील हिंदी भाषेतही पुष्कळच रचना केलेली होती. त्याने या आपल्या भाषेला हिंदी असेच नाव दिलेले आहे. परंतु उत्तरकालीन मुस्लिम कवि साहित्यिकांनी या भाषेला रीख्ता असे नामाभिधान दिलेले होते. आपणाला पुष्कळशा भारतीय भाषा येतात असे स्वत: खुस्रौ यानेच म्हटलेले आहे. संस्कृत, फार्सी, अरबी, तुर्की, हिंदी आणि इतर आठ भाषा यांचे त्याने आपल्या एका महाकाव्यात सर्वेक्षण केलेले आहे. या लेखकाने खुस्रौच्या या भाषा-सर्वेक्षणाची ओळख अभ्यासकांना करून दिलेली आहे. (पाहा राव : पृ. ४०८) खुस्रौ याने व्यक्त केलेली मते आजदेखील उपयुक्त ठरणारी अशीच आहेत. वरील भाषांकडे ऐतिहासिक दृष्टिकोणातून पाहिल्यास त्याची ही मते मोठी उपयोगी पडणारी आहेत. बऱ्याच वेळा असा दावा मांडला जातो आणि सामान्यतया तो मान्यही करण्यात येतो की बुद्धिमान आणि विद्वान अमीर खुस्रौने फार्सी साहित्यात अनेक नवनवीन गोष्टींची निर्मिति केली, आणि या गोष्टी उत्तरकालीन फार्सी आणि विशेषतया हिंदी किंवा उर्दू भाषेच्या साहित्यिक विकासाची महत्त्वाची अंगे बनलेल्या आहेत. अमीर खुस्रौ याने सितार नावाचे गायनोपयोगी वाद्य शोधून काढले. एवढेच नव्हे तर, अबयाते-सिलसिला, हिंदी किंवा उर्दू भाषेतील रीख्ता, शैली, हिंदीतील पहेलियाँ यांचे निर्माण, हिंदी किंवा उर्दूचे फार्सी भाषेतून कोश-लेखन इत्यादींचा तो निर्माता आहे. अर्थात त्याचे सर्व लिखाण अरबी-फार्सी लिपीत झालेले आहे. अमीर खुस्रौ याने फार्सी आणि उर्दू भाषात नव्याने आणलेल्या चारही गोष्टी, संस्कृत आणि प्राकृत अपभ्रंशादीत, त्याच्या कालाच्या पूर्वी, शतकानुशतके चालत आलेल्या साहित्यातील तांत्रिक विचारांची उसनवारी होय असे दाखविण्याचा पुढील ओळींतून प्रयत्न करण्यात येत आहे.

२·१ आख्यायिकाकार

अवयाते– सिलसिला म्हणजे काय आणि त्याचे तंत्र कोठून घेतलेले आहे, या प्रश्नाची छाननी या लेखकाने अन्यत्र केलेली आहे* (पाहा संक्षेप–चौहान–अब).

* दक्खिनी हिंदीतील इतिहास : दे. व्यं. चौहान, पृ. १६६ व पुढे

खुस्रौने वापरलेले तंत्र काय आहे ते डॉ. मिर्ज़ा यांनी मांडलेले आहे (पाहा संक्षेप–खुस्रौ, प्रस्तावना पृ. २८). म्हणून हे तंत्र काय आहे याची पुनश्च तपासणी करण्याचे येथे कारण नाही. आपल्या क़िरानुस्–सादैन, मिफ्ताहुल–फ़तूह, नुह–सिपिह्र आणि तुगलक़-नामा या चार ऐतिहासिक महाकाव्यांत, या ऐतिहासिक दीर्घ काव्यांची प्रकरणे पाडण्याकरिता, अमीर खुस्रौने एक विशेष तंत्र स्वीकारलेले आहे. प्रत्येक प्रकरण एका विशिष्ट वृत्तांतील एका श्लोकाने सुरू होते. हे वृत्त मुख्य प्रकरणात प्रयुक्त असलेल्या वृत्ताहून भिन्न असते. सर्व प्रकरणे या विशिष्ट वृत्ताने आरंभ होतात. अन्य प्रकरणात वापरण्यात आलेले वृत्त पहिल्या प्रकरणासाठी वापरण्यात आलेल्या वृत्ताहून भिन्न असेल, किंवा तेच देखील असू शकेल. दुसरी गोष्ट ही की सर्व प्रकरणारंभीच्या प्रथम श्लोकांत त्या त्या प्रकरणाच्या वर्ण्यवस्तूचा आशय दिलेला असतो. अशा विशिष्ट वृत्तातील प्रकरणारंभी असलेल्या श्लोकांची संख्या काव्याच्या प्रकरणांच्या संख्येइतकीच असते. हे सर्व प्रकरणादि श्लोक एकत्र वाचले असतांना त्यांचा एक क़सीदा तयार होतो. पहिल्या प्रकरणाच्या सुरुवातीच्या श्लोकात अशी काळजी घेतलेली असते. या कसीद्यात सर्व ग्रंथांचा सारभूत आशय व्यक्त होतो. तिसरी गोष्ट अशी की, कथानकातील घटनांचा आविष्कार होत असतांना कवि, अधूनमधून, आपले यांविषयीचे मत व्यक्त करितो, किंवा घटनांवर आपला अभिप्रायही व्यक्तवितो. कथानकातील पात्रांच्या चरित्राविषयीही कवि आपला अभिप्राय सांगू शकतो.

कथा आणि आख्यायिका अशी नावे संस्कृत श्रेष्ठ साहित्याचार्यांनी आजकालच्या कादंबरी (हिंदी उपन्यास) आणि ऐतिहासिक कादंबरीसाठी प्राचीन काली वापरलेली आहेत. (पाहा संक्षेप– काणे प्रस्तावना, पृ. २०). भामह (साधारणतया शक ५००), दण्डिन् (सा. शक ६००) आणि इतरांनी असा दण्डक घालून दिलेला आहे की आख्यायिकेत उच्छ्वास किंवा आश्वास (प्रकरणे) असावेत आणि त्यांचा आरंभ एकाच वृत्तातील श्लोकाने व्हावा. भामह याने आख्यायिकेची व्याख्या अशी केलेली आहे.

गद्येन युक्तोदात्तार्था सोच्छ्वासाऽऽख्यायिका मता ॥
वृत्तमाख्यायते तस्यां नायकेन स्वचेष्टितम् ।
वक्त्रं चापवक्त्रं च काले भाव्यर्थशंसि च ॥
कवेरभिप्रायकृतैरङ्कनैः कैश्चिदङ्कता ।

साहित्यदर्पणाचा कर्ता विश्वनाथ पंडित हा अमीर खुस्रौ याचा समकालीन होता. त्याचा हा ग्रंथ शक १२३८ आणि १३०६ यांच्या दरम्यान केव्हा तरी लिहिला गेला, हे आता निश्चित झालेले आहे. त्याने अल्लाउद्दीन खिलजी (मृत्यु शक १२३८) याचा उल्लेख केलेला आहे.

सन्धौ सर्वस्वहरणं विग्रहे प्राणनिग्रहः।
अल्लावदीननृपतौ न सन्धिर्न चविग्रहः॥

भामह या आचार्यानंतर सात शतकांनी झालेल्या विश्वनाथ पंडिताने आख्यायिका म्हणजेच ऐतिहासिक कादम्बरीचे गमक सांगतांना, भामह याने निर्देशिलेल्या गमकांचाच पुनरुच्चार केलेला आहे. तो म्हणतो–

आख्यायिका कथावत्स्यात्कवेर्वंशानुकीर्तनम्।
अस्यामन्यकवीनां च वृत्तं पद्यं क्वचित्क्वचित्॥
कथांशानां व्यवच्छेद आश्वास इति बध्यते।
आर्यावक्त्रापवक्त्राणां छन्दसा येन केनचित्॥
अन्यापदेशेनाश्वासमुखे भाव्यर्थसूचनम्।

अमीर खुस्रौ याने आपल्या फक्त ऐतिहासिक महाकाव्यात (फार्सी भाषेतील साहित्यसंकेतानुसार, मस्नवी काव्यात) हे तंत्र वापरलेले आहे ही मोठी बोलकी वस्तुस्थिति आहे. उपरोक्त चार ऐतिहासिक महाकाव्याखेरीज खुस्रौच्या आणखी चार इतर मस्नव्या आहेत. त्यात त्याने या तंत्राचा उपयोग केलेला नाही. आख्यायिकेकरिताच आश्वास किंवा प्रकरणे पाडण्याच्या, साहित्याचार्यांनी सांगितल्याप्रमाणे, आवश्यकतेची पुरेपूर जाणीव अमीर खुस्रौ याला होती. या नियमानुसारच त्याने या तंत्राचा वापर केलेला आहे ही गोष्ट विशेष लक्ष्य आहे. खुस्रौ विश्वनाथ पण्डिताचा समकालीनच असल्यानेही ही गोष्ट अधिक बोलकी बनते.

दक्खिनी हिंदीच्या अनेक कवींनी या तंत्राचा आपल्या कृतींमध्ये उपयोग केलेला आहे. अशा कवींपैकी मुल्ला नुस्रती हा सर्वाद्य होय. त्याचा मृत्यु शक १५९६ (हिजरी १०८५) मध्ये घडून आला. म्हणजे तो खुस्रौ नंतर ३४९ वर्षांनी दिवंगत झाला. ईराणच्या व भारताच्या फार्सी साहित्यात, अमीर खुस्रौ-खेरीज, हे तंत्र कोणी हाताळल्याचे आढळात नाही. नुस्रतीने अमीर खुस्रौ याच्या उपलब्ध साहित्यातून हे तंत्र उचलल्याचा प्रत्यक्ष उल्लेख कोठेच निर्दिष्ट नसला तरी, वरील सर्व परिस्थितीमुळे तसा निष्कर्ष काढणे हा एकमेव मार्ग शिल्लक राहातो. शिवाय खुस्रौ आणि नुस्रती या दोघांनी संस्कृत साहित्याचार्यांचे आदेश काटेकोरपणे पाळलेले दिसून येतात. नुस्रतीने हे तंत्र आपल्या गुलशने-इश्क़ या कथाकाव्यात वापरले आहे. तसेच अबयाते-सिलसिला हे तंत्र त्याने आपल्या **अली-नामा** या प्रदीर्घ ऐतिहासिक काव्यातही वापरलेले आहे. दक्खिनी हिन्दीच्या सर्वश्रेष्ठ अशा या कवीवरील आपल्या प्रबन्धात स्व. डॉ. अब्दुल हक यांनी या तंत्रावलम्बनाची चर्चा केलेली आहे. (पाहा संक्षेप-हक, पृ. ३१ व ८३). डॉ. हक

यांनी तंत्रासाठी काहीच नाव सुचविलेले नाही. सर्व प्रकरणादि श्लोक एकत्र वाचले असतांना अशा श्लोकांचा एक कसीदा बनतो असे त्यांनी म्हटलेले आहे. अशा श्लोकांचा कसीदा बनावा अशी काळजी खुस्रौ यानेच घेतलेली आहे. नुस्रती या बाबतीत खुस्रौचा अनुकारक आहे. या तंत्राचा अवलंब करणारा दक्खिनी हिंदीचा दुसरा कवि इब्ने-निशाती होय. त्याने आपले **फूलबन** हे काव्य शक १५८८ (हिजरी १०७६) मध्ये लिहून पूर्ण केले होते. तो नुस्रतीचा समकालीनच होय. त्याने आपल्या १७४४ बैतांच्या (भारतीय संकेतानुसार ८७२ श्लोक) या उत्कृष्ट काव्यगुणांनी युक्त अशा फूलबन कथाकाव्यात प्रकरणादि श्लोकांनी ४९ प्रकरणें पाडलेली आहेत (पाहा संक्षेप-चौहान). या ४९ श्लोकांचा-बैतांचा एका कसीदा बनून त्यांत समग्र काव्याचा सारांश आलेला आहे. दक्खिनी हिंदी भाषेच्या आणखी एका कवीने-आलिम (सा. शक १६०७) या आपल्या **मुअजिज़ाते-नबी** या मस्नवी-काव्यात केलेला आहे. आणखी दोन कवि, एक मुअज़िम आणि दुसऱ्या एकाने आपल्या कथाकाव्यात-मस्नवीत या तंत्राचा वापर केलेला आहे.

अबयाते-सिलसिला हे तंत्र खुस्रौने संस्कृतमधून स्वीकारले याचा प्रत्यक्ष उल्लेख अप्राप्त असला तरी, वरती उल्लेखिलेल्या कारणांखेरीज देखील, अन्य परिस्थिति अशा अनुमानाला अत्यंत उपोव्दलक आहे. हे सांगणे युक्त होईल. आपल्या जन्म आणि लालनपालनाच्या भरतभूमीवर अमीर खुस्रौ याचे नितांत प्रेम होते हे तर खरेच. त्याशिवाय वेद आणि स्मृति यांचा ठेवा असलेल्या संस्कृत भाषेबद्दल खुस्रौला फार अभिमान वाटत होता. अन्य बऱ्याचशा भारतीय भाषा खुस्रौला ज्ञात होत्या. काही भाषात त्याने रचनाही केलेली आहे.

२.२ रीख़्ता शैलीचा जनक

उत्तरकालीन उर्दू साहित्यातील रीख़्ता शैलीचा अमीर खुस्रौ हा निर्माता किंवा जनक मानला जातो. तक़ी मीर, कविनाम मीर याने आपल्या हिंदी कवींच्या चरित्रग्रंथात (पाहा संक्षेप-मीर, पृ. १७९) रीख़्ता शैलींची अशी व्याख्या केलेली आहे–

"**अव्वल आँ कि यक मिस्रश पार्सी व यक हिन्दी. चुनाँ चि किता हज़रत अमीर (खुस्रौ) निविश्ता शुद. दूयम ई कि निस्फ मिस्रश हिन्दी व निस्फ पार्सी.**" अर्थ असा की रीख़्ताचा एक श्लोकार्ध पार्सी (फार्सी) भाषेत असतो आणि दुसरा अर्ध हिन्दीत. उदाहरणार्थ अमीर खुस्रौ याचे श्लोक अगोदर अद्धृत केलेले आहेत. दुसरी गोष्ट अशी की रीख़्ताचा एक चरण हिंदीत असतो आणि दुसरा पार्सीत. अमीर खुस्रौ याचा म्हणून मीर याने उल्लेखिलेला बैत (= श्लोक) असा आहे--

नक़्दे-दिले-मन गिरिफ़्त व बि-शिकस्त
फिर कुछ न घडा न कुछ संवारा ।

खुस्रौने लिहिलेली आहे असे समजल्या जाणाऱ्या आणखी एका ग़ज़लेत एका चरणाचा प्रथमार्ध फार्सीत असून दुसरा अर्ध हिंदीत आहे–

जि हाले-मस्कीन् म-कुन तग़ाफुल
दुराए नैना बनाए बतियाँ ।

यात दोन्ही मिळून एक चरण बनलेला आहे.

डॉ. वहीद मिर्ज़ा याने असे निश्चयाने प्रतिपादिले आहे (पाहा-मिर्ज़ा, पृ. २३७) की अमीर खुस्रौ याने, एक चरण अरबी भाषेतून व दुसरा चरण फार्सीतून आहे, अशा काही ग़ज़ला रचलेल्या आहेत. अशा ग़ज़ला त्याच्या **नहायतुल-कमाल** या दीवान– ग़ज़लसंग्रहात समाविष्ट केलेल्या आहेत.

रीख़्तन हा फार्सी शब्द संस्कृत धातु ऋष् (वाहाणे, वेगाने वाहाणे) या मुळापासून व्युत्पन्न आहे. या संस्कृत धातूचे भाऊबंद ग्रीक आणि लॅटिन भाषांमध्येही वावरत आहेत. फार्सीत या धातूचा वाहाणे, ओतणे किंवा विखरणे असा अर्थ होतो. रीख़्ता शब्दाचा वाहलेला, ओतलेला, विखुरलेला (अलग अलग भाषांतील चरणांमध्ये) असा अर्थ आहे.

काव्यशास्त्राच्या भिन्न भिन्न प्रकारांची चर्चा करीत असतांना विश्वनाथ पण्डिताने, आपल्या ग्रंथाच्या सहाव्या अध्यायात, संस्कृत काव्यशास्त्रात **करम्भक शैली** म्हणून ज्ञात असलेल्या काव्यप्रकाराची व्याख्या अशी केली आहे (पाहा-विश्वनाथ, पृ. ३६९).

करम्भकन्तु भाषाभिर्विविधाभिर्मितम् ॥ ३१५
यथा मम षोडशभाषामयी प्रशस्तिरत्नावली ।

या शैलीचे उदाहरण म्हणून विश्वनाथ पण्डिताने स्वकृति, **प्रशस्ति-रत्नावली** या ग्रंथाचाच उल्लेख केलेला आहे. तो म्हणतो की त्याने या ग्रंथात या शैलीसाठी सोळा भाषांचा वापर केलेला आहे. अमीर खुस्रौने अ़रबी, फ़ार्सी आणि हिंदी या तीन भाषांचा रीख़्तासाठी उपयोग केल्याची नोंद आहे.

अमीर खुस्रौ याच्यापूर्वी, अनेक भारतीय कवींनी या करम्भक शैलीचा वापर केल्याची नोंद भारतीय साहित्यात मिळते. मराठी साहित्यात शककालांच्या सतराव्या शतकात अनेक मराठी कवींनी या करम्भक शैलीचा वापर केलेला आहे. राम जोशी या व्युत्पन्न शाहिराने या शैलीत संस्कृत, मराठी, कानडी आणि हिंदी भाषांचा उपयोग केलेला आहे. अनेक कवींनी आपल्या मराठी भाषेशी हिंदी भाषेची सांगड घातलेली आहे. हे सर्व खुस्रौ याच्या रीख़्ता शैलीच्या अनुकरणाने झाले असे प्रतिपादणे फारच दुरापास्त आहे. याच्या उलट विश्वनाथाने वापरलेल्या करम्भक शैलीची पाळेमुळे सर्वच नव्य आर्यभारतीय भाषांत अधिक खोलवर रूजलेली होती असे आढळून येते.

२.३ कोशकार

ख़ालिक-बारी नावाचा एक छोटासा **हिंदी-फार्सी** कोश अमीर खुस्रौने रचलेला आहे. त्यात १९४ श्लोक (द्विचरणी) आहेत. या ख़ालिक़-बारीचे संपादन लाहोरनिवासी स्व. महमूद शीरानी याने उर्दू भाषेतून आणि डॉ. श्रीराम शर्मा यांनी हिंदीतून केलेले आहे. (पाहा–शर्मा). हा कोश शक १५४४ (हिजरी १०३१) च्या सुमारास मुगल सम्राट जहाँगीर यांच्या काळात झालेल्या कोणा एका खुस्रौने रचलेला आहे असे शीरानी याने प्रतिपादिलेले असले तरी हे मत विद्वन्मान्यता पावू शकलेले नाही. ख़ालिक़-बारी ही कोशकृति अमीर खुस्रौ याचीच आहे असे मत आताशा विद्वानांमध्ये मान्यता पावलेले आहे. डॉ. शर्मा यांनी या कोशाची चिकित्सापूर्ण संहिता संपादित केली आहे. या कोशात ४७५ हिंदी, ४८२ फार्सी, २३७ अरबी आणि २ तुर्की समार्थ शब्दांची चर्चा आलेली आहे. ग्रंथाचे भाषा-वैज्ञानिक महत्त्वही भरपूर आहे. हा कोश पद्यात लिहिलेला आहे.

प्राकृत भाषा आणि व्याकरण यावरील ग्रंथ संस्कृत भाषेतून लिहिण्याची परम्परा संस्कृतमध्ये प्राचीन कालापासून चालत आलेली आहे. इसवीच्या सहाव्या शतकात होऊन गेलेला वररुचि हा सर्वप्रथम प्राकृत वैयाकरणी होय. अमरसिंहाने रचलेला अमरकोश हा संस्कृत भाषेचा कोश यांच्या मुळाशी असावा. प्राकृत-अपभ्रंश भाषांच्या अभ्यासात जैन महापण्डित हेमचन्द्रसूरि (मृत्यु, शक १०९४) हा एका परीनें लोकोत्तर असा आहे. हेमचन्द्राने लिहिलेला देश्य शब्दांचा कोश नव्य आर्यभारतीय भाषांच्या अभ्यासात अतीव महत्त्वपूर्ण आहे (पाहा–पिशल). स्वतः हेमचंद्राने, आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या, अभिमानचिन्ह, गोपाल, देवराज, द्रोण, धनपाल, पादलिप्ताचार्य, राहुलक आणि शीलाङ्क अशा आठ प्राकृत कोशकारांचा उल्लेख केलेला आहे.

हेमचन्द्रसूरीनंतर अमीर खुस्रौ दीड शतकानंतर झालेला आहे. एका हिंदु मातेच्या पोटी जन्मलेला अमीर खुस्रौ मोठा देशभक्त असा विद्वान् होता. आपण भारतात जन्मलो आणि भारत ही आपली मातृभूमि आहे, असे त्याने आवर्जून सांगितलेले आहे. भारत हा जगतीतलावरील सर्वोत्कृष्ट देश, पृथ्वीवरील स्वर्ग आहे अशी अमीर खुस्रौची धारणा होती.

किश्वरे-हिंद अस्त बिहिश्ते ब-ज़मीन्

भारत देश या जगतीवरील स्वर्ग होय.

वररुचीने आरम्भ केलेल्या आणि कळसरूप झालेल्या हेमचन्द्राच्या, प्राकृत भाषेची व्याकरणे, कोश संस्कृत भाषेत लिहिण्याच्या या प्राचीन परम्परेस अनुसरून, अमीर खुस्रौ याने आपला हिन्दी भाषेचा कोश फार्सी भाषेतून आणि त्याला ज्ञात असलेल्या अरबी-फार्सी लिपीतून लिहिला. जुनी परम्परा त्याने अनुसरली. खुस्रौने अनुसरलेल्या परम्परेची कास, उर्दू भाषेतील पण्डितांनी हिंदी-

फार्सी कोशरचनेत धरलेली आहे. वरती म्हटल्याप्रमाणे, तथाकथित उर्दू भाषेचे सर्व साहित्यिक या भाषेला हिंदी किंवा रीख्तए-हिंदी म्हणत असत, ही गोष्ट येथे सांगितली पाहिजे. हीच प्रथा शक १७२८ (हिजरी १२२१) पर्यंत अप्रतिहतपणे चालू होती. डॉ. राणा एम्. एन्. इहसान इलाही याने वाहिद-बारी नावाच्या कोणा एका अज्ञात लेखकाच्या हिन्दी-फार्सी कोशाची संहिता आता उजेडात आणलेली आहे (पाहा – सहीफ़ा). कोशरचनेचा कालोल्लेख प्राप्त नाही. परंतु उपलब्ध प्रति विक्रम संवत् १६७९ (हिजरी १०३२ = शक१५४४) मध्ये झालेली आहे. या वाहिद-बारी कोशाचे १०३ श्लोक (द्विचरणी) असून तो कोणा बिस्नूदासासाठी नकलला असे म्हटले आहे. या कोशात खुस्रौच्या ख़ालिक़-बारी कोशाचे सर्व दृष्टींनी अनुकरण केलेले आढळते. याच डॉ. राणा इलाही लेखकाने, "दर लुग़ाते-हिन्दी" अशा हकीम यूसुफ़ी याने लिहिलेल्या एका क़सीद्याचा उल्लेख केलेला आहे. यूसुफ़ी अफगानिस्तानातील हरात नगराचा रहिवासी असून त्याने हा क़सीदा साधारणतया शक १४४१ च्या सुमारास (हिजरीच्या नवव्या शतकाच्या आरम्भास) लिहिलेला आहे. येथे एक ईराणी विद्वान्, दोनशे वर्षांपूर्वी अमीर खुस्त्रौ याने सुरू केलेल्या परम्परेनुसार कोशरचनेचा प्रयत्न करीत असलेले दिसून येते. खुस्रौनंतर फ़ार्सी लिपीत हिंदी-फार्सी कोशरचनेच्या क्षेत्रातील हे पहिले पाऊल आहे असे आढळून येते.

दक्खिनी हिंदी-फार्सी भाषेचा कोश एका अज्ञात लेखकाने तयार केल्याचे, हैद्राबाद येथील, इदारए-अदबियाते-उर्दू संग्रहालयातील एका हस्तलिखितावरून कळते. हस्तलिखितावर कसलेही वर्ष नाही. डॉ. मु. क़ा. ज़ोर याने याची ओळख करून दिलेली आहे (पाहा– ज़ोर, खण्ड ५, पृ. २६१). डॉ. ज़ोर याने असा अंदाज वर्तविला आहे की हा कोश, नवसरहार या मस्नवी-काव्याचे लेखक जालना नगराचे रहिवासी शाह अश्रफ याने रचलेला असावा. परंतु असे असण्याची शक्यता फारच कमी आहे. याचे कारण असे की शाह अश्रफ याची भाषा फारच जुनी आहे. या उलट या हस्तलिखिताची भाषा बरीच आधुनिक आहे. परंतु डॉ. ज़ोर याने सांगितल्याप्रमाणे हा कोश शक १६११ (हिजरी ११००) च्या सुमाराचा असावा.

यानंतर औरंगजेबाच्या काळी पंजाबातील हांसी येथे राहाणाऱ्या अब्दुलवासी याने लिहिलेल्या **ग़रायबुल-लुग़ात** ग्रंथाचा सुगावा लागतो. हा कोशसुद्धा फार्सी पद्यात असून, त्यात हिंदीतील अज्ञात व आर्ष शब्दांचे अर्थ फार्सी लिपीतून देण्यात आलेले आहेत. प्रसिद्ध उर्दू साहित्यिक सिराजुद्दीन आरज़ू याने शक १६७२ (हिजरी ११६३) मध्ये फार्सी गद्यात, **नवादिरुल-लुग़ात** नावाचा ग्रंथ, अब्दुलवासी याच्या ग्रंथाचे स्पष्टीकरण व टीका करीत, लिहिलेला आहे.

हा ग्रंथ, उर्दू विद्वानांच्या मते, अत्यन्त महत्त्वाचा व मूलगामी आहे. आर्ज़ूच्या या ग्रंथाचे सम्पादन डॉ. अब्दुल्ला याने उर्दू गद्यात केलेले आहे. आर्ज़ूने या ग्रंथाची टीका भाषावैज्ञानिक भूमिकेवरून करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्याला संस्कृत, प्राकृत, हिंदी येतच असल्यास, त्याचे या क्षेत्रातील ज्ञान अत्यंत जुजबी व तोकडे आहे असे आढळून येते. हांसवी किंवा सिराजुद्दीन आर्ज़ू यांच्यावर डॉ. अब्दुल्ला यांनी काही नवीन प्रकाश टाकलेला आहे असे मुळीच म्हणता येत नाही.

हिन्दी (उर्दू)– फार्सी कोशलेखनातील आणखी एक प्रयत्न सफ़ी नावाच्या लेखकाने **मतबूए-सबियान** या ग्रंथाच्या रूपाने केलेला आहे (पाहा– ज़ोर, खण्ड ४, पृ. ३३). हा कोश शक १७०८ (हिजरी १२००) च्या पूर्वी रचला गेल्याचे दिसते. स्व. डॉ. ज़ोर यांच्या मते हा कोश अमीर खुस्रौ याच्या ख़ालिक़-बारी कोशाच्या स्पष्टीकरण आणि विस्तार अशा स्वरूपाचा आहे. ज़ोर यांच्या मते खुस्रौ याने १७० श्लोक रचले होते. परंतु सफ़ीच्या कोशात ३५५ श्लोक (द्विचरणी) आहेत. २८ बैतांची प्रस्तावना असून तीत म्हटले आहे की हा कोश एका गोविंदराम याच्या प्रोत्साहनाने हाती घेतला होता.

वररुचि आणि हेमचन्द्र यांच्या प्राचीन मार्गाने जाणाऱ्या अमीर खुस्रौ याने आरम्भ केलेल्या परम्परेचा सुवर्णकळस म्हणजे हुसेन अ़ली सब्र याने रचलेला फार्सी-अ़रबी कोश होय. या कोशाचे नाव शमए-दबिस्तान असे आहे (पाहा– ज़ोर, खण्ड ४, पृ. २३८), हे पुस्तक केवळ १५० बैताचे असून ते पद्यात आहे. ग्रंथाचे लेखनवर्ष ज्ञात नाही. परंतु डॉ. ज़ोर याच्या मते ग्रंथ अगदी अलीकडील' शक १८०५ (हिजरी १३००) च्या सुमाराचा आहे.

२.४ पहेली लेखक

हिंदी किंवा उर्दूतील एक किंवा दोन बैताच्या बनलेल्या पहेली या काव्यप्रकाराचे जनकत्व सामान्यपणे अमीर खुस्रौकडे आहे असे मानण्यात येते. पहेली ही संज्ञा संस्कृत प्रहेलिका संज्ञेपासून आलेली आहे. संस्कृत साहित्यात प्रहेलिका हा साहित्यप्रकार फारच प्राचीन आहे. अमर कोशात (साधारणतया शक ४८० च्या पूर्वी) प्रहेलिका संज्ञेची व्याख्या केलेली आहे. आपल्या काव्यालङ्कारात भामह याने प्रहेलिकेची व्याख्या दिलेली आहे. या काव्यप्रकाराबद्दल भामहने असे मतही व्यक्त केले आहे की, नीरस, कृत्रिम आणि भावोद्दीपित करण्यास असमर्थ असल्याने प्रहेलिकेचा काव्यप्रकारात समावेश करू नये. प्रहेलिका या प्रकाराचा दण्डिन् हा मोठा समर्थक आहे.

क्रीडागोष्ठीविनोदेषु तज्ज्ञैराकीर्णमन्त्रणे ।
परव्यामोहने चापि सोपयोगाः प्रहेलिकाः ॥ ९७

त्याने या काव्य प्रकाराची सोळा उदाहरणे दिलेली आहेत. मम्मटाने (शक १००० च्या सुमारास) प्रहेलिकेस आपल्या ग्रंथात थारा दिलेला नाही. आपल्या काव्यानुशासनात हेमचन्द्राने जवळ जवळ असेच म्हटले आहे की प्रहेलिका ही काव्य होऊ शकत नाही. हेमचन्द्राचे अनुकरण करीत, प्रहेलिकेचा उल्लेखमात्र करून, ती काव्यमय असत नाही, असे विश्वनाथाने म्हटलेले आहे.

रसस्य परिपान्थत्वान्नालङ्कारः प्रहेलिका ।
उक्तिवैचित्र्यमात्रं सा च्युतदत्ताक्षरादिका ॥ १७

काव्याचार्यांनी वरीलप्रमाणे प्रहेलिकेविषयी मते व्यक्त केल्यावरून दोन तीन गोष्टी पुढे येतात. प्रथमतः, प्रहेलिका म्हणजे बौद्धिक कसरत आहे असे स्पष्ट केलेले आहे. प्रहेलिका फक्त एका किंवा दोन श्लोकात पूर्ण व्हावी अशी अट स्पष्ट झालेली आहे. तिचा विस्तार यापेक्षा अधिक श्लोकातून असू नये. तसेच प्रहेलिकेत शृंगारविषयक काही असू नये, कारण प्रहेलिका ही सभ्य, सुसंस्कृत व विद्वान लोकांपुढे वापरावयाची असते.

शककालाच्या तेराव्या शतकाच्या अखेरीस संस्कृत साहित्यातून प्रहेलिकेचे उच्चाटन झाले असे सामान्यपणे दिसून येते. तिचा उल्लेख करणारा विश्वनाथ पंडित हाच शेवटचा आचार्य असावा. परंतु प्रहेलिकेने, विद्वानांचा आश्रय सोडून, ग्रामीण भागांतील महिला समाजाकडे आश्रय घेतलेले दिसून येते. लोकसाहित्यात, विशेषतः स्त्रियांच्या तोंडी, ती अद्यापपर्यंत जिवन्त आहे. मराठीत प्रहेलिकेसाठी उखाणे असा शब्द वापरण्यात येतो. ती गुजरातीत उखाणो आणि सिन्धी भाषेत उखाणी, नावाने नावाने वावरते. हिंदी आणि बंगालीत ती पहेली या नावानेच रूढ (पाहा– भागवत, पृ.) आहे. हा साहित्यप्रकार भारतीय भाषामध्ये, या ना त्या नावाने, सर्वत्र रूढ आहे.

शककालाच्या तेराव्या शतकाच्या प्रथमार्धात अमीर खुस्रौ याने दिल्लीच्या परिसरातील मुसलमानात पहेली प्रसृत केली. खड़ीबोली, ब्रज म्हणजे भाखा, अलीकडे डॉ. सुनीतिकुमार चाटुर्ज्या यांनी जिला अधिक व्यापक व समर्पक म्हणून कोसली असे नाव दिले ती अवधी, राजस्थानी, पंजाबी आणि इतर भाषांत प्ररूढ असलेल्या परम्परेलाच खुस्रौने फार्सी लिपीतून रूढ केले. परंतु या पहेलीला रीख़्तए-हिंदी किंवा उर्दू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भाषेवर आपली कायमची छाप मारता आलेली नाही. पहेली अमीर खुस्रौपर्यंतच मर्यादित राहिली. उर्दू साहित्यात कोणत्याहि नाव घेण्यासारख्या मोठ्या कवीने तिचे पाणिग्रहण केलेले नाही.

अमीर खुस्रौ याने काही पहेली (हिंदी-पहेलियाँ) रचल्या ही गोष्ट वादातीत आहे. तरी त्याच्या नावावर मोडत असलेल्या सर्व पहेली त्याच्याच आहेत असे म्हणणे अगदीच धाष्ट्र्याचे होईल. खुस्रौने खालील श्लोक रचलेले आहेत. त्यात पहेली अंतर्हित आहे.

फार्सी बोली [बोलीं] आए ना तुर्की [तुर्की] धूंडे पाए ना
हिंदी बोलों आरसी आए खुस्रौ कहे न कोई बताए ।

येथे पहेली अंतर्हित आहे. चौकटी कंसात मी शुद्ध पाठ सुचविले आहेत. अर्थ सरळ आहे. फार्सी बोलींत ती येत नाही. तुर्की भाषा धुंडाळली तर ती सापडत नाही. हिंदी बोलींत ती आरशाइतकी स्पष्ट आहे. तर ती कोण ? खुस्रौ म्हणतो, कोणीच सांगत नाही. तर ती पहेलीच होय. तिचे बी फार्सी-तुर्की भाषात कधीच रुजले नव्हते, असे खुस्रौनेच येथे स्पष्ट केलेले आहे.

३.१ समारोप

खुस्रौच्या काव्यसंग्रहात अनेक रुबायांमधून पहेली गोवलेल्या आहेत (पाहा– मिर्ज़ा, पृ. २३६). खुस्रौचा हा ग्रंथ केवळ फार्सी साहित्याचा आहे. फार्सी भाषेत पहेली वापरणारा अमीर खुस्रौ हा एकमेव कवि होय. त्याच्या या वैशिष्ट्यामुळे फार्सी साहित्यक्षेत्रात अमीर खुस्रौ हा त्या साहित्याला अलंकारभूत बनलेला आहे. संस्कृत आणि इतर भारतीय भाषांनी, खुस्रौच्या माध्यमाने, फार्सी भाषेला दिलेली ही देन होय. हा भारतीय प्रभाव आहे यात संदेह असू शकत नाही.

(भांडारकर प्राच्य संशोधन संस्थेची पत्रिका, खण्ड ५१, १९७१ मधून अनुवादित)

संक्षेप आणि सन्दर्भ

अब्दुल्ला– नवादिरुल-लुग़ात : अब्दुल्ला (उर्दू) कराची, १९६२
काणे– बाणकृत हर्षचरितम् : पां. वा. काणे, मुंबई, १९६५
खुस्रौ– अमीर खुस्रौकृत नुह सिपिहर : वहीद मिर्ज़ा, मुंबई, १९५०
चौहान – इब्ने निशातीकृत फूलबन : दे. व्यं. चौहान, पुणे, शक १८८८
चौहान– अब– अ. भा. प्रा. परिषद, वाराणसी शक १८९०, दे. व्यं. चौहानचा, अबयाते-सिलसिला
ज़ोर– तज़्किरए-मख्तूतात : मु. क़ा. ज़ोर, हैद्राबाद
पिशल– देशीनाममाला : आर्. पिशल, पुणे १९३८
भागवत– लोकसाहित्याची रूपरेखा : दुर्गा भागवत, मुंबई १९५६
मिर्ज़ा– अमीर खुस्रौ (उर्दू) : वहीद मिर्ज़ा, प्रयाग, १९४९
मीर– मीरकृत नुकातुश्-शुअ़राए – हिंदी : अ़ब्दुल-हक़, दिल्ली, १९४४
राव– स्टडीज इन इण्डियन हिस्टरी : व. दी. राव, कोल्हापूर, १९६८
विश्वनाथ– विश्वनाथकृत साहित्यदर्पण, के. का., लाहोर, १९३८
शर्मा– खुस्रौकृत ख़ालिक़-बारी : श्रीराम शर्मा, वाराणसी, १९६४
सहीफ़ा– सहीफ़ा, त्रैमासिक लाहोर, जुलै १९६८, राणा इलाही
हक़– मुल्ला नुस्रती (उर्दू) : अ़ब्दुल-हक़, दिल्ली, १९४४

◆◆◆

८ : बाल्ट् आणि आर्य

गेल्या ऑक्टोबरच्या शेवटच्या तीन तारखेला कलकत्ता येथे भरलेल्या अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेच्या प्रसंगी डॉ. सुनीतिकुमार चाटर्जी यांचा नवीन ग्रंथ बाल्ट्स आणि आर्यन्स* हाती पडला. डॉ. चाटर्जी हे अखिल भारतीयच नव्हे तर जागतिक कीर्तीचे भाषाकोविद आहेत. येत्या २६ नोव्हेंबर रोजी त्यांच्या वयाला ७९ वर्षे पूर्ण होतात. शके १८४८ मध्ये त्यांनी बंगाली भाषेचा उद्गम व विकास हा १३०० पृष्ठांचा बृहद् ग्रंथ लिहिलेला आहे. त्यांच्या या आदर्श प्रयत्नामुळे भारतीय भाषांचे उद्गम व विकास हे ग्रंथ लिहिले गेले. याच धर्तीवर लिहिलेले कोशली, कोंकणी, ब्रज, असमी आदी भाषांमधील हे प्रयत्न प्रमाण मानले जातात. अन्य सर्व भाषांतही असे प्रयत्न झालेले आहेत. परंतु दुर्दैवाने मराठी भाषा अशा प्रमाणभूत ग्रंथावाचून वंचित आहे. डॉ. चाटर्जी यांनी शक १८६२ साली अहमदाबाद येथे गुजरात व्हर्न्याक्युलर सोसायटीच्या पदव्युत्तर संशोधन विभागासाठी आठ व्याख्याने दिली. त्याचाच इंडो-आर्यन व हिंदी हा ग्रंथ शक १८६४ मध्ये प्रसिद्ध झाला. त्याची आता दुसरी आवृत्ती निघाली आहे. शक १८७५ मध्ये उक्तिव्यक्ति प्रकरण (शक १०७५) या कोशली भाषेच्या संस्कृत व्याकरणातील कोशली भाषेचे भाषिक समीक्षण केलेले आहे. शक १८८२ मध्ये त्यांना आफ्रिकीयता, आफ्रिकीय व्यक्तिमत्व हा इंग्रजी ग्रंथ (पाने २२०) लिहिला. तसेच शक १८८४ मध्ये त्यांचा भारतीयता व भारतीय संश्लेषण (Synhestis) हा ग्रंथ (पाने २०८) प्रसिद्ध झालेला आहे. प्रस्तुत बाल्ट्स् आणि आर्य हा ग्रंथ (पाने १७८) शक १८९० मध्ये सिमल्याच्या प्रगत अभ्यासाच्या भारतीय संस्थेने प्रकाशित केलेला आहे. हा ग्रंथ डॉ. चाटर्जी यांनी वरील संस्थेत दिलेल्या व्याख्यानांचा ग्रंथरूप प्रपंच आहे.

कोणत्याही देशाचा इतिहास वा संस्कृति अन्य देशांचा विचार न करता सामग्र्याने अभ्यासणे अशक्यप्रायच आहे. विशेषतः शेजारील देशांच्या जीवनाचा प्रभाव, प्रत्येक देशाच्या इतिहास संस्कृतीत कमीअधिक, प्रमाणात पडलेला दिसून येईल. प्राचीन कालाच्या बाबतीत भारतीय इतिहास असाच गुंतागुंतीचा आहे. आपला देशही अनेक दृष्टींनी संपन्न व अन्य देशांना अनुकरणीय वाटत होता. म्हणून प्राचीन कालखंडात भारतीय जीवनाचा प्रभाव आग्नेय आशिया, मध्ये आशिया,

* बाल्टस् आणि आर्यन्स, डॉ. सुनीतिकुमार चाटर्जी, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडीज, सिमला १९६८.

पश्चिम आशिया, सीलोन इत्यादी देशांच्या जीवनावर दिसून येतो. हे सर्व प्रश्न आता विद्वानांनी हाताळलेले आहेत. या प्रयत्नात भारतीय विद्वानांचे सहकार्य अल्पांशाचेच म्हणावे लागेल. भारतातील प्रयत्नात महाराष्ट्रीय विद्वानांचा हातभार नाहीच असे म्हटल्यास ते सत्यास सोडून होईल असे वाटत नाही. वरील भूभागात भारतात पडलेल्या प्रभावाचा अभ्यास एका तरी मराठी विद्वानाने केला आहे की काय, याची शंकाच आहे. अशा कार्यात बंगाली विद्वानांचा भाग बराच मोठा आहे असे दिसून येते. आग्नेय आशियाच्या अभ्यासात डॉ. मुजूमदार, मध्य आशियाच्या अभ्यासात स्व. डॉ. पूरणचंद्र बागची, ईराणविद्येत डॉ. सेन इत्यादींचा उल्लेख करता येईल. अशा गणनेत मराठी विद्वान घालावयाचाच म्हटले तरी कठीण आहे, असे वाटते.

वरील प्रश्नाखेरीज सर्व पाश्चात्य जगाशी भारताला निगडित करणारा भारोपीय (भारत-युरोपीय) भाषांचा प्रश्न. सर्व भारोपीय भाषांत संस्कृत भाषा प्रगल्भतम. या संस्कृत भाषेच्या मायेचा पसारा भारतात व भारताबाहेर पसरलेला आहे. भारतातील संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश व नव्य आर्य भारतीय भाषांच्या अभ्यासापलीकडे भारतीयांची मजल क्वचितच गेलेली दिसते. त्यातही मराठी विद्वान काही अपवाद सोडले तर चुकूनही सापडायचा नाही. अशा प्रसंगी डॉ. सुनीतिकुमार चाटुर्ज्या यांच्या प्रस्तुत प्रयत्नांची आठवण होते. वेद व त्यातील भाषा, संस्कृती ही आपणाला प्राणापेक्षा अधिक प्रिय आहेत. पण वेदांतील भाषा व संस्कृती ज्या लॅट्व्हिया व लिथ्वेनिया या भटिकी (Baltic) प्रदेशांत आजही साररूपाने उपलब्ध आहेत, त्या देशांकडे डॉ. चाटुर्ज्या यांचे लक्ष गेले व आपल्या श्रमाचा मधु-वट त्यांनी आपल्या पुढे ठेवला, ही गोष्ट विशेष होय. तसे पाहिले तर डॉ. चाटुर्ज्या यांनी त्यांच्या अभ्यासाच्या खोलीची ओळख अनेक रूपाने करून दिलेली आहे. शक १८७५ साली अहमदाबाद येथे भरलेल्या भारतीय प्राच्यपरिषदेच्या प्रमुख अध्यक्ष-पदावरूनही त्यांनी याची आठवण दिलेली आहे.

बाल्ट्स आणि आर्य या छोटेखानी ग्रंथात एकूण १६ प्रकरणे आहेत. पहिल्या सहा प्रकरणांत लेखकाने भारोपीय भाषा, त्यांचे भूप्रदेश इत्यादींसंबंधी थोडक्यात माहिती दिलेली आहे. ७, ८ व ९ व्या प्रकरणात भाटिक देश, त्यांची संस्कृती त्यांचे स्वभावविशेष आदींचा थोडक्यात परिचय करून दिलेला आहे. १० व्या व ११ व्या प्रकरणात भटिक (Balts) देशांतील काव्याविष्कार प्रकार, दइन याचा परिचय व त्यातील संस्कृती व आशय विशद केलेले आहेत. १२ व्या प्रकरणात बाल्टिक जीवन व लोकाचार वर्णिला आहे आणि त्यांची तुलना आर्यांच्या वैदिक जीवनाशी करण्यात आली आहे. तेराव्यात लोकांच्या धर्माचा मागोवा घेण्यात आला आहे. चौदाव्यात जर्मन लोकांनी धर्मप्रसाराच्या बुरख्याखाली चौदाव्या पंधराव्या

शतकातील केलेल्या आक्रमणाचा राजकीय इतिहास व भटिक लोकांच्या देशभक्तीचे व राष्ट्रीय भावनेचे वर्णन आलेले आहे. पंधरावे प्रकरण भाषाशास्त्रीय असून त्यात भटिक भाषा व तिचे वैदिक भाषेशी साम्य, यांची चर्चा केलेली आहे. शेवटच्या सोळाव्या प्रकरणी बाल्टिक भाषेची छोटी छोटी पण प्रातिनिधिक वाक्ये व त्यांचे आंग्ल रूपांतर दिलेले आहे. हे नमुने भरपूर २० पाने आहेत. म्हणजे शेवटची दोन प्रकरणे (पाने ४०) भाषिक असून बाल्टिक भाषाभ्यासाचे प्राथमिक साधन म्हणून अत्यंत उपयुक्त व ग्रंथसाररूप आहेत.

पुस्तकातील राजकीय इतिहासाचा भाग अत्यंत वाचनीय असून हे आक्रमण धर्माच्या नावाने पण राजकीय हेतूने झालेले होते. हे आक्रमण एका दृष्टीने इष्टापत्तीच होते. भटिक देश खेड्यांचा बनलेला, निसर्गसंपन्न व शेतकीप्रधान होता व आहे. त्यामुळे पहिल्या चौदा ख्रिस्ताब्द शतकातील लोकजीवन संपन्न, सुस्थिर पण अप्रवाही होते. त्यामुळे राष्ट्रीयत्वाची भावना नव्हती. जर्मन आक्रमणाने लॅटिव्हया व लिथ्वेनिया या दोन भाषिक प्रदेशात राष्ट्रीयत्वाची भावना उदय पावली. हे दोन भाषिक प्रदेश आक्रमणाने जवळ आले, सुसंधता निर्माण झाली. महाराजा गोदिमिनस (मृत्यू शक १२४८), अलिरस (मृत्यू शक १२९९), केस्तुतिस (मृत्य शक १३०४) हे बाल्टिक इतिहासातील राष्ट्रपुरुष होत. यांनी जर्मन व रशियाई आक्रमकांचा फडशा पाडला व आपली विजयी सैन्ये त्या त्या आक्रमकांच्या राजधान्यांत घुसविली. काही काळ बाल्ट लोकांचे साम्राज्यही चालले. याचा मूलभूत परिणाम म्हणजे एकराष्ट्र भावनेचा उदय होय. हे लोक आपल्या प्राचीन परंपरेचे व वाडवडलांच्या धर्माचे कट्टे अभिमानी व पुरस्कर्ते होते.

बाल्टिक भाषा इसवी सनपूर्व १२०० ते १५०० मध्ये अस्तित्वात आल्याचे खरे असले तरी तिच्यातील साहित्य मात्र ख्रिस्ताब्दाच्या १६ व्या शतकात लिपिबद्ध झाले. प्राचीन वैदिक आर्यांप्रमाणेच भटिक लोकांचे साहित्यही मुखोद्‌गत रूपाने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला पोचलेले आहे. लॅटिव्हयन व लिथ्वेनियन या दोन बोलभाषा ख्रिस्ताब्दाच्या १० व्या शतकापर्यंत परिस्फुटित झालेल्या नव्हत्या. दोन्ही भाषा, भारतातील गुजराती व राजस्थानी प्रमाणे एकरूप होत्या. दोन्ही भाषांसाठी सध्या रोमन लिपी वापरली जाते. बाल्ट लोकांच्या साहित्याचा आविष्कार दइन या काव्यप्रकारातून झालेला आहे. ज्याप्रमाणे महाराष्ट्रीय संतांचा हृदयाविष्कार अभंग-वाणीतून झाला, त्याप्रमाणे बाल्टिक हृदयाचे बोल दइनांमधून साकार झालेले आहेत. बाल्टिक वाङ्मय म्हणजे दइन साहित्य होय. दइन वस्तुतः लोकसाहित्य आहे. हे साहित्य एका पिढीकडून पुढच्या पिढीला मुखोद्‌गत रूपाने प्राप्त झालेले आहे. ते विपुलही आहे. भारतातील लोकसाहित्य संग्रहाच्या कार्याप्रमाणे, बाल्ट लोकसाहित्य संग्रहही मोठ्या प्रमाणात झालेला आहे. त्याचे ५-१० खंडही प्रकाशित झालेले आहेत

दइन शब्दाची कुळीमुळीही मोठी विलोभनीय आहे. ती पाहिल्याने भटिकी साहित्य व जीवन, वैदिक जीवनाचे कसे सहोदर आहे, याची मनोमन खात्री पटते. दइन हा शब्द भारोपीय भाषेतील अध्याहृत धातु * धि, * ध्य, *ध्यै, *धेइ – विचार करणे, मनन करणे, चिंतन करणे, यापासून निघाला आहे. त्याचा वैदिक समकाय व समानार्थ शब्द धेना आहे. त्याचा अवेस्ता प्रतिशब्द दएना हा होय (पाने ६९, ७०). हा दइन व दएना शब्द भारतातही प्राचीन व आधुनिक कालात सुपरिचित आहे. परंतु भारतीय विद्वानांनी त्याकडे लक्ष दिलेले नाही. आपल्या प्राकृत व संस्कृत लेखांतून वराहदिन्न, दीनिकपुत्र इत्यादींचा उपयोग अनेक शतके व अनेक प्रसंगी झालेला आहे. प्राचीन काली हे शब्द शकपल्लवांच्या संपर्काने येथे आले. मध्ययुगीन कालात ईराणी मुसलमानांच्या संपर्काने दीन शब्द भारतात आला व रूढ झाला. दएना या अवेस्ता रूपाचे भारतीय रूप दीन झाले. अरबांच्या प्रभावाने सध्या ते रूप दीन असे असून त्याचा अर्थ धर्म असा आहे. शम्सूद्दीन, क़मरुद्दीन इत्यादी सामासिक शब्दांत दुसरा शब्द दीन धर्माच्या अर्थाने असून तो दइन, वा ध्यै – ध्यान शब्दाचेच अवस्थान्तर होय. शम्सूद्दीन, क़मरुद्दीन यांचा अर्थ धर्मादित्य व धर्मचंद्र असा होतो. ही व्युत्पत्ती आता जगात विद्वन्मान्य झालेली आहे (पान ७०). धेना या वैदिक शब्दाचे ध्वन्यात्मक समकाय अवेस्ता रूप दएना असून तेच लिथ्वेनियन दइन होय. दइन ही लोकगीते असून त्यांत तद्देशीय हृदयाचा व मनाचा आविष्कार सामावलेला आहे. बाल्टिक लोकांच्या धार्मिक भावना व तत्त्वचिंतनाचे ते दर्शन होय. या दइन गीतसंपदेत लोकांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाची गर्भगृहे उभारलेली आहेत. या गीतांतून भटिक लोकांच्या अनामिक देवादिकांचा विचार स्थिरावलेला आहे. चंद्रदेव व सूर्यदेवतेच्या, ही गीते म्हणजे गाथा होत. (बाल्ट साहित्यांत चंद्र हा पुरुष देव व सूर्य ही स्त्री देवता आहेत.) ही गीते उषा, संध्या तारका, पेर्कून (पर्जन्य), विद्युद्देवता इत्यादींच्या वर्णनांनी भरलेली आहेत.

वैदिक भाषेशी भटिकी भाषेचे नाते पाहण्यासाठी काही शब्दांच्या रूपांकडे दृष्टी फिरविणे युक्त होईल. संस्कृत दधि शब्दाचे बाल्टिक रूप ददन म्हणजे दूध असे आहे. अल्बेनियन भाषेत ते रूप जधे (लोणी) असे आहे. संस्कृतातला कृ हा धातु स्कृ, स्वलृ या प्राचीन धातूपासून मागाहून आलेला आहे. कृ धातूपासून कवि शब्द बनलेला आहे. या धातूपासून वेगळ्या प्रक्रियेने ग्रीक (Poietes, Poet) शब्द बनलेला आहे. प्राचीन आंग्ल रूप स्कॉप (Scop), प्राचीन नॉर्स रूप स्काल्ड (Skald) असे आहे. प्रमुख बाल्टिक भाषात लिथ्वेनियन मध्ये कंक्लेस (Kankles) आणि लॅटिव्हयन भाषांत कोक्ले (Kokle) अशी कवि शब्दाची रूपे रूढ आहेत. सं. देव शब्दाचे लिथ्वेनियन रूप दियवस् आणि लॅट रूप दियवस्

असे आहे. सं. दुहितृ शब्दाचे बाल्टिक रूप दुक्रिते (Dukryte) असून ते आधुनिक ईराणीत दुख्तर आहे. आधुनिक महाकवि अंद्रेज पुम्पर्स (शक १७६३ ते १८२४) याने लॅटिव्हयन भाषेत लच्पेलेसिम् हे महाकाव्य लिहिले. या लच्पेलेसिस् शब्दाचा अर्थ 'The bear slayer or The bear-piercer' असा आहे. या शब्दाला ऋक्ष – स्पर्श, ऋक्षं – दर, ऋक्ष – हन असे वर्णनात्मक शब्द डॉ. चाटुर्ज्या यांनी उपयोजिले आहेत (पान १३१). ऋक्ष हा शब्द लच् शब्दाच्या समान अर्थी व सगोत्र आहे. अग्नी शब्दाचे रूप उगुन्स आणि नक्त (रात्र) शब्दाचे नक्ट्स् असे आहे. गम्मत अशी की आणि शब्दाला अन् हा प्रतिशब्द आहे; अशा वेळी आपणास मराठी अन् शब्दाची आठवण अवश्य होईलच.

सुरवातीची ३०–३५ पाने प्रास्ताविक म्हणून सोडली तर शेष ग्रंथ अत्यंत माहितीपूर्ण असा आहे. विषयाचा ज्याला आवाका आहे अशा विद्वानांकडूनच हा विषय हाताळला जाऊ शकतो. ग्रंथ शास्त्रीय असला तरी सर्वसामान्यांना कळावा अशी काळजी घेतल्याचे विद्वान लेखकाने सांगितलेले आहे. हे अगदी सुयोग्य आहे. या विषयावरील जागतिक साहित्याच्या दृष्टीने हा ग्रंथ संशोधनात्मक नसला तरी वाल्टिक जीवन व साहित्य यांच्या जोडीने वैदिक जीवन व साहित्य यांची तुलनात्मक योजना हे या ग्रंथाचे वैशिष्टच, भारताबाहेरील विद्वानांनाही नवीन वाटेल असे माझ्या अल्प बुद्धीस वाटते. ग्रंथाच्या शेवटी बाल्टिक देशांचा नकाशा जोडल्याने वाचकांची चांगली सोय झालेली आहे. पुस्तकांत आणखी १८ सुंदर चित्रे दिलेली आहेत. ग्रंथ भटिकदेशीय व परदेशी विद्वानांना समर्पित आहे, हेही योग्यच आहे. या सर्वांबद्दल डॉ. चाटुर्ज्या आणि सिमल्याची संस्था अभिनंदनास पात्र आहेत. ग्रंथाच्या एकादश प्रकरणाला परिशिष्ट म्हणून काही संस्कृत श्लोक विद्वान लेखकाने जोडलेले आहेत. हे सर्व ग्रंथाचे जणू काय सारच या थोड्याशा श्लोकांत गोवलेले आहे. तसेच या श्लोकांतून ग्रंथ-लेखकाचा दृष्टिकोनही उत्तम रीतीने व्यक्त झालेला आहे. डॉ. चाटुर्ज्या यांची ही जुनी प्रथा आहे. त्यानी आपल्या आर्यभारतीय भाषा व हिंदी या पुस्तकातही असे विविध वृत्तांतील १२ श्लोक जोडलेले आहेत. प्रस्तुत श्लोक पुढे दिले आहेत :–

अभूच्छ्रुतिः प्रवैदिकी[1] मूलार्यवाङ्मयी पुरा ।
धेना -गाथाश्रिता[2] विद्या देवमानवधारिणी[3] ॥
उत्तरस्यां श्रुतिर्यासीत् पितृभिर्नः सुषेविता ॥१॥

आद्यायां तत्र वै श्रुतावार्यजनप्रसारितम् ।
देशे देशे नवीनं च रूपं बहु समागतम् ॥
विलोपश्च क्वचित्क्वचिद् दृश्यतेऽस्य श्रुतेरपि ॥२॥

भारतस्यार्यकृष्टिषु श्रुतेः सम्पूर्णता गता।
वेदरूपा मनुष्याणां विश्वेषां मङ्गलावहा ॥३॥

इष्टिर्नामिति[4] पारस्ये[5] मन्त्रपाठः सुविश्रुतः।
मूलश्रुतेः कथाञ्चित्तु तत्रास्ति नूतनं रूपम् ॥४॥

सर्याणामार्यजनानां[6] हि कविषु सत्यदर्शिषु।
ऋतं च सुन्दरं चापि श्रुतिवन्निहितं सदा ॥५॥

रोमकाश्च[7] सबान्धवा धृतवन्तः श्रुतिं पराम्।
तथैवान्ये जनाः प्रत्ना आर्यगोत्रोद्भवाश्च[8] ते ॥६॥

१. वेदकालपूर्व, २. बाल्टिक देशातील दइनरूपी आणि ईराण देशातील गाथारूपी मन्त्र. ३. ज्यांमध्ये मानव व देवादींची वर्णने आहेत अशी. ४. इष्टि अर्थात यस्त नावाने ओळखले जाणारे मंत्र. ५. पारसीक, ईराण देश. ६. सर्य किंवा सर्याण म्हणजे हेलेन अर्थात ग्रीक लोक. व्हेल्लस, हेल्लनिस < भारोपिय *सेल्यो – *सेल्येविस्-भटके किंवा नृत्य करणारे लोक. ७. रोमन लोक. ८. पुराण, प्राचीन.

चटा[9] स्तोताश्च[10] भूखण्डे पश्चिमे प्रचरन्ति ये।
श्रवस्काश्च[11] सुवीरा[12]स्ते वसन्ति तोतसन्निधौ ॥७॥

भृगवः[13] पतयश्चान्ये[14] ऋषीका[15] ह्यार्यजा जनाः।
तेषां मध्ये श्रुतिश्चाद्या लघुरूपेण संस्थिता ॥८॥

स्रोतास्तस्याः श्रुतेः प्रत्नमार्यजा भटसंज्ञिताः[16]।
संरक्षन्त्यधुनापि ते प्रत्ननूत्नविमिश्रितम् ॥९॥

प्रवैदिकस्य धर्मस्य कालप्रवाहचालितम्।
आदिमं सहजं रूपं किञ्चित्तेषूपलभ्यते ॥
धेने -ति विदिते लोके बहुसूक्तसहस्रके ॥१०॥

सर्वे वेदाः ऋषिप्रोक्ता भारतस्य सनातनाः।
धेनाश्चार्यभटिकानां पूरयन्तु परस्परम् ॥११॥

संहिते द्वे विराजतां भारतस्य श्रुतिः सदा।
भटजनस्य वै तद्वद् भटिकी वेदसंहिता ॥१२॥

मुंबई, कार्तिक २४, १८९१.

(इतिहास आणि संस्कृति, मुंबई, पु. ३०, श. १८९३)

९. केल्ट लोक-भारोपीय * केल्टो, * के (क्वे)ल्टो- < * केल् = संस्कृत <चर्' <चल् = भटके, *फिरते लोक = संस्कृत चट, १०. टयूटन Teuton टेऊट- भारोपिय टयूटो, *टाऊटो < √ टय्-टु-बलवान असणे. म्हणून जर्मन *डयुओअ, * डिउड, प्राचीन आंग्ल डेओड, श्रेष्ठ जर्मन डिओट. त्याचे लॅटिन रूप टयुटो, बाल्टिक टौट. इटालियन टोउटो. प्राचीन आयरिश, टुअठ, यांचे संस्कृत समीकरण होईल* तौत > तोत. हे रूप एका देवतेच्या नावात मिळते. एक देवी, तोतिला ' प्रबल लोकांची देवी ' (?). ११ स्लाव्ह लोक, स्लाव्ह. स्लाव्ह- इस्क, < भारोपीय * क्लेवोस्, संस्कृत श्रवस् ' वैभव '. १२. उत्तम वीर, श्रेष्ठ योद्धा. १३. भृगवः, भृगु = फ्रुजिस्, ब्रुजिस् = फ्रिजियन. (Phrygian). १४. संस्कृत पति = अर्मेनियन हइ, प्रभावी लोक. हे अर्मेनियनांचेराष्ट्रीय नाम. १५. ऋषीक = अर्सिक, अर्सक, प्राचीन मध्यआशियायी लोकांपैकी एक – तोखारियनस् (सं. तुषार). १६. भट = भारोपीय *भल्टोस, *भ्लृटास. यांचे संस्कृत रूप. म्हणून बाल्टिक-लिथ्वेनियन भाषेत बल्टस म्हणजे शुभ्र, श्वेत लॅट्व्हियन बल्टस्-बल्ट नामाचे मूळ = (?) ' श्वेत बर्फमय प्रदेशाचे लोक. '

९ : देवनी मोरी शिलालेख – काही विचार

सात इंच व्यास व पाच इंच उंचीच्या एका दगडी करंडकाच्या बाहेरून एक लेख संस्कृत भाषेत कोरलेला आहे. हा करंडक देवनी मोरी या उत्तर गुजरात-मधील प्राचीन अवशेषांच्या उत्खननात प्राप्त झालेला आहे. देवनी मोरी हे स्थान शामळाजी गावाजवळ आहे. आता या उत्खननाचे इतिवृत्तही प्रकाशात आले आहे. या करंडकावरील संस्कृत लेख महत्त्वाचा असून त्याचे प्रथम सम्पादन डॉ. आर्. एन्. मेहता व एस्. एन्. चौधरी यांनी केलेले आहे (पाहा– मेहता पृ. १७३). यानंतर डॉ. वा. वि. मिराशी यांनी या लेखातील काही प्रश्नांची चर्चा केली आहे (पाहा मिराशी, पृ. १०१). आपल्या या लेखाच्या मराठी पुनर्लेखनात डॉ. मिराशी यांनी देवनी मोरी या नावाच्या ऐवजी देवरी मोरी हेही रूप वापरले आहे. (पाहा – मिराशी संमु, पृ १०९)

या लेखाविषयी डॉ. मिराशी यांनी काही पाठ सुचविलेले आहेत. ते योग्यच आहेत, असे वाटते. या लेखात लेखाचे वर्षही दिलेले आहे. लेखातील सात आर्यां-पैकी कालोल्लेखाची आर्या अशी –

> **सप्तविंशत्यधिके कथिकनृपाणां समागते ऽब्दशते ।**
> **भाद्रपदपञ्चमदिने नृपतौ श्रीरुद्रसेने च ॥ २ ॥**

येथे रुद्रसेन या राजाचे नावही दिलेले आहे. डॉ. मिराशी यांचे मुख्य आक्षेप आहेत– उल्लेखित १२७ हे वर्ष कोणत्या कालगणनेचे समजावयाचे आणि हा रुद्रसेन राजा कोणत्या वंशाचा आहे? त्यांच्या मते ही कलचूरी-चेदी कालगणना असून ते इसवी सनाचे ३७६-७७ वर्ष होते. लेखातील राजा रुद्रसेन हा आभीर वंशीय असावा. या दोन्ही आक्षेपांचाच या टिपणात मुख्यतः विचार कर्तव्य आहे. परंतु तिकडे वळण्यापूर्वी देवनी मोरी या नावाबद्दल बोलू.

देवनी मोरी शब्दाचा एक पाठ देवरी मोरी असा डॉ. मिराशींनी दिलेला आहे. डॉ. साहेबांनी हाही पाठ योग्य का याचा उल्लेख केलेला नाही. परंतु तसा पाठ असल्यास तोही भाषावैज्ञानिकदृष्ट्या योग्य आहे असे दिसून येते. गावाचे मूळ नाव मोरी आहे असे वाटते. देवनी हा शब्द विशेषणरूप आहे. देवनी हे जुन्या व आजच्या गुजरातीत देव या शब्दाचे षष्ठीच्या एकवचनाचे स्त्रीलिंगी रूप आहे. जुन्या गुजरातीत री हासुद्धा लिंगाप्रमाणे बदलणारा षष्ठीच्या एकवचनाचा प्रत्यय होता. नी, नउ, नई आणि री, रउ, रइ हे प्रत्यय षष्ठी एकवचनासाठी

जुन्या गुजरातीत प्रयुक्त होत असत (पाहा – तेस्सितोरी, पृ. ८८). म्हणून देवनी किंवा देवरी मोरी म्हणजे देवाची मोरी असा आशय होतो.

जाता जाता या देवनी शब्दाचा महाराष्ट्राशी असलेला संबंधही स्पष्ट करणे योग्य होईल. अखिल महाराष्ट्रातील ३९००० गावांपैकी देवनी नावाचे एकच गाव आहे. हा गाव उदगीर तालुक्यात (जिल्हा धाराशीव, महाराष्ट्र) आहे. महाराष्ट्रातील देवनी जातीच्या गाई-बैलांचा बाजार भरण्याचे ते प्रमुख गाव आहे. महाराष्ट्रात हा गाव या देवनी जातीच्या गाई-बैलांसाठीच प्रसिद्ध आहे. पशुसंवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते ही गोष्ट निर्णीत झालेली आहे की महाराष्ट्रातील देवनी ही गाईची जात सौराष्ट्रातील प्रसिद्ध गीर जातीच्या जनावरांची विकसित जात आहे. महाराष्ट्रातील देवनी जात आता भारतातील गाईंत एक उत्कृष्ट जात मानली जाते. देवनी हा शब्द महाराष्ट्रात दुर्मिळच आहे. काही शतकांपूर्वी गीर जातीची महाराष्ट्रात आयात झाली. तेव्हापासून या जातीस हे नाव पडले. ते मूलतः वरील देवनी या शब्दापासून पडलेले असावे. महाराष्ट्रातील देवनी हे ग्रामनाम देवनी जातीच्या गाईवरून पडलेले दिसते.

उपरोक्त लेखसम्पादनात डॉ. मेहता व त्यांच्या सहकाऱ्याने १२७ हे वर्ष शककालगणनेचे आहे, असे मानलेले आहे. तसेच उल्लिखित रुद्रसेन हा चष्टणाच्या वंशातील प्रथम रुद्रसेन होय असे त्यांनी मानलेले आहे. डॉ. मिराशींचा या दोन्ही मुद्यांवर मतभेद आहे. हे वर्ष शककालाशी संबंधित करण्यास डॉ. मिराशींचे दोन-तीन आक्षेप आहेत. या लेखातील वर्णलेखनकामाटी पुरालेखनकलेच्या दृष्टीने थोडीशी मागाहूनची वाटते. दुसरे लेखात साधारणतया शुद्ध संस्कृत भाषा वापरलेली आहे. पुरालेखनकलेतील लेखनपद्धतीवरून काल ठरविणे हे कालनिर्णयाचे अगदी गौण साधन आहे. प्रत्यक्ष दिलेला काळ, लेखनपद्धतीच्या थोड्याशा भिन्नपणामुळे बदलणे हे अगदी अयोग्य आहे, असे म्हणावे लागेल. लेखनपद्धतीतही प्रादेशिकता असू शकते. या लेखात शुद्ध संस्कृत भाषा वापरलेली आहे हा दुसरा आक्षेप केलेला आहे. डॉ. मिराशींनी रुद्रदामन् याच्या लेखाचा उल्लेख करून तो अपवाद मानावा असे सुचविले आहे. परंतु या लेखाशिवाय तत्कालीन अन्य लेखही उपलब्ध आहेत. कार्द्दमक कुलातील चष्टणाच्या प्रपौत्र आणि रुद्रदामनाच्या पौत्र असलल्या रुद्रसेन याचा शक १२७ मधीलच एक लेख संस्कृत भाषेतला, पण प्राकृताने प्रभावित असा उपलब्ध आहे (पाहा सरकार, पृ. १८५). या रुद्रसेनाचा बाप जयदामन्. या जयदामनाचा एक शिलालेख शुद्ध संस्कृत भाषेतला व गिरिनगरातला प्राप्त आहे (पाहा – सरकार, पृ. १८३). कार्द्दमकवंशीय प्रथम रुद्रसेनाचे आणखीही शिलालेख आहेत. त्याच्या भाषेचे वर्णन डॉ. सरकार यांनी प्राकृतप्रभावित संस्कृत असे केलेले आहे. यावरून असे दिसून येते की कार्द्दमक वंशातील क्षत्रप महाक्षत्रपांनी

संस्कृत भाषा वापरण्यास आरम्भ केलेला होता. याची मुहूर्तमेढ शक्तिशाली महाक्षत्रप रुद्रदामन् याने रोवलेली होती. वायव्य भारतातून आलेले शक क्षत्रप अनार्य नव्हते. ते भारतीय, अफगान, ईरानी लोकांप्रमाणेच आर्यवंशीय होते. शकांनी एका नव्या कालगणनेचा आरंभ केला. हीच कालगणना स्वतंत्र भारताच्या लोकशाही शासनाने भारताची राष्ट्रीय कालगणना म्हणून स्वीकारलेली आहे. शक १८७९ सालापासून ती भारत शासन आणि प्रादेशिक शासने अमलात आणीत आहेत. संस्कृत भाषेच्या बाबतीतही शक क्षत्रपांनी असेच आपलेपणाचे धोरण स्वीकारलेले होते. या बाबतीतले सिल्वाँ लेव्ही याचे मत विचारणीय आहे. (पाहा- लेव्ही, पृ. १६३). तो म्हणतो – " ज्या घटना मी वरती संकलित केल्या आहेत त्यावरून मला हे मान्य केले पाहिजे की क्षत्रप, शक यांनी संस्कृत साहित्याच्या रचनेत निर्णायक असा वाटा उचललेला आहे. हे ओबडधोबड शक आक्रमक संस्कृतीचे वाहक होते. त्यांनी भारतात आक्रमण करून येथे विकासाची, मंद का होईना गती आरम्भ केली. साहसी जीवनामुळे त्यांच्यावर ईराणी, ग्रीक, ब्राह्मण आणि बौद्ध प्रभावांची पुटे चढलेली होती. ते स्वत: कट्टर बौद्ध असले तरी त्यांनी ब्राह्मण समाजव्यवस्थेत स्वत:च प्रविष्ट होऊन, ब्राह्मणांच्या व्यवस्थेची बंधने तोडून टाकली. सनातनी घटकांनी त्याचा निषेध केला तरी या अर्धसंस्कृत विजेत्यांनी भारताचे ऐक्य घडविले. ब्राह्मणांतील पुरोहित वर्ग आणि त्यांच्या विविध शाखा यांच्या हातून त्यांनी त्यांची अद्भुत अशी भाषा हिसकून बाहेर काढली. भोवताली स्थानिक प्राकृत भाषांच्या पसरलेल्या अराजक अवस्थेत असा प्रभावी प्रतिस्पर्धी उभा केला. केवळ हा प्रतिस्पर्धीच या अराजकावर मात करू शकत होता. शकांची कालगणना, ती आपलीच आहे असे मानून, भारताने निष्ठापूर्वक संरक्षित ठेवलेली आहे. अभावितपणे भारत, या बाबतीत कृतज्ञ आणि न्यायय राहिलेला आहे. एक राष्ट्रीय साहित्य बाजूला सारून, जित संस्कृत भाषेने भारताला एक साधारण साहित्य बहाल केलेले आहे. "

डॉ. मिराशी यांनी रुद्रसेन नावातील सेन या पादार्धावर बोट ठेवून, एक ईश्वरसेन आभीर राजाशी त्याचे नाते जोडण्याचा प्रयत्न केलेला राहे. हा आक्षेपही टिकण्यासारखा नाही असे दिसून येते. प्रथम रुद्रसेन हा कार्द्दमक शकवंशातला चौथा महाक्षत्रप आहे. या घराण्यातील राजांचा इतिहास आता बराचसा सुसंगतरीत्या पुढे आलेला आहे (पहा गुप्त- पृ. ४९). या रुद्रसेनापूर्वी या घराण्यात सेनपदयुक्त नाम धारण करणारी व्यक्ति ज्ञात व उपलब्ध नाही. परंतु कार्द्दमक राजवंशात सेन-पदयुक्त नावे धारण करणाऱ्या भरपूर व्यक्ति दिसून येतात. डॉ. गुप्ताने दिलेल्या वंशवृक्षावरून दिसून येते की या प्रथम रुद्रसेन राजाचा सख्खा भाऊ दामसेन नामे होता. तो आठव्या क्रमांकात शक १७२-१७७ मध्ये महाक्षत्रप होता.

या रुद्रसेनाने आपल्या एका मुलाचे नाव पृथ्वीसेन असे ठेविले होते (जीवित शक १४४). प्रथम रुद्रसेनाचा पुतण्या दामसेनसुत विजयसेन नामे दहावा महाक्षत्रप (जीवित शक १६०-१७२) होता. या विजयसेनाचा पुत्र द्वितीय रुद्रसेन (जीवित शक १७७-१९९) आणि त्याचा नातू विश्वसेन नामे होऊन गेले (जीवित २१५-२१६). अशा रीतीने, या प्रथम रुद्रसेनाला सोडून, या कार्दमक क्षत्रप शकवंशात सेन-पदयुक्त नामे धारण करणाऱ्या आणखी चार राजव्यक्ति होऊन गेलेल्या आहेत, असे दिसून येते. म्हणून सेन शब्दाने बिचकून जाऊन, दुसऱ्या राजवंशाचा तलाश करण्याचे कारण असू नये.

आता मुख्य प्रश्न १२७ या वर्षाच्या कालगणनेचा. हे वर्ष देणाऱ्या उपर्युक्त श्लोकात या वर्षाला कथिकनृपाणाम् असे विशेषण लावलेले आहे. कथिक नृप किंवा कथिक संज्ञेचे वैशिष्टच समजून घेण्याचा प्रयत्न झालेला नाही. डॉ. मेहता यांनी या क्षत्रप वंशाचे नाव कथिक होते असे प्रतिपादिले आहे. परंतु हे तितकेसे योग्य वाटत नाही. डॉ. मिराशी यांनी या प्रथम रुद्रसेनाच्या वंशाचे नाव कार्दमक होते असे सांगितले आहे, ते अगदी योग्य व इतिहासपरिचित असेच आहे. कथिक हे वंशनाम आहे, असे मानून हा सर्व तलाश झालेला आहे. त्यामुळे हा घोटाळा निर्माण झालेला आहे, असे दिसून येते.

वस्तुत: कथिक हे अखिल शक जमातीला किंवा त्यातील विशिष्ट गटाला नाव होते, असे दिसून येते. याचा शोध आता घ्यावयाचा आहे. याचा विचार पुढे येत आहे. येथे ही गोष्ट सांगितली पाहिजे की शूलिक, पह्लव, दरद, खस, तुषार, शक, शकमुरुण्ड इत्यादी जाति मध्य आशिया, पामीर, अफगाणिस्तान, ईराण, बलूचिस्तान या देशातून इसवी कालपूर्वपासून भारतात येत राहिलेल्या आहेत. आर्यभाषा बोलणाऱ्या या आर्यवंशीय जाती होत्या. त्यांपैकी शक, भोजक, आभीर-आहीर यांची बरीच माहिती भारतीय साधनग्रंथांतून मिळते. अग्नि, सूर्यादींची उपासना करणारे हे गट ईराणीप्रभावक्षेत्रातून आलेले आहेत. भविष्यपुराणातला प्राचीनभाग, विशेषत: ब्राह्मपर्वातील काही भाग या सूर्याग्निउपासकाची माहिती देतो. त्यात प्राचीन परम्परांबरोबर तत्कालीन दन्तकथा, समज व अपसमज भरलेले आहेत. परंतु त्यातून काही प्राचीन परम्परांचे धागे हाती घेता येतात. मग आणि भोजकाबद्दल ते अग्निसूर्योपासक होते अशी निश्चित परम्परा हाती येते. (पाहा-भविष्यपुराण पृ. २०८)–

अग्निजात्या मगा: प्रोक्ता: सोमजात्या द्विजातय: ।
भोजकादित्यजात्या हि दिव्यास्ते परिकीर्तिता: ॥१.१३९.४४
मगवंशे महात्मानो वेदवेदांगपारगा: ॥ १.१३९.६२
मगा ब्राह्मणभूयिष्ठा मगगा: क्षत्रिया: स्मृता: ॥ १.१३९.७३
तेभ्यो वेदास्तु चत्वार: सरहस्या मयोदिता: ।१-१३९.७६

भविष्यपुराणात भोजक गटाविषयी बऱ्याच उलटसुलट गोष्टी लिहिलेल्या आहेत. त्यांच्याविषयीचा हा उल्लेख पाहण्यासारखा आहे.

भोजकानां यदुश्रेष्ठ तस्य मूले स्थितो हरिः ।
मध्ये ब्रह्मा महातेजा अग्रे गोश्रुतिभूषणः॥ १.१४६.२०
ऋग्वेदो यस्य मूलस्थो मध्ये सामानि कृत्स्नशः ।
यजुर्वेदस्तथा श्रेष्ठश्चाथर्वसहितः स्थितः १.१४६.२१

भोजक हे आदित्योपासक होते ही गोष्ट खालील उल्लेखाने दिसते.

पूजयेत् सततं यस्तु भास्करं नृपसत्तम ।
भोजकांश्च तथा राजन् यथा देवं दिवाकरम् ॥१.२१०.२९
आदित्यं भोजकं विद्याद्भ.नोर्देहसपुङ्गवम् ॥१.२१०.३३

या भविष्यपुराणात चहूकडेच सूर्याचे पुराण आहे. सूर्यपूजादिमाहात्म्यवर्णन करीत असताना 'कथिक' कोणाला म्हणावे याची चर्चा आलेली आहे.

रंगोपजीवी कथको यश्च प्राकृतनर्तकः ॥१.२१०.४०
रंगोपजीवी राजेंद्र तथा च बहुयाचकः ।
द्वे एते नामनी राजन् कथकस्य प्रकीर्तितः ।
कृतेनानेन यादृक्च उद्वृत्तः कुरुनंदन ।१.२१०.४१
यः स्तुतिं गायते विप्रः प्रोच्चैस्तु जनसंसदि
रंगोपजीवी प्रोक्तोयं द्वितीयः परिकीर्तित. ॥१.२१०.४२
सूचनं कथनं प्रोक्तं सर्वशास्त्रेषु भारत
सूचयेद्यस्तु ऋक्षाणि स वै नक्षत्रसूचकः ।१.२१०.४३

या नोंदीवरून असे स्पष्टतया दिसून येते की भोजक वर्ग नाटयकला, नृत्य, जनसंसदातून पोवाडे, गाणे आणि भविष्यवर्तन करीत असत. आणि या कलांचे अवलंबन करणाऱ्या वर्गाला कथक असे नाव येथे दिलेले आहे. वरती सिल्वां लेव्ही याचा, शकगणाच्या नाटयकलेच्या विकासातील सिंहाच्या भागाबद्दल, उल्लेख आलेला आहेच. यावरून कथक हा भोजकांपैकी एक विशिष्ट गट होता हे दिसून येते. भविष्य सांगणे व फलज्योतिषाचा व्यवसाय करणाऱ्याला नक्षत्रसूचक असे नाव दिलेले आहे. पोटासाठी, लाचार होऊन या कलांचा वापर करणारांची येथे निंदा केलेली आहे.

वरील उल्लेखांवरून कथक हे भोजक गटांपैकी होते हे स्पष्ट होते. भोजक हा विशाल अशा शक गणाचा घटकच आहे, हे सर्व अग्निसूर्योपासक होते. येथे कथक शब्दाचा वापर एका विवक्षित गटाकरिता झालेला असला तरी कथक अर्थात् कथिक हे नाव या सूर्योपासक गणांनाही लावलेले दिसून येते. हा प्रयोग निंदाव्यंजक नव्हता

असे वाटते. देवनी मोरीच्या शिलालेखावरून असे आढळून येते की सांस्कृतिक आणि धार्मिक गोटातूनही कथिक म्हणजे शक, सूर्योपासक भोजक अशी संज्ञा रूढ होती.

मन्दसौर येथे सूर्यांचे देवालय दुरुस्त करणे आणि बांधणे याबद्दल वत्सभट्टीने लिहिलेला शिलालेख प्राप्त आहे (पाहा–सरकार, पृ ३०२). त्या लेखांत सूर्योपासक असलेल्या लाटदेशाहून मन्दसौर येथे, आपल्या जातीच्या राजाच्या आश्रयाला गेलेल्या एका श्रेणीचे, संघाचे वर्णन आहे. हा गट शकवंशीय सूर्योपासक होता असे आम्ही अन्यत्र दाखविले आहे. या श्रेणीतील धनुर्विद्यानैपुण्य, कथाविद् हा व्यवसाय, आणि आपल्या धर्माचे प्रसंगानुकूल पालन याचे खालील श्लोकात वर्णन आले आहे. त्यातील कथाविद् हे कथक, कथिक याचेच नामान्तर आहे असे दिसून येते. तो श्लोक असा–

श्रवणसुभगं धानुर्वेद्यं दृढं परिनिष्ठिताः
सुचरितशतासङ्‌गाः केचिद्विचित्र - कथाविदः ।
विनय-निभृतासम्यग्धर्म्म-प्रसङ्‌ग- परायणाः
प्रियमपरुषं पत्थ्यं चान्ये क्षमा बहु भाषितुम् ॥१६

भविष्यपुराणातील उताऱ्यांत या भोजकात नक्षत्रसूचक होते असे म्हटले आहे. प्रसिद्ध सम्राट हर्षवर्धन याची कुंडली तयार करणारा मग ब्राह्मण असा भोजक होता व त्याचे नाव तारक होते. या नोंदीची चर्चा स्व. वा. श. अग्रवाल यांनी केलेली आहे. (पाहा अग्रवाल – पृ. ६४ व टीप) "सम्राटने तारक नामके ज्योतिषी को बुलाकर ग्रह दिखलाए। बाण के अनुसार यह गणक भोजक, अर्थात् मग जाति का था। **भोजकाः रविमर्चयित्वा पूजका हि भूयसा गणका भवन्ति, ये मगा इति प्रसिद्धः।** (शंकर)"

देवनी मोरी येथील शिलालेखाचा शक गणाशी संबंध दिसत नाही असे डॉ. मिराशींनी म्हटलेले आहे. या लेखात शाक्य-भिक्षूभ्यां आणि शाक्य-भिक्षूकौ असे दोन शब्द आलेले आहेत. बौद्धधर्माविषयीच्या आरम्भाच्या लेखातून वरील प्रकारच्या वापरल्या गेलेल्या संज्ञांबद्दल विद्वानांचा असा निष्कर्ष आहे की शक किंवा शाक्य या पदांनी युक्त नामे धारण करणारे बौद्धभिक्षू शक अथवा सिथियिन गटापैकी होते. "शाक्यभिक्षू या नावाने उदयाला आलेला गट संभवतः एका विचारसरणीचा परिपाक होता. या गटाला शाक्यमुनि याच्या मूर्तीला लोकप्रियता बहाल करायची होती आणि यातून अप्रत्यक्षतः त्याला आपल्या शक-कुळाचे महत्त्व प्रामुख्याने जाणवावयाचे होते." हा निष्कर्ष एका अभ्यासूने काढलेला आहे. (पाहा वास्तुशास्त्र, पृ. १०७). यावरून दिसून येईल की ज्यांनी तो स्तूप बांधला आणि ज्यांच्याकरिता बांधला या दोन्हीत शक गणाचे वैशिष्टय होते असे दिसते. आपली अस्मिता आणि अस्तित्व जाणविण्याचा हा शक गणांचा प्रयतन येथेसुद्धा दुर्लक्षिता येणार नाही.

ज्या पद्धतीने डॉ. मिराशी यांनी हा प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न केलेला आहे, ते कितपत योग्य आहे याचा विचार होणे आवश्यक आहे. आमची वरील विचारसरणी योग्य आहे असे दिसून आले तर देवनी मोरी शिलालेखातील १२७ हे कथिकनृपाचे वर्ष निश्चितपणे शककालगणनेतले आहे, हे दिसून येते. या लेखाचे अतीव महत्त्व या वर्षाला लावलेले कथिकनृप या विशेषणात आहे. इतर सर्व कालगणनांप्रमाणेच शककालगणना ही सुद्धा आरम्भी निर्विशेषण अशी रूढ होती. आमच्या माहितीप्रमाणे सर्वप्रथम वराहमिहिराने, ४२७ या शकविशेषणयुक्त वर्षाचा उल्लेख करताना, पुढील श्लोक

सप्ताश्विवेदसङ्ख्यं शककालमपास्य चैत्रशुक्लादौ ।
अर्द्धास्तमिते भानौ यवनपुरे सोमदिवसाद्ये ॥ ८ ॥

आपल्या पञ्चसिद्धान्तिकेत घातलेला आहे. येथे शककाल असा स्पष्ट उल्लेख आलेला आहे. देवनी मोरी शिलालेखातील **कथिकनृपाणां** हे विशेषण या कालगणनेचे नामकरण करणारे आहे असे दिसून येते. ही गोष्ट एकदा निश्चित झाली म्हणजे डॉ. मिराशींनी सुचविलेल्या अनेक पर्यायी कल्पनांची गरज राहात नाही. कारण त्या पर्यायी सूचना आहेत. त्यात निश्चित असे ऐतिहासिक सूत्र नाही.

(भा. इ. सं. मंडळ, पुणे १८९० त वाचलेल्या निबंधाचा अनुवाद)

संक्षेप आणि सन्दर्भ

अग्रवाल – हर्षचरित, सांस्कृतिक अध्ययन, वा. श. अग्रवाल, पटना शक १८८६
गुप्त – प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम बुलेटिन क्र. ४, १९५३, परमेश्वरीलाल गुप्त, मुंबई, १९५४
तेस्सितोरी – तेस्सितोरीकृत पुरानी राजस्थानी, नामवरसिंह, काशी श. १८७७
भविष्यपुराण – भविष्यपुराण, वेंकटेश्वर प्रेस, मुंबई, शक १८८०
मिराशी – विश्वेश्वरानंद इण्डॉलॉजिकल जर्नल, खण्ड ३, १९६५, वा. वि. मिराशी.
मिराशीसंमु – संशोधन मुक्तावली सर ५, वा. वि. मिराशी, नागपूर श. १८८८.
मेहता – जर्नल ऑफ द ओरिएण्टल इन्स्टिटयूट, खण्ड १२, १९६२–६३, आर्. एन्. मेहता व एस्. एन्. चौधरी.
लेव्ही – इण्डियन ॲण्टिकरी, खण्ड ३३, १९०४ : सिल्वाँ लेव्ही.
वास्तुशास्त्र – **स्टडीज इन अर्ली बुद्धिस्ट ऑर्किटेक्चर इन इण्डिया** : एच्. सरकार कलकत्ता, १९६६
सरकार – सिलेक्ट इन्सिक्रप्शन्स् : दीनेशचंद्र सरकार, कलकत्ता, १९६५

◆ ◆ ◆

१० : औलिकर हा राजवंश ईराणी

१.१ दीनेशचंद्र सरकार (पाहा संक्षेप सरकार पृ. ३९७) आणि वा. वि. मिराशी (पाहा मिराशी, खण्ड ३, पृ. १०३) यांनी दशपूर अथवा आधुनिक मंदसौर येथून राज्य करणाऱ्या एका राजवंशाचे वर्णन केले आहे. मिराशी यांनी इतिहासही दिला आहे. फ्लीट या विद्वानाने या वंशातील राजपुरुषांच्या प्रत्नलेखांचे सम्पादन केलेले आहे (पाहा संक्षेप— फ्लीट, पृ. ७९ व १५०). या वंशाच्या राष्ट्रीयत्वा-बद्दल या विद्वानांनी मौन पाळलेले आहे. हा राजवंश ईराणी असून, बहुधा शक-वंशीय असावा, असा सुगावा काढण्याचा प्रयत्न येथे करण्यात येत आहे. या शक गणाचें एका अवस्थेतले मूळ ठिकाण नैर्ऋत्य अफगाणिस्तानातील सइस्तान हा प्रदेश होता. हे सर्वविदित आहे.

औलिकर असे नाव असलेल्या या राजवंशासंबंधी भारतीय इतिहास किंवा भाषाविज्ञानात विशेष माहिती मिळत नाही. या राजवंशाखेरीज अन्य कोणा राज-घराण्याचे हे नाव असल्याचे आढळत नाही. ऋग्वेद आणि नंतरच्या वैदिक साहित्यात और्णनाभ आणि और्णवाभ असे वंश आढळतात. और्ण, और्णक म्हणजे लोकरीचे, लोकरीसंबंधी (सं. ऊर्ण) याचा उल्लेख पाणिनीत सापडतो. तसेच और्णावत्य असा शब्दही असून त्याचा अर्थ ऊर्णावत याचे वंशज असा सांगण्यात आलेला आहे (पाहा-कत्रे, पृ. १५६). समुद्रसपाटीपासून ५००० ते ६००० फूट उंचीवर पसरलेला अफगाणिस्तान प्राचीन काळापासून मेंढ्या आणि लोकर व लोकरीचे कपडे यांच्या करिता प्रसिद्ध आहे. ईराणी भाषेत कौल म्हणजे 'लोकरीचे जाडेभरडे कापड' आणि गौल म्हणजे 'फकिराचा जाडाभरडा लोकरी पोशाख' असे प्राचीन व आर्ष शब्द आढळतात (पाहा-स्टीनगास, पृ. १०६३ व ११०५). हे दोन्ही शब्द वैदिक व पाणिनीय और्ण शब्दाचे सगोत्र आहेत. येथे औष्ठ्य **औ** ध्वनीचे कण्ठ्य **कौ** अथवा **गौ** ध्वनीत आणि ण या अनुनासिकाचे ल ध्वनीत रूपान्तर झालेले आहे. ही गोष्ट ईराणी भाषावैज्ञानिक प्रक्रियेमुळे घडून आलेली आहे असे म्हणता येते. उपरिनिर्दिष्ट राजवंशाच्या औलिकर या नावात वैदिक शब्द **और्ण** किंवा और्णक, और्णिक असावा असे येथे सुचवावयाचे आहे. औलिक हा शब्दांश और्ण अथवा और्णिक यापासून व्युत्पन्न होणे सहज शक्य आहे. औलिकर शब्दातील र या शब्दाला लागणारा गुणधर्मवाचक प्रत्यय असावा. तो पाण्डुर, मांसल, मधुर इत्यादि शब्दांत चिकटलेला दिसून येतो. र आणि ल या दोन ध्वनीचा खांदेपालट भाषाविज्ञानात नित्याची

बाब आहे. प्राकृत भाषांतूनही न किंवा ण याचा ल नेहमीच झालेला आढळतो. जन्म शब्दाचे रूपान्तर जलम झालेले ग्रामीण जनतेत आजदेखील रूढ आहेच. या चर्चेचा मथितार्थ एवढाच की औलिकर हा शब्द पाणिनीय व वैदिक और्णक, और्णिक शब्दाचा सगोत्र वारस असावा.

२.१ प्रत्नलेखीय साधनांमधून औलिकर राजवंशाचे धागेदोरे जुळविण्यासाठी बरीच माहिती मिळण्यासारखी आहे. या वंशाच्या नात्यागोत्यावरही त्यामुळे थोडासा प्रकाश पडण्यासारखा आहे. या संबंधात दोन शिलालेख महत्त्वपूर्ण आहेत. एक (पाहा, फ्लीट, पृ. ७९) वत्सभट्टीने रचलेला विक्रम संवत ४९३ व ५२९ चा कुमारगुप्त आणि बन्धुवर्मन् याचा आणि दुसरा, औलिकरवंशीय यशोधर्मन् याचा संवत ५८९ मधील शिलालेख (पाहा-फ्लीट, पृ. १५०). दोन्ही लेख मंदसौर येथे दगडावर कोरलेले आहेत. पहिल्या लेखात शककाल ३९४ मध्ये सूर्यदेवाच्या देवालयाची दुरुस्ती केल्याची व ते देऊळ शक ३५८ मध्ये बांधले गेल्याची नोंद आहे. या उल्लेखांवरून हा राजवंश आणि लाटदेशातून त्याच्या आश्रयाला आलेली श्रेणी म्हणजे सूर्योपासक ईराणी लोक असावेत अशी सूचना मिळते. ते बहुधा शक वंशाचे असावेत. या विणकर श्रेणी म्हणजे लोकसंघाने मंदसौर येथे सूर्याचे देवालय बनविले ही गोष्ट विशेष लक्ष्य आहे. खालील श्लोकात वराहमिहिराने (जीवित शक ४२२ ते ४७२), तत्कालीन कोणकोणते गट कोणकोणत्या देवांची देवळे उभारीत याचे स्मारक मागे ठेवले आहे (पाहा- वराहमिहिर)–

> **विष्णोर्भागवतान् मगांश्च सवितुः शम्भोः सभस्मद्विजान् ।**
> **मातॄणामपि मण्डलक्रमविदो विप्रान् विदुर्ब्रह्मणः ॥**
> **शाक्यान् सर्वहितस्य शान्तमनसो नग्नान् जिनानां विदुः ।**
> **ये यं देवमुपाश्रिताः स्वविधिना तैस्तस्य कार्या क्रिया ॥** ६०.१९

येथे मग ब्राह्मण सूर्याची देवळे उभारीत आणि शक गणातील भक्त लोक सामान्यतः शाक्यमुनि गौतमबुद्धाच्या प्रतिमा उभ्या करण्यात विशेष दक्ष असत, या प्रथेची वराहमिहिराने नोंद घेतलेली आहे. शक जमातीचे मग हे ब्राह्मण होते ही गोष्ट सर्वविश्रुत आहे. उत्तर व पूर्व भारतात या मग ब्राह्मणांची वसति आजदेखील आढळते. भागलपूर विद्यापीठातील इतिहासाचे तज्ज्ञ डॉ. पञ्चानन्द मिश्र हे मग ब्राह्मण आहेत असे मला त्यांच्याकडूनच कळले. बन्धुवर्मन् याच्या शिलालेखातील पहिल्या तीन नमनश्लोकात भास्कर हाच या विश्वाचा निर्माता आणि पोषक आहे, तोच सर्व शक्तिमान् होय, असे भास्कर, सूर्याचे वर्णन करण्यात आलेले आहे (फ्लीट. पृ. ७९).

२.२ या शिलालेखात विणकर-संघ (प्रथितशिल्प श्रेणी) आणि बन्धुवर्मन् याचा औलिकर हा राजवंश हे दोन्ही एकाच वंशाचे आहेत, याच्या भरपूर खुणा उपलब्ध आहेत. ५ व्या श्लोकात असे म्हटले आहे की दशपुर येथे देशपार्थिव राज्य करीत आहे, म्हणून ही श्रेणी तिकडे आकर्षित झाली. देशपार्थिव याचा अर्थ स्व-देशपार्थिव असाच घेतला पाहिजे. म्हणजे या श्रेणीच्या देशातला हा राजा होता. आपल्या प्रजेशी बंधुत्वाने वागणाऱ्या बन्धुवर्माला, याच्यापुढे जाऊन, तो बन्धुप्रिय होता (पाहा श्लोक २६) असे वर्णिले आहे –

तस्यात्मजः स्थैर्यनयोपपन्नो
बन्धुप्रियो बन्धुरिव प्रजानाम्।
बंध्वर्त्तिहर्ता नृपबन्धुवर्मा
द्विड्दृप्तपक्षक्षपणैकदक्षः ॥ २६

तो बन्ध्वर्तिहर्ता म्हणजे बन्धुसम असलेल्या लोकांची संकटे तो दूर करीत होता. आपल्या मुलाशी ठेवावे असे वर्तन या राजाने या श्रेणीशी ठेविले होते.

अथ समेत्य निरन्तरसङ्गतै–
रहरहः प्रविजृम्भितसौहृदाः।
नृपतिभिस्सुतवत्प्रतिमानिताः
प्रमुदिता न्यवसन्त सुखं पुरे ॥ १५

मंदसौरला येण्यापूर्वीसुद्धा या श्रेणीला या राजवंशाबद्दल अतीव आदर असलेला दिसून येतो. ५ व्या श्लोकात या श्रेणीला **जातादराः** असे म्हटलेले आहे. हा पूर्वी वसत असलेला संबंध पुढे अधिक दृढ झाला (प्रविजृम्भितसौहृदाः). या गटाची एक वेगळी आणि विशिष्ट अशी वागणुकीची आणि वेशभूषेची धाटणी होती व हे सर्व त्यांच्या वंशाच्या आवश्यकतेनुसार होते (श्लोक १८)

वंशानुरूप–चरिताभरणस्तथान्ये।

२.३ मन्दसौर नगरात राहणाऱ्या या शक गटाच्या सुसंस्कृत व्यक्तींच्या सांस्कृतिक पातळी आणि त्यांचा दर्जा यांचेदेखील प्रस्तुत शिलालेखातून दर्शन होते. खालील श्लोक बोलके आहेत–

सत्यक्षमादमशमव्रतशौचधैर्य–
स्वाध्यायवृत्तविनयस्थितिबुध्युपेतैः।
विद्यातपोनिधिभिरस्मयितैश्च विप्रैः
यद्भ्राजते ग्रहगणैः खमिव प्रदीप्तैः ॥ १४

श्रवणसुभगे धानुर्व्वेदे दृढं परिनिष्ठिताः
सुचरितशतासङ्गाः केचिद्विचित्रकथाविदः ।
विनयनिभृताः सम्यग्धर्म्मप्रसङ्गपरायणाः
प्रियमपरुषं पत्थ्यं चान्ये क्षमा बहु भाषितुम् ॥ १६

पहिल्या श्लोकात शक गणाच्या सांस्कृतिक मार्गदर्शन करणाऱ्या वर्गाची सांस्कृतिक पातळी सांगितलेली आहे. दुसऱ्या श्लोकात शक गणातील क्षत्रिय वर्गाचे धनुर्विद्येतील, विशेषत: ध्वनिभेदकलेतील, नैपुण्य मोठ्या मार्मिकपणे वत्सभट्टीने वर्णिलेले आहे. या श्रेणीतील एक गट उत्तम कथा सांगणारा (कथाविदः) होता. ही गोष्ट मोठी लक्ष्य आहे. भविष्यमहापुराणात शक, मग, भोजक आणि तत्सम गटांचे अनेक उल्लेख विखुरलेले आहेत. या पुराणातील ब्राह्मपर्वाचा लेखनकाल साधारणतया शककाल ४०० ते ८०० असा मानण्यात येतो. या पुराणात कथाविद् या संज्ञेवरील भाष्य पाहायला सापडते. ब्राह्मपर्वातील २१० व्या अध्यायातील खालील श्लोक लक्ष्य आहेत.

रंगोपजीवी कथको यश्च प्राकृतनर्तकः ॥ ४०
यः स्तुतिं गायते विप्रःप्रोच्चैस्तु जनसंसदि ।
रंगोपजीवी प्रोक्तोऽयं द्वितीयः परिकीर्तितः ॥ ४२
सूचनं कथनं प्रोक्तं सर्वशास्त्रेषु भारत ।
सूचयेद्यस्तु ऋक्षाणि स वै नक्षत्रसूचकः ॥ ४३

या प्रश्नाची ही बाजू स्व. श्री. व्यं केतकर यांनी चांगली तपासलेली आहे (पाहा – केतकर पृ. २०४). येथील कथक संज्ञेची अधिक चर्चा देवनी मोरी प्रत्नलेखावरील दुसऱ्या एका लेखात केलेली आहे. रुद्रदामनाचा पौत्र असलेल्या रुद्रसेन प्रथमच्या शक १२७ च्या लेखात शक गटांच्या राजाला कथिक नृप म्हटलेले आहे. खालील आर्या पाहा (सरकार, पृ. ५१९)

सप्तविंशत्यधिके कथिकनृपाणां समागतेऽब्दशते ।
भाद्रपदपंचमदिने नृपतौ रुद्रसेने च ॥२

शिलालेखातील उपर्युद्धृत दुसऱ्या श्लोकातील **सम्यग्धर्मप्रसंगपरायण** हे विधान देखील बारकाईने पाहिले पाहिजे. कारण आपल्या धर्मातील रीतिरिवाजावर योग्य अमल करण्याची काळजी हा गट घेत होता, हे येथे दिसून येते. म्हणजे या लोकांच्या धार्मिक कल्पना, विधी, रीतिरिवाज काहीसे भिन्न होते, असे येथे सूचन होते. अशा प्रकारच्या सूचनांची प्रस्तुत सन्दर्भात नोंद घेणे अगदी रास्त आहे असे दिसते. १७ व्या श्लोकात **ज्योतिषं विज्ञायते** असे विधान केलेले आहे. या विधानाची

सत्यता या गोष्टीवरून दिसून येते की आदित्यदाससुत वराहमिहिर हा प्रसिद्ध ज्योतिःशास्त्रज्ञ याच शक गणांपैकी होता. (पाहा – ईराणी, पृ. ११५). शिवाय औलिकर राजवंशातील द्रव्यवर्धन हा, वराहमिहिराच्या सांगण्यानुसारच, ज्योतिर्ग्रंथलेखक होता असे आढळते (पाहा – वराहमिहिर).

> **भारद्वाजमतं दृष्ट्वा यच्च श्रीद्रव्यवर्धनः ।**
> **आवन्तिकः प्राह नृपो महाराजाधिराजकः ।८६·२**

या द्रव्यवर्धनाचा वराहमिहिर हा समकालीन होता.

या श्रेणीतील विद्वानांच्या साहित्यिक निर्मितीचा अंदाज आपणाला राविल, वासुल इत्यादि नावांवरून बांधता येतो. राविल हा औलिकर राजवंशातील प्रभाकर राजाच्या शिलालेखाची पूर्वा म्हणजे प्रशस्ति लिहिणारा लेखक आहे (पाहा-सरकार, पृ. ४०६). हा प्रभाकर बन्धुवर्मन् याचा मुलगा आणि राज्याचा उत्तराधिकारी आहे. वासुल हा कक्क याचा पुत्र असून त्याने यशोधर्मन् याच्या शिलालेखाची पूर्वा लिहिलेली आहे (पाहा- सरकार, पृ. ४१८). ही दोन्ही नावे, कक्कसुद्धा, भाषा-वैज्ञानिक दृष्टया, भारतीय परम्परेतून संस्कृतमूल आहेत, असे म्हणणे बरेच कठीण आहे. ही नावे परकीय वाटतात. हे दोघेही पूर्वालेखक, प्रसिद्ध वत्सभट्टी इतकेच, साहित्यगुणसंपन्न आहेत. वरील शिलालेखात साहित्यगुणांबद्दल मांडलेला दावा, एका दृष्टीने, योग्यच आहे असे म्हणावे लागते. शक श्रेणीत चांगली साहित्यगुणसंपन्न माणसे वावरत होती असे आढळते

२.४ या श्रेणीतील क्षत्रियवृत्तीच्या व्यक्तींच्या नैपुण्याचा उल्लेख यापूर्वी आलेलाच आहे. त्या श्रेणीतील असे लोक **समरगुणप्रगल्भ** (श्लोक १७), म्हणजे युद्धकलेत मोठे प्रवीण होते. शक राजाविषयी उत्कीर्ण लेख शक गणांचा हा विशेष नोंदविण्याच्या बाबतीत विशेष दक्ष असतात. शौर्याचा उल्लेख करण्यास हे विसरत नाहीत, असे दिसून येते. भारतीय प्रत्नलेखात पहिला म्हणता येईल अशा, प्रथम रुद्रदामन् याच्या शककाल ७२ च्या जुनागड येथील गिरिलेखातील उल्लेखाकडे लक्ष वेधता येईल. या लेखात असे दोन उल्लख आहेत (पाहा- सरकार, पृ. १७५)–

स्ववीर्य्यार्जितानामनुरक्त-सर्व्व– प्रकृतीनां

आणि

सर्व्वक्षत्राविष्कृत-वीर-शब्द- जातोत्सेकाविधेयानां
यौधेयानां प्रसह्योत्सादकेन दक्षिणापथ-पतेस्सातकर्णेर्द्विरपि नीर्व्याजमवजित्याव-जित्य......

वरील दोन विधानापैकी, दुसरे विधान अधिक महत्त्वपूर्ण आहे असे दिसून येते. कारण की या विधानातील '**सर्व्वक्षत्राविष्कृत-वीर-शब्द-जातोत्सेकाविधेयानां**' या दाव्यात सर्व जगातील क्षत्रियांना निष्प्रभ केल्याची कल्पना अंतर्भूत आहे. असा मनोदय रुद्रदामन् या शकगणाच्या महाक्षत्रपाने शक ७२ मध्ये व्यक्त केलेला आहे. मला असे वाटते की या विषयावरील ऐतिहासिक दृष्टया ज्ञात कालाचे हे सर्वप्रथम विधान होय. ही कल्पना मागाहून हिंदू विद्वानांनी उचलली आणि सहावा अवतार मानला गेलेल्या परशुरामादींच्या चरित्रातून तिला लोकप्रिय असे रूप प्राप्त झाले. परशुराम हा विष्णूचा अवतार असून त्याने एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली. शकनृपति श्रीधरवर्मा याच्या कानाखेरा प्रस्तरलेखात शकगणाच्या या राजाच्या शौर्यवीर्याबद्दल असाच जोर देण्यात आलेला आहे (पाहा-सरकार, पृ. १८६). येथे त्याचे **आदित्य-वीर्य्यार्ज्जित-विजय** असे वर्णन केले आहे. पुनश्च याच महाक्षत्रपाच्या एरण येथील प्रस्तरस्तम्भावरील लेखात तो **स्ववीर्य्यार्ज्जित-विजय** आहे असे म्हटले आहे (पाहा- मिराशी सर १.पृ. १५९). अशी आणखी उदाहरणे येथे नोंदण्याची गरज नाही. धनुर्विद्येतील प्रावीण्य आणि युद्धातील समरधीरता ही या श्रेणीची वैशिष्टये आहेत. यावरून हा गट शकवंशीय असावा असे वाटते.

मागाहून दिसून येणारे राजपूत, ज्यांची भारतात आता एक वेगळी जात बनलेली आहे, हे शतकानुशतकांच्या कालौघात क्षत्रियवर्णात समाविष्ट झालेले परदेशी गट असावेत, असे मत भांडारकरादि विद्वानांनी व्यक्त केलेले आहे (पाहा- भाण्डारकर, खण्ड २, पृ. ६५६). औलिकर हा राजवंश, शकगणांच्या भारतीय क्षत्रियवर्णात हिंदू म्हणून समाविष्ट होण्याच्या प्रक्रियेतील एक पायरी असणे संभवनीय आहे, असे वाटते.

चर्च्य शिलालेखातील **प्रथित-शिल्प** (श्लोक४) या संज्ञेचा अधिक विस्तार वत्सभट्टीने खालील श्लोकात केलेला आहे :

तारुण्यकान्त्युपचितोऽपि सुवर्णहार–
ताम्बूलपुष्पविधिना समलङ्कृतोऽपि –
नारीजनः प्रियमुपैति न तावदश्र्यां
यावन्नपट्टमयवस्त्रयुगानि धत्ते ॥२०
स्पर्शवता वर्णान्तरविभागचित्रेण नेत्रसुभगेन ।
यैः सकलमिदं क्षितितलमलङ्कृतं पट्टवस्त्रेण ॥२१

येथे " धत्ते " शब्दाचा फ्लीट याने " वापरणे, अंगात घालणे " असा अर्थ केलेला आहे. परंतु तो योग्य दिसत नाही. या शब्दाचा वास्तव अर्थ 'तयार करणे, बनविणे' असा असून तो ऋग्वेदकालातही या अर्थाने उपयोगात होता. लेखकाला

स्त्रीवर्गाच्या आपल्या विणकाम कार्यातील चिकाटी आणि सततोद्योगाचे वर्णन करावयाचे आहे. त्यामुळे या भागात त्यांच्या विणलेल्या कपड्यांची विपुलता झालेली होती. जरी भिन्न भिन्न अवस्थात असल्या तरी या युवतींनी आपल्या कामाकडे दुर्लक्ष केले नाही. या गटाच्या विणकाम उद्योगामुळे, या भागात लोकांना सुंदर व भरपूर कपडे मिळत असत. या गटातील महिलांचाच हा विणकाम धंदा होता असे दिसते. पुरुषवर्गाने इतर भिन्न भिन्न उद्योगांचा (शिल्प) अवलंब केलला असावा. काही उद्योगांचा वरती उल्लेख आलेलाच आहे.

२.५ यशोधर्मन् ऊर्फ विष्णुवर्धन याच्या मंदसौर येथील शिलालेखात त्याच्या राजवंशाचे नांव औलिकर असे देण्यात आलेले आहे. आपण या राजघराण्याची काही माहिती देऊ शकत नाही असे फ्लीट याने म्हटलेले आहे (फ्लीट, पृ. १५१, टीप ४). या राजवंशातील राजांना वंशकृत–वंशवृद्धि करणारे (**वंशकृतां नृपाणाम्**, श्लोक १०) असे म्हटलेले आहे. या लेखाचा मुख्य उद्देश, षष्ठिदत्त याच्या वंशातील झालेल्या मुख्य प्रधानांची कर्तबगारी वर्णन करून सांगण्याचा आहे. षष्ठिदत्त स्वतः ही असा मुख्य प्रधान होता. त्याचा पुत्र व उत्तराधिकारी वराहदास हा होता. आलंकारिक भाषेंत याला रविकीर्ति असे म्हटलेले आहे (श्लो. १३). फ्लीटने रविकीर्ति ही स्वतंत्र व्यक्ती आहे असे प्रतिपादिले आहे. परंतु हे योग्य दिसत नाही. त्याने या रविकीर्तीला ब्राह्मण म्हटलेले आहे, हेही अनावश्यक आहे. ही कल्पना योग्य नव्हे. ब्राह्मण पुरुषाशी क्षत्रियकुलातील स्त्रियांची लग्ने होण्याच्या प्रथेवरील त्याची टीपही अनावश्यक आहे. रविकीर्ति म्हणजे सूर्याच्या कीर्तीचा असा या शब्दाचा अर्थ घेणे हेच योग्य आहे. वराहदत्ताच्या पत्नीचे नांव भानुगुप्ता असे आहे. (श्लो. १५). याला पोषक अलंकारिक असे वर्णन कवीने रविकीर्ति शब्दाने साधलेले आहे. कारण रविकीर्तीचा सर्व वर्णनात पुढे कोठेच पत्ता नाही. भानुगुप्ता ही रविकीर्तीची राणी मानल्यास वराहदास तसाच लोंबकळत राहातो. वराहदास व भानुगुप्ता ही नामे इराणी प्रभावाची स्मारक आहेत. अशावेळी रविकीर्ति हे वराहदासाचे विशेषण घेणे हेच योग्य आहे. भानुगुप्ता हिला भगवद्दोष, अभयदत्त आणि दोषकुंभ असे तीन पुत्र झाले. पहिल्या दोघांनी, एकामागून एक, मंत्री म्हणून काम केले. अगोदरच मृत झालेल्या दोषकुंभाचा थोरला मुलगा धर्मदोष हा विक्रम संवत् ५८९ मध्ये (शक ४५४) मंत्री आहे. या धर्मदोषाचा धाकटा भाऊ दक्ष ऊर्फ निर्दोष नामे होता. येथेसुद्धा फ्लीटचा घोटाळा झालेला आहे. त्याने निर्दोष (निरागस) असे विशेषण मानले आहे. हेही योग्य नव्हे. कारण श्लोक २२ मध्ये निर्दोष–नामा आणि श्लोक २८ मध्ये निर्दोषोऽयं असे व्यक्तिदर्शक उल्लेख आलेले आहेत. शेवटल्या श्लोकात हा निर्दोष धर्माचे रक्षण करो अशी आशा व्यक्त केलेली आहे.

या लेखातील विशेषनामे वराहदास, भानुगुप्ता, भगवद्दोष, दोषकुम्भ, धर्मदोष आणि निर्दोष ही विशेषपणें लक्ष्य आहेत. वराह आणि भानु हे शब्द ईराणी आर्य लोकांत विशेष लोकप्रिय व आदरणीय आहेत. फार्सी भाषेत सं. वराह शब्दाचे रूप वराज़ असे असून या पदाने युक्त अनेक व्यक्ति नामे रूढ आहेत. ही नावे इस्लामपूर्व काळात जास्त लोकरूढ होती. भानुगुप्ता हा शब्द सूर्याशी संलग्न असून भानु हे शक लोकांचे उपास्य दैवत आहे. वरील विशेष नामात आलेला दोष हा शब्दही लक्ष्य आहे. फ्लीटने याचा अर्थ गुन्हा, अपराध, चूक असा केलेला आहे. हेही युक्तिसंगत नव्हे. हा अर्थ घेतला तर धर्मदोष हे एका उच्चकुलीन मंत्र्याचे नाव असू शकणे, कल्पनाशक्ती कितीही ताणली तरी, शक्य दिसत नाही. हेच म्हणणे भगवद्दोष आणि दोषकुम्भ या नावाला लागू होते. संस्कृत भाषेतील दोस् (खांदा, आधार) हा शब्द फार्सी भाषेतही नित्याने रूढ आहे. तेथे त्याचा अर्थ **खांदा अथवा सहाय, आधार असा आहे. चूक, अपराध या अर्थी फार्सीत हा शब्द** नाही वरील विशेष नामांकडे, दोष शब्दाचा नवीन किंवा वेगळा अर्थ लक्षात घेऊन पाहिले म्हणजे वरील सर्व नामांचे अर्थ सरळच लागतात. ही नावे विशेषार्थवाही बनतात, ती सार्थ ठरतात. या शब्दातून त्या लोकांची संस्कृतिही प्रतिबिम्बित होते. या वेळी निर्दोष शब्दातही काही अडचण येत नाही. कारण निस् या उपसर्गाचा वैपुल्य असाही अर्थ आहे. हाच अर्थ निःक्षेप, निःश्वास इत्यादि शब्दात अध्याहृत आहे. म्हणून येथे निर्दोष शब्दाचा अर्थ 'भरपूर आधाराचा, केवलाधार' असा होईल. पाणिनीने दोस् या शब्दाचे समानार्थी वैकल्पिक रूप दोषन् असेही दिलेले आहे (पहा – कत्रे, पृ. ३०९). भारतातील व्यक्तिवाचक विशेष नामात, एक घटक म्हणून दोष हा शब्द कधीही वापरात येत नाही. आर्यभारतीय भाषांत, विशेषनामाचे अंग म्हणून, हा शब्द, अपवादरूपानेही, आढळत नाही. या चर्चेवरून ही नामे ईराणी बनावटीची आहेत, निदान ती निर्भेळ भारतीय परम्परेतील नव्हेत, असा निष्कर्ष काढणे अपरिहार्य आहे.

२.६ या शिलालेखांत वापरलेल्या काही संज्ञा आणि विधानांकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे. मन्दसौर आणि उज्जयिनी येथून राज्य चालविणाऱ्या औलिकर राजवंश आणि शकवंशीय इतर क्षत्रप महाक्षत्रपांनी अरावली आणि विन्ध्य या पर्वतराजींनी व्यापलेल्या प्रदेशावर आपली सत्ता नेहमी चालविलेली होती, असे दिसून येते. श्लोक ९ मधील **विन्ध्याद्रि–रन्ध्रैर्बलैः उद्धूतेन रजसा** या विधानाने वरील वस्तुस्थिती स्पष्ट होते. दुसरे विधान असे-श्लोक चौदामध्ये–**'न विसंव्वादिता येन कलावपि कुलीनता'** कलियुगामध्ये देखील त्याने आपल्या कुलीनतेला विसंवादित्व येऊ दिले नाही, असे बहुमानाचे वर्तन वराहदासाने ठेवले होते, असे वर्णिले आहे. येथे लेखकाला काय म्हणायचे आहे, हे स्पष्ट नाही. परंतु राज्यकर्ता

आणि त्याचे मंत्री या देशात परकीय होते, भिन्न वंश व संस्कृतीचे होते, ही गोष्ट ध्यानी घेतली तर वरील विधानाचा अर्थ लावणे सोपे जाते. हे **राज्यकर्ते परकीय व भिन्न असल्यामुळे आणि येथील भिन्न संस्कृतीच्या लोकात वावरत असल्यामुळे हा शक गण आपल्या सांस्कृतिक परंपरांचे रक्षण करण्याचा प्रयत्न करीत असणार हे उघड आहे.** ही परम्परा वराहदासाने योग्य रीतीने पाळली म्हणून या श्लोकात समाधान व्यक्त केलेले आहे, शाबासकी दिलेली आहे. **कलियुगामध्ये वावरत असूनसुद्धा वराहदासाने आपल्या कुलाच्या परंपरेला अविसंवादी वागणूक ठेवली हे त्याचे वैशिष्टच.** प्रथम चर्चिलेल्या बन्धुवर्मन्प्रमाणेच भगवद्दोष हा आपल्या भाऊबंदांचा केवलाधार होता, स्वजातीयांचा तो आधार होता असे वर्णन आलेले आहे. या शिलालेखातही आपल्या गटाच्या शौर्यवीर्यादी वैशिष्टयाला महत्त्व देण्याच्या शक गणांच्या विशेषतेचा उल्लेख करण्यात आलेला आहे. **भुजविजितभुवा** असे यशोधर्मन् याचे वर्णन करण्यात आले आहे (पाहा श्लोक ८). शिवाय श्लोक १९ मध्ये अभयदत्त हा '**सुरगुरुरिव यो वर्ण्णिनां भूतयेऽपात्** – आपल्या स्ववर्णीयांना सुरगुरूप्रमाणे होता, स्ववर्णीयांचा त्याच्यामुळे उत्कर्ष घडून आला आहे असे वर्णिले आहे. वर्णी म्हणजे आपल्या जातीचा, आपल्या वंशाचा असा अर्थ प्राचीन काळापासून रूढ आहे (पाहा – कत्रे, पृ. ५०२, वर्णिन्).

२·७ शवटी धर्मदोष या प्रधानाच्या धाकट्या भावाच्या, दक्ष ऊर्फ निर्दोष याच्या सैन्याची बनावट (काम्पोझिशन) आणि त्याचे स्वरूप विचारात घेण्यासारखे आहे. दक्षाच्या सैन्याची रचना अशी होती (श्लोक २२) –

उपहित-हित-रक्षामण्डनो जाति-रत्नैः ।
भुज इव पृथुलांसस्तस्य पक्षः कनीयान् ।।

त्याचे अखिल सैन्य **जाति-रत्नैः** अशा सैनिकांचे बनलेले होते. आपल्या राज्याच्या रक्षणासाठी औलिकर राजांना स्थानिक सैनिकांवर व त्याच्या तशाच सेनाधिकाऱ्यावर विसंबून राहता येत नव्हते, ही वस्तुस्थिती ध्यानी घेतल्यावरच **जातिरत्न** या संज्ञेचे वैशिष्टय ध्यानी येईल. अलीकडे, मध्ययुगीन इतिहासा-शोधनाच्या विद्वानांच्या सततोद्यागामुळे, ही गोष्ट आता स्पष्ट झालेली आहे की मुगल साम्राज्याच्या दोन शतकांच्या प्रदीर्घ कालावधीत, लहानमोठ्या हिंदू सेना-धिकाऱ्यांची संख्या एक चतुर्थांशापेक्षा कधीही वाढू शकली नाही (पाहा-अतहर अलीचा प्रबंध). जलालूद्दीन अकबर या सहिष्णु सम्राटाच्या राजवटीत तर ती संख्या अधिकच कमी होती. शिवाय इतिहासातील ही घटनाही विशेष लक्ष्य आहे. मराठा देशातील छत्रपति शिवाजीचे पारिपत्य करण्यासाठी मुगल सम्राट औरंगजेबाने मिर्झा राजा जयसिंग याची, अवाढव्य सेनासागर आणि भरपूर द्रव्यादि साधनांनिशी, दक्षिणेत

रवानगी केली. तेव्हा सम्राटाला केवळ जयसिंगावरच विसंबून राहाता आलेले नाही. तसे करणे त्याला योग्य वाटले नाही. त्याने दिलेरखान या पठान सेनापतीला त्याच्या बरोबर ५००० पठानांची विशेष सेना देऊन जयसिंगाबरोबर पाठविले. हिंदू असलेल्या शिवाजीबरोबर जयसिंगाचे काय धोरण राहाते, पावले कशी पडतात या गोष्टीवर विशेष बारकाईने त्याने लक्ष ठेवावे असा गुप्त आदेश औरंगजेबाने त्याला दिलेला होता, हीही गोष्ट इतिहासात नमूद झालेली आहे (पाहा–जोशी, पृ. ३३). अशा संदर्भात औलिकरवंशीय राजांनी आपल्या सैन्याची सूत्रे आपल्या जातिरत्न अशा सेनाधिकाऱ्यांकडे ठेविली होती, याचा अर्थ लागतो. २५ मार्च १९७१ पासून पाकिस्तान आणि बांगला देश यांच्या संघर्षातही या ऐतिहासिक सत्याचे भरपूर दर्शन झालेले आहे.

३.१ सौराष्ट्र (गिरिनगर, गिरनार), उत्तर गुजरात (अन्धौ व देवनी मोरी), मालवा (एरण < एरिकिण, ऐरिकिण, दशपुर-मंदसौर, उज्जिनिनी), राजस्थान, हरियाना (हरीआण) आणि पंजाब या प्रदेशात शक गणांचे पुरातत्त्वीय अवशेष विशेष प्रमाणात सापडतात, ही गोष्ट विचारणीय आहे. पारियात्र (विंध्य पर्वतराजीचा पश्चिम भाग) हा विंध्य व अरावली पर्वतांचा प्रदेश समजण्यात येतो. परंतु या भागाला पारियात्र हे नाव का व कसे पडले याच्यावर आतापर्यंत प्रकाश पडलेला नाही. हा शब्द पाणिनीत नाही. परंतु तो महाभारतात आहे. यशोधर्मन् याच्या मंदसौर शिलालेखात अभयदत्ताचे असे वर्णन आहे (पाहा– सरकार, पृ. ४१५)–

विन्ध्यस्यावन्ध्य-कर्म्मा शिखर-तट-पतत्पाण्डु-रेवाम्बुराशे–
र्ग्गोलाङ्गूलैःसहेलप्लुतिनमिततरोः पारियात्रस्य चाद्रेः।
आसिन्धोरन्तरालं निज-शुचि-सचिवाद्ध्यासितानेक-देशं
राजस्थानीय-वृत्त्या सुरगुरुरिव यो वर्ण्णिनां भूतयेऽपात् ॥ १९

येथे औलिकरांचा राजस्थानीय व्हाइस-राय असलेला अभयदत्त विन्ध्य पर्वतराजींच्या प्रदेशात अवन्ध्य–अजेय, अजिंक्य होता असे वर्णिले आहे. त्याची सत्ता समुद्रापर्यंत चालत होती. त्याने शेजारील अनेक प्रदेश व्यापलेले होते. इसवीपूर्व पहिल्या शतकापासून या प्रदेशावर शक गणाचे वर्चस्व दिसून येते. चष्टन, रुद्रदामन् यांच्या राजवंशाच्या चलतीच्या काळात हा प्रदेश त्यांच्या वर्चस्वात नांदत होता. या प्रदेशावरील शकगणाच्या यशस्वी परियात्रेमुळेच (यशस्वी आक्रमण) या प्रदेशाला पारियात्र असे नामभिधान मिळणे शक्य आहे. परंतु याला अधिक पुराव्याची गरज आहे.

३·२ वरील भारतीय प्रदेशाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की येथील प्रत्नलेख साहित्यात ईराणीभाषोत्पन्न व्यक्तिनामांची रेलचेल आहे. मिहिरवर्म (सरकार पृ.३८९), पुस्तपाल (सरकार पृ. २९२, २९३, ३७७), षाहानुषाही-शक-मुरुण्ड (पृ. २६६), कुलैप, पह्लव (पृ. १८०), तुषास्फ (पृ. १७७), तिवर्ष-अस्प (पृ. २४५), वराहदिन्न (पृ. ३९३) इत्यादि (पाहा-सरकार, वरील पृष्ठे). रविल आणि वासुल यांचा उल्लेख वरती करण्यात आलेला आहेच. दिविरपति हा, राजाने निर्माण करावयाच्या प्रत्नलेखांचा प्रवर्तक अधिकारी होय. या शब्दाचा भारतीय प्रत्नलेखात अनेकवेळा वापर झालेला आढळतो. ही सर्व व्यक्तिनामे अभारतीय होत. ही नावे ईराणीभाषोद्गत अशी आहेत. म्हणून या सर्व प्रदेशात लोकसमूहातील शक गणाच्या मोठ्या प्रमाणाचा संकेत होतो.

३.३ चर्च्य प्रदेशातील लोकसमूहात शकगणांची संख्या आणि त्यांच्यामुळे अस्तित्वात आलेली प्राकृतची उपबोली पैशाची यांच्या अस्तित्वाचा सुगावा महाकवी राजशेखर याच्या काव्यमीमांसेमधून पाहावला मिळतो. राजशेखराचा काल शक-काल ८२२ ते ८७२ मानण्यात येतो. या महाकवीच्या जीवनकालात पैशाची भाषा बोलली जात होती व ती साहित्यनिर्मितीची वाहकदेखील होती, असे आढळते. राजशेखराचा हा श्लोक पाहा (पाहा-राजशेखर, पृ. १२८)

एकोऽर्थः संस्कृतोक्त्या स सुकविरचनः प्राकृतेनापरोऽस्मिन्
अन्योऽपभ्रंशगीर्भिः किमपरमपरो भूतभाषाक्रमेण ।
द्वित्राभिः कोऽपि वाग्भिर्भवति चतसृभिः किञ्च कश्चिद्विवेक्तुं
यस्येत्थं धीः प्रपन्ना स्नपयति सुकवेस्तस्य कीर्त्तिर्जगन्ति ॥

काही तुटक तुटक उतारे व वाक्ये यांशिवाय पैशाची म्हणजेच भूतभाषेचे काही साहित्य उपलब्ध नाही. परंतु राजशेखरच्या वरील पुराव्यावरून अशी कल्पना येते की त्याच्या, किंवा त्याच्यापूर्वी जवळच्या, काळात पैशाची भाषेत रचना होत होती. राजशेखरानंतर साधारणतः दोन शतकांनी झालेल्या हेमचन्द्रसूरीने पैशाची व्याकरणाची चर्चा केलेली आहे. काव्य कसे वाचावे हे सांगताना राजशेखराने भूतभाषावाचनासंबंधी असा उल्लेख केला आहे (पाहा–राजशेखर, पृ. ८८).

संस्कृतमपभ्रंशं लालित्यालिङ्गितं पठेत् ।
प्राकृतं भूतभाषां च सौष्ठवोत्तरमुद्गिरेत् ॥

भूतभाषेचे वाचन सौष्ठवयुक्त रीतीने व्हावे असे तो म्हणतो.

३.४ पैशाची भाषा प्रामुख्याने कोणत्या प्रदेशात वावरत होती याचाही उल्लेख राजशेखराने, अप्रत्यक्ष रीत्या का होईना, परंतु केलेला आहे (पाहा–राजशेखर पृ. १३३).

गोडाद्या : संस्कृतज्ञाः परिचितरुचयः प्राकृते लाटदेश्याः
सापभ्रंशप्रयोगाः सकलमरुभुवष्टक्कभादानकाश्च ।
आवन्त्याः पारियात्राः सह दशपुरजैर्भूतभाषां भजन्ते
यो मध्ये मध्यदेशं निवसति स कविःसर्वभाषानिषण्णः ॥

कोणकोणत्या प्रदेशात कोणत्या भाषेचा जास्त रिवाज आहे याचा येथे राजशेखराने उल्लेख केलेला आहे. गौडदेशात संस्कृत, लाट देशात प्राकृत, समग्र राजस्थान, टक्क म्हणजे पंजाब आणि भादानकात अपभ्रंश, आणि आवन्ती, पारियात्र आणि मंदसौर-लग्न प्रदेश येथे भूतभाषा म्हणजे पैशाची, विशेष रूढ आहेत, असे त्याचे म्हणणे आहे. राजशेखराने येथे पैशाची भाषेच्या प्रभावक्षेत्राचा केलेला उल्लेख अत्यन्त महत्त्वपूर्ण आहे. एरण, दशपुर, अवन्ती जनपद आणि पारियात्र या प्रदेशातील शक गणाच्या दीर्घकालीन–सामान्यपणे एक सहस्रक, संपर्कामुळे या प्रदेशात पैशाची भाषेने मूळ धरलेले होते ही गोष्ट स्पष्ट होते. ग्रियर्सन याने दरद भाषा म्हणून वर्णिलेल्या भाषा, वस्तुतः पैशाची भाषा होत व ही संज्ञा तिरस्कारार्ह बनल्याने आपण दरदीय भाषा ही संज्ञा वापरीत आहो, हे स्पष्ट केलेले आहे. हा भाषासमूह पामीर टापू, उत्तर व पूर्व अफगाणिस्तान आणि काश्मीर प्रदेशात वावरत आहे. पैशाची भाषेचा प्रभाव शक गणाच्या माध्यमाने आवन्त्यादि प्रदेशात पोचला. चष्टण आणि नहपान या राजवंशाची सत्ता या भागात तीन शतके कमीअधिक प्रमाणात चालली. मुख्य केन्द्र एरण, मन्दसौर येथे असले तरी ती सत्ता गिरनार, म्हणजे आजचे जुनागड पर्यंत चालू होती. या वरील दोन इतिहासप्रसिद्ध शकवंशा-बरोबर औलिकर राजवंशाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. या वंशाचे सर्वप्रथम राज्यवर्ष शक ३२३असून शेवटचे शक ४५४ वर्ष आहे. अशा प्रकारे हा राजवंश या भागात सुमारे दीडशे वर्षे राज्य करीत होता, असे समजणे तर्कसंगत होईल.

मुम्बई, वैशाख २२, १८९१. (भा. इ. सं. मंडळ, पुणे शक १८९० मध्ये वाचलेल्या निबंधाचा अनुवाद)

संक्षेप आणि सन्दर्भ

अतहर – **भारतीय इतिहास काँग्रेस**, प्रयाग १९६५, इतिवृत्त, अतहरअली–औरंगजेबाचे सूबेदार

ईरानी – **दीनशाह ईरानी स्मारक ग्रंथ** (इंग्रजी-फार्सी), मुंबई, १९४३

कत्रे – **डिक्शनरी ऑफ पाणिनि** – सु. मं. कत्रे, डेक्कन कॉलेज, पुणे, १९६८

केतकर – **प्राचीन महाराष्ट्र** – श्री. व्यं. केतकर, पुणे, शक १८५६

जोशी – सभासदकृत **शिवाजी बखर** : शं. ना. जोशी, पुणे, शक १८८२

फ्लीट – **कॉर्पस इन्स्क्रिप्शनम् इण्डिकारम्**, खण्ड ३, फ्लीट, वाराणसी, १९६३

भविष्य – **भविष्य महापुराण** – वेङ्कटेश्वर प्रेस मुंबई शक १८७१

भाण्डारकर – **सिलेक्टेड वर्क्स ऑफ भाण्डारकर**, खण्ड २, पुणे, १९२८

मिराशी – **संशोधन मुक्तावली**, खण्ड ३, वा. वि. मिराशी, नागपूर १९५८

राजशेखर – राजशेखरकृत **काव्यमीमांसा**, चौखंबा, वाराणसी शक १८८६

वराहमिहिर – वराहमिहिरकृत **बृहत्संहिता** चौखंबा, वाराणसी शक १८९०

सरकार – **सिलेक्ट इन्स्क्रिप्शन्स्** : दीनेशचंद्र सरकार, कलकत्ता १९६५

स्टीनगास – पर्सियन-इंग्लिश डिक्शनरी, स्टीनगास, लंदन, १९५७.

✦ ✦ ✦

११ : जऊब्ल, ज़ाबूल आणि प्लक्षा

तोरमाण षाहि (साधारणतः शक ४२२ ते ४३७) याच्या कुरा येथील प्रस्तरलेखात तोरमाण या तथाकथित हूण वंशातील राजाचे खालील दोन उल्लेख प्राप्त आहेत (पाहा संक्षेप सरकार, पृ. ४२२).

(१) [राजाधि] राज-महाराज-तोरमाण-षा-[हि] – जऊ [व्लस्याभिवर्धं] [मान-राज्ये] ....

आणि

(२) तोरमाण-षाहि-जऊव्लस्य ....

डॉ. सरकार यांनी तळटीपेत तोरमाण संबंधी असे म्हटले आहे, "ज्या अर्थी या राजाला एक जऊब्ल (जे एक सरंजामी किंवा वांशिक नाम आहे असे समजण्यात येते) म्हणून संबोधण्यात आले आहे, त्यावरून बुहलर आणि कीलहॉर्न यांचा कल, तो मिहिरकुल याचा बाप आहे, असे ओळखण्याकडे नव्हता. तरी पण हे लिखाण इ. स. च्या चौथ्या वा पाचव्या शतकाविषयी आहे. असे त्यांनी मान्य केलेले आहे. ही ओळख मान्य करण्यात काही असंभाव्यता आहे असे मला वाटत नाही. .... तोरमाण हा शब्द तुर्की शब्द तोरमान्, तूरमान् किंवा तोरेमान असून त्याचा अर्थ बंडखोर किंवा विद्रोही असा आहे असे सांगण्यात आलेले आहे. जऊव्ल हा शब्द तुर्की 'ज्व्ल्' म्हणजे बहिरी ससाणा या शब्दाशी जोडण्यात आला आहे."

येथे जऊब्ल हे नाम अफगाणिस्तानातील ज़ाबूलिस्तान या प्रदेशाच्या शेजारी असलेल्या सीस्तान, सइस्तान अथवा शकस्थान या प्रदेशातील प्राचीन ज़ाबूल किंवा ज़ाबोल नगराशी संबंधित आहे असे दाखविण्याचा आमचा मानस आहे. शकस्थान हे ईराणी शकवंशीय गटाची मायभूमि होती हे ऐतिहासिक सत्य सर्वमान्य आहे. ज़ाबूलिस्तान आणि सइस्तान यांच्या सीमा, सुदीर्घ भूतकालात कसकशा होत्या हे, सध्याच्या उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक साधनांवरून, निश्चित करणे फारच कठीण काम आहे. नकाशावरून ज़ाबूल गावाचे स्थान ६१° ४५' पूर्व आणि ३१° १५' उत्तर आहे असे आढळते. हे स्थान सध्या एक छोटेसे ग्राम असून त्याची जनसंख्या काही हजार आहे. हा गाव समुद्रसपाटीपासून १७४५ फूट उंचीवर असून तो हामून-ई हलमंदच्या परिसरात वसलेला आहे.

जऊब्ल हे एका स्थानाचे वा देशाचे नाम असावे आणि जउब्ल आणि ज़ाबूल यांचे एकवस्तुत्व सिद्ध करता येण्यासारखे आहे. जऊब्ल याचा अर्थ, एक सरंजामी

पदवी किंवा वंशवाचक नाव असा घेणे केवळ कल्पनेवर आधारलेले असल्याने निरुपयोगी ठरते. त्याला कसलाही ऐतिहासिक आधार अथवा पुरावा नाही. उपरिनिर्दिष्ट प्रस्तरलेखातील जऊब्ल हे वरील ज़ाबूलच होय असे दाखविण्याचा येथे प्रयत्न आहे. तोरमाण याला शाह, षाह ही उपाधि होती, त्याला षाहि-जऊब्ल असे लेखात संबोधण्यात आले आहे; याचा अर्थ तो जऊब्ल म्हणजे ज़ाबूल नगर वा देशाचा राजा होता. या शब्दांच्या भाषावैज्ञानिक अंगाचा पुढे विचार होणार आहे.

अफगाणिस्तानातील ग़ज़ना या स्थानाचे प्राचीनत्व वर्णन करीत असताना अलेस्सिओ बोम्बाची यांनी प्राचीन काबूल नगराला, ईराण, भारत वाणि मध्य आशियातून येणाऱ्या वेगवेगळ्या व्यापारी राजमार्गांची चर्चा केली आहे. (पाहा संक्षेप-बोम्बाची, पृ. २४७). ईराण देशाच्या नगरातून काबूलला येण्यासाठी दोन मार्ग होते, एक वायव्येकडून बल्ख-बाक्ट्रियामधून आणि दुसरा अफगाणिस्तानच्या नेर्ऋत्येकडून-द्रांगियाना आणि अर्कोसियामधून. हा मार्ग हलमंद व अर्गंदाब या नद्यांच्या खोऱ्यांतून ग़ज़ना मार्गाने जातो. हा दक्षिणी मार्ग ज़ाबूलिस्तान, सइस्तान अथवा अवेस्ता साहित्यातील द्रांगियाना या देशाची राजधानी असलेल्या ज़ाबूल नगरातून जात असे. या विद्वान लेखकाने आग्रहपूर्वक असे म्हटले आहे की, "आमच्या काल-गणनेच्या चौथ्या शतकापासून, प्राचीन कालापासून **अर्कोसिया** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भूप्रदेशाला, पहलवी, भारतीय, चिनी आणि अरबी भाषांत लिहिल्या गेलेल्या नाणी आणि प्रत्नलेखात **ज़ाबूल** किंवा ज़ाबूलिस्तान असे नामाभिधान प्रयोजिलेले आढळते. (इस्लामी साधनांतून हेच नाव सर्वत्र वापरलेले आहे). या संज्ञेच्या सुद्धा भौगोलिक सीमा अनिश्चित स्वरूपाच्या व नेहमी बदलणाऱ्या होत्या असे आढळते." लेखकाने पुढे असे प्रतिपादिले आहे की, "हफ्थालाइट या गटाच्या उदयापूर्वी आम्हाला चर्च्य असलेल्या ग़ज़ना या प्रदेशाला स्वतंत्र असे राजकीय अस्तित्व प्राप्त झालेले नव्हते. ज़ाबूल हा प्रदेश बाक्ट्रियामधून राज्य चालविणाऱ्या हफ्थालाइट गटाच्या सत्तेखाली होता. ज़ाबूलच्या सत्तेखाली गजना या विभागाची, महत्त्वाचे राज्य होते म्हणून जाबूलिस्तान अशी संज्ञा रूढ झाली. तोरमान (साधारणतः श ४१२ ते ४३६) आणि त्याचा पुत्र मिहिरकुल (साधारणतः शक ४३६ ते ४६६) या दोन राजांनी भारताचा बराच भाग जिंकलेला होता. या दोघांनी विशेषतः दुसऱ्याने अनन्वित जुलूम केल्याचा आणि अमाप द्रव्यलालसा दाखविल्याचा इतिहास सापडतो. या जुलमाला बौद्धधर्मीय बळी पडले असे बौद्ध साधनांवरून कळून येते." शककालाच्या तिसऱ्या शतकाच्या आरम्भी, या राजांचे राज्य ज़ाबूल येथे चालू होते असे, गीर्ष्मन् याच्या लेखांवरूनही आढळन येते.

उपरोक्त कालखण्डात ज़ाबूल आणि बाक्ट्रिया म्हणजे बहुतेक सर्व अफगाणिस्तानात शक गणांचे राज्य होते असे स्व. डॉ सईद नफीसी यांनी वर्णिले आहे (पाहा नफीसी पृ. ६८). या गटांना ग्रीक लेखकांनी सिथियन किंवा सक असे नाव दिलेले असून, चिनी इतिहासात त्यांचा उल्लेख यूह-चिह असा केलेला आढळतो. हे गण बौद्धधर्मीय होते. त्यांचे बाक्ट्रिया प्रदेशावर राज्य होते. त्यांच्या एका गटाची मजल युरोप व इटालीपर्यंत पोचली होती. याच गणांना इस्लामी अरब आणि ईराणी लेखकांनी तुर्क असे म्हटले आहे. परंतु याच काळातील या गणांना अरबी व ईराणी लेखकांनी एकदम व विशेष कारण नसता हयतला किंवा या शब्दाचे अरबी अनेक वचन हयातिला असे संबोधण्यास सुरुवात केली. तसेच आशिया मायनरच्या इतिहासलेखकांनी यांना हफताल किंवा हफ्तालाइट असे म्हटले आहे. याच लोकांना हूण असेही म्हटलेले आहे. कास्पियन समुद्राच्या पश्चिमेकडे वावरणाऱ्या यांच्या गटाहून भिन्नता दाखविण्यासाठी, बाक्ट्रिया, येथे असणाऱ्या पूर्वेकडील गटांना श्वेत हूण अशी संज्ञाही वापरण्यात आलेली आहे. काबूल, अफगाणिस्तानचे एक पुरातत्त्वकोविद व भाषाशास्त्री डॉ. अब्दुल-हय्य् हबीबी यांनी असे प्रतिपादिले आहे की हफ्तालाईट, हप्ताल, हफ्ताल व अब्दाल, एकच असून तेच श्वेत हूण होत (पाहा पादटीपा पृ. ३१ आणि १०१). या प्रश्नाची अधिक चर्चा डॉ. हबीबी यांनी आपल्या पष्तो आणि गजना प्रदेशाचा लवीक राजवंश (काबूल, १३४१ सौर हिजरी– इ. १९६२) या आपल्या ग्रंथात केलेली आहे.

तोरमाण आणि त्याचा पुत्र मिहिरकुल हे अफगाणिस्थान या देशातील हफ्तालाइट राजे इस्लामच्या उदयापूर्वीच्या शतकात प्रबल होते व त्यांचे राज्य भारतात पसरलेले होते. हे हफ्तालाइट आर्यवंशीय अफगाण लोक होते व त्यांचे मूळ राज्य बाक्ट्रिया प्रदेशात होते असा निर्वाळा बोस्वर्थ यांनी दिलेला आहे (पहा बोस्वर्थ, पृ. ३४). ते तुर्कवंशीय होते असे अरबांचे व त्यावर आधारलेले आधुनिक विद्वानांचे मत त्यांनी त्याज्य ठरविले आहे.

बी. डी. मीरचन्दानी (पाहा मीरचंदानी, पृ ६१ आदि) यांनी, सिंध देशाच्या प्राचीन इतिहासाचा मागोवा घेतांना, ज़ाबूल या संज्ञेची चर्चा केलेली आहे. पार्जिटरच्या मार्कण्डेय पुराणाच्या इंग्रजी अनुवादाचा उल्लेख असा दिलेला आहे. "पार्जिटरला गबल या जनसमूहाचा प्रदेश निश्चित करता आला नाही. माझा असा अंदाज आहे की गजनाच्या उंच प्रदेशात हे लोक होते. प्रदेशाचे नाम असलेल्या गबल शब्दाचे, अरबांच्या भाषेत ग उच्चार नसल्याने, ज़ाबूल असे रूपान्तर केले असे वाटते." मार्कण्डेय पुराणाच्या ५७ व्या अध्यायातील (पाहा बानर्जी) उत्तरेकडील प्रदेशांचा उल्लेख असा —

बाल्हीका वाटधानाश्च आभीराः कालतोयकाः ॥ ३५
अपरान्ताश्च शूद्राश्च पल्लवाश्चमरखाण्डकाः ।
गान्धारा गबलाश्चैव सिन्धुसौवीरमद्रकाः ॥ ३६
एते देशा ह्युदीच्यास्तु ...... ॥ ४२

वरील संहितेत देशांची नावेच आहेत असे नव्हे. त्या त्या देशाचे अनेकवचनी रूप वापरून येथे त्या प्रदेशावरून तेथील लोकांचाच उल्लेख येथे केलेला आहे. येथील गबल लोक म्हणजे ज़ाबूल प्रदेशातील लोक होत, हा मीरचंदानी यांचा तर्क योग्य असाच आहे. परंतु ते गजना प्रदेशातील लोक होते हे त्यांचे म्हणणे तितकेसे योग्य दिसत नाही.

ज़ाबूलिस्तान आणि अर्कोसिया (हलमंद आणि अरगंदाब नद्यांच्या संगमाचा आणि खोऱ्यांचा प्रदेश) हे दोन भूप्रदेश अलेक्झांडर याच्या आक्रमणापासून दोन वेगवेगळे प्रदेश आहेत ही गोष्ट ध्यानी घेतली पाहिजे. जेव्हा ज़ाबूलिस्तानात प्रबल राजकीय सत्ता स्थापित होई तेव्हा अर्कोशिया त्यात समाविष्ट असे आणि जेव्हा राजसत्ताकेन्द्र अर्कोशियात असे तेव्हा ज़ाबूलिस्तान प्रदेशाचा या सत्तेत समावेश असावयाचा. याचे कारण असे की हे दोन प्रदेश अगदी सलग व परस्परावलंबी आहेत. दोन्ही भूभाग अगदी लहान असले तरी प्रत्येकाला ऐतिहासिक वेगळेपण लाभलेले आहे. त्यांची नामवैशिष्टचे सुद्धा लक्ष्य आहेत. गबल हे प्रदेशनाम होते. परंतु अरब लोकांनी त्याचा उच्चार ज़ाबूल असा केलेला असावा हे बोंम्बाची, मीरचंदानी आणि इतरांचे म्हणणे योग्य नव्हे. याचे कारण असे की जऊब्ल हे नाम इस्लामच्या उदयापूर्वी भारतात प्रत्न लेखात वापरलेले आढळते. मीरचंदानी यांनी स्वतः असेही नोंदविले आहे की जऊब्ल हे नाम इस्लामपूर्व काळात नाण्यावरही आढळते. भारतात प्राचीन प्रत्नलेखात प्रयुक्त झालेले जऊब्ल हे रूपच कालान्तराने भाषिक दृष्टचा ज़ाबूल बनले. त्याचा इस्लामी काळात अधिक प्रमाणात वापर करण्यात आला. तोरमाण याची ज़ाबूल ही वैयक्तिक उपाधि नसून ते भारतीय हफ्तालाइट यांची लोकवाचक उपाधि आहे. हा मीरचंदानी यांचा तर्क योग्य असाच आहे. ती देशवाचक शब्दापासून उत्पन्न आहे. पुढील विवेचावरून ही गोष्ट स्पष्ट होईल. षाहि–जऊब्ल या संज्ञेचा आशय काय आहे ते आता पाहू.

कुरा येथील प्रत्नलेखात वापरलेली जऊब्ल ही संज्ञा जाबूलिस्तान किंवा प्राचीन द्रांगियाना येथील ज़ाबूल होय याचा उलगडा वरील चर्चेवरून झालेला आहे. आता **षाहि–जऊब्ल** या दोहीपैकी षाहि या संज्ञेचा विचार कर्तव्य आहे. ही संज्ञा प्रयुक्त झालेल्या प्रत्नलेखांचे सम्पादन आतापर्यंत बऱ्याच विद्वानांनी केलेले आहे. ही

संज्ञा एका ईराणी वंशाच्या राजाचे विशेषण आहे हे लक्षात घेतलें पाहिजे आणि या संज्ञेचे व्याकरणही पाहिले पाहिजे. ही संज्ञा केवळ आगंतुक नसून, ती येथे पहिल्यांदाच वापरलेली आहे असेही नव्हे. कुषाणवंशीय सम्राट कनिष्काच्या नाण्यावर ग्रीक लिपीत हीच संज्ञा अनेक वेळा टंकित झालेली आहे. दीनेशचंद्र सरकारच्या प्रत्नसंग्रहात क्रमांक ४६ (पृ. १४७) आणि क्र. ५६ (पृ. १६०) वरील नाणेलेखात ती वापरलेली आहे. नाणेलेख– "शऊनन‍ु शऊ कनेश्की कुशनु" येथे शऊननु शऊ हे शब्द शाहान शाह या दारयवहूच्या लेखातील शब्दांचा पुनरुच्चार असून, हे रूप प्राकृत अपभ्रष्ट संस्करण आहे, ही गोष्ट ध्यानी घेतली पाहिजे. हा सम्राटासाठी ईराणी शब्द होय. तसेच येथे '**कनेश्की कुशनु**' या संज्ञेकडे बारकाईने लक्ष पुरविले पाहिजे. उपरोक्त '**षाहि–जऊब्ल**' ही संज्ञा याच वर्गातील आहे. याची दखल घेतली पाहिजे. वरील 'कनेश्की कुशनु' संज्ञेच्या समकक्ष संज्ञा हुविश्क (साधारणतः शक २८ ते ६०) या कनिष्काच्या पुत्र आणि वारसाच्या सुवर्ण नाण्यावर मुद्रित केलेली आहे (पाहा सरकार, पृ. १६०). नाणेलेख आहे "शउननु शऊ ऊएश्की कुशनू" (शाहान शाह हुविष्की कुषाण). हुविष्कि कुषाण या सामासिक शब्दांचा अर्थ कुषाणांचा म्हणजे कुषाण वंशाचा हुविष्क असा होतो. हीच पदरचना वासिष्क आणि हुविष्क (वासिष्क–क्र. ४७ अ, पृ. १४९; क्र. ४८, पृ. १५० आणि हुविष्क–क्र. ४९, पृ. १५२) यांच्या वर्णनांत आणखी तीन वेळा अशी पुनरावृत्त आहे. या तिन्ही पदरचना प्रत्यक्षतः अनुक्रमे अशा आहेत– षाहेर्व्वासिष्कस्य, षाहि वासिष्कस्य आणि षाहिस्य हुविष्कस्य. यातील प्रथम आणि तृतीय रचनेत षाहि पद वासिष्क व हुविष्क या विशेष्यांचे विशेषण म्हणून प्रयुक्त आहे आणि दुसऱ्यात षाहि हे सामासिक शब्दाचे पूर्वपद आहे. वरील संस्कृत आणि अर्धसंस्कृत लेखांत त्यांच्या कर्त्यांनी या ईराणी पदरचनेचा दोन स्वतंत्र पदे म्हणून वापर केलेला आहे. परंतु मूलतः ही ईराणी पदरचना तशी नाही. मूलतः हा ईराणीतील एक सामासिक शब्द आहे. पहिल्या वापरात षाहि या इकारान्त पदाची षष्ठी वापरलेली असून तिसऱ्या वापरात षाहि शब्दाला अनियमित असा संस्कृतमधील षष्ठीचा स्य प्रत्यय वापरलेला आहे. दुसऱ्या वापरात सामासिक शब्दाचे षाहि हे पूर्वपद आहे. वरील चर्चेवरून असे स्पष्ट दिसून येते की शककालच्या पहिल्या शतकात देखील भारतातील संस्कृत पंडितांना या ईराणी सामासिक पदरचनेचा अर्थ नीटसा लावता आलेला नाही.

आधुनिक फार्सी (ईराणी) भाषेत शब्दांचे सन्धीकरण करण्याची एक अत्यंत विलोभनीय आणि अर्थपूर्ण पद्धत रूढ, प्रचलित आहे. तिला इज़ाफत (भारतीय परिभाषेत समास) असे नाव आहे. ही इज़ाफत-पद्धति प्राचीन पहलवी भाषेत, अगदी प्रारम्भिक अवस्थेतदेखील प्रचारात होती. तिची अनेकानेक उदाहरणे

सापडतात. या इज़ाफतीचे उदाहरण शाह-इ-ईराण किंवा शाम-इ-वतन म्हणजे ईराणचा राजा किंवा मातृभूमीची संध्याकाळ असे देता येईल. शब्दांच्या एकत्रीकरणाची किंवा संधीकरणाची ही विशेष अशी ईराणी पद्धति होय. पाणिनीच्या परिभाषेत हा शब्दांचा समास होय. वेस्टने मइनो-खर्द ग्रंथाच्या आपल्या आवृत्तीत (पाहा-वेस्ट, पृ. १०९) असे म्हटलेले आहे की या पहलवी इज़ाफतीचे मूळ अद्यापि उमगलेले नाही. ते आर्य किंवा सामीय Sematic असू शकेल. परंतु अलीकडे ईराणविद्याकोविदांनी असा मागोवा घेतलेला आहे की या इजाफतीचे मूळ आर्यगणांच्या भाषेत आहे. क्लेअर-टिस्डेल (पाहा – टिस्डेल, पृ. १८४) यांनी हा नियम असा उलगडून दाखविलेला आहे. " ही इज़ाफत अवेस्ता भाषेतील **यो, यत्** (who, which) या रूपांचे पहलवीत संक्षिप्त झालेले ई हे रूप होय. या ई प्रत्ययाचा उपयोग विशेष्य आणि तदनंतर येणाऱ्या विशेषणाच्या दरम्यान होतो. हे विशेषण विशेष्याच्या वर्णनात्मक असते. उदाहरणार्थ, मर्द–ई नीको या पदांचा वस्तुतः अर्थ होतो ' मर्द जो (आहे) नीको (चांगला). जेव्हा ही इज़ाफत दोन नामांच्या मध्ये येते आणि जेव्हा एक नाम दुसऱ्याचे नामान्तर नसेल (noun in apposition), तेव्हा या ई पदाचे स्वरूप प्रत्ययात्मक असते आणि त्याचा अनुवाद चा, ची, चे या प्रत्ययाने करता येतो. उदाहरणार्थ, शमशेर-ई पादशाह ' पादशाहाची तलवार (शमशेर). ' परंतु जेव्हा फार्सी भाषेत नामांना विभक्ति-प्रत्यय प्रयुक्त होत असत, अशा प्राचीन काली या दोन्हींपैकी दुसऱ्या नामाची षष्ठी प्रयुक्त होत असे; म्हणजे या शब्दांचा अर्थ होई– तलवार जी राजाची (आहे). ' याचा संस्कृत अनुवाद असा करता येईल ' शमशेरः यत् पादशाहस्य "

वरील चर्चेच्या अनुरोधाने डॉ. सरकार यांनी उल्लेखिलेल्या नाणेमुद्रितांतील कनेश्की कुशनू या पदरचनेकडे बघितले पाहिजे. या पदरचनेचा स्पष्ट अर्थ असा होतो. ' कनेष्क जो (आहे) कुषाण (वंशाचा)'. आजकालच्या फार्सी भाषेत हाच आशय असा व्यक्तविता येईल– ' कनिश्क-ई कुशान ' व अर्थ होईल ' कुषाण राजवंशातील कनिष्क राजा '. किंवा हाच आशय संस्कृतमधून व्यक्त करावयाचा झाल्यास ते ' कनिष्कः यत् कुषाणस्य ' असे होईल. कुरा प्रत्नलेखातील षाहि जऊव्ल या पदावलीकडे याच प्रकाशातून बघितले पाहिजे. आधुनिक फार्सी भाषेत सांगितल्यास ही पदावली ' शाह-इ जऊब्ल ' म्हणजे राजा जो (आहे) जाबूलचा, अशी बनेल.

इसवीपूर्व ३२३ मध्ये अलेक्झांडरने ईराण देशावर आक्रमण करून ग्रीकांनी तो व्यापल्यानंतर, या देशात मोठे बदल-ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि भाषिक घडून आले. तत्काली वापरात असलेली ईराणी किंवा प्राचीन फार्सी म्हणून ओळखली जाणारी भाषा पार बदलून गेली. पूर्वी ती अत्यंत संश्लिष्ट Synthetic भाषा

होती. आक्रमणोत्तर शतकातून तिचे विघटन झाले. वरचेवर ती असंश्लिष्ट भाषा analytical बनत गेली. अरब आक्रमणाने तिच्यावर दुसरे गंडान्तर आले. हा परिणाम फिर्दौसीच्या कालापर्यंत चालू होता. फार्सी आता एक अत्यंत असंश्लिष्ट भाषा बनलेली आहे. फार्सीच्या सद्यःकालीन असंश्लेषणात, प्राचीन कालातील संश्लेषण वैशिष्टयाचा अवशेष वरील समासपद्धतीत आपणाला पाहायला मिळतो.

ज़ाबूल हा शब्द अफगाणिस्तानात जीवित असला व प्रयुक्त होत असला तरी त्याची व्युत्पत्ति अद्यापि अज्ञातच आहे. आणखी एक शब्द फार्सी भाषेत जिवन्त आहे. तो शब्द हामून होय. अफगाणिस्तानातील हलमंद, खाशरूद, फराह रूद, खुश्क रूद व हारूद (हारूत) रूद इत्यादि छोटया मोठया नद्या हामून-ई हलमंद म्हणजे हलमंदच्या हामूनमध्ये लुप्त होतात. हा हामून शब्द पूर्व ईराण, नैर्ऋत्य अफगाणिस्तान आणि वायव्य बलुचिस्तान या देशभागात आजही रूढ आहे. हा शब्द संस्कृत सामन शब्दापासून आता विद्वानांनी व्युत्पादिला आहे (पाहा पोकोर्नी, पृ. ९०४). पंधरा सोळा हामून स्थानांची यादी मी काढलेली आहे. परंतु हा विषय येथे चर्च्य नाही. हामून कशाला म्हणावे याचे वास्तव वर्णन तारीख-ई सइस्तान मध्ये आलेले आहे. तेथे त्याला ज़िरिह असे नाव दिलेले आहे (पाहा सइस्तान, पृ. १६).

" रूद-ई-हरमंद व रुखद रूद व ख़ाश रूद व
फ़राह रूद व खुश्क रूद व हरूत रूद व आब-ई-
दश्तहा अज़ हमए अतराफ-ई-सइस्तान व अज़
हज़ार फर्संग हमा ब-ज़िरह आयद व यके
सूराख अस्त. आन्रा दहान-ई-शीर गोयन्द, न
बुज़ुर्ग, हमा ईं चन्दीं आब बिदां फिरू शवद,
हेच कस न दानद कि कुजा शवद; मगर खुदाए-
तआ़ला व तकद्दुस व ईं अज़ायबे अस्त. "

अर्थ- " हलमंद नदी व रुख़द (अरगंदाब) नदी, व ख़ाश नदी व फ़राह नदी व खुश्क नदी व हरूत (हारूद) नदी आणि सइस्तानाच्या सर्व दिशांच्या जंगलातील पाणी (आब) हजार मैलांपासून (फर्संग) या जिरिह मध्ये येते आणि त्याला एक छिद्र आहे. त्याला पाण्याचे तोंड म्हणतात. ते फार मोठे नाहीं. हे सर्व पाणी त्यात लुप्त होते. कोणीच जाणत नाही की ते कोठे जाते. परंतु त्या सर्वशक्तिमान् व पवित्र ईश्वरास ठावे. आणि हे महदाश्चार्य होय. "

येथे या स्थानाला **जिरिह, जिरह** असे म्हटलेले आहे. हा संस्कृत **ज्रयस्** शब्दाचा समकाय व सगोत्र आहे. ज्रयस् म्हणजे समुद्र. या ज्रयस् शब्दापासूनच ज़रंग हे तेथील नगर नाम बनलेले आहे. तारीख-ई सइस्तानमध्ये या जरंग नगराचा

अनेक वेळा उल्लेख आलेला आहे. अलेक्झांडरच्या काळात या प्रदेशाला **ड्रांगियाना** असे म्हटलेले आहे. हे सं. ज्रयस् आणि प्राचीन पष्तो रूप ज़रंग याचे ग्रीक रूपान्तर, अपभ्रष्ट रूप होय. ज़रंग हे नगर अरब आक्रमणकाळी वैभवसंपन्न होते. त्याला १३ वेशी होत्या, इत्यादि माहिती सइस्तानच्या इतिहासात नमूद आहे.

याच हामून अथवा ज़रंग प्रदेशाला ज़ाबूल असे नाव पुढील काळात रूढ झाले. या ज़ाबूल शब्दाचाही अन्त कळत नाही. त्याचा सुगावा भारतीय साहित्यातून लागतो का हे पाहणे आहे.

प्लक्षा म्हणजे ज़ाबूल

हिल्लेब्रान्ट, पिशेल, गेल्डनर इत्यादि विद्वानांनी ऋग्वेदातील **सरस्वती** नदी म्हणजे अफगाणिस्तान देशातील **हलमंद** नदी असे प्रतिपादिले आहे. हलमंद नदीचे पाणी या देशाच्या नैर्ऋत्येस वसलेल्या सइस्तानात लुप्त होते. वरील विद्वानांचे असे प्रतिपादन आहे की ऋग्वेदाचा प्राचीनतर भाग या सरस्वती नदीच्या तीरावर लिहिला गेला. या सरस्वतीला अवेस्ता भाषेत हरकैति, अक्काडियन साहित्यात अ-रु-खा-अति आणि प्राचीन फार्सीत हरहुवती असे म्हटलेले आहे. या नदीच्या तीरावर वसलेल्या प्रदेशास **अरकोसिया** असे नाव मिळाले. हलमंद नदीच्या विलय स्थानास हामून म्हणतात. वेदोत्तर कालीन संस्कृत साहित्यात अशा विलयस्थानास **विनशन** हे नाव दिलेले आहे.

वेदोत्तर कालीन साहित्यात या **विनशन** प्रदेशाला **प्लक्षा-प्रास्रवण** असे नाव दिलेले आहे (पाहा वेदिक इण्डेक्स). या संज्ञेचा वापर पञ्चविंश ब्राह्मण, कात्यायन श्रौतसूत्र, लाटचायन श्रौतसूत्र, आणि अशाच अन्य साहित्यात झालेला आहे. पुराणांतून प्लक्ष-द्वीप म्हणजे प्लक्ष नावाचा देश असे उल्लेख आढळतात. महाभारतात **प्लक्षा** नदीचा उल्लेख आहे. ही **प्लक्षा** नदी **सरस्वती** होय असा विद्वानांचा निर्वाळा आहे. मागाहूनच्या साहित्यात **शक-द्वीप** असाही उल्लेख आढळतो. पुराणात **प्लक्षगा** म्हणजे **सरस्वती** असा उल्लेख आहे. **प्लक्ष-जाता** नदीचाही असाच उल्लेख आढळतो.

आता **प्लक्ष-द्वीप** किंवा **प्लक्षा-प्रास्रवण** याचा मागोवा कसा घ्यावयाचा? **प्लक्षा** ही संज्ञा वेदोत्तरकालीन साहित्यात रूढ झाली हे उघड आहे. येथे असे प्रतिपादावयाचे आहे. की ही प्लक्षा संज्ञा सइस्तानात अस्तित्वात असलेल्या जाबूल या संज्ञेची सगोत्र आणि पूर्वज आहे. वरती चर्चिलेल्या जऊब्ल शब्दाची बनावट Morphology या संबन्धात लक्ष्य आहे, असे येथे नोंदणें योग्य होईल. संस्कृत भाषेतील क्ष या ध्वनीचा, अशोकाच्या प्रस्तरलेख आणि तदुत्तर प्रत्नलेखांच्या

प्राकृत भाषेत, वावर कसा होतो या संबंधातील वाल्ड्श्मिद्त् आणि मेहेंदळे यांचा अभिप्राय लक्ष्य आहे. (पाहा संक्षेप मेहेंदळे, प्रस्तावना पृ. २०). भारहुत प्रत्नलेखांच्या भाषावैज्ञानिक विशेषांची चर्चा करीत असतांना ते प्रतिपादितात– "क्ष जोडाक्षराचा वापर हा अधिक महत्त्वपूर्ण आहे. क्ष ध्वनीचे रूपांतर कधी (क) ख ध्वनीत होते, तर बहुधा त्याचे रूपान्तर (छ) च्छ या तालव्यात होते. एकसमयावच्छेदे करून ज्याचे दोन्ही वापर दिसून येतात, असा भिक्षुनी शब्द आहे. टी. मिचेलसन आणि लुडर्स यांच्या मते, –ख-रूपे पूर्वेकडील आणि –छ-रूपे पश्चिमेकडील होत. कारण अशोकाच्या पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील प्रत्नलेखात अशा प्रकारचा स्पष्ट विवेक केलेला आढळून येतो. अलीकडे एच्. बर्जर यांनी थोडाशा वेगळ्या प्रकारे हा मुद्दा प्रतिपादिला आहे. ते म्हणतात की क्ष > च्छ हे पूर्वेकडे मागधीत आढळून येत नाही. मध्यवर्ती आणि पश्चिमेकडील बोलीत घडून येणारे क्ष् > च्छ् हे परिवर्तन, बोलीतील सहजस्फूर्त कलामुळे घडून येत नसून, ते 'काही ध्वन्यात्मक विशिष्ट परिस्थितीचा' परिपाक होय, असे त्यांनी स्पष्टीकरण केलेले आहे. अर्थात्, जेथे क्ष् ध्वनीचे रूपांतर च्छ् असे होते अशा सर्व उदाहरणात, त्यांनी परिवर्तन घडवून आणणाऱ्या सर्व ध्वन्यात्मक अवस्थांचा तलास करण्याचा प्रयत्न केलेला आहे (पाहा बर्जर पूर्वोल्लिखित पृ. ७१ आणि पृ. ८६). सु. कु. चातर्जी यांच्या मते, भिक्षु (नी) शब्दात क्ष् ध्वनीचे च्छ् ध्वनीत रूपांतर होते याचे कारण या शब्दाचा भिक्ष्यु (नी) असा उच्चार करण्याची लोकांची सवय, हे होय. एच्. बर्जर यांच्या मते च्छ् ध्वनि हा, भिक्षुक >भिक्खुक या प्रक्रियतील दोन कण्ठ्य ध्वनीच्या विरूप्यीकरणाचा Dissimilation परिणाम होय. परंतु हे सर्व अशक्य आहे, कारण भिक्षुक हा शब्द बौद्ध साहित्य आणि प्राकृत प्रत्नलेखांतून वावरत नाही, आणि संस्कृत साहित्यातही तो फारसा जुना नाही. भिक्खु किंवा भिक्खुनी ज्या प्रदेशात वावरल्या त्या प्रदेशाच्या भिन्न अशा वाचिक सवईवरून हा दुहेरी वापर आढळून येतो असे समजणेच अधिक बुद्धिगम्य आहे, असे वाटते. किंवा देणग्यांची नोंद करणाऱ्या या प्रदेशातील लिपिकांच्या हातून हे पडलेले असावे."

अफगाणिस्तान आणि सइस्तान हे प्रदेश प्राकृत भाषांच्या पश्चिमेकडील क्षेत्रात मोडतात. या प्रदेशात प्राकृत भाषा फार उशीरापर्यंत वावरत होती. हा सर्व प्रदेश बौद्धकालीन अवशेषांनी युक्त आहे. ग़ज़ना नगराच्या जवळील गर्देज़ गावात इ. स. च्या सहाव्या सातव्या शतकातील ऊर्ध्वरेतस् महाविनायकाची मूर्ति आता प्रकाशात आलेली आहे. म्हणजे इस्लामच्या जन्मापर्यंत या भागात भारतीय सांस्कृतिक प्रभाव वावरताना दिसून येतो. आणि म्हणून, वरती करण्यात आलेल्या चर्चेच्या अनुरोधाने, प्राकृत भाषेच्या प्रभावामुळे **प्लक्ष** शब्दाचे **प्लच्छ** असे अवस्थान्तर होणे शक्य आहे. अशी रूपे धारण करण्याची जोडाक्षरांना मोठी सवय

असते. वर्णविपर्ययाच्या प्रक्रियेत याच्या पुढचे ध्वन्यात्मक परिवर्तन होऊन, परिणामरूपी छबल हा शब्द आकारास आला. ईराणी भाषिक वातावरणात त्याचे रूप ज़्हबल असे होणे फारसे दुरापास्त नाही. याच शब्दरूपात थोडेसे परिवर्तन होऊन हा उपरिनिर्दिष्ट कुरा प्रत्नलेखात प्रयुक्त झालेला आहे. सारूप्यीकरण Assimilation आणि स्वरभक्ति यांच्या प्रक्रियात याचे झाबूल किंवा ईराणी वातावरणात ज़ाबूल हे दूरान्वित आहे असे म्हणता येत नाही. याचे जऊब्ल हे रूप तर प्रयुक्तच आहे. आर्यभारतीय भाषांच्या परिवर्तन प्रक्रियेत या बाबी नित्यपरिचयाच्या आहेत.

वरील चर्चेत षाहि- जऊब्ल या पदावलीच्या व्याकरणविशेषांचा मागोवा घेतलेला आहे. षाहि हे शाह शब्दाचेच एक विशेष रूप आहे, हे पाहिले. षाहि-जऊब्ल याचा आजच्या ईराणी भाषेतला अर्थहि पाहिला. जऊब्ल म्हणजे तोरमाण या अब्दालवंशीय बादशाहाची सइस्तानातील मूळ राजधानी ज़ाबूल होय. याची नोंद घेतली आणि शेवटी ज़ाबूल, ज़ऊब्ल या शब्दांचे प्राचीनत्व पाहून, तो प्राचीन प्लक्ष शब्दापासून व्युत्पादण्याचा प्रयत्न केलेला आहे.

(अ. भा. प्राच्यविद्या परिषद कलकत्ता, शक १८९१, मराठी अनुवाद)

संक्षेप आणि संदर्भ

टिस्डेल – क्लेर-टिस्डेल, मॉडर्न पर्सियन कॉन्व्हर्जेशन ग्रामर, हैडेलबर्ग, १९२३
नफीसी – सईद नफीसी; रौदकी, त्याचे काव्य व त्याचा काळ. तिहरान १३४१ (१९६२)
बानर्जी – के. एम्. बानर्जी, मार्कण्डेय पुराण, ई. आय सेरीज, कलकत्ता, इ. १८६२.
बोम्बाची – अलेस्सिओ बोम्बाची, ईस्ट अण्ड वेस्ट, खण्ड ८, १९५७
बोस्वर्थ – सी. ई. बोस्वर्थ, सीस्तान अंडर द अरब्स, रोम, १९६८.
मीरचंदानी – बी. डी. मीरचंदानी, मुंबई आशियायी सोसायटीचे जर्नल खं. ३९-४०, १९६४–६५
मेहेंदळे – वाल्शिमड्द्त् व मेहेंदळे, कार्पस इन्स्क्रिप्शनम इण्किरम, खण्ड २, भाग २, उटकमंड, १९६३
वेस्ट – इ. डब्ल्यू. वेस्ट, मैन्यो–खर्द, लंदन, १८७१
वैदिक इण्डेक्स – मॅक्डोनेल व कीथ, वेदिक इण्डेक्स, वाराणसी, १९५८
सईस्तान – तारीख ई-सईस्तान, संपादक बहार, तिहरान सौर १३१४ (१९३५)
सरकार – दीनेशचंद्र सरकार : सिलेक्ट इन्स्क्रिप्शन्स, कलकत्ता, १९६५
हबीबी – अब्दुल-हय्य् हबीबी, ज़ैनुल-अख़बार, तिहरान १३४७ (१९६८)

◆ ◆ ◆

१२. शक आणि महाराष्ट्र

भारत इतिहास संशोधक मंडळ या भारतात अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या संस्थेने, स्व. द. वा. आपटे याच्या इतिहासाचे सखोल अध्ययन आणि त्यांनी केलेल्या आजीव श्रमाच्या स्मरणार्थ आरंभिलेल्या या ज्ञानसत्रात माझ्यासारख्या आगंतुकाला पाचारण केले हा मी माझा गौरव मानतो. यात संस्थाचालकांची विशालदृष्टिच विशेषेकरून दिसून येते. माझा आजच्या भाषणाचा विषय, शक गण आणि महाराष्ट्र असा आहे. शक जमातीचा इतिहास आतासा उजेडात येत आहे. या शक गणांचा महाराष्ट्राशी संबंध, एका दृष्टीने फारच प्राचीन व भरपूर असा आलेला आहे. मी जे जे प्रतिपादन करणार आहे, ते ते अनेक विद्वानांच्या इतिहासकथनाच्या आधारे करणार आहे.

इहान्वयमुखनैव सर्वं व्याख्यायते मया ।
नामूलं लिख्यते किञ्चिन्नानपेक्षितमुच्यते ।।

हा मल्लिनाथाने स्वतःकरिता स्वीकारलेला दंडक इतिहाससूत्रप्रणेत्यांना शिरोधार्य असावयास पाहिजे, असे मी मानतो. या दृष्टीने माझे सर्व कथन मी करणार आहे. माझ्या प्रतिपादनाचे मुख्यतः चार भाग आहेत. प्रथमतः शक गणाच्या इतिहासाचा धागा थोडक्यात हाती घ्यावयाचा आहे. तदनंतर महाराष्ट्राशी आलेल्या सम्पर्काला स्पर्श करावयाचा आहे. यात या सम्पर्काने महाराष्ट्रातील काही स्थलनामांची मी चर्चा करणार आहे. याला जोडून महाराष्ट्रातील शेषगत सांस्कृतिक अवशेषांचा उल्लेख येईल. तदनंतर भाषिक प्रभावाची चाहूल घ्यावयाची आहे. यात पैशाची भाषेच्या स्वरूपाचा व ती भाषा बोलणाऱ्यांचाही समावेश होईल. शिवाय मराठी भाषेत शक गणांच्या आगमनाची काही पदचिह्ने आहेत की काय याचा मागोवा घेणे आहे. व शेवटी आजच्या महाराष्ट्रीय समाजघटकांत शकांच्या सम्पर्काचे काही धागेदोरे दिसतात का याचा संकेत करावयाचा आहे. मुख्यतः या चार मुद्यांचा येथे विचार कर्तव्य आहे.

भारतीय संस्कृत साहित्यात शक गणाचे उल्लेख तुषार, खस, दरद, पल्हव आदींच्या जोडीने पुष्कळच येतात. परंतु त्यांचा काल निश्चित नसल्यामुळे व माझी या क्षेत्रात गति अल्प असल्यामुळे मी त्या खोलात शिरत नाही. ईराणी आणि भारतीय आद्य इतिहाससाधनांतून आलेल्या उल्लेखांवरून, भारतीय हिंदूप्रमाणेच शक गण हा आर्यवंशीय होता असे दिसून येते. या शक गणाचा सर्वप्रथम उल्लेख

दारयवहू (प्राचीन ईराणी-दारयवहुश, ग्रीक दारियस, ईराणी, दाराब, दार्याव, दारा) या ईराणी सम्राटाच्या (इ. स. पूर्व ५२२ ते ४८६) शिलालेखातून आढळतो. काही लेखांत शकांच्या हौमवर्ग, तीग्रखौद आणि परद्रय या तीन गटांचा उल्लेख आलेला आहे. इ. स. पूर्व ५१६ मधील हमदान येथील लेखात या शक गणाच्या मूलस्थानाचा उल्लेख, ते पर-सुग्द होते असा आलेला आहे. डॉ. हर्ज़्फेल्ड याने हे स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तो विद्वन्मान्य आहे असे वाटते. आमू दर्या (ऑक्सस नदी, सं. वंक्षु) व जक्सार्तिस (सयर दर्या, सं. रंहस्) या नद्यांच्या दरम्यान असलेल्या प्रदेशास सुग्द, सोगदिया असे नाव आहे. संस्कृत साहित्यात यालाच चूलिक, शूलिक असे म्हणण्यात आलेले आहे. ग्रीक लोकांनी याला ट्रान्स–ऑक्झियाना म्हणजे आमू पलीकडील प्रदेश असे नांव दिले. नवीन उदय पावलेल्या अरबांनी याच संज्ञेचे अनुकरण करून त्याला मावराउन्नहर असे म्हटलेले आहे. शक गण हे पर- सुग्द होते. म्हणजे त्यांचा देश सोगदियाच्या पलीकडे होता. या पर–सुग्द लोकांना दारयहूने जिंकिलेले होते. हा प्रदेश जक्सार्तिस नदीच्या पलीकडील होय. ताशकंद हे शहर शकांच्या या प्रदेशाचा मध्यवर्ती आहे. खोकन्द आणि उजकन्द ही नगरे या प्रदेशाच्या उत्तरभागी आहेत. या प्रदेशास अरबांनी फरगान असे नांव दिले. तेच नाव पूर्वी परकान असे होते. याचा अर्थ असा की इ. स. पूर्व ५१६ च्या सुमारास परकान देशात शकांचे स्वतंत्र असे राज्य होते. ते दारयवहूने जिंकले.

सोगदियाची सुग्द, चूलिका, सूलिका आणि परकानच्या शकांची शकभाषा या आर्यभाषागटातील भाषा आहेत. त्या भारेराणी गटात मोडतात. परंतु त्यांचा समावेश ईराणी या भाषागटात होतो. सुग्दो, शक, पष्तो आणि बलोची या प्रमुख पूर्व ईराणी भाषा होत.

बृहद्भारतातील सीलोन हे जसे भारतीय संस्कृतीचे दाक्षिणात्य स्थान आहे तसे या संस्कृतीचे खोतन हे औदिच्य केन्द्र आहे. शकांच्या दोन प्रमुख शाखा इ. स. पूर्व दोनशेच्या सुमारास खोतन आणि सइस्तान येथे सत्तारूढ झालेल्या आढळतात. सईस्तान हे तत्कालीन भारताच्या सीमेवरच असल्याने, त्याच्या स्वतंत्र संस्कृति व भाषेचे अवशेष आढळत नसले तरी, खोतनमधील शकांची संस्कृति आता चांगलीच उजेडात आलेली आहे. त्यांची भाषा, राज्यव्यवस्था, धर्म इत्यादीविषयी बरेच साहित्य आता उजेडात आले आहे. त्यांच्या इतिहास संस्कृतीचे धागे इ. स. दोनशे-पासून पुढे उपलब्ध आहेत. इ. स. ३०० च्या सुमाराचे दस्ताऐवज (निय प्राकृत) आता पुढे आले आहेत. एव्हापासून तेथे बुद्ध धर्म नांदत होता, तो खोतनमधील शक इ. स. च्या दहाव्या शतकात मुसलमान होईपर्यंत चालू होता. त्यांची मूळ भाषा खोतनी शक असली तरी त्यांनी वायव्य भारतातील प्राकृत भाषेचाही

अवलंब केलेला दिसतो. तेथे बौद्धधर्माचे मोठे पीठ होते. पुढे तेथे संस्कृत भाषेनेही प्रवेश केला.

सइस्तानातील शक गण हा ईराण आणि भारत या दोन प्रबल व संस्कृतिसंपन्न राष्ट्रात अडकलेला दिसून येतो. शककालारम्भी पिशाचपूर येथून कुषाणवंशीयांची सत्ता सुरू झाली. हा वंश शक जमातीपैकी आहे असेही एक मत आहे. परंतु हा वंश सइस्तानातील नव्हे. तो उत्तरेतील आहे. या वंशातला कनिष्क हा बौद्धधर्मीय सम्राट अशोकानंतरची बडी असामी आहे. खोतनमधील व भारतातील शक हे बहुधा बौद्धधर्मीय होते असे आढळते. याचे कारण, अश्वघोष म्हणतो त्याप्रमाणे, स्वतः गौतमबुद्ध हाही शाक्यमुनि-शकवंशीय होता हे असावे. ईराणी लोक शिया का ? हाच प्रकार येथेही दिसतो. कुषाणवंशाच्या मागोमाग किंवा त्यांच्या बरोबरीने पश्चिम भारतात नहपान (सं. नरवाहन ?) आणि चष्टण या शक महाक्षत्रपांचा उदय झालेला आहे. चष्टणाचा वंश शककाल ५२ पासून शक २२६ पर्यंत अव्याहत चालू होता. यानंतर मन्दसौर येथून शक ३०० पासून औलिकर या घराण्याची सत्ता चाललेली आढळते. ती या घराण्यातील विष्णुवर्धन-यशोधर्मन् या राजापर्यंत – शक ४५७ पर्यंत चालू होती.

महाराष्ट्रात शकांच्या राज्याचा आढळ होत नसला तरी, नहपान, उषभदत्त, रुद्रदामन् इत्यादी शक राज्यकर्त्यांचे महाराष्ट्रांशी घनिष्ट संबंध आले होते असे दिसते. हा संबंध विशेषतः सह्याद्रीच्या पश्चिमेकडे व उत्तर महाराष्ट्रात दिसून येतो. शकांची अनेक लेणी, शिलालेख आणि नाणी या भागात उपलब्ध आहेत. यांवरून त्यांची सत्ता या भागात असावी असे वाटते. रूपिअम्म या क्षत्रपाची एक प्रस्तरयष्टि झाडीमण्डळातील वैनगंगा नदीकाठी पौनी या प्राचीन गावी अलीकडे उजेडात आलेली आहे. सोपारा, तगर आणि पौनी येथील विशाल स्तूपाशी शकांचा तसा संबंध जुळविता येत नसला तरी ही तीर्थस्थाने त्यांची आकर्षण केन्द्रे असणे संभवते. श्रीधरवर्मन् याच्या दरबारात (शक २५० च्या सुमारास) सत्यनाग-प्रभृति महाराष्ट्रीय प्रमुख सेनापति अनुस्यूत होते असाही सुगावा लागतो.

मालवा, पारियात्र भूप्रदेशात शकगणांचे राजकीय वर्चस्व इतिहाससिद्ध आहे. महाकवि राजशेखर (शक ८२२ – ८७२) याने म्हटल्याप्रमाणे

गौडाद्याः संस्कृतस्थाः परिचितरुचयः प्राकृते लाटदेश्याः
सापभ्रंशप्रयोगाः सकलमरुभुवष्टक्कभादानकाश्च ।
आवन्त्याः पारियात्राः सह दशपुरजैर्भूतभाषां भजन्ते
यो मध्ये मध्यदेशं निवसति स कविः सर्वभाषानिषण्णः ॥

याचा भाषिकप्रभाव तेथील पैशाची भाषेच्या प्रकर्षात दिसून येतो. माळव्याच्या भाषेचा पैशाचीच्या मागोव्याच्या दृष्टीने खोल अभ्यास होणे अत्यन्त जरूर आहे.

शकांच्या प्रभावसम्पर्काच्या काही खुणा स्थलनामातही दिसून येतात. ते पाहाण्या-पूर्वी मन्दसौर या शक राजधानीचा भाषिक मागोवा पाहाणे इष्ट होईल. या शब्दाची व्युत्पत्ति अद्यापि साकल्याने पुढे आलेली नाही. दसौर हा शब्द दशपुर या सामासिक शब्दापासून आहे. परंतु पूर्वपद मन् भागाचा बोध होत नाही. माझा विचार असा आहे की दशौरच्या मागे अवन्ती हा शब्द लागलेला होता. एखाद्या गावाचा जोडनावाने उल्लेख करण्याची परंपरा महाराष्ट्रात आजदेखील सर्वत्र रूढ आहे. अवन्ती प्रदेशातील दशौर असा या नावाचा अर्थ होईल. ही राजधानी अवन्तीदशौर अशी होती. कालान्तराने आरंभीच्या अ ध्वनीचा लोप झाला, व वन्तीदशौर मधील व ध्वनीचा म होऊन मन्दीदशौर असा शब्द झाला. परंतु ध्वनिशास्त्रानुसार पूर्व द ध्वनीचा लोप होऊन मन्दशौ-सौर हे रूप सिद्ध झाले. व ध्वनीचा म करण्याची शक गणांची लकब होती. गमेष = गवेषणा (शोधणे); आमेचीता = आवेक्षिता, चिमर = चीवर, भमनै = भावनाय, नाम = नावन् (टी. बरो, खरोष्ठी दस्ताऐवजांची भाषा) अशी खोतनी रूपे मिळतात. मराठी भाषेतही पुढील प्रवृत्ति दिसून येते. ज्हूल्स ब्लोक (परांजपे, १९१) याने याचा उल्लेख केलेला आहे. खालील शब्दात प्रथमवर्ण अ ध्वनीचा लोप झाल्याचे दिसते. वखार = सं. अवस्कर, वठाण = सं. उपस्थान, वर = सं. उपरि. समानाक्षरलोप झाल्याचेही अविकणे = सं. अव + पिकणे (ब्लोक पृ. १९०) दिसून येते.

महाराष्ट्रातील लेण्याच्या कार्ले गावाचे प्राचीन नाव वल्लूरक, वलूरक असे होते. येथे प्राचीनतम बुद्ध लेणी आहे. वलूरक हा शब्द वृक – लांडगा शब्दापासून भारतीय परम्परेतून बनला. परंतु शक गणाच्या साहचर्याने व या ध्वनीचे क ध्वनीत रूपान्तर झाले. पष्तो आदि ईराणी भाषांत संस्कृतमूल व ध्वनीचा तेथे क, ग होतो. वृक शब्दापासून गुर्ग, जुर्जिस्तान – गुर्गिस्तान ही ईराणात रूढ आहेत. सं. वृत् धातूचे समानकाय रूप गर्दी-दन असे आहे. गोई (बोलणे, वाचा) = अवेस्ता वाचह् = मेडियन ज्वह् = सोगदिन वब्, आधुनिक ईराणी – गुफ़्तन. हा शब्द वच् धातूचा समकाय, सगोत्र आहे. ईराणीत गुस्ताख (बुस्ताख़) = प्राचीन फार्सी विश्ताह्व (शूर) = पहलवी विश्ताख्वं = आधुनिक ईराणी गुस्ताज़, गुस्ताख़, अशी रूपे सर्रास आढळतात. याच नियमाच्या प्रभावाने कार्ले होणे शक्य आहे.

महाराष्ट्रातील अजन्ता स्थानाची व्युत्पत्ति, अर्हन्तः, अर्हन्तक पासून मी सुच-विलेली आहे. अजंता येथील प्राचीनतम शैलगृह बौद्ध हीनयानपंथाचे आहे. वरील प्रकारचा प्रभाव दिसत असल्यामुळे ह ध्वनीचे ज ध्वनीत रूपातंर पष्तो भाषेत–ईराणीतही होते. पष्तो भाषेत ही ध्वन्यन्तरप्रथा ज़ंद, ईराणीतून आली असे तज्ज्ञ मानतात. सं. हिम = झंद जिह्म = ईराणी ज़म; सं. व्रीहि = पष्तो व्रीज्हे; सं. हन् = पष्तो ज़न् = ईराणी ज़न्, ज़दन; सं. अहम् = पष्तो ज़ह; सं. हरित् = पष्तो ज़ियर

= जंद ज़इरि = ईराणी ज़र्द; सं. हृदय = पश्तो ज़्रह = जंद ज़रेधय = ईराणी दिल. मराठी गूज (हित-गूज) शब्द सं. गुह्य शब्दापासून आल्याचे लुई ग्रे याने नोंदविले आहे. अफगाणिस्तानातूनच आलेल्या शकाचा महाराष्ट्राची संपर्क आला. म्हणून अजंता हे अर्हन्तक (स्थविर, थेर, साधुपुरुष) शब्दाचा पर्याय आहे असे म्हणावे लागते.

हिंगोली, (गड) हिंगलज, हिंगलज-वाडी (तेरसमीप, उस्मानाबाद) ही गावे विशेषरूप आहेत. हिंगोली हा शब्द हिंगलपुरी शब्दापासून व्युत्पन्न आहे असे मी मानतो. हे नियमानुसारी आहे. मिहरौली (मिहिरपुरी), वाघोली (व्याघ्रपुरी) अशीच स्थान नामे होत. येथे हिंगलज शब्द लक्ष्य आहे. हिंगुलजा ही शिवपत्नी पार्वती, दुर्गा आहे. हिंगुलजा नदी व तत्परिसरातील हिंगुलजा देवीचे दक्षिण बलोचिस्तानातील प्रसिद्ध देवस्थान सर्वज्ञात आहेत. हिंगुलजा देवीचे देऊळ औरंगाबाद गांवात (व अन्यत्रही) आहे. ही आवक शकसम्पर्कामुळे आहे असे दिसते. महाराष्ट्रातील एकमेव गाव केज हे बलोचिस्तानातील प्राचीन केच गावाचे स्मरण देते. नासिक जिल्ह्यातील डोंगराळ बागलाण तालुका अफगाणिस्तानातील प्राचीन बगलान नगराचा स्मारक आहे. बगलान शब्दामध्ये भग शब्द अंगभूत आहे. भग शब्द अंगभूत असलेले बगदाद, बगनी, बइस्तून, बगशूर, बगह, बगबूर (फगफूर), बगार, बगावी बगक, बगयार, बगान यश्त, बगावरदान इत्यादी अनेक शब्द ईराण, अफगाणिस्तान देशात वावरत आहेत.

एरण (जि. सागर, मध्यप्रदेश) हा एरिकिण, ऐरिकिण, एरिकिञ शब्दाचा अवशेष आहे. बृहमुंबईतील मढ बेटाजवळील एरंगल खेडे या नावाशी संबंधित आहे असे वाटते. कान्हेरी लेणेसंचात शकांचा संबंध गुंतलेला आहे. अवगाण (वराह-मिहिर-प्रोक्त), आयकान-अफगाण (हुदूदे-आलम, शक ९०४) आणि हरियाना-प्राचीन हरिआण हे सर्व ईराण, एरानक या शब्दाचे वेगवेगळे अवतार आहेत. ज्याप्रमाणे हिंद हे भारताला ईराणने दिलेले नाम, तसे एरानक शब्दापासून भारतीयांनी अफगाणिस्तानला दिलेले अवगाण हे नाम आहे. तेच पुढे अपगान-अफगान बनले. अखिल महाराष्ट्रात एकच एरंगल आहे.

महाराष्ट्रात शककालगणनेचा विचारही लक्ष्य आहे. सातवाहनांनी अनुस्यूत कालगणना वापरली नाही. शक क्षत्रप, महाक्षत्रपांनी सातत्याने आपलीच अनुल्यूत कालगणना वापरली. मला वाटते की स्पष्टतया प्रथमच वराहमिहिराने या काल-गणनेला शक हे उपपद जोडले. महाराष्ट्राने हीच कालगणना सातत्याने वापरली आहे. त्याने कोणतीच अन्य कालगणना कधी स्वीकारली नाही. शकाला शालिवाहन हे उपपद फार उशीरा म्हणजे शक कालाच्या बाराव्या शतकात चिकटले.

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजा, तुकाई भवानी, बालाघाटावर आपल्या नावाचे नगर वसवून 'रामवरदायिनी माता। गर्द घेऊनी ऊठली ॥' अशा

आविर्भावाने महाराष्ट्राची शिकवण देत उभी आहे. गर्द हा, ईराणी गुर्ज (खड्ग) शब्दाचा सगोत्र आहे. तुळजा व तुक्का हे दोन्ही शब्द पैशाची भाषेच्या नियमानुसार दुर्गा शब्दाची रूपे आहेत. दुर्गेपासून तुक्का आहे हे हेमचंद्र-पिशेल आदींनी उल्लेखिलेलेच आहे. भाषावैज्ञानिक विचार करताना या नियमाची चर्चा येणारच आहे. येथे लक्ष्य गोष्ट ही की हिंगलजा आणि तुळजाई, तुकाई या देवता शक आणि पैशाची भाषा यांच्याशी संबंधित सिद्ध होतात. या संदर्भात महाराष्ट्रातील मराठा जातीतील राजेरजवाडे आणि सरदार यांची तुळजाभवानीभक्ति विशेष लक्ष्य व अर्थपूर्ण ठरते. ही गोष्टही मोठी लक्ष्य आहे की तुकाराम (दुर्गाराम) हा केवळ मराठी-महाराष्ट्रीय आहे. तो अन्य शेजारील भाषात मुळीच आढळत नाही.

भारताच्या प्राकृत, अपभ्रंशादि भाषांचा विचार करीत असताना पैशाच, पैशाची भाषेची चर्चा अवश्यमेव येते. भारतीय भाषाचिकित्सेतील पैशाची हा एक यक्षप्रश्न आहे. पैशाची भाषा ही प्राकृत भाषेची बोली मानण्यात येते. पैशाची भाषेचा मायदेश वायव्य भारतात होता. परंतु विद्वान असेही म्हणतात की हा प्रदेशच तिचे माहेरघर होता असे म्हणता येणार नाही. का की पैशाची भाषा मध्यभारतासारख्या अन्य प्रदेशातही बोलली जात होती. पैशाची भाषेच्या कैकेय पैशाची, शौरसेन पैशाची, पाञ्चाल पैशाची आणि चूलिका पैशाची अशा चार पोट भाषांचा उल्लेख येतो. याखेरीज शकारी नामक एका प्राकृत बोलीचाही उल्लेख आढळतो. शक शब्दावरून तिची कुळी कळते. कैकेय हा अफगाणिस्तानातील भूप्रदेश आहे. चूलिका किंवा सूलिका हणजे सोगदियन होय. यावरून पैशाचीचे उगमस्थान भारताच्या वायव्येस होते, असे कळते. इ. स. च्या सहाव्या सातव्या शतकापर्यंत अफगाणिस्थानात भारतीय संस्कृति व बौद्धधर्म नांदत होता. आजदेखील पूर्ववाहिनी काबूल नदीच्या उत्तरेकडील पंजशीर आणि कुनार या प्रदेशातील पशई, अश्कून, वैगेली, प्रसुन आणि कती या भारतीय भाषा वावरत आहेत. त्या मूलतः ईराणी नव्हेत. या भागाला काफिरिस्तान असे नाव आहे. पैशाची भाषेची एकदोन वैशिष्टे आहेत. कैकेय आणि चूलिका पैशाचीत विशेष फरक नाही. या दोन्हींचा मुख्य विशेष हा की अन्य भारतीय भाषातील वा संस्कृतातील ग, ज, ड, द आणि ब ध्वनींचे क, च, ट, त आणि प ध्वनींमध्ये अनुक्रमे रूपान्तर होते. तसेच घ, झ, ढ, ध आणि फ ध्वनींचे अनुक्रमे ख, छ, ड, थ आणि फ रूपान्तर होते. उदा० दामोदर दुर्गा शब्दांचे पैशाची पर्याय तामोतर आणि तुक्का असे होतात. हे कैकेय पैशाचीच्या नियमानुसार होते. येथे मुद्दा असा सांगावयाचा की हाच नियम पश्तो या अफगाणीस्तानातील भाषेत, तसेच सोगदी भाषेत आपणाला पाहावयाला आढळतो.

गन्दल या पश्तो शब्दाचे ईराणी रूप गंद, गंदगी (दुर्गंधी) आहे. सोगदी बोलीतील याचे रूप ग़न्टाक़ असे आहे. येथे मूळ द आणि ग ध्वनींचे रूपान्तर ट

आण क मध्ये झालेले आहे. ईराणी अज़ (पासून) = अवेस्ता हच, पष्तो ज़न्-ए (पासून) = सोगदी चन् अशी रूपे आढळतात. अन्य भाषातील ज ध्वनीचा सोगदी भाषेत च होतो. ईराणी जन् (स्त्री) = अवेस्ता ज़ैनि = पष्तो ज़िनइ, ज़न, ज़ल् (लहान मुलगी) ही रूपान्तरे सं. कन्या शब्दाची सगोत्र आहेत. पष्तोच्या अन्य बोलीत अंज़ून, एंजु, इंजु, एंजू अशी रूपान्तरे आहेत. परंतु याचे सोगदी रूप इंच् (स्त्री) असे आहे. पष्तो भाषेच्या काही बोलीतील गूजल, ग्वोजल (गाईचा गोठा) = सं. गोष्ट या शब्दाचे शुगनी बोलीतील गेचीद असे आहे. येथे ज ध्वनीचा च आणि ल ध्वनीचा द झालेला दिसून येतो. सं. कुंचित (तीळ) : पष्तो बोली = वज़ीरानी कुंजल = ईराणी कुंजद या समीकरणात बलोची रूप मात्र **कुंचीथ** असे आहे. येथे ज ध्वनीचा च आणि द ध्वनीचा थ झालेले आढळते. पष्तो न्मूंज=ईराणी नमाज शब्द पाहा. हा सं. नमस्, नमः शब्दाचा सगोत्र व समानार्थ आहे. परंतु या शब्दाचे सोगदी रूप न्मंच् असे अहे. च ध्वानीची पष्तो बोलीतून अन्य उदाहरणेही मिळतात. पष्तो बोलीतील रौदल = सं. लू = पष्तो अन्य बोली रेबल्, रेबम्, रेब्दल् (कापणी करणे) ही रूपे पाहा. या शब्दाचे सोगदी रूप रोप् असे आहे. येथे ब ध्वनीचे रूपान्तर प असे आढळते.

शक गणांचा एक गट खोतन या देशात इ. स. पूर्व दोनशे पासून इ. सनाच्या १० व्या शतकापर्यंत नांदत होता. खोतनी भाषेतील व खरोष्ठी लिपीतील अनेक छोटेमोठे दस्ताऐवज आणि खोतनीत अनुवादित बरेचसे साहित्य आता उजेडात आले आहे. या शकांच्या खोतनी भाषेतही पैशाचीतील उपरोक्त नियम दिसून येतो. टी. बरो याने हा नियम नमूद करून त्याची उदाहरणेही दिली आहेत. या नियमाचा उल्लेख आधुनिकतम प्राकृत व्याकरण ग्रंथातही आजच्या विद्वानांनी समाविष्ट केलेला आहे. शक खोतनी किलने = सं. ग्लै, ग्लान; योकछेम = सं. योगक्षेम; चंल्पित = सं. जल्पित; चंन्म = सं. जन्म; सरचिदति = सं. सरजितन्ति; चनति = जनति; मुत्र = सं. मुद्रा; पोग = सं. भोग; तुंभिछा = दुर्भिक्षा; इत्यादी. त्याचप्रमाणे तुर (दूर), तोज (दोष), त्रंध (दूध), त्रिठ (दृष्ठ), थरिदवो (दरिद्र), सत्रिश (सदृश), चोतयति (चोदयति), वेतयति (वेदयति), नंतसेन (नन्दसेन) इत्यादी उदाहरणे लक्ष्य आहेत.

संघाटसूत्र या शक खोतनी भाषेतील ग्रंथाच्या भाषावैज्ञानिक नियमाचा अभ्यास स्टेन कोनौ याने प्रस्तुत केलेला आहे. कोनौ यांनी पैशाचीतील उपरोक्त नियमाचा उल्लेख आपल्या अभ्यासात केलेला नाही. परंतु तेथील खालील शब्द-रूपांवरून हाच नियम शकांच्या भाषेत रूढ होता असे दिसून येते. संखाराम = सं. संघाराम; संखाल = स. संघाटी; सिंखल = सिंघल, सं. सिंहल; सिंखलद्वीप = सिंघलद्वीप, सं. सिंहलद्वीप; जनवत = सं. जनपद; जंबुतीव = सं. जम्बुद्वीप;

कोटिञ कौण्डिण्य; शिदूतन = सं. शुद्धोदन; सुहावतान = सं. सुखावान; अर्मूतन = सं. अनुमोदन; सुप्रतिष्ठितपातता = सं. सुप्रतिष्ठितपादता; उतार = सं. उदर; उवजंबतिअ = सं. उपसम्पदिक; वजवंत: =सं. उपसंपदा; वेत = सं. वेद; विश्पस्त = सं. विश्वस्त; तिनार=सं. दीनार (ग्रीक देनारियस). हाच नियम आपणाला भारतात अशोकाच्या वायव्येकडील शिलालेखात दिसून येतो. तिवसे = सं. दिवसे; तिविर = सं. दिविर (ईराणी दिबीर, मराठी दबीर, डबीर); बुधत्रेवस = सं. बुद्धदेवस्य; उत्रएन = सं. उदयेन इत्यादि.

वरील चर्चेवरून शक खोतनी भाषा आणि पष्तो या दोन भाषांचे पैशाची भाषेशी असलेले नाते स्पष्ट होते, निदान स्पष्टतया या दोन्हीच्या नात्यांचा संकेत होतो असे मला म्हणावयाचे आहे. पैशाचीच्या त्या नियमाची पाळेमुळे वरील दोन्ही भाषात निश्चितपणे सापडतात. तसेच सोगदी भाषेतूनही हाच नियम कार्यप्रवण असल्याचे आढळते. चूलिक आणि शक हे एक नसले तरी त्यांच्यांत फक्त प्रान्तिक भेद आहे. ते वंशाने व मूळ भाषेने एकच आहे. गुजराती आणि राजस्थानी भाषां-प्रमाणे चूलिका आणि खोतनी भाषात अन्तर असले तरी त्या भाषा वंशाने एकच आहेत. हीच गोष्ट पष्तो भाषेला, निदान तिच्यातील काही बोलींना लागू पडते. शक लोक गेल्या दोन सहस्रकांपैकी पहिल्या सहस्रकात भारताच्या निकट संबंधात आलेले होते. खोतनमध्येही भारतीय बौद्धधर्मीयांची सतत आवक होती. या घनिष्ठ संबंधावरून पैशाची भाषेची मायभूमि वायव्य भारत होती, या गोष्टीचा स्पष्टतया बोध होतो. हा भारत काबूलपर्यंत होता. पैशाची ही प्राकृत भाषा आहे. म्हणजे वायव्य भारतातील शक व पष्तून लोक जी प्राकृत भाषा बोलत ती पैशाची होय. दुसरे मध्यभारतात पैशाची बोलली जात होती; याचाही सरळ अर्थ लागतो. या प्रदेशात – एरण, उज्जयिनी, मन्दसौर, पारियात्र या परिसरात इ. स. दोनशे पासून शकांची सत्ता पाचव्या शतकापर्यंत, कमी अधिक प्रमाणात चालू होती. राजशेखरचे पैशाची विषयीचे विधान इतिहासावर आधारलेले व सत्य आहे. म्हणून पैशाची भाषा हा शक सम्पर्काचा परिपाक होय.

अखिल नव्य आर्यभारतीय भाषांपैकी फक्त मराठी भाषेतच च-वर्ग या तालव्यांचे भिन्न उच्चार होतात. च़्, ज़् हे वर्त्स्य स्पर्शघर्ष्य अल्पप्राण आणि छ़्, झ़्, हे वर्त्स्य महाप्राण फक्त मराठीतच उपलब्ध आहेत. याचा ऊहापोह डॉ. अग्निहोत्री यांनी थोडासा केलेला आहे. अशाच प्रकारचा या तालव्य वर्णांचा वर्त्स्य उच्चार पष्तो भाषेत रूढ असल्याची चर्चा ट्रम्प्प याने केलेली आहे. च-वर्ग वर्णांचे ईराणी (फार्सी) आणि संस्कृत उच्चार समान आहेत. ईराणी चश्म आणि संस्कृत चक्षु यांतील च वर्णाचा उच्चार तालव्य होतो. परंतु पष्तो भाषेत मराठीतल्या प्रमाणे कांही विशिष्ट शब्दातील च या वर्णाचा उच्चार वर्त्स्य होतो; याची ट्रम्प्प् याने ही

उदाहरणे दिलेली आहेत. चारी (हेर, सं. चार), चड़ह (एकटा, सिंधी छड़हो, मराठी सडा), ज्वान (ईराणी जुवान, सं. युवा), ज़ोलई (सिंधी झोली, मराठी झोळी), जुनह (ईराणी ज़नख, हनुवटी), षज़ह (स्त्री = सं. सखी)

शकांच्या खोतनी भाषेत या तालव्याचे वर्त्स्य उच्चार होतात ही गोष्ट, कोनौ, बरो, बेली आदी विद्वानांनी सर्वत्र नमूद केलेले आहे. कोनौ याने आपल्या व्याकरणात याची चर्चा केलेली आहे (पाहा सक स्टडीज पृ. ११). त्याने चार्व, (मराठी चरबी), संचार (संसार). जुनीन्दि (ते हत्या करतात, सं. हन्), पंज् (सं. पंच) इत्यादि.

पैशाची भाषेत या ध्वनींचा उच्चार शेष राहिलेला नाही. परतु तो मूलतः असला पाहिजे. कारण तो मराठीत शेष राहिला आहे. मराठी ही अगदीच दक्षिणेतील नव्य आर्यभाषा. तिचा प्रदेश अन्य आर्यभारतीय भाषाप्रदेशापासून विन्ध्य-सातपुडा आणि सह्याद्रि पर्वतराजीने वियुक्त झालेला आहे. गुजराती, मारवाडी, मालवी आदि भाषांतील वर्त्स्य उच्चार भारतीय प्राकृतादि प्रभावाने पुसून गेले. परंतु महाराष्ट्र दूरस्थ व वियुक्त असल्याने हे वर्त्स्य उच्चार येथे बद्धमूल झाले. या ध्वनींचा इतिहास ध्यानात घेणे अत्यावश्यक आहे. ही या वर्त्स्य उच्चारांची उत्पत्ति आपण विचारात घेतली पाहिजे.

मराठीतील की या उभयान्वयी अव्ययाचा विचार मागाहून करू. प्रथम मराठीतील काही शब्दांच्या व्युत्पत्ति पष्तो भाषेतून लागतात, हे पाहावयाचे आहे. फाळ (नांगराचा) हा शब्द मराठीत व अन्य आर्यभारतीय भाषात आहे. ऋग्वेदात फल, फाल हे दोन्ही शब्द याच अर्थाने वापरतात. परंतु पष्तो भाषा आणि तिच्या बोलीतील या शब्दाची रूपे पाहिली म्हणजे फल, फाल हे दोन्हीही तद्भव शब्द ऋग्वेदात आहेत असे म्हणण्याची प्रवृत्ति होते. पष्तो भाषेत स्पार म्हणजे फाळ होय. आधुनिक ईराणीत ते रूप सुपार असे आहे. पष्तोच्या सरीकोली बोलीत ते—स्पुर; इष्खष्मी बोली—उस्पीर; वखी बोलीत—स्पून्दर, अशी रूपे आहेत. भाषांच्या विकासावस्थांकडे पाहिले तर स्पार आदि रूपे फल, फाल या रूपाहून अधिक प्राचीन आहेत असे वाटते. या शब्दाचा मूळ धातु सं. स्फर् – स्फार् असावा असे वाटते. मराठी फाळ मात्र संस्कृतातूनच आला असे वाटते.

खोंड (म्हणजे तरुण, जुवान बैल) शब्दाची व्युत्पत्ति समाधानकारकरीतीने लागत नाही. ती पष्तोवरून जुळते असे वाटते. पष्तोच्या पेशावरी बोलीत स्खवन्दर म्हणजे जुवान बैल असा शब्द आहे. स्खै (गाईचे वासरू), हजारा बोली—स्खे, वज़ीरानी—खोंन्दर असे आहे. हा शब्द सं. शक्वर (बैल) शब्दापासून व्युत्पन्न आहे. या शब्दांवरून खोंड शब्द आलेला दिसतो. चाळ (घरांची रांग) हा शब्द मराठी, गुजराती, हिंदी आदि भाषा आहे. पण समाधानकारक व्युत्पत्ति लागत नाही.

सं. कट शब्दाच्या समान ईराणीत कद (घर) असा शब्द आजही रूढ आहे. ईराणीत कद-बानू (गृहस्वामिनी), कद-खुदा (गृहस्वामी), कद-वाद असे शब्द आहेत. पष्तोच्या बोलीत – (हजारा भाग) काल म्हणजे शेजार, तिरा भागात क्वाले (घर), चाल (गावातील गल्ली), वजीरानीत चोल, चेल (गल्ली, आळी) असे शब्द आहेत. म्हणून हा शब्द पष्तोतून आला असे दिसते.

कळवा – घोड्याच्या एका बाजूच्या दोन पायांला कानीने बांधणे, अथवा बांधण्याचे दावे, दोर. याच पष्तो भाषेत ष्केल शब्द याच अर्थाने आहे. त्याची उत्पत्ति सं. श्वल्, श्वल्ल् (वेगाने पळणे, धावणे) या धातूपासून असावी. येथे सं. व ध्वनीचा क बनलेला आहे. या ष्केल शब्दापासून कळवा शब्दाची उत्पत्ति जुळते असे वाटते.

चपल, चप्पल (वहाणा)– पष्तो भाषेत पल् (पाय, पदचिह्न, = सं. पद्) असा शब्द आहे. या शब्दाचे अवेस्ता रूप पज़ आणि ईराणी पै असे आहे. वज़ीरानी बोलीत येबल् – एबल्, मानसेहरा – हजारा भागात ख़्पे – अब्ल आणि पेशावर टापूत ख़्पे – अब्ल् म्हणजे जोडा, वहाणा असे शब्द आहेत. पष्तोतील ख़्पे – अबल (सं. क्षप् + पद्य) यापासून चप्पल शब्द बनला असावा. कारण पष्तोत अब्ल म्हणजे अनवाणी, नागव्या पायाचा, पायात काही नसलेला असा शब्द आहे. तो सं. अपद्य शब्दापासून निघालेला आहे. दुसरे एक रूप चपलई असे आढळते म्हणजे चप्पल हे रूप पष्तो भाषेतलेच आहे.

गार, गारा (बर्फवर्षाव) हा शब्द महानुभावीय मराठीत आहे. भारतीय भाषात याची योग्य व्युत्पत्ति नाही. पष्तो भाषेत वोरे-दल म्हणजे वर्षणे, पाऊस पडणे असा धातु आहे. त्याचे अवेस्ता रूप वार म्हणजे पाऊस आहे. पष्तोचे दुसरे रूप वरे – दल, वज़ीरानी – वारे, वरन्दे, ओर्मुड़ी बोलीत ग़ोर-एक असे रूप आहे. यांवरून गार हा शब्द पष्तोत आढळतो. मूळ सं. व ध्वनीचे पष्तो प्रदेशात ग असे रूपान्तर होते. परची बोलीत गी = सं. वेत; ईराणी – गिदस्त, ब्राहुई गिदिस्प = सं. वितस्ति (वीत); परची गसो = सं. वत्स अशी समीकरणे आढळतात. सं. कर, करक हे सुद्धा पष्तो भाषेतून आलेले तद्भव शब्द असावेत.

मराठी सजून, सजूणा व हिंदी सजन, सय्यां ही पष्तोची देन आहे. सं. सखी शब्दाचे पष्तो रूप षज् असे आहे. अन्य रूपे शज, खज अशी आहेत. मराठी सजून सजूणा हा शब्द सं. सखायम् शब्दाचे पष्तो रूप आहे, असे वाटते. येथे ध्वनि आणि अर्थविन्यास यांचा मेळ बसतो.

वरील शब्दचर्चेबद्दल हे सांगणे आवश्यक आहे की वरीलपैकी एकही शब्द ईराणीत रूढ नाही. या शब्दाची व्युत्पत्ति पष्तो भाषेतच आहे. हा पष्तो सम्पर्काचाच

परिणाम आहे. दुसरी गोष्ट अशी की हे शब्द मराठी, हिन्दी भाषात शक ११५०–१२०० नंतर आले का अगोदर? मराठीत काही शब्द या कालाच्या अगोदर प्रयुक्त होत होते, असे दिसते आहे. म्हणजे काही सम्पर्क, मुस्लिमांच्या भारत व महाराष्ट्रात येण्यापूर्वीचा नक्की आहे; व काही मागाहूनचा आहे. हेहि खरे की मराठी व उत्तरेतील अन्य भाषा यांच्यावरील प्रभाव, ईराणी मुसलसान व ईराणी भाषा यांच्या प्रभावांहून भिन्न आहे. हा प्रभाव अफगाण लोक व त्यांच्या पष्तो-शक आदि भाषा यांच्यामुळे घडून आलेला आहे. ही नोंद, हे वेगळेपण लक्षात घ्यावयास पाहिजे.

की या मराठीतील उभयान्वयी अव्ययाच्या इतिहासावरून वरील विधानातील सत्य स्पष्ट होते. की हे अव्यय महानुभावीय मराठीत प्रयुक्त होत होते. की अव्ययाचा विकास प्राकृत अपभ्रंश परम्परेतील नक्की नव्हे. की हे अव्यय सं. यत् अव्ययापासून व्युत्पन्न आहे. येथे या ध्वनीचे रूपान्तर ज, क ध्वनीत झालेले आहे.

पष्तो भाषेत हे उभयान्वयी अव्यय च (चि) या रूपात वावरते. पष्तो भाषेत कि (किह) अव्ययसुद्धा आहे. पण तो ईराणीतील ऋणशब्द आहे, असे विद्वन्मत आहे. पष्तो भाषेचे फक्त च, चिन्ह् हेच अव्यय होय. शक खोतनी भाषेत या अव्ययाची रूपे चि, चू, चे अशी खोतनी दस्ताऐवज आणि इतर साहित्यांतून आढळतात. सं. यत् याची संबंधी सर्वनामासाठीसुद्धा हीच रूपे प्रयुक्त झालेली आढळतात. प्राकृत-अपभ्रंश भाषात या सं. यत् अव्ययाचे रूप ज, जं, जु असे आहे. आधुनिक काळात ते जे, जो असे बनले. आता पष्तो आणि शक खोतनी भाषेतले चि, चू, चे हे रूप अगदी नियमानुसारी आहे, असे म्हणावे लागते. कारण पैशाचीचा, मृदुव्यंजनाचा कठोर वर्ण बनविण्याचा नियम, येथे कार्यप्रवण झालेला दिसून येतो. सं. यत् शब्दाचे प्राकृत ज, जं, जु हे रूप पष्तो आणि खोतनी भाषात चि, चु असे होते. याचा अर्थ असा की पैशाची भाषेचे मूळ पष्तो आणि खोतनी यांच्या ध्वन्यात्मक प्रवृत्तीत आहे. मूळ प्रेरणा हीच आहे. या पख्तून व शक लोकांनी जी प्राकृत प्रयोजिली ती पैशाची भाषा होय. असो.

सिंधी भाषेत या अव्ययाची दोन रूपे आढळतात. एक आहे त (तह) आणि दुसरे आहे जअं, जिअ, जिअं, जो. थोडक्यात सिंधी भाषेत त आणि जअं अशी दोन रूपे आहेत. ही उभयान्वयी अव्ययाचे काम करतात. जअं रूप प्राकृत परम्परेचा वारसा असून ते केवळ नियमानुसारी आहे. त हे रूप वेगळे आहे. त्याचा विकास कसा झाला. सिंध हा गेल्या २५०० वर्षांपासून ईराणी प्रभावाच्या छायेत राहिलेला आहे. प्राकृत आणि अवेस्ता ज ध्वनीचे रूपान्तर द ध्वनीत करण्याची प्राचीन पार्सीची प्रवृत्ति आहे. त्या प्रवृत्तीनुसार प्राकृत ज ध्वनीचा प्राचीन फार्सीच्या प्रभावाने द ध्वनि बनला व तदनंतर पष्तो आणि शक खोतनी, व पर्यायाने पैशाची सम्पर्कात्ते या द ध्वनीचे त या कठोर व्यंजनात रूपांतर झाले. . . .

येथे महत्त्वाची गोष्ट ही कि या वरील भाषात कि हे उभयान्वयी रूप आढळत नाही. हिंदुकुश पर्वतश्रेणीच्या वायव्य पाणलोटात तुखारिस्तान हा प्रदेश वसलेला आहे. या तुषार देशात कुन्दूज़ नदीच्या काठी बगलान हे प्राचीन नगर वसले आहे. तेथे शक ३१ (इ. स. १०९) मधील कुषाणांचा, ग्रीक लिपी व तुखारी भाषा, यात उट्टंकित एक प्रस्तर लेख आता प्रकाशात आलेला आहे. त्या लेखात किद् हे उभयान्वयी अव्ययाचे रूप वापरलेले आढळलेले आहे. संबंधी सर्वनामासाठी सुद्धा या लेखात किद् हा शब्द आलेला आहे. म्हणजे किद् आणि उत्तर कालीन किअ, किह, कि हे मूलतः ईराणी रूप होय. ते पष्तो किंवा खोतनी नव्हे. परंतु ते पष्तो भाषेतही, ऋणशब्द म्हणून वापरात असावे.

गुजराती भाषेत के आणि जे अशी या उभयान्वयी अव्ययाची दोन रूपे प्रयुक्त होतात. तज्ज्ञांच्या मते के हे मुस्लिमांच्या सम्पर्काने ते ईराणींतून गुजरातीत आले आणि जे हे प्राकृतातून आलेले आहे. अर्थात गुजरातीत के मुस्लिमोत्तर काळातले आहे असा अभिप्राय निघतो. परंतु मराठीतील उपलब्ध पुरावा याच्या उलट आहे. मराठी भाषेत हे कि रूप मुस्लिमसम्पर्कपूर्व काळात, ज्ञानेश्वरी आदि महानुभावीय मराठीत प्रयुक्त होत होते. हे आता प्रकाशात आलेले आहे. म्हणून गुजराती सिंधी, मालवी इत्यादी भाषांमधून ते, अपवादात्मक म्हणून का होईना पण मुस्लिम आगमनाच्यापूर्वी असावे असे वाटते. या चर्चेचा मुद्दा असा की मराठीतील किं, कीं हे उभयान्वयी इस्लामसम्पर्कपूर्व मराठीत आलेले आहे. ते गुजराती आदीतून आलेले नाही. कि, किह हे रूप केवळ ईराणी भाषेतच आढळते. ते इस्लामसम्पर्कपूर्व काळात महाराष्ट्रात पोचण्याचे एकच कारण असू शकते. ही शक्यता शक जमातीच्या महाराष्ट्रातील सम्पर्काने, वास्तव्याने संभवते.

महानुभावीय मराठीत उभयान्वयीची दोन रूपे प्रयुक्त होत होती. प्राकृतागत जे आणि ईराणी ऋणशब्द किं, कीं. हे दुसरे तुरळक असले तरी ते होते हे निश्चयात्मक सांगता येते. एकनाथ कालोत्तर कालात जे रूप प्रचारातून जात गेले. काही विशिष्ट प्रसंगी ते आजही रूढ आहे. एखाद्या भाषेची मूल भाषिक व सांस्कृतिक परम्परा खण्डित झाली म्हणजे तिची विशिष्ट पूर्वागत विकास दिशाही खण्डित होते. मुंबईच्या पार्सी लोकांत जे उभन्वयीचा आणि मुसलमान प्रयुक्त उर्दूभाषेत जो या उभयान्वयीचा आजही होत असलेला प्रयोग याच नियमाकडे अंगुलिनिर्देश करितात. महिकावती बखरीत जर म्हणजे उभयान्वयी किं, जे असे रूप प्रयुक्त आहे. ते प्राकृत जद् अव्ययाचे रूपान्तर आहे. ईराणी संपर्काने दंत्यवर्णाचा र, ल होतो. येथे द् ध्वनीचा र झालेला आहे.

आता शक गण महाराष्ट्रातील लोक समूहात मिसळल्याचे कोठे दिसते का या समाजशास्त्रीय प्रश्नाकडे संकेत करावयाचा आहे. या प्रश्नाचे दोन टप्पे असलेले दिसून येतात. महाराष्ट्रात मराठा म्हणून एक जात आहे. तिचा मागोवा आतापर्यंत

विद्वानांनी घेतलेला आहे. टॉड, एन्थोव्हेन, राजवाडे, वैद्य, वि. रा. शिंदे आदि विद्वानांनी हा प्रश्न चर्चिला आहे. त्यांचा अभिप्राय असा. तेथे मराठा जातीत ३६ कुळी मराठे व मराठे कुणबी असा फरक केलेला आहे. राजवाडे व शिंदे यांचा अभिप्राय असा की हे मराठा गट शक, पल्हव, तुषार, खस आदि मध्य आशिया-तील आर्य गणांचा अवतार आहेत. ते इ. स. च्या पाचव्या सहाव्या शतकाच्या आत महाराष्ट्रात वसाहती करून, पुंज बनवून स्थिरावलेले होते. शिंदे यांनी राजपुतांची ३७ कुळे मांडून त्यापैकी २४ कुळे मराठ्यात समान, एकच आहेत, असे प्रतिपादिले आहे. मला वाटते की हा मुद्दा आता सर्वमान्य बनत चाललेला आहे. आम्ही वरती चर्चिलेली भौगोलिक, सांस्कृतिक आणि भाषावैज्ञानिक अंगे, विद्वानांनी काढलेल्या वरील निष्कर्षाला उपोद्बलक अशीच आहेत.

या संबंधात आणखीन एक पुरावा पुढे मांडता येतो. महिकावतीच्या बखरीत इ. स. च्या बाराव्या शतकात अनहिलवाड (फार्सी साहित्यातील नहरवाला) पाटणाहून तेथील भीमसिंह बिंब या राजपूत राजाबरोबर ठाण्यानजीकच्या माहीम भागात, अनेक राजपूत खुमे, कुळे वसाहतीस येऊन राहिली, याचे वर्णन आलेले आहे. ही आयात शेपन्नास वर्षांच्या अंतराने दोनदा झालेली असल्याचा पुरावा सापडतो. एकदा प्रथमतः अनहिलवाड येथील राजपुताच्या अपरांतावरील आक्रमणाच्या वेळी आणि दुसऱ्यांदा कुतब्रूद्दीन ऐवकाने शक ११११९ मध्ये भीमदेवाच्या केलेल्या धूळ-धाणीनंतर राजपुतानी केलेले सामूहिक देशान्तर. या देशान्तरित राजपुतांचाच पुढे पाटाणे-पाठारे प्रभू नावाचा जनसमूह ठाणे प्रांतात विकसित झाला. ते क्षत्रिय होत. त्यांचीच वंशावळी नायकोराव देसला याच्या प्रेरणेने केशवाचार्याने शक १३७० त वरील बखरीत वर्णिली आहे. हा ऐतिहासिक स्पष्ट असा पुरावा होय.

राजपूत आणि राजस्थानी हे शब्द इ. स. नवमशतकोत्तर आहेत. सहाव्या शतकात राजस्थानीय म्हणजे राजप्रतिनिधि असा शब्द वापरला गेलेला आहे. राजपूत हे शकादिगणोत्पन्न आहेत, ही गोष्ट आता अधिकाधिक मान्यता पावत आहे. राजस्थानी भाषेच्या सखोल अभ्यासाने याला उपोब्दलक असा भाषावैज्ञानिक पुरावा मिळण्यासारखा आहे. हा प्रश्न प्रस्तुत प्रसंगी आपल्यासमोर नसल्याने त्याच्या खोलात शिरण्याची गरज नाही.

गेल्या अर्थशतकात चूलिका (सोग्दी) आणि शक भाषांचा अभ्यास करण्यात अनेक पण्डितांनी तपश्चर्या केलेली आहे. त्यांच्या तपश्चर्येचे फळ म्हणजे या भाषाभ्यासामुळे भारतीय संस्कृतीच्या अभ्यासाला नवीन पैलू निर्माण झालेले आहेत. अशा पंडितांत एच्. ई. हेनिंग, टी. बरो, स्टेन कोनौ, जी. मॉर्गेन्स्टर्न, जे. ब्रफ, एच्. डब्लू. बेली यांचा समावेश आहे. त्यातल्यात्यात हॅरोल्ड वाल्टर बेली यांना अग्रेसरत्वाचा मान प्राप्त आहे. त्याने शक खोतनी भाषेच्या अभ्यास साधनांचे सहा खंड प्रकाशित केलेले आहेत. शिवाय कॉर्पस इन्स्क्रिप्शनम् ईरानिक्यारम् या

बृहद् ग्रंथमालेत तिसऱ्या भागातील पाचवा व सर्वप्रथम खंड प्रकाशित केलेला आहे. आज त्यांनी सत्तरी ओलांडली असून आपल्या आयुष्यांची तीन तपे या शकभाषेच्या अध्ययनात खर्चिली आहेत. जे. बी. (ब्रफ) यांनी त्यांना वाहिलेल्या सुमनांजलीची आठवण करून हे व्याख्यान मी संपवितो.

गोस्थानगोकुचछ्रगवेषमाणो भाषाद्विचक्रे सुविशारदश्च ।
कंसेतुविद्यालयरत्नभूतो लोकेष्वशेषेषु यशःप्रपन्नः ॥ १
पाण्डित्ययोगाद्बहुलैः स्वलेखैः आलोकमाविष्कृतवान् समन्तात् ।
वागाधिपत्यात्परिकीर्तितो यः त्वां सर्वतो प्राञ्जलयो नमामः ॥ २

भारत इ. सं. मंडळाच्या चालकांनी मला ही सन्धि दिली आणि आपण माझे विचार शान्तपणे ग्रहण केले, यांबद्दल मी आपणा सर्वांचा आभारी आहे.

(स्व. द. वा. आपटे-स्मारक व्याख्यान, पुणे, १८९२)

काही सन्दर्भ ग्रन्थ

१. दीनेशचंद्र सरकार, सिलेक्ट इन्स्क्रिप्शन्स, कलकत्ता १९६५
२. ई. हर्जफ़ेल्ड, आर्कियालॉजिकल सर्वे ऑफ इंडिया, मेमॉयर क्र. ३४, १९२८
३. टी. बरो, खरोष्ठी डाक्युमेंटसची भाषा, लंदन, १९३७
४. एच. डब्यू. बेली, इण्डो सिथियन स्टडीज, खंड ४ था, लंदन, १९६१
५. दे. व्यं. चौहान : १. इतिहास आणि संस्कृति, पुस्तक २६, १९७०
२. म. सा. पत्रिका, पुणे, क्रमांक १६३, १६७ व १७०
७. मॉर्गन्स्टर्न, एटिमॉलॉजिकल व्होकॅब्युलरी ऑफ पश्तो, ऑस्लो १९२७
८. स्टेन कोनौ, सक स्टडीज, ऑस्लो, १९३२
९. ई. ट्रम्प्, ग्रामर ऑफ दि पश्तो, तुबिंजेन, १८७३
१०. आ. स्टाइन, एनशंट खोतन, दोन खंड, १९०७
११. आ. ने. उपाध्ये, भांडारकर प्राच्य संस्था पत्रिका, पुणे, खंड २१, १९३९-४०
१२. पिशेल, प्राकृत व्याकरण, हिंदी, हे. जोशी. पटना, शक १८८०
१३. सुकुमार सेन, ग्रामर ऑफ मिड्ल इण्डो आर्यन, पुणे, १९६०
१४. एन्थोव्हेन, कास्टस अँड ट्राइब्स ऑफ रेस्टर्न इण्डिया,
१५. मा. प. मंगुडकर, वि. रा. शिंदे लेखसंग्रह, पुणे, १९६३
१६. वि. का. राजवाडे, महिकावती बखर, पुणे शक १८४६
१७. द. ह. अग्निहोत्री, मराठी वर्णोच्चारविकास, नागपूर शक १८८५

✦ ✦ ✦

१३ : महाराष्ट्र धर्म : उद्गम आणि आशय

महाराष्ट्र धर्म या संज्ञेचा अर्थ काय याबद्दल मराठी विद्वानात बरेच मतभेद दिसून येतात. साहित्यिकशिरोमणि भाऊसाहेब माडखोलकर यांचे बडोद्याच्या वाङ्मय परिषदेत भाषण झाले (दि. २७ डिसेंबर, १९६९). त्या भाषणात त्यानी एका वेगळचाच अर्थाने महाराष्ट्र धर्म शब्द वापरलेला दिसून येतो.)[१] स्व. वि. का. राजवाडे यानी मराठचांच्या इतिहासाची साधने २२ खंडात प्रकाशात आणली. या काही खंडांच्या प्रस्तावनांतून त्यानी अनेक इतिहास प्रश्नांची चर्चा केली आहे. महाराष्ट्र धर्माची चर्चा त्यानी पहिल्या व चौथ्या खंडांच्या प्रस्तावनांतून केलेली आहे. महिकावतीच्या बखरीच्या प्रस्तावनेतही (शक १८४६) यानी चर्चा केलेली आहे. त्यांचा पहिला खण्ड शक १८२० त आणि चौथा खण्ड शक १८२२ त प्रकाशित झाला. या खण्डातून राजवाडे यानी असे म्हटलेले आहे की, महाराष्ट्र धर्म ही कल्पना प्रथमतः समर्थ रामदास यानी निर्मिली व प्रसृत केली. महिकावतीची बखर उजेडात आल्यानंतर त्यानी हे श्रेय त्या बखरीच्या द्वितीय व तृतीय अंशाचे लेखक केशवाचार्य व त्याचा आश्रयदाता नायकोराव देसला (शक १३७०) यांना दिले. चौथ्या खण्डाच्या प्रस्तावनेत)[२] रामदासांनी शक १५७१ तच महाराष्ट्र धर्म शब्द बनविला असे म्हटलेले आहे. या प्रस्तावनातून, महादेव गोविन्द रानडे व प्रो. भागवत यांना महाराष्ट्र धर्म या संज्ञेचा खरा अर्थ कळला नाही असे सांगून, त्यांनी तो स्पष्ट करून सांगितलेला आहे. राजवाडे यांचा दृष्टिकोन योग्य आहे असे आता मान्य झाले असल्याचे दिसून येते. शिवाजीच्यावेळी जी राज्यक्रांती झाली तिचे मूळ तत्कालिन धर्म समजूतीत होते हे रानडचाप्रमाणे राजवाडे यांनाही मान्य होते. ‘ परंतु न्यायमूर्ती रानडे जी धर्मक्रांती म्हणतात, तिचा वाचक महाराष्ट्र धर्म हा शब्द नव्हता,’ (पृ २८४) हे राजवाडचाना मुख्यतः या प्रस्तावनातून सांगावयाचे आहे. राजवाडे यांची उत्तरे माडखोलकरांनाही लागू आहेत.

महाराष्ट्र धर्म या संज्ञेचा राजवाडे यांचा आशय त्यांच्या शब्दात असा आहे. कै. न्यायमूर्ती रानडचांनी व प्रो. भगवतानी बखरीचे नीट परीक्षण केले असते तर महाराष्ट्र धर्म हा Religion वाचक शब्द नसून Duty, Patriotism वाचक शब्द आहे हे त्यांच्या लक्षात आले असते. ‘ राज्य साधून, म्लेंछांचे पारिपत्य करून महाराष्ट्र धर्म रक्षणे. तेव्हा ज्यास जसे आपले होईल तसे करणे, विपरीत दिसल्यास पारिपत्य करणे

---

१. युगवाणी, नागपूर, फेब्रुवारी १९७०, पृ. ४८७.

२. ऐतिहासिक प्रस्तावना, चित्रशाळा, पुणे १८५०, पृ. २८४

हे वाक्य मल्हार रामरावाच्या सप्तप्रकरणात्मक चरित्राच्या ३२ व्या पृष्ठावर आहे (प्रथमावृत्ति). ह्या वाक्यात (१) स्वराज्य साधणे, (२) यवनांचे पारिपत्य करणे, (३) मराठ्यांची एकी करणे, व (४) विरुद्ध असतील त्यांचे पारिपत्य करणे, ही महाराष्ट्र धर्माची चार अंगे सांगितली आहेत. एवढ्यानेच महाराष्ट्र धर्माची व्याप्ति झाली असे नाही. "(शत्रू)हत म्हणजे नष्ट न झाला तरी वृकयुद्ध किंवा चित्याचे युद्ध, महाराष्ट्र धर्मी युक्त योजना केली,"—हे वाक्य शिवदिग्विजयाच्या १८२ व्या पृष्ठावर आहे. या वाक्यात शत्रु नष्ट न झाला तर लांडग्यासारखे किंवा चित्त्यासारखे युद्ध करावे अशी महाराष्ट्र धर्माची अनुज्ञा आहे असे सांगितले आहे. युद्ध कसे करावे याचाही निर्देश महाराष्ट्र धर्मात होतो हे ह्या वाक्यावरून अनुमानिता येते. "रायबागीन सरकारकाम नेकीनें बजावून राहिली तिची सेवा कराल तरी महाराष्ट्र धर्म तुमचा, नाही तर ठीक नाही," हे वाक्य शिवदिग्विजयाच्या २१४ व्या पृष्ठावर आहे. ह्यात सशास्त्र स्त्रीची युद्धसेवा करणे महाराष्ट्र धर्माला वंद्य आहे, म्हणून स्पष्ट म्हटले आहे. (पृ. २८७).

रामदासांचा आशय –

महाराष्ट्र धर्म कल्पनेचा रामदासांचा काय आशय होता, याचे संकलन राजवाडे यानी पहिल्या खंडाच्या आपल्या प्रस्तावनेत)[१] केलेले आहे. महाराष्ट्र धर्म स्थापनेचा प्रपंच करण्यास काय करावे हे सांगताना, रामदासांचे उद्गार संगृहीत करून, राजवाडे म्हणतात—"अमर्याद फितवेखोर लोकांचा संहार करावा, न्यायसीमा उल्लंघू नये, नेटके बंध बांधावे, तुरग, शस्त्र आणि स्वार जमवावे" आणि सर्वात पहिले काम काय करावे तर "मराठा तितका मेळवावा, आणि जिकडे तिकडे महाराष्ट्र धर्म वाढवावा" आपला महाराष्ट्र धर्म वाढविण्यास आणखी कोणते उपाय, तर "बहुत लोक मेळवावे। एक विचारें भरावें, कष्टें करून घसरावें, म्लेंछावरी॥" आणि इतके करून झाल्यावर मग, "आहे तितकें जतन करावे, पुढे आणीक मेळवावें, महाराष्ट्र राज्य करावें, जिकडे तिकडे," महाराष्ट्र धर्म या कल्पनेवर लिहिल्या गेलेल्या वरील लेखनाखेरीज धुळेकर भास्कर वामन भट यांनी शक १८४७ मध्ये महाराष्ट्र धर्म नावाचा एक ग्रंथ प्रकाशित केला. त्यानी या कल्पनेचा सांगोपांग इतिहासच चर्चिला आहे. न्या. रानडे व राजाराम-शास्त्री यांच्या जोडीला प्रोफेसर हरिभाऊ लिमये, रावबहाददूर प्रभाकर रामकृष्ण भाण्डारकर, प्रो. भाटे इत्यादींच्या मतांचाही निर्देश या पुस्तकात आलेला आहे. परंतु भट यांनी राजवाडे संपादित महाकावती बखर पाहिलेली नाही. म्हणून राजवाडे यांचे सुधारित मतही त्याना ज्ञात नाही. या ५०८ पानांच्या ग्रंथामुळे या कल्पनेच्या खोली व ऐतिहासिकेच्या अभ्यासात मुळीच भर पडलेली नाही. पुस्तकाच्या पान ५६ वर भट यानी वल्लभी शक २१० आणि २५२ मधील म्हणजे शक काल ४५२ आणि ४९४ सालातील शासन पत्रांतून "जो राजा युद्धिष्ठिर राजाप्रमाणे मन्वादी ऋषींनी घालून

१. उपरोक्त, पृ. ३१.

दिलेल्या नियमाप्रमाणे वर्तन करतो " अशी वाक्ये महाराष्ट्र धर्माच्या प्राचीनतेच्या पुष्टयर्थ पुढे आणली आहेत. परंतु मनुप्रणीत धर्माचा काहीही संबंध महाराष्ट्र धर्माशी नसल्याने ही चर्चा अनाठायी ठरते. भट यांचे सर्व विवेचन ऐतिहासिकतेच्या दृष्टीने विशेष उपयोगी नाही. तीच अवस्था पृ. ५८ वरील राक्षसतांगडी बखरीतील रामराजा याच्या त्याच्या आईजवळील बोलण्याची आहे. त्यात धर्मोच्छेद होतो म्हणून मी लढायाम जातो असे विधान आहे.

महिकावती बखर)[१]

राजवाडे यांनी पहिल्यांदा शक १८४६ मध्ये ती प्रकाशिली. या बखरीच्या प्रस्तावनेत (पृ. १०७) राजवाडे म्हणतात – "केशवाचार्याने प्रवृत्तिप्रधान महाराष्ट्र धर्म सांगितला. ह्याच महाराष्ट्र धर्माचा पुनरुच्चार दोनशे वर्षांनी पुढे म्हणजे शक १५७७ च्या सुमारास श्रीमत्समर्थ रामदास स्वामी यांनी शिवप्रभृति मराठ्यांच्या हितार्थ सह्याद्रिकुहरांत केला. तदनंतर दोनशे वर्षांनी महादेव गोविंद रानडे व राजारामशास्त्री भागवत यांनी पंचवीस वर्षामागे महाराष्ट्र धर्म म्हणजे काय ह्या बाबी संबंधाने लेखांतून व भाषणांतून खल मांडिला. महाराष्ट्र धर्मं या शब्दाचा अर्थ महाराष्ट्रातील देवधर्म म्हणजे Religion of महाराष्ट्र असा रानडे व भागवत यांनी केला. महाराष्ट्र धर्म हा देवधर्मवाचक शब्द नसून कर्तव्य वाचक शब्द आहे. असे प्रत्युत्तर त्यावेळी प्रस्तुत लेखकाने दिले. त्या प्रत्युत्तराला पोषक असा पुरावा केशवाचार्याच्या लेखात सापडतो. केशवाचार्याने महाराष्ट्र धर्माचे निरूपण बखरीच्या ५३ पासून ६१ पृष्ठ पर्यंतच्या आठ पृष्ठांत केलेले आहे. महाराष्ट्र धर्मावर एवढे विस्तृत लिखाण आजपर्यंतच्या कोणत्याही जुन्या ग्रंथात आलेले नाही. आजपर्यंत समर्थांच्या त्रोटक उल्लेखांवरून महाराष्ट्र धर्माची अल्पस्वल्प कल्पना करता येत असे. ती अडचण आता राहिली नाही. महाराष्ट्र धर्म या सामासिक शब्दाचा अर्थ केशवाचार्य महाराष्ट्र देशाचा धर्म असा करीत नाही, तर महाराष्ट्रीय लोकांचा ऊर्फ मराठा लोकांचा धर्म असा करतो."

त्यावेळच्या राजकीय व सामाजिक स्थितीचे केशवाचार्याने रेखाटलेले चित्र असे आहे.)[२] "आज पावे तंव हिसाब पाहतां बिंब प्रारंभापासुन वरुषें तीनसे जालि ।। राज्य अभिमान सांडिला ।। या मध्ये हे राज्यकुळ खल्लक सैनिक ईनामक सर्व रईत अजम सेक आलावदिनाचि जाली ।। या उपर देसा मध्ये ते हि बहुत यवन जाले।। राज्य अभिमान सांडला ।। शस्त्रे सोडली ।। कृषि धरली ।। सोमवंशि कारकोणि गांवखोति ताडमदिरेस उदीम धरिला ।। सिंधी काहिक असति धरोन आपलि वतने ।। काहिक सेवा करू

१. महिकावतीची बखर : वि. का. राजवाडे, पुणे १८४६.
२. उपरोक्त संहिता, पृ. ५३.

लागले ।। काहिक नष्टले ।। बहुन आचाररहित जाले ।। वहुन गोत्र प्रवर कुळस्वामिण कुळगुरु ठिकाणें सांगतां विसरू लागले ।। जाणेन देविने धर्म महाराष्ट्र रक्षाया कारणें राजश्री नायकोरायास स्वप्न दिल्हें ।। जर हा जाति मेळवा करावा ।। आम्हास ।। ब्राह्मणास भूदेव प्रसिद्धि जाणेन ही मेळवावें ।। तर हा आशिर्वाद आमचा ।। श्रीदेवि आद्यशक्ति जगदंबिका ।। महाराष्ट्रधर्मरक्षिका ।। तुम्हां प्रसन्न असो ।। श्रीरस्तु ।। हा आशिर्वाद आयिकोन व केशवाचार्याचे वचन ।। स्वधर्म रक्षणार्थ श्रीदेविचे स्वप्न ।। तीन हजार सासें छपन्न सर्व जे राजकुळि सैनिक मिळाले होते. "

महिकावती बखरीत आणखी एक उल्लेख मोठा मार्मिक आहे असे वाटते. पान ५९ वर म्हटले आहे – "तर सत्यमेव आयिकाल तर शैगाद्रिखंडिचे समतें शास्त्राचें आधारें श्रीशंकराचार्य जगद्गुरुहि जैं कर्म स्थापिलें असे, यावत् श्वेतबंधरामेश्वरा पासून यावत् काशि व द्वारका श्रीतुळजापुर परियंत, मध्यें देश पुण्यक्षेत्र, देवांचि दशावतारिक जागा, माहाराष्ट्रधर्माचे स्थान ।। कोटि तीर्थाचें महिमान ।। येथे हा धर्म. "

महिकावती बखरीच्या ६ भागांपैकी दुसरा व तिसरा भाग हे केशवाचार्यांनी शक १३७० मध्ये रचिले असे राजवाडे यानी प्रतिपादिले आहे. यासाठी त्यानी दिलेली कारणे ग्रंथांतर्गत व प्राप्त भाषिक पुराव्यावर आधारलेली आहेत. ती सर्वमान्य होण्यास अडचण पडू नये. वरील कालोल्लेख ग्रंथनिविष्ट असल्याने तद्विरुद्ध पुरावे दुबळे ठरतात. काही विसंगति दिसली तरी ती मागाहून शिरलेली विधाने होत असेच म्हणावे लागेल. अशी एकदोन विधाने सापडतातहि. उदाहरणार्थ पान ६० ओळ ७ मध्ये हे विधान आहे. " कानडा रामराजा कुतुबश्या तयाचा पाळेकर असतां दैवि इछा पंचवरूणा मध्यें वैर उत्पन्न होतां नवा लक्षाच सैनिक समागमे असतां तया हस्ते मृत्य जाला ।। " भागानगरला कुतुबशाहीराजवट शक १४४० (हिजरी ९२४) पासून सुरू झाली. पहिला नरेश सुल्तान कुली कुतुबशाह याला वरील वर्षी राज्यभिषेक झाला. तो शक १४६५ मध्ये (हि. ९५०) मध्ये शहीद झाला. त्याने १० – २० वर्षे अगोदर पासून सवते राज्य चालविले होते. परंतु काही झाले तरी शक १३७० मध्ये ही गोष्ट केशवाचार्याला कळणे अशक्य आहे. त्याचप्रमाणे दुसरी विसंगति हंबीरराव नावाची होय. पान ३७ (ओळ २९) वर " संवत् १२४५ " च्या उल्लेखाने 'हंबिरराव भोजाचा पाळकपुत्र मारिला' असे विधान आहे. संवत् १२४५ म्हणजे विक्रम कालगणनेचे हे वर्ष शककाल १११० चे येईल. इतक्या पूर्व कालात हंबीरराव हे नाव महाराष्ट्रात रूढ असणे अशक्य. हंबीर हा शब्द अरबी अमीर शब्दाचे अपभ्रष्ट रूप होय. अशी काही विसंगत उदाहरणे दिसली तरी महिकावतीच्या बखरीचा काल पुष्कळच जुना आहे यात शंका नाही. तो रामदासांच्या जन्माच्या किती तरी अगोदरचा ठरतो. महाराष्ट्र धर्म संज्ञेच्या जुनेपणाच्या दृष्टीने या बखरीतील उल्लेख निश्चितपणे रामदासपूर्वकालीन मानावा लागतो.

महाराष्ट्र धर्माची प्राचीनता –

बखरीच्या संहितेतील पृष्ठ ५९ वरील उतारा वरती दिला आहे. 'यावत् श्वेतबंध-रामेश्वरापासून यावत् काशि व द्वारका श्रीतुळजापुर परियंत, मध्ये देश पुण्यक्षेत्र, देवांचि दशावतारिक जागा, महाराष्ट्र धर्माचे स्थान' असा या धर्माच्या मातृप्रदेशाचा केशवाचार्यांनी उल्लेख केलेला आहे. येथे श्वेतबंध रामेश्वर म्हणजे सेतुबन्ध रामेश्वर आणि मध्ये देश म्हणजे आर्यांचा मध्यदेश हे अभिप्रेत असावेत. तसेच द्वारका, काशी व तुळजापुर या स्थानांनी सीमित झालेला प्रदेश असा आहे. हा प्रदेश महाराष्ट्र धर्माचे स्थान अशी केशवाचार्यांची साक्ष आहे. वरील विधानावरून मला असेही सुचवावेसे वाटते कीं, महाराष्ट्र धर्म ही संज्ञा वा या धर्माची परस्परा केशवाचार्यांच्या पूर्वीपासून चालत आलेली होती. हा प्रदेश या अशा धर्माचे स्थान आहे, हे केशवाचार्यांनी नोंदविले आहे. या बखरीत महाराष्ट्र धर्म ही संज्ञा नव्याने सांगितली जात आहे असे कोठेही नमूद नाही. नायकोराव याने केशवाचार्यांच्या माध्यमाने या चालत आलेल्या जुन्याच परस्परेचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला, असेच या सर्व प्रकारावरून दिसून येते. राजवाडे यानी असे प्रथमतः सांगून टाकले होते की, रामदासांनीच महाराष्ट्र धर्म हा शब्द प्रथम बनविला होता. परंतु नंतर त्यानी सांगितलेकी, हा शब्द वरील बखरीत आलेला आहे. खरी वस्तुस्थिती मात्र अशी दिसून येते की, महाराष्ट्र धर्म ही संज्ञा महिकावती बखरीच्या अगोदरदेखील रूढ व प्रचारात होती.

महाराष्ट्र धर्माच्या या चर्चेत प्रा. न. र. फाटक यांच्या मताचा उल्लेख इष्ट आहे असे वाटते. प्रा. फाटकांनी, रामदासाच्या वाङ्मय आणि कार्याची पाहाणी करीत असताना रामदासाच्या महाराष्ट्र धर्म या कल्पनेचा आशय ग्रहण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचा मुख्य रोष राजवाडे यांच्यावर आहे. आपल्या १६ पानी प्रकरणात त्यांनी न्या. रानडे यांचे समर्थन करून रानडे याना महाराष्ट्र धर्म हा हिंदूधर्मांहून भिन्न वाटत असून त्याचा अर्थ रानड्यांनी Duty, patriotism असा केला आहे असे सांगितलेले आहे. राजवाडे यांनी देखील तेच सांगून इतर पुष्कळ गोष्टी निराधार व कपोल–कल्पित मांडल्या आहेत, असे फाटकांना वाटते. दासबोधात हा शब्द आला नसला तरी रामदासांनी अन्यत्र दोन ठिकाणी महाराष्ट्र धर्माचा उल्लेख केलेला आहे. या कल्पनेच्या मळाचा व आशयाचा प्रश्न असल्याने ग्रंथातील हा अनुल्लेख मारक ठरत नाही. फाटक यांचे प्रतिपादन ऐतिहासिकता व सत्यान्वेषण या हेतूने झालेले आहे असे मानणे कठीण आहे. त्याना मुख्यतः राजवाडे यांच्या मताचे खंडण व महाराष्ट्र धर्म या कल्पनेतील विशिष्ट अर्थाचा निरास साधावयाचा आहे. त्यानी स्पष्ट म्हटलेले नसले तरी फाटकांना न्या. रानड्यांना अभिप्रेत असलेला अर्थही महाराष्ट्र धर्म कल्पनेत दिसलेला नाही. राजवाडे यांनी महिकावती बखर प्रकाशित केल्यानंतर १९ वर्षानंतर फाटक यानी चर्चा केली आहे. परंतु त्याच्या चर्चेत या बखरीचा कोठेच उल्लेख नाही. शिवाजील

उद्देशून लिहिलेल्या पत्रात 'तुमच्या पराक्रमामुळे महाराष्ट्र धर्म काही उरल्याचा अनुभव येतो.' असे रामदासाचे प्रतिपादन नोंदवूनही फाटकांचा निष्कर्ष मात्र 'क्षात्रधर्माच्या उपदेशांतील आपला महाराष्ट्र धर्म वाढवावा, हें वचन आपला हिंदु धर्म वाढवावा, या साध्या अर्थाचेच आहे.' असा सत्यान्वेषणविन्मुख आहे. महाराष्ट्र धर्म चर्चेत फाटकांनी काही विशेष प्रतिपादिले आहे, असा प्रत्यय येत नाही.

महाराष्ट्र धर्म या संकेताचा मराठी साहित्यात सातत्याने उल्लेख व वापर होत आलेला आहे. त्याचा आरम्भीचा अर्थ लोक विसरले व बऱ्याच कविसाहित्यिकांनी त्याचे वर्णाश्रम धर्माशी चुकीने समीकरण मांडले. परंतु महाराष्ट्र धर्माची शहाण्या लोकांना सारखी जाणीव आहे असे उल्लेख महिकावतीची बखर (शक १३७०), बाळबोधकार सरस्वती गंगाधर (सुमारे शक चौदाशे, भट पान १४९), समर्थ रामदास (शक १६००), राजाराम छत्रपतीचे नागोजी रताजी माने यास पत्र (शक १६१३) की 'या राज्यास तांब्राचा उपद्रव न व्हावा, महाराष्ट्र धर्म रहावा, राज्याची अभिवृद्धि व्हावी.' (भट, पा. ११४), शाहूचे फोंड सावंत सरदेसाईस पत्र (शक १६५७), थोरल्या बाजीरावाचे पत्र (शक १६६३, भट पा. १२२) आणि यावत्कालोत्तर बखरी यात सापडतात. या सातत्यपूर्ण उल्लेखांची दखल टाळता येणार नाही.

क्षत्रराष्ट्र :—

पश्चिम भारतातील एक राजा महाक्षत्रप नहपान असून त्याच्या राज्यकालातील (शक वर्ष ४१, ४२, ४५) अनेक शिलालेख उपलब्ध आहेत. त्याच्या शिलालेखात क्षहरात शब्द अनेक वेळा वापरण्यात आला आहे.)[१] दीनेशचंद्र सरकार आदि विद्वानांनी क्षहरात हा शब्द नहपान याच्या घराण्याचे नाव आहे, असे मानले आहे. कारण की हा शब्द नहपान याच्या नावाशी नित्यप्रयुक्त आहे. या नहपानाचे वरील लेख नासिक येथील लेण्यात खोदलेले आहेत. नहपानाच्या कार्ले येथील लेखात)[२] क्षहरात या शब्दाचे रूप खहरात असे आले आहे. डॉ. दीनेशचंद्र सरकार यानी ह्या शब्दाचे संस्कृत रूपांतर दिलेले नाही. क्षहरात हाच शब्द संस्कृत छायेत वापरलेला आहे. अर्थात् खहरात शब्दाची छाया क्षहरात अशी दिलेली आहे.

क्षहरात हा शब्द मूलतः संस्कृत नव्हे. त्याचा संस्कृत साहित्यात वापर नाही. वस्तुतः हा शब्द ईराण व अफगाणिस्तान या देशातून येऊन भारताच्या पश्चिम भागात रूढ झालेला आहे, असे दिसून येते. क्षहरात हा सामासिक शब्द असून तो क्षत्र व राष्ट्र या दोन शब्दांनी बनलेला आहे. क्षत्र शब्दाचा उगम व वापर ईराण

१. सिलेक्ट इन्स्क्रिप्शन्स, डी. सी. सरकार, कलकत्ता १९६५, पृष्ठे १६४, १६७, १७१.

२. उपरोक्त पृ. १७१.

देशात फार्च प्राचीन आहे. या क्षत्र शब्दापासून शाह म्हणजे राजा शब्द बनलेला आहे. शाहानशाह हा शब्द क्षत्रियाणां क्षत्रिय यापासून बनलेला असून हखामनिश (Achaemenian) या राजवंशातील दारयवहू (इ. स. पूर्ण ५२२ – ४८६) या सम्राटाने तो आपले बिरूद म्हणून सम्राट् या अर्थाने आपल्या प्रस्तरलेखात वापरलेला आहे. क्षत्र या शब्दाचे रूपांतर शाह शब्दाबरोबर शहर असेही होते. शहर शब्दाचा मूळ अर्थ प्रदेशवाचक होता. तसा तो ईराण देशात आजदेखील रूढ आहे. ईरान–शहर म्हणजे ईराणराष्ट्र आजदेखील ईराणात रूढ आहे. प्राचीन काळी हखामनिश सम्राट आपल्या प्रांतांना क्षत्र म्हणत. त्याच्या अधिकाऱ्यांला क्षत्रप अशी संज्ञा होती. पश्चिम भारतातील शक अधिकाऱ्यांना क्षत्रप, महाक्षत्रप अशा उपाधि लावलेल्या दिसून येतात.

क्षहरात या शब्दात क्षत्र हा शब्दच वापरलेला आहे. क्षहरात, खहरात हे शब्द क्षत्रराष्ट्र या शब्दाचे समकाय आणि समार्थ रूपांतर होत. क्षत्र हा शब्द शक लोकांच्याच वापरात असल्याने क्षत्रराष्ट्र म्हणजे शक लोकांच्या ताब्यातील प्रदेश अथवा शक जमातीशी संबंधित भूभाग असा त्याचा अर्थ दिसतो. क्षत्र शब्द उपाधिवाचक तसाच प्रदेशवाचक आहे. त्याचप्रमाणे राष्ट्र शब्दसुद्धा लोकवाचक आणि प्रदेशवाचक आहे. क्षहरात म्हणजे क्षत्रांचे राज्य, भूभाग असा होईल. नहपानाला हा शब्द सातत्याने प्रयुक्त झाल्याने या जमातीत या शब्दाला काही विशिष्ट अर्थ असावा. हा अर्थ निश्चितपणे काय होता हे आजदेखील स्पष्ट झालेले नाही. नहपानाच्या घराण्याचे ते नाव आहे असे मोघमपणाने विद्वानानी म्हटलेले आहे. नहपान महाक्षत्रप, विशिष्ट अर्थाने युक्त असा क्षहरात होता. हे निश्चित आहे. परंतु ते त्याच्या कुलाचे नाव आहे असे समजण्यास काडीचाही आधार नाही.

या नहपानाची (शक ४१ ते ४५) कन्या दखतमिता (दक्षमित्रा) ऋषभदत्त याला दिलेली होती. ऋषभदत्ताचे प्रस्तरलेख नासिक आदि लेण्यातून उपलब्ध आहेत. नहपान व त्याचा प्रान्ताधिकारी जावई ऋषभदत्त याला महाराष्ट्र व दक्षिण गुजरातेतून हुसकून लावण्याची कामगिरी गौतमीपुत्र सातकर्णी या सातवाहन राजाने केलेली होती.

नहपान व ऋषभदत्ताच्या उच्छेदानंतर पश्चिम भारतात चष्टन या शक महाक्षत्रपाने आपली सत्ता स्थापित केली. त्याचे राजघराणे कार्दमक या नावाने ओळखले जाते. चष्टनाचे ज्ञान वर्ष शक ११ व ५२ (इ. स. १३०) असून त्याची सत्ता गुजरात, सौराष्ट्र, कच्छ, राजस्थानचा काही भाग व माळवा प्रदेशांवर प्रस्थापित झालेली होती. हे शकांचे राजघराणे मागाहून उज्जयिनी येथे राजधानीस आले. या घराण्याची सत्ता शक २२६ पर्यंत चाललेली होती. या वंशाने आपल्या शिलालेखांसाठी संस्कृत भाषेचा वापर केलेला आहे.

या कार्दमक शक राजवंशापैकी चष्टनाचा नातू रुद्रदामन् हा विशेष पराक्रमी व सुसंस्कृत होता. त्याची राजधानी उज्जैन होती. सौराष्ट्रवरही त्याची सत्ता होती.

गिरनार येथील त्याचा सुप्रसिद्ध संस्कृत प्रस्तरलेख प्रकाशित आहे. तो स्वतः संस्कृत जाणणारा व व्याकरण संगीताचा जाणकार होता. या शक राजवंशाच्या कारकीर्दीत संस्कृत नाटयकलेचा विशेष विकास झाला, असे सिल्वॉ लेव्ही या फ्रेंच संस्कृत पण्डिताने प्रतिपादिलेले आहे. त्याने सातवाहन राजांचा पराभव करून त्यांचा बराचसा प्रदेश घेतलेला होता. परंतु सातवाहन जवळचे सोयरे असल्याने त्याने त्यांचा उच्छेद केला नाही असे तो सांगतो. या वंशातील राजकन्यांची लग्ने दक्षिणापथातील सातवाहन, आंध्रपंथातील इक्ष्वाकु आणि वैशालीचे लिच्छवी या राजवंशांत झालेली होती.

क्षत्रराष्ट्र धर्म :–

कार्दमक या शक राजवंशाचा उतरत्या काळात श्रीधरवर्मा नावाच्या एका शकवंशी महाक्षत्रपाचे दोन शिलालेख प्रकाशित झालेले आहेत. (पाहा परिशिष्ट) ह्या श्रीधरवर्म्याच्या बापाचे नाव शकनन्द असे असून त्याच्या राज्यकालाच्या तेराव्या वर्षातील कानाखेडा (सांची) येथील लेखात)[१] त्याला महादण्डनायक असे म्हटले आहे. या लेखात शककालवर्षही दिलेले आहे. ते २००+१ म्हणजे २०१ शककाल आहे. परंतु काही विद्वानांच्या मते ही संख्या २४१ अशी आहे. त्याचा दुसरा शिलालेख)[२] एरण (जि. सागर, मध्यप्रदेश) येथे उपलब्ध झाला असून तो श्रीधरवर्म्याच्या सत्ताविसाव्या राज्यकालातील म्हणजे शक २१५ मधील आहे. या दोन्ही शिलालेखातून शक जमातीची काही वैशिष्टचें उल्लिखित आहेत. या लेखांकडे बारकाईने पाहिल्यास दोन्ही लेखात खालील गोष्टींचा उल्लेख दिसून येतो. पहिल्या लेखात आदित्यवीर्याज्जितविजयिन् असा प्रयोग असून दुसऱ्यात स्वस्वीर्याजितविजयविपुलकीर्ति असे शकनन्दपुत्र श्रीधरवर्मा याचे वर्णन आले आहे. दोन्ही प्रत्नलेखात त्याला धर्मविजयिन् अशी उपाधि लावलेली आहे. पहिल्या लेखात स्वराज्याभिवृद्धिकर असे स्पष्ट वर्णन असून दुसऱ्या लेखात 'स्वराज्या' ही अक्षरे खण्डित झाल्याने डॉ. मिराशींनी ती पूरित केलेली आहेत. पहिल्या लेखात कल्याणाभ्युदयवृध्द्यर्थ असा लेखाचा हेतु उपलब्ध असून दुसऱ्या लेखात 'भिवृध्द्यर्थ' एवढाच भाग उपलब्ध आहे. त्याची पूर्ति कल्याण किंवा अभ्युदय अथवा दोन्ही पदे जोडून करता आली असती. परंतु तशी करण्यात आलेली नाही. परंतु कल्याणाभिवृध्यर्थम् असा प्रयोग योग्य होईल. हा भाग गद्यातीलच आहे. पहिल्या लेखात धर्मयशोऽर्थ असा प्रयोग आहे. सध्याच्या अवस्थेत तरी, खण्डित असल्याने तो दुसऱ्या लेखात प्राप्त नाही. दुसऱ्या लेखात आणखी एक फारच महत्त्वाचे विधान प्राप्त आहे. ते म्हणजे 'क्षत्रराष्ट्र (स्य) धर्मा (न्). शक जमात ही परदेशीय असून त्याना भारतात राज्य करावयाचे

१. सिलेक्ट इंस्क्रिप्शन्स, सरकार, पृ. १८६.

२. संशोधनमुक्तावलि सर १, वा. दि. मिराशी, नागपूर, १८७६, पृ. १६६.

होते ही गोष्ट लक्षात ठेवली तर वरील विधानांची वैशिष्टये लक्ष्य वाटावीत. या विधानांत स्वराज्याची म्हणजे स्थापन झालेल्या शकराज्याची वृद्धि करणे प्रथम कर्तव्य ठरते. या दोन्ही शिलालेखात याचा उच्चार केलेला आहे. या महान् कार्यसिद्धीसाठी स्ववीर्यार्जितविजयिन् असा शक जमातीच्या पौरुषपराक्रमाला आव्हान करणारा दण्डक घालून दिलेला आहे. अशा आवाहानाचा उल्लेख मागाहूनच्या अनेक प्रत्नलेखांतून आलेला असला तरी सर्वप्रथम तो रुद्रदामन् याच्या गिरनार येथील संस्कृत लेखात आलेला आहे, ही गोष्ट ध्यानात असावी. धर्मविजयिन् या शब्दाचा आशय व्यक्त करताना डॉ. मिराशी यानी (पान १६१) कौटिलीय अर्थशास्त्राच्या आधारे भारतीय परम्परेतील रूढ अर्थ दिलेला आहे. परंतु क्षत्रराष्ट्रस्य धर्मान् हा शब्दप्रयोग लक्षात घेतला तर क्षत्रराष्ट्राच्या धर्माला विजय प्राप्त करून देणारा असा अर्थ घेणे अधिक सुसंगत व प्रसंगनिष्ठ होईल. कल्याणाभ्युदयवृद्धि हे विशेषणही ऐहिक दृष्टीने राज्याला प्रयुक्त करणे योग्य होईल. कारण पारमार्थिक कल्याणासाठी दुसरी उपपदे अक्षय-स्वर्गावाप्ती, धर्माभिसम्बुद्धि, श्रद्धा इत्यादि प्रयुक्त झालेली आहेत. धर्मयशोर्थम् हे उपपद ऐहिक अर्थानेच घ्यावे याला तर अधिक सबळ कारण उघड आहे. कारण पारमार्थिक जीवनात यश कशाचे मिळविणार ? ते ऐहिक जीवनातच शक्य आहे. म्हणून क्षत्रराष्ट्र धर्म व त्यातील यश हीच येथे अभिप्रेत दिसतात.

वरील उल्लेखांवरून शक जमातीचा असा अभिप्राय दिसून येतो. आपले स्वराज्य म्हणजे शकांचे राज्य स्थापन करावे. त्याची अभिवृद्धि करावी. या राज्याचा कल्याणाभ्युदय व्हावा. हे राज्य टिकाऊ होण्यासाठी सर्व जमातीने स्ववीर्यार्जितविजय हा बाणा अंगी बाणवावा. या सर्व गोष्टींचा समावेश श्रीधरवर्मा याने क्षत्रराष्ट्रधर्म या संज्ञेत केलेला दिसून येतो. आणि या धर्माचे पालन करणारे आपण धर्मविजयिन् आहोत असे जगाला, विशेषत: स्वबांधवांना त्याने स्पष्ट केलेले आहे. ही यष्टि "क्षत्रराष्ट्राच्या धर्माचे किंवा कर्तव्याचे शिक्षण देवो," असा अर्थ डॉ. मिराशी यांनीही या शिलालेखात (पृ. १६२) पाहिलेला आहे; परंतु फारच अंधुक व मोघम रीतीने.

महाराष्ट्र धर्माची अंगे –

महाराष्ट्र धर्माची रामदासांनी दिलेली शिकवण, त्या शिकवणीला नायकोराव व केशवाचार्य यांची दोन अडीचशे वर्षापूर्वीची महाराष्ट्राची प्राचीन परम्परा आणि या दोन्हीच्या मागे असलेली राजकीय पार्श्वभूमि, ही विचारणीय आहेत. आणि याच्या जोडीला श्रीधरवर्मा या शकनृपतीच्या प्रस्तरलेखात उपलब्ध असलेला क्षत्रराष्ट्रधर्म. या तीन सूत्रांपैकी श्रीधरवर्मा याच्याजवळ स्वराज्य होते. परंतु शकांची सत्ता नष्ट झाली होती वा होत होती. श्रीधरवर्मा ही सत्ता टिकवावी, स्थिर करावी या प्रयत्नात दिसतो. म्हणून त्याने आपल्या शकस्वबान्धवांस स्ववीर्यार्जितविजयविपुलकीर्ति बनण्याची चेतावणी दिलेली आहे. केशवाचार्यांनी स्वराज्य नष्ट झाल्याचे दुष्परिणाम तीनशे

वर्षांचे पाहिलेले, अनुभवलेले आहेत. सर्वत्र तुरकाण पसरलेले होते. सर्व कर्ता सवरता समाज मुसलमान राजांच्या कच्छपी लागलेला होता. क्षत्रियांचा राज्याभिमान बुडालेला होता. त्यांनी शस्त्र सोडून दिले होते, कृषिकर्म वा वैश्यवृत्तीचा त्यांनी अवलंब केला होता. सोमवंशी क्षत्रियांनी कारकुनी पत्करली. गावखोती घेतल्या, ताडीमदिरेचा उदीम अवलंबिला. कित्येक आपली वतने सांभाळून बसले, कित्येक म्लेंच्छसेवा करू लागले. कित्येक घराणी नष्ट झाली. बहुत आचारहीन झाले. बहुत गोत्रप्रवर, कुलस्वामिनी, कुलगुरु यांना विसरून गेले. म्हणून देवीने महाराष्ट्र धर्म रक्षावयाकारणे नायकोरायास स्वप्न दिले. म्हणून हा जातिमेळावा करावा. ब्राह्मणास मेळवावे. असे असेल तर हा आमचा आशीर्वाद. श्रीदेवी आद्यशक्ति जगदंबिका महाराष्ट्रधर्म रक्षिक तुम्हास प्रसन्न असो. (पृ. ५३).

न्या. रानडे व राजवाडे यांच्या महाराष्ट्र धर्माच्या मूलभूत अर्थग्रहणामध्ये विशेष फरक आहे असे दिसून येत नाही. रानडे यानी महाराष्ट्र धर्माचा आशय Duty, Patriotism या शब्दानी व्यक्त केलेला आहे. परंतु राजवाडे यांनी रानडे यांच्या म्हणण्याचे निराकरण करताना या गोष्टीचा उल्लेख दोन्ही तिन्ही प्रसंगीसुद्धा केलेला नाही. राजवाडे यांचे लेखन या संबंधात उपलब्ध ऐतिहासिक उल्लेखांना धरून व कमी भावनाप्रभावितपणे झाले असते तर बरे झाले असते. न्या रानडे व इतिहासाचार्य राजवाडे यांच्यात महाराष्ट्रधर्माच्या आशयासंबंधाने विशेष असा फरक नाही. फरक आहे तो भावनेचा, विस्ताराचा व स्वमतमण्डनार्थ याच्या उपयोगाचा. दोघांना मान्य असलेली गोष्ट ही की महाराष्ट्र धर्म हा मन्वादिमुनिप्रणीत हिंदुधर्म नव्हे. तो त्याहून भिन्न आहे. त्याचा आशय विशिष्ट कर्तव्यपालन व विशिष्ट देशभक्तिमूलक असा आहे. महाराष्ट्रधर्म म्हणजे काय किंवा त्याचे अंगभूत घटक काय आहेत याची चर्चा राजवाडे यानी आपल्या चौथ्या खंडाच्या (सहाव्या नव्हे) प्रस्तावनेत केलेली आहे.)[1] राजवाडे म्हणतात–'राज्य साधून म्लेंच्छाचे पारिपत्य करून महाराष्ट्रधर्म रक्षणे. तेव्हा ज्यास जसे आपले होतील तसें करणे, विपरीत दिसल्यास पारिपत्य करणे' हे वाक्य मल्हार रामरावाच्या सप्तप्रकरणात्मक चरित्राच्या ३२ व्या पृष्ठावर आहे (प्रथमावृत्ति). ह्या वाक्यात (१) स्वराज्य साधणे, (२) यवनांचे पारिपत्य करणे, (३) मराठ्यांची एकी करणे व (४) विरुद्ध दिसतील त्यांचे पारिपत्य करणे ही महाराष्ट्र धर्माची चार अंगे सांगितली आहेत.' याशिवाय वृकयुद्ध किंवा चित्याचे युद्ध करणे, रायबागिनीप्रमाणे नेकीने राज्य करणे इत्यादीचाही राजवाडे यानी महाराष्ट्र धर्मात समावेश होतो असे सांगितले आहे. राजवाडे यानी वरती सांगितलेल्या चार अंगापैकी खरी अंगे दोनच आहेत. हे थोडासा बारकाईचा विचार केल्यास दिसून येईल. ती दोन अंगे म्हणजे (१) स्वराज्य स्थापणे आणि (२) मराठ्यांची एकी करणे. एकदा स्वराज्य

---

१. ऐतिहासिक प्रस्तावना, पृ. २८७.

स्थापण्याचा उद्योग करावयाचा असे ठरल्यावर त्यात यवनांचे पारिपत्य आपोआपच आले. तसेच या कार्यात जरी स्वकीय विघ्न करायला लागले तरी त्याना मारून काढणे आवश्यक होऊन बसते. म्हणून खरी अंगे दोनच दिसून येतात.

वरती महिकावतीच्या बखरीतील उतारा सारांश रूपाने दिलेला आहे. त्याकडे पाहिल्यास दिसून येते की, नायकोराव व केशवाचार्य यांना स्वराज्याची भूक लागलेली आहे. स्वराज्यलोपाचे दुष्परिणाम नोंदविलेले आहेत. हे स्वराज्य पुनश्च स्थापन व्हावे, यासाठी केशवाचार्याने स्वबान्धवास एकत्र येण्याचे आवाहन केलेले आहे. महाराष्ट्र लोकांनी शस्त्रे सोडून दिली याची खंतही येथे व्यक्त झाली आहे. या खंतीचा अर्थ लोकांनी शस्त्र हाती धरावे असा महिकावतीच्या बखरकर्त्याचा आशय उघड दिसतो. परकीय आक्रमण झाले त्यामुळे आमचे सारसर्वस्व नष्ट झाले, हेही येथे नमूद आहे. त्यांची अंगे दोन. क्षत्रियवृत्ति लोपून हीन उदीम पदरी पडला. समाजविघटन झाले व सांस्कृतिक परम्परा कोसळली, निर्मूल झाली असा केशवाचार्यांचा निर्वाळा आहे. या गोष्टींना सूत्ररूपाने मांडावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, केशवाचार्याला खालील चार गोष्टी अभिप्रेत आहेत आणि तीच महाराष्ट्र धर्माची चार अंगे आहेत.

१. केशवाचार्याला स्वराज्याची भूक होती.
२. क्षत्रवृत्तीचा लोप झाला याची खंत व्यक्त करून त्याने लोकांच्या शौर्य-वीर्याला आव्हान केलेले आहे.
३. स्वराज्य स्थापन करण्यासाठी त्याने सर्व मराठ्यांना एकत्र आणण्याचा अभिप्राय व्यक्तविला आहे आणि
४. या सर्व महान् उद्योगाची पार्श्वभूमि म्हणून पूर्वजांची सांस्कृतिक परंपरा व पुंजी सांभाळण्याची प्रेरणा दिलेली आहे. ही केशवाचार्याच्या प्रतिपादनाची चार प्रमुख अंगे आहेत असे आढळून येते. यालाच केशवाचार्य महाराष्ट्र धर्म मानतो. ही महाराष्ट्र धर्माची चतुःसूत्री आहे असे म्हणावयास हरकत नाही.

महाराष्ट्र धर्माच्या वरील आशयाशी श्रीधरवर्मा याच्या दोन शिलालेकांतून दिसून येणाऱ्या क्षत्रराष्ट्र धर्माच्या आशयाची तुलना करणे उपयुक्त आहे.

क्षत्रराष्ट्रधर्म महाराष्ट्रात ? —

आता प्रश्न असा निर्माण होतो की, क्षत्रराष्ट्रधर्माची ही कल्पना वा विचार महाराष्ट्रात का प्रसृत झाला. शकांची सत्ता पश्चिम भारतात मुख्यत्वे करून होती. तिचा विस्तार महाराष्ट्राच्या आसमन्तात होता. पण त्यांची सत्ता महाराष्ट्रात चिरकाल टिकल्याचे इतिहासात नमूद नाही. हे खरे आहे. पण काही गोष्टी विचारणीय अशा आहेत. शककालांच्या प्रथम दोन तीन शतकांपर्यंत शक पश्चिम महाराष्ट्र व

उत्तर महाराष्ट्रात वावरलेले दिसून येतात. नासिक, जुन्नर, कार्ले, कान्हेरी आदि लेण्यातील त्यांचे शिलालेख त्यांच्या या प्रदेशातील संचारांची पदचिन्हे होत. नासिक जिल्हा, अकोला, वासीम, हैद्राबाद राज्य इत्यादि भागातून शक राजांच्या नाण्यांचे अनेक संग्रह हाती आलेले आहेत. पौनी (जिल्हा भण्डारा) येथे एका महाक्षत्रप रूपिअम्म या शक सेनापतीचा प्राचीन यष्टिशिलास्तम्भ मिळालेला आहे. डॉ. मिराशीच्या अनुमानानुसार या प्रदेशात शक जमातीचे वर्चस्व शक कालाच्या तिसऱ्या शतकापर्यंत अधुनमधून चालू होते. आन्ध्रकन्नड सीमाभागातही माहिषमती येथे त्यांची सत्ता होती असे त्यांचे अनुमान आहे. असे जरी असले तरी प्रत्यक्ष राज्यसत्तेचा पुरावा उपलब्ध नाही. हे मान्य केले पाहिजे. सिरिखदसातकणिस (श्रीक्षत्रसातकर्णि-स्य) आणि सिरिसक सातकणिस (श्रीशकसातकर्णि-स्य), तसेच हकुसिरि (शकश्री) ही शकवंशप्रभावदर्शक व्यक्तिनामे सातवाहन राजवंशातील राजपुरुषांची होत. ती सर्वत्र आढळतात. ही नावे प्रत्नलेख व नाण्यांत आलेली असल्याने ती ऐतिहासिक दृष्टया सर्वस्वी स्वीकार्य ठरतात. डॉ. मिराशींच्या प्रयत्नाने हे ज्ञान मराठी माणसापर्यंत पोचलेले आहेच.

तुकाई, तुळजाई –

तुळजापूरवासिनी तुळजाभवानी ही अखिल महाराष्ट्राची कुलदेवता असल्याचा दावा महिकावती बखरीत मांडलेला आहेच. आतापर्यंत कोणाही मराठी वा अन्य विद्वानाने तुकाई वा तुळजाई या शब्दांच्या व्युत्पतीचा शोधबोध घेतलेला नाही. कृ. पां. कुलकर्णी यांच्या कोशात दोन्हीबद्दल मौन आहे. श्री. दाते यांच्या कोशात तुकाई म्हणजे तुळजापूरची देवी असा अर्थ दिलेला असून 'तुका ना माका घाल सुण्यास' या म्हणीचा वेडगळपणे तुकाई शब्दाशी संबंध जोडला आहे. या कोशात तुल-ळजाई देवतेचा उल्लेख नाहीच. प्रा. ग. ह. खरे यांच्या चार दैवतांच्या वर्णनात तुळजादेवीच्या व्युत्पतीचा प्रपंच केलेला नाही.

लुई ग्रे (Indo-Iranian Phonology, New York, 1902, § 252) आणि पिशल (प्राकृत भाषाओं का व्याकरण, पटना, शक १८८०) यांनी पैशाची भाषेचा विचार करताना दुर्गा शब्दाचे पैशाची रूप तुक्का होते असे सांगितलेले आहे. पैशाची बोलीत सर्वच वर्गांच्या मृदुवर्णाच्या जागी ते ते कठोर व्यंजन होते असा नियम हेमचन्द्रादि **वैय्याकरणांच्या** आधारे सर्वच आधुनिक विद्वानांनी चर्चिला आहे. म्हणून तुक्का, तुका हा स्त्रीलिंग शब्द संस्कृत दुर्गा शब्दाचे पैशाची रूप होय हे सांगणे नलगे.

तुलजा, तुळजा हे सुद्धा दुर्गा शब्दाचेच भाषिक रूपान्तर होय हे थोडया विचाराने कळून येते. दुर्गा शब्दापासून रूपान्तर होताना येथे कसलाही ध्वनिलोप झालेला नाही. पैशाचीच्या वरील नियमानुसार द या मृदु ध्वनीचे त या कठोर

व्यंजनात रूपान्तर झाले. रेफाचा ल बनला- र व ल हे नेहमीच परस्परावर्तनीय आहेत. ल ध्वनीऐवजी ळ उच्चार होणे हा पैशाचीचा स्वभाव असल्याचे हेमचन्द्राने सांगितलेले आहेच (पाहा प्रा. व्याकरण § ४,३०८). म्हणून तुळजा हे शुद्ध व प्राचीन रूप होय. आता ग ध्वनीचे ज ध्वनीत रूपांतर कसे होते हे पाहाणे आहे. भारतीय प्राकृतापभ्रंशादीत ही परिवर्तनप्रक्रिया दिसून येत नाही. ग्रे आणि पिशल याना असे रूपान्तर आढळलेले नाही. याच्या उलट ई. ट्रंप याने मात्र पश्तो भाषेत अफगाणिस्तानात–पूर्व, मध्य व पश्चिम भागात, एकाच वर्णाचे ज, ज़ व ग असे उच्चार होतात असे प्रतिपादिले आहे (पाहा पृ. १०). यहूदी भाषातही (हिब्रू व अरबी) असाच प्रकार आहे असे सांगून जमल, गमल, ग्यमल (कॅमल–उंट) शब्दाचे रूप चर्चिले आहे. पैशाची भाषेची मायभूमी गांधारतक्षशिलादि वायव्य भारतात आहे आणि या बोलीचे लोक या प्रदेशातूनच पश्चिम भारतात वावरले हे लक्षात घेतले तर दुर्गा शब्दातील ग या ध्वनीचे ज ध्वनीतले रूपांतर लक्षात येते. म्हणजे तुळजा हा शब्द, पैशाची बोली व ईराणी लोक यांच्या संपर्काने दुर्गा शब्दापासून बनला हे ध्यानी येते. तुळजापूर क्षेत्रात तुळजा भवानीलाच तुकाई म्हणतात हे सांगणे नको.

तुळजा भवानीच्या या पैशाची भाषा सम्पर्काने महाराष्ट्र धर्माच्या शकगणोत्पत्ति प्रमेयास प्रस्तुत सन्दर्भात चांगलीच बळकटी येते. केशवाचार्याने नायकोरावाच्या आधिपत्याने ज्या पाठारे प्रभूना महाराष्ट्रधर्म प्रतिपादिला ते पाठारे प्रभु, राजा भीमदेवाचा कुतबुद्दीन ऐबक याच्याकडून शक १११९ मध्ये पराभव झाल्यानंतर, भीमदेवाबरोबर केळवे-माहिमास आले व त्यांच्या अंगात राजपूतांचे सौर क्षत्रिय, गुर्जर प्रतिहार आणि चालुक्य-सोळंकी यांचे रक्त सळसळत होते ही गोष्ट ही आता उजेडात आली आहे (पाहा पाठारे, पाटाणे प्रभु यांचा उद्‌गम, लेखक ए. एस. भाण्डारकर, मुंबईच्या आशियायी सोसायटीचे जर्नल, खण्ड २३, १९४७). ही राजपूत घराणी शकादि ईराणी आर्यापासून निर्माण झालेली आहेत, असे थोरल्या भाण्डारकर टॉड आदीपासून अनेक विद्वानांनी प्रतिपादलेले आहे. तुळजाभवानीविषयी महाराष्ट्रातील छत्रपति शिवाजी आदि क्षात्रवृतीच्या मराठा घराण्यात विशेष आस्था दिसून येते. ही गोष्टही मोठी अर्थगर्भ व सूचक आहे.

स्थाननामे

महाराष्ट्रातील उपनावे, व्यक्तिनावे व स्थळनावे यांचा भाषिक व ऐतिहासिक अभ्यास करून इतिहास लेखनास त्याचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न मराठी भाषिकांना अद्यापि करणे आहे. असा प्रयत्न आतापर्यंत इतिहासाचार्य राजवाडे सोडले तर झालेला नाही. कोठे झाला असल्यास फारच जुजबी आहे. असो. महाराष्ट्रातील शक जमातीच्या गतकालीन प्रभावाच्या खुणा म्हणून काही स्थलांचा येथे विचार करू. नासिक येथील शैलगृहातून शकांचे प्रत्नलेख विद्वानास ज्ञात आहेत. नासिक

जिल्ह्याच्या डोंगरी भागात बागलाण असा तालुका आहे. त्या तालुक्यात बागलाण नावाचे ग्राम नाही, परंतु तालुक्याचे मात्र नाव बागलाण आहे. अखिल महाराष्ट्रात हे नाव एकमेव आहे. परंतु याच नावाचे एक गाव किंवा कसबा उत्तर अफगानिस्तानात आजदेखील वास्तव्य करीत आहे. त्याचे अक्षांश रेखांश ६८°, ४५' पूर्व व ३६°, २०' उत्तर असे आहेत. शक १८७९ मध्ये या भागात सापडलेला कुषाणकालीन शककाल ३१ मधील तुखारी (सं. तुषार) भाषेतील ग्रीक लिपीत लिहिलेला एक शिलालेख आता प्रकाशित झालेला आहे. त्याचे ईराणी भाषेत केलेले अब्दुलहय्य् हबीबी यांचे संपादन आम्हाला पाहायला मिळाले. त्यात बग्–लंग शब्द वापरलेला आहे. हा बग–लंग शब्द बागलान शब्दाचे प्राचीन रूप होय, असे सर्व विद्वानानी निश्चित केलेले आहे. बग–लंग शब्दातील पूर्वशब्द बग हा संस्कृत भग शब्दाचा ईराणी अवतार आहे, हे निर्विवाद आहे. बगदाद, बग–शूर, बग–नी, बगान–यश्त, बगार, बगक, बगीन, बगया, बगावर्दान अशा ईराण अफगाणिस्तानातील स्थाननामात बग-भग शब्द वास्तव्य करीत आहे, असे डॉ. हबीबी याने निवेदिले आहे. थोडक्यात सांगायचे असे की, बागलाण या नासिक जिल्ह्यातील प्रदेशाची कुळीमुळी अशी खोल गेलेली आहे.

आफगणिस्तान हा पहाडी प्रदेश होय. म्हणून महाराष्ट्रातील पहाडी भागात हे नावे आढळणे वैशिष्टपूर्ण म्हणावे लागेल. शिवाय पहाडी प्रदेश हे शत्रुपासून संरक्षण मिळविण्याचे उत्तम साधन असते, हे छत्रपति शिवाजीनी आपल्या उदाहरणानेच दाखविलेले आहे. बागलाण हे महाराष्ट्रातील स्थलनाम शक जमातीच्या महाराष्ट्र भूतीमील एका कालाच्या सञ्चाराची खूण आहे. ही गोष्ट येथे ध्यानात ठेवणे अगत्याचे आहे.

हिंगोली, हिंगलज –

परभणी जिल्ह्यात हिंगोली हे तालुक्याचे ठिकाण, अव्वल इंग्रजी अंमलातील सेनेचे स्थान आणि कापूस पैदासीचे केंद्र आहे. हिंगोली नावाचे हे एकच ठिकाण अख्या महाराष्ट्रात उपलब्ध आहे. धाराशीव जिल्ह्यात तेर ह्या प्राचीन ऐतिहासिक गावाजवळ हिंगलजवाडी हे खेडे असून, त्या गावात हिंगुलजा देवीचे एक अर्वाचीन छोटेसे देऊळ आहे. गड हिंगलज हे कोल्हापूर जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाणही सर्वपरिचित आहे. या तीन गावांखेरीज या नावाची अन्य गावे उपलब्ध नाहीत. हिंगोली हा शब्द भाषाशास्त्रदृष्टया हिंगलजपुरी या संस्कृत शब्दापासून ग्रामीण जीवनात अपभ्रष्ट बनत हिंगल उरी, हिंगोली असा बनू शकतो. याची प्रत्नलेखबद्ध व ग्रंथनिविष्ठ रूपे प्राप्त झाल्यास या म्हणण्याला अधिक बळकटी येईल. परंतु यांच्या अभावी या व्युत्पत्तीवरच वितंबावे लागत आहे. भारतीय प्रत्नलेखसंग्रह खंड

३ (corpus Inscriptionum Indicarum, vol. III) मध्ये फ्लीट या विद्वानाने मिहरौली या दिल्लीच्या दक्षिणेस १४ किलोमीटरवर असलेल्या गावाची व्युत्पति मिहिरपुरी या मूळावरून दिलेली आहे. व्याघ्रपुरी या शब्दापासून वाघोली अशी अनेक ग्रामनामे महाराष्ट्रात विखुरलेली आंहेत. र ध्वनीचा ड बनून गुजरात देशात नंदीपूर यापासून नांन्दोड बनल्याची उदाहरणे इतिहासज्ञांस ज्ञात आहेत. म्हणून हिंगलजपुरी शब्दापासून हिंगोली शब्द बनणे शक्य आहे असे सांगवयाचे आहे.

हिंगुलजा ही दक्षिण बलुचिस्तानातील अरबी (म्हणजे प्राचीन ईराणी) समुद्राला मिळणारी सिंधुनदीला समान्तर वाहणारी पश्चिमेकडील नदी होय. आजदेखील तिचे हेच नाव रूढ व चालू आहे. ईस्लामसम्पर्कापूर्वी या भागात हिंगुलजा देवीचे मोठे प्रसिद्ध देवालय होते. हिंगुलजा हे त्या भागात शंकर-महादेवपत्नी उमा पार्वतीचे नाव होय. त्या भागातील हे अत्यंत प्रसिद्ध देवालय होते असे इतिहासनमूद आहे. सिंध, राजस्थान, मुलतान, सौराष्ट्र आदि भागातून भारतीय भक्तगण तेथे यात्रेस जमत, असे आढळून येते. मुहम्मद कासिम या अरब सेनापतीने दाहिर (भारतीय धैर्यसेन) याच्यावर केलेल्या हल्ल्याच्या काळी (शक ६३३) हिंगुलजादेवीचे यात्रास्थान प्रसिद्ध होते असे दिसूत येते.

मुसलमान आक्रमक भारतात आले. त्यानी तेथील प्राचीन प्रसिद्ध व पवित्र स्थानांची नावे, आपणाला पूज्य, आदरणीय वा प्रिय वाटणाऱ्या व्यक्तींच्या नावाने बदलून टाकली याची इतिहासातील नोंद, परमसहिष्णु मुगल सम्राट जलालूद्दीन अकबरापासून सुकुंचित जातीय व राजकीय भावनेने पछाडलेल्या आला हजरत मीर उस्मान अली खान आसफजाह, निजामुल्मुल्क या शक १८७८ मध्ये पदच्युत झालेल्या हैद्राबादच्या निजामापर्यन्तच्या अनेकांची मिळते. शक १७७५ मध्ये (इ. स. १८५३) मध्ये मेडोज टेलर हा उदार इंग्रज कलेक्टर नळदुर्ग (धाराशीव, उस्मानाबाद) जिल्ह्याचा अधिकारी होता. जनहिताची अनेक कामे त्याने केल्याची नोंद आहे. त्याचे अनेक ग्रंथ जुन्या पिढीतील इतिहासज्ञांस ज्ञात आहेत. तो हुशार समबुद्धि व लोकहितदक्ष होता. सोलापूर हैद्राबाद या राजमार्गाचा आरम्भ, दुष्काळी काम म्हणून, मेडोज टेलर यानेच केलेला आहे. त्याने या पहाडी भागात बांधलेल्या तळ्यांचीच दुरूस्ती, हैद्राबाद व महाराष्ट्र शासनाने नुकतींच केलेली आहे. पडीत जमीन वहिवाटीस आणण्यासाठी त्याने टेलनगर नावाची एक छोटीसी वाडी नळदुर्गजवळील भागात बसविली. तो अद्यापही राजस्व विभागाच्या नोंदीत पाहावयास उपलब्ध आहे. या विषयान्तराचा हेतू हा की परकीय शासकांनी आपल्या संस्कृती-

नुसार ग्रामनामे, स्थळनामे बदललेली इतिहासात नमूद आहेत. काहींचा काल ठाऊक असतो; काहींचा नसतो. तेलंगणातील प्रसिद्ध निजामाबाद नगराचे परवापर्यंतचे नाव इंदूर होते. फिरश्ता याने आपल्या इतिहासात या इंदूर शहराचा उल्लेख केलेला आहे. परंतु इंदूरचे नामान्तर गेल्या ७५ वर्षात झाले. म्हणून फिरश्ताच्या इतिहास-ग्रंथाचे इंग्रजी भाषान्तरकार मेजर ब्रिग्ज याला इंदूरचा शोध लागला नाही.

अजंता व कार्ले :-

अजन्ता येथील लेणी भारतीयांच्याच नव्हे तर जगाच्या कुतुहलाचा विषय होत. या अजन्ता स्थलनामची व्युत्पत्ति काय ? महादेवशास्त्री जोशी यांच्या संस्कृति कोशात अजंटा असे रूप वापरले आहे. ते अजन्ता शब्दाचे इंग्रजी प्रभावाने अपभ्रष्टी-करण असून व्युत्पत्तीची चर्चा केलेली नाही. परंतु बुद्ध परम्परेत रूढ असलेल्या एका अर्हन्ताची दन्तकथा उल्लेखिली आहे. कृ. पां. कुलकर्णी यांनी अजन्ता शब्दाची नोंद घेतलेली नाही. अजन्ता येथील लेणीसंचात सर्व-प्राचीन लेणी बुद्धकालीन, बौद्ध आहेत. शककालाच्या पहिल्या शतकात गुजरात, माळवा, महाराष्ट्रात वावरणारे शक लोक बुद्धानुयायी होते, या पंथाबद्धल त्याना विशेष आपुलकी होती असे आता विद्वानानी निश्चित केले आहे)[१]. अजन्ता येथे वावरत असलेल्या बुद्धधर्मानुयायात शक जमातीचा एक विशिष्ट गट होता. त्याचे वैशिष्टय म्हणजे बुद्धाच्या मूर्ति स्थापणे. विहारनिर्मिती करणे, पिण्याच्या पाण्याची कुण्डे बांधणे, बुद्धभिक्षुंच्या अन्नवस्त्रनिवासांची सोय पाहाणे इत्यादी दिसून येते. आम्हाला येथे एवढेच जतावावयाचे आहे की, या बुद्धानुयायात शकजमात प्रामुख्याने वावरत होती. दुसरी गोष्ट म्हणजे या विशिष्ट कालात अर्हत् शब्द एखाद्या थेराच्या पीठाचा वाचक बनलेला होता. अर्हत् म्हणजे प्रीस्टहुड असा इंग्रजी अर्थ विद्वानांनी या शब्दाला दिलेला आहे. थेरांचे अनेक पंथोपपंथ पडलेले होते. फर्दापूरच्या परिसरात असलेल्या या बुद्धपीठात एखाद्या उपपंथाचे वा मठाचे वर्चस्व असणे सहज अनुमानिता येते. तेथे एखादा प्रसिद्ध अर्हत् म्हणजे बुद्धपंथीय स्वामी किंवा गोस्वामी असणे शक्य आहे. त्याच्या आदरार्थी अर्हन्तः किंवा अर्हन्तक या शब्दापासून अजन्त शब्द बनलेला आहे. रफार अर्धा असल्याचे त्याचा लोप होतो आणि ईराणी भाषा-शास्त्रानुसार ह या ध्वनीचे रूपान्तर ज ध्वनीत होते. संस्कृत अर्ह शब्दाचे रूपान्तर ईराणी (फार्सी) भाषेत अर्ज, अर्ज़ान्, अर्ज़ानी असे होते. सं. वराह शब्द वराज़ शब्दात रूपान्तरित होतो. संस्कृत आणि अवेस्ता या भाषांच्या परस्पर संबंधांची चर्चा भाषा-कोविदांनी केलेली आहे.)[२] स्व. तारापोरवाला यांनी वरील नियमानुसार बदलणाऱ्या शब्दांची उदाहरणे दिली आहेत. संस्कृत होता शब्दाचे अवेस्ता रूप ज़ओता असे

---

१. अर्ली बुद्धिस्ट आर्किटेक्चर, एच्. सरकार, दिल्ली, १९६६.

२. सायन्स ऑफ लॅंग्वेज : जे. तारापोरवाला, कलकत्ता १९६२, पृ. ३१२.

होते. सं. महान्तम् = मज़ान्तम्, सं. हस्तः = अवे. ज़स्तो (प्राचीन ईराणी दस्त), सं. अहम् = अवे. अज़म्, सं. अहिः = अजिश, सं. दहति = दज़इति इत्यादी.

वरील नियमाचा येथे उल्लेख यासाठी की महाराष्ट्रातील शककालाच्या पहिल्या शतकातील बुद्धानुयायात शक जमातीचा एक प्रभावी गट असल्याने अर्हन्तः अथवा अर्हन्तक शब्दाचे रूपान्तर शकसम्पर्कामुळे अजन्ता असे होणे सहज शक्य आहे. हीच विचारसरणी कार्ले (लेण्याचे) गावाची कुळीमुळी शोधण्यासाठी वापरली पाहिजे. कार्ले शब्दाचे प्रत्नलेखनिविष्ट रूप वल्लूरक, वलूरक असे आहे. त्याच गावांला पुढे कार्ले असे रूप मिळालेले आहे. वल्लूरक शब्दाकडे ईराणी भाषाशास्त्रीय प्रभावाच्य प्रकाशात पाहिल्यास व संस्कृतातील व ध्वनीचा अवेस्ता शाखेत क, ग होतो हे ध्यानी घेतल्यास हा शब्द वृक (लांडगा) शब्दापासून निघाला असावा असे वाटते. ईराणी भाषेत वृक शब्दाचे रूपातंर गुर्ग असे होते. कास्पिअन समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील जंगल प्रदेशास गुर्गिस्तान असे नाव ईराणात आजदेखील चालू आहे. संस्कृत वज्र शब्दाचे रूपातंर गुर्ज़ असे आहे. तसेच सं. वृत् धातूचे ईराणी समीकरण गर्दीदन असे होते. म्हणजे सं. व ध्वनीचे ईराणी रूपांतर ग ध्वनीत होते. वल्लूरक हे आर्यभारतीय भाषारूप आहे. वल्लूरक शब्दातील प्रथमाक्षर व ध्वनीचे क झाल्यास, पुढील अक्षरद्वित्वामुळे, त्या क ध्वनीस दीर्घत्व येते. र आणि ल ध्वनींची अदलाबदल आर्यभारतीय भाषात नेहमीच आहे. जन्म शब्दाचे मराठी ग्रामीण रूप जलम असे असून दक्खिनी हिंदीत ते रूप जरम असे आढळते. वल्लूरक शब्दाचे रूप कालूरक असे होऊन कारूलक, कारलअ, कारले, कार्ले अशी रूपे प्रवाहपतीत आहेत. आतापर्यंत ज्यांना आपण पैशाची म्हणून समजत आलो त्या वस्तुतः पूर्व ईराणातील अवेस्ता भाषेच्या प्रभावाने वल्लूरक शब्दाचे रूपांतर कार्ले शब्दात झाले असे वाटते. या पैशाची भाषेतील गुणाढ्यलिखित बृहत्कथा ग्रंथ आता उपलब्ध नाही. पैठण येथील सातवाहन राउळात पैशाचीचा शिरकाव झालेला असल्याचे तुटक तुटक का होईनात, पण नोंदले गेलेले उल्लेख या संदर्भात बोलके आहेत.

एरण, एरंगल –

एरण हे मध्य प्रदेशातील सागर जिल्ह्यात शक जमातीच्या प्राचीन प्रभावावशेषाचे स्मारक आहे. एरण हा आर्याणाम्, अरियन, अइर्यन, एरिकिरण–त्र, ऐरिकिण अशा अवस्थान्तरातून घडला गेला असल्याचे आम्ही आपल्या एका लेखात मांडलेले आहे.)[1] याच मुद्यांचा अधिक बारकाईने विचार करून, एरण, अवगाण, अफगान आणि अरीआण–हरियाना (एक भारतीय राज्य) ही सर्व प्रदेशनामे आर्याणाम, ईराण शब्दाची रूपान्तरे व अवस्थान्तरे होत, असे आम्हीं भारतीय इतिहास कॉंग्रेस, वाराणसी येथील अधिवेशनातील इंग्रजी प्रबन्धात प्रतिपादिलेले आहे. आता बृहन्मुंबईत सामील

१. भा. इतिहास आणि संस्कृति, मुंबई, पृ. २३, ऑक्टोबर १९६९.

करण्यात आलेले, परंतु केशवाचार्य याने आपल्या महिकावतीच्या बखरीत उल्लेखिलेले समुद्र किनाऱ्यावरील एरंगल ग्राम व एरंग टेकडी याच प्रभावाचे प्रतीकरूप होते.

आणि केज

बीड जिल्ह्यात बालाघाटावर धारूर (उंची समुद्रसपाटीपासून २४०० फूट) किल्ल्यापासून दक्षिणेस ८ मैलावर केज नावाचे एक छोटेसे पण तालुक्याचे ठिकाण आहे. केज नावाची दुसरी गावे महाराष्ट्रात आढळत नाहीत. महाराष्ट्रात साधारतः एकूणचाळीस हजार गावे आहेत. एकाकी वसलेले केज गाव आपणाला दक्षिण बलुचिस्तानात असलेल्या केच या प्रसिद्ध ठिकाणची आठवण करून देते. केज नावाची व्युत्पत्ति व इतिहास एक दृष्टीने या केच नगरीशी संबंधित असावा असे वाटते. याला कारण या बलुचिस्तानातील वजनदार माणसे महाराष्ट्रातील या भागात वावरली व त्यानी हे अवशेष मागे ठेवले, असे अनुमानिले तर बावगे होणार नाही.

भाषिक प्रभाव–

भारतात शक जमातीचे आगमन होण्यापूर्वी पेशावर (पिशाचपूर) येथे कुषाणवंशीय एक जमातीचे राज्य बरेच दिवस चाललेले होते. हे शक मूलतः तुखारिस्तान म्हणजे हिंदुकुश पर्वतराजीच्या उत्तरीय प्रदेशातील रहिवासी होते. परंतु त्या प्रदेशातील त्यांची राजकीय सत्ता संपुष्टात आल्याने त्यानी नैर्ऋत्य अफगानिस्तानातील हलमंद नदीच्या मुखाजवळील जरंग या प्रदेशात इ. स. पूर्व १५० च्या सुमारास वसाहत केली. याच प्रदेशाला कालान्तराने शकस्थान, सगिस्तान सजिस्तान, सइस्तान, सीस्तान अशी रूपे असलेले नाव प्राप्त झाले. शककालाच्या चौथ्या पांचव्या शतकापासून आढळणारे व हूण तोरमण याच्या भारतातील शिलालेखात आढळणारे जऊव्ल वा ज़ाबूल हे त्यांचे राजधानीचे नगर होते. जाबूल आजदेखील अस्तित्वात आहे. शक जमात या प्रदेशातूनच अफगानिस्तान व बलूचिस्तान यावर आपली सत्ता कायम करीत करीत भारतात उज्जयिनी, सौराष्ट्र आदीपर्यंत पसरलो. या शक जमातीच्या भाषेला शकभाषा Scythian Language असे नाव मिळालेले आहे. या शक भाषेचे तुखारिस्तानी भाषेशी नक्की काय नाते होते हे आतापर्यंत नक्की सांगता आलेले नाही. परंतु तुखारी भाषेचा एक शिलालेख शक १८७९ मध्ये उपलब्ध होऊन तो जगापुढे आलेला आहे. शकभाषा तुखारी भाषा यांचे फार जवळचे नाते असले पाहिजे. बगलंगमध्ये तुखारी भाषा शककालाच्या दुसऱ्या शतकात नांदत होती असे आढळून येते.

शक लोकांच्या भाषेचा मराठी भाषेवर बराच प्रभाव पडलेला आहे. असे मोलस्वर्थ व क्याण्डी यांच्या मराठी-इंग्रजी कोशाच्या प्रास्ताविकात म्हटले आहे.

मोलस्वर्थ याच्या कोशाच्या शक १७७९ (इ. स. १८५७) च्या आवृत्तीला जॉन विल्सन या विद्वानाची इंग्रजी भाषेतील प्रस्तावना जोडलेली आहे. या प्रस्तावनेत)[१] विल्सन म्हणतात–

Independently of the Arabic and Persian words which have found their way into the Marathi language, principally from the Muhammadan conquests and dominion and the exigencies of commerce and social intercouse, it has two distinct lingual elements, the Scythian (or Turanian) and the Sanskrit, which are both easily recognised and distinguished by the philologist.

The Scythian element of the Marathi is obviously the more ancient of the two as far as its present locality is concerned. It is still a good deal in use, especially among the lower orders of the people, and in the business of common life It claims almost all the word beginning with the cerebral letters, which, as initials, were probably not originally in use in the Sanskrit; almost all the words formed from initative particles, both simple and reduplication, which are often very expressive, and are not now of an arbitrary character, whatever, they might have been before they got established in the *Usus loquendi* words in of the people by whom they were originally formed. The Scythian the Marathi are, in general, like those of the other Turanian tongues more in their forms than in their sounds.

मराठी भाषेवरील शकभाषाप्रभावासंबंधी आम्ही जॉन विल्सन याचे अन्य उपलब्ध साहित्य पाहाण्याचा प्रयत्न केला. इंडियन अँटिक्वेरी खंड ३, पान २२१ वरील लेख, वरील प्रस्तावनेखेरीज थोडा संबंधित आहे. त्याच्या इंग्रजी चरित्रात (प्रकाशन इ. स. १८७८) या प्रश्नांसंबंधी मूकता आहे. डॉ. पिगे (मुंबई शक १८८२) याच्या पुस्तकातून काही विशेष लभ्य नाही. विलसन हा स्कॉटिश धर्मोपदेशक, याने महाराष्ट्र व गुजरात, सिंध प्रदेशात प्रवास केलेला आहे. त्याने ईराणी, शकभाषा पष्तू आदि भाषांचा खोल अभ्यास केलेला आहे असे मुळीच दिसत नाही. त्याची विधाने बरीचशी मोघम स्वरूपाची आहेत. ती कदाचित् सत्य, कदाचित् असत्य असू शकतात. ती सत्य असल्यास त्याला त्याने विशेष पुरावा दिलेला नाही म्हणून ही विधाने निःसन्देह स्वीकार्य नव्हेत. इ. सन पूर्व ५०० च्या हखामनिश राज्यघराण्याच्या विपुल प्रस्तलेखात, त्याने आहे असा सांगितलेले ट वर्ग (Cerebrals) वर्ण मुळीच नाहीत. तसेच ते सुर्खकोतल (शककाल ३१ – इ. स. १०९) या प्रस्तर-

१. मोलस्वर्थ व क्याण्डी, मराठी–इंग्रजी कोश, इ. १८५७, पृ. २२

लेखात नाहीत. म्हणून ते शकभाषेतून आले. हे म्हणणे निरर्थक होय. ते संस्कृत भाषेत अन्य भाषेतून आले हेही योग्य नव्हे. उलट हे ध्वनि भारतीय भाषात आहेत, ईराणीत नाहीत असे दिसून येते. थोडक्यात बोलावयाचे म्हणजे विल्सन याने उपलब्ध पुराव्याला न झेपणारी विधाने वरील लेखात केलेली आहेत. ती पुराव्यांनी सिद्ध करावयास पाहिजेत. मराठीवरील ईराणी व शकभाषा प्रभाव हा संस्कृत प्रभावापेक्षा प्राचीन आहे, हे म्हणणे निराधार व त्याज्य होय. परंतु विल्सन याचे म्हणणे अधिक खोलात जाऊन तपासले पाहिजे असे वाटते.

उभयान्वयी की ? –

मराठी भाषेतील उभयान्वयी की हे अव्यय मराठी विद्वानांच्या मतभेदाचा विषय बनलेला आहे. ज्यूल्स ब्लोक यांच्या मते ते फार्सीतून हिंदीच्या माध्यमाने मराठीत आलेले असावे. वि. का. राजवाडे यांच्या मते ते मुसलमानाच्या आगमना-नंतर ईराणी भाषेतून मराठीत आलेले आहे. अन्य मराठी विद्वानांनी राजवाडे यांच्या मताचेच अनुसरण केलेले आहे. फार्सी व मराठी असा एक लेख महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे या त्रैमासिकात क्र. १६९, १७० शक १८८९ मध्ये दोन भागात आम्ही लिहिलेला आहे. त्या लेखात असे दाखविण्यात आलेले आहे की, ज्ञानेश्वरी, शिशु-पालवध, लीलाचरित्र, स्मृतिस्थळ इत्यादि इस्लामसम्पर्कपूर्व ग्रंथात की हे उभयान्वयी अव्यय थोड्या प्रमाणात का होईना, पण मराठी भाषेत प्रयुक्त होत होते. त्याचे प्रमाण अल्प आणि जे, जो या उभयान्वयी अव्ययाचे प्रमाण अधिक आहे. परंतु त्याचे मराठीत अस्तित्व या काळी असणे हे विचारणीय आहे.

सुर्खकोतल (बगलान, उत्तर अफगानिस्तान) येथे कुषाण कालातील शककाल वर्ष ३१ मधील एक तुखारी भाषेत व ग्रीक लिपीत लिहिलेला तुखरी म्हणजे दरी किंवा प्राचीन अफगानी फार्सी भाषेचा प्रस्तरलेख उपलब्ध असून, तो फ्रेंच व फार्सी भाषात प्रकाशित झालेला आहे. फार्सीतून या लेखाचे सम्पादन डॉ. अब्दुल हय्य् हबीबी यानी शक १८८५ मध्ये काबूलहून, अफगानिस्थान इतिहास परिषदेच्या वतीने केलेले आहे)[१]. या प्रस्तरलेखात किद् म्हणजे की (उभयान्वयी अव्यय) या शब्दाचा वापर दोनदा (शब्द क्रमांक ५० व ६०) झालेला आहे. हबीबी यानी या शब्दाची सुगदी, पहलवी, काबूली, फार्सी, पष्तू इत्यादि भाषातील रूपे दिलेली आहेत. (पृ. ८९) काही रूपात हलन्त द् ध्वनीचा लोप झालेला असून, काहीत हे व्यंजन शेष आहे. डॉ. हबीबी यानी या किद् अथवा कि रूपाचे संस्कृत समीकरण मांडलेले नाही. परंतु ते संस्कृत यत् आहे यात संदेहास जागा नाही. ध्वनि व अर्थ या दोन्ही दृष्टीनी हे समीकरण योग्य आहे. प्राकृत भाषामध्ये य या ध्वनीचे ज ध्वनीत परिवर्तन नेहमी होत आलेले आहे. यमुना व जमना हे उदाहरण याचा ढोबळ

१. मादर-ई ज़बान-ई दरी, डॉ. अब्दुल हय्य्, हबीबी, काबूल, शक १८८५.

नमूना आहे. संस्कृत यत् अव्ययाची प्राकृत भाषातील रूपे, जे जो अशी आहेत. तसेच सं. यकृत् अवयवाचा ईराणी अवतार जिगर आहे, असे विद्वान् मान्य करतात. या ज ध्वनीचाच अफगानी भाषाकुलात क ध्वनि झालेला दिसून येतो.

मला असे म्हणावे असे वाटते की, मराठी भाषेत इस्लामधर्मीय अफगान व ईराणी लोक शककालाच्या अकराव्या शतकाच्या आरंभापासून भारतात स्थिरावण्याच्या पूर्वी, या कि उभयान्वयी अव्ययाचे महाराष्ट्रातील आगमन, अफगानिस्तान व सइस्तान या प्रदेशातून वायव्य, पश्चिम भारतात व महाराष्ट्रात येऊन राहिलेल्या शक टोळचांच्या शकभाषा, तुखारी भाषा यातून मराठीत झालेले असलेले पाहिजे. मला असे अनुमानावे असे वाटते की, हा उभायान्वयी की गुजराती, राजस्थानी, पंजाबी व सिंधी भाषातही इस्लामागमनापूर्वी असला पाहिजे. या भाषातील तत्कालीन उपलब्ध साहित्य या दृष्टीने बारकाईने तपासिले पाहिजे. मला फक्त गुजराती भाषेचा किंचित सुगावा घेता आला. डॉ. छो. र. नायक यांनी हे अव्यय फार्सीतून आले आहे असे म्हटलेले आहे)[1] वरील दृष्टीकोणातील खोलीने त्यांनी या प्रश्नाकडे पाहिलेले नाही. अधिक प्रयत्नांची गरज अर्थात राहातेच. राजस्थानीच्या बावतीत स्व. तेस्सितोरी आणि हिंदीच्या बाबतीत डॉ. धीरेन्द्र वर्मा यांनी या दृष्टीने या प्रश्नाकडे पाहिलेले नाही असे वाटते. मराठीतील या कि उभयान्वयी अव्ययाचे अशा प्रकारचे अस्तित्व प्राचीन शक जातिप्रभावाचे अवशेषरूप आहे असे दिसून येते.

मुस्लिमकालाच्या शेवटी शेवटी उत्तरेतून महाराष्ट्रात आलेल्या राजपूत जमातीमध्ये काही महिलाची नावे दसोदा या रूपात आढळतात. राजस्थान, मध्यप्रदेशातही हे नांव आढळते. अशा नावाच्या काही महिला माझ्या परिचयाच्याही आहेत. आता दसोदा हे स्त्री–नाम कसे आले हे पाहाणे मोठे मनोरंजक आहे. हे नाव यशोदा या संस्कृत नामाचे रूपांतर आहे असे दिसून येते. यशोदा शब्दाचे जसोदा हे भारतीय प्राकृत भाषा परंपरेला सुसंगत असेच आहे. परंतु त्यापासून दसोदा हे रूपांतर रूप कसे व्युत्पन्न झाले ! संस्कृत ज ध्वनीचे रूपांतर ईराणी भाषेत द ध्वनीमध्ये होते. हस्त शब्दाचे रूपांतर अवेस्ता बोलीत जस्त असे होते तर ते प्राचीन फार्सी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दारयवहूच्या प्रत्नलेखभाषेत दस्त असे होते. संस्कृत जामातृ या शब्दाचे ईराणी रूप दामाद असे आहे. याची आणखीही उदाहरणे देती येतील. यावरून हा भाषाशास्त्रीय नियम लक्षात ठेवण्यासारखा आहे. म्हणजे यशोदा शब्दापासून दसोदा हे रूपांतर ईराणी भाषा व परंपरा याचे प्रतीक आहे असे अनुमानता येईल. हा प्रभाव मराठी भाषेत झालेला दिसून येत नाही. परंतु नियमाचा प्रभाव हा ईस्लामाच्या भारतातील आगमनापूर्वीचा आहे हे लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे. भारतीय भाषाप्रांगणात असा प्रभाव होता याचा येथे सुगावा लागतो.

१. गुजरातीपर अरबी–फारसीनी असर, डॉ. छो. र. नायक, १९५६, पृ. ३८९.

समारोप

सारांश हा की महाराष्ट्र धर्म या संकेताची मुळी ही प्राचीन काळात शिरलेली आहे. ती शक २५० च्या सुमारातील शक जमातीच्या क्षत्रराष्ट्र धर्मापर्यंन्त पोचते असे दिसून आलेले आहे. ईराण–अरब या देशात मिल्लत असा एक शब्द वापरतात. त्याचा अर्थ कोशात समाज, राष्ट्र असा दिलेला आहे. परंतु हा मोघम अर्थ आहे. त्याचा खरा व्यवहारातील अर्थ सुसंघटित समाज, ऐक्य भावनेने वावरणारा समाज असा आहे. त्यात आधुनिक राष्ट्रीयत्वाचा अर्थ नाही. तो साधा समाजही नव्हे. म्हणून ईराण विमान वाहतूक संघटनेचे नाव **हवाइए–मिल्लीए–ईरान** असे आहे. येथे मिल्ली म्हणजे ईराण राष्ट्र किंवा ईराणी संघटित समाज असे आहे. येथे मिल्ली म्हणजे ईराण राष्ट्र किंवा ईराणी संघटित समाज असा आहे. तसेच दिल्ली येथे मुसलमानाचे एक विद्यापीठ **जामिए–मिल्लिया** असे आहे. मिल्लत शब्दाला हा अर्थ कसा आला आहे हे सांगता येत नाही. परंतु हा अर्थ ईराणी सम्पर्काने आलेला आहे. महाराष्ट्र धर्म या कल्पनेची आणखीं एक दृष्टी आहे. न्यायमूर्ती रानडे, राजवाडे यानी लाविलेला व वरती चर्चिलेला महाराष्ट्र धर्माचा अर्थ मान्यता पावला तर, या धर्माचा विसाव्या शतकातील आधुनिक राष्ट्रीयत्वाचा आरम्भ म्हणून उलेख करावा लागेल. राष्ट्रीयत्वाच्या भावनेत स्वराज्य आणि त्यासाठी सहसंवेदनाशील सुसंघटीत समाज ही दोन्ही अभिप्रेत आहेत. महाराष्ट्र धर्माने स्वराज्य आणि समाजैक्याची हाक दिलेली आहेच, म्हणजे महाराष्ट्र धर्मात आजच्या राष्ट्रीयत्वाची बीजाङ्कुरे आपणाला दिसून येतात. महाराष्ट्र मंडळाने ही कल्पना कृतीत उतरविण्याचा प्रयत्न केला. शिवाजीने त्यासाठी योग्य भूमी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अशी भावना महाराष्ट्रात वस्तुतः किती निर्माण झाली होती, याचे प्रत्यंतर छत्रपति संभाजी यांच्या मरणोत्तरकाली महाराष्ट्रातील स्वराज्य टिकविण्याच्या मराठ्यांच्या प्रयत्नात (शक १६११ ते १६२९) भरपूर दिसून येते. या समाजात सामान्यतया मुस्लिमांचा समावेश नव्हता. परंतु मुस्लिमेतर कोळी, कुंभार, जंगम आदींचा या समाजात समावेश निश्चितपणे होता असे आढळते. या कल्पनेचा व्याप व विस्तार भारत या अखिल भूप्रदेशापर्यंत झालेला नव्हता. खण्डभूत अशा या देशात ही कल्पना निर्माण होणे तत्काली कठीण होते. भौगोलिक, भाषिक, वांशिक, सांस्कृतिक एकतेच्या पार्श्वभूमीची अनुकूलता असलेल्या पाश्चात्य देशातही या राष्ट्रीयत्वाचा कल्पनेचा उगम झालेला नव्हता. तरी पण महाराष्ट्र धर्म या संकल्पनेत, मर्यादित अर्थाने व मर्यादित अशा महाराष्ट्र भूमीत राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचे बीज अंकुरत असलेले आपणाला येथे दिसून येते. राजवाडे यांचा अर्थ मान्य केला तर, वरीलप्रमाणे अर्थ लावणे हा मूळ प्रमेयाचा उपसिद्धान्त होय.

परिशिष्ट :

१. श्रीधरवर्मा याचा कानाखेरा शिलालेख.

राज्यवर्ष १३ वे. (शक २०१ ? = इ. स. २७९)

१. सिद्धम् भगवतस्त्रिदशगणसेनापतेरजितसेनस्य स्वामि-महासेन (स्य) महा [भक्त ?] [स्य] [आदित्य] वीर्य्या [ज्जितविजय]
२. धर्मविजयिना शक-नंद-पुत्रेण महादण्डनायकेन शकेन श्रीधरव (र्म्म) णा वर्षे [सह] स्राय स्वराज्याभिवृद्धिकरे वेजयिके संवत्सरे त्रयोदश [मे]
३. श्रावणबहुलस्य दशमीपूर्व्वकमेतद्दिवसं कल्याणाभ्युदयवृध्द्यर्थमक्षयस्वर्ग्गावाप्तिहेतोर्द्धर्म्मयशो (ऽ) र्थं धर्मासि (भि) संबुद्धया श्रा (श्र) द्ध [या]
४. शाश्व [तं] चन्द्रादित्य-[कालिकोयं] ...... (।।) अपि [च] का [न्तः] -: [प्रसन्न] -सलिलः सर्व्वाधिगम्यः सदा
५. सत्वाना [ं] प्रियदर्शनो जलनिधिर्द्धर्म्मामलः [शाश्व] तः (।।)
६. [कू] पः श्रीधरवर्म्मणा गुणवता खानापितो (ऽ) यं शुभः ।।
.... ।।
२०० (+) १ स्वस्त्यस्तु

(दीनेशचन्द्र सरकार, सिलेक्ट इंस्क्रप्शनस् पृ. १८६)

२. श्रीधरवर्मा याचा एरण स्तम्भलेख.

राज्यवर्ष २७ वे (शक २१५)

१. सिद्धम् (।) राज्ञा (ज्ञो) महाक्षत्रपस (स्य) स्ववीर्य्या [र्ज्जित] विजयविपुल कीर्तेर··स्य
२. शकनन्दपुत्रस्य ध [र्म्म] विजयिनः श्रीधरवर्म्मणः····· [स्वराज्या]-
३. भिवृद्धिकरे वैजयिके सं [व] त्सरे सप्तविंशतितमे २० ७·········
४. एतद्दिवसमेरिकिणाधिष्ठाणे (ने) स्य नगे [न्द्रा] हारबा [हि] रकाया·· [नारा-]
५. यणस्वामिना भक्तपू [र्व्वं] तीर्थगोब्राह्मणपुरोगस्य चाधि······मा······
६. भिवृध्या (द्ध्य) र्थम् [।] राज्ञः आरक्षिकेन (ण) [से] ना [प-]-तिसत्यनागेन म [हाराष्ट] ··प्रमु-
७. खेन महाराष्ट्रेन (ण) शान्तिकर्द्धिसर्व्वसत्व (त्त्व) [सु] खहिताय स्व-......
८. अपि च [।] सिध्य [न्ते] प्रेरितान्तात्पृथुपृथिवीमाशमान (ने) नरेन्द्र ना [गै] रे········
९. वपुषा क्षत्रराष्ट्र [स्य] धर्म्मा [न्] यष्टिश्शिष्टामखण्डस्थितित·········
१०. सेवादररिपु [सु] [हृदां] स्थानमेतत्प्रजानाम् [।।]

✦ ✦ ✦

१४ : एरण, अवगाण, अफगान आणि हरीआण

आर्य शब्द फार प्राचीन आहे. तो ऋग्वेदात अनेक वेळा वापरलेला दिसून येतो. ऋग्वेदाच्या १० मण्डलांपैकी पहिले, आठवे, नववे आणि दहावे मण्डल ही कालदृष्टया मागाहून लिहिलेली आहेत याबद्दल विद्वानांत ऐकमत्य आहेत. ऋग्वेद हा किमान इसवीसनपूर्व पंधराशे वर्षांपूर्वी लिहिलेला आहे हेही बहुधा विद्वन्मान्यच आहे. ऋग्वेदाच्या प्राचीन मानल्या गेलेल्या मण्डलांतूनही आर्य शब्द आलेला आहे. आर्य शब्दाचा अर्थ व व्याप्ति वैदिक इण्डेक्स या ग्रंथात सांगितलेली आढळून येतात. या ग्रंथाच्या हिन्दी अनुवादावरून)[१] हा अर्थ विशद होईल. "ऋग्वेद से लेकर आगे वैदिक साहित्य में यह सामान्यतः आर्य जाति के लिए प्रयुक्त हुआ है, जो शतपथ ब्राह्मण में दिए हुए औपचरिक विभाजन के अनुसार ब्राह्मण, क्षत्रिय और वैश्य जाति के सदस्य होते थे। आर्यों को दासों और शूद्रों का भी विरोधी कहा गया है। कभी कभी इस व्याहृति का प्रयोग वैश्यों तक ही सीमित है, और ब्राह्मणों तथा क्षत्रियों के लिए विशेष उपाधियों का प्रयोग किया गया है।...... आर्य शब्द (स्त्रीलिंग 'आर्या' अथवा 'आरी' बहुधा विशेषण के रूप में आर्य वर्गों (विषः), अथवा नामों (नामन्) अथवा वर्णों (वर्ण), अथवा आवास (धामन्) के वर्णन के लिए प्रयुक्त हुआ है। देशों पर आर्यों के प्रभुत्व विस्तार (व्रत) के सन्दर्भ में भी इसका प्रयोग हुआ है।"

धाम म्हणजे स्थान, ठिकाण याचे विशेषण म्हणून ऋग्वेदात)[२] आर्य शब्दाचा वापर असा आलेला आहे. (९.६३. १४).

एते धामान्यार्या शुक्रा ऋतस्य धारया। वाजं गोमन्तमक्षरन् ॥ १४॥
सायणाचार्यांनी आर्य शब्दाचा विस्तार "आर्या आर्याणां श्रेष्ठानां यजमानानां धामानि" असा केलेला आहे. दहाव्या मण्डलात (१०.६५.११)

सूर्यं दिवि रोहयन्तः सुदानव आर्या व्रता विसृजन्तो अधि क्षमि ॥११॥

श्रेष्ठ असे आर्य यज्ञयागादि व्रते कर्मे यांचा विस्तार करीत सर्वत्र वावरतात असे म्हटलेले आहे. आर्य हा शब्द जाति व देश यासाठी वापरला जाण्याचा आरंभ ऋग्वेद कालामध्येच झालेला दिसून येतो.

शिलालेखात आर्य शब्दाचा, वंश किंवा जाति या अर्थाने, कदाचित् सर्वप्रथम, उल्लेख, ईराण देशातील हखामनिश (सखामनीष्य) राजवंशातील

दारयवहु (Darius, धारयद्वसुः) या इसवीसनपूर्व ५२२ ते ४८६ या कालात झालेल्या राजाच्या पर्सिपोलिस या त्याच्या राजधानीच्या जवळील नक्शे-रुस्तुम येथील शिलालेखात सापडतो.)[३] या राजवंशाचा मूळ पुरुष सखामनिश होता. म्हणून त्याचा वंश सखामनीष्य म्हणजेच प्राचीन ईराणी भाषेत हखामनिश किंवा ग्रीक भाषेत Achaemenian. ह्या दारयवहु राजाचा पणजा आरियारम्न (अर्यारम्ण) नावाचा होता. हा दारयवहु स्वतःला क्षत्रियाणां क्षत्रिय म्हणजेच शाहानशाह आणि आपल्या वंशाला आरिय (आर्य) म्हणतो, व स्वतःला आर्यचित्र, आर्यवंशीय म्हणवतो. ही माहिती त्याच्या अनेक शिलालेखांतून आलेली आहे. या दारयवहूचा पुत्र क्षयार्शा (Xerxes) याने इसवी पूर्व ४८६ ते ४६५ असे राज्य केले. त्याचेही शिलालेख प्राप्त आहेत. त्याने आपल्या पर्सिपोलिस या राजधानीजवळील शिलालेखात आपली वंशावळ देऊन, आपण आर्य व आर्यचित्र (आर्यवंश्य) आहोत असे प्रतिपादिले आहे.

भारतातील शिलालेखातूनही आर्य या शब्दाने वंश व्यक्त करण्याची परम्परा प्राचीन व अविछिन्न अशी दिसून येते. कदाचित् सर्वप्रथम उल्लेख अशोकानेच केलेला असावा. अशोकाच्या वैराट (जयपूर जिल्हा) येथील एका प्रस्तरखण्डावरील लेखात हा प्राप्त होतो. अशोकाने इसवी सनपूर्व २७३ पासून २३२ पर्यंत राज्य केले. त्याने आपल्या या धर्मोपदेशात अलियवसाणि (आर्यवंशाः) असा उल्लेख केलेला आहे.

शक नावाच्या जमातीची आपणाला चांगली ओळख आहे. त्यांचे राज्य व अधूनमधून साम्राज्य, वायव्य भारतात मथुरेपर्यंत पसरलेले होते. सौराष्ट्रातील गिरनार (गिरिनगर) आणि उज्जयिनीहून या शकांची राज्ये शतकानुशतके चाललेली आहेत. नहपान, चष्टन आणि रुद्रदामन् ही नावे सर्वपरिचित आहेत. हे शक आर्यवंशीयच होते, याबद्दल आता विद्वानांची खातरजमा झालेली आहे. पिशाचपुर (पेशावर) येथे कुषाणवंशीय कनिष्काचे साम्राज्य स्थापन होण्यापूर्वी या भागात रञ्जुवुल, षोडास आदि शकनृपांची राज्ये होऊन गेली. या राजांनी विक्रम संवत् आपल्या शिलालेखातून वापरला आहे असे आता विद्वन्मान्य झालेले आहे. षोडास या राजाच्या कालात विक्रमसंवत् ७२ म्हणजे इ. स. १५ मध्ये जैन लोकांच्या आर्यवती या देवीची प्रतिष्ठापना केली असे मथुरा येथे सापडलेल्या शिलाखण्डावरील लेखात म्हटलेले आहे. या प्राकृत लेखाचा संस्कृत अनुवाद)[४] असा–कौत्स्या अमोहिन्या सह पुत्रैः पालघोषेण, प्रौष्ठघोषेण, धनघोषेण च आर्यवती प्रतिष्ठापिता। आर्यवती अर्हतपूजायै ॥ (पृ. १२१)

कनिष्काचा नातू हुविष्क, हुवक्ष (सुवक्ष) याच्या राज्यकालात शक ४४ म्हणजे इ. स. १२२ मध्ये अर्यचेटियिग (आर्यचेटीयक–आर्य श्रेष्ठिक) कुलात

जन्मलेल्या भगनन्दी याच्या शिष्याने एक जैन प्रतिमा करवून दिल्याचा उल्लेख मथुरेजवळ सापडलेल्या एका मूर्तीवर खोदलेला उपलब्ध आहे.)[५] (पृ. १५६)

शक ७२ (इ. स. १५०) मध्ये कोरला गेलेला शकवंशीय राजा महाक्षत्रप प्रथम रुद्रदामन् याचा जुनागढ (गिरिनगर, गिरनार) येथील प्रस्तर लेख अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. संस्कृत भाषेला राष्ट्रभाषेच्या अढळ पदावर प्रतिष्ठापित करून या भाषेतच राजकाज सम्पन्न करण्याचा सन्मान भारतीय शक नरपतींना जातो असे दिसून येते. प्रस्तरादि लेखांसाठी, शुंग वंशानंतर, सर्वप्रथम शक राजांनीच संस्कृत भाषेचा उपयोग केलेला आहे, असे दिसून येते. अनुप्रासयुक्त अलंकृत भाषा लिहिण्याचा उपक्रमही शक नरपतींच्या लेखातूनच आढळतो. नाट्यशास्त्र व नाट्यकला ही शक राजांच्या दरबारात विकसित झाली, हे सिल्व्हाँ लेव्ही याने प्रतिपादिलेले मत अद्यापि भरपूर पुराव्यानिशी खोडून काढले गेलेले नाही. असो. या रुद्रदामन् राजाने आपल्या गिरिनगर अधिष्ठानात भग्नीभूत सुदर्शन सेतुबन्धाच्या पुनर्निर्मितीचे काम आपल्या पल्हववंशीय सुविशाख अमात्याकडे सोपविल्याचा उल्लेख या शिलालेखात केलेला आहे.)[६] तो असा–(पृ. १८०)

पार्थिवेन कृत्स्नानामानर्त्त-सुराष्ट्राणां पालनार्थंन्नियुक्तेन पह्लवेन कुलैप-पुत्रेणामात्येन सुविशाखेन यथावदर्थ-धर्म-व्यवहार-दर्शनैरनुरागमभिवर्द्धयता शक्तेन दान्तेनाचपलेनाविस्मितेनार्य्येणाहार्य्येण स्वधितिष्ठता धर्म-कोर्ति-यशांसि भर्तुरभि-वर्द्धयतानुष्ठितमिति.

या उल्लेखात पह्लववंशीय सुविशाख या मंत्र्याला आर्य हे उपपद लावलेले दिसून येते.

ईराणी म्हणजेच फार्सी भाषेत, अवेस्ताकालात आर्य शब्दाचे ध्वन्यन्तर अरिय असे झालेले आहे. हे विद्वन्मान्य आहे. अरिय हा शब्द वंश, जाति या वैशिष्ट्याचा द्योतक आहे. अलिय हे त्याचे भारतात झालेले रूप वरती पाहायला मिळालेलेच आहे. अफगानी व पश्तू भाषेतही आरिया, आरह असे त्याचे ध्वन्यन्तरित रूप सर्वत्र पाहावयास मिळते. तेथे याचा अर्थ श्रेष्ठ, प्रतिष्ठित किंवा शेतकरी असा आहे.

ईराण

आर्य या वंशवाचक नावावरून भारतीय आर्यांनी आपल्या देशाला आर्यावर्त असे नाव दिलेले आहे. परंतु हा उल्लेख फारच उशीराचा आहे. सर्वप्रथम असा उल्लेख मनुस्मृतीत मिळतो. मनूने आर्यांच्या निरनिराळ्या विकास-विस्तार अवस्थांतील चार देशांचा उल्लेख केलेला आहे. त्यापैकी आर्यावर्त हा अंतिम उल्लेख होय. प्रथम उल्लेख ब्रह्मावर्त असून तो दृषद्वती व सरस्वती या नद्यांच्या

अंतर्वेदीचा प्रदेश होय. ब्रह्मावर्त कोणते याचा विद्वानांत वाद आहे. दुसरा देश ब्रह्मर्षिदेश. तो मत्स्य, पञ्चाल, कुरु व शूरसेन या जनपदांचा. त्यानंतर मध्यदेश. परंतु या सर्व नावांत आर्य हा वंशवाचक शब्द, अंगभूत वा संश्लिष्ट झालेला नाही. परंतु ईराणी आर्य शाखेने आपल्या देशाचे नाव आर्यशब्दसंश्लिष्ट, " अरियन " असे घडविले आहे. ईराण हा देशवाचक शब्द अरियन या मूळ अविस्ता शब्दाचे ध्वन्यन्तरित रूप आहे, हे विद्वन्मान्य आहे. (तसेच ईराणी आर्य आपल्या मूळ मायभूमीस अरियन वएज म्हणत.)[७] डॉ. इब्राहीम पूरे-दाऊद या ईराण विद्याविशारदाने या प्रश्नाचा विस्ताराने ऊहापोह केलेला आहे. त्याच्या पुनरुच्चाराची आवश्यकता नाही असे वाटते.

अफगान

आजचे अफगान लोक आपल्या देशाला "आर्याना" म्हणतात. डॉ. अहमद अली कुहज़ाद या विद्वानाने एक ग्रंथ आंग्लभाषेत " आर्याना अर्थात प्राचीन अफगानिस्तान " असा लिहिलेला आहे. हा ग्रंथ " अफगानिस्तान " या संशोधनात्मक त्रैमासिकातून क्रमशः सन १९५५ ते १९५८ च्या अंकातून प्रकाशित झालेला आहे. कुहज़ाद हे परवापर्यंत अफगानिस्तान शासनाच्या पुराविभागाचे संचालक होते. पुरातत्त्व व प्राच्यविद्या या क्षेत्रात डॉ. कुहज़ाद यांचा अधिकार पाश्चात्य प्राच्यविद्याकोविदांनी ही मानलेला आहे. अफगानिस्तान हे त्रैमासिक अंजुमने–तारीखे–अफगानिस्तान (Societe des Etudes Historiques d, Afghanistan) या संशोधन संस्थेच्या वतीने प्रकाशित होत असे. डॉ. अहमद अली कुहज़ाद आणि अन्य अफगानी विद्वान यांनी सन १९४२ पासून आर्याना हे मासिक फार्सी भाषेतून चालविलेले आहे. डॉ. कुहज़ाद हे स्वतः आर्याना मासिकाचे संस्थापक आणि संपादक होते. या मासिकातील सर्व लिखाण या देशाचा प्राचीन कालातील सुगावा घेणारे आहे. संपादकीय धोरणावरून असे प्रत्ययाला येते की अफगान लोकांना आपल्या आर्यत्वाचा अतिशय अभिमान आहे. हे लोक ऋग्वेद आणि इतर वैदिक साहित्य यांच्याकडे बारकाईने, आपलेपणाने व आदराने पाहात आहेत. परंतु दुर्दैवाने भारतीयांना या घटनांची फार कमी माहिती आहे किंवा ती मुळीच नाही. भारतीयांची ही अनास्था आत्महिताच्या दृष्टीनेही घातुक ठरणारी आहे.

या प्रस्तुत लेखनाचा मुख्य उद्देश अफगान हा शब्द अरियन शब्दापासून निघालेला आहे, हे दाखविण्याचा आहे. तसेच अफगान हा शब्द वराहमिहिराने (शक ४२७- सप्ताश्विवेदसङख्यं शककालमपास्य ····) अनेक वंशगटांबरोबर प्रयुक्त केलेल्या अवगाण शब्दावरून निघाला, व्युत्पन्न झाला असे दाखविण्याचा आहे. तत्पूर्वी आर्य शब्दांची ईराणी व शक सम्पर्काने कशी रूपान्तरे झाली हे पाहिले पाहिजे. ईराणी व अफगानी या भाषात आर्यशब्दाची अरियन वा तत्सम

रूपान्तरे उपलब्ध आहेत. याखेरीज अन्य रूपे अवेस्ता किंवा पहलवी या अवस्थांतही सापडत नाहीत.

ईराणी आर्यांचा भारताशी राजकीय संबंध इसवी सनपूर्व पाचशे वर्षांपासून आहे हे दिसून येते. गौतम बुद्ध हा शाक्यमुनी होता असा पुरावा सर्वत्र दिसून येतो. हे विसरता येत नाही. त्यानंतर शकांचा भारताशी फारच निकटचा संबंध इसवी सन पाचशेपर्यंत, कमीअधिक सातत्याने, येत राहिलेला आहे. शक हा आर्यवंशीय गट आहे यात आता विद्वानांना संदेह राहिलेला नाही. तसेच शक हे मूलतः ईराणी आहेत. दारयवहूच्या सैन्यात या शकांच्या तीन गटांचा उल्लेख आलेला आहे. ईराण देशासंबंधी बोलताना, आर्यांच्या आपल्या मूळ मायभूमीतून महत्त्वाच्या अशा झालेल्या निष्क्रमणापैकी शकांचे हे तिसरे निष्क्रमण आहे असे हर्जफेल्ड याने म्हटलेले आहे. भारतासंबंधी बोलताना हे सर्वस्वी लागू पडणारे नाही. भारताच्या दृष्टीने शकांचे हे निष्क्रमण दुसरे म्हणावे लागेल. हे शकनिष्क्रमण ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकातील नक्कीच आहे. शिवाय हे शक ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकात सइस्तानात स्थिर झालेले होते असा इतिहास प्राप्तच आहे. हे शक पुढे सरकत सरकत अफगानिस्तानच्या नैर्ऋत्य कोपऱ्यात. भारतीय आर्यांच्या मूळ सरस्वती आणि दृषद्वती नद्यांच्या खोऱ्यात येऊन वसले, कालान्तराने या प्रदेशाला शकस्थान असे नाव प्राप्त झाले. या शब्दाची कालौघात सकिस्तान, सगिस्तान, सजिस्तान, सइस्तान अशी रूपान्तरे घडून आली. शेवटी अरब आणि अरबी भाषा व लिपि यांच्यामुळे मुसलमान या शब्दाचा उच्चार सीस्तान असा करतात. पण खरा शुद्ध उच्चार सइस्तान आहे. आजच्या ईराणी व अफगानी साहित्यात हेच उच्चारण चालू आहे. इसवी सनपूर्व ५७ पूर्वीपर्यंत या शकांचे राज्य सिन्ध, पंजाब, उज्जयिनी आणि मथुरेपर्यंत पसरलेले होते. सर्व प्रदेशावर म्हणजे मनूने व्याख्याणलेल्या सर्व मध्यदेशावर शकांचे राज्य पसरलेले होते. ते भारतीय आर्यांशीए करूप झालेले होते. त्यांची नावे, देवता, पूजास्थाने, विद्याक्षेत्र इत्यादी बाबीत ते सर्वस्वी भारतीय आर्यांसारखे होते. हे सर्वत्र दिसून येते. डॉ. जयस्वाल यानी प्रतिपादिल्याप्रमाणे या मध्यदेशातील शकांना पराभूत करण्याचे महान् कार्य गौतमीपुत्र सातकर्णि या सातवाहनवंशीय बलाढ्य सम्राटाने केले. त्याने विक्रमादित्य ही पदवी धारण केली. ही घटना इसवी सनपूर्व ५७ मध्ये घडून आली. या विजयप्राप्तीच्या स्मरणार्थ त्याने विक्रम संवत् सुरू केला. कालकाचार्य कथानक जरी उत्तरकालीन असले तरी त्यात या घटनेचा रूढिरूप उल्लेख आहे. 'नामूला तु जनश्रुतिः' या न्यायानेच विद्वान या कथानकाकडे पाहात आहेत.

मला येथे असे सुचवावयाचे आहे की गौतमीपुत्र सातकर्णीने क्षत्रराष्ट्र शकांचा पराभव कोठे केला याचे उत्तर एरिकिण-एरण देत आहे. हे प्राचीन

तालीकोट किंवा पानिपत एरण होय असे म्हणता येईल. येथे प्रत्यक्ष युद्धभूमि अभिप्रेत नाही. गौतमीपुत्र सातकर्णि याचा प्रतिस्पर्धी सुद्धा अज्ञात व अनिर्णीत आहे. तर येथे असे म्हणता येईल की सातकर्णीने एरणच्या शकसत्तेचा पराभव केला. या गौतमीपुत्राची एखादी विजययष्टि प्राप्त झाली तर प्रत्यक्ष युद्धभूमीचाही तपास लागेल. शकपराभवाचे हे सत्य आता बहुधा सर्वच विद्वानांनी ग्रहण केलेले आहे. असे जरी झाले तरी शकांचा पुरा नायनाट झाला असे नाही. त्यानंतर ईराणी लोकांच्या कुषाणवंशीय (तोखारियन, महाभारतातील तुषार) कनिष्काने पुनः आपला जम बसविला, व आपली शककालगणना आरम्भ केली. शकांचे एवढे वर्चस्व या मध्यदेशात होते की ही कालगणना पुढे जाऊन शककाल समजली जाऊ लागली. वराहमिहिरानेच शक हे उपपद या कालगणनेला सर्वप्रथम लावल्याचे दिसून येते. कालौघात उत्तर भारतात या शकांची दाणादाण झाली तरी माळवा आणि सौराष्ट्र येथील दोन शक राजघराणी फार काळ टिकलेली प्रस्तरलेखादि विश्वासार्ह साधनांवरून दिसून येतात. उत्तरकालीन सातवाहन राजकुलात या शक नरपतींच्या सोयरिका झाल्याचे शिलालेखनांवरून आढळून येते. सातवाहन राजवंशातील एका राजाचे नाव हकुसिरि (शकश्री) सातवाहन असल्याचे त्याच्या शिलालेखावरून दिसून येते. या शकांनीच आपल्या राजकाजासाठी सर्वप्रथम संस्कृत भाषेचा वापर केलेला आहे. शकांचे जीवन येथील समाजजीवनाशी एकरूप झाल्यानेच कालान्तराने कनिष्काने आरम्भ केलेली व मागाहून शककाल म्हणून ओळखली जाणारी कालगणना भारतीय आर्यांना अनाक्षेपार्ह व स्वीकरणीय वाटली. सर्व पश्चिम भारतावर पाचसातशे वर्षे राज्य करणारा शक समाज भारतीय समाजात निरनिराळया जातीच्या रूपाने आत्मसात् झालेला आहे.

आर्य या मूळ शब्दाच्या अरिय किंवा अइर्य या रूपाला कालान्तराने भारतीय व्याकरणातील इक आणि इन् हे प्रत्यय लागलेले असावेत. अरिय, अइर्य या सर्वत्रोपलब्ध रूपांला इक अधिक इन् हे प्रत्यय लागल्यानंतरचे रूप एरिकिण वा ऐरिकिण या शब्दात पाहावयाला सापडते. या ए–ऐरिकिण शब्दापासून एरण हे नाव व्युत्पन्न आहे असे विद्वानांनी प्रतिपादिलेले आहे हे योग्यच आहे. शकनृपति श्रीधरवर्म्याच्या एरण येथील स्तम्भलेखाचे सम्पादन करताना डॉक्टर वा. वि. मिराशी एरण स्थानाच्या प्राचीनत्वाबद्दल म्हणतात)[८] – " मध्यप्रदेशाच्या सागर जिल्ह्यातील खुरई तहसिलीत एरण नावाचे अत्यन्त प्राचीन नगर आहे. त्या ठिकाणी ख्रिस्तपूर्व तीन-चार शतकांइतकी प्राचीन नाणी सापडतात. तेथे अनेक प्राचीन देवालयांचे अवशेष, विष्णु, वराह, नरसिंह इत्यादिकांच्या विशाल मूर्ति, उत्तुंग स्तम्भ व कित्येक प्राचीन शिलालेख आणि स्तम्भलेख अद्यापि विद्यमान आहेत. तेथे सापडलेल्या काही नाण्यांवर त्या नगराचे प्राचीन नाव, ' एरिकिण ' हे प्राकृत भाषेत लिहिलेले आढळते. " असे या नगराचे प्राचीनत्व व महात्म्य आहे. डॉक्टर

मिराशीच्या शेवटच्या वचनाचे सार असे की या शब्दलेखनाची लिपि ब्राह्मी असून, ए–ऐरिकिण शब्दाचे सापडणारे आणखी एक रूप, '**एरिकिञ**' हे प्राकृत भाषेच्या प्रभावाचे प्रतीक आहे.

डॉक्टर मिराशी यांनी न उल्लेखिलेली गोष्ट अशी की अधिष्ठान हा शब्द येथे राजधानीवाचक आहे. लेख खण्डित आहे, हे खरे पण, '**एतद्दिवसमेरिकिणाधिष्ठाणे**' असे शब्द स्वच्छ आहेत. म्हणजे एरिकिण राजधानीत अथवा नगरात असा सरळ अर्थ प्राप्त होतो. रुद्रदामनाची राजधानी गिरिनगर, आधुनिक गिरनार होती हे या वंशातील राजांच्या प्रस्तर लेखांवरून दिसून येते. रुद्रदामनाच्या या गिरनार शिलालेखात, '**गिरिनगरे**' व '**इहाधिष्ठाने**' असे उल्लेख लेखाच्या आद्यन्ती आलेले आहेत. याचा अर्थ या राजधानीत. म्हणून प्रस्तुत प्रसंगी अधिष्ठान शब्दाचा अर्थ राजधानी असाच आहे. मोनियर वुइल्यम्सनेही राजधानी असा या शब्दाचा अर्थ दिलेला नाही. ज्या अर्थी ख्रिस्तपूर्व तीन-चार शतकांपासून या शहराचे प्राचीनत्व सिद्ध आहे आणि शक राजांचा या नगरांशी सम्बन्ध, शककालाच्या तिसऱ्या शतकापर्यंत, कमी अधिक सातत्याने, टिकून राहिलेला आहे, त्या अर्थी आरम्भीच्या काळी या शक राजघराण्याची ऐरिकिण ही राजधानी होती, हे निश्चित होते. ही राजधानी होती असा स्पष्ट उल्लेख याच लेखात सापडतो. अरिय किंवा अइर्य या शब्दावरून ऐरिकिण हे नगर शक राजांनी आपले वर्चस्व व वैशिष्टय जतविण्यासाठी स्थापन केले हे स्पष्ट होते. शक राजांच्या वैभवसत्तेच्या बाह्य खुणा आज जरा पुराकोविदांशिवाय अन्यांना ठाऊक नसल्या तरी जाणकाराला एरण या नगरनामावरून त्यांच्या एका काळच्या या प्रदेशाच्या स्वामित्वाची ओळख पटते.

क्षत्रराष्ट्रधर्म

आणखी एका गोष्टीचा येथे उल्लेख करणे योग्य होईल. खहरात, क्षहरात, ख-क्षहरात-ट असा शब्द शक जमातीच्या अनेक हालचालीच्या निमित्ताने नासिक, कार्ले इत्यादी स्थानातील प्रस्तर लेखात आलेला आहे. काही विद्वानांनी हा शब्द एका राजघराण्याचा द्योतक आहे असे मानले आहे. परंतु हे योग्य नव्हे; खहरात हा शब्द क्षत्रराष्ट्र या शब्दापासून व्युत्पन्न आहे. हा खहराट शब्द काय दर्शवितो याचा सुगावा याच श्रीधरवर्म्याच्या एरण येथील शिलालेखातील "**क्षत्राष्ट्रस्य धर्मान्**" या प्रयोगावरून लागतो. शेवटच्या श्लोकात हे विधान आलेले आहे. क्षत्रराष्ट्र ही एक संकल्पना, भावना होती आणि तिचे काही धर्म होते, कर्तव्ये होती. असे स्पष्टपणे या विधानावरून दिसून येते. श्रीधरवर्म्याच्या कानाखेडा प्रस्तर लेखात श्रीधरवर्म्याला "**आदित्यवीर्य्यार्ज्जितविजय**" आणि "**धर्मविजयिन्**" अशी उपपदे लावलेली आहेत. शकनन्दपुत्र श्रीधरवर्म्याला 'आदित्यवीर्याजितविजय' ही उपाधि

तो शकवंशीय होता हे लक्षात घेतल्यास साभिप्राय दिसून येते. शिवाय तो 'धर्मविजयी' म्हणजे तो '**क्षत्रराष्ट्रस्य** धर्मान् पालयिता' होता हे स्पष्ट होते. नाही तरी आता शकवंशीय बौद्धानुयायांची एक विशिष्ट वृत्ती आणि धोरण होते हे विद्वानांच्या ध्यानात आलेले आहेच. डॉ. सरकार यांनी ही गोष्ट स्पष्टपणे मांडलेलीच आहे.)[९]

राष्ट्र शब्द ऋग्वेदात आलेला आहे; परंतु या शब्दाचा अर्थ केवळ देश किंवा लोक असाच आहे. आज मराठी भाषेतील राष्ट्र हा शब्द इंग्रजी नेशन शब्दातून व्यक्त होणाऱ्या भावना, सहसंवेदना, विचारैक्य इत्यादी मनोवैज्ञानिक संवेदनाचा वाहक आहे; म्हणजे वैदिक राष्ट्र शब्द आजच्या राष्ट्र शब्दाहून अगदी भिन्न आहे. दोन्ही शब्दांची अर्थव्याप्ति अगदी भिन्न आहे. येथे मला असे प्रतिपादावयाचे आहे की या शकांच्या क्षत्रराष्ट्र किंवा क्षहराट, खहराट शब्दात आधुनिक राष्ट्रशब्दाच्या विशिष्ट अर्थाचा उगम झालेला आहे. महाराष्ट्रात महाराष्ट्र धर्म म्हणून एक शब्द शिवकाल व तत्पूर्व रूढ झालेला आहे. त्याच्या अर्थाची नक्की व्याप्ति किती निश्चत झालेली आहे हा प्रश्नच आहे. परंतु त्यांचा काही तरी निश्चित अर्थ मराठी माणसाला अभिप्रेत असतो व तो इतरांना कळतो हे नक्की आहे. खहराट शब्द नहपान व त्याच्या वंशजाच्या सह्याद्रीतील शैलगृहातून वापरण्यात आलेला आहे. प्रस्तुत क्षत्रराष्ट्रधर्म शब्द माळव्यातील आहे. खहराट धर्माच्या अनुरोधाने महाराष्ट्र धर्म रूढ व्हावा, हा काही केवळ योगायोग नव्हे. तसे म्हणणे योग्य होणार नाही. अधिक अभ्यासाने दोन्हीतील सांधे जुळण्याची शक्यता आहे.

या खहराट धर्माचे एक महत्त्वाचे अंग म्हणून शकजमातीच्या बौद्धधर्मानुयायित्वाचा उल्लेख करता येईल. दुसरे अंग म्हणजे स्ववीर्यार्जितविजयित्व होय. कारण या विशेषाचा उल्लेख स्वतः श्रीधरवर्म्याच्या कानाखेरा शिलालेखातच आला आहे. शिवाय या वैशिष्ट्याला शकवर्गाच्या पूर्वपरम्परेचाही आधार सापडतो. शक ७२ तील रुद्रदामनाच्या गिरनार शिलालेखात, "जनपदानां स्ववीर्य्यार्जितानां" असा एकदा उल्लेख आलेला आहे. तदनंतर दुसरा उल्लेख म्हणजे, "सर्वक्षत्राविष्कृतवीरशब्दजातोत्सेकाविधेयानां योधानां प्रसह्योत्सादेन" असे रुद्रदामनचे वर्णन केलेले आहे. यात भारतातील तत्कालीन अखिल क्षत्रियकुलांपेक्षा शकवंशीयांची श्रेष्ठता अभिप्रेत आहे. दुसरा कानोसा असा की भारतात जिवन्त राहावयाचे म्हणजे आपल्या शौर्यवीर्यावर राहिले पाहिजे अशी शिकवण शकनेत्यांनी आपल्या क्षत्रोपजीवी अनुयायांना दिलेली आहे. हा एक या धर्माचा विशेष मानता येईल.

हिन्दू पुराणकथातील सहावा अवतार मानलेल्या ब्राह्मणजातीय परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केल्याची कथा ऐतिहासिक सत्यान्वेषणाच्या दृष्टीने

कोणत्या काळी निर्माण झाली हे सांगणे मला कठीण आहे. परन्तु सर्व अवतारांची कल्पना फारच अलीकडील आहे हे विसरता येत नाही. ते काही असो. रुद्रदामनाच्या या लेखात पृथ्वी निःक्षत्रिय करण्याचा वेगळ्या पद्धतीने उल्लेख आलेला आहे, असे मानता येईल. या दृष्टीने हा उल्लेख सर्वप्रथमच मानावा लागेल.

अवगाण

वराहमिहिराने आपल्या बृहत्संहितेत अवगाण शब्दाचा दोनदा वापर केलेला आहे.

उल्काभिताडितशिखः शिखो शिवः शिवतरोऽतिवृष्टो यः ।
अशुभः स एव चोलावगाणसितहूणचीनानाम् ॥ ११·६१ ॥
गिरिदुर्गपह्लवश्वेतहूणचोलावगाणमरुचीनाः ।
प्रत्यन्तधनिमहेच्छव्यवसायपराक्रमोपेताः ॥ १६·३८ ॥

श्रीधरवर्मा आणि वराहमिहिर यांच्या काळात साधारणतः दोनशे वर्षांचे अन्तर आहे. ए–ऐरिकिण शब्दाचे कदाचित पर्याय रूढ रूप ए–ऐरिकण किंवा ए–ऐरकण असे असू शकेल. या रूपातून वराहमिहिराने आपल्या ग्रन्थात अवगान असे रूप वापरलेले आहे. ऐरकण शब्दापासून ऐरकिण असे रूप भारतातील भाषांच्या चालीरीती आणि रूढीपरम्परा यांना धरूनच आहे. याच्या पुढची पायरी अयकण अशी शक्य आहे. क वर्णाचा ग झालेला अशोकाच्या शिलालेखातही सापडतो. लोक शब्दाचे लोग हे रूप तेथे वापरलेले दिसून येते. अशा रीतीने अयगण, अवगण, अवगाण हे रूपपर्याय व्यवहारात असणे सहजशक्य आहे. मुद्दा हा कि ए–ऐरिकिण या शब्दापासूनच अवगाण हे रूप विकसित झालले आहे.

अफगान

या अवगाण शब्दापासून अफगान शब्दाची व्युत्पत्ति सरळ व नियमानुसारी आहे. ज्याप्रमाणे संस्कृतमधील व् वर्णाचा ईराणीत ग् होतो, त्याप्रमाणे संस्कृतातील आद्याक्षरानंतर येणाऱ्या व् वर्णाचा अविस्ता अवस्थेत प होतो आणि पुढील पहलवी अवस्थेत त्या प् ध्वनीचा फ् होतो.)[१०] सं. अश्व > अवेस्ता अश्प, सं. अश्विन् > अवे. अश्पिन्, सं. कृशाश्व > अ. किरिशास्प, सं. श्वेत > अ-श्पएत ईराणी सफेद, इत्यादी. सम्राट् अशोक आणि खरोष्ठी प्रत्नलेखांतही व ध्वनीचे प ध्वनीत रूपांतर झालेले आढळते. दसयित्पा (सं. दर्शयित्वा, पाहा सिलेक्ट इन्स्क्रिप्शन्स्, सरकार, पृ. २०), सर्वलोकहितत्पा (सं. सर्वलोकहितत्वात्, पृ. २४), स्पमिकेन (सं. स्वामिकेन, पृ. २८), विश्पिलेन (सं. विश्विलेन, पृ. १०५, १४ ई), अश्पवर्मस (सं. अश्ववर्मस्य, पृ. १२७, २९ ए), ही भाषिक

प्रवृत्ति प्राकृतातही दिसून येते. याच नियमानुसारी अवगाण शब्दाच्या विकासाचा मागोवा घेता येतो. अपगाण हे रूप सिद्ध होते. पुढील पहलवी अवस्थेत याचे रूपान्तर अफगाण शब्दात होते.

अवेस्ता, पहलवी आणि ईराणी अवस्थात ण हा स्वरच अस्तित्वात नाही. म्हणून अफगान हे रूप नियमानुसारी आहे. ७ व्या, ८ व्या, शतकानंतर ईराणी (पार्सी, फार्सी) भाषेत ग़ gh हा नवीन स्वर आला आणि या प्रभावाचे द्योतक म्हणून आज या मायभूमीत अफग़ान 'Afghan' हा शब्द शुद्धस्वरूप मानण्यात येतो. येथे gh या वर्णाचा उच्चार घ नसूत ग़ असा आहे. अशारीतीने अरियन-अइर्यन, ए-ऐरिकिण, अवगाण आणि अफगान अशी या अफगानिस्तानी आर्यभूमीची नामरूपान्तरे होत. म्हणजे भाषिक दृष्टीने अफगानिस्तान म्हणजे आर्यस्थान आहे.

हरिआण, हरियाना

हरियाना हे सध्या भारतीय संघाराज्यातील एक नवीन बनलेले राज्य आहे. राज्यपुनर्रचनेचे विधेयक, आणि तत्पूर्वी राज्यपुनर्रचना वृत्तांत, संसदेत चर्चिली जात असताना हरियाना हा शब्द मला कळल्याचे आठवते. त्याच्या अगोदर हरियाना नावाची एक गाईची जात आहे एवढेच ठाऊक होते. राज्यपुनर्रचनेच्या चर्चेसमयी हरियाना या स्वतंत्र राज्याची मागणी झाली होती. परंतु तेथील हरियाना जातीच्या वळूशिवाय तेथे विशेष काही वैशिष्टय नाही असा जनमताचा व नेत्यांचा कौल होता. पंजाबला वेगळे राहायचेच होते म्हणून हरियाना हे नवीन छोटेसे राज्य अस्तित्वात आले.

हरियाना हा शब्द संस्कृत नव्हे. मोनियर वुइल्यम्स याच्या कोशात तो सापडत नाही. दिल्ली, पंजाब किंवा प्राचीन मध्यदेशात तो किती प्राचीन आहे याची कल्पना करणे प्रत्यक्ष ज्ञानाभावी कठीण आहे. परंतु एपिग्राफिया इण्डो मोस्लेमिका)[११] या प्रकाशनाच्या सन १९१३-१४ च्या अंकात एक संस्कृत प्रस्तर-लेख प्रकाशित करण्यात आलेला आहे. गुलाम यज़दानी यांनी तो संपादिला आहे. हा लेख मिती श्रावण बदि १३ बुधवार विक्रम संवत् १३३७ चा असून त्या लेखात संस्कृत श्लोक व शेवटी ढिल्ली भाषेत हरियानक आणि हरीआण हे शब्द वापरलेले आहेत. लेखात सध्याच्या दिहलीला ढिल्ली म्हणत हेही कळते. या लेखाचा शक-काल १२०२ हा येतो. हा श्लोक असा :

अभोजि तोमरैरादौ चौहाणैस्तदनंतरं ।
हरियानकभूरेषा शकेंद्रैःशस्यतेधुना ॥३॥

दिल्लीचे वर्णनही मनोवेधक आहे--

अस्यानेकमहापुरीशतपते राज्ञो मनोहारिणी
ढिल्ली नाम महापुरी विजयते भल्लीव विद्वेषिणां ॥
या पृथ्वीव विचित्ररत्ननिलया या द्यौरिवानंदिनी
या पातालपुरीव दैत्यनिलया मायेव या मोहिनी ॥ १२ ॥

लेखाच्या २२ ओळींपैकी २१ वी ओळ दिल्ली भाषेत अशी आहे :

" संवत्सरेस्मिन्वैक्रमादित्ये संवत् १३३७ श्रावण वदि १३ बुधे ॥ ३१ ॥ किआशन्दीण शुरिताण रजि हरीआण इ देश ह ॥ पंच कोश ढिली अहु पथि पालंम पवेश ह ॥ "

शेवटच्या दोन ओळींचा अर्थ असा – गियासुद्दीन (बलबन) सुल्तान (याच्या) राज्यात हरीआण हा देश आहे. पाच कोस दिल्ली आहे. वाटेत पालम प्रदेश आहे. मला हरियानह (हरियान) शब्दाचा आणखीन् जुना वापर ज़ैनुल-अखबार या गर्देज़ीकृत इतिहास ग्रंथांत (रचनाकाल ४४२ हिजरी = शक ९७२) सापडलेला आहे (पृ. २०१). हा फार्सी ग्रंथ अब्दुल-ह्य्य हबीबी यानी तिहरानमधून शक १८९० मध्ये प्रकाशिला आहे.

संस्कृत श्लोकात हरियानक आणि लोकभाषेतील रूप हरीआण हे शब्द येथे प्रयुक्त आहेत. लोकभाषेतील रूप हे खरे भाषिक रूप आणि हरियानक हे त्याचे संस्कृत रूप आहे. असे म्हणावयास हरकत नाही. आता असा प्रश्न निर्माण होतो की मूळ शब्द संस्कृतप्रयुक्त का लोकभाषाप्रयुक्त ? जर हा मूळ शब्द संस्कृत असता तर तो अनेक संस्कृत ग्रंथातून, धार्मिक साहित्यातूनही दिसून आला असता. परंतु तसे आढळून येत नाही. डॉ. रामशंकर शुक्ल 'रसाल' यांच्या भाषाशब्द कोष १९५१ या हिंदी कोशात हा शब्द सापडत नाही. मॅक्डोनल याच्या वैदिक सूचीत तो नाही. अन्य कोशात सापडला तरी तो फार जुना आहेसे वाटत नाही. हा शब्द मूलतः लोकभाषेतच रूढ असावासे वाटते.

मागे अरिअन, अइर्यन, ईराण, ए-ऐरिकिण, अवगाण आणि अफगान या शब्दांच्या व्युत्पत्तिविकासासंबंधी जी चर्चा झालेली आहे त्यावरून हे सहज ध्यानी येते की प्रस्तुत हरीआण हा शब्द शुद्ध ईराणी अरिअन वा अइर्यन या शब्दाचे रूप आहे. भारतीय वातावरणात अरिअन या शब्दाचे अरीयान, व शेवटी, संस्कृत लोकरूढ शब्द हरि याच्या साम्यामुळे, त्याचे रूप हरीआण असे रूढ झाले. वस्तुतः हा शब्द अरिअन याचेच रूपांतर होय. कालान्तराने पर्सिया या देशात अरिअन शब्दाचे ईरान हे रूपांतर घडून आले.

ईराण, अफगान, ऐरिकिण-अवगान आणि हरिआण या शब्दांनी व्यक्त होणाऱ्या भू-प्रदेशाकडे पाहिले म्हणजे आपणाला एक भौगोलिक सलगता दिसून येते. शकांचा, निदान सात-आठशे वर्षांचा, इतिहास सइस्तान, गिरनार, ऐरिकिण (एरण-यवनपुरी) आणि एरणच्या उत्तरेचा पंजाबातील भाग म्हणजेच प्राचीन हरिआण हे या कालातील वास्तव्यक्षेत्र राहिलेला आहे. खरोष्ठी लिपीतील लेख मुख्यतः हरिआण आणि प्राचीन गन्धार या प्रदेशात सापडलेले आहेत असे म्हटले तर ते योग्य व वस्तुनिष्ठ होईल. वराहमिहिराने उल्लेखिलेली यवनपुरी हे ऐरिकिण अर्थात एरणचा आहे. यांतही शंका नाही. दिल्लीच्या वरील प्रस्तरलेखात तत्कालीन गियासुद्दीन बलबन आदि मुसलमान शासकांना शक म्हणून उल्लेखिले आहे, हे देखील मोठे अर्थगर्भ व प्राचीन परम्परेकडे अंगुलिनिर्देश करणारे आहे.

एरंगल

सध्याच्या बृहन्मुंबई या नगराच्या भौगोलिक सीमेत एरंगल नावाचे एक ग्राम आहे. या गावाचा उल्लेख महाराष्ट्रातील ग्रामनामांची मातृकाक्रमाने दिलेल्या वर्णक्रमीत सापडत नाही. कारण ते गाव आता या बृहन्नगरात समाविष्ट झालेले आहे. महाराष्ट्रातील एकोणचाळीस हजार खेड्यांपैकी या नावाचे दुसरे एकही गाव महाराष्ट्रात अस्तित्वात नाही. मुंबई नगराच्या सविस्तर नकाशात मात्र एरंगल नावाचा निर्देश आहे. संशोधनक्षेत्रात या गावाचा समावेश आहे. कारण टॉड (Todd) नावाच्या एका नौशिल्पशास्त्रज्ञाने एरंगल आणि त्याच्या परिसरातील दगडाची सूक्ष्म-लहान लहान हत्यारे उपलब्ध असल्याचा एक प्रबंध, भारत शासनाच्या वतीने प्रकाशित होत असलेल्या (सन १९५०, क्रमांक ६) प्राचीन भारत नावाच्या बुलेटिनमध्ये प्रकाशित केलेला आहे. हे बुलेटिन पुरातत्त्वविभागातर्फे प्रकाशित होते. एरंगल हे २०-२५ झोपड्या-घरांचे खेडे समुद्रकाठी आहे. आता तेथे जाण्यासाठी सडक झालेली आहे. प्रथम मालाडला जाऊन पश्चिमेकडे वळून परत मागे एरंगळला यावे लागते, कारण मध्ये मालाडची खाडी आडवी आलेली आहे. या खाडीला तेथील लोक अकसा खाडी म्हणतात. एरंगलचा बीच म्हणजे विशिष्ट समुद्रकिनारा अत्यंत सौंदर्यपूर्ण आहे. नारळीमाडांची झाडे आहेत. एरंगल बीच दोन अडीच फर्लांग लांबीचा आहे. उत्तर व दक्षिणेला खडकाळ भाग असून हा बीच अर्धचंद्राकार आहे. तो चौपाटी सारखाच सुंदर व आकर्षक आहे. समुद्रस्नानाचा मोह कोणालाही अनावर होईल. या बीचच्या मध्यभागी श्री गजदर या पार्सी गृहस्थाचा एक छोटासा टुमदार बंगला असून त्याचे नाव योगायोगाने त्याने "एरंगल हौस" असे दिलेले आहे. त्याला ही ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमि सांगितल्यावर मोठी गम्मत वाटली. या एरंगळ गावाच्या दक्षिणेस मढ नावाचे एक दुसरे छोटे खेडे आहे. मढ शब्द मठ शब्दाचे प्राकृत रूप आहे. एरंग

हे उत्तरेकडील खडकाळ भागाचे नांव आहे. या एरंग टेकडीवर महाराष्ट्र शासन २५-३० लक्ष रुपये खर्चून एक अद्यावत सोयींनीयुक्त असे हॉटेल बांधीत आहे.

एरंगल हे नाव विशेष आहे. महाराष्ट्रातील हजारो खेड्यांहून ते वेगळे आहे, हे उघड आहे. ग्रामनामे सुद्धा सार्थ व अर्थवाही असतात हे सर्वज्ञात आहे. प्रत्येक ग्राम शब्दाला अर्थ असतो व त्याला इतिहासही असतो. कालान्तराने या अर्थाचा लोप होतो व ग्रामनाम, उपनाम किंवा व्यक्तिनाम हे अर्थवाहक असलेच पाहिजे असा नियम नाही असा अपसमज, शहाण्या मंडळीतही प्रसृत होतो. तसा अपसमज मराठीतही भरपूर आहे.

एरिकिण-ज, हरीआण ही भारतातील ग्राम-स्थलनामे ईराण या देशाच्या नामाशी संबद्ध आहेत. ईराण या शब्दाची व्युत्पत्ति आर्य शब्दापासून-अरियान-शहर या ईराण देशाच्या प्राचीन नावावरून आहे असे विद्वानांनी सिद्ध केलेले आहे. अरियान-शहर म्हणजे **आर्याणां क्षत्र** म्हणजे आर्यांचे क्षत्र म्हणजे देश, प्रदेश असा आहे. हा शहर शब्द राष्ट्र वा देश वाचक आहे. ईराणी लोक आपल्या देशाला ईराण शहर म्हणजे ईराणराष्ट्र असे म्हणतात. तसेच ईराणी लोक, ईराण या देशात येण्यापूर्वी राहात असलेल्या भूमीस इराणी लोकांनी **अरियान-वएज** असे नाव दिलेले आहे. याचा संस्कृत अनुवाद **आर्याणां बीज** असा विद्वान् करतात.

मइन्यो-इ-ख़र्द या पहलवी ग्रंथात एरांनगां (Eranaga) हा शब्द तुरुक आणि अरूमाइग म्हणजे तुर्क व रोमचे लोक या लोकांच्या जोडीने वापरलेला आहे. मइन्यो-इ-खर्द हा ग्रंथ ई. डब्ल्यू. वेस्ट या विद्वानाने सन १८७१ मध्ये लंदन शहरातून प्रसिद्ध केलेला आहे. हा ग्रंथ खुस्रौ अनुशीरवान (राज्यकाल शक ४५३ ते ५०१) याच्या काली लिहिला गेला असे वेस्ट याचे म्हणणे आहे. हा पहलवी भाषेचा मोठा पंडित होता. या ग्रंथाचा शब्दशः संस्कृत अनुवाद, पंधराव्या शतकात, धवलसुत नेरिओसंघ या गुजरात मधील पार्सी गृहस्थाने केलेला आहे. वेस्टने या संस्कृत अनुवादाचा समावेशही पहलवी संहितेबरोबर आपल्या ग्रंथात केलेला आहे. एरांनगां शब्द असलेल्या वाक्याचा नेरिओसंघ याचा संस्कृत अनुवाद असा— "यत् : अनादेशचरता **यारूमीनान् तुर्कवानान्** च समं **एरानिकैः** मूले तस्मात् द्वेषात् सम्भूता, येषां यो व्यधेन **इरजस्य फ्रेदूनपुत्रस्य** सञ्जातः।" याचा वेस्टनें दिलेला इंग्रजी अनुवाद असा— ईराणी लोकांबरोबर रोमन आणि तसेच तुर्क यांच्या वैमन्याचे मूळ **इरच** याच्या वधामुळे, लोकांनी निर्माण केलेल्या द्वेषात होते.

आपणाला प्रस्तुतप्रसंगी एवढेच पाहावयाचे आहे की एरांनगां हा शब्द मूळ कोणत्या रूपात आणि कोणत्या अर्थाने प्रयुक्त झालेला आहे. एरान या देशवाचक नामाला स्वार्थे क-प्रत्यय लागून एरांनक असा शब्द वापरलेला आहे. नेरिओसंघ याने त्याचा अनुवाद एरानिक असा केलेला आहे. या शब्दरूपावरून एरण

(जि. सागर) येथील नाणी व प्रस्तरलेखात प्रयुक्त झालेल्या एरिकिण शब्दाचा मागोवा घेणे सुलभ होते. तसेच बृहन्मुंबईतील एरंगळ शब्दची कुळीमुळीही डोळचासमोर येते. ईराणात रूढ असलेल्या एरांनग शव्दाला महाराष्ट्राच्या प्राकृत भूमीत फक्त ल प्रत्यय लागलेला आहे. अशा रीतीने एरंगल शब्दामुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक अशा एका जीर्ण पृष्ठाकडे अंगुलिनिर्देश होतो.

एरंगलचा परिसर लक्ष्य आहे. पाच चार मैलाच्या आत जोगेश्वरी आणि कान्हेरी येथील, शकाच्या प्रस्तरलेखयुक्त लेणी उपलब्ध आहे. प्राचीन शक हे शाक्यमुनि गौतम बुद्धाचे अनुयायी होते. सोपारा येथे महाराष्ट्रातील तीन स्तूपांपैकी सर्वप्रथम उपलब्ध झालेला स्तूप सर्वपरिचित आहे. कार्ले, भाजे, बेडसे, कोंडाणे, नाणेघाट, जुन्नर, नासिक येथील शकप्रभावयुक्त लेख व लेणी पुराविदांच्या परिचयाची आहेत. या सर्व पार्श्वभूमीवरून एरंगल शब्दाचा हा इतिहास उद्बोधक साधन म्हणून विचारार्ह आहे असे नक्की म्हणता येईल.

मुंबई : चैत्र ४, १८९१ (इतिहास आणि संस्कृति. मुंबई, पु. २३, श. १८९१).

सन्दर्भ ग्रन्थ

१. **वैदिक इण्डेक्स** : अनुवाद रामकुमार राय, वाराणसी, १९६२
२. **ऋग्वेद संहिता** : वैदिक संशोधन मण्डल, पुणे १९४६
३. **सिलेक्ट इन्स्क्रिप्शन्स** : डी. सी. सरकार, कलकत्ता, १९६५
४. **तथैव** : पान १२०
५. **तथैव** : पान १५६
६. **तथैव** : पान १८०
७. **पूरे दाऊद यांची व्याख्याने** : कामा संस्था, बुलेटिन क्रमांक– २८, १९३५
८. **संशोधन मुक्तावलि सर १** : नागपूर १९५४
९. **अर्ली बुधिस्ट अर्किटेक्चर इन इण्डिया** : एच्. सरकार, दिल्ली, १९६६
१०. **वेन्दिदाद सदे** : इण्डेक्स (जर्मन), लीप्झिग
११. **एपिग्राफिया इण्डो मोस्लेमिका, सन, १९१३–१४** : यज़्दानी, पृ. ३९

१५ : शक, पह्लव हे आर्य होत

डॉ. वा. वि. मिराशी यांनी गेली ५० वर्षे खडतर तपस्या करून, प्राचीन, भारतीय इतिहासाच्या ज्ञानात मोलाची भर घातलेली आहे. त्यांचे शेकडो लेख मौलिक संशोधनाने अलंकृत होऊन जनतेसमोर आलेले आहेत. त्यांच्या या महनीय कामगिरीचा विद्वज्जनांनी गौरवही केलेला आहे. लोकनायक अणे यांनी काढलेले उद्गार डॉ. मिराशी यांच्या कामगिरीचे द्योतक आहेत. डॉ. रामकृष्णपंत भांडारकर यांनी दक्षिणेचा प्राचीन इतिहास हा ग्रंथ लिहून महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादी प्रदेशाचा प्राचीन इतिहास उपलब्ध करून देण्याचे कार्य केले, तसेच कार्य म. म. मिराशी यांनी वाकाटक व कलचुरि या राजवंशांविषयीच्या आपल्या संशोधनात्मक ग्रंथांनी विदर्भ व मध्यप्रदेश या प्रदेशांच्या इतिहासाच्या बाबतीत केलेले आहे. लोकनायकांचे हे उद्गार सार्थ आहेत.

डॉ. मिराशी यांनी आपल्या प्रबंधांचे ग्रंथरूपाने प्रकाशनही केलेले आहे. त्यांच्या मराठी प्रबंधांचे पांच संग्रह संशोधनमुक्तावलिरूपानें विद्वानांपुढे पुनश्च आलेले आहेत. या प्रबंधांतून संस्कृत ग्रंथ, स्मृति, पुराणे, शिलालेख, ताम्रपट, मूर्ति शिल्प इत्यादीच्या सहायाने त्यांनी महाराष्ट्राचा व दक्षिणापथाचा प्राचीन इतिहास उजेडात आणलेला आहे. शकाच्या चौथ्या-पांचव्या शतकाच्या कालमर्यादेपर्यंत हा इतिहास पोचतो. शकारम्भापासून या वरील कालमर्यादेपर्यंत पश्चिम आणि दक्षिण भारतात शक राजे व सत्रप किंवा क्षत्रप यांची राज्ये अधूनमधून पसरलेली होती. यांची माहिती ग्रंथ, शिलाताम्रलेख व नाणी यांच्या सहायाने डॉ. मिराशी यांनी प्रस्तुत केली आहे. सौराष्ट्र गुजरातेत शक संवत्सराच्या आरम्भकालात रुद्रदामन् या शक-वंशीय अभारतीय क्षत्रपाचे राज्य होते. गुजरात–महाराष्ट्रात शकवंशीय नहपान क्षत्रपाचे राज्य कित्येक वर्षे चाललेले होते. भारतातील या शकवंशीय परकीयांचे राज्य माहिषक अर्थात् हैद्राबाद समीपच्या आंध्रकर्णाटक प्रदेशावर स्थापन झालेले होते व ते इ. स. २५० पासून ५५० पर्यंत टिकले होते असे डॉ. मिराशी यांनी प्रतिपादिले आहे (संशोधनमुक्तावलि सर तिसरा, पृष्ठ ९४). डॉ. मिराशी यांनी आपल्या अनेक प्रबंधांतून जो इतिहास प्रतिपादिला आहे त्याबद्दल आम्हाला कांहीही म्हणावयाचे नाही. परंतु त्यांनी ग्रीक, शक, पह्लव, कुशाण, हूण, गुर्जर, यवन इत्यादि परकीयांना " **अनार्य** " म्हटलेले आहे (सर तिसरा पृ. ९०, ९३) त्यासंबंधी प्रस्तुत प्रसंगी आम्हाला हे सांगावयाचे आहे की शक, पह्लव इत्यादी परकीय हे अनार्य नव्हते, ते आर्यच होते.

भारताच्या प्राचीन इतिहासाची मांडणी करीत असताना भारतातील उपलब्ध होत असलेली संस्कृत प्राकृत, अपभ्रंश व अनेक नव्य आर्यभारतीय भाषा यांतील उल्लेख व साधने वापरून निष्कर्ष काढण्याची प्रवृत्ति भारतीय विद्वानात दिसून येते. यांच्या जोडीला भारतीय शिलाताम्रलेख, नाणी, इत्यादी आहेत. ते प्रधानात: योग्यही आहे. पण केवळ या भारतीय साधनांवरून सर्व कूट प्रश्नांची उकल होत नाही; सर्व उकल होऊ शकली नाही असे म्हणावे वाटते. प्राचीन भारताचा इतिहास सर्वांगीण रीतीने समजून घेण्यास निदान ईराण आणि मध्यआशियाच्या प्राचीन इतिहासाचे, सूक्ष्म नसले तरी ढोबळ ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे. आर्यवंशीय सम्राट अशोकाने आपला धर्मस्तंभ भारत भूमीवर उभा करण्याच्या निदान दोन-तीनशे वर्षे अगोदर दारियस–दारा–दारयवहु या आर्यवंशीय, क्षत्रियाणां क्षत्रिय म्हण-जेच शाहानशाह म्हणविणाऱ्या, या ईराण अथवा पर्सियामधील सम्राटाने आपला एकाच दगडाचा वीसतीस फूट उंचीचा स्तंभ उभा केलेला होता. अशोकाने आपली आज्ञापत्रे शिलालेखबद्ध करण्यापूर्वी दारयवहु शाहानशाहाने आपली शासने पर्सिपोलिस, बिहिस्तून, नक्शे–रुस्तुम इत्यादी ठिकाणी कोरलेली होती. आता विद्वानांनी निरपवादपणे हे मान्य केलेले आहे की अशोकाने दारयवहूचे या क्षेत्रात अनुकरण केलेले आहे. पाणिनि हा आर्यभाषेचा वैयाकरणी, भारत व ईराण यांच्या सीमारेषेवर राहाणारा पंडित होता. हा स्वात नदीच्या खोऱ्यातील शलातुर येथील रहिवासी होता. वराहमिहिर हा वंशाने, भाषेने ईराणी होता असेही आता निष्पन्न झाले आहे. ईराणमधील ज़रतुष्ट्र (झरतुष्ट्र) धर्माचे विशिष्ट उपाध्याय मगी नावाने वावरत होते. त्यावरूनच इंग्रजी मॅजिक–जादू हा शब्द बनला. याच मगी उपाध्यायांचा एक संच मुलुखगिरी करणाऱ्या ईराणी सेनेबरोबर भारतात येऊन येथे राहिला. हे मगी ब्राह्मण मध्यदेशात–सध्याच्या उत्तरप्रदेशात सध्याही वावरत असलेले दिसून येतात. ही दोनचार उदाहरणे ईराण भारत यांच्या प्राचीन इतिहासातील घनिष्ट संबंध दाखविण्यासाठी पुरेशी आहेत. अशी शेकडो उदाहरणे वंश, इतिहास, साहित्य, भाषाशास्त्र इत्यादि क्षेत्रांतील परस्परातील देवाणघेवाणीची दाखविता येतात. ती पाश्चात्य विशेषत: जर्मन, फ्रेंच, रशियन, इंग्रज इत्यादी विद्वानांनी आपल्या संशोधन ग्रंथातून चर्चिलेली आहेत. येथे सांगण्याचा मुद्दा एवढाच की भारतीय इतिहासाची विशेषत: प्राचीन इतिहास, संस्कृति, भाषा इत्यादींची तपासणी करीत असताना ईराण व मध्य आशियाच्या प्राचीन सांस्कृतिक, भाषिक इतिहासाचे ज्ञान पूरकच नव्हे तर आवश्यक आहे असे आम्हाला येथे आग्रहपूर्वक प्रतिपादावयाचे आहे.

ईराणविषयी चुकीचा ग्रह

सखोल अभ्यास करणाऱ्या विद्वानांना ईराण हे शक ५७४ पर्यंत आर्यांचे राष्ट्र होते, त्यांची पहलवी भाषा ही संस्कृतभाषेची सहोदर भगिनीभाषा होती,

ज़रतुष्ट्रधर्म हा आर्यधर्मांचाच विशिष्ट आविष्कार होता, ईराणी संस्कृति ही आर्यसंस्कृतीचेच रूप होते इत्यादि सत्ये विदित आहेत. परंतु शक ५७४ त अरब टोळचांनी या उत्कृष्ट संस्कृतीचा धुव्वा उडविला, राजकीय स्वातंत्र्य गेले. पुढील शेदीडशे वर्षात ज़रतुष्ट्र धर्माच्याऐवजी इस्लामधर्म ईराणच्या आर्यभूमीवर नांदू लागला. आर्य पहलवी लिपि नष्ट करून तिच्याऐवजी पाऊण शतकाच्या आत अरबी लिपीने आपले संपूर्ण पाश टाकले. पहलवी लिपि व पहलवी भाषेचा वापर करणे अपराध ठरविण्यात आला. दोनशे वर्षात ईराणी आर्यभूमीचे इस्लामीकरण पूर्ण झाले. शक ७७५ च्या पुढे अरबी लिपिबद्ध पहलवी किंवा फार्सी ईराणी लोकांना मोकळी झाली. फार्सी भाषेतील साहित्यनिर्मितीला तेव्हापासूनच आरम्भ झाला.

मध्ययुगात म्हणजे शक १००० च्या पुढे भारत व ईराण देशाचे संबंध समोरासमोरील शत्रु म्हणूनच आले. त्यात संकुचित कडवा इस्लामधर्म व अरबी लिपीतील फार्सी भाषा या आर्यभारतीय प्रकृतीशी न जुळणाऱ्या गोष्टीमुळे ईराणी मुसलमान हे भारताचे नंबर एकचे शत्रु समजले गेले. ही परम्परा मोगल साम्राज्याच्या अंतापर्यंत तीव्रपणाने चालू होती. स्वातंत्र्य संपादनाच्या शेदीडशे वर्षांच्या कालावधीत अंजारणेगोंजारण्याचे प्रकार झाले. पण फलनिष्पत्ति होऊ शकली नाही. या ऐतिहासिक कारणपरम्परांच्या पार्श्वभूमीवरून भारतीयांचा, ईराणदेश व फार्सी भाषा यांच्याविषयीचा दृष्टिकोन बनलेला आहे. म्हणून भारतात फार्सी भाषेचा आविष्कार–साहित्य आणि इतिहास या क्षेत्रात, बराच झालेला असला तरी, या कार्यात भारतीय हिंदूनी कधीच मनसा सहकार्य केलेले नाही. त्यात हिंदू साहित्यिक मुळीच नाहीत असे म्हटल्यास सत्यापलापी मुळीच होणार नाही. काही इतिहासलेखक हिंदु होते. परंतु ते सर्व मुसलमान शासकवर्गांच्या भृत्यवर्गातले होते. म्हणून त्यांची गणना भारतीय हिंदूच्या या कार्यात सहकार्य म्हणून करता येणे कठीण आहे. गेल्या शेपाऊणशे वर्षात ईराण, अफगाणिस्तान या आर्यवंशीय व आर्यभाषीय ईस्लामी देशातून भाषिक व सांस्कृतिक दृष्टिकोन सर्वस्वी बदललेला असला तरी आम्हा भारतीयांना आमच्या या जुन्या दृष्टिकोनामुळेच त्याच्या नव्या मनोभूमीची स्पष्टशी कल्पना नाही.

आजच्या या परिस्थितीस भारतीय मुसलमानही बऱ्याच अंशी कारणीभूत आहे. भारतीय मुसलमानाची ज्ञानोपासना व संस्कृतिभाषाज्ञान ईराण व अफगानिस्तानच्या इस्लामपूर्व काळापर्यंत मुळीच पोचलेले नाही. त्याचे ज्ञान इस्लामोत्तर काळातच–केवळ १३४६ वर्षातच रेंगाळत व गुदमरत आहे. भारतीय मुसलमानांचा दृष्टिकोनही अत्यंत संकुचित असा असल्यामुळे या देशाच्या प्राचीन संस्कृतीचे दर्शन मुसलमानांच्या उर्दू भाषेतही कधीच प्रतिबिंबित होत नाही. या देशांच्या

भारतीय मुसलमान विद्वानांच्या बाबतीत इस्लामपूर्वकाळाच्या ज्ञानासंबंधी कधी प्रश्नच उद्भवत नाही.

आज ईराण व अफगानिस्तान या दोन्ही देशातून सांस्कृतिक व भाषिक दृष्टिकोन बदलेले आहेत. ते आज अंतर्मुख झालेले असून, इस्लामपूर्व संस्कृति, धर्म, भाषा, वंश इत्यादीविषयी अत्यंत सहानुभूतिपूर्ण झालेले आहेत. ईस्लामी आक्रमणामुळे अरबीशब्दमय झालेल्या फार्सी भाषेतून अनावश्यक, न रुळलेल्या, बोजड अरबी शब्दांची हकालपट्टी झालेली आहे. भाषा सोपी, प्राचीन स्वीय शब्दांनी युक्त व जनसाधारणगम्य बनलेली आहे. साहित्यातून प्राचीन इतिहास, भाषा, संस्कृति यांची आदरपूर्ण चर्चा चालू आहे. ईराणी लोकनेते आपल्या आर्य वंशाचा गौरवपूर्ण साभिमान उल्लेख करीत असलेले दृष्टीस पडत आहे. ईराणात माध्यमिक शाळांतून आता अवेस्ता भाषा आवश्यक बनणार आहे.

फार्सी भाषेत व ईराणी जनमानसात झालेल्या या क्रांतीचे दर्शन ईराणी साहित्यात आज सर्वत्र दिसून येते. या प्रश्नासंबंधी केवळ एकाच विद्वानाच्या मताचा येथे उल्लेख करू. डॉ. इब्राहीम पूरे दाऊद)* हे आज ८१ वर्षांचे ज्ञानमहर्षि आहेत. धर्माने मुसलमान असूनही त्यांचा प्राचीन ईराण, जरतुष्ट्रधर्म, आर्य फार्सी भाषा, ईराणी जनतेचा आर्यवंश व तिची संस्कृति इत्यादींचा त्यांचा अभिमान ज्वलंत आहे. ईराणमध्ये ही वैचारिक व सांस्कृतिक क्रांती शक १८४७ मध्ये रज़ाशाह पहलवी हे ईराणचे सम्राट बनल्यानंतर घडून आली. शक १८५२ च्या नंतर भारतीय तपोनिधि स्वर्गीय रवीन्द्रनाथ टागोर यांनी ईराणची यात्रा केली. त्यावेळी त्यांनी ईराणच्या शाहाकडे-सम्राटाकडे, आपल्या शांतिनिकेतनात ईराणी संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी एका सांस्कृतिक प्रतिनिधीची मागणी केली. तेव्हा रज़ाशाह यांनी प्रोफेसर पूरे दाऊद यांची नियुक्ति केली. डॉ. पूरे दाऊद शक १८५५ या वर्षी एक वर्षभर शांतिनिकेतन येथे ईराणी शासनाचे प्रतिनिधी या नात्याने ईराणी कला व संस्कृति या विषयाचे आचार्य म्हणून राहिले. पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या तोडीच्या मुंबई येथील के. आर. कामा प्राच्यविद्या संस्थेने डॉ. आग़ा पूरे दाऊद यांना शक १८५६ चे शासकीय संशोधन फेलो नियुक्त केले. त्यांची या वर्षीच्या चैत्र महिन्यात प्राचीन ईराणसंबंधी सहा व्याख्याने झाली. ती व्याख्याने कामा संस्थेच्या क्रमांक २८ च्या पत्रिकेत प्रकाशित झालेली आहेत. ईराणी इतिहासाचे सिंहावलोकन करून, आपल्या शेवटच्या व्याख्यानात, ईराणी राष्ट्राची आपल्या भारतीय प्राचीन संस्कृती-विषयीची भावना, भारताबद्दलचा जिव्हाळा त्यांनी बोलून दाखविला आहे. भारतातील पार्सी लोकांचा उल्लेख करून डॉ. पूरे दाऊद यांनी म्हटले आहे. :—

* (मृत्यू, नोव्हेंबर १९६८)

" We Iranians look at our Parsi brothers in India with feeling of gratitude and respect, for their having preserved the ancient religion of Iran and with it our noble Iranian character. In Iran, today, all men look back to their ancient history. tradition and culture and, therefore there has arisen a feeling of unity and love among the old brethren of Iran of the same blood. When we think of our Parsi brethren as the Preservers of the ancient faith of Iran, a feeling of admiration and gratitude for India at once comes to our mind for the tolerant India, but for whose hospitality and protection, the Parsi community would not be living today......We Iranians do not feel that the children of Iran had gone to any foreign country eleven centurries ago, because India is an Aryan country and we are glad that a part of the Aryan Iran had taken refuge in a part of the Aryan India."

सध्याच्या पिढीतील ईराणी राष्ट्राच्या प्राचीन संस्कृतीविषयाच्या त्यांच्या बदलत्या दृष्टिकोनाचे प्रत्यंतर सर्वत्र येते. ईराणच्या शाहाला आदरार्थी बहुमान-दर्शक म्हणून त्याच्या नावाबरोबर आला हज़रत ही उपाधि लावण्यात येत असे. हे दोन अरबी शब्द असून त्याचा अर्थ पुरुषोत्तम, पुरुषश्रेष्ठ असा आहे. हैद्राबाद राज्यातून आलेल्या माझ्यासारख्यांना आला हज़रतांची चांगली ओळख असणे साहजिकच आहे. गेल्या एकदोन वर्षांत ईराणमधील लोकप्रतिनिधी मज्लिसमध्ये पास झालेल्या एका ठरावानुसार ही उपाधि आता **आर्यमिहिर** अशी स्वीकारण्यात आली आहे. हा आर्यमिहिर शब्द केवळ ईराणी अर्थात आर्य आहे. मिहिर हे संस्कृत मित्र शब्दाचे पहलवी रूप. अर्थ संस्कृतातल्याप्रमाणेच सूर्य आणि दोस्त, कृपा असा आहे. संस्कृत नाटकांशी परिचितांना हे माहीतच आहे की आर्य राजाला संबोधावयाचे झाल्यास आर्यमित्र हा बहुमानार्थी प्रयोग होत असे. हैद्राबादच्या उस्मानिया विद्यापीठाला भारतीय मुसलमान जामिए-उस्मानिया म्हणतात. अलीगड विद्यापीठ हे जामिए-अलीगढ़ आहे. भारतीय राष्ट्रीय मुसलमानांनी दिल्ली येथे स्थापिलेल्या विद्यापीठास जामिए-मिल्लिया असे नाव आहे. अरबी भाषेत मिल्लत म्हणजे धर्मसंघ, परंतु यौगिक अर्थ विशिष्ट समाज. येथे अभिप्रेत मुस्लिम समाज. परंतु ईराणी लोक आपल्या विद्यापीठास **दानिश-गाह** असा शब्द वापरतात. दानीदन, दान्, दाना, दानिश हे सर्व शब्द केवळ पहलवी व संस्कृत ज्ञा धातूपासून व्युत्पन्न आहेत. गाह शब्दही पहलवी असून अर्थ स्थान असा आहे. तो गाथा शब्दाचा सगोत्र आहे. दारयवहूच्या शिलालेखात त्याचे रूप गाथु, अवेस्ता भाषेत गातु, पहलवी भाषेत गास् असून तो ऋग्वेदकालीन गातु

शब्दापासून आला आहे असे जर्मन प्राच्यविद्याविशारद डॉ. पॉल हॉर्न यानी प्रतिपादिले आहे. यावरून ईराणी राष्ट्राचा भाषा व संस्कृतिविषयक दृष्टिकोन स्पष्ट दिसून येतो.

भारतीय मुसलमान ईराणच्या इस्लामपूर्व संस्कृतीकडे पाहात नाहीत. ईराणमधील या उत्क्रांत परिस्थितीचे दर्शन भारतातील किंवा पाकिस्तानातील चालू उर्दू साहित्यातून मुळीच होत नाही. हे आम्ही स्वतःच्या अनुभवाने सांगू शकतो. नुकत्याच ज्यू राष्ट्र आणि अन्य सर्व अरब देश यांच्यात घडून आलेल्या रणकंदनात व तदनंतर, तुर्कस्तान, ईराण व अफगाणिस्तान या राष्ट्रांनी स्वीकारलेली भूमिका मोठी बोलकी आहे. वरील देशांची या सर्व प्रकरणातील मूकता शहाण्या मंडळींनी विचार करण्यायोग्य आहे. भारतीय मुसलमान सर्व इस्लामधर्म-संबद्ध बाबीत इस्लामी, मुसलमानी असे शब्द वापरतात. परंतु वरील जीवघेऊ संघर्षात या इस्लामी शब्दप्रयोगाचे अर्थ विशद झालेले आहेत. परंतु भारताच्या, केवळ न्यायदानातच रुळलेल्या परराष्ट्र मंत्र्याला आपल्या ईराणभेटीनंतर काय बोलावे आणि काय बोलू नये यातील मसलिहत कळली नाही, याचे सखेद आश्चर्य वाटते. वरील कथनाचा हेतु एवढाच की ईराण, अफगाणिस्तान इत्यादी देशातून घडून आलेल्या भाषिक व सांस्कृतिक स्थित्यन्तराकडे भारतीय विद्वानांचे लक्ष्य आकृष्ट करावे. भारताने या देशांशी आपले भाषिक, सांस्कृतिक व परिणामरूपे राजकीय संबंध कसे निर्धारित करावे या प्रश्नाची छाननी भारतीय विद्वानांनी करावी, व या देशाशी आपले राजकीय, सांस्कृतिक नाते जुळविण्यात सहायभूत व्हावे. दुर्दैवाने भारतीय विद्वान, फार्सी भाषेसंबंधी ऐतिहासिक कारणपरम्परेतून निर्माण झालेल्या दुष्टग्रहातून अजून मुक्त झालेले नाहीत, असे खेदाने म्हणावे लागते. आता काळ बदलला आहे. इतिहासाची पावले अतिवेगाने पुढे पडत आहेत. परंतु भारतीय विद्वानांकडून मिळावयाचे बौद्धिक व सांस्कृतिक मार्गदर्शन मात्र, कर्णाच्या रथाची चाके ऐनवेळी चिखलात रुतून बसली त्याप्रमाणे, अज्ञानजन्य तिरस्कारात आणि भ्रममूलक जीवघेण्या तटस्थतेच्या कर्दमात रुद्धबद्ध होऊन जागचे हलेनासे झाले आहे. असो.

आता शक, पहलवाकडे वळू. ईराणविद्येशी Iranology थोडासा ढोबळ परिचय झाला की शक हे आर्यवंशीय आहेत याची त्याला कल्पना येते. ईराण-विद्या शब्दात ईराणचा प्राचीन व अतिप्राचीन इतिहास, ईराणी लोकांचा वंश, वंशीय शाखोपशाखा, त्यांची भाषा, तिचा विस्तार व स्थित्यंतरे, त्यांच्या कला व इतर सांस्कृतिक विकास इत्यादींचा समावेश होतो. ईराण हा शब्द आर्याणाम् यापासून बनलेला आहे. नाम् हा संस्कृतमधील षष्ठीचा बहुवचन प्रत्यय. ईराण म्हणजे आर्यभूमि. ग्रीक लोकांचे अनुकरण करणाऱ्या यूरोपीय लोकांनी ईराणला पर्सिया असे नाव दिलेले होते. पर्स, फार्स हा ईराणचा एक सुभा किंवा

जिल्हा आहे. त्यावरून फार्सी भाषा हा शब्दही व्युत्पन्न आहे. शक १८५७ पर्यंत या देशाचे शासकीय नाव पर्सिया असेच होते. पण रजाशाह पहलवी यांच्या प्रेरणेने होत असलेल्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनामुळे, त्या साली मज्लिस अर्थात ईराणी लोकसभेने या देशाचे खरे नाव **ईरान** असावे असा ठराव केला. फार्सी भाषेच्या, आधुनिक आर्यभारतीय भाषांच्याप्रमाणेच, तीन प्रमुख विकासावस्था आहेत. वैदिक संस्कृतभाषेला समांतर असे फार्सीभाषेचे अवेस्ता हे प्राचीन रूप आहे. दारयवहूचे शिलालेख लिहिणाऱ्या भाषेला पाश्चात्य विद्वानांनी प्राचीन फार्सी असे विशिष्ट नाव दिलेले आहे. पण ही अवेस्ता भाषेचाच भाग आहे. प्राकृत अपभ्रंशांशी समांतर अशी फार्सीची पहलवी ही विकासावस्था होय. इस्लामसंपर्कानंतर झालेल्या पहलवीच्या रूपान्तराला पार्सी हे नाव आहे. अरब सत्तेखाली प चा फ होऊन फार्सी हे नाव रूढ झाले. दिल्लीकर अमीर खुस्रौने (मृत्यु शक १२४७) या भाषेला पार्सी असेच म्हटले आहे.

अवेस्ता भाषेत ईराणी लोकांचे धार्मिक वाङमय उपलब्ध आहे. लौकिक साहित्य अरब आक्रमकांनी अग्निसात् केले असा विद्वानांचा निर्वाळा आहे. अरबपूर्व (शक ५७४ पूर्व) लौकिक साहित्य व ईराणच्या इतिहासाचे ग्रंथ नष्ट झाल्याचे दिसून येते. जे धार्मिक वाङमय उपलब्ध आहे त्यातूनही समाजाचे थोडे बहुत चित्र अपरिहार्यपणे सापडतेच. प्राचीन ईराणी लोकजीवनाचा जर्मन, फ्रेंच व रशियन विद्वानांनी कसोशीने अभ्यास केलेला आहे. थोडासा अभ्यास अलीकडे ईराणी लोकांनीही केलेला दिसून येतो. अशा ईराणी मुसलमानात प्रोफेसर मीर्ज़ा इब्राहीम पूरे दाऊद आणि त्यांचे मित्र विद्वद्रत्न स्वर्गीय मीर्ज़ा मुहम्मद अब्दुलवह्हाब क़ज़्वीनी हे होत. पाश्चात्य विद्वानांच्या फार्सी-अरबी भाषांच्या अभ्यासाचा विशेष हा की त्यांनी या दोन्ही भाषांतील बहुतेक सर्व प्राचीन व महत्त्वाच्या ग्रंथांच्या, साहितिक टीकाशास्त्राला अनुसरून, विस्तृत आवृत्ति काढलेल्या आहेत. त्यामुळे सांस्कृतिक अभ्यास करणे सुकर झाले आहे. फिर्दौसी याच्या शाहनामा या, भारतीय महाभारताच्या समान्तर असलेल्या, बृहद्ग्रंथाचा असाच खोल अभ्यास करण्यात आलेला आहे. 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्' ही उक्ति शाहनामा ग्रंथाला देखील लागू पडेल. अशा या अभ्यासातून तूराणी, शक, पह्लव (म्हणजे संस्कृत साहित्यातले पह्लव, पल्हव वा पल्लव), पारसीक, दस्यु (म्हणजे फार्सी साहित्यांतील दाही) भारतीय साहित्यातील दनु म्हणजे फार्सी साहित्यातील दानी इत्यादी मध्यआशियातील जनसमूहाबद्दल ऐतिहासिकदृष्ट्या साधार बोलणे शक्य झाले आहे.

डॉ. पूरे दाऊद यांनी कामा प्राच्य संस्थेत दिलेल्या व्याख्यानात दुसरे व्याख्यान तूरान या शब्दावर व तूरान या जनसमूहाच्या इतिहासासंबंधी आहे. त्यात विद्वान व्याख्यात्याने, विविध प्रकारच्या ईराणविद्येच्या संशोधनग्रंथातून मांडल्या गेलेल्या प्रमेयांचा आधार घेऊन, असे प्रतिपादिले आहे की, तूरानी हा

आर्यवंशीय जनसमूह होता. ईराणी हे ज़रतुष्ट्र या धर्मसंस्थापकाच्या उपदेशाने शेती व पशुपालन करावयास लागले. पुढे त्यांनी ईराणदेश व्यापला व ते स्थिर जीवन कंठू लागले. तूरानी मात्र भटके राहिले. ते टोळकी करून स्थिरावलेल्या ईराणी जीवनाचा उद्ध्वंस करीत. म्हणून ते ईराणी लोकांचे शत्रु ठरले. होते भाईबंदच, परंतु कालौघाने भिन्न जीवनसाधनांमुळे त्यांच्यात वैर माजले. मूलतः तूर शब्दाचा अर्थ वेगवान, यौगिकार्थाने शूर, साहसी असा अर्थ निष्पन्न झाला. संस्कृत भाषेत तूर शब्दाचा असाच अर्थ होतो अशी ग्वाही डॉ. पूरे दाऊद यांनी दिली आहे (उपरोक्त इंग्रजी पुस्तक, पृष्ठ २३). प्राचीन फार्सी ग्रंथलेखकांनी याच अर्थाने हा शब्द वापरला. परंतु तूरानी लोक ईराणी पारसीकांचे शत्रू बनल्यानंतर या शब्दाच्या अर्थात देखील बदल झाला. ईराणी लोकांनी या शब्दाचा अर्थ दीवाना, वेडा, अडाणी, गांवढळ असा केला. आधुनिक फार्सीत तोच अर्थ रूढ आहे. तसेच फार्सी भाषेच्या कुर्दी (कुर्दिस्तानची भाषा) आणि गीलानी (कास्पियन समुद्रालगतचा ईराणी प्रदेश) या दोन बोलभाषांत याच शेवटच्या अर्थाने हा शब्द रूढ आहे. निरनिराळ्या यस्तांमधील या शब्दाचा उल्लेख करून, पूरे दाऊद यांनी हे दाखवून दिले आहे की तूर, तूरानी हा आर्यवंशीय जनसमूह होता.

पृष्ठ २८–२९ वर डॉ. पूरे दाऊद यांनी दाह या जनसमूहाच्या वंशीय संबंधाची चर्चा केली आहे. अवेस्ता भाषांतर्गत दाह हे ऋग्वेदातील दास होत; दास हेच दस्यु पण होत. दास हे आर्य लोकांच्या मानाने अडाणी व गांवढळ असून ते आर्यजीवनाचा उच्छेद करून आपली वृत्ति चालवीत. त्यांचा देश कास्पियन समुद्राच्या पूर्वेस होता. त्यांच्या देशाला दहिस्तान म्हणत व तो हरकेनिया Hyrcania या देशाच्या उत्तरेला होता. अकामिनियन (सखामनस्) वंशातील सम्राट दारयवहूने दाही गटाला जिंकले होते. पश्चात्काळी हे दाही लोक तिसऱ्या दारयवहूच्या सैन्यात सामील झाले व त्यांनी प्रसिद्ध ग्रीक योद्धा सिकंदरबरोबरही दोन हात केले. हे लोक आर्यवंशीय असल्याने ते मृतांच्या देहास अग्निसंस्कार करीत. हे इतिहासनिविष्ट आहे.

यानंतर डॉ. पूरे दाऊद यांनी (पृ. ३०) शक या जनसमूहाच्या कुळीमुळीचा ऊहापोह केलेला आहे. दारयवहु या अकामिनियन (अथवा फार्सीत हखामनिश) सम्राटाने आपल्या बिहिस्तून (विस्थून) आणि पर्सिपोलिस (पुरुषपुर) येथील शिलालेखात शक लोकाच्या तीन गटांचा उल्लेख केलेला आहे. पहिला समूह होमवर्क याचा होय. पूरे दाऊद यांनी असा अंदाज बांधला आहे की हे होम (सोम) या झाडाची पाने धारण करणारे असावेत. दुसरा गट तीग्रख़ौद शकांचा होय. (तीग्रख़ौद हा शब्द संस्कृत तीव्रक्षौद शब्दाचा पर्याय असावा–लेखक) या शब्दाचा अर्थ तीक्ष्ण शिरस्त्राण धारण करणारे होय. शकांचा तिसरा गट तर–द्रय म्हणविला जाई. याचा अर्थ समुद्रापलीकडील असा होतो. एका जर्मन पंडिताच्या

मते हा समुद्र काळा समुद्र असून हे लोक हा समुद्र व बॉस्फोरसच्या मध्ये राहात असावेत. पूरे दाऊद म्हणतात :–

" The Aryan names, habits and customs of these people particularly, which have reached us from the accounts of classical writers, leave no room for doubt as to their Iranian origin. They resemble the Medians and the Persians in all their traits." (पृ. ३०).

दारयवहु याने त्यांचा मायदेश शकस्थान याचा उल्लेख केला नाही. परंतु त्याने त्यांचा देश म्हणून ज़रनक या प्रदेशाचा उल्लेख केलेला आहे ज़रनक हे, शकांनी तेथे वसाहत करण्याच्या पूर्वी, त्या देशाचे नाव होते. प्राचीन साहित्यिकांनी त्याला ज़रंगोई अथवा द्रंगियाना असे म्हटलेले आहे (संस्कृत ' ह ' चा प्राचीन फार्सीत द होतो, जसे हस्त याचे रूप दस्त म्हणजे हात). येथे द्रय हा शब्द सं. ज्रयस् शब्दापासून निघालेला आहे. ज्रयस् शब्दात मूळ सं. धातू ज्रयति असून पाण्याचे वाहाणे असा त्याचा अर्थ होतो. या ज्रयस्, द्रय शब्दापासून फार्सी दर्या, दरिया (समुद्र) शब्द बनलेला आहे. तर म्हणजे पलीकडे, दूर. पाहा पोकोर्नी Glei–To run, to stream (P. 401).पुरुज्रय, पृथुज्रय या सं. शब्दात हे मूळ दिसून येते. डॉ. पूरे दाऊद यांनी बग (भग), बगदाद (भगधात) इत्यादी शब्दांची व्युत्पत्ति देणाऱ्या फार्सी भाषेत लिहिलेल्या प्रबंधात (पाहा, डी. जे. ईरानी स्मारक ग्रंथ, प्रकाशन ईरानी स्मारक निधि समिती, मुंबई, शक १८६५, फार्सी विभाग, पृष्ठे २१३ ते २३८) शकस्थान, फार्सी सकिस्तान या शब्दाच्या रूपान्तरांची चर्चा केली आहे (पृ. २१५). फार्सीत संस्कृत ' क ' चा कधी कधी ' ग ' होतो. हा वस्तुतः प्राकृत नियमच आहे. त्यावरून सकिस्तानचे रूप सगिस्तान असेही आढळते. प्राकृतच्या नियमानुसार कोणत्याही एखाद्या शब्दातील प्रथमोत्तर अक्षराचे व्यंजनत्व लोप पावून त्यातील स्वरत्व शेष रहाते. उदाहरणार्थ नदीपासून नई, कवि शब्दपासून कइ. हाच नियम फार्सीच्या प्राचीन रूपातही दिसून येतो. सकिस्तान अथवा सगिस्तान या रूपातील क अथवा ग व्यंजन लोप पावून सइस्तान हा शब्द राहिला. अरबांच्या राजकीय आक्रमण व धसमुसळेपणामुळे फार्सीच्या प्राचीन परंपराही अस्ताव्यस्त झाल्या. अनेक शब्दांचे रूप व उच्चार बदलले. त्यातच या शब्दाचा खरा सइस्तान उच्चार लोप पावून आज स्टीन्गासच्या कोशात याचा उच्चार सीस्तान असा दिलेला आहे. हाच उच्चार ईराणमध्ये देखील रूढ असल्याचे डॉ. पूरे दाऊद यांच्या निर्देशावरून दिसून येते. सीस्तान हा प्रदेश अफगानिस्तानच्या नैर्ऋत्य दिशेला ज़रनक-द्रंगियाना या प्रदेशाच्या उत्तरेस आणि हलमंद (संस्कृत, सरस्वती) नदीच्या मुखरूप हामूनच्या दक्षिणेस वसलेला आहे.

ही गोष्टही येथे लक्षात ठेवणे आवश्यक की प्राचीन काळी अफगानिस्तानचा

स्वतंत्रपणे उल्लेख सापडत नाही. हा प्रदेश खुरासान (संस्कृत स्वरास्थान– पूर्वेकडील प्रदेश, पूर्वदिशा), बलख, ज़नरक (द्रांगियाना) या प्रदेशान्तर्भूत होता. ईराणी वा भारतीय प्राचीन साहित्यात अफगानिस्तानचा स्वतंत्र उल्लेख सापडत नाही. सर्वप्रथम उल्लेख वराहमिहिराच्या (शक ४७२ च्या सुमारास) बृहत्संहितेत "**अवगाण**" या रूपात सापडतो. या सर्व प्रदेशात आर्यवंशीय जनसमूह वसत असल्याचे उल्लेख ईराण व भारत या दोन्ही देशाच्या प्राचीन साहित्यात-इतिहासात सापडतात. गंधार देश प्राचीनकालापासून ज्ञात आहेच. शिवाय या प्रदेशात अनार्य टोळ्या फार उशीरा, फक्त तुर्क व मोंगोल यांच्या आल्या. हा संपर्क शकाच्या सहाव्या सातव्या शतकात आला. तत्पूर्वी हा प्रदेश आर्य गणांनी व्यापलेला होता.

कास्पियन समुद्राच्या पूर्व प्रदेशात राहात असलेल्या आर्य जनसमूहाच्या टोळ्यांना ग्रीक इतिहासकारांनी Scythians म्हटले असल्याचे पूरे दाऊद सांगतात. त्यात पर्थव व शक यांचा समावेश होता (पृ. ३६). हे आर्य वंशीय होते.

पर्थव किंवा पर्थियन हा तूरानी जनसमूहांपैकी एक गट होता. त्यांनी आधुनिक खुरासान (दहाव्या शकशतकात संस्कृत साहित्यात उल्लिखित खुरशान) प्रदेशात वसाहत केली आणि शकांप्रमाणेच त्यांनी या प्रदेशास पर्थव असे नामाभिधान दिले. दारयवहु याच्या विहिस्तून (क्स्थून) आणि नक्शे-रुस्तुम येथील खोदनलेखात या पर्थव प्रदेशाचा उल्लेख आलेला आहे. तो म्हणतो, "एके काळी पर्थव आणि वर्कान (आधुनिक गूर्गान, संस्कृत वृक यापासून) यांनी माझ्याविरुद्ध बंड केले. माझा पिता विस्तास्प याने त्याचे शमन वियख्न महिन्याच्या २२ व्या (५ फेब्रुवारी ५२१ ख्रिस्तपूर्व) दिनी केले." (पाहा पृ. ३५) येथे पूरे दाऊद यांनी पर्थव शब्दाची काहींशी चर्चा केली आहे. पर्थव शब्दापासून पहलव हा शब्द व्युत्पन्न आहे. पहलवी अथवा पहलवानी (भाषा) पर्थव शब्दापासून निघाली असे समजण्यात येते. फिर्दौसी म्हणतो–

अगर पहलवानी न दानी ज़बान्
ब-ताज़ी तू अरवन्द रा दिजला दान

"जर तुला पहलवानी भाषा ज्ञात नसेल तर तू पहलवानीतील अर्वन्द या नदीला अरबी भाषेत दिजला (तिग्रीस) समज." शूर, साहसी या अर्थाने प्रयुक्त होत असलेला पहलवान हा शब्द पर्थव या आर्य टोळीच्या शौर्यगुणावरूनच रूढ झालेला आहे. हा शब्द बहुतेक सर्वच नव्य आर्यभारतीय भाषात ईराणी मुसलमानाच्या गेल्या सात-आठ शतकाच्या संपर्काने रूढ झालेला आहे. जुस्ती या जर्मन पंडिताने तो पर्थव या शब्दापासून व्युत्पादिला असून त्याचा अर्थ बाजू, दिशा असा दिलेला आहे. याचे कारण, त्याच्या मते, असे की, पर्थव लोक पर्वतांच्या बाजूला, पायथ्याला वसती करून राहात असत. म्हणजे पर्थव ही आर्य जमात पर्वतोपत्यकानिवासी होती.

प्राचीन काळी पर्थवांनी व्यापलेल्या खुरासान प्रदेशाची उत्तर सीमा सध्याच्या रशियन तुर्कस्थानपर्यंत पसरलेली होती. त्यांचे प्रमुख राजधानीचे शहर ख़्वारिज़्म होते. ख़्वारिज़्म कालान्तराने पहलवांच्या हातून ईराणी लोकांच्या ताब्यात गेले. तेव्हा पहलव लोकांनी आपल्या प्रमुख ठिकाणासाठी उत्तर अफगानिस्तानातील बल्ख़ या शहराची निवड केली. बल्ख़ हे खुरासान प्रदेशाची राजधानी बनले. हख़ामनिश राजांनी खुरासान जिंकिले आणि बल्ख़ येथे आपल्या ख्शथ्रपावन (संस्कृत क्षत्रपावन अर्थात क्षत्रप वा ग्रीकांचा सत्रप) नावाच्या अधिशासकाची नियुक्ति केली. अशा प्रकारच्या क्षत्रपांची सत्ता भारतात कित्येक प्रदेशात शकाच्या पाचव्या शतकापर्यंत चालू असल्याचे उघडच आहे.

यवन हा शब्द आयोनियन (ग्रीक) या शब्दापासून भारतात प्रथमतः रूढ झाला. सिकंदर म्हणजे अलेक्झांडर हा आयोनियन अर्थात् यवन होता. आरम्भ कालात यवन हा शब्द. ग्रीस देशातील भारत देशात येऊन राहिलेले परदेशी, परकीय लोक, अशा अर्थाने वापरात होता. पण कालान्तराने सर्व प्रकारच्या परकीयांना तो लावण्यात येऊ लागला. ग्रीक ही आर्य भाषा आहे. ग्रीक, रोमन. जर्मन, रशियन इत्यादी युरोपीय लोक हे आर्यवंशीयच होत. म्हणूनच बहुधा सर्व युरोपीय भाषा व ईराण, आज़रबाइजान, कुर्दिस्तान, अफगानिस्तान, बलूचिस्तान या देशखंडातील ईरानियन ही भाषा आणि भारतातील भाषा यांचे एक कुल समजले जाते. हे सर्व भारोपीय भाषाकुल Indo-European Family समजण्यात येते. एवं च यवन हे देखील आर्यवंशीय होते व आहेत असे दिसून येते.

डॉ. मिराशींनी पृष्ठ ९२ वर (सर तिसरा) मनुस्मृतीत उल्लेखिलेल्या परकीय व भारतीय, पूर्वी क्षत्रिय असलेल्या, पण कालान्तराने क्रियालोप झालेल्या आणि ब्राह्मणीय आचारांपासून दुरावलेल्या, जनसमूहांचा निर्देश केलेला आहे. त्यांतील शक, यवन, पहलव इत्यादींचा ते आर्यवंशीय असल्याचा ऊहापोह वरती केलेला आहे. या यादीत दरद नावाचा एक गट आहे. तो गटही डॉ. मिराशी यांच्या मते अनार्य असणारच. तसा त्यानी उल्लेख केलेला नसला तरी एकंदर दिशेवरून हे गृहीत धरावयास हरकत नसावी. आता या दरदांच्या आर्यवंशीयत्वाचा विचार करू. दरद हे काश्मीरच्या जवळपास, वायव्येस राहाणारे आहेत असे दिसते. विष्णुपुराणात खालील उल्लेख आहे. **काश्मीराऽऽभीरसमीपर्वातिनो दरदाः ।** ईराणविद्येतील संदर्भावरून ही जमात काराकोरम पर्वताच्या पूर्वदक्षिणेस आणि काश्मीरच्या उत्तरेस राहात होती असे दिसून येते. या दरद लोकांच्या भाषेचे नाव दरी असे आहे. दरी भाषा ही फार्सी भाषेची एक बोली समजण्यात येते. खुरासान देश पहलवांनी व्यापला. दरी ही भाषा पहलवी भाषेला जवळची असून फार्स इत्यादी पश्चिम दक्षिण ईराणातील फार्सी भाषेला दूरची आहे असे पूर्वसूरींनी नमूद करून ठेविले आहे. अमीर खुस्रौ (मृत्यु शक १२४७) याने आपल्या नुह

सिपिहर (लेखनकाल शक १२४०, व अर्थ नऊ आकाश) या ग्रंथात तत्कालीन त्याला ज्ञात असलेल्या भाषांचे सर्वेक्षण प्रस्तुत केले आहे. या विषयासंबंधाने त्याने ८०–९० श्लोक लिहिलेले आहेत. त्यात खुस्रौ याने संस्कृत, अरबी, तुर्की, फार्सी, दरी आणि भारतीय संविधानात उल्लेखित १५ भाषांपैकी ९ भाषांचा उल्लेख केलेला आहे. वरील सर्व विषयाचा विचार आम्ही एका स्वतंत्र लेखात केलेला असून तो लेख श्री डॉ. पवार स्मारक ग्रंथात, कोल्हापूराहून, प्रकाशित झाला आहे.

अमीर खुस्रौ याने या चर्चेत दरी भाषेचा दोनदा उल्लेख केलेला आहे. दरी ही ईशान्य ईराणमधील भाषा होय. अरब आक्रमकांनी ईराण पादाक्रांत केल्यानंतर नैर्ऋत्य ईराणमधील फार्सी भाषेवर अरबीचे संस्कार झाले आणि तत्प्रभावामुळे दरी भाषादेखील एक प्रकारची फार्सी (पार्सी) बनली अशी तक्रार अमीर खुस्रौ याने खालील श्लोकात केली आहे–

चूं दमे शान पार्सीई बूद दरी ।
वां हमह बि–गिरिफ्तह मुक़ीम व गुज़री ।।

अशाप्रकारे त्यांच्या (पार्सी लोक) प्रभावाने दरी बोली एक प्रकारची पार्सी (फार्सी) बनली; ती स्थैर्य पावली आणि प्रसृत झाली.

दुसऱ्या एका श्लोकात अमीर खुस्रौ याने संस्कृत भाषेची तुलना अरबी आणि फार्सी म्हणजेच दरी बरोबर केली आहे. त्याने आपल्या धार्मिक अतिरेकी भावनेमुळे संस्कृत भाषेला अरबी भाषेपेक्षा कनिष्ठ ठरविले आणि तिला दरीपेक्षा श्रेष्ठ असल्याचे निवेदिले आहे.

आन्स्त ज़बान-ई ब–सिफ्त दुर्र-ई दरी ।
अज़ अ़रबी कम-तर व बर-तर ज़ि दरी ।।

" दरीभाषारूपी रत्नांप्रमाणे ही (संस्कृत) एक भाषा (तेजस्वी) आहे. ती (संस्कृत) अरबीपेक्षा कनिष्ठ, कम-तर आणि फार्सी पेक्षा बर-तर अर्थात श्रेष्ठ आहे, "

येथे प्रस्तुत मुद्दा दरद लोकांच्या वंशत्वाचा आहे. कोणत्याही वंशगटाची भाषा ही त्याच्या वंशाची सर्वात मोठी खूण आहे. भाषा अतिशय महत्त्वाचे असे गमक होय. भाषा शेकडो नव्हे सहस्रावधि वर्षांच्या संस्काराने व खतपाण्याने बनत असते. म्हणून दरद लोकांच्या आर्यवंशीय होण्याबद्दल कोणालाही शंका घेता येणार नाही. तीच गोष्ट अफगान, पठाण, बलूच या जनसमूहांला लागू पडते. कारण अफगानी, पख्तू आणि बलूची या फार्सीच्या बोली आहेत.

शकादि आर्यसंस्कृतीत विलीन का

शक, पह्लवादींच्या राज्यांचा विचार करून, डॉ. मिराशींनी हे अनार्य

परकीय आर्यसंस्कृतीत विलीन झाले, हिंदूधर्माच्या महाप्रवाहौघात मिसळून गेले, असे निवेदन केले आहे. ते म्हणतात, "याप्रमाणे हिंदु धर्माने शकयवनादि अनार्य लोकांना, ते म्लेंच्छ म्हणून दूर न सारता, त्यांना समाजांत योग्य स्थान देऊन व वैदिक कर्मांचा अधिकार देऊन त्यांचा आपणात समावेश करून घेतला." (पृ. ९३). या परदेशस्थ अनार्य परकीयांनी एक संवत् कालगणना सुरू केली. ती शालिवाहनाच्या नावाशी जुळवून टाकून, परकीयांची कालगणना भारतीयांनी शक शालिवाहन या नावाने स्वीकारली. या घटनेची स्वीकार्यता वर्णन करीत असतांना डॉ. मिराशी यांनी पुढील कथन केले आहे, "शक राजे हे कोणी परकी असे मानण्याची प्रवृत्ति नसल्यामुळे त्यांच्या संवताचा उपयोग करणे अनुचित मानले जात नसे. पुढच्या देवगिरीच्या यादवांच्या काळांत त्या संवताचा प्राचीन शालिवाहन राजाशीं संबंध जोडण्यात येऊन त्याला शालिवाहन शक असें नांव मिळालें." (पृ. ९४–९५). या अनार्य परकीयांना आपल्या संस्कृतीत व धर्मात समाविष्ट करून घेण्याची एवढी मोठी सामाजिक क्रांति झाली. तिच्या कारण परंपरेकडे त्यांनी कोठेच अंगुलिनिर्देश केलेला नाही. ही कारणपरंपरा त्यांच्यासारख्या सव्यसाची पंडिताने सांगितली असती तर फार चांगले झाले असते.

स्व. डॉ. श्री. व्यं. केतकर यांनी आपल्या प्राचीन महाराष्ट्र-प्रथम विभाग या ग्रंथात (पुणे, शक १८५६) ईराणी लोक, संस्कृति, दारयवहू आणि मग यांची शककालाच्या पूर्वीपर्यंतच्या संपर्काची चर्चा अनेक प्राचीन साधने यांच्या आधारे केलेली आहे. ईराणी लोकाविषयी डॉ. केतकर म्हणतात (पृ. ६४), "इराणी लोकांची संस्कृति अत्यंत सदृश (अर्थात् भारतीय संस्कृतीशी) होती, आणि त्यांच्यामध्ये असलेल्या अग्नीच्या, समुद्राच्या आणि सूर्याच्या उपासना आपल्याकडील लोकांसही मान्य होत्या, आणि त्यांच्यामध्ये चातुर्वर्ण्याची कल्पना असून ब्राह्मणसदृश एक जात होती. या सर्व गोष्टी त्यांच्या भारतीयांशी सुंदर तऱ्हेने मिलाफ होण्यास सोइस्कर होत्या. ब्राह्मणांची व त्यांच्या उपाध्यायांची स्पर्धा लागण्याचाही संभव नव्हता."

हरिवंशातील सत्राजिताविषयीची उदाहरणे देऊन सत्राजित हा दारयवहू होता असे श्री. केतकरांनी अनुमानिले आहे. दुर्योधनमाता गांधारी ही गंधार (उत्तरपूर्व अफगाणिस्तान) देशाची अर्थात् अभारतीय राजकन्या होती आणि दशरथपत्नी व भरतमाता कैकेयी ही ईराणमधील राजाची कन्या होती असे प्रतिपादिले आहे. दाशरथि रामाचा सूर्यवंश हा ईराणी होता असेही अनुमानिले आहे. तसेच शाक्यमुनी गौतमबुद्धाचे घराणे ईराणी होते, या विद्वानांच्या अनुमानांचा उल्लेख केलेला आहे. भविष्यपुराणातून भरपूर उतारे देऊन त्या पुराणात मग इत्यादी अभारतीय असूनसुद्धा ते कसे पूज्य, दिव्य आहेत, व त्यांना भारतीय

समाजात सामाऊन घेण्याची वकिली कशी केली आहे, याची चर्चा डॉ. केतकरांनी केलेली आहे. मगांविषयी ते पुराण म्हणते.

अग्निजात्या मगा प्रोक्ता: सोमजात्या द्विजातय: ।
भोजका आदित्यजात्या दिव्यास्ते परिकीर्तित: ।

मग हे " सवितु: परिचारक: " ' भोजका: पूजका: रवे:, " " अग्निहोत्रं च तेषां, " " ब्रह्मणोक्तास्तथा वेदा मगानामपि सुव्रत " इत्यादि त्यांच्या पूज्यतेच्या व दिव्यतेच्या खुणा दिलेल्या आहेत. " ईराणी आक्रमणाचे आणि मगांचे आजचे परिणाम पहावयाचे ते हिंदुसमाजांतच पाहिले पाहिजेत. ज्याअर्थी अश्वपति कैकेय हा उपनिषदांतील एक उपदेशक व्यक्ति म्हणजे पूज्य व्यक्ति म्हणून समाविष्ट झालेला दिसतो, त्या अर्थी भारतीयांस ह्या लोकांचा परकेपणा वाटत नसला पाहिजे. मग ब्राह्मण, अंगिरस ब्राह्मण व शाकद्वीपी ब्राह्मण म्हणून यांस अस्तित्व आहेच. " (पृ. २०४). " कोणार्क येथील देवळांचे पुजारी अंगिरस ब्राह्मणच आहेत " (पृ. २०५)

डॉ. केतकरांच्या या सविस्तर चर्चेसंबंधी विशेष उल्लेखनीय व चिंतनीय गोष्ट ही की, वरील सर्व आधार हाताशी असतानासुद्धा, त्यांनी शक, मग, पह्लव दरद हे आर्यवंशीय होते किंवा निदान असावे असे कोठेही सूचित केलेले नाही. डॉ. मिराशी यांची भूमिका त्यांना परकीय अनार्य समजण्याची आहे. तर डॉ. केतकर त्यांना आर्यही म्हणत नाही वा अनार्यही ठरवीत नाही. मागील सर्व चर्चेवरून वरील जनसमूह आर्यच आहेत हे वाचकांनी ध्यानी घ्यावे.

भारताच्या भौगोलिक रचनेमुळे भारतात परकीय लोक फक्त वायव्य आणि पूर्व दिशेकडून आले. पूर्वेकडील परकीयांच्या आगमनाने आसाममधील प्रधान भारतीय आर्य संस्कृतीवर व असमी भाषेवर काही परिणाम झाल्याचे दिसून येते. परकीयांचा मुख्य लोंढा वायव्य व पश्चिमेकडून आला. हे परकीयागमन फार प्राचीन, अतिप्राचीन आहे. ऋग्वेदकालात दास, दस्यु, असुर, दनु यांचे आर्यांबरोबर संघर्ष होत. या संघर्षनाटकाचे काही अंक भारताच्या भूमीवरही होणे शक्य आहे. शक, यवन, कुशाणांच्या आक्रमणांपासूनचा इतिहास साधारण: ज्ञात आहे, असे म्हणावयास हरकत नाही. हे सगळे परकीय आक्रमक त्याचा राजकीय पराभव झाल्यावर देशाबाहेर गेले असे कोणीच मानीत नाही. ते बहुसंख्यत: येथेच राहिले. मुसलमानपूर्व आलेले सर्व परकीय भारतीय आर्यसंस्कृतीत विलीन झाले, हेही सर्वमान्य आहे. फक्त मुसलमान आक्रमक हे मात्र आर्यसंस्कृतीत विलिन होऊ शकले नाहीत. ही वस्तुस्थिति आहे. येथे हे विलीनीकरण सुकर व भारतीय आर्यांना स्वीकार्य का झाले हा विचारणीय प्रश्न आहे.

वायव्य दिशेकडून आलेले बहुतेक परकीय आक्रमक आर्यवंशीय होते असे

दिसून येते. मानववंशाच्या दृष्टीकोनातून पाहिले तर मोंगोल हा अनार्य वंश आहे. तुर्क हे मोंगल वंशीयच होत. ते मध्य आशियात मोंगोलियांतून शकाच्या सहाव्या सातव्या शतकात उतरले व त्यांनी रशियन तुर्कस्थानात आपले गबाळ टेकविले. तेथून ते शकाच्या नवव्या शतकात ईराण देशात उतरले. दहाव्या शक शतकापासून ईराण देशात व मध्य आशियात त्यांची राज्ये पसरली. तेव्हापासून तुर्कांनी ईराण देशावर सातशे वर्ष राज्य केले. या तुर्क लोकांना विशेष बद्धमूल झालेला धर्म नव्हता. त्यांची संस्कृतीही खालच्या पातळीवरील होती. मध्य आशियात असे-तोवर हे बौद्धधर्मानुयायी होते. शकाच्या सातव्या शतकापर्यंत त्यांची स्तूपे, देवळे इत्यादि ताशकंद, समरकंद, बुखारा इत्यादी प्रदेशांत उपलब्ध होतात. (स्वतः बुखारा हा शब्दसुद्धा सं. विहार शब्दाचा सगोत्र आहे हे स्व. सईद नफीसी यांनी मांडलेले आहे पाहा–अहवाल–ई रौदकी: सईद नफीसी, पृ. २२). इस्लामी बनलेल्या ईराणात आल्यावर ते हळूहळू मुसलमान झाले. चंगीजखान, याच्या पाशवी हल्ल्यावरोबर जे मोंगोल आले ते बहुधा बौद्धधर्मी होते. चंगीज खानाचा नातू हुलागू हा ईराणमध्ये शक ११७८ मध्ये शिरला. तो मुसलमान नव्हता. त्याचा मुलगा अबाका (राज्यकाल शक ११८४ ते १२०४) आणि त्याचा नातू अर्गून (शक १२०४ ते १२१३) हे दोघेही मुसलमान नव्हते. गाज़ान या अर्गूनच्या मुलाने आपल्या दहा हजार मोंगोल बांधवांसह शक १२१७ त नौरोज़च्या वसन्तोत्सवसमयी इस्लाम धर्माचा स्वीकार केला. असो, या तुर्क आणि मोंगोल लोकात पूर्वधर्माचा विशेष अभिमान, वा सांस्कृतिक पातळी, विशेष नसल्यामुळे त्याचे ईराणी संस्कृतीत विलीनीकरण लौकर झाले, असे दिसते या दोन्ही जमाती भारतात विशेष आलेल्या नाहीत. जे काही तुर्क व मोंगोल भारतात आले ते मुसलमान म्हणून आणि फारच मागाहून. मुसलमानपूर्व परकीय आक्रमक म्हणून त्यांचा भारताशी संबंध आलेला नाही. अगुइलर या पंडिताने हाच अभिप्राय चीन-मध्ये आक्रमण करणाऱ्या कुबलाय आदीच्या मोंगोल लोकांबद्दल केलेला आहे. तो म्हणतो : (पृ. २६)

"Quite as often the conquered have given their language to their conquerors as being the expression of a superior culture. The Mongols who repeatedly invaded ancient China invariably became assimilated both culturally and linguistically. (Lectures in Linguistics by O. L. C. Aguilar, Deccan College Research Institute, Poona, 1954).

भारतावरील प्राचीन आक्रमकांमध्ये मध्य आशिया या प्रदेशातील टोळयांचा विशेष भरणा होता. या आक्रमकात ठळकपणे डोळयात भरणारे आक्रमक म्हणजे शक जमात. त्यांचा प्रभाव भारतीय राजकारणात पाचसहाशे वर्षे टिकला.

त्यांची साम्राज्ये व अनेक राज्ये भारतात दीर्घ काळपर्यंत टिकली. त्यावरून हजारो, लाखो शक लोक भारतात आले असावेत. परंतु ते सर्व भारतीय आर्य समाजात विलीन होऊन एकरूप झाले व त्यांना येथील समाजात चांगला सामाजिक दर्जा मिळाला. या सर्व प्रक्रियेच्या मुळाशी, एक तर हे लोक आर्यवंशीय होते, त्यांची संस्कृति, कमीअधिक सुधारलेली का असेना, आर्यांची होती, आणि त्यांची भाषा, बऱ्याच मोठ्या भेदाने कां होईना, आर्यवंशीय होती, हे घटक होते. हे विसरून चालणार नाही. सुसंस्कृत भारतीय आर्यांनी या शकांना आपल्या समाजव्यवस्थेत विधिपूर्वक सामावून घेतले. या परिवर्तनात समान वंश, समान संस्कृति आणि समान भाषा हा फार मोठा घटक होता असे आम्हाला प्रतिपादावयाचे आहे. परिवर्तनपूर्वक सामावून घेण्याच्या प्रक्रियेत सांस्कृतिक पातळीही नेंहमी कार्यप्रवण असते. शूर आक्रमक रोमन लोकांनी ग्रीस पादाक्रान्त केला पण जित ग्रीक लोकांनी जेत्या रोमन लोकावर आपली सांस्कृतिक छाप पाडली, असे इतिहास सांगतो. ईराणी लोक अरबांकडून पराभूत झाले. पण रानटी अरब आक्रमकांना सुसंस्कृत ईराणी लोकांनी आपल्या सांस्कृतिक श्रेष्ठतेने जिंकले व त्यांच्यावर भरपूर छाप पाडली, असे पाश्चात्य पंडित वेळी अवेळी कंठरवाने सांगत असतात. म्हणजे जितजेत्यांच्या सांस्कृतिक संघर्षात, उच्च संस्कृतीचे स्वामी असलेले जित लोक आपले सांस्कृतिक वर्चस्व स्थापन करितात, असे दिसून येते. हीच गोष्ट शक, यवन, पह्लव, दास, दनु, दरद इत्यादि छोटयामोठया आक्रमकासंबंधी भारतात घडून आली. सगळया प्रक्रियेत जेत्यांचा समान वंश, समान संस्कृति व समान एककुलीय भाषा हा पहिला महत्त्वाचा घटक आणि जित लोकांची उच्च संस्कृति हे दुसरे प्रमुख कारण होय.

(इतिहास आणि संस्कृति, मुंबई, पुस्तक १५, शक १८८९)

सन्दर्भ

संशोधनमुक्तावलि, डॉ. वा. वि. मिराशी, सर तिसरा, नागपूर, शक १८७०
प्राचीन महाराष्ट्र, डॉ. श्री. व्यं. केतकर, पुणे, शक १८५६
डी. जे. ईरानी, स्मारक ग्रंथ (इंग्रजी–फार्सी), मुंबई, शक १८६५
डॉ. पूरे दाऊद, सहा व्याख्याने (इंग्रजी), कामा प्राच्य संस्था पत्रिका, क्रमांक २८, मुंबई, शक १८५७
अहवाल–ई रौदकी (फार्सी), **डॉ. सईद नफीसी, तिहरान**, सौर १३४१ (श. १८८४)

◆◆◆

१६ : की उभयान्वयीचे दशावतार

मराठी भाषेत रूढ असलेले किं, कीं, की हे उभयान्वयी अव्यय ईराणी भाषेतून आलेले आहे, अशी विद्वानांची साधारणपणे धारणा दिसून येते. इस्लामी सम्पर्क आणि ईराणी प्रभुत्व यांनी महाराष्ट्राला शक १२१६ मध्ये स्पर्श केला. महाराष्ट्रात इस्लामी सत्ता शक १२४० मध्ये स्थापन झाली. ज्यूल ब्लोक याने असे प्रतिपादिले की '**की**' हे उभयान्वयी मराठीत हिंदुस्तानीमधून आले. याच्या-पुढे की हे उभयान्वयी हिंदुस्तानीतसुद्धा अगदी अलीकडील असून ते परकीय भाषेतून आलेले आहे असे वाटते (पाहा-ब्लोक, § २७७). स्व. वि. का. राजवाडे यांनी म्हटले आहे की, मराठीतील की हे उभयान्वयी अव्यय ईराणीतून ऋण आहे. तुळपुळे यांनी आपल्या दोन्ही अध्ययनांत या की उभयान्वयाचा उल्लेख केलेला नाही (पाहा-तुळपुळे आणि तुळपुळे ओम). पानसे यांनी राजवाडे यांचा केवळ अनुवाद केला. त्याला आधार म्हणून त्याने ब्लोक व टर्नर यांचाही उल्लेख केला आहे. भावे यांनी ज्ञानेश्वरीत प्राप्त किं, कीं या उभयान्वयी अव्ययाचा अर्थ दिलेला नाही.

प्रस्तुत लेखकाने एका निबंधात असे प्रतिपादिले आहे की मराठीतील किं, कीं हे उभयान्वयी अव्यय, इस्लामाचा महाराष्ट्रात प्रादुर्भाव होण्याच्या पूर्वी महानुभावीय मराठीत वावरत होते (पाहा चौहान, पृ. २०८ ते २१४). त्या निबंधात इस्लामपूर्व आणि ज्ञातकाल साधने वापरेलेली आहेत. या प्रसंगी, शक्य तो ज्ञात कालाच्या आधाराने, या उभयान्वयी की अव्ययाचे वास्तव्य ईराणी, तोखारियन, खोतनी शक, सिंधी, आणि गुजराती भाषांतून प्राचीन काली कसकसे दिसून येते हे पाहावयाचे आहे. व त्या प्रकाशातून, हे अव्यय इस्लामसम्पर्कपूर्व मराठीतून नांदणे कसे शक्य होते, याचा मागोवा घेणे आहे.

या उभयान्वयी की अव्ययाचा सर्वप्रथम शिलालेखीय उल्लेख अफगाणिस्ता-नातील तुखारिस्तान या प्रदेशातील बग़लान या प्राचीन नगरातील उत्खननात उपलब्ध झालेल्या एका शिलालेखात पाहायला सापडतो. हा २५ ओळीचा लेख तुख़ारी भाषेत आणि ग्रीक लिपीत लिहिलेला आहे. कुषाणवंशीय कनिष्क सम्राटाने सुरू केलेल्या कालगणनेनुसार हा लेख ३१ व्या वर्षी कोरला गेलेला आहे. हे इसवी सनाचे १०९ वर्ष किंवा शककालाचे ३१ वे वर्ष होय. या लेखात **किद्** शब्द दोनदा (ओळी ७ व ९) वापरण्यात आलेला आहे. या लेखाचे संपादन एम्. मारिश्क यांनी क्रमांक ४, १९५८ आणि एमाईल बेन्विहनिस्ते यांनी

सन् १९६१ च्या, जूर्नेल एसियाटिक या पारिस येथील त्रैमासिकाच्या अंकातून प्रकाशित केलेले आहे. हाच शिलालेख डॉ. अब्दुलहय्य् हबीबी यांनी फार्सी भाषेतून पुस्तकरूपाने संपादिलेला आहे. या उभयान्वयी अव्ययाचे या लेखातील रूप **किद्** असे आहे. हबीबी याच्या मते, एम्. मारिश्क याने हे अव्यय खोतनी भाषेतील **किदे**, कदे आणि सोग्दियन भाषेतील कद्य् याच्या समकक्ष आहे असे वर्णिले आहे. हेन्निग याच्या मते ते त्रिद् याच्या समान आहे. हबीबी याने **किद्** हे अव्यय **कि** याच्याशी जोडलेले आहे. त्याचे म्हणणे असे आहे की सोग्दियन भाषेतील क्ज़् हे अव्यय **कि**, की याच्या समान्तर आहे. उत्तरीय पहलवी भाषेच्या **दर्खत-इ असुरिक** या ग्रंथातील **गज़्श्** हे रूप फार्सीतील कि या अव्ययाच्या अर्थीच आहे याची नोंद त्याने केलेली आहे. काबूलच्या बोलभाषेत याचे रूप **कति** आहे. हबीबी याने असेही प्रतिपादिले आहे की ते **कदि** या आकारानेही वावरते. द् हा ध्वनि आधुनिक फार्सी भाषेत गळालेला आहे, परंतु काबूल येथे बोलल्या जाणाऱ्या उत्तरीय पहलवीत तो **कज़्श्** अथवा खज़्श् या रूपात आजदेखील आढळतो, असे हबीबी याने म्हटलेले आहे. याच्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की जरी आजच्या फार्सीतून द् हा ध्वनि लोप पावलेला असला तरी **किद्** या मूळ शब्दातील द् अजूनसुद्धा पश्तो भाषेत तगून राहिलेला आहे. (पाहा-हबीबी, पृ. ८९ व ९९)

पश्तो भाषेत

ट्रम्प्प् याने पश्तो भाषेतील उभयान्वयी अव्ययाचे रूप च्ि़ह् (meaning that, so that, in order that) असे दिलेले आहे (पाहा ट्रम्प्प्, पृ. ३०२) या च्ि़ह् अव्ययाच्या जागी फार्सीतील किह् हे अव्ययसुद्धा कधीकधी वापरले जाते. ते विशेषतः काव्यात प्रयुक्त होते. पश्तो च्ि़ह् आणि फार्सी किह् दोन्ही व्युत्पत्तीच्या दृष्टीने एकच होत, असेही त्याने म्हटलेले आहे. पश्तो भाषेतील ध्वनिरचनेचा विचार करीत असतांना (पृ. ९) त्याने असे प्रतिपादिले आहे की काही ठिकाणी च़् ध्वनि मूळ ज्, झ् ध्वनीपासून व्युत्पन्न झालेला आहे. जसे च़ाड़ा (तोतरेपण), सिंधी जडु (संस्कृत जड). यावरून अशी सूचना मिळते की च्ि़ह् हे पश्तो भाषेतील अव्यय संस्कृत **यद्** या अव्ययापासून व्युत्पन्न असावे. कारण या यद् अव्ययाची प्राकृत भाषातील रूपे ज, ज, जे, जो अशी होताना नित्य आढळून येतात. पश्तो भाषा आर्यभाषांची शेजारीण आणि भगिनी भाषा असल्याने ही गोष्ट सहज संभवनीय ठरते.

लुई ग्रे यांनीही असे सांगितलेले आहे (पाहा–ग्रे, § ११८) की फार्सीतील काही ध्वनि तिच्या काही बोलीत च़, च ध्वनींमध्ये रूपान्तरित होतो. अवेस्ता **कत** (घर), पहलवी **कतक**, नव्य फार्सी **कद्**, **कद्ह** ही रूपे सिग्नी भाषेत च़ीद्, सरीकोली भाषेत द्; चेअवेस्ता करत, नव्य फार्सी कार्द्, ही रूपे उत्तर अफगानी

भाषेत चारह्, आणि अवेस्ता क (कोण, जो) हे रूप सरीकोली भाषेत चोइ, आस्सेटिश भाषेत ची, अशा रूपात रूपान्तरित होतात.

अशा परिस्थितीत, ईराणी भाषेतील कि आणि तुखारियन भाषेतील किद् ही सहजगतया पष्तो भाषेतील च्हि रूपामध्ये बदलू शकतात. आता आपण, दोन्ही कि, किद् आणि च्हि ही व्युत्पत्तिशास्त्रानुसार संस्कृत उभयान्वयी यद् अव्ययाची सगोत्र व समान्तर रूपे होत, या ई. ट्रम्प्प् याच्या मताशी सहमत होऊ शकतो.

खोतनी शक भाषेत

खोतनी शक भाषेत या उभयान्वयी अव्ययाचे रूप च अथवा चु असे आहे. ते सर्वत्र वापरलेले आढळते. संस्कृत यत् अव्ययाचा जसा अनेक सूक्ष्म छटा व्यक्त करण्यासाठी वापर होतो, तसाच च, चु यांचा खोतनी शक भाषेत वापर आढळून येतो. शूरंगमसमाधिसूत्रात चु या रूपाचा वापर आढळतो (पाहा– एमिरिक, पृ. ३०, ३.६ व्हर्सो ५). काही ठिकाणी त्याचे रूप च असे आहे (पाहा– बेली, पृ. ४७, उतारा, ५६ ब १). चिनी तुर्कस्तानातून, प्राकृत भाषा, पण खरोष्ठी लिपीत इसवीच्या तिसऱ्या चौथ्या शतकात, लिहिल्या गेलेल्या सुटचा लेखनातही हे अव्यय वरील अर्थाने वापरलेले दिसून येते (पाहा– सरकार, पृ. २४४, ओळ, २; पृ. २४५, ओळ २; पृ. २४६, ओळ ३; पृ. २४८, ओळ १; पृ. २५०, ओळ ३.). हे सर्व ग्रंथ व सुटे लेखन हे खोतनमधून प्राप्त झालेले आहे. खोतनमधील इसवीच्या पहिल्या सहस्रकातील सांस्कृतिक जीवन लक्षात घेतले असता, या अव्ययाच्या या रूपाचे गूढ सहजतया हाती येते. प्राकृत भाषेत सं. यत् अव्ययाचे ज, जं, जु हे रूप प्राचीन कालापासून रूढ असलेले आढळून येते. या प्राकृत रूपाचे खोतनी शक भाषेत च, चु असे रूपांतर झालेले आहे. खोतनी शक भाषेच्या, संस्कृत-प्राकृत भाषेतील बहुधा सर्वच मृदु वर्णांचा तो कठोर व्यंजन करण्याच्या प्रवृत्तीची चर्चा आम्ही अन्यत्र केली आहे (पाहा–चौहान खोतनी). येथे प्राकृत वैयाकरणांनी सांगितलेल्या पैशाची बोलीच्या विशेषतम महत्त्वाच्या नियमाची आठवण होते. येथे प्राकृत भाषेतील ज ध्वनीचा खोतनी भाषेत च ध्वनी बनलेला आहे. हाच बदल आपणाला पष्तो भाषेतही आढळतो. यावरून पैशाची बोलीच्या मातृस्रोताची कल्पना येते.

सिंधी भाषेत

ट्रम्प्प् याने आपल्या सिंधी भाषेच्या व्याकरणात या अव्ययाची दोन रूपे नोंदली आहेत (पाहा– ट्रम्प्प् सिंधी, पृ. ४१४). ती रूपे **त** (that, in order that, also an expletive, in quoting the words of a person) आणि

जअं, जिअ, जिए, जो अशी होत. मागाहून उल्लेखिलेले रूप, आपल्या अलग अलग विकृतीसह, प्राकृत परम्परेतून आलेले असून त्याच्या स्पष्टीकरणाची गरज नाही. पूर्वोक्त उभयान्वयी अव्ययाचे **त** हे मात्र भारतीय भाषात अनपेक्षित आणि वेगळे आहे.

ईराणी भाषाविज्ञानात प्रसिद्ध असलेला एक नियम आहे की संस्कृत भाषेतील **ज** ध्वनि ईराणीत **द** ध्वनीत रूपान्तरित होतो. संस्कृत **जामातृ** शब्दाचे ईराणीत **दामाद** असे रूप होते. अवेस्ता **ज़स्त** (सं. **हस्त**) शब्दाचे **दस्त, जमुना** (सं. यमुना) शब्दाचे **दैमुन,** व जसोदा (सं. **यशोदा**) शब्दाचे दसोदा (स्त्रीव्यक्तिनाम) ही परिवर्तने याच सदरातील होत. सिंध प्रदेशावर गेल्या २५०० वर्षांपासून ईराणच्या बाजूने सारखा प्रभाव पडत आलेला आहे. ई. ट्रम्प्प् याने स्वतः याची दखल घेतलेली आहे की, "मुसलमानांच्या रोषाला बळी पडलेला सिंध हा प्रथम भारतीय प्रदेश असून, तेथील हिंदुधर्म आणि संस्कृत साहित्याची परम्परा यांचा तेथे इतक्या संपूर्णपणे लोप झाला आहे की कोणीतरी प्रतिपादल्या प्रमाणे "हा ब्राह्मण आणि जाति संस्था विरहित असा देश बनलेला आहे." ही पार्श्वभूमि लक्षात घेतली तर **जं, ज** या उभयान्वयी प्राकृत अव्ययाचे सिंधी भाषेत जं, त असे रूप विकसित झाले तर ते सुसंगत आहे असे मानावे लागेल.

लुई ग्रे याने अशी नोंद घेतलेली आहे (पाहा ग्रे– § २५२) की **द** या मृदु व्यजनाचे त या कठोर व्यंजनात रूपान्तर होणे पैशाची प्राकृतचा नित्याचा नियम आहे. पिशलनेही हे सांगितले आहे (पाहा– पिशल § १९१). परंतु अन्यथा असे रूपान्तर दुर्मिळ असते. ग्रे याने, दुर्गा (पार्वतीचे नाव) शब्दाचे **तुक्का,** प्रदेश (विषय, जिल्हा) शब्दाचे पतेस, सं. यदि अव्ययाचे जति अशी रूपे पैशाची प्राकृतांत होतात, असे सांगितले आहे. पैशाचीची ही प्रवृत्ति ध्यानी घेतल्यास **ज** (सं. यत्) या अव्ययाचे सिंधी भाषेत **त** हे रूप झाले तर पैशाची परंपरेस धरूनच होईल.

तुकाई नावाच्या देवीची महाराष्ट्रातील लोक मोठ्या संख्येने उपासना करतात, याची नोंद येथे घेणे इष्ट होईल. महाराष्ट्रभर प्रसिद्ध असलेल्या तुळजाभवानीचे उपाख्य तुकाई, तुक्काई असून ती महादेवपत्नी दुर्गाच आहे. पैशाची प्रभावामुळे दुर्गा शब्दाचे लोकबोलीतील रूप तुक्का असे होते. ई. ट्रम्प्प् याने ही गोष्टही सांगितली आहे की पष्तो भाषेत मुळातील **क, ग** ध्वनींचा **ज** ध्वनि बनतो. अशाप्रकारे, पैशाची आणि पष्तो प्रभावामुळे दुर्गा शब्दाचे दुसरे पर्यायी रूप तुळजा बनणे सहज शक्य आहे. **र** आणि **ल,** तसेच **ळ** हे परस्पर परिवर्तनीय आहेत. शिवाय **ल** ध्वनीच्या ऐवजी **ळ** बनणे हाही एक पैशाचीचा विशेष होय. म्हणून तुळजा हा लोकरूढ शब्दच अधिक जुना, शुद्ध व रूढिपरिपूत आहे. तुलजा हे संस्कृती-

करण होय. म्हणून तुकाई आणि तुळजा ही शब्दरूपे, पैशाचीसम्पर्काच्या ओघात दुर्गा शब्दापासूनच व्युत्पन्न आहेत. हे दोन्ही शब्द मराठी भाषा-विज्ञानात अद्यापि अव्युत्पादित आहेत असे वाटते. महाराष्ट्रातला प्रसिद्ध संतकवि तुकाराम याच्या नावाचे, वरील चर्चेतून स्पष्टीकरण होते. तुकाराम हे केवळ मराठी व्यक्तिनाम आहे. ते अन्य प्रान्तात मुळीच सापडत नाही. तुकाराम शब्दाचा अर्थ होईल– ' राम नावाची व्यक्ति जी तुका, तुक्का म्हणजे दुर्गेची पूजा, भक्ति करते. '

गुजराती भाषेत

छो. र. नायक याने आपल्या ग्रंथात असे निर्णित केले आहे (पाहा– नायक, पृ. ३८९) की उभयान्वयी **के** हे गुजरातीतील अव्यय फार्सीतूनच आलेले आहे जुन्या गुजराती भाषेत या **के** अव्ययाचा शिरकाव झालेला नव्हता असेही त्याने सांगितले आहे. त्याच्या जागी प्राकृतागत जे वापरला जात असे. आजच्या मुख्य गुजराती भाषेतून या **जे** अव्ययाचा लोप झालेला आहे. परंतु सूरत, संजान आणि मुंबई येथील, गुजराती ही मातृभाषा म्हणून स्वीकारलेल्या, पार्सी समाजात मात्र हे **जे** रूपी अव्यय आजदेखील प्रयुक्त होते असे नायक यांनी नोंदविले आहे. आजच्या गुजराती भाषेत **जत** हे उभयान्वयी अव्यय-रूप वापरात आहे, असे ही त्याने सांगितले आहे. ही गोष्ट लक्ष्य आहे. जत हे अव्यय प्राकृतच्या माध्यमाने आलेले संस्कृत यत् अव्यय होय, हे स्पष्ट आहे. या अव्ययाच्या जे–रूपाचे स्पष्टीकरण करण्याची गरज असू नये. कारण दोनशे वर्षांपूर्वीपर्यंत हे रूप भारतातील सर्वच आर्य-भारतीय भाषांत वापरात राहिलेले होते. परंतु हिंदी भाषेची एक शैली मानली जाणाऱ्या उर्दूभाषेत मात्र **जे** हे उभयान्वयी अव्यय आजदेखील प्रयुक्त होत असते. मुहम्मद इक़बालसारख्या या भाषेच्या आधुनिकतम श्रेष्ठ कवींतून याची अनेक उदाहरणे देता येतात.

जुन्या गुजराती भाषेत **के** (किंवा मराठी कि, कीं) हे उभयान्वयी अव्यय प्रविष्ट झाले नव्हते, या डॉक्टर–नायक यांच्या मताचा फेरविचार होणे जरूर आहे, असे सांगावेसे वाटते. कारण कि हे अव्यय इस्लामसम्पर्कापूर्वी महाराष्ट्र-भूमीत रुजलेले होते व त्याचे माध्यम शक जमात होती हे आम्ही इतरत्र एका प्रबंधात म्हटलेले आहे. म्हणून अतिशय जुन्या गुजरातीत ते प्रविष्ट व प्राप्त असले पाहिजे. कारण गुजरातमध्ये तर शक गणांचा प्रत्यक्ष धुमाकूळ शतकानुशतके चालू होता. ज्या-अर्थी ते मराठीत आहे त्या-अर्थी ते गुजरातीत होते, असे म्हणावे लागते. जुन्या गुजरातीत ते नसलेच तर, शकांचा राजकीय प्रभाव संपल्यावर ते भारतीय प्राकृतापभ्रंशांचा प्रभावाने लुप्त झाले, कालौघात नष्ट झाले, असे म्हणावे लागेल. परंतु त्याचा शोध अत्यंत बारकाईने व कसोशीने घेण्याची गरज आहे, हे निश्चित.

मराठी भाषेत

जुन्या मराठी भाषेत या अव्ययाचे **जे**-रूप फारच मोठ्या प्रमाणात, बव्हंशाने रूढ होते. ही गोष्टही आता नोंदली गेलेली आहे की जुन्या मराठीत या अव्ययाची **किं, कीं** ही रूपेही रूढ होती. हे दुसरे रूप देखील अत्यंत महत्त्वपूर्ण आणि आधार-भूत ग्रंथातून आढळते. याची चर्चा वरती आलेली आहे. महिकावतीची बखर (पाहा– राजवाडे मब) या साधनग्रंथाचाच येथे विचार कर्तव्य आहे. शक १३७० मध्ये लिहिल्या गेलेल्या, या संमिश्र ग्रंथाचा दुसरे प्रकरण हा गाभा होय, हे राजवाडे यांचे म्हणणे अगदी रास्त आहे. सगळ्या महाराष्ट्रात तुर्काण झाल्यानंतर, बऱ्याच उशीरा हा ग्रंथ लिहिला गेला तरी, हा ग्रंथ बराच-सा जुन्या-महानुभावीय, मराठी भाषेत लिहिलेला आहे. जुन्या मराठीची समजली जाणारी सर्व वैशिष्ट्ये या भाषेत पाहावयास सापडतात. भाषेत मागाहून प्रविष्ट झालेली रूपेही या ग्रंथात आढळत नाहीत. दुसऱ्या प्रकरणात **जे, जो, जर–री** आणि **किं, कीं** या उभयान्वयी अव्ययांचा वापर आढळतो.

स्व. राजवाडे यांनी या प्रकरणातील (पृ. ३२ ते ६२) अरबी-फार्सी शब्दांची नोंद दिली आहे. हे शब्द १०३ भरतात. शासनाच्या मुलकी आणि सैनिकी कारभारात आढळून येणारेच असे बहुतेक सर्व शब्द आहेत. हे सर्व शब्द नामे आहेत. अव्यये किंवा सूक्ष्म छटा दाखविणारे शब्द कोठेच वापरलेले नाहीत या प्रकरणात आलेल्या शब्दसंख्येच्या मानाने या शब्दांचे प्रमाण अत्यल्प आहे. अशा परिस्थितीत **किं, कीं** या अव्ययाचे वास्तव्य फार्सी भाषा बोलणाऱ्या मुस्लिम आक्रमकामुळे होते असे म्हणणे फारच धाष्टर्याचे होईल. हे अव्यय नव्य फार्सीतील ऋण शब्द असणे असंभव वाटते. कारण या अव्ययाचा उपयोग हा अत्यंत गुंता-गुंतीच्या मिश्र वाक्यात होतो. म्हणून हे **किं, कीं** अव्यय अगोदरच मराठीत वावरत होते, असे मानणेच अधिक सयुक्तिक होईल. यांचे असे पूर्ववास्तव्य होते हे पूर्वी सांगितलेले आहेच.

जर हे उभयान्वयी अव्यय **जे, जो** आणि **किं कीं** याचे पर्याय म्हणून वापरलेले आहे, हे स्व. राजवाडे यांनी सांगितलेले आहेच (पाहा–राजवाडे मब, पृ. १३). त्यांनी व्युपत्तीसाठी त्याची कुळी यर्हि–तर्हि शब्दापासून सांगितली आहे. त्यांचे हे म्हणणे योग्य नव्हे. जर या अव्ययाची व्युत्पत्ति संस्कृत यत् शब्दापासून आहे. येथे अंत्य **त** हलन्ताचा लोप न होता त्याचा **र** ध्वनीत बदल झालेला आहे. गुजराती भाषेत **जत** हे या अव्ययाचे रूप प्रयुक्त होते हे वरती आलेलेच आहे. संस्कृत **यत्** शब्दाचेच हे आर्ष रूप शेष राहिलेले आहे. या प्रकरणात **जर**–रूपाचा वापर सर्वाधिक आहे. **जे** आणि **किं** अधून मधून वापरलेली आहेत. **जरी**-रूपही वापरलेले आढळते. **जरी** (सं. यर्हि) या दुसऱ्या मराठी शब्दाच्या साम्य व साहचार्याने

जर हे रूप आलेले आहे. अशाप्रकारे गुजरातीतील जत–रूप आणि मराठीतील जर रूप ही यत् या अव्ययाची प्राचीन व आर्ष रूपे होत. मराठीतील जर–रूप हे शेजारील गुजरातीतील जुन्या रूपाचे ऋणदेखील असू शकेल. उत्तर कोकणात राजकीय हालचालीमुळे सुद्धा असा परिणाम शक्य होता हे महिकावतीच्या बखरीवरून दिसून येते.

महाराष्ट्रात शकप्रभाव

(अ) ऐतिहासिक

१. शककालाच्या आरम्भापासून शक गणाचे राजकीय वर्चस्व, महाराष्ट्रात निदान पश्चिमोत्तर भागात, राहिलेले आहे.
२. एके काळी त्यांनी सातवाहन सत्तेचा पराभव केलेला होता आणि लग्नाचे संबंध निर्माण केलेले होते.
३. शक हे एरण आणि उज्जयिनीहून राज्य चालवीत असत.
४. औलिकर हे घराणे ईराणी वंशाचे होते. ते कदाचित शक असावेत (पाहा–चौहान-ओ).
५. महाराष्ट्रात शकगणाच्या वास्तव्याच्या प्रत्नलेखात्मक विपुल खुणा उपलब्ध आहेत.
६. शकांनी आपली स्वतःची नाणी पाडलेली होती. त्यांच्या नाण्यांचे संच नासिक, अकोला जिल्हे आणि आंध्र प्रदेशात सापडलेले आहेत.

(आ) सांस्कृतिक

१. संस्कृत ही शासकीय भाषा म्हणून शुंग सम्राटांनी स्वीकारलेली होती. तीच परम्परा पुढे शक क्षत्रप राजांनी, शककालाच्या आरंभापासूनच चालू ठेविली.
२. सातवाहन प्रत्नलेखांतील दीनिकपुत्र, हकुसिरि (शकश्री), खदपालित (क्षत्रपालित); गुप्तकालीन प्रत्नलेखांतील वराहदिन्न, मिहिरवर्मा इत्यादि; महिकावतीच्या बखरीतील कमळादीन, शाह ही राज्यकर्त्यांची नांवे; आजच्या हिंदु समाजात आढळणारी मिहिरदिन, मिहिर सेन, भगवानदीन अशी विशिष्ट जातींतील नावे.
३. स्थलनामे–अजन्ता (अर्हन्तक, यासाठी पाहा चौहान मध), कार्ले (< वलूरक, वल्लूरक, < संस्कृत, वृक, ईराणी गुर्गिस्तान), हरीआण-हरियाणा, अवगाण, अफगान, एरंगल, एरण-एरिकिण-ऐरिकिञ-ऐरिकिण (< आइरिनकाँ-इरानियन) ही स्थलनामे ईराणी प्रभावामुळे विकसित झालेली आहेत.

४. बागलाणा, हिंगोलो-हिंगलज-हिंगलजवाडी ही स्थलनामे अफगाणिस्तान व बलूचिस्तानमध्ये पूर्वी असलेल्या नावाची ऋणनामे होत.

५. तुळजापूर येथील तुकाई, तुळजा ही देवता दुर्गाच होय. हिंगुलजा ही तेर (जि. धाराशीव, महाराष्ट्र) व औरंगाबाद येथे असलेली देवी दक्षिण बलूचिस्तानात् असलेल्या हिंगुलजेची प्रतिकृति होय.

६. गेल्या ५०० व अधिक वर्षे महाराष्ट्रात रूढ असलेली. महाराष्ट्रधर्म ही संकल्पना, उद्गमतः व विकासतः, शक गणाची आहे.

सातवाहन राजकुलात दिसून येणारी ईराणी व्युत्पत्तीची व्यक्तिनामे, तुळजापूर येथील तुळजा भवानीची ईराणी सांस्कृतिक प्रभावाशी संबद्ध पूर्वपीठिका आणि कितीही अपूर्ण व अविकसित, पण निश्चितपणे आजच्या राष्ट्रीयत्वदर्शक महाराष्ट्र धर्माच्या संकल्पनेचा ईराणी असलेल्या शक गणापासून उद्गम, या सर्व संकलित प्रभावामुळे, मराठीतील **कि, कीं** हे उभयान्वयी (< संस्कृत **यत्**) इस्लामपूर्व महाराष्ट्रात विकसित झाले आणि ते आर्यवंशोद्भव ईराणी शक गणाच्या साहचर्याने येथे आले असे प्रतिपादणे चांगलेच भरीव व विश्वासपात्र होईल, असे वाटते.

(इण्डियन लिंग्विस्टिक्स : डॉ. सु. मं. कत्रे, अभिनंदन ग्रंथ, भाग २, १९६९ वरून भाषान्तरित)

संक्षेप आणि सन्दर्भ

एमिरिक– शूरंगमसमाधिसूत्र : आर्. ई. एमिरिक, लंदन, १९७०

ग्रे– इण्डो-ईरानियन फोनॉलॉजी : लुई. एच्. ग्रे, न्यूयार्क, १९०२

चौहान– मराठी आणि दक्खिनी हिन्दी, : दे. व्यं. चौहान, पुणे, शक १८९३

चौहान खोतनी– याच संग्रहातील क्रमांक २०–खोतनी शकभाषा आणि मराठी.

चौहान मध– इतिहास आणि संस्कृति त्रैमासिक, पु. २६, शक १८९२ दे. व्यं. चौहान यांचा-महाराष्ट्रधर्म

चौहानहरीआण– भारतीय इतिहास कॉंग्रेस, वाराणसी, १९६९ : दे. व्यं. चौहान, एरण, अवगाण व हरीआण

ट्रम्प्– ग्रामर ऑफ द पश्तो लॅंग्वेज : ई. ट्रम्प्प्, लंदन इ. १८७३

ट्रम्प् सिंधी– ग्रामर ऑफ द सिंधी लॅंग्वेज : ई. ट्रम्प्प्, लंदन इ. १८७२

तुळपुळे– यादवकालीन मराठी : शं. गो. तुळपुळे, पुणे, शक १८८२

तुळपुळे ओम– अॅन ओल्ड मराठी रीडर : शं. गो. तुळपुळे, पुणे, १९६०

नायक– गुजराती पर अरबी-फार्सीनी असर, छो. र. नायक, अहमदाबाद, १९५४.

पानसे– ज्ञानेश्वरीची भाषावैज्ञानिक वैशिष्ट्ये (इंग्रजी), मु. ग. पानसे, पुणे, शक १८७३
पिशल– ग्रॅमॅटिक दर प्राकृत-स्प्राचेम् : आर्. पिशल, स्ट्रास्वर्ग, १९००
बेली– खोतनीज टेक्स्ट्स्, खण्ड ४ : हॅरोल्ड बेली, लंदन १९६१
ब्लोक– ब्लोककृत मराठी भाषेचा विकास : वा. गो. परांजपे, पुणे शक १८६३
भावे– ज्ञानेश्वरी-शब्दकोश : शि. न. भावे, वर्धा, शक १८७३
राजवाडे– मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खण्ड ८ : वि. का. राजवाडे, पुणे, शक १८२५
राजवाडे मब– महिकावतीची बखर : वि. का. राजवाडे, पुणे, शक १८४६
सरकार– सिलेक्ट इन्स्क्रिप्शन्स्, दीनेशचंद्र सरकार, कलकत्ता १९६५
हबीबी– मादर-इ ज़बान-इ दरी : अब्दुलहय्य् हबीबी, काबूल, १३४२ (इ. १९६३)

♦♦♦

१७ : पष्तो, पैशाची आणि मराठी

भारतवर्षाच्या तीनचार हजार वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीतील इतिहासात या देशातील बहुविध समाज जीवनाशी ज्या ज्या परदेशाचा सम्पर्क आला त्यात अफगाणिस्तान या भूखण्डाचा समावेश अग्रक्रमाने करावा लागेल. अफगाणिस्तान हे या भूभागाचे नाव तसे पाहिले तर फारच उत्तरकालीन आहे. अवगाण या नावाचे अफगान हे रूपान्तर आहे. अवगाण ही संज्ञा सर्वप्रथम वराहमिहिराने (मृत्यु शक ५०९) वापरलेली आहे. अवगाण वा अफगाण हे नाव या प्रदेशास ईराणी लोकांनी दिलेले आहे. या देशाचे खरे स्थानिक नाव पख्तूनिस्तान असे आहे. अवगाण हा शब्द अरियनगान् अथवा अइर्यनगान, एराँन्गाँन् या ईराणवाचक शब्दावरून निघालेला आहे असे आम्ही एका लेखात प्रतिपादिले आहे. (हा प्रवन्ध भारतीय इतिहास काँग्रेस, वाराणसी, १९६९ येथे वाचला आहे). त्याच लेखात मुंबई बृहन्नगरातील एरंगल, मध्यप्रदेशातील एरण (एरिकिण) व हरियाना (हरीआण) ही स्थलनामें या ईराणी शब्दाची भारतीय रूपान्तरे होत असे त्या लेखात प्रतिपादिलेलें आहे. ईराणी व अरब विद्वानांनी अयगान, अफगान ही लोकवाचक संज्ञा इ. स. एक हजाराच्या सुमारास वापरली.

अफगाणिस्तान या प्रदेशावर प्राचीन काली ईराण अथवा भारत या देशाचीच सत्ता चालत आलेली आहे. हख़ामनिश Achaemenian साम्राज्यकाली हा भाग त्या साम्राज्यात समाविष्ट होता. तदनंतर हलमंद (प्राचीन सरस्वती) नदीच्या मुखावरील शकस्थान, सजिस्तान, सइस्तान या प्रदेशात शक जमातीचे वर्चस्व स्थापन झाले. ते इ. स. पूर्व १५० च्या नंतर. त्यानंतर या प्रदेशावर कुषाणवंशीयांचे साम्राज्य होते. कनिष्काची सत्ता शक १ पासून २४ (इ. स. १०२) पर्यंत होती. या कुषाणवंशीयांचे राज्य मधुरा (मथुरा हे मधुरा शब्दाचे पैशाची रूप) नगरीपर्यंत पसरले होते. तदनंतर श्वेत हूण (पष्तो हवन, ख़्वन, ख़ान) या जमातीची सत्ता ज़ाबूल, ज़ाबोल (सइस्तान, हलमंद नदीचे मुख) या राजधानीतून तोरमाण राजाने (शक ४२२ ते ४३७) चालविली. त्याचा मुलगा मिहिरकुल याने शक ४६७ पर्यंत पश्चिम भारत व अफगाणिस्तानावर राज्य केले. इस्लामाचा उदय व सम्पर्क लागेपर्यंत या प्रदेशावर बुद्धधर्मीय अफगाण लोकांची सत्ता होती. मुहम्मद बिन कासिम याने भारताचा सिंध प्रान्त जिंकल्यापासून अफगाणिस्तानही हळूहळू अरबांच्या इस्लामी सत्तेत समाविष्ट झाला.

अफगाणिस्तानावर बगदादच्या खलीफांची सत्ता शक ७९१ पर्यंत अव्याहतपणे

चालू होती. या वर्षी झाबूल (सइस्तान, अफगाणिस्तान) येथे प्रबल बनलेल्या याकूब बिन लैस या सफ्फार (तांबट, तांबटकर) घराण्यातील सरदाराने खलीफाच्या गादीविरुद्ध बंड पुकारले व ईराण देशाची अस्मिता जागृत करण्यासाठी त्याने आपली शक्ति खर्ची घातली. शककालाच्या आठव्या शतकाच्या उत्तरार्धापासून खलीफांची सत्ता नामधारी बनलेली होती. एव्हांपासून अफगाणिस्तानाला स्वतंत्र असे अस्तित्व येऊ लागले. गझनीचा महमूद व महम्मद गोरी हे या देशाचेच सत्ताधारी होते.

इ. सोळाव्या शतकाच्या आरंभी ईराणात सफवी साम्राज्याची सत्ता स्थापन झाली व भारतात मुगल साम्राज्य स्थिरावले. मुगल साम्राज्याच्या काळात अफगाणिस्तानचा बराचसा भाग, निदान पूर्वेचा काबूलचा प्रदेश मुगलांच्याच ताब्यात होता. अफगाणिस्तान आपल्या ताब्यात ठेवल्याने आपल्या साम्राज्याची पश्चिम सीमा सुरक्षित राहील अशी बाबरापासून औरंगजेबापर्यंत सर्वांची धारणा होती. या कल्पनेला नादिरशाह (शक १६५८ ते १६७१) या ईराणी विजेत्याने मूठमाती दिली. नादिरशाहाने शक १६६० मध्ये दिल्ली लुटल्याची आठवण भारताला आहेच. परंतु भारताच्या या क्षणिक दुःखापेक्षा, ईराण देशाला अफगाण लोक व नादिरशाह यांची झळ फार काळ सोसावी लागली. शक १६४४ त अफगाण सेनेने शेवटच्या सफवी सम्राटाचा पराभव केला. आठ वर्षांनी नादिरशाह क्षितिजावर उगवला व त्याने सम्पूर्ण ईराण देशावर साम्राज्य स्थापिले. ईराण देशाच्या दीड हजार वर्षांच्या इतिहासात तीन परकीय आक्रमणे ऐतिहासिक मानली जातात. शक५७४ मध्ये अरबांनी सासान साम्राज्याचा केलेला अन्त. शक ११८० मध्ये खिलाफत मोंगोल टोळ्यांच्या हातून नष्ट झाल्याची घटना व शक १६४४ मध्ये अफगाण फौजांनी सफवी राजघराण्याचा केलेला नाश. ही शेवटची घटना अफगाण देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची होय. या घटनेमुळे अफगाण हे वेगळे राष्ट्र बनले. त्याला अस्मिता प्राप्त झाली. राष्ट्र म्हणून त्याला एक प्रकारचा स्वाभिमान व आत्मविश्वास प्राप्त झाला. या पूर्वी शेरशाह सूरी आदि अफगाण विजेत्यांनी भारतात राज्ये निर्माण केलेली होती. परंतु ती अफगाणिस्तानाबाहेर होती. उलट अफगाण देश मात्र भारत व ईराण येथील सत्तांमध्ये विभागला गेलेला होता. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे शककालाचे सतरावे शतक म्हणजे अफगाण लोकात स्वत्व व अस्मिता निर्माण होण्याचा काल होय. तेव्हापासून अफगाण देश बहुधा स्वतंत्र असून, वेगळा देश व राष्ट्र म्हणून त्याची जगाने दखल घेतलेली आहे.

पष्तो भाषा

अफगाण देश शक ७०० च्या सुमारास इस्लामधर्मीय बनत गेला. सर्व देश पहाडी असल्याने हे इस्लामीकरण हळूहळूच झाले. ते इतके की पर्वत-

राजीतून वसत असलेल्या व काफिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अनिस्लामी मोठमोठ्या जमातींचे इस्लामीकरण शककालाच्या सतराव्या शतकात व नंतर पूर्ण झाले. अफगाण लोक बुद्ध व हिंदुधर्मीय होते. इस्लामीकरणानंतर त्यांच्या भाषेवरही परिणाम झाला. अफगाण लोकांची भाषा पष्तो, पख्तो व त्यांचा देश पख्तूनिस्तान होय.

गेल्या शेदोनशे वर्षांपासून जेव्हा पष्तो भाषेचा स्वतंत्र अभ्यास सुरू झाला तेव्हा, पष्तो भाषेसाठी वापरण्यात येत असलेल्या अरबी लिपि आणि तीत असलेल्या अरबी शब्दांच्या बाहुल्यामुळे, पष्तो भाषा ही अरबी भाषेची एक उपभाषा आहे असा एक विचार तत्कालीन लेखकांनी मांडलेला होता. परंतु ही गोष्ट आता विद्वानांनी खोटी ठरविलेली आहे. पष्तो, पख्तो, पष्तू–पख्तू ही भाषा भारेराणी (भारत-ईराणी, Indo-Iranian) वंशाची असून ती ईराणी या विशाल भाषासमूहातील एक प्रमुख भाषा आहे असा पाश्चिमात्य व पौर्वात्य विद्वानांचा निष्कर्ष आहे. दार्मेस्तेतर या जर्मन विद्वानांचे असे मत आहे की ती अवेस्ता भाषेची खरीखुरी वारस व प्रतिनिधि आहे. या भाषेतच ज़रतुष्ट्राच्या शिकवणीची सांस्कृतिक परम्परा प्राप्त होते. ज या मूळ तालव्याचे दोन तीन नवीन वर्त्स्य उच्चार ईराणी भाषेच्या मध्ययुगीन ज़ंद भाषेतून आधुनिक पष्तो भाषेत आलेले आहेत, असे विद्वानांचे मत आहे. मूळ क या संस्कृत ध्वनीचे पष्तो भाषेत ज़, ज़्ह रूपाने होणारे ध्वन्यन्तरही ज़ंद भाषेच्या वारशामुळे घडून आलें असे विद्वान् मानतात. परंतु याच्याच बरोबरीने प्राकृतमध्ये आढळणारे दन्तमूलीय वर्ण (ठ, ढ सोडून ट-वर्ग) पष्तोनें आत्मसात् केलेला आहे, हेही विसरता येत नाही. प्राकृत भाषांनी श्, ष् यांना खो दिलेला असला तरी, पष्तो भाषेने मात्र त्यांना आपल्या कुसीत सामावून घेतलेले आहे. आश्चर्य हे की ण हे अनुनासिकही एक प्रकारे या भाषेत उपलब्ध आहे. प्राकृत भाषेतील फार मोठे शब्दभाण्डार शुद्ध पष्तो शब्दांच्या रूपाने या भाषेत वावरत आहे. नव्या आर्यभारतीय भाषांपैकी सिंधी भाषेची पष्तो भाषेशी विशेष सलगी आहे. पष्तो भाषेतील नामांची विभक्तिरूपे आणि क्रियापदांची वावरणी बरीचशी सिंधी भाषेच्या वळणावर आहे.

हलमंद (सरस्वती) नदीच्या सपाट व सुपीक खोऱ्याशिवाय भारतातल्यासारखी नद्यांची खोरी अफगाणिस्तानात नाहीत. सर्व देश उंच-उंच पर्वतराजी व पठारांनी व्याप्त आहे. अफगाण लोकांच्या कोटि सव्वाकोटि संख्येपैकी बहुसंख्य लोक डोंगरी भागात राहातात. लोकातील शिक्षणाचे प्रमाण जेमतेम १० टक्यापर्यंत आहे.

या सर्व नैसर्गिक परिस्थितीचा परिपाक म्हणजे पष्तो भाषेच्या अनेक बोली आढळून येतात. शास्त्रज्ञांनी मानलेल्या चार-पाच मुख्य बोलींहून किती तरी अधिक बोलींचा उल्लेख मोर्गन्स्टर्न याने आपल्या ॲन एटिमॉलॉजिकल व्होकॅबुलरी ऑफ्

पष्तो (इ. स. १९२७) या व्युत्पत्ति-शास्त्रीय छोटयाशा ग्रंथात केलेला आहे. जितका शिक्षणाचा प्रसार कमी आणि सामान्य जनतेची शिक्षणाची पातळी कमी तितक्याच प्रमाणात बोली अधिक संख्यांनी असतात व जगतात. शिक्षणाची वाढ व प्रमाणभूत एकाच राष्ट्रीय भाषेचा विकास म्हणजे निरनिराळ्या बोलभाषांची मुमूर्षु अवस्था. अफगाणिस्तान देशातील शिक्षणाचा अभाव हा तेथील अनेक बोली जीवित असल्याचा दाखला होय.

पष्तो भाषा बोलणारे लोक म्हणजे पष्तून. पश्चिम अफगाणिस्तानात पष्तून हा उच्चार रूढ आहे. पूर्व अफगाणिस्तान भागात याच शब्दाचा उच्चार पख्तून असा करितात. हा भारतीय सान्निध्याचाच प्रभाव होय. भारतात ष आणि ख यांच्या उच्चारात अभिन्नता असलेली सर्वप्रसिद्धच आहे. मराठी भाषेतही ‘उखा-हरन का उषाहरन’ हा प्रश्न सर्वज्ञात आहेच. पष्तून शब्दात मूळ शब्द पक्थ आहे असे विद्वान् मानतात. पक्थ हा शब्द ऋग्वेदात एका लोकसमुदायाचा वाचक म्हणून आलेला आहे. इ. सनाच्या पहिल्या शतकात या लोकांचा पख्तून असा उल्लेख हिरोडोटस याने केलेला आहे. आजच्या अफगाण लोकांचे पख्तून लोक पूर्वज होत. या पष्तून वा पख्तून शब्दाचा भारतीय परम्परेत पठाण असा उच्चार झाला. पख्तुन लोकांनाच भारतीय पठाण म्हणतात. पष्तो भाषेत महाप्राण उच्चार नसल्याने अफगाण हा शब्द पटाण असा उच्चारतात. अरबी भाषेत पटाण वा पठाण हा शब्दच नाही. कारण त्या भाषेत प आणि ट, ठ हे वर्ण मुळात नाहीतच. हा शब्द ईराणीदेखील नव्हे. भारतात अफगाण लोकांना कधी-कधी रोहिला असे म्हणण्यात येते. अफगाण आपल्या प्रदेशाला रोह-पर्वतमय असे म्हणतात. रोह हे विशेष नाम असून त्याचा अर्थ पहाडी प्रदेश असा आहे. परंतु हे नाव भारतातील सखल प्रदेशाच्या अनुषंगाने वापरण्यात येते. रोह शब्दावरून रोहिला हे अफगाण लोकासाठी तिसरे नामकरण होय. सिंधी भाषेत डोंगराळ प्रदेशाला रोहु असे म्हणतात. पष्तो भाषेत रोहील म्हणजे पर्वतनिवासी असा शब्द वापरला जातो. भारतातील रोहीलखंड हा प्रदेश या अफगाण लोकांच्या एका काळच्या संचार व सत्तेची खूण म्हणून शेष आहे.

महाराष्ट्रात अफगाण

ऋग्वेदातील पक्थ लोकानंतर ऐतिहासिक दृष्टया शक लोकांचे उल्लेख आढळतात. हे लोक मूलतः उत्तर अफगाणिस्तान व त्याच्याही उत्तरेस सोगदिया प्रदेशात राहात. हिरोडोटस याने या शकांचा Scythians असा उल्लेख केलेला आहे. हखामनिश राजवंशाच्या दारयवहू या सम्राटाच्या (इ. स. पूर्व ५२१ ते ४८६) शिलालेखांतून या शक वंशीयांच्या तीन गटांचे उल्लेख आलेले आहेत. हे आर्यवंशीय लोक आहेत असे त्यांच्या भाषा, वेश व संस्कारादीवरून हर्जफेल्ड

आदि प्राच्यविद्याकोविदांनी प्रतिपादिलेले आहे. गौतम बुद्धाच्या अगोदर एक दोन शतके तरी हे लोक भारतातही वावरत होते असे वाटते. गौतम बुद्ध हा शाक्यमुनि होता, हे अश्वघोषाच्या बुद्धचरितावरूनही आढळते. अमरसिंहाने आपल्या कोशात बुद्धाला शाक्यवंशीय म्हणून वर्णिले आहे. कुषाणवंशीय सम्राट कनिष्काच्या एक शतक अगोदर झालेल्या सूरेन राजवंशातील प्रथम अयस (Azes : इ. १०–३५), अयिलिष (Azlises इ. ३०–४०), शोडास (Sodasa) इ. स. १५ ते २५), गंडुफ्हरस (Gondophernes : इ. ४६), अश्ववर्म इत्यादि राजे शक जमातीतील होते असे, आता हर्जफेल्ड आदि विद्वान प्रतिपादितात. कुषाणवंशातील राजे कनिष्काच्या अगोदर उदयाला आलेले दिसतात. कुषाण हा राजवंश शकवंशीयच होय. या सर्व राजांची सत्ता वायव्य भारतात होती. ते एरण व मथुरेपर्यंत पसरलेले होते. त्यांचे प्रत्नलेख खरोष्ठी लिपीतील प्राकृत भाषेत उपलब्ध आहेत. याच शक सम्राटांचे क्षत्रप, महाक्षत्रप एरण आणि सौराष्ट्रातील गिरिनगर–गिरनार येथे शककालाच्या पहिल्या शतकापासून नांदत होते. गिरिनगरचा रुद्रदामन् सर्वप्रसिद्धच आहे. रुद्रदामन् आणि नहपानाचा जावई व दखमिता (दक्षमित्रा) हिचा नवरा उषभदत्त हे महाराष्ट्राच्या चांगले परिचयाचे आहेत. रुद्रदामनाने सातवाहन राजाचा पराभव केलेला होता. उषभदत्ताचे शिलालेख नासिक आदि ठिकाणच्या शैलगृहातून सापडतात. रुद्रदामनाचा वंश गुजरातेत शककालाच्या तिसऱ्या शतकांपर्यंत चालू होता. शक लोक गौतमबुद्धाचे अनुयायी बनलेले होते. शाक्य भिक्षु म्हणून प्रत्नलेखातून उल्लेखित भिक्षु शक जमातीतील होते असा निष्कर्ष आता विद्वानांनी काढलेला आहे. अशा शाक्य भिक्षूंनी दिलेल्या अनेक दानांचे उल्लेख महाराष्ट्रातील अनेक लेण्यातील अनेक शिलालेखांतून सापडतात. असे उल्लेख सातवाहन राज्यकालापर्यंत सापडतात.

ईराणी परम्परेत मुरलेले व अफगाणिस्तानात ग्रीक विजेत्यांच्या संपर्कात वाढलेले हे शक लोक नाणी पाडीत. त्यांची नाणी पश्चिम भारतात सर्वत्र सापडलेली आहेत. नासिक, अकोला, अमरावती जिल्ह्यातून त्यांच्या हजारो नाण्यांचे संच आतापर्यंत हाती आलेले आहेत. असा एक नुकताच सरकारला सापडलेला प्राचीन नाण्यांचा संच, नाणकशास्त्राच्या तज्ज्ञ व शिक्षणविभागाच्या एका माजी आय्. सी. एस्. सचिवाकडे गेल्या आठ दहा वर्षांपासून नुसताच पडून राहिलेला आहे, अशी तक्रार एका महामहोपाध्यायांनी केल्याचे आमच्या कानावर आहे. शक क्षत्रपमहाक्षत्रपांची अनेक नाणी भूतपूर्व हैद्राबाद संस्थानातही सापडलेली आहेत. रुपिअम्म या महाक्षत्रपाची एक विजययष्टि–खांब पौनी येथे वैनगंगा नदीच्या काठी सापडलेला प्रकाशात आलेली आहे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे या शक क्षत्रपांचा संचार महाराष्ट्रात शककालाच्या चौथ्या शतकापर्यंत चालू होता. शकांचे एक राज्य एरण–मन्दसौर–उज्जयनी या प्रदेशात चालू होते. ते औलिकर

राजघराणे होय. ईराणी वा अफगाण शक लोकांचे ते राज्य होते असे एका लेखात आम्ही दाखविलेले आहे. हे राज्य दीडदोनशे वर्षे चालले होते. वराहमिहिर हा ज्योतिर्विद याच राजदरबारात होता असे वाटते.

महाराष्ट्रधर्म

महाराष्ट्रधर्माचा उद्‌गम व विकास असा एक प्रबंध आम्ही, कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठातर्फे झालेल्या मराठा इतिहाससंबंधी परिसंवादात वाचलेला आहे (२८ मे, १९७०). तो मुंबईच्या इतिहास आणि संस्कृति या त्रैमासिकात प्रकाशित झालेला आहे. त्या लेखात मांडलेल्या मुद्यांच्या संबंधित भागाचा सारांश येथे देणे इष्ट होईल. क्षत्रराष्ट्र हा शब्द नहपान या महाक्षत्रपाच्या (कारकीर्द शक ४१, ४२, ४५) तीन चार शिलालेखात त्याचे विशेषण म्हणून प्रयुक्त आहे. शक जमातीच्या अस्मितेचा हा शब्द दर्शक आहे. शक क्षत्रप राजा श्रीधरवर्मा याच्या शक २१५ तील एरण येथील शिलालेखात क्षत्रराष्ट्रस्य धर्मात् असा प्रयोग आलेला आहे. या सुगाव्यावरून शक जमातीत आपल्या शकराष्ट्राच्या धर्माची कल्पना वावरत होती. श्रीधरवर्म्याच्या दोन प्रस्तरलेखांवरून या धर्माची अंगेही निश्चित करता येतात. महाराष्ट्रात महाराष्ट्रधर्म या संकल्पनेचा सर्वप्रथम उल्लेख महिकावतीच्या बखरीत (लेखनकाल शक १३७०) सापडतो. ही बखर, रामदास स्वामी व मराठीतील तदुत्तर उल्लेख यांच्या या संकल्पनेच्या वैशिष्टयांशी, श्रीधरवर्मा याच्या शिलालेखांतील वैशिष्टयांशी त्या लेखात तुलना केलेली आहे. या तुलनेवरून महाराष्ट्रधर्म या संकल्पनेचा उगम शक लोकांच्या क्षत्रराष्ट्रधर्म या कल्पनेतून झाला असे प्रमेय या लेखात मांडलेले आहे. महाराष्ट्रधर्माची स्फूर्तिदेवता जगदम्बिका तुळजाभवानी मानण्यात येते. तुळजा या देवीचे दुसरे नाव तुकाई असे आहे. पैशाची भाषेच्या नियमानुसार सं. दुर्गा शब्दाचे तुक्का असे रूप होते. हे अनेक प्राकृत वैयाकरणांनी सांगितलेले व विद्वन्मान्य आहे. तुळजा, तुरजा शब्ददेखील वेगळ्या परिस्थितीत दुर्गा शब्दाचेच रूप होय भारताच्या वायव्य कोपऱ्यातील लोक जी प्राकृत भाषा बोलत ती पैशाची भाषा होय. हे लोक अफगाण लोकच होत. प्राचीन काळी अफगाण लोकांची शक जमात भारतात वावरत होती हे आपण पाहिलेच आहे. हे शक लोक जशा प्रकारची अपभ्रष्ट प्राकृत—येथील सर्वसाधारण लोकांहून वेगळी, बोलत ती पैशाची प्राकृत होय असे आमचे मत आहे.

शकावशेष स्थलनामे

महाराष्ट्रातील शक, अफगाण लोकांच्या संचाराची प्रतीके म्हणून वरील लेखात आम्ही काही प्रदेशनामे व स्थलनामे यांची चर्चा केलेली आहे. प्रदेशनामे बागलाण हे नासिक जिल्ह्यातील स्थल लक्ष्य आहे. नहपान, उषभदत्त

(ऋषभदत्त) यांची पूर्वपदचिन्हे लक्षात घेतली तर ही प्रदेशनामे विचारणीय ठरतात. हिंगोली, (गड) हिंगलज (कोल्हापूर), हिंगलजबाडी (तेरसमीप, धाराशीव–उस्मानाबाद) ही स्थलनामे दक्षिण बलूचिस्थानातील हिंगुलजा नदीच्या परिसरात प्राचीनकाळी असलेल्या हिंगुलजा देवीच्या या महाराष्ट्रप्रदेशातील प्रभावाची स्मारके होत. हिंगुलजा हे त्या भागात महादेवपत्नी दुर्गा–पार्वतीचे नामान्तर आहे. परवा कळले की औरंगाबाद शहरातही हिंगुलजा देवीचे एक छोटे देऊळ आहे. असे देऊळ हिंगलजवाडी, तेर येथे असल्याचे मला ठाऊक होते. पष्तो भाषेच्या व्युत्पत्तिशास्त्रानुसार अजन्ता शब्द अर्हन्तक (म्हणजे बौद्ध धर्मगुरु) यापासून आणि कार्ले प्राचीन वलू–ल्लूरक शब्दापासून झालेला आहे असे आम्ही प्रतिपादिले आहे. सं. ह ध्वनींचा ज आणि व ध्वनीचा क, ग होणे ही पष्तो भाषेतील नित्याची प्रक्रिया आहे. मध्य प्रदेशातील एरण (प्राचीन एरिकिण, ऐरिकिन) ईराण या देशनामाची भाषाशास्त्रीय भारतीय अपत्ये होत. बृहन्मुंबईतील एरंगल हे खेडे एरण शब्दाचे सहोदर आहे. केज (धाराशीव – विषयातील तालुक्याचे ठिकाण) हे स्थलनाम बलूचिस्तानातील केज, केच या प्रसिद्ध स्थानाचे स्मृतिरूप आहे. केच हे स्थान सम्राट हर्षकालीन व तत्पूर्व आहे.

पष्तो आणि मराठी

पष्तोच्या मराठीशी सम्पर्काची चर्चा करतांना शक खोतनी भाषेची दखल घेणे अत्यावश्यक आहे. अखिल नव्य आर्यभारतीय भाषांपैकी फक्त मराठी भाषेतच च–वर्ग या तालव्यांचे भिन्न उच्चार होतात. च़्, ज़् हे वर्त्स्य–स्पर्शघर्ष्य अल्पप्राण आणि छ़्, झ़् हे वर्त्स्य महाप्राण फक्त मराठीतच उपलब्ध आहेत. याचा थोडासा ऊहापोह डॉ. द. ह. अग्निहोत्रींनी (मराठी वर्णोच्चार विकास, नागपूर शक १८८५) केलेला आहे. अशाच प्रकारचा या तालव्यांचा वर्त्स्य उच्चार पष्तो भाषेत रूढ असल्याची चर्चा ट्रम्प् याने (पष्तो व्याकरण इंग्रजी इ. स. १८७३), केलेली आहे. च–वर्ग वर्णांचे ईराणी (म्हणजेच फार्सी) आणि संस्कृत उच्चार समान आहेत. ईराणी चश्म आणि संस्कृत चक्षु यांतील च–वर्णाचा उच्चार तालव्य होतो. परंतु, पष्तो भाषेत, मराठीतल्या प्रमाणे, काही विशिष्ट शब्दातील च या वर्णाचा उच्चार वर्त्स्य होतो, याची ट्रम्प् याने ही उदाहरणे दिलेली आहेत. च़ारी (हेर, सं. चार), च़ड़ह (एकटा, सिंधी छड़हो, मराठी सडा), ज़्वान (ईराणी जुवान, सं. युवा), ज़ोलई (सिंधी झोली, मराठी झोळी), ज़नह (ईराणी जनख़, म. हनुवटी), षज़ह (स्त्री, युवती, सं. सखी)

शकांच्या खोतनी भाषेत या तालव्याचे वर्त्स्य उच्चार होतात ही गोष्ट कोनौ, बरो, बेली आदी विद्वानांनी सर्वत्र नमूद केलेले आहे. कोनौ याने आपल्या व्याकरणात याची चर्चा केलेली आहे, (पाहा–शक स्टडीज, आस्लो इ. स. १९३२,

पृ. ११ आदि). ़चार्ब (मराठी चरबी), सं़चार (सं. संसार), ज़नीन्दि (= ते हत्या करतात, सं. हन्), पंज़ (सं. पंच) इत्यादि शब्दांचा त्याने उल्लेख केलेला आहे.

पैशाची भाषेत या ध्वनींचा विचार शेष राहिलेला नाही. परंतु तो मूलतः असला पाहिजे. कारण तो मराठीत शेष राहिला आहे. मराठी ही अगदीच दक्षिणेतील नव्य आर्यभाषा. तिचा प्रदेश अन्य आर्यभारतीय भाषाप्रदेशांपासून विन्ध्य-सातपुडा आणि सह्याद्रि पर्वतराजीने वियुक्त झालेला आहे. गुजराती, मारवाडी, मौलवी आदि भाषांतील वर्त्स्य उच्चार भारतीय प्राकृतादि भाषाप्रभावाने पुसून गेले. परंतु महाराष्ट्र दूरस्थ व वियुक्त असल्याने हे वर्त्स्य उच्चार येथे बद्धमूल झाले. या ध्वनींचा इतिहास ध्यानात घेणे अत्यावश्यक आहे. ही या वर्त्स्य उच्चारांची उत्पत्ति आपण विचारात घेतली पाहिजे.

आता शक जमात व अफगान लोकांची मूळ पष्तो भाषा यांचा मराठी भाषेवर काही प्रभाव पडलेला आहे की काय हा प्रस्तुतचा मुख्य विषय पाहाणे आहे. महाराष्ट्रधर्मावरील प्रवचनात मराठी भाषेतील की या उभयान्वयी अव्ययाची चर्चा आम्ही केलेली आहे. सर्वप्रथम गोष्ट ही की हा की उभयान्वयी मुस्लिम संपर्काने ईराणी (पार्सी, फार्सी) भाषेतून आला, हे वि. का. राजवाडे आदींचे म्हणणे अप्रमाण होय. ही गोष्ट आम्ही यापूर्वी मांडलेली आहे (पाहा–महाराष्ट्र साहित्य पत्रिका, क्रमांक १६३, पुणे श. १८८९). तदनंतर एक लेखात हा की, शक जमातीच्या भारतातील व महाराष्ट्रातील प्रभावामुळे मुसलमान विजेत्यांचे पाय महाराष्ट्रभूमीला लागण्यापूर्वी, मराठीत प्रविष्ट झाला असे आम्ही फार्सी, पष्तो, सिंधी, गुजरातीतील या अव्ययाच्या रूपांच्या अनुरोधाने प्रतिपादिले आहे. आता मराठी भाषेतील मराठी म्हणून समजल्या गेलेल्या आणि मुस्लिमसंपर्कापूर्वी मराठी भाषेत वावरणाऱ्या काही शब्दांचा ऊहापोह करावयाचा आहे. हे शब्द मराठीत जरी वावरत असले तरी कृ. पां. कु. च्या व्युत्पत्ती कोशात वा अन्यत्र त्यांची समाधानकारक व्युत्पत्ति सापडत नाही. ती पष्तो, पख्तो भाषेतील त्या त्या शब्दांच्या प्रपंचावरून हेरावयाची आहे. या कामी आम्ही ई-ट्रम्प्प या विद्वानाच्या ग्रामर ऑफ दि पष्तो, लंदन १८७३ आणि गार्ग मोर्गन्स्टर्न (Georg Morgensterne) याच्या ॲन एटिमॉलॉजिकल व्होकॅबुलरी ऑफ पष्तो, ऑस्लो, १९२७ या पुस्तकांचा उपयोग करीत आहोत. खालील चर्चेत पृष्ठांचे सन्दर्भ दुसऱ्या ग्रंथातीलच समजावेत ट्रम्प्प याचा मुद्दाम उल्लेख केला जाईल.

फाळ

नांगराच्या भूमीत घुसणाऱ्या लाकडी भागाला फाळ म्हणतात. काही लाकडी नांगराला लोखंडी चपटे पाते बसविण्यात येते. त्याला देखील फाळच म्हणतात हा शब्द मराठीत अगदी जुना आहे. तो फल, फाल या रूपात ऋग्वेदात आहे. हे कृ. पां. कु. आदींनी सांगितले आहे. तो ऋग्वेदात आहे हे त्याच्या प्राचीनत्वाचे दर्शक आहे. परंतु त्याची व्युत्पत्ति कशी ? या गोष्टीचा उल्लेख कोठे दिसत नाही. पष्तो भाषेतील व तिच्या अन्य बोलीतील या शब्दांची रूपे पाहिली म्हणजे एक नवीनच प्रकाश प्राप्त होतो. या शब्दाचे पष्तो रूप **स्पार** असे असून (पृ. ६८) त्याचा अर्थ Plough-Share असा दिलेला आहे. या शब्दाचे ईराणी (फार्सी) भाषेतील रूप **सुपार** असे आहे. हा पष्तो शब्द ईराणीतून आला असावा असे विद्वान मोर्गन्स्टर्न याचे म्हणणे आहे. परंतु हे तर्कसिद्ध ठरू शकत नाही. ते ईराणीतून येण्याची मुळीच गरज नाही. पष्तो भाषेची मायभूमि हीच अवेस्ता भाषेची जन्मभूमि आहे. ऋग्वेदाचा प्राचीन भाग (मंडल १, ८, ९ व १० सोडून) अफगाणिस्तानात हलमंद (सरस्वती) नदीच्या परिसरात लिहिला गेला असे एक विद्वन्मत प्रचारात आहे. असे असताना हा शब्द ईराणीतून पष्तो भाषेत येण्याची मुळीच गरज नाही. तो मूळचा याच भाषेतला असू शकतो. शिवाय भाषांच्या विकासावस्थांकडे पाहिले तर स्पार हे भाषिक रूप सुपार या रूपाहून प्राचीन आहे असे दिसून येते. ऋग्वेदातला फल, फाल हा शब्द देखील तद्भव स्वरूपात ऋग्वेदात प्रयुक्त झालेला आहे असे म्हणावे लागते. आर्यांच्या सर्व भारोपीय भाषांचे व संस्कृत भाषेचेही असे वैशिष्ट्य आहे की बहुतेक सर्व शब्दांची व्युत्पत्ति धात्वनुसारी आहे. सर्वप्रथम मनात क्रियेची संवेदना उत्पन्न होते; तदनुसार धातूचे रूप शरीरधारी बनते. क्रियेच्या शब्दशरीरावरून अन्य अनेकानेक आनुषंगिक शब्द अस्तित्व पावतात. वैदिक स्कृ शब्दाचा प्रपंच-विस्तार या दृष्टीने अत्यंत उद्बोधक आहे. प्रस्तुत प्रसंगी स्पार या पष्तो शब्दाचे मूळ सं. स्फर्, स्फार या धातूत आहे असे वाटते. त्याचे प्रयोजक रूप स्फार्–स्फारयति असे आहे. अर्थसंधारणाशास्त्राशी (Semantics, Semasiology) ही सूचना सुसंगत आहे. म्हणून स्पार या पष्तो शब्दाचे मूळ स्फर्–स्फार धातूत आहे असे आम्हाला वाटते. ऋग्वेदात या शब्दाचे फल, फाल असे तद्भव रूप झालेले आहे. र आणि ल ध्वनींच्या अभेदामुळे ल ची अडचण नाही. पष्तो भाषेत ख़ आणि ज़्ह या ध्वनीखेरीज अन्य महाप्राण ध्वनि व वर्ण नाहीत. म्हणून **स्पार** हे पष्तो रूप अधिक मूलानुसारी आहे असे म्हणावे लागते. अनेक ईराणी बोलीत हा शब्द आहे. त्यातील रूपे अशी. सरीकोली–स्पुर; इष्खष्मी–उस्पीर; वख़ी–स्पून्दर; इत्यादी. पेशावरच्या परिसरात हे रूप सस्पोर असे आहे. परची बोलीत ते फी–ए–शश्पार असे आहे. मोर्गन्स्टर्न याने संस्कृत शस्त्र शब्दाचा व्युत्पत्तिदर्शक उल्लेख करून हे संशयास्पद आहे असे म्हटले आहे. ते योग्यच आहे. मराठी भाषेतील फाळ हा शब्द पष्तोतून आला असे नसून तो संस्कृतातून आलेला आहे.

खोंड

खोंड शब्दाचा उल्लेख कृ. पां. कु. मध्ये आहे. त्यांनी कानडी कंदु म्हणजे वासरूं, गोंडे म्हणजे बैल असा उल्लेख केलेला आहे. शेवटी षंढ म्हणजे बैल असे लिहून पुढे प्रश्नचिन्ह केलेले आहे. दाते कोशांत नवीन विशेष नाही. कृ. पां. कु. अथवा दाते कोशात दुर्दैवाने शब्द सर्वप्रथम कोठे प्रयुक्त झाला याची नोंद नाही. अशा ऐतिहासिक दृष्टीचा कोश मराठी अभ्यासूंना मिळेल तो सुदिन. तो किती दूर आहे, हे कोण सांगू शकेल ? पष्तो भाषेत (पृ. ७१) स्खै, ख़्सै म्हणजे गाईचे वासरू असा शब्द व्युत्पादिलेला आहे. हज़ारा प्रदेशात याचे रूप ख़्सै असून, मोहमद बोलीत ते स्खाइ, कोहात भागात स्खै, परंतु वजीरानी बोलीत ख्सै असे आहे. पेशावर भागात याचे रूप खुसे आणि स्ख़्वन्दर असून, वजीरानीत ते स्ख़न्दर असेही आढळते. या शब्दाची व्युत्पत्ति संस्कृत शक्वर–बैल आणि शक्वरी–गाय यापासून दिलेली आहे. वरील रूपांपैकी पेशावरी स्ख़्वन्दर आणि वजीरानी रूप स्ख़न्दर (स्ख्वन्दर) ही दोन्ही विशेष लक्ष्य आहे. आर्. एल्. टर्नर याने आपल्या तौलनिक आर्य-भारतीय भाषा कोशात (इ. स. १९६६) खोंड म्हणजे लंगडा या शब्दाची चर्चा केली आहे. पण प्रस्तुत शब्द त्यात नाही. वरील चर्चेवरून मराठीतील खोंड शब्दाशी पेशावरी व वजीरानी बोलीतील पष्तो शब्द स्खंदर शब्दाचे भरपूर साम्य आहे. साम्य दोन प्रकारांनी तुळावयाचे. एक ध्वन्यनुसार व दुसरे अर्थसंधारणेनुसार. या दोन्ही दृष्टींनीही खोंड हा शब्द वरील पष्तो शब्दाशी चांगला जुळतो असे वाटते. म्हणून हा शब्द पष्तो शब्दावरून व्युत्पादण्यासारखा आहे.

चाळ

चाळ हा शब्द मराठीत, तसेच हिंदी गुजरातीत रूढ आहे. तो एकाच प्रांगणात घरांची रांग या अर्थाने आहे. मुंबई, पुणे, नागपूर इत्यादी औद्योगिक शहरातील चाळी प्रसिद्ध आहेत. व्युत्पत्ति कोशात या शब्दाची व्युत्पत्ति सं. शाला-साळ-चाळ अशी दिलेली आहे. परंतु या दोन्ही शब्दातील अर्थ-संधारणा अगदीच भिन्न-भिन्न आहेत. म्हणून शाला शब्द अप्रस्तुत वाटतो. टर्नर साहेबांनी मराठीतील चाल (चालणे) व चाळा या संबंधी चर्चा केली आहे परंतु प्रस्तुत चाळीचा प्रश्न काढलेला नाही.

मोर्गन्स्टर्न यांनी (पृ. ३२) पष्तो कलै शब्दाची चर्चा केली आहे. हा शब्द अवेस्ता कत म्हणजे घर शब्दापासून व्युत्पन्न असा सांगितला आहे. हा फार्सी भाषेत कद रूपाने वावरतो. कद-खुदा (गृहस्वामी), कद-बानू (गृहस्वामिनी), कद-वाद (घरातील कारंज), इत्यादी अनेक सामासिक शब्दात तो आहे. पष्तो कलै म्हणजे ग्राम. त्यांनी असेही म्हटले आहे की अफगाणिस्तानात एका घराच्या पाठ-भिंतीला,

वा बाजूच्या भिंतीला, लागून दुसरी घरें बांधण्याची पद्धत आहे. नेमकी हीच पद्धत भारतातही आहे. निदान महाराष्ट्रातील घरे तरी याच पद्धतीने बांधली जातात हजारा प्रदेशात **काल** म्हणजे शेजार, तिरा भागात क्वाले–ल म्हणजे घर, गृह, असे वापर लेखकाने नोंदविले आहेत. तसेच तिरा भागात **चाल** म्हणजे Village Lane गावातील गल्ली असा शब्द दिला आहे. वजीरानी बोलीत **चोल, चेल** (म्हणजे गल्ली, आळी) अशी रूपें नोंदविली आहे. शेवटी त्यांनी हा शब्द कात्य शब्दापासून निघाला असे प्रश्नचिन्ह-पूर्वक सुचविले आहे. टर्नर यांनी या मराठी चाळ शब्दाची नोंद घेतलेली नाही. शब्दशरीर आणि अर्थ-सन्धारणा दोन्ही दृष्टींनी मराठी चाळ शब्द पष्तो भाषेतील काही बोलीत काल अथवा चाल रूपात वावरणाऱ्या शब्दाशी सगोत्र आहे असे वाटते. यावरून मराठीतील चाळ शब्द पष्तो भाषेतून आलेला असावा.

कळवा

घोड्याच्या एका बाजूच्या दोन पायाला कानीने बांधतात. हेतु असा की ते उधळून जाऊ नये, फार लांब न भटकता, साधारणत: जवळच चरत रहावे. कानी बांधण्याच्या क्रियेस कळवा घालणे, तसेच दाव्यास कळवा म्हणतात. व्युत्पत्तिकोशात हा शब्द कळावा या रूपात दिलेला आहे. व्युत्पत्तीदाखल कानडी कळिवु-अडकविणें, सं. कलाप, प्राकृत-कलाप आदि उल्लेख आहेत. परंतु हे समाधानकारक मुळीच नाहीत. टर्नरच्या कोशात शब्द नाही. मोर्गन्स्टर्न याने (पृ. ७८) ष्केल शब्द देऊन त्याचा अर्थ tying a horse's two feet, rope used for that purpose असा दिला आहे. व्युत्पत्ति अज्ञात आहे असेही सांगितले आहे. अश्व-घोडा शब्द सं. श्वल्, श्वल्ल् (वेगाने पळणे, धावणे) या धातूपासून बनलेला असावा. या शब्दाची नक्की व्युत्पत्ति सांगणे कठीण असले तरी मूळ संस्कृत किंवा अवेस्ता भाषेतील अश्व किंवा अस्प शब्दाशी संबंधीत अशा एखाद्या शब्दापासून ष्केल शब्द व्युत्पन्न असला पाहिजे असे अनुमानता येते. मूळ सं. व ध्वनीचा पष्तो भाषेत क उच्चार होतो. म्हणजें ष्केल शब्द ष्वेल, सूवेल यासारख्या शब्दापासून निघालेला असावा. अंतीम ल हा प्रत्ययात्मकही असूं शकतो; परंतु येथे मुख्य मुद्याची गोष्ट ही की मराठीतील कळवा शब्द अफगान लोकांच्या भारतातील सम्पर्काने तो पष्तो भाषेतून भारतात आलेला आहे. तो पंजाबी, सिंधी, मारवाडी, गुजराती आदींतही असला पाहिजे असे अनुमान करण्यास तशीच सबळ ऐतिहासिक कारणें आहेत.

चप्पल, चपल

वहाणा या अर्थी, हा शब्द मराठी भाषेत नवीन आहे. व्युत्पत्ति कोशात नोंद करून तो हिंदीतून आला एवढेच सुचविले आहे. प्लॅट्स् Platts च्या उर्दूहिंदी-

इंग्रजी कोशात (ऑक्स्फर्ड १९६८) हा शब्द संस्कृत चर्प अधिक ला या सामासिक शब्दापासून व्युत्पादिला आहे. परंतु मोनिअर वुइल्यम्स वेगळा चर्प शब्द देत नाही. वरील सामासिक शब्दही नाही. म्हणून व्युत्पत्तीचा मार्ग खुंटतो. मोर्गन्स्टन (पृ. ५६) याने पष्तो पल् (पद, पदचिन्ह) शब्दाची चर्चा करतांना तो शब्द अवेस्ता पज़ शब्दापासून निघाल्याचे सांगितले आहे. ईराणीत पै, पय म्हणजे पाय पाऊल, पदचिन्ह असा शब्द आहे. वज़ीरानी बोलीत येबल्-एबल्, मानसेहरा-हज़ारा प्रदेशात ख़पे-अब्ल आणि पेशावर टापूत ख़्पे-अब्ल् असे शब्द रूढ असून त्यांचा अर्थ Shoe असा आहे. या सामासिक शब्दातील अंतिम एबल्, अब्ल् हा शब्दांश संस्कृत पद्य (पद्, पद–पायासंबंधी) शब्दापासून व्युत्पादिलेला आहे. पष्तो भाषेच्या स्वभावानुसार हे शक्य आहेच. द ध्वनीचा र, ल नित्य होतो. प ध्वनीचा ब सुद्धा बनतो. खरी अडचण ख़्पे अंशाबद्दलची आहे. माझी सूचना अशी आहे की हा मागील शब्द क्षप्, क्षपा शब्दाचा अवशेषरूप आहे. म्हणजे मूळ शब्द क्षप् अधिक पद्य म्हणजें रात्रीच्या वेळी पायातील म्हणजेच ख़्पे-अब्ल् होय. या पष्तो शब्दाने भारतात यावयाचे ठरविले तर ख् ध्वनीचा च बनेल व चपल असा शब्द बनेल. चप्पल हे सुद्धा अत्यंत शुद्ध असे रूप बनेल. म्हणून वरील मूळ पष्तो शब्दरूपाचे चपल, चप्पल हे भारतीय अपभ्रष्ट रूप होय असे म्हणता येते.

पष्तो भाषेत अब्ल् म्हणजे नागव्या पायाचा. पायात काही नसलेला, असाही शब्द आहे. हा अपद्य याचा अवतार असावा, हे उघड आहे; तसेच ईराणीतही अब्ल-पा म्हणजे नागव्या पायाचा असा शब्द आहे. याच अर्थाचा आणखी एक शब्द प्क्खे-अब्ल असा उपलब्ध आहे (कोशात). चपल हे रूपान्तर खुद्द पष्तो भाषेतच झालेले आहे असे आढळते. कारण ्चपलई हा शब्द चप्पल या अर्थी मुळातच आढळतो. येथे च वर्णाचा उच्चार मराठीतील ्चिंच शब्दातील ्च ध्वनीच्या उच्चाराप्रमाणे आहे.

गार, गारा (Hail)

मराठीत गारा शब्द फार जुना आहे. तो महानुभावीय साहित्यात वापरलेला दिसतो. तो नरेन्द्राच्या रुक्मिणीस्वयंवरात (ओ ५६८) आहे. तो हिंदीत असून, दक्खिनी हिंदीतही सापडतो. दक्खिनीत त्याचे रूप गार असे आहे. प्लॅट्स Platts आणि कुलकर्णी हा शब्द संस्कृत करका शब्दापासून व्युत्पन्न असल्याचे नोंदतात. कुलकर्णी यांनी, ते नेहमी करतात त्याप्रमाणे गार शब्दाची प्राकृत अपभ्रंश वा नव्य आर्यभारतीय भाषांतील रूपे येथे दिलेली नाहीत. मोनियर वुइल्यम्सने करक शब्द कर शब्दाच्या कक्षेत नोंदविला आहे. हा कर शब्द सं. कॄ धातूपासून व्युत्पन्न आहे. कॄ धातूचा मूळ अर्थ फेकणे, विखुरणे, अस्ताव्यस्त करणें असा आहे. या धातूच्या मूळ अर्थसंधारणेत पाणी वाहणे, पाऊस पडणे, वर्षा होणे इत्यादी अर्थाचा

संबंध येत नाही. करक, करका म्हणजे गारा या शब्दाचा या धातूखालील समावेश अनाठायी आहे असे वाटते. वर्षा होणे, वर्सणें, पाऊस पडणें किंवा पावसासंबंधी कसलाही भाव कॄ धातूशी येत नाही.

पष्तो भाषेत **बोरे-दल** म्हणजे वर्षणे, पाऊस पडणे या शब्दाची व्युत्पत्ति मोर्गन्स्टर्न यानें चर्चिली आहे (पृ. ८८). गायगरचे मत उध्दृत करून त्याचा अवेस्ता पर्याय **बार** म्हणजें पाऊस असा दिला आहे. पष्तो भाषेत दुसरे वैकल्पिक रूप **वरे-दल** असे आहे. वज़ीरानी बोलीत ते रूप **वोर** (पाऊस), **वरन्दै** Raining; पेशावर प्रदेशात **बारे-दल**; कोहात भागात **वरेग़ी** असे आढळते. ईराणी (फार्सी) भाषच्या पराची बोलीत ग़ार (पाऊस) असा शब्द आहे. ईराणीच्या ओर्मुरी बोलीत आणि कम प्रदेशात ग़ोर-एक किंवा ग़ोरयेक म्हणजें वर्सणे, वर्षणे, पाऊस पडणे असे रूप आढळते.

ईराणीत बारी-दन–वर्षणें, बार-पाऊस, बारिश-पाऊस असे शब्द आहेत. यांचे मूळ अवेस्ता व ज़ंद भाषातील शब्द होत. या धातूचा संस्कृत पर्याय धातु वृष्-वर्षति हा होय. ईराणी क्षेत्रात संस्कृत धातूतील अंतिम ध्वनि ष् हा दिसून येत नाही. ईराणी भाषेत ग़ार शब्द या अर्थाने नाही असे वाटते. पष्तो क्षेत्रातील धातूंची रूपे पाहिली म्हणजें असे दिसून येते की मूळ व् ध्वनीचा काही पष्तो बोलीत ग़ झालेला आहे. मूळ संस्कृत अथवा अवेस्ता व ध्वनीचा ग़ झाल्याची उदाहरणे अनेक सापडतात. उदाहरणार्थ पराची बोलीत सं. वेत शब्दाचे रूप गी, सं. वितस्ति शब्दाचे ईराणीत गिदस्त, ब्राहूई भाषेत गिदिस्प; सं. वत्स शब्दाचे पराची बोलीत ग़सो इत्यादि. यावरून ग़ार शब्दाची व्युत्पत्ति पाहाता येते. सं. वृष, वर्षा, अवेस्ता व जंद–वार याचें ग़ा असे रूप झालेले दिसते. ग़ोर रूपसुद्धा दिसून येते.

संस्कृतमध्ये दिसून येणारे कर hail, करक, करका hail, hail-stone हे शब्द मूलतः संस्कृत धातूपासून दिसत नाहीत. ते पष्तो भाषेतील अतिथि शब्द होत. सारांश हा की अलीकडील आर्यभारतीय भाषांत वावरणारा गार शब्द पष्तो भाषेतून आलेला दिसतो. संस्कृतमधून त्याची व्युत्पत्ति दुरापास्त आहे. म्हणून हा मुस्लिम संपर्कपूर्व काळात भारतीय भाषात आलेला आहे

सज़न, सज़णा

हा शब्द मराठी साहित्यात, विशेषतः लोकसाहित्यात, अलीकडे (गेली ३०० वर्षे) नित्य प्रयुक्त आहे. व्युत्पत्ति कोशात तो स्वजन शब्दापासून व्युत्पादिला आहे. परंतु हे अगदी गैर आहे. ते अर्थसंधारणेच्या विरुद्ध आहे. येथे केवळ वर्णसाम्य अप्रस्तुत होय. म्हणून त्याची व्युत्पत्ति अन्यत्र बघितली पाहिजे. पष्तो भाषेत सखी (स्त्री) शब्दाचे रूप षज़ (पाहा पृ. ७७) असे आहे. अन्य बोलीत ती रूपे शज़ु, षज़ु, षज, ख़्ज़, ख़ज अशी आहेत. मात्र पराची बोलीत ते

रूप शिच+क आणि झेबकी बोलीत शच् (स्त्री) असे होते. मूळ ख ध्वनीचा पष्तोत ज़ होतो असे सांगून ट्रम्प्प याने याच शब्दाचे उदाहरण दिले आहे. मोर्गन्स्टर्न याने मात्र हा शब्द सं. स्त्री शब्दापासून व्युत्पादिला आहे. परंतु हे योग्य नव्हे. मिंजनी बोलींतील शीय आणि वखीतील स्त्रेइ हे शब्द मात्र स्त्री शब्दापासूनच होत. या दोन शब्दात लेखकाची गल्लत झालेली आहे. षज़् सज़् या पष्तो भाषेतील मूळापासून हिंदी-मराठी सज़्न शब्द आला असावा असे दिसते. तो सखिम् या रूपापासून इकडे आला. सखी शब्दापासूनची व्युत्पत्ति अर्थ आणि ध्वनि दोन्ही दृष्टींनी सुयोग्य आहे. हा शब्द फार्सीत नाही. भारतीय भाषात याची व्युत्पत्ति लागत नाही.

कलत्र

कलत्र शब्द संस्कृत साहित्यात महाभारतकालापासून वावरत असला तरी तो अगांतूक, म्हणून अव्युत्पादित आहे, हे उघड आहे. त्याची कलत्रा, कलत्रवत्, कलत्रीकृ ही अन्य रूपे अगांतुकाला केलेला साधा शिष्टाचार आहे. म्हणून तो सगोत्र ठरत नाही. त्याचे लिंग पाहिले म्हणजे ईराणी व उर्दू साहित्यातील पुल्लिंगी प्रेयसीची आठवण होते. हा शब्द पष्तो भाषेतून आला असे वाटते. त्याची तेथील रूपे (पृ. ३५, क्रमांक ७८) अशी – कोज़द, क्वज़द, कोज़दन (betrothal). अन्य बोलीतील रूपे कोज़देन्न, कोज़दन्, केज़दल्ये (विवाहित) अशी आहेत. वरील रूपांपैकी शेवटील रूप लक्ष्य आहे. यातील ज़द < त्र हे समीकरण स्वीकारून वर्ण-विपर्यय मानिला तर कलत्र शब्द सहजगत्या हाती येतो. शतपथब्राह्मणात युज् शब्द to fix in, insert, inject, in (Semen) मध्ये घालणे, मध्ये स्थिरावणे, वीर्यादि अन्त: प्रविष्ट करणे या अर्थाने प्रयुक्त असल्याची कोशावरून कल्पना येते. म्हणजे अर्थ व बाह्य शरीर या दोन्ही दृष्टींनी हा शब्द सं. युज् शब्दापासून आल्याचे दिसते. परंतु मूलतः हा शब्द योक्तृ, योक्त्र असा दिसतो. ईराणी पष्तो आदीतही सं. य ध्वनीचा ज होतो; जसे युवान्, पष्तो ज्वान्. मागाहून या ज ध्वनीचा क झालेला दिसतो. एकूण सं. योक्त्र शब्दाची ही पष्तो प्रक्रिया आहे असे दिसते. व्युत्पत्ति ज्ञात नाही असे मोर्गन्स्टर्न याने म्हटलेले आहे. अशा रीतीने आपली सज़्नी-णी आणि कलत्र ही कैकेयी व गान्धारीप्रमाणे गान्धार देशातून आलेली आहेत.

वरील शब्दचर्चेबद्दल ही गोष्ट नमूद करणे आवश्यक वाटते की वरील शब्दांपैकी एकही शब्द ईराणी भाषेत रूढ नाही. या शब्दांची रूपे मूलतः पष्तो आहेत.

मराठीत काही शब्द या कालाच्या अगोदर प्रयुक्त होत होते हे वरती आलेलेच आहे. म्हणजे काही सम्पर्क, मुस्लिमांच्या भारतात व महाराष्ट्रात येण्यापूर्वीचा नक्की आहे; व काही मागाहूनचा आहे. मराठीतील जुन्या साहित्यातील अखिल शब्दांचा ससन्दर्भ कोश हाती आल्यानेच हे सहजतया सांगता येईल. मुद्याची बाब अशी की सर्व, निदान उत्तरेतील भारतीय भाषावर ईराणी मुसलमान व ईराणी भाषा यांच्या प्रभावांहून भिन्न असा परिणाम अफगाण लोक व पष्तो यांच्यामुळे आहे. याचा अधिक अभ्यास होणे इष्ट आहे.

पष्तो आणि पैशाची

भारताच्या प्राकृत, अपभ्रंशादि भाषांचा विचार करीत असतांना पैशाच-पैशाची भाषेचा उल्लेख अवश्यमेव होतो. भारतीय भाषाचिकित्सेतील पैशाची हा एक यक्षप्रश्न आहे. पैशाची भाषा ही प्राकृत भाषेची बोली मानण्यात येते. पैशाची भाषेचे मूळ क्षेत्र वायव्य भारतात होते असे डॉ. सुकुमार सेन आपल्या मध्य-आर्य भारतीय भाषांचे तौलनिक व्याकरण (इंग्रजी, पुणे, १९६०, पृ. २४) या ग्रंथात म्हणतात व लागलीच पुढे म्हणतात की हा प्रदेशच तिचे माहेरघर आहे असे म्हणता येणार नाही; का की पैशाची केंद्रीय भारतासारख्या अन्य प्रदेशातही बोलली जात होती. या पैशाचीचे नक्की रूप काय होते हे तिचे लिखित साहित्य उपलब्ध नसल्याने सांगता येत नाही. परंतु अनेक प्राकृत वैयाकरणांनी पैशाचीचा उल्लेख केलेला आहे, या पैशाचीच्या सुद्धा पोटभाषा, किंवा बोली त्यांनी सांगितलेल्या आहेत. डॉ. सेन यांनी कैकेय पैशाची, शौरसेन पैशाची, पाञ्चाल पैशाची व चूलिका पैशाची अशा चार पोटभाषांचा उल्लेख केलेला आहे. याखेरीज शकारी नामक एका प्राकृत बोलीचाही उल्लेख आढळतो. शक शब्दावरून तिची कुळी कळते. पैशाची प्राकृताची विशेषत: एक दोनच वैशिष्टये आहेत. कैकेय आणि चूलिका पैशाचीत विशेष फरक नाही. या दोन्हींचा मुख्य विशेष हा की अन्य भारतीय भाषातील ग, ज, ड, द, आणि ब ध्वनींचे क, च, ट, त आणि प ध्वनींमध्ये अनुक्रमे रूपांतर होते. तसेच घ, झ, ढ, ध, भ या ध्वनींचे अनुक्रमें ख, छ, ठ, थ, फ रूपांतर होते. चूलिका पैशाचीत वरील नियम त वर्गाला लागत नाही. उदा. दामोदर, दुर्गा शब्दांचे पैशाची पर्याय तामोतर आणि तुक्का, तुळजा असे होतात. अर्थात हे कैकेय पैशाचीच्या नियमानुसार होते. पिशेलच्या प्राकृत व्याकरणात पैशाचीच्या नियमांची चर्चा आलेली आहे. तसेच डॉ. आदिनाथ उपाध्ये यांनी भाण्डारकर प्राच्य संस्थेच्या जर्नल, खण्ड २१ मध्ये (१९४०, पृ. १–३७) या विषयाची सांगोपांग चर्चा केलेली आहे. प्रस्तुत प्रसंगी मुख्य मुद्दा असा की पैशाची बोलीच्या उपरोक्त नियमाचा अमल पष्तो भाषेतील वा ईराणीतील काही बोलभाषात दिसून येतो. या घटनेकडे पाठकांचे लक्ष वेधावयाचे आहे.

ईराणी भाषेची पष्तो ही एक उपभाषा आहे. ईराणी आणि पष्तो या दोन्हीच्या आणखी पुष्कळ बोली आहेत. सर्वसाधारण जे ईराणी शब्द आढळतात त्याची निरनिराळ्या बोलीत वेगवेगळी रूपे होतात. वेगळेपणातून पैशाचीच्या वरील नियमांचा सुगावा कसकसा लागतो याचा तलाश येथे करावयाचा आहे. मोर्गन्स्टर्न याच्या पुस्तकाधारेच हे केलेले आहे.

ग > क

पृ. २६ वर गन्दल (अप्रिय होणे) शब्दाची चर्चा केलेली आहे. या शब्दाचे मूळ ईराणी गन्द (दुर्गंध) शब्दात आहे. हा संस्कृत गन्ध शब्दच होय. परंतु त्याचा यौगिक अर्थ अर्थात दुर्गंध अभिप्रेत आहे, या शब्दाचे सोगदी बोलीतील रूप आहे **गन्टाक्**. येथे मूळ शब्दातील किंवा अन्य बोलीतून आढळणाऱ्या शब्दरूप **गन्दग** शब्दातील **द** ध्वनीचा **ट** आणि ग ध्वनीचा **क** झालेला आहे. हा बदल पैशाची नियमाकडे अंगुलिनिर्देश करणारा आहे.

ज > च

सोगदी भाषेत अन्य बोलीतील **ज** ध्वनीचा **च** बनतो असे आढळून येते. पृ. ३० वरील (क्रमांक ५८) चर्चेत जन्-ए (त्यापासून) शब्दाचे सोगदी बोलीतील रूप चन् (पासून) असे आहे. पृ ३१ वर (क्रमांक ६०) जिनै, जन्, ज़ल् (लहान मुलगी) या शब्दाची चर्चा आहे. अवेस्तात हे रूप जैनी (स्त्री) असे आहे. हा शब्द संस्कृत कन्या शब्दापासून व्युत्पन्न आहे हे ट्रम्प् आदींनी सांगितले आहे. येथे पष्तोच्या बोली व प्रादेशिक वैशिष्टचे याला अनुसरून अनेक रूपे उध्दृत आहेत. त्यापैकी सोगदी बोलीतील रूप **इन्च्** असे आहे. अन्य बोलीत ही रूपे न्जल्, इन्जल, इन्जलइ (त्याचे अनेकवचन अन्जून), एन्जु, इन्जु अशी आहेत. परंतु सोग़दीतील रूप डोळयात भरण्यासारखे वेगळे आहे. पृ. ३२ (क. ३४१) वर **कलै** (ग्राम) शब्दाची चर्चा करतांना ग़ूजल आणि ग़्वोजल (Cowpen) शब्दांचा उल्लेख आहे. हे दोन्ही शब्द गोष्ठ या संस्कृत शब्दाचे पर्याय आहेत. त्यांचा अर्थ गोठा असा आहे. या शब्दाचे **शुग़नी** या ईराणी बोलीतील रूप **गे-चीद्** असे आहे. येथे **ज** ध्वनीचा **च** व **ल** ध्वनीचा **द** झालेला दिसून येतो. पृ. ३३ (क्र. ७३) वर कुंजल Sesamum शब्दाची चर्चा आहे. हा शब्द सं. कुञ्चित शब्दापासून व्युत्पन्न आहे. त्याचे ईराणी रूप कुंजद असे आहे. परंतु या ईराणी शब्दाचे बलोची बोलीतील रूप **कुंचीथ्** असे आहे. येथे **ज** ध्वनीचा **च** आणि **द** ध्वनीचा **थ** झाल्याचे आढळते. पृष्ठ ५२ वर (क १४५) न्मूंज शब्दाची चर्चा आहे. हा शब्द भारताला चिरपरिचित असलेल्या **नमाज़्** या ईराणी शब्दाचा सगोत्र व समार्थ आहे. न्माज़् हा शब्द संस्कृत नमस्, नमः या **शब्दाचा** ईराणी पर्याय आहे. या शब्दाचे रूप अफगाणिस्तानातील तिरा प्रदेशात न्मांच् असे होते. सोग़दी बोलीत ते न्मच् असे आहे

येथे ज ध्वनीचा च झालेला आढळतो. पृ. ६५ वर (क्र. ३६५) रव्-दल, रवम् to reap शब्दाचा विचार आहे. अफगणिस्तानातील बोलीतून याची रूपे रेबदल् रेबल्, रेबम्, रेबी, रेबे अशी होतात. परंतु तेच रूप सोगदी बोलीत रोप असे आढळते. येथे व ध्वनीचे रूपान्तर प मध्ये झालेले आहे. पृ. ५७ वर (क्र. १६८) पष्तो पिंज़, ईराणीं पंज् आणि सं. पञ्च शब्दाचा विचार आहे. पाच (हो! मराठीने अनुस्वाराचे उच्चाटन केलेले आहे!) अफगाणिस्तानातील पष्तो आणि पख्तो विभागांतील बहुतेक सर्व बोलीत, शब्दाचा उच्चार पिंज़ किंवा पिंज असा आहे. परंतु शुगणी बोलित मात्र हा उच्चार पींच् असा आहे. येथेही ज ध्वनीचे च मध्ये रूपान्तर झालेले आहे.

पष्तो भाषेत पैशाचीच्या उपरोक्त विशेष नियमाच्या खाणाखुणा कश मिळतात हे किंचितसे दर्शन आपणाला वरील चर्चेवरून झाले आहे. भारतीय व्याकरणाच्या भाषेत, प्रत्येक वर्गाच्या मृदु व्यंजनांच्या जागी त्याच वर्गातील कठोर व्यंजने पैशाचीच्या वरील नियमात येतात. हीच प्रक्रिया आपणाला पष्तो भाषेंच्या काही बोलीत-बलोचीत दिसून येते. तसेच ईराणी बोली सोगदी आणि शुगणी यातही ही प्रक्रिया दिसून येते. या तीन बोलींपैकी सोगदी बोली अत्यंत महत्त्वाची आहे. एक प्रकारे बुद्ध साहित्यात जसे पाली भाषेला महत्त्व, तसे शक या अत्यंत-बुद्धाइतक्या, प्राचीन ईराणी लोकांच्या इतिहासात, सोगदी भाषेला आहे. हर्झफेल्ड यांच्या मते (Arclaeological survay of India, Memoir No. 34, 1928, by Herzfeld) या शक जमातीची मातृभूमी सोग्द देशात होती. सोग्द हा Transoxonia असून अरबांनी या संज्ञेचे भाषान्तर मावराऊन्नहर असे केले. हेच शक लोक इ. स. पूर्व दीडदोनशे वर्षापासून भारताच्या वायव्य दिशेस वावरत होते. या शक लोकांच्या मायभूमीत, सोगदी बोलीत पैशाची भाषेच्या प्रमुख नियमाचा माग निघावा हा केवळ योगायोग मुळीच नाही. वरील प्रतिपादनात काही हशील असल्यास, ही गोष्ट समोर येते की, शकप्रमुख अफगान-पठाण-रोहिले लोकांनी प्राचीन भारतीय प्राकृत ज्या प्रकारे वापरली तिचे नांव पैशाची होय. पैशाची बोलणारे लोक शकप्रमुख अफगाण होते. हे एकदा मानल्यावर वायव्य भारतात पैशाचीची मायभूमी होती, याचाही उलगडा होतो. कारण हाच भाग अफगाणिस्थानला सलग आहे. एवढेच नव्हे सेन्ट्रल इण्डिया-मध्यवर्ती भारतातही ती बोलली जात होती. यामुळे एरण या प्राचीन शक राजाच्या राजधानीकडे दृष्टी वळते. तेथे औलिकर या राजवंशाचे राज्य शक ४५७ पर्यंत चालू होते. हेमचन्द्राने उल्लेखिलेल्या चूलिका पैशाचीचा पदर लागतो. गिरनार येथे रुद्रदामन् याचा वंश दोनतीनशे वर्षे राज्य हाकीत होता. शक लोकांचे महाराष्ट्राशी नाते सातवाहन कालीन आहे. या शकांच्या सातवाहन राजकुलात सोयरिका झालेल्या होत्या. सात-वाहन नरेशांनी शकप्रभावद्योतक हकुसिरि (शकश्री), खदपालित (क्षत्रपालित)

अशी स्वनामे धारण केलेली होती. गुणाढ्याने पैशाची भाषेत बृहत्कथा लिहिली हेही मोठे लक्ष्य आहे. सातवाहन राजवाड्यात प्राकृतचा प्रभाव होता. राऊळातील एक राणी शुद्ध संस्कृत बोलते. शकांनी संस्कृत भाषा राजकाजासाठी स्वीकारली हे विद्वन्मान्यच आहे. गुणाढ्याचे सातवाहन दरबारात जमेनासे झाले तेव्हा तो विंध्य पर्वतापलीकडे गेला. विंध्यापलीकडील (दक्षिणेकडून) भागांत पैशाची भाषेचे थैमान होते अशी साक्ष महाकवि राजशेखराने (जीवित शक ८२२) काढलेली आहे.

पष्तो, पैशाची आणि मराठी या भाषांचे व त्या भाषा बोलणाऱ्या लोकांचे नाते उलगडून दाखवण्याचा वरती थोडासा प्रयत्न केलेला आहे. जेव्हा कालोल्लेखासहित राजकीय व्यक्ती व घटना यांचा इतिहास र्चाचता येत नाही, तेव्हा भाषाविज्ञानाचे साधन वापरणे–निदान प्राचीन इतिहासलेखनात, अत्यंत उपयुक्त व योग्य आहे असे मानण्यात येते. भारोपीय भाषा वैज्ञानिक अध्ययनातून प्रागैतिहासिक समाजाचे चित्र रेखाटण्यांकरिता असा प्रयत्न करण्यात येतो. पैशाची भाषा व ती वापरणारे लोक यांच्या अध्ययनात वरील तिन्ही भाषांचा अभ्यास उपयुक्त ठरेल असे वाटते. सिंधी, पंजाबी, राजस्थानी आदि भाषांच्या जुन्या स्वरूपाचा अभ्यासही या कामी उपकारक ठरेल.

आषाढ २७, १८९२.

(म. सा. पत्रिका, पुणे, क्र. १७४, शक १८९२.)

***

१८ : खोतन

खोतन हा छोटासा प्रदेश चिनी तुर्कस्थानात असून पश्चिम भारताच्या सम्यग् अभ्यासात या देशाची माहिती अत्यंत उपयुक्त नव्हे तर अत्यावश्यक आहे. जे महत्त्व वरील अभ्यासात सइस्तान, सजिस्तान, सगिस्थान, शकस्थान या अफगणिस्थानातील हलमंद-सरस्वती नदीच्या खोऱ्यातील देशाला प्राप्त आहे, नक्की तशाच प्रकारचे स्थान प्राचीन खोतन देशाच्या अभ्यासाला मिळावयास पाहिजे. परंतु आधुनिक संशोधनाने उजेडात आलेली सर्व माहिती अद्यापि मराठी भाषेत आलेली नाही. पश्चिम भारतात शक जमातीने चारपाचशे वर्षे छोटी मोठी राज्ये चालविली. परंतु कुशाणवंशीय कनिष्क व त्याचे राजघराणे जरी शक जमातीपैकीच असले तरी ते सइस्तानातील शकांपैकी नव्हते. खोतन देशात शकांचे राज्य फार प्राचीन कालापासून होते. इ. सनाच्या दुसऱ्या शतकात ते अस्तित्वात असल्याचे आढळते. खोतनमधील शक जमातीचे खरे महत्त्व त्यांनी स्वीकारलेल्या व जोपासलेल्या बौद्धधर्मात आहे. इ. सनाच्या दुसऱ्यातिसऱ्या शतकापासून दहाव्या शतकात शक मुसलमान बनेंपर्यंत त्यांची बुद्धभक्ति चालू होती. या अनुषंगाने शक व खोतन देशाने आपल्या शक भाषेत, संस्कृतमधील बौद्धसाहित्याचा अनुवाद मोठ्या प्रमाणात केला. परिणामरूपाने शकभाषा साहित्यस्वामिनी बनली. या शकभाषेतील बौद्ध-साहित्य आता प्रकाशात आले आहे. शकभाषेचा भाषावैज्ञानिक अभ्यासही आताशा होत आलेला आहे. भारताच्या व महाराष्ट्राच्या इतिहाससंस्कृती अभ्यासात या भाषेला महत्त्वाचे स्थान द्यावे लागेल असे दिसून येते. पैशाची भाषा ही प्राकृत भाषेची एक बोली आहे. तिची काही भाषिक वैशिष्टये आहेत. ही पैशाची भाषा बोलणारे लोक कोण यासंबंधी आधुनिकतम भारतीय इतिहासज्ञ मूक आहेत. अद्यापी निर्णयात्मक मत स्थिर झालेले नाही. पैशाची प्राकृतची वैशिष्टये पश्तो-पख्तो भाषेत आढळतात हे आम्ही एका लेखात मांडलेले आहे. तो लेख प्रकाशात येत आहे. पैशाचीची तीच वैशिष्टये खोतनमधील शकभाषेत प्राप्त आहेत. हे आम्ही दुसऱ्या स्वतंत्र लेखात मांडणार आहोत. येथे फक्त खोतन देश व तेथील शकांची सत्ता, तेथील त्यांचा प्रपंच यांचीच चर्चा करावयाची आहे.

शक लोक हे आर्यवंशीय होत. त्यांची भाषा आर्यभाषा गटातील असून, ईराणी या प्रमुख भाषागटात तिचा समावेश होतो. आमू दर्या (आक्सस नदी, सं. वंक्षु) आणि जक्सार्तस या नद्यांच्या दरम्यान असलेल्या प्रदेशास सोगदिया असे नाव आहे. यालाच संस्कृत साहित्यात चूलिक, सूलिक असे म्हणण्यात येते. ग्रीक लोकांनी याला ट्रान्सॉक्झियाना असे म्हटले, तर अरब लोकांनी याच नावाचा

अरबी अनुवाद करून मावराऊन्नहर असे नाव दिले. सोगदियन किंवा सोग्दभाषा
ईराणी भाषाकुलातील एक प्रमुख भाषा होय. शक जमातीचे मूलस्थान शोधण्याच्या
कामी या सोगदिया देशाचा मोठा उपयोग आहे. शक गणाच्या मूलस्थानाचा
मागोवा ईराणी सम्राट दायरवहू (ईराणी-दार्यूश दारा, दाराब, दारयाव, ग्रीक-
दारियस) याच्या इ. सनपूर्व ५१६ मधील हमदान (प्राचीन एकबटना) येथील
शिलालेखावरून घेता येतो. या प्रश्नाची छाननी ई. हर्झफेल्ड याने इ. १९२८ मध्ये
आर्कियालॉजिकल सर्वे ऑफ इण्डिया या मालेतील क्रमांक ३४ च्या मेमॉयर मध्ये
केलेली आहे. या लेखात दारयवहू याने **पर-सुग्द** वसलेल्या सक लोकापासून राज्य
मिळविले असे म्हटलेले आहे. सुग्द म्हणजे सोगदिया देश होय. शक लोक हे पर-सुग्द
म्हणजे सोगदिया देशाच्या परा म्हणजे पलीकडे राहाणारे होते असे लेखात
म्हटलेले आहे. हर्झफेल्ड यांनी हा प्रदेश जक्सार्स (सयर, सं रंहस्) नदीच्या
पलीकडील आहे असे प्रतिपादिले आहे. ताश्कंद शहर या प्रदेशाच्या मध्यवर्ती आदे
असे म्हटलेले आहे. या परा-सुग्द प्रदेशाला त्यांनी ट्रान्स-जक्सार्सस असे नाव दिले
आहे. खोकन्द आणि उजकंद ही नगरे या प्रदेशाच्या उत्तरभागी आहेत. या
प्रदेशाला फ़रग़ान असे नाव अरबांनी दिलेले आहे. त्याचे तत्पूर्व नाव परकान होते
याच अर्थ असा की इ. सन ५१६ च्या सुमारास सूलिक-चूलिक लोक बुखारा व
समरकंद असलेल्या सोगदिया प्रदेशात वसत असत, आणि परकान, फरकान या
देशात शक गणाचे वास्तव्य व राजकीय वर्चस्व होते. या दोन्ही आर्यगणाचे उल्लेख
भारतीय साहित्यात सापडतात. भारतात शकांची सत्ता पाचसहाशे वर्षे कमी अधिक
प्रमाणात चालत होती, तर सोगदियाच्या सम्पर्कामुळे पैशाची प्राकृताची एक
उपबोली चूलिका पैशाची म्हणून ज्ञात आहे. मार्कण्डेय पुराणात (अध्याय ५७
श्लोक ४० व ४२) या दोन्ही गणांचा उल्लेख सापडतो.

जगाच्या संस्कृतींचा अभ्यास करण्यात कोणती राष्ट्रे अग्रेसर आहेत याचा
विचार केला तर भारतीयात ज्ञानलालसा व त्यासाठी करावे लागणारे राष्ट्रीय
पातळीवरील प्रयत्न यांचा सम्पूर्ण अभाव दिसून येतो. कोणत्याही अन्य संस्कृतीचा
अभ्यास करण्याचे श्रेय भारताला कोठेच आजपर्यंत मिळालेले नाही. याची अनेक
उदाहरणे देता येतील. खोतनमधील शकांची संस्कृति समजून घेण्यात योगायोगानेच
भारताचा हातभार लागलेला आहे. परंतु याचे श्रेय भारतीय राष्ट्राला देता येणार
नाही, ते श्रेय काहीशा दूरदर्शी येथील ब्रिटिश शासकांना द्यावे लागेल. स्वातन्त्र्योत्तर
कालात भारताने एखादीही मोहीम घेतलेली नाही यावरून भारतीय अनास्था
दिसून येते. ईराण, अफगाणिस्थान, सोगदिया, खोतन इत्यादी देशांच्या इतिहासा-
ध्ययनात तर भारताचे उपरणे अडकलेले आहे. भारतीय पुरातत्त्व विभागातील
एक तज्ज्ञ आरेल स्टाइन यांना भारत शासनाने मध्य-आशियातील व विशेषत:
खोतनमधील पुरावशेषांच्या अध्ययनासाठी पाठविले. त्यांनी आपला वृत्तांत प्राचीन

खोतन या द्विखण्डात्मक ग्रंथात वर्णिला आहे. (इ. स. १९०७) पहिल्या भागात सविस्तर वृत्तांत असून दुसऱ्या भागात चित्रे, नकाशा व छायाचित्रे दिलेली आहेत- खोतन देश व त्याच्या संलग्न प्रदेशाच्या नकाशात हा प्रदेश अक्षांश ३५° ३०′ ते ३८° ३०° उत्तर आणि रेखांश ७८° ३०° ते ८४° पूर्व, असा वसलेला आहे. तो कशगरच्या आग्नेयेस पडतो. या प्रदेशाचे मुख्य ठिकाण वा राजधानी खोतन हे नगर होय. ते युरुंगकाश या नदीच्या उजव्या तीरावर वसलेले असून त्याचे अक्षांश-रेखांश ३७° १०° व ८०° ५° असे आहेत. म्हणजे खोतन शहर जबलपूरच्या नीट उत्तरेस आणि ईराणातील मशहद व नैशापूर यांच्या नीट पूर्वेला वसलेले आहे. खोतन शहर हे खोतन देशाच्या मध्यवर्ती आहे. खोतन देशाचा पाणलोट दक्षिणे-कडून उत्तरेकडे आहे, म्हणून नद्या उत्तरवाहिनी आहेत. खोतन प्रदेशात मुख्यतः तीन नद्या आहेत. पश्चिमेकडील नदी करकाश, मध्यातील युरुंगकाश (युरुंकाश) आणि पूर्वेकडील चीर नदी होय. आणखीही पूर्वेकडे एक छोटीशी केरिय नदी आहेः युरुंगकाश नदी २३,०७० फूट उंच असलेल्या पर्वतश्रेणीतून उगम पावते. करकाश ही १८,८५० फूट उंचीवरून उगम पावते. चीर आणि केरिय नद्यांची उगमस्थाने कमी उंच आहेत. उंच प्रदेशातील उपनद्यांसाठी खोतन देशात जिल्ग हा नदीअर्थी शब्द वापरलेला दिसून येतो. तो ऋग्वेद कालीन रंहस् म्हणजे नदी या शब्दापासून व्युत्पन्न दिसतो. कारण होल्गा, ऱ्हाईन, ऱ्होन इत्यादी नदीनामे या रंहस् शब्दा-पासूनच व्युत्पन्न आहेत. सखल प्रदेशातील करकाश नदीवरील करकाश नगर, युरुंग-काश नदीवरील खोतन, चीर नदीवरील सरीग आणि केरिय नदीवरील केरिय ही नगरे समुद्र सपाटीपासून सामान्यतः चार साडेचार हजार फूट उंचीवर आहेत. या सगळ्या नद्यांचे आणखी एक भौगोलिक वैशिष्टच हे की बहुतेक नद्या कोणत्याही समुद्रगामी नदीला व समुद्राला मिळत नाहीत. फक्त करकाश आणि युरुंगकाश या मोठ्या नद्या तारीम नदीला मिळतात. म्हणजे या नद्या सखल प्रदेशात लुप्त होतात. ही या प्रदेशाची विशिष्ट भू-रचना होय. हेच वैशिष्टच आपणाला ईराण, अफगाणिस्थान, बलोचिस्थान व पामीरच्या उत्तरेकडील सलग प्रदेशात दिसून येते. वरील सर्व देशात अशा अनेक नद्या आहेत. वस्तुतः तिहरान या ईराणच्या राजधानी-पासून दक्षिणेस रेघ मारली तर पूर्वेकडील बहुतेक नद्या वाळवंटात लुप्त होणाऱ्याच आहेत. अफगाणिस्थानातील हरीरूद, हलमंद, अद्रशकंद (हारूद), खाश आदि नद्या वाळवंटात लुप्त होणाऱ्या आहेत. पहिली मर्वच्या व शेवटच्या तीन हलमंद हामून नावाच्या अशा वाळवंटात लुप्त होतात. अशा ठिकाणाला पूर्व ईराण, अफगाणिस्थान व बलोचिस्थान देशात हामून म्हणतात. बलोचिस्थानची माशकेल नदी हामून-ई-माशकेल मध्ये लुप्त होते. खोतन प्रदेशात असेच हामून आहेत. परंतु अशा भागाला तेथे हामून हा शब्द प्रयुक्त होत नाही. समुद्राला न मिळणाऱ्या व मार्गातच लुप्त होणाऱ्या सरस्वती नदीला मार्कण्डेय पुराणात प्रतिलोमा सरस्वती

असे म्हटले आहे. अर्थात खोतनमधील उपरोक्त नद्याही प्रतिलोम नद्या होत. सरस्वती नदी कुमारी असल्याचा संकेत भारतात रूढ आहे. उत्तर गुजरातेत अशी एक कुमारी सरस्वती नदी आढळते. खोतनमधील नद्यांना उंच पर्वतश्रेणीतील बर्फ वितळण्यामुळे पाणी-पुरवठा होतो. म्हणून या नद्यांना उन्हाळ्यात पूर येतो.

खोतन शब्दाची व्युत्पत्तिही पाहाण्यासारखी आहे. तिसऱ्या-चौथ्या शतकात खोतन हे नाम रूढ होते असे आढळते. निरनिराळ्या प्रत्नलेखात खोतन हा देश-वाची शब्द वापरलेला आहे. या शब्दाचे प्राचीन रूप ह्वतिन, ह्वतन असलेले शक भाषेत आढळून येते. तसेच गौस्तन व गास्तन ही रूपेही आढळतात. डॉ. एच्. डब्ल्यू. बेली याने आपल्या इण्डो-सिथियन स्टडीज खण्ड ६, लंडन १९६७, पान ४३१ वर या शब्दाची चिकित्सा केलेली आहे. या शब्दाचे भाववाचक नाम वा विशेषण ह्वतिनि असे आहे. बेली याने असेही प्रतिपादिले आहे की, ह्वनौ संज्ञे-वरून खोतनी भाषेचा बोध होतो. तसेच ह्वतनौ हा शब्दही खोतनी या अर्थाने वावरतो. ही रूपे ह्वनि, हूवंनि अशी आढळतात. खोतन राष्ट्र यासाठीं या भाषेत ह्वतन-क्षीर हा प्रयोग वावरतो. क्षीर हा शब्द शहर या शब्दाचा भाऊबंद आहे. ईराणी शहर व क्षीर हे शब्द संस्कृत क्षत्र शब्दाचे सगोत्र व समानार्थ पर्याय होत. ईरान-शहर म्हणजे ईराणी राष्ट्र हा प्रयोग आजही रूढ आहे. खोतनी भाषेत ह्वतिन-क्षीरु, ह्वनि-क्षीर, हूवन्य-क्षीर आदि संज्ञावरून खोतनी राष्ट्र वा देश असा बोध होतो. तिबेटी भाषेत ह्वतन शब्दाची रूपे हु-तेन, हु-देन, हु-थेन, य्वुथेन अशी आढळतात. ईराणी भाषेत खुतन असा शब्द (शक ९०४) रूढ आहे. लॅटिन मध्ये तो कोतन असा आढळतो. डॉ. हर्ज़फेल्ड (पैकुली क्र. ५२८, पृ. २०५) याने पहलवी उच्चार क्वश्दन, ऋश्दन असा देऊन खोतन शब्दाची चर्चा केली आहे. हुएन च्वंग याचे उध्दृत रूप कु-श-तन याचा उल्लेख केला आहे. हा उल्लेख इ. स. २९४ च्या सुमाराचा होय.

या शब्दाची व्युत्पत्ति डॉ. बेली याने दिलेली नाही. परंतु खुरासान आणि ख़्वारिज़्म या शब्दांची व्युत्पत्ति पाहिल्यानंतर खोतन शब्दाच्या व्युत्पत्तिचा संकेत होतो. खुरासान शब्द स्वर् आणि स्थान याच्या समासाने बनलेला असून त्याचा मूळ अर्थ प्रकाशित प्रदेश किंवा पूर्व दिशा, पूर्व दिशेचा प्रदेश असा दिलेला आहे. प्राचीन स्वर् शब्दाचा अर्थ सूर्य असा आहे. त्यावरून खुरासान शब्दाचा अर्थाचा संकेत मिळतो. ख़्वारिज़्म हा शब्द (मध्य आशिया–रशियातील इतिहासप्रसिद्ध शहर) डॉ. हर्जफेल्ड याने, आपल्या पैकुली (इ. १९२४) ग्रंथात (पृ. १८७) चर्चिला आहे. शिलालेखात ख़्वारिज़्म शब्दाचे शक २१६ मधील रूप ख़्वारज़्म–ख़्वारस्म असे आहे. या शब्दाचा अर्थ त्याने विपुल खाद्य असलेली भूमी असा केलेला आहे. या शब्दाचे प्राचीन पार्सी भाषेतील रूप ह्वारज्म, एलमाइट भाषेतील वरस्मिय, आणि पहलवी रूप ख़्वारज़्म असे आहे. ख़्वारिज़्म हे आधुनिक ईराणी रूप होय. खुरासान

व ख्वारज्म या दोन्ही शब्दात सं. स्वर् शब्द आहे. खोतन शब्दाच्या प्राचीन रूपातही हा सं. स्वर् म्हणजे सूर्य हा शब्द निश्चितपणे आढळतो. या तिन्ही शब्दात स्वर् शब्दाच्या वास्तव्यामुळे ही तिन्ही देशनामे उगवत्या सूर्याची आठवण करून देतात. भारतातील प्राग्जोतिषपूर चिरपरिचितच आहे. ही आर्यांची नामधारणपद्धति होय.

खोतनी शक जमातीच्या इतिहासाची साधने शक भाषेतील आणि खरोष्ठी लिपीतील साहित्य, ब्राह्मी आणि खरोष्ठी लिपीत लिहिलेले प्राकृत भाषेत अनुवादित ग्रंथ, आणि तिबेटी व चिनी भाषेतील साहित्य, तसेच खोतन देशात क्रौरन (म्हणजे लौलन) आदि ठिकाणी, काही कागदावर व काही लाकडावर लिहिलेले प्रत्नलेख होत. त्यांची लिपी खरोष्ठी व भाषा वायव्य प्राकृत होय. शक लोक या प्रदेशात केव्हां पोचले होते हे कळत नाही; परंतु इसवीपूर्व पहिल्या शतकाच्या आरंभी शकांचे चीनशी संबंध आल्याची नोंद सापडते. हान राजवंशकाली खोतनची जनसंख्या साधारणपणे वीस हजार होती व त्यापैकी अडीच हजार सैनिक होते, ही माहिती मिळते. इ. स. च्या पहिल्या शतकात शकांच्या राज्यावर कशगर राज्यातून गंडांतर आले. पण ते लवकरच टळले. तेव्हापासून शकांचे राज्य साधारणपणे टिकून राहिले. हे स्वातंत्र्य इस्लामी आक्रमणापर्यंत टिकून होते. शक ९०० चे सुमारास तेथे इस्लामी सत्ता स्थापन झाली. शकांच्या राज्याला हूण, तुर्क, सुपीय या भटक्या लोकांच्या आक्रमणाची भीति होती. शिवाय शेजारील चीन व तिबेट या प्रबल सत्तांची धास्ती होतीच. इ. सनाच्या पाचव्या शतकात उत्तरेतील भटक्या टोळ्यांनी शक लोकांना हैराण केले. शक ४२४ आणि ४७२ च्या दरम्यान खोतन-वर हूण लोकांची सत्ता राहिली. या पुढील शतकात खोतनमध्ये चिनी साम्राज्याचे वर्चस्व आले. शक ७१२ मध्ये शक लोकांनी चिनी वर्चस्व झुगारून दिले. परंतु पुढे लौकरच खोतनमध्ये तिबेटचे वर्चस्व आले. शेवटी कशगरहून इस्लामी सत्ता आली.

खोतनी समाजात प्रमुख सांस्कृतीक प्रभाव ईराणी आहे. शकांची भाषा ही ईराणवंशीय आर्यभाषा असून खोतनी समाजाने तिला ह्वतनि किंवा खोतनी भाषा असे नाव दिलेले आहे. चिनी, तिबेटी व तुर्की प्रभावही डोकावतो. परंतु भारतीय प्रभाव मात्र मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. येथील राजाला मोठमोठ्या पदव्या लावलेल्या आढळतात. महरय रयतिरय म्हणजे महाराज राजातिराज अशी उपाधि राजाला लावल्याचे प्रत्नलेखांवरून दिसते. शक राज्यातील प्रमुख सेनापतीला हिनज्ञ असे म्हणत. ही पदवी भारतातील शकांच्या प्रत्नलेखात आढळते. आज्रिस व अस्पवर्म यांच्या लेखात ती पहावयास मिळते. भारतीय देव शब्दाचे खोतनी भाषेत धेव असे रूप आढळते. शाहानशाहि ही ईराणीतील सम्राटांची उपाधि. तीतील शाहान हा शब्द ख्शायथियानाम् अर्थात् क्षत्रियाणाम् या विभक्तीचे शेष रूप आहे. म्हणजे शाहान शब्दामधील न हा षष्ठीचा प्रत्यय होय. खोतनी भाषेत राजन्

शब्दाचे रूप रान्द असे होते. यावरून सम्राटासाठी शक लोकांनी रान्दान रान्द असा सम्राटवाचक शब्द बनविलेला आहे. तसेच ज़स्त (अवेस्ता यस्त व सं. यज्) शब्दावरून ज़स्तान ज़स्त म्हणजें सम्राट् होय. श्री वीजीत संग्राम या राजाला चक्रवर्तीन रान्दान शिरा असे म्हटले आहे.

शकांच्या भाषेत राजा शब्दासाठी षौ हा शब्दही रूढ आहे. डॉ. बेली आदि विद्वानांच्या मते हा शब्द वैदिक क्षु-धातूपासून व्युत्पन्न असून त्यापासून सोगदी भाषेत क्षावन् म्हणजे राज्यसत्ता असा शब्द रूढ आहे. या शब्दापासून षौ हा शब्द व्युत्पन्न आहे. या शब्दापासून बनलेली शौननौ शौ अशी सम्राटवाचक उपाधि कुषाण राजांच्या ग्रीक लिपीतील नाण्यांवर उट्टंकित दिसून येते. हा देखील शाहानशाह शब्दातल्या राजकीय व सांस्कृतिक परम्परेचा प्रभाव होय. याच शब्दाचे दुसरे रूप अन्यत्र रक्षजनो शौ म्हणजे राक्षसांचा राजा असे सापडते. शौ या शब्दाचा ईराणी शाह या शब्दाशी व्युत्पत्तिदृष्टचा काहीही संबंध नाही. अर्थ मात्र तोच आहे.

खोतनी शकभाषेत राजा शब्दासाठी रुन्द हा शब्दही रूढ आहे. या शब्दावरून रुन्दिनु रे म्हणजे राजांचा राजा अर्थात सम्राट् हा शब्द शक लोकांनी घडलेला आहे. यावरून दिसून येते की खोतनी शक-भाषेत शाह (क्षत्रिय शब्दापासून) शब्द मुळीच आलेला नाही. परंतु जेव्हा सहाव्या, सातव्या शतकात शक लोकांचे राज्य वायव्य भारतात स्थापन झाले तेव्हा त्यांनी शाहानुशाही ही ईराणी सम्राटांची प्राचीन उपाधि वापरलेली होती. याचा बोध सम्राट समुद्रगुप्त याच्या शिलालेखावरून व कालकाचार्य कथानकातील उल्लेखावरून स्पष्टपणे दिसून येतो. भैषज्यगुरुसूत्र या बौद्ध संस्कृत ग्रंथातही श्री देव साहि सुरेन्द्रविक्रमादित्यनन्द असे राजाचे नाव आढळते. येथे साहि शब्द लक्ष्य आहे. महामंत्र्यासाठी अमाच, अमाच्य अशी उपाधि शक वापरीत. हे अमात्य शब्दाचे प्राकृत रूप. युवराज हा यौवरायि होता. धार्मिक मठांच्या प्रमुखाला प्रमुख म्हणत. हा प्रमुख स्थविरापेक्षा श्रेष्ठ दर्जाचा होता. या प्रमुख शब्दाचे खोतनी रूप परमोग आणि तिबेटी रूप बरमग असे होते. हाच बरमक शब्द ईराणात अब्बासी खलिफांच्या एक वज़ीर बनलेल्या घराण्याचे उपनाम होते. इतिहासात हा बरमक प्रसिद्ध आहे. मुख्य सेनापतीसाठी हीनाज असा शब्द आहे. हा सेना (प्राचीन ईराणी हैना) आणि आज म्हणजे प्रमुख या शब्दांपासून बनलेला आहे.

खोतन देशातील राजघराण्याचे नांव विश असे होते. राजांची नावे विश सबभ (विश संभव), विश शूर, विश दर्म (धर्म), विश वाहम्, विश संग्राम, विश कीर्ति आदि अशी आढळतात. बिजय नंद, बिजय जय, बिजय सिंह अशीही नावे आहेत. खोतनी जीवनात ग्रीक प्रभावही डोकावतो. त्याचे विशेष अवशेष उपलब्ध नसले तरी शकभाषेत तिनार (ईराणी दीनार, ग्रीक देनारियस, भारतीय

दीनार) आणि सतीर, मागाहून सेर (औषधी मापण्याचे माप) हे दोन शब्द त्या प्रभावाचे प्रतीक रूप आहेत. हे शब्द भारतातही आहेतच.

शक लोकांचा धर्म बौद्ध होता. पूजेसाठी ज़ज़्, ज़स्न, ज़स्त (ईराणी अवेस्ता यज़्, प्राचीन ईराणी यद्, संस्कृत यज्, यज्ञ) शब्द वापरण्यात येत. दुष्टशक्ती-साठी द्युव (प्रा. ईराणी दैव, अवे. दएव, आजची ईराणी देव) हा शब्द रूढ होता. बौद्ध साहित्यातील श्री ही वैभव देवता **सन्द्रामत** म्हणून ओळखली जाई हा शब्द अवेस्ता स्पेन्त आर्मैतिश् या शब्दाचा अपभ्रंश असून ही पृथ्वीदेवता होय. भारतीय, ' लोक ' शब्दासाठी शक लोक **ज़म-सन्दै** हा शब्द वापरीत. ज़म हा शब्द क्षमा, क्ष्मा, ज्मा या पृथ्वी अर्थी असलेल्या शब्दाचे प्राकृत रूप आहे. खोतनी भाषेतील बल्ज आणि तुमशुक या खोतनी बोलीतील बार्स या शब्दांचा अर्थ दैवी अर्थात् गौतम बुद्ध असा आहे. तुमशुक बार्स शब्दाचे षष्ठीचे अनेकवचन बार्ज्येनु असे असून हा संस्कृत ब्रह्मन् शब्दापासून व्युत्पन्न आहे. बौद्धधर्माची शिकवण व शिस्त यासाठी दात (कायदा, विधि या अर्थी) शब्द प्रयुक्त होई. आचार्य शब्दाचे खोतनी रूप आशिरी असे होते. उपाध्यायाचा वाजा (गुजराती ओझा) असा अवतार झालेला होता.

बौद्धधर्मीयांनी खोतनी भाषेत विपुल ग्रंथरचना (अनुवादित) केलेली आहे. खोतन देशात संस्कृतज्ञ आचार्यही असत. वेद्यशील या आचार्याचे जातकस्तव हे स्तोत्र याचे उदाहरण म्हणून सांगता येईल. या स्तवाचा खोतनीत अनुवादही झालेला होता. धम्मपद ग्रंथाचा वायव्य प्राकृत भाषेत व खरोष्ठी लिपीत अवतरलेला काही भाग उपलब्ध आहे. कर्मवाचना ग्रंथाचा काही भाग तुमशुक बोलीत अनुवादित आहे. सिद्धसार, सुवर्णभाससूत्र, भद्र चर्यादेशना, वज्रच्छेदिका, अपरिमितायु-सूत्र, प्रज्ञापारमिता (कनिष्काची दंतकथा), अशोक व सुधन यांचे अवदान, सुमुख-सूत्र, अवलोकितेश्वरसूत्र, भैषज्यगुरुवैडूर्यसूत्र, शूरंगमसमाधिसूत्र, संघाटसूत्र, सद्धर्म-पुण्डरीकस्तोत्र, वज्रायन आदि संस्कृत ग्रंथाचे अनुवाद खोतनी या शकभाषेत उपलब्ध आहेत.

आशिरी (आचार्य), आशी (आर्य), साधु, षमनि (श्रमण), बिलसंग (भिक्षुसंघ), उवजंब, वजब (उपसंभव), दाता (धातु), लोव (लोक), जान (ध्यान) नालै, नौले (नाटक), जायशाष्टअ (प्रहाणशाला) इत्यादी पारिभाषिक संज्ञा खोतनी भाषेने वायव्य प्राकृतातून आत्मसात केलेल्या आहेत. खोतनी साहित्यावरून असे दिसून येते की बौद्धधर्माच्या महासांघिक पंथाचे १६ विहार खोतन देशात होते. यावरून असे दिसते की या माध्यमाने तेथे प्राकृत भाषेचा शिरकाव झाला. वायव्य-भारतातील प्राकृत प्रत्नलेखांतून या पंथाचे अनेक उल्लेख आढळतात. सर्वास्तिवाद-पंथ खोतन देशात मागाहून पोंचला. या पंथाने संस्कृत भाषेचा अवलंब केलेला होता. या खोतनी साहित्यावरून खोतन नगरात नाटकाचे प्रयोग होत, असे आढळते

खोतनी भाषेतील नोले अथवा नालै (प्राकृत नाडग शब्दापासून व्युत्पन्न, सं. नाटक) या शब्दांवरून ही गोष्ट कळते. तसेच जुन्या प्राकृत व संस्कृत भाषेत लिहिल्या गेलेल्या काही नाटकांचे अवशेष सापडलेले आहेत. भारतीयांनी सर्वप्रथम निर्माण केलेली ती हीच नाटके होत. खोतनी भाषेत मात्र नाटक ग्रथांचे असे अवशेष मिळालेले नाहीत. खोतनी साहित्यकांनी बहुधा अनुवादच केलेले असले तरी त्यांनी स्वतंत्र साहित्यनिर्मिति केल्याचेही दिसून येते. त्यांनी ऐहिक जीवनावर स्फुट काव्ये लिहिलेली आढळतात.

खोतन नगर हे बुद्धधर्माचे मोठे पीठ होते. त्सु-कु-किग-संग हा चिनी विद्वान खोतन येथे ध्यानसाधनेच्या अधिक अभ्यासासाठी आलेला होता. खोतनी धर्मपंडित देखील प्रचारकार्यार्थ चीन देशात जात. या पंडिताची नावे मात्र निव्वळ संस्कृतमय आढळतात. देवप्रज्ञ, गीतमीत्र, शिक्षानन्द, मोक्षल, शीलधर्म आदि काही पंडित चीनमध्ये गेलेले होते. त्यांनी बौद्धग्रंथाची चिनी भाषेत भाषान्तरे केलेली आहेत. ती आजही उपलब्ध आहेत.

इ. सनाच्या सातव्या शतकात विश ईरसंग नांवाचा बौद्ध विषयांची चित्रे काढणारा प्रसिद्ध चित्रकार होता. त्याची बोधिसत्व मैत्रेय, अवलोकितेश्वर आदींची चित्रे चीनच्या सम्राटाच्या चित्रशाळेत ठेवलेली होती. देवराज या राजाचे त्याने काढलेले चित्र आजदेखील उपलब्ध आहे. तो उच्च कुलातला असून चीनमध्ये त्याचा बहुमान झालेला होता.

या लेखातील खोतनी जीवनाची व इतिहासाची माहिती डॉ. बेली याच्या इण्डोसिथियन स्टडीज खण्ड चारमधून घेण्यात आलेली आहे. बेली यांनी आपल्या प्रस्तावनेचा शेवट पुढील महत्त्वाची मते नोंदवून केलेला आहे. ते बेली यांचेच प्रतिपादन आहे. खोतन देशात शक लोक फार मोठ्या संख्येने असलेले दिसून येते. त्यांच्या भाषेच्या अध्ययनावरून असे आढळते की भारतातील शक गणांच्या भाषेशी खोतनी भाषेचे अगदी जवळचे नाते आहे. खोतनी आणि भारतीय शकांच्या भाषेत होर (देणगी) हा अवेस्ता फ़ वर शब्दापासून व्युत्पन्न शब्द दिसून येतो. या शब्दावरून शकांची भारतीय भाषा व तुमशुक बोली ही किती जवळून सम्बद्ध आहेत हे पाहाता येते. या बोलीत देणे, देणगी या अर्थी रोर-धातु असून तो फ़ या मुळावरून निघाला व त्याचेच पुढे ह ध्वनीत रूपांतर झाले असे आढळते. हेच रूप खोतनी व भारतीय शकांच्या भाषेत आढळते. काही फरक असले तरी खोतनी आणि शकांची तुमशुक भाषा यात मोठे साम्य वसत आहे हे दिसून येते. चिनी इतिहासग्रंथात अशी नोंद मिळते की कशगर प्रदेशातून शक गणांच्या टोळ्या पश्चिमेकडे पसरल्या. त्यांच्यापैकी एक गट इ. सनपूर्व दुसऱ्या शतकाआधी खोतन मध्ये येऊन स्थिरावला व दुसऱ्या गटाने तुमशुक तेथे वसती केली. या दोन्ही गटांनी या ठिकाणी आपली राज्ये स्थापन केली असे दिसून येते. खोतनी भाषेशी पामीर

प्रदेशातील सरीकोली भाषेचे मोठे साम्य आहे. खोतनी नष्फाज (बाहेर काढणे) हा शब्द सरीकोली या पष्तोच्या बोलीत मल्फोन् या रूपाने वावरतो. तसेच शेजारच्या वख़न प्रदेशातील वख़ी बोलीशी ख़ोतनी भाषेचे फारच साम्य आहे. श्यु ध्वनीचा त्याग करून त्या जागी शश् स्वीकारण्याचा नियम ख़ोतनी व वख़ी भाषात समान आहे. सं. अश्व आणि ईराणी अस्प शब्दाचे खोतनी रूप अश्श असे होते, तर ते वख़ी बोलीत यश् असे होते. लोखंडासाठी खोतनी भाषेत हिशम् शब्द असून वख़ी भाषेत ते रूप ईश्न् असे आहे. अशीच अनेक अन्य रूपे सापडतात. दोन्ही भाषांनी ईराणी -स्प रूपाचा त्याग केलेला आहे.

आपल्या प्रास्ताविकात खोतनी शकभाषेच्या महत्त्वाविषयी डॉ. बेली याने आपला असा अभिप्राय व्यक्त केला आहे. या संग्रहातील पाऊणशे उद्धरणाचे आशिया खण्डाच्या इतिहास अध्ययनात अत्यंत महत्त्व आहे. त्यामुळे या इतिहासात मोलाची भर पडलेली आहे. भारतात शक गणांनी चार शतके राज्ये चालविली आहेत; परंतु त्यांचा इतिहास अजून अंधारात चाचपडतो आहे. या साधनसामुग्रीमुळे भारताच्या इतिहासकाराला शक इतिहासाकडे अधिक जवळून पाहाता येईल. कुषाण सत्तेचा इतिहास हाताळतांना ही सामुग्री पाहिल्याशिवाय कोणालाही आता पाऊल टाकता येणार नाही. मध्य आशियाच्या इतिहासातील, चिनी इतिहासकारांना महत्त्वाचे वाटले नाहीत असे अनेक स्थानिक तपशील आता उपलब्ध झालेले आहेत. ज्यांना रानटी म्हणून आतापर्यंत समजले गेले त्यांना आता जवळून तपासता येईल.

भारतातील शक गण आणि कुषाण राजवंशाचा इतिहास वरील साधनांमुळे अधिक सुसूत्र बनेल, हे उघड आहे. या साधनांच्या अध्ययनाने महाराष्ट्राच्या इतिहासालाही चांगला उजळा मिळेल. याशिवाय पैशाची भाषेच्या अभ्यासाची एक नवी दिशा, शकभाषेच्या अध्ययनाने प्राप्त होईल. ही गोष्टही तितकीच स्पष्ट आहे.

मुंबई, भाद्रपद १३, १८९२.

(मराठी संशोधन पत्रिका, मुंबई, माघ १८९२)

◆◆◆

१९ : चवर्गीय दन्त्यवर्त्स्य ध्वनींचा उद्‌गम

मराठी भाषेत च वर्गातील व्यंजनांचे उच्चार दोन प्रकारे होतात. या प्रश्नाची बरीच सविस्तर चर्चा डॉ. अग्निहोत्री यांनी केलेली आहे (पाहा अग्निहोत्री). छ वर्णाखेरीज अन्य वर्णांचे तालव्य व दन्त्यवर्त्स्य असे दोन प्रकारचे उच्चार मराठीत होतात. डॉ. अग्निहोत्री यांनी असे प्रतिपादिले की, " च वर्गाचे दोन प्रकार होण्यास सुरुवात झाली ती मध्ययुगात म्हणजे प्राकृत भाषाकाली, असे प्राकृत भाषेच्या व्याकरणातील पुढील सूत्रावरून वाटते. (१) ' च वर्गस्य स्पष्टता तथोच्चारणः '– प्राकृतप्रकाश ११·५, (२) ' चजयोरुपरि यः स्यात् '– प्राकृतसर्वस्व १२·२१ (उदा.– य्चिरम्, य्चिय), (३) ' य्चिष्टोय्चिश् इत्येके, य्चिशादि '– प्राकृत-सर्वस्व २०·४.

' य्च्, य्छ्, य्ज्, य्झ् ' या वर्णांनी प्राकृत वैय्याकरणांना तालव्य उच्चारच अभिप्रेत होता. कारण, ' चि ' या अक्षराचा आजहि उच्चार तालव्यच होतो. भारतीय संस्कृतात किंवा अर्वाचीन भाषांत, ' चि ' या अक्षराचा दंततालव्य उच्चार होत नाही, तालव्य होतो. व तो दर्शविण्यासाठी, ' य् ' जोडला आहे. ' छ् ' संबंधीहि असेच म्हणता येईल. या व्यंजनाचा संस्कृतातील किंवा अर्वाचीन भारतीय भाषातील उच्चार दंततालव्य नाही, तालव्यच आहे आणि तो दर्शविण्यासाठीच वरील सूत्रात आधी, ' य् ' जोडला आहे."

डॉ. अग्निहोत्री यांनी वरील सूत्रातील, ' य्च् ' हे लेखन सदोष आहे असे टीपेत म्हटले आहे (अग्निहोत्री, पृ. १७८). त्यांचे हे म्हणणे अगदी रास्त आहे. तालव्य उच्चार दर्शविण्यासाठी य् हा वर्ण च्, छ्, ज्, झ् या वर्णानंतर म्हणजे च्य्, छ्य् आदि लिहावयाला पाहिजे. हे प्रतिपादन सयुक्तिक आहे.

परंतु ही गोष्ट नमूद करावीशी वाटते की छ वर्णाचा उच्चारदेखील दन्त्यवर्त्स्य होतो. छ वर्णाचा उच्चार मराठीत दन्त्यवर्त्स्य नाहीच हे त्यांचे म्हणणे योग्य दिसत नाही. छकडा, छबीना, छत आदि शब्दातील छ वर्णाचा उच्चार दन्त्यवर्त्स्यच आहे. निदान माझ्या प्रदेशात (बालाघाट, तुळजापूर) तरी तो तसा होतो. या दन्त्यवर्त्स्य उच्चारासंबंधी भारताबाहेरील, पण शेजारील भाषांचा पुरावा पुढे येणार आहे. त्यावरूनही आमच्या म्हणण्याला बळकटी येते.

मराठीतील दन्त्यवर्त्स्य वर्णाचा इतिहासही मोठा गुंतागुंतीचा आहे. पहिली गोष्ट ही की हे उच्चार वैदिकादि संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश आदीत नाहीत. पंजाबी, सिंधी, गुजराती, हिंदी (अखिल बोलींसहित) भाषात हे उच्चार

नाहीत. मग हे मराठी या आर्य भाषेत कसे प्रादुर्भूत झाले हा प्रश्न आहे. डॉ. अग्निहोत्री यांनी असे प्रतिपादिले आहे की च़्, ज़्, झ़् हे दन्त्य उच्चार द्राविड भाषेतून आले (अग्निहोत्री, पृष्ट ३३). द्राविड कुलात चार प्रमुख भाषा आहेत. त्यापैकी कोणकोणत्या भाषेत हे उच्चार आहेत, याची चर्चा आलेली नाही. या प्रश्नाची उकल करीत असताना भारताबाहेरील आर्यभारतीय आणि ईराणी भाषाकुलातील पष्तो, बलोची, खोतनी शक आदि भाषाक्षेत्रांतील वस्तुस्थिति सुद्धा विचारात घेतली पाहिजे. कारण भारतीय आर्यभाषांवर या वायव्य प्रदेशाचा प्रभाव सर्व इतिहासकालांतून पडत आलेला आहे. पुरातत्त्व संशोधनामुळे हा प्रभाव आता प्रागैतिहासिक कालातही डोकावलेला दिसतो.

पष्तो भाषेतील तालव्यांचा विचार करीत असतांना ई. ट्रम्प्प् यांनी आपल्या पष्तो व्याकरण (ट्रम्प्प्, पृ. ८) या ग्रंथात असे प्रतिपादिले आहे. तालव्य वर्णाच्या क्षेत्रात पष्तो भाषेत अनेक उच्चार प्राप्त आहेत. संस्कृत आणि ज़ंद या भाषातल्यापेक्षा अधिक संख्येने तालव्य उच्चार येथे सापडतात. च हा उच्चार ईराणीतल्या उच्चाराच प्रतीक आहे. तोच उच्चार संस्कृतात आहे. पष्तोतील च तालव्य ध्वनियुक्त शब्द संस्कृत, प्राकृतमधील, क, ख, च व छ ध्वनीचे रूपान्तर होत. पष्तो चार हा शब्द संस्कृत-कार्य, सिंधी-कारि यापासून व्युत्पन्न आहे. तसेच पष्तो चाड़ह (लांब चाकू) = सं. कर्तरी, कत्री = ईराणी कार्द = सिंधी काती. ज हा ध्वनि बहुधा क, ज, झ या ध्वनीचे परिवर्तन आहे. पष्तो जिनई = सं. कन्या, पष्तो जोड़ = सिंधी जोड़ु (निरोगी). पष्तो भाषेत संस्कृत प्राकृतातील कठोर वर्ण नाहीत. म्हणून छ आणि झ यांचा प्रश्न उद्‌भवत नाही. हे तालव्य उच्चार होत.

हळूहळू क्रमशः झालेल्या घर्षणामुळे मूळ च व ज या ध्वनीतून च़् व ज़् हे दोन उच्चार पष्तो भाषेने निर्माण केलेले आहेत. या दोन्ही ध्वनीसाठी पष्तो वर्णमालेत वेगवेगळे वर्ण आहेत. हे दोन्ही उच्चार दन्त्यवर्त्स्य आहेत हे दर्शविण्यासाठी च़ ध्वनीसाठी ts आणि ज़ ध्वनीसाठी dz अशी चिन्हे ट्रम्प्प् याने वापरलेली आहेत. या ध्वनींचा उच्चार दन्त्य आहे हे सर्वमान्य आहे. हा उच्चार व्यक्तविण्यासाठी आम्ही च, ज या वर्णांच्या दंडाच्या निम्नभागाला छोटेशे शून्य जोडले आहे. या चिन्हांनी दन्त्यवर्त्स्य दाखवावेत. याची चर्चा मागाहून येणार आहे. पष्तो च़ारी = संस्कृत चार = सिंधी चारी (हेर, दूत); पष्तो च़ड़ह = सिंधी छड़हो (एकटा, एकाकी). आता दन्त्य ज़ वर्णाचे उच्चार असे. पष्तो ज़्वान = सं. युवान् = ईराणी, हिंदी जवान = मराठी ज़वान (तरुण, युवक); पष्तो ज़नह = ईराणी ज़नख़ = सं. हनु (हनुवटी); पष्तो षज़ह = सं. सखी = मराठी सखी सई.

येथे ईराणी भाषेतील ज ध्वनीचा विचार करणे योग्य होईल. मूळ ईराणी भाषेत संस्कृतातला तालव्य ज ध्वनि आहे. तो जीम या चिन्हाने व्यक्त होतो

दुसरा ज़ ध्वनि. हा (ज़े) अक्षराने दाखवितात व तिसरा ज़्ह ध्वनि हा ज़्हे या चिन्हाने लिहितात. या तीन मूळ ईराणी ध्वनीखेरीज अरबी भाषेच्या दीर्घकालीन संपर्काने ज़ाल, ज़ाद आणि ज़ोय अक्षरानी व्यक्त होणारे ध्वनी ईराणीत रूढ आहेत. पण ते केवळ अरबी शब्दातच येतात. अन्यभाषीय शब्दासाठी त्यांचा वापर कदापि होत नाही. शिवाय या शेवटच्या तीन अरबी वर्णांचा उच्चार, ईराण, अफगाणिस्तान, भारत आदि देशात केवळ ज़ ध्वनीचाच (ज़े) होतो. त्यांच्या उच्चारात फरक नाही. अरब देशात उच्चार भेद आहेत. पण येथे ते नष्ट झालेले आहे. मोठमोठ्या पट्टीच्या विद्वानांच्या उच्चारांतही हे भेद दिसून येत नाहीत. डॉ. अग्निहोत्री यांना, या ध्वनीच्या उच्चारांचा नीट उलगडा झालेला नाही असे वाटते (अग्निहोत्री, पृ. २२८, ३०३). ज़ाकिर हुसेन (झाकिर हुसेन नव्हे, पृ. ८) आदी शब्दांच्या उच्चारात घोटाळे आहेत. वरील ज़ ध्वनीचे मराठीत सारूप्यीकृत द रूप होते, हा डॉ. अग्निहोत्री यांचा निष्कर्ष बिनचूक आहे. असो. डॉ. अग्निहोत्री यांनी या चारही ध्वनींबद्दल ज़ हा वर्ण वापरलेला आहेच (पृ. १९३). परंतु हेच चिन्ह दन्ततालव्य च़, ज़ यासाठीही वापरलेले आहे. या दोन्ही उच्चाराचा येथे घोटाळा होणार. ईराणीतील मृदु ज या ध्वनीसाठी ज़ हे अक्षर वापरण्याची हिंदी उर्दूची परम्परा बरीच जुनी व रूढ आहे. म्हणून मराठीतही हीच परम्परा चालू ठेवणे इष्ट आहे. आता मराठी दन्ततालव्यासाठी दुसरे चिन्ह वापरणे इष्ट होय. म्हणून आम्ही या उच्चारासाठी या वर्णाच्या दंडाखाली एक लहानसे शून्य जोडले आहे. ते स्वीकार्य व्हावे असे वाटते. दन्त्यवर्त्स्य च, ज हे च़, ज़ असे लिहावेत. या लेखात ते तसे वापरण्यात आले आहेत.

पष्तो भाषेच्या खालोखाल ओर्मुडी ही दुसरी ईराणीची एक उपभाषा अफगणिस्तानात आजही प्रचलित आहे. या भाषेचे क्षेत्र काबूल नगराच्या दक्षिणेस कंदहार शहरापर्यंतच्या मधल्या भागात व पूर्वेकडे वज़ीरिस्तानापर्यंत पसरलेले आहे, ग्रियरसनच्या भारतीय भाषा सर्वेक्षणाच्या दहाव्या खण्डात या भाषेच्या चर्चेला दोनशे पृष्ठे खर्चिलेली आहेत (ग्रियरसन खण्ड १०, पृ. १२४-३२६). ओर्मुरी शब्दाची व्युत्पत्ति जॉर्ग मॉर्जन्स्टर्न याने दिलेली आहे (मार्गन्स्टर्न पृ. १६). ओर्मुरी असाही उच्चार स्थानपरत्वे रूढ आहे. ओर्मुरी शब्द **आर्यमृत्य** या संस्कृत शब्दापासून निघालेला आहे असे त्याचे प्रतिपादन आहे. या शब्दाचा अर्थ आर्य मनुष्य असा दिलेला आहे. पष्तो प्रमाणेच या भाषेत अनेक जुने संस्कृत शब्द तद्‌भवरूपाने वावरत आहेत.

च़र्वोक (मेंढी किंवा शेळी); च़ान < सं.-शरद्, ईराणी-साल (वर्ष); च़ार < सं. चत्वार, अवे.-चथ्वार (चार, ४); च़रेस < सं. चतुर्दश (चौदा, १४); च़री-जिस्तू < सं. चतुर्विंशती (चोवीस, २४) इत्यादी अनेक शब्दात दन्त्य च़ प्रयुक्त होतो. ज़वान हा शब्द सं. युवान्, ईराणी जवान (युवक, तरुण) अनेक शब्दांचा प्रतिनिधिभूत आहे. ज़वानी म्हणजे तारुण्य होय.

दरद शब्द भारतीय संस्कृत साहित्यातून परिचयाचा आहे. पामीरच्या दक्षिणेस पसरलेल्या प्रदेशास दरद असे नाव आहे. हाच पैशाची भाषेचा मायदेश आहे अशी ग्वाही ग्रियरसन याने काढलेली आहे (ग्रियरसन खं. ८, भाग २ प्रास्ताविक). दरद प्रदेशातील जनतेला पिशाच किंवा पैशाची हा घृणास्पद शब्द आवडत नाहीं म्हणून मी दरदीय भाषासंच असे या भागातील भाषांना नाव देत आहे, असे त्याने स्पष्टीकरण नोंदविले आहे. कुनार नदीच्या पूर्वेस अक्षांश ३७° पर्यंत हा दरदीय भाषांचा प्रदेश पसरलेला आहे. या भाषासंचात खो-वार, बुरुशस्की, शिना, काश्मीरी आदि प्रमुख भाषा आहेत. त्या ईराणी कुलातील नव्हेत. अन्य नव्य आर्य भारतीय भाषांशीही त्यांचा भेद आहे. परंतु त्या संस्कृतोद्भव व आर्यभाषाकुलातीलच आहेत. या भाषासंचांची ग्रियरसन याने काही वैशिष्टचे सांगितली आहेत. प्रथमतः या सर्व दरदीय भाषात मृदुव्यंजनातील महाप्राण वर्ण अस्तित्वात नाहीत. कठोर व्यंजनाचे महाप्राण आहेत. ईराणी भाषाकुलात सर्वच महाप्राणांचा त्याग केलेला आहे. वरील नियम पैशाची प्राकृतातील प्रमुख नियम होय. दरदीय भाषाकुलाचे दुसरे वैशिष्टच असे की संस्कृत, प्राकृतमधील मृदु व्यंजनाच्या जागी या भाषात कठोर व्यंजन येते. ग वर्णाचा क, ज वर्णाचा च, ड वर्णाचा ट, द वर्णाचा त आणि ब अथवा व वर्णाचा प वर्ण बनतो. पैशाची जेव्हा लोकभाषा म्हणून वावरत होती त्यावेळी या नियमाचा पुरेपूर अमल होता असे ग्रियरसनने म्हटलेले आहे. तिसरी सांगितलेली गोष्ट ही की काश्मीरी भाषेत काही विशिष्ट परिस्थितीत त वर्णाचा च़ आणि ट वर्णाचा च होतो. तसेच काश्मीरीत द वर्णाचा ज़ आणि ड वर्णाचा ज (तालव्य) होतो. याची उदाहरणे अशी. प्राकृत, हिंदी रात शब्दाचे रोच़ू (अनेकवचनी) असे रूपान्तर होते. ग्रन्द (गणती, मोजणे) याचे काश्मीरी रूप ग्रुंज़, ग्रुंज़ू असे होते. हिंदी चार=का. च़ोर हिंदी पंच – का. पांच़, संस्कृत छागल– का. छ़ाउल (शेळी), सं. जीव – का. ज़ुव (जीव, जीवन) इत्यादी. येथे च़ आणि ज़ वर्णाचे उच्चार मराठी उच्चाराचे समकाय (दन्त्यवर्त्स्य) आहेत असे ग्रियरसन याने आवर्जून सांगितले आहे. याची अनेक उदाहरणे देता येतील. पण त्याची गरज असू नये. सारांश असा की पश्तो आणि ओर्मुरी या ईराणी कुलातल्या आणि काश्मीरी व शिना या दरदीय भाषासंचातील भाषात च़ आणि ज़ हे दन्त्य ध्वनि वावरत आहेत.

खोतनी शक या ईराणी कुलातील भाषेत च़, ज़ हे दन्त्य उच्चार वावरत

असल्याचा मागोवा आता घ्यावयाचा आहे. या प्रश्नाची छाननी स्वर्गीय डॉ. स्टेन कोनौ याने आपल्या या भाषेच्या व्याकरण ग्रंथात केलेली आहे. (पाहा कोनौप्रा). आता खोतनी शक भाषेची उच्चारसरणी आणि व्याकरणनियम स्थैर्य पावलेले असून विद्वन्मान्य आहेत.

खोतनी शक भाषा खरोष्ठी आणि ब्राह्मी या दोन्ही लिपींत लिहिली गेली आहे. यापैकी ब्राह्मी लिपीत दन्त्य च़ आणि ज़ हे ध्वनि व्यक्तविलेले आहेत. प्रायमर पुस्तकात लेखकाने ब्राह्मी लिपीतील खोतनी भाषेची व्याकरणमीमांसा केलेली आहे. या दन्त्य च़ ध्वनीसाठी आंग्ल tc अक्षरे वापरण्याचा प्रघात आहे. मी त्यासाठी च़ हे चिन्ह वापरले आहे. कौनौ याच्या या पुस्तकातील कोशात या च़ वर्गात पहिला शब्द च़ंज़ tcamjsa असा असून त्याचा अर्थ केस असा आहे. हा शब्द निरनुस्वारही असून त्याचे रूप च़ज़इ असे आहे. महानुभवीय मराठीतील झिंजी, झिंजोटी म्हणजे केस याची आपणाला येथे आठवण येईलच. ऋग्वेदातील च्यु, च्यवते धातुपासून च़व, च़ू (जाणे) असे क्रियापद आढळते. खोतनी च़हौर = अवेस्ता चथ्वायो = संस्कृत चत्वार (चार); खोतनी च़ूर्ज़ंनिय = सं. चतुरंग इत्यादि. बेली यांनी ज़म्बस्त ग्रंथाच्या शब्दकोशात ज़ ध्वनीने आरम्भ होणारे काही शब्द दिलेले आहेत (बेली, खण्ड ६, पृ. ९२). खोतनी ज़िऩौ याचा अर्थ वध्य असा आहे. कोनौ याने दुसऱ्या एका पुस्तकात ज़हार म्हणजे पोट, अन्नाशय असा दिलेला आहे (कोनौमे). असे शब्द संख्येने बरेच असले तरी ते प्रमाणाने फार कमी आहेत. थोडक्यात सांगावयाचे ते हे की खोतनी शक भाषेत मराठीतील च़, ज़ हे दोन्ही दन्त्य ध्वनी उपलब्ध आहेत.

याच्या उलट खोतनी भाषेत ज़ या मृदु तालव्याचे आणखी तीन उच्चार उपलब्ध आहेत. ते खोतनी लेखनपद्धतीत (s') = ź ; (s̤) = ẓ आणि ys = z असे लिहिण्यात येतात. हे तिन्ही उच्चार ईराणी ज़ ध्वनीची वेगवेगळी बदललेली रूपे आहे. त्यासाठी मराठी वर्णाचा उपयोग सांगणे कठीण व अनावश्यक वाटते.

खोतनी शक भाषेतील ग्रंथांच्या काळाविषयी येथे थोडा उल्लेख झाल्यास बरे होईल. खोतनी शक भाषेतील हस्तलिखिते शककाल सातशे ते नऊशे या दोनशे वर्षातील आहेत. कारण शककाल नऊशेच्या सुमारास समरकंद, बुखारा येथून खोतन देशात झालेल्या इस्लामी आक्रमणाने या छोटयाशा पण संपन्न संस्कृतीचा नाश झाला. यावरून च वर्गातील दन्त्यवत्स्र्य उच्चार निदान या काळातील होत हे निश्चियाने सांगता येते. याचा अर्थ असा की हे उच्चार याच्या पूर्वीही शतकानुशतके वावरत असले पाहिजेत. अफगाणिस्तान व दरद देशातील या उच्चाराच्या आजच्या अस्तित्वाने या विधानाला चांगलीच बळकटी येते.

डॉ. अग्निहोत्री यानी म्हटले आहे की च वर्गातील दन्त्य उच्चार द्राविडी

भाषांतून आलेले आहेत. या बाबतीत त्यांनी कसलाच आधार दिलेला नाही. म्हणून ते आधार पाहाणे कठीण आहे. राबर्ट काल्डवेल याचे द्राविडी भाषांचे तौलनिक व्याकरण या बाबतीत पाहाण्यासारखे आहे (काल्डवेल, पृ. १४१). सर्व द्राविड भाषा व बोली या मध्ये तमिल भाषा सर्वप्राचीन व त्या कुलातील भाषांची अधिकाधिक प्रतिनिधि आहे. काल्डवेल याने म्हटले आहे की तमिल आणि संस्कृत चवर्गातील वर्णाचे उच्चार एकच आहे. तमिल च आणि ज हे संस्कृतातल्याप्रमाणेच उच्चारले जातात. या बाबतीत फक्त तेलुगु भाषा अपवाद आहे. त्याने तो अपवाद असा मांडला आहे. तेलुगु भाषेत च आणि ज, व त्यांचे महाप्राण वर्ण यांचा विशेषत्वे मृदु उच्चार होत असल्याची येथे नोंद घेणे आवश्यक आहे. ही गोष्ट संस्कृत आणि सर्वच नव्य आर्यभारतीय भाषांना अज्ञात अशी आहे. हे उच्चार फक्त तेलुगु आणि मराठी भाषांतच आढळतात. च वर्णाचा उच्चार ts (आम्ही स्वीकारलेल्या चिन्हात च़) सारखा आणि ज वर्णाचा dz सारखा (ज़) होतो. इ, ई, ए, ए (दीर्घ) आणि ऐ हे स्वर सोडून, अन्य सर्व स्वरापूर्वी आलेल्या या वर्णांचा च़, ज़ असा उच्चार होतो. अपवादकृत वरील स्वरांच्या पूर्वी च आणि ज याचे सामान्य उच्चारच कायम राहातात. हे उच्चार तेलुगु भाषेने मराठीकडून उसणवारीने घेतले किंवा मराठीने तेलुगुकडून ही उसणवारी केली, याबद्दल आपले मत प्रतिपादण्याचे धाष्टर्य आपण करीत नाही, असे काल्डवेलने आवर्जून सांगितले आहे. परंतु या दोन्ही भाषांत केवळ हेच साम्य आहे असे नव्हे, असेही त्याने नोंदविले आहे.

येथे मराठी व तेलुगु भाषांची भोगौलिक सलगता सांगितली तर बरे होईल असे वाटते. गेल्या पाच सहाशे वर्षांपासून महाराष्ट्राचा तेलुगु भाषेला सलग असलेला मराठीभाषी भाग म्हणजेच मराठवाडा, तेलुगु भाषिकांच्या बरोबर एकाच सत्तेखाली नांदत आलेला आहे. इस्लामपूर्व काळातही राजेलोकांनी भाषिक सीमा कधीही पाळलेल्या नाहीत. म्हणून तेलुगु मराठीचे हे साहचर्य, भोगौलिक सलगतेतून निर्माण होणाऱ्या प्रभावांना वृद्धिंगत करणारे आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे. साधुसंतांचा संचारही अव्याहतपणे चाललेला होताच. महानुभाव पंथाचे संस्थापक हे वोरंगल नगरीत व योगिनी मुक्ताबाई ही श्रीशैल या तीर्थक्षेत्री निवासास होती, हे सर्वविदित आहे. महाराष्ट्र आणि तेलंगणा यांच्या सीमा भिडलेल्या आहेत. ज्याला जुना आंध्रप्रदेश म्हणतात तो मराठीभाषासंपर्कात कधी नव्हता व आजही नाही. मराठी भाषेचा तेलुगुसंपर्क नांदेड जिल्ह्यातील देगलूर या तालुक्याच्या मुख्य ठिकाणापासून आरम्भ होतो. नांदेड जिल्ह्यातील बिलोली, भोकर व किनवट हे तालुके, निजामाबाद आणि आदिलाबाद या आंध्रप्रदेशातील

जिल्ह्याला लागून आहेत. किनवटच्या पुढे पेणगंगा ही पूर्ववाहिनी नदी काही अंतरापर्यंत सीमेचे काम करते. आदिलाबाद तालुक्याच्या उत्तरेस नदीपलीकडे वणी तालुका आहे. नदीच्या उजव्या तीरावर राजूरा (माणिकगड) हा मराठी तालुका पसरलेला आहे. पेणगंगा, वर्धा व वैन्गंगा या नद्यांनी बनलेली प्राणहिता व तदनंतर गोदावनी या मराठी व तेलुगूच्या मीलनाचे कार्य करितात.

खोतन, अफगाणिस्तान आणि दरद-भूमि (काश्मीरसहित) या देशातील भाषांत चवर्गीय दन्ततालव्याच्या अस्तित्वावरून आणि द्राविड भाषातील, एका बोलीचा अपवाद सोडून, त्याच्या अभावावरून, या दन्ततालव्याची मायभूमि पष्तो आणि दरद भाषाक्षेत्रात आहे, असा निष्कर्ष काढावयास अडचण असू नये. त्यापैकी खोतनी शकभाषा आणि तेलुगुभाषा यांतील या उच्चारांचे अस्तित्व सम्पर्कजन्य मानावे लागेल. ती गोष्ट मराठीलादेखील लागू पडते. खोतन आणि महाराष्ट्र येथे हा उच्चार प्रत्यक्ष शक लोकांच्या संचाराने व संबंधाने प्रादुर्भूत झाला आणि तेलुगु भाषेत तो मराठीच्या सहवासाने रूढ झाला हे म्हणणे सयुक्तिक होईल.

पष्तो प्रदेशातील हा दन्त्यवर्त्स्य उच्चार शक गणाच्या माध्यमाने भारतात आला. पैशाची प्राकृत भाषा ही या दरदी लोकांच्या साहचर्यातूनच निर्माण झालेली दिसून येते. पैशाचीच्या उत्कर्ष कालात हा उच्चार वायव्यभारत व मध्य-प्रदेशातील माळवा प्रदेशात रूढ असावा असे अनुमान निघते. परंतु उत्तर काळात ईराणी शक गणांचे भारतीयीकरण होत गेले. पैशाचीची क्षीण परम्परा प्राकृत अपभ्रंशाच्या विस्तृत व बलशाली प्रभावात विलीन होऊन गेली. ती महाराष्ट्रातच शेष राहाण्याचे कारण शोधता येते. उत्तरीय प्रदेशापासून महाराष्ट्र-भूमि विंध्य व सातपुड्याच्या पर्वतराजींनी वियुक्त झालेली आहे. म्हणून एकदा स्थिर झालेली ही परम्परा बाधित झाली नाही. गुजराती, माळवी, सिंधी, राजस्थानी भाषांतून ही परम्परा प्राकृतप्रभावाने पुसून गेली. ती महाराष्ट्रात अन्धूक अशी मूळ धरून राहिलेली आहे.

महाराष्ट्रातील शक गणाच्या वास्तव्याचे अवशेष इतिहासज्ञापुढे आहेत. त्यांचा आढावा आम्ही आमच्या काही लेखातून घेतलेला आहे. या संबंधात (१) महाराष्ट्रधर्म, उद्‌गम व विकास (इतिहास आणि संस्कृती, मुंबई पु. २६, १८९२), (२) पष्तो, पैशाची आणि मराठी (म. साहित्य पत्रिका, पुणे क्र. १७४, १८९२) आणि (३) महाराष्ट्र आणि शक या लेखांतून शकगणाच्या राजकीय, प्रत्नलेखीय, नाणकशास्त्रीय, भौगोलिक, भाषिक आणि व्याकरणात्मक अवशेषांचे दिग्दर्शन आम्ही केलेले आहे. त्यांची येथे पुनरावृत्ति अनावश्यक होय. वरील

चर्चेचा सारांश असा की या शक गणांच्या महाराष्ट्रातील वास्तव्य व साहचर्यामुळे मराठी भाषेत चवर्गीय दन्त्यवर्त्स्य उच्चार प्रादुर्भूत झालेले आहेत.

मुंबई, आश्विन ३०, १८९२

(म. साहित्य पत्रिका, पुणे, क्रमांक १७५, शक १८९२)

संक्षेप व सन्दर्भग्रंथ

अग्निहोत्री – द. ह. अग्निहोत्री : मराठी वर्णोच्चार विकास, नागपूर १९६३
काल्डवेल – रावर्ट काल्डवेल : द्राविडी भाषांचे तौलनिक व्याकरण, मद्रास, १९५६
कोनौप्र – स्टेन कोनौ : प्रायमर ऑफ खोतनीज शक, ऑस्लो, १९४९.
कोनौमे – स्टेन कोनौ : ए मेडिकल टेक्स्ट इन खोतनीज, आस्लो, १९४१.
ग्रियरसन – जॉर्ज ग्रियरसन : भारतीय भाषा सर्वेक्षण, खण्ड १०.
ट्रम्प् – ई. ट्रम्प् : पश्तो व्याकरण, टुबिंजेन, १८७३.
बेली – एच्. डब्ल्यू , बेली : इण्डो-सिथियन स्टडीज, लंदन.
मॉर्गन्स्टर्न – जॉर्ज मॉर्गन्स्टर्न : रिपोर्ट ऑन ए लिंग्विस्टिक मिशन टु अफगानिस्तान आस्लो, १९२४.

२० : खोतनी शक आणि मराठी

खोतन या लेखात आम्ही खोतन या देशाची भौगोलिक माहिती दिलेली आहे. खोतन हे शहर युरुंगकाश नदीच्या काठी अक्षांश ३७° उत्तर, रेखांश ८०° पूर्व असे वसलेले आहे. ज्याला चिनी तुर्कस्तान म्हणतात त्या देशात खोतन हा प्रदेश अंतर्भूत आहे. खोतन या देशात शक या आर्य गणाची वसाहत, राज्य व संस्कृति शककालपूर्व दुसऱ्या शतकापासून शक ९०० पर्यंत नांदत होती. शककाल नऊशेच्या सुमारास हे बौद्धधर्मी राज्य व संस्कृति इस्लाममय झाली. तेव्हापासून जुन्या संस्कृतीचा लोप झाला. खोतन मध्ये शक गण नांदत असत. या गणाची माहिती आमच्या अन्य लेखातून आलेली आहे. त्यांच्या पूर्वेतिहासाकडे ही अंगुलिनिर्देश झालेला आहे. शकगणांच्या एका शाखेचा किंवा अनेक गटांचा संबंध भारताशी फार प्राचीन काळापासून आलेला आहे. महाराष्ट्राशीही या शक गणाचे नाते फार जुने आहे. या नात्याची चर्चा आम्ही **महाराष्ट्र आणि शक** या स्व. दत्तोपंत आपटे यांच्या पुणे येथील स्मारक व्याख्यानात (कार्तिक ६, शक १८९२) केलेली आहे. या सर्व व्याख्यानाचे अंतःसूत्र, महाराष्ट्राच्या इतिहास आणि संस्कृतीचे उपरणे शकेतिहास संस्कृतीच्या गुंत्यात अडकलेले आहे, असे आहे. महाराष्ट्रातील अजन्ता कार्ले, एरंगल, हिंगोली, हिंग्लज (गड), हिंग्लजवाडी, बागलाण इत्यादि प्रदेशस्थान नामे शकसम्पर्काची स्मारके आहेत असे आम्ही म्हटलेले आहे. मध्यप्रदेशातील एरण ईराणसंज्ञोत्पन्न आहे. तसेच मन्दसौर हे नगरनाम अवन्तीदशपुर या नावाचा गांधारी प्राकृत व खोतनी शक भाषांच्या साहचार्याचा परिपाक आहे, असे आम्ही प्रतिपादले आहे. महाराष्ट्रधर्म ही ऐहिक, राजकीय व सामाजिक संकलपना असून तिचा उद्गम शक गणाच्या क्षत्रराष्ट्रधर्म या संकल्पनेतून झाला असे आम्ही, महाराष्ट्रधर्म–उद्गम आणि आशय या लेखात सांगितले आहे. तसेच तुळजाई आणि तुकाई ही पैशाची भाषेतील दुर्गा शब्दाची अपत्ये आहेत, असे आम्ही म्हटलेले आहे. म्हणजे तुळजाभवानी या दैवताचा उद्गम शकगणप्रेरित आहे हेही मराठी जनां-समोर आलेले आहे. मराठी भाषेतील किं, की (संस्कृत यत्, प्राकृत जं, जे, जु) हे ईराणीभाषेत्पन्न उभयान्वयी अव्यय इस्लामसम्पर्कपूर्व काळात मराठीत रूढ होते, हे आम्ही एक दोन लेखातून मांडलेले आहे. तसेच मराठीतील चवर्गीय दन्त्यवत्स्र्य ध्वनींची आयात तेलुगु भाषेतून नव्हे, तर पष्तो, खोतनी शक आणि काश्मीरी आदि दरद-देशीय भाषांतून शकगणाच्या माध्यमाने झाली, असे आम्ही या ध्वनींच्या उद्गमविषयक लेखात चर्चिले आहे. ही शकगणसम्पर्काची महाराष्ट्रातील

भौगोलिक, सांस्कृतिक आणि भाषिक अमीट अशी स्मारके आहेत. प्रस्तुत प्रसंगी मराठी भाषेत आणखी काही खुणा सापडतात की काय याचा मागोवा घेणे आहे.

खोतनची नामान्तरे

मराठी भाषेतील खोतनी शकभाषेच्या खुणा पाहाण्यापूर्वी खोतन या नावाविषयी व त्या भाषेविषयी विचार करावयास पाहिजे. खोतन या देशाचे प्राचीन तद्देशीय नाव ह्वतन असे उपलब्ध होते. या उपलब्धीचा काल इ. स. तिसरे शतक होय. या नावाच्या भिन्न भिन्न रूपाची चर्चा डॉ. हारोल्ड बेली याने केलेली आहे (बेली, खण्ड ६ पृ. ४३१). त्याचप्रमाणे एमिरिक यानेही अशी चर्चा केलेली आहे (एमिरिक पृ. १ ते ३). उत्तरकालात, परंतु इ. स. सातव्या शतकापूर्वी, खोतन शब्दाची अन्य रूपे ह्वतम्,- ह्वतिन, ह्वम्न, ह्वन, ह्वम्, ह्वन्य अशी सापडतात. खोतनी या भाववाचक रूपासाठी ह्वतन, ह्वतिन, ह्वतिनि, ह्वन, ह्वनम्, ह्वम्नौ आदि रूपांचा उपयोग केलेला दिसून येतो. ही रूपे खोतनी भाषा वा खोतनी राजा, नरेश यांची विशेषण म्हणून प्रयुक्त आहेत. मध्य आशियात बौद्धधर्माचा खूपच प्रसार झालेला होता. याचा मागोवा चूलिक-सूलिक म्हणजे सुग्द, सोग्दियाची भाषा, तुर्कांची उइगूर भाषा, खोतनी शक भाषा यांवरून घेता येतो. परंतु या सर्वांत खोतन देशाला अग्रेसरत्वाचा मान आहे. खोतन नगर व देश बौद्धधर्माचे मोठे पीठ होते, असे उपलब्ध साधनांवरून दिसून येते. शिवाय खोतन नगर पश्चिम आशियातील समरकंद, बुखारा, पूर्व आशियातील चीन व तिबेट, दक्षिणेकडील भारत आणि नैर्ऋत्येकडील अफगाणिस्तान, ईराण यांच्या परस्पर मार्गातील प्रमुख केन्द्रस्थानीय ठिकाण होते. खोतन हा शब्द या प्राचीन काळात वरील भूखण्डातील देशातून वापरात होता. उल्लेख नोंदविण्याइतपत या केन्द्राचे महत्त्व सर्वमान्य होते. प्राचीन ईराणी भाषात खोतनचा प्रतिशब्द हौतन आणि आधुनिक ईराणी भाषेत खुतन असा आहे. सोद्गियाच्या चूलिका भाषेत त्याचे रूप गौदन्यक असे होते. तुमशुक ही शकगणाची एक महत्त्वपूर्ण अशी उपभाषा आहे. तिला मरलवशी असेही दुसरे नाव आहे. या तुमशुक बोलीत खोतन शब्दाचे रूप ह्वदन, ह्वद्न असे आहे. प्राकृत भाषेतील प्रत्नलेखातून खोतन हा शब्द प्रयुक्त आहे (इ. स. चे ३ रे शतक). खोतन देशात संस्कृत साहित्यही निर्माण झालेले आहे. या संस्कृत साहित्यात खोतन शब्दाची नामान्तरे गोस्तन, गौस्तन, गास्तन, गांस्तन, गौस्तमि देश अशी आढळतात. ह्युएन च्वंग याने चिनी भाषेत या देशाला हुअन्-न असे म्हणत, अशी नोंद केलेली आहे. तसेच या देशाला ईराणी लोक हुओ-तन् म्हणतात, असे त्याने नोंदविले आहे. प्राचीन चिनी भाषेत याचा उल्लेख यूत्येनि, यूत्यैन असा आलेला आढळतो. तिबेटी भाषेत त्याचे रूप हु-तेन, हु-देन, हु-थेन, ख्वु-थेन असे आढळते. लॅटिन भाषेत त्याचा अवतार अघोष

रूपात कोतन असा आहे. डॉ. हारोल्ड बेली यांची सत्तरी गेल्या डिसेम्बरात साजरी झाली. त्याच्या अभिनन्दनपर काढलेल्या, ग्रंथामध्ये (बुलेटिनओ खं. ३३ भाग १) जे. बी. (ब्रफ?) याने बेली याचे वर्णन करताना खोतन देशासाठी संस्कृत गोस्थान शब्द वापरला आहे, असे खालील श्लोकावरून दिसून येते–

गोस्थानगोकृच्छ्रगवेषमाणो
भाषाद्विचक्रे सुविशारदश्च ।
कंसेतुविद्यालयरत्नभूतो
लोकेष्वशेषेषु यशःप्रपन्नः ॥

शक शब्दव्युत्पत्ति

शक शब्द खोतनी कागदपत्रे यात निश्चित रूपात आढळत नाही (एमिरिक, पृ. २). सकाञि ज़नीरि हा शब्द प्रयोग आलेला आहे. त्याचा अर्थ सकाचे ज़नीर असा आहे. सकाम् असे रूप व्यक्तिनामात प्रयुक्त झालेले आहे. सक हा शब्द ईराणी परम्परेतला दिसतो. ते सम्भवनीय आहे. हा शब्द डॉ. हारोल्ड बेली यांच्या मतानुसार *सक् (म्हणजे शकणे, बलवान् असणे इत्यादि, अवेस्ता सक, संस्कृत शक्–शक्नोति) धातूपासून व्युत्पन्न आहे. हा शब्द ऋग्वेदात नित्यप्रयुक्त आहे. शक्र (इंद्र) हा शब्द या धातूपासूनच निघालेला आहे. सक् म्हणजे धावणे, गतिमान होणे या धातूपासूनही या शब्दाची व्युत्पत्ति पुढे आलेली आहे. या शक गणांचे परद्रय, तिग्रक्षौद आणि हौमवर्ग असे तीन प्रमुख गट होते असा उलेख दारयवहू (धारयद्वसु) याच्या इ. स. पूर्व सहाव्या शतकातील शिलालेखांतून आलेला आहे. अन्य उल्लेखही सापडतात.

इ. स. च्या पहिल्या शतकाच्या आरंभापासून वायव्य भारतात या शक गणांच्या वास्तव्याच्या खुणा सापडतात. हे क्षत्रप, महाक्षत्रप म्हणून इतिहासात परिचित आहेत. ते निश्चितपणे ईराणी होते. त्याची भाषा, खोतनी नसली तरी खोतनीला अगदी जवळची व सगोत्र होती, हे या गटातील व्यक्तींच्या नाण्यांवर सापडणाऱ्या नावांवरून कळून येते. खोतनी भाषेत प्राप्त असलेली एक विशेष लेखनकामाठी त्याच्या लेखनात आढळते. ही विशेषता म्हणजे य़्स् या लेखन-चिन्हाचा उपयोग. य़्स् या चिन्हाचा उच्चार ईराणीतील ज़ हा उच्चार होय (एमिरिक).

भाषेचे नाते

(अ) खोतनी भाषेचे नाते ईराणी भाषेशी आहे ही गोष्ट, दोन्ही भाषांतील समान शब्दांची तुलना केल्यास व त्या शब्दांचे अवेस्ता आणि प्राचीन ईराणी भाषांतील शब्दांचे सगोत्रत्वाचे नाते पाहिल्यास, सहजपणे स्पष्ट होते (एमिरिक पृ. २–३).

खोतनी	अवेस्ता	संस्कृत
अय़्सु (= अज़ु, मी)	अज़म्	अहम्
गर-(पर्वत	गरि-	गिरि-
पुल्स्- (पुसणे)	परस्-	पृच्छ्-
बर्- (वाहून नेणे)	बर्-	भर्-
बस्त- (बांधलेला)	बस्त-	बद्ध-
य़्सात- (= ज़ात, जन्मलेला)	ज़ात-	जात-
सत-	सत-	शत-

(आ) खोतनी भाषेची ध्वनीविन्यासात्मक वैशिष्टचे पाहिल्यावर ही भाषा पश्चिम ईराणीपेक्षा पूर्व ईराणी भाषाकुलात मोडते. अशारीतीने खोतनीतील ब, द, ग्, (ग़) असे लिहिले जाणारे वर्त्स्य उच्चार ब़, द़, ग़ हे प्राचीन ईराणीतील ब, द, ग या ध्वनीपासून विकसित झालेले आहेत. खोतनी भाषेत च़ (मराठी) दन्त्यवर्त्स्य [=tc (ts)] हा ध्वनी प्राचीन ईराणीतील च् (संस्कृत च् ध्वनिसमान) ध्वनीपासून निघालेला आहे. हीच अवस्था ऑस्सेती, पष्तो इत्यादीत आढळून येते. याच्या उलट पश्चिम ईराणीत हा उच्चार संस्कृतातल्यासारखा तालव्य होतो. काही वैशिटचे पाहिली असता, खोतनी भाषा पश्चिम ईराणीशी न जुळणारी असून तिचे पूर्व ईराणीशी साम्य डोळचात भरणारे आहे. उदाहरणार्थ शब्दारंभी आलेल्या *थ्र् ध्वनीपासून खोतनीत द्र् होतो. परंतु तोच उच्चार शब्दान्तर्तगत आल्यास, पष्तो भाषेतल्याप्रमाणे थ्र ध्वनीचा र् होतो. सामान्यतः शब्दारंभीच्या थ्र् ध्वनीचा व्यवहार दोन्ही अवस्थात सारखाच असतो. परंतु यिदग–मुंजी गटातही वेगळेपण दिसून येते. भारोपीय * कु– ध्वनीपासून, खोतनीत श् होतो. हे वख़ी बोलीतील श् ध्वनीशी सुसंगत आहे, परंतु अन्यत्र त्याचा स्प् झाल्याचे सर्वत्र दिसते.

(इ) खोतनी आणि तुमशुक या बोलींचे इतके निकट साम्य दिसून येते की त्या एका साधारण शक भाषेच्या दोन बोली आहेत, असा निष्कर्ष काढला पाहिजे.

तुमशुक	खोतनी
बिश – (सर्व)	बिश –
दुद़र – (कन्या)	दुतर –
द्रैनु – (तिन्हींचे)	द्रैणु –
खाज़ – (अन्न)	खाय़्स – (=खाज़-)
रे – (राजा)	रे
शज़्द – (सर्प)	शय़्स्द (=शज़्द)
वसुत – (शुद्ध)	वसुत –

शक भाषेच्या अनेक बोली अस्तित्वात होत्या, हे निर्विवाद आहे. इ. स. च्या अकराव्या शतकात अल-काशगरी याच्या काळात काशगर प्रदेशात एक शक बोली वावरत होती असे दिसून येते. कॉकेशस प्रदेशात ऑस्सेती नावाची एक भाषा आजदेखील बोलली जाते. तिच्या दिगोर आणि इरोन अशा दोन बोलीशाखा दिसून येतात.

खोतनी संश्लिष्टभाषा

खोतनी भाषा पूर्व ईराणीची एक प्रमुख भाषा असली तरी पश्चिम ईराणीच्या विकासावस्थांहून तिच्या विकासावस्था भिन्न दिसतात. पहलवी, पाज़ंद आदि पश्चिम ईराणी अवस्था त्याच कालात विश्लिष्ट भाषेचे रूप धारण करितात. परंतु खोतनी मात्र संश्लिष्ट भाषा म्हणून वावरते. आधुनिक ईराणी (फार्सी) ही अत्यंत विश्लिष्ट भाषा आहे. अखिल भारोपीय भाषांचा विकास संश्लिष्टतेतून विश्लिष्टतेकडे होताना आढळतो. या दृष्टीने पाहिले तर, आजच्या आपल्या मराठी भाषेतही संश्लिष्टता पदोपदी आढळते. विशेषत: आपले आधुनिकतम काव्यही या दृष्टीने लक्ष्य आहे. अगदी नवकाव्यात सुद्धा ही संश्लिष्टता आढळते. आजच्या ईराणीत तसे मुळीच नाही. ती केवळ विश्लिष्ट भाषा बनलेली आहे. दहाव्या शतकाअखेरपर्यंत उपलब्ध असलेल्या खोतनी भाषेत मात्र सर्वत्र संश्लिष्टतेचे साम्राज्य दिसून येते. या भाषेत उपसर्ग आहेत. खोतनीत एकवचन व अनेकवचन ही दोनच दिसत असली तरी द्विवचनाची रूपे अधून-मधून आढळतात, लिंगभेदात पुंस्त्रीनपुंसकाचे वास्तव्य आहे. परंतु शेवटचे निर्मूल होत आहे. सामान्यरूपात पुंस्त्रीभेद लोपलेला आहे. मराठीत तो आजही शेष आहे. खोतनीत सहा विभक्ति आढळतात. पंचमी तृतीयेत आणि चतुर्थी षष्ठीत विलीन झालेली आहे, संबोधनासह शेष सहा कारक उपलब्ध आहेत. नामे स्वरान्त आणि व्यजनान्तही आहेत. व्याकरणात त्याचे वर्गीकरण असेच होते. मराठीत व्यजनान्त, हलन्त नामे लुप्त झाली आहेत. खोतनीत ती जिवन्त आहेत. खोतनीची कारक व्यवस्था मूळ भारोपीय, प्राचीन ईराणी आणि संस्कृतातल्या सारखीच आहे. खोतनी भाषेच्या क्रियापदात अवेस्ता भाषेतल्याप्रमाणे सर्व अर्थ व प्रयोग आढळून येतात.

सोग्दिका–शूलिका

शूलिक हे लोक आणि शूलिका ही त्यांची भाषा, ही संस्कृत साहित्यात नित्याची वस्तु आहे. शूलिका पैशाची-ही पैशाची प्राकृताची एका प्रमुख भाषा म्हणून पैशाची या यक्षप्रश्नाच्या पांचवीला पुंजलेलीच आहे. सोग्द, सोग्दिया, शूलिक हा आमू (वंक्षु) नदी आणि जक्सार्तिस नद्यांच्या दर्म्यानचा प्रदेश. तो

ट्रान्स्-आक्जियाना अथवा मावराउन्नहर. हा सोग्द, सुग्द देश व लोकांची भाषा ती सोग्दिका म्हणजेच शूलिका-चूलिका. या शूलिक भाषेत बरेच साहित्य असून ते आताशा प्रकाशात आलेले आहे. ही मूलतः आर्यभाषा असून तिचा समावेश भारेराणी (भारत-ईराणी Indo-Aryan) भाषासमूहात होतो. ती ईराणी वंशातील असून ती पूर्व-ईराणी उपभाषात मोडते. या शूलिका भाषेच्याही दोन तीन बोली प्रामुख्याने पुढे आलेल्या आहेत. शूलिका भाषेतील बौद्धधर्मीय साहित्यात आढळणारी बौद्ध शूलिका, ख्रिस्ती लोकांच्या साहित्यातून आढळणारी ख्रिस्ती शूलिका आणि इ. स. च्या दुसऱ्या शतकात झालेल्या मानी या धर्मपंथ संस्थापकाच्या साहित्यातून दिसून येणारी मानीकी शूलिका (Manichaean Sogdian). या शूलिका भाषेचा अभ्यास गेल्या शेपन्नास वर्षात विद्वानांनी गेलेला असून, बरेच साहित्य प्रकाशित झालेले आहे. ही शूलिका भाषा इ. स. च्या दहाव्या शतकापर्यंत सर्व मध्य-आशियात बहुप्रयुक्त होती (बुलेटिनई, पृ. ७५). तिचा पगडा समरकंदपासून खुमानपर्यंत आणि करबलगसूनपासून लदाखपर्यंत बसलेला होता. शूलिका भाषेतील अनेक प्रत्नलेखांपैकी दोन लेख लदाख प्रदेशात सापडलेले आहेत. या भाषेतील उपलब्ध साहित्यावरून विद्वानांनी असा निष्कर्ष काढलेला आहे की शूलिक लोकांची संस्कृति मध्य-आशियात इ. स. दहाव्यापर्यंत सर्वव्यापी होती. शूलिका भाषेचा वापर सर्वत्र होता. काही विद्वानांच्या मते ती मध्य-आशियाची राष्ट्रभाषा होती. तिचे हे स्थान एका सहस्रकापर्यंत अप्रतिहतपणे चालू होते. एका दृष्टीने ही पूर्व आणि पश्चिम यांच्या सगमाचे माध्यम म्हणून वावरत होती. चिनी तुर्कस्तानात ह्या भाषेचा व शूलिक गणाच्या संस्कृतीचा विशेष प्रभाव दिसून येतो. तुर्क आणि त्यांच्या उइगूर भाषेवर या संस्कृतीची चांगलीच छाप पडलेली दिसून येते. हा प्रभाव पूर्व आणि पश्चिम तुर्कस्तानात सारखाच दिसून येतो. तुर्की भाषची वर्णमाला शूलिक वर्णमालेचेच अनुकरण आहे. इ. स. च्या दहाव्या शतकाच्या अखेरीस शूलिका भाषेचे वर्चस्व लोप पावू लागले. त्याचे कारण म्हणजे पूर्वेकडून तुर्कांची सत्ता आणि भाषा वाढत गेली आणि पश्चिमेकडून तिला ईराणी लोक व त्यांची भाषा यांचा शह लागला. असे असले तरी आज देखील ही भाषा, ज़रफ़शान नदीच्या खोऱ्यात, विशेषतः तिची उपनदी असलेल्या यग़नाब नदीच्या परिसरात बोलली जाते. हा प्रदेश समरकंद नगराचा भू-प्रदेश होय. तेथील आजची बोली ही प्रत्यक्षतः प्राचीन शूलिका भाषेपासून विकसित झालेली आढळते.

या शूलिका भाषेची भाषावैज्ञानिक वैशिष्ठ्ये भारतीय भाषा व मराठीच्या दृष्टीनेही तपासून पाहाण्यासारखी आहेत. कारण चूलिका पैशाचीच्या दृष्टीने आपले हितसंबन्ध या भाषेत गुंतलेले आहेतच. तूर्त एवढे सांगण्यास हरकत नाही. चूलिका पैशाची प्राकृतातील नियमाप्रमाणेच, अन्य भाषातील घोष व्यंजनाचा अघोष वर्ण बनविण्याची या शूलिका-सोग्दिका भाषेची प्राचीन प्रकृति आहे.

इ. स. च्या दुसऱ्या तिसऱ्या शतकापासून शूलिका भाषेत बौद्ध धर्म व परम्परांचा प्रवेश झालेला आहे. ब्रफ याने (ब्रफ, पृ. ५०) खोतनी भाषेतील जबोदण (सं. जाम्बूनद) शब्दाची चर्चा करीत असतांना या शब्दाची शूलिका भाषेतील रूपेही दिलेली आहेत. शूलिका भाषेत या शब्दाची रूपे चंपव्दन, चंपोदन अशी होतात. येथे ज आणि ब या घोष ध्वनींचे च आणि प या अघोष ध्वनीत रूपान्तर झालेले आढळते. तसेच सं. ब्राह्मण शब्दातील ब ध्वनीचा शूलिका भाषेत प बनतो. म्हणजे अन्य भाषातील घोष व्यंजनांचे अघोष व्यंजन बनवण्याची खोड शूलिका भाषेला पूर्वीपासून जडलेली आहे.

खोतनी शक

खोतनी शक भाषा ही भारेराणी भाषाकुलातील असून ती ईराणीगटात समाविष्ट आहे. पूर्व ईराणी भाषातील ती एक प्रमुख भाषा आहे शूलिका भाषेतल्याप्रमाणेच या भाषेतही अन्यभाषीय घोष व्यजनाचा अघोष व्यंजन बनण्याचा नियम दिसून येतो. त्याला फक्त दन्त्य वर्णांचा अपवाद दिसून येतो. मराठीच्या दृष्टीने आणखी एक अत्यन्त महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे खोतनीत आढळणारे चवर्गातील दन्त्यवत्स्र्य उच्चार होत. ही दन्त्यवत्स्र्य उच्चाराची परम्परा पष्तो, काश्मीरी आदि दरदीय भाषा आणि खोतनीत आढळून येते. तीच अवस्था मराठीत आढळते. दन्त्यवत्स्र्य उच्चार तेलुगु भाषेतही आढळतात. या उच्चाराच्या परम्परेचा मागोवा घेण्याचा प्रयत्न आम्ही दुसऱ्या एका लेखात केलेला आहे. म्हणून अधिक खोलात जाण्याचे येथे कारण नाही. हे दन्त्यवत्स्र्य उच्चार तेलुगु भाषेतून मराठीत आले, असे मानणे इतिहासक्रमाच्या विरोधी पडते. हे उच्चार आर्यभारतीय भाषांशी आलेल्या मुंडा-ख्मेर, द्राविड भाषाकुलाच्या सम्पर्काने आले असण्याची शक्यता दूरान्वित वाटते. तसे असते तर ही प्रथा सर्व तमिलकुळात आढळली असती. शिवाय उरिया, बंगला, असमी, हिंदी, गुजराती भाषांतही ती आढळावयास पाहिजे होती. परंतु तशी वस्तुस्थिति नाही. याखेरीज हे उच्चार खोतनी शक, पष्तो, काश्मीरी आदि भाषात कसे आले हा प्रश्न राहातो. हे उच्चार ज़हन्द भाषेच्या सम्पर्काने पष्तो भाषेत आले, असे ट्रम्प्प् याचे म्हणणे आहे (ट्रम्प्प्, प. १०). म्हणून दन्त्यवत्स्र्य उच्चारांचा उद्गम व विकास ज़हन्द भाषेच्या साहचर्याने पूर्व ईराणात झालेला आढळतो. या साहचर्याने तो काश्मीरी वा दरदीय म्हणजे पैशाची भाषात आला. खोतनी, पष्तो आदी भाषा बोलणाऱ्यांचा भारताशी व महाराष्ट्राशी इ. स. च्या पहिल्या सहस्रकात भरपूर सम्पर्क आलेला होता. म्हणून ही उच्चारप्रथा वायव्येकडून भारतात, महाराष्ट्रात आली व महाराष्ट्राच्या संगतीने फक्त तेलुगु भाषेला चिकटली, असे मानणे सयुक्तिक होईल. आता हे उच्चार पंजाबी, सिंधी गुजराती, हिंदी भाषात का

नाहीत याचा उलगडा व्हायला पाहिजे. शकगणप्रभाव कालात या भाषातून नव्याने प्रविष्ट झालेले हे उच्चार शकांचा प्रभाव लोप पावल्यानंतर, हे उच्चार मूलतः अप्राप्त असलेल्या, ईराणी आणि मध्य आर्यभारतीय, या भाषांच्या सतत आक्रमणाने लोप पावले. महाराष्ट्र हा भौगोलिक दृष्टीने अलग व वियुक्त असल्याने (पाहा-म. सा. पत्रिका) हे उच्चार मराठीत जिवन्त राहिले. हा प्रश्न अत्यंत खोल, गुंतागुंतीचा आहे. यावर अद्यापि विद्वन्मत स्थिर झालेले नाही. परंतु वस्तुस्थिति ही की खोतनी शक, पष्तो, काश्मीरी आणि तेलुगु या भाषांत हे दन्त्यवर्त्स्य उच्चार आज नांदत आहेत.

खोतनी शकभाषेत, कोनौ याच्या अध्ययनानुसार (कोनौ प्रा, पृ. १९) च़, छ़, ज़ (tc, ts, js) असे तीन दन्त्यवर्त्स्य उच्चार उपलब्ध आहेत. ts याचा उच्चार मराठी छ़ सारखा असावा असे वाटते. दन्त्यवर्त्स्य झ उच्चार नाही. तो मराठी, तेलुगु भाषात आहे. या उच्चारांनी युक्त च़ंज़ (केश, मराठी, झिंजी, झिंजोटी), च़हौर (अवेस्ता चथ्वारो, सं. चत्वार), छ़ात (अवेस्ता श्यात–श्रीमंत), ॰छु, ॰छुत (अवे श्यु–जाणे); ज़न, ज़त (अवे. जन्, सं. हन्, वध करणे), ज़ीन (अवे. गय–जीवन, आयुष्य) आदि अनेक शब्द सापडतात.

घोष व्यंजनाच्या अघोष व्यंजन बनण्याच्या नियमाची चर्चा टी. बरो याने केलेली आहे (बरो, पृ. ५). इतरत्रही ही चर्चा आलेली आहे. खोतन देशातील शन-शन भागात ग्, ज्, द्, ब हे घोष वर्णच नव्हते. म्हणून अन्य भाषांतील या वर्णांनी युक्त असलेल्या शब्दांची रूपांतरे अघोष व्यंजनात झालेली आढळतात. उदाहरणार्थ किलने– सं. ग्लानि, आजार; योकछेम– सं. योगक्षेम; चंल्पित– सं. जल्पित; चंन्म–सं. जन्म; सचिदति–सं. सर्जितन्ति; चनति – सं. जनति; दण्ट–सं. दण्ड; पोग –सं. भोग इत्यादि. कोनौ यांनी अभ्यासिलेल्या संघाटसूत्रात (कौनौसं, शब्दसूची) खालील शब्द आलेले आहेत. खोतनी भाषेत ख़ ध्वनीचा उच्चार ईराणीतल्याप्रमाणे जिह्वामूलीय होतो. हा संस्कृत–मराठीतल्यासारखा महाप्राण उच्चार नव्हे. संख़ाराम – सं. संघाराम; संख़ाल – सं. प्राकृत संघाट; सिंख़ल, – प्रा. सिंघल – सं. सिंहल (सीलोन); विश्पस्त – प्राकृत विश्वस्त, सं. विश्वस्त

भारतीय प्राकृतात चूलिका पैशाची म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भाषेत या नियमाचा प्रसार कसा आहे याचा निर्वाळा पिशल आदि मण्डळींनी घेतलेला आहेच (पिशल, पारा § १९१). तेथे अनेक शब्दांचा उल्लेख आलेला आहे. दुर्गापासून तुक्का, भगवती शब्दापासून फकवती (मराठी फोकला-ली), मधुर शब्दापासून मथुर, मथुरा, माथूर हे शब्द लक्ष्य आहेत.

प्राचीन शिलालेखातूनही (सरकार, पृ. ११६, २२५) या नियमाची पडलेली सावली दिसून येते. भक्रवत्रो (भगवतः), सर्वस्तिवत्रन (सर्वास्तिवादिनाम्);

बुधत्रेवस (बुद्धदेवस्य), उत्रएन (उदयेन) अशी रूपे इसवी सनारम्भी सापडतात. ही प्रथा पुढेही चालू होती, उदा. तिवसे (दिवसे), तिविर (दिविर, दिवीर, दबीर, डबीर).

खोतनी शक भाषेतील शब्दभाण्डाराकडे पाहिल्यास तेथे काही शब्द असे आढळतात की त्यांचे नाते मराठी भाषेतील काही शब्दाशी असावे असे वाटते. अलग अलग वंशातल्या भाषात समध्वनि व समकाय शब्द आढळतात. परंतु त्यांचे अर्थ अगदी वेगवेगळे असतात. उदा० इंग्रजी भाषेतला सफर आणि ईराणी भाषेतला सफर. एकाचा अर्थ सहन करणे तर दुसऱ्याचा अर्थ प्रवास करणे. अशा स्थितीत या दोन शब्दात ध्वनिसाम्यांखेरीज कसलेही नाते असत नाही. येथे ध्वनिसाम्य आढळले तरी आर्थवैन्यासिक नाते मुळीच संभवत नाही. परंतु खोतनी शक भाषेतील शब्दांविषयी असे म्हणता येणार नाही. कारण खोतनी शक भाषा आणि पश्चिम भारतातील नव्य आर्यभारतीय भाषा या सगोत्र भाषा आहेत. त्यांचे कुल एकच आहे त्यांचा मातृप्रदेश अगदी सलग आहे. एकेकाळी, दीर्घ मुदतीपर्यंत शक जनसमूहाचा पश्चिम भारताशी निकटचा सम्बन्ध आलेला आहे. पञ्जाबी, लहंदा, सिंधी, राजस्थानी, गुजराती, मालवी आदि भाषांतील शब्दांशी खोतनी शक भाषेतील शब्दांची तुलना, ऐतिहासिक व सांस्कृतिक क्षेत्रात अत्यन्त महत्त्वपूर्ण असली तरी ती आमच्या आवाक्याच्या बाहेर आहे. परंतु खोतनी भाषेतील काही शब्दांची तुलना मराठी भाषेतील काही शब्दाशी करणे एवढेच प्रस्तुत प्रसंगी शक्य आहे. अशी तुलना प्राचीन इतिहास व संस्कृति समजून घेण्याच्या दृष्टीने अत्यन्त उपयुक्त ठरावी, अशी आमची धारणा आहे. म्हणून खोतनी शक भाषेतील काही शब्दांची चर्चा येथे अप्रस्तुत होणार नाही.

आज़ण–अजन्ता

महाराष्ट्रातील अजन्ता येथील निरुपम लेणी आणि अजन्ता हे स्थाननाम एका दृष्टीने अपूर्व आहेत. स्थलकोशात (चित्राव) या नामाची बरीच माहिती आली आहे. या कोशात या शब्दाची व्युत्पत्ति अचल शब्दाचे अपभ्रष्ट रूप म्हणून सांगितली आहे. ह्यु एन च्वंग याने या स्थानाचा, "अचल नामक बौद्ध भिक्षूंचा मठ" असा उल्लेख केल्याचे कोशात सांगितले आहे. व्युत्पत्ति-कोशात या शब्दाचा उल्लेख नाही (कुलकर्णी). अजन्ता शब्दाची व्युत्पत्ति आम्ही अहर्न्त–तक शब्दापासून लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. या कल्पनेस खोतनी शक भाषेत आधार उपलब्ध झालेला दिसून येतो. संस्कृत बौद्धसाहित्यातील अर्हन्त शब्दाचा अनुवाद खोतनी भाषेत आज़ण (मोठा, महार्ह), आज़न, आज़म् अशा स्वरूपात झालेला आढळतो. सं. अर्हन्त् शब्दाचे ज़ोरष्ट्रीय पहलवी रूप अर्ज़ान् आणि नव्य ईराणी

रूप अर्ज़, अर्ज़ान्, अर्ज, अर्जमन्द् असे आढळते. अर्मेनी भाषेत अज़न (स्वस्त), अर्ज़न् (सुयोग्य मूल्य), अर्ज़ (मूल्य) अशी रूपे आढळतात. खोतनी भाषेत आर, सोग्दी भाषेत अर्ग़्, ऑस्सेती भाषेत आर्ग़, सर्वांचा अर्थ मूल्य, अशी रूपे रूढ आहेत. ही शब्द रूपे संस्कृत अर्घ, अर्हति, लॅटिन अल्गा यांच्या समान्तर होत, अशी चर्चा बेली याने केलेली आहे (बेली, खण्ड ६, आज़ण). हाच शब्द जातकस्तव ग्रंथात प्रयुक्त आहे (ड्रेस्डेन). ह्यु एन च्वंग याने उल्लेखिलेले (चित्राव) अचल हे रूप खोतनी शक भाषेतील वरील रूपाशी अगदी जवळचे आहे. ज ध्वनीचा च आणि ण–न ध्वनींचा ल होणे या नित्याच्या प्रक्रिया आहेत.

वरील चर्चेवरून अर्हन्त् या सं. शब्दाची अन्य सगोत्र भाषातील रूपान्तरे डोळ्यासमोर येतात. काही भाषात रफार शेष राहातो, काहीत लोप पावतो. बहुतेक सर्व भाषात ह-ध्वनीचे ज़ ध्वनीत रूपान्तर होते. परंतु ऑस्सेती भाषेत त्याचे ग़ ध्वनीत रूपान्तर झालेले दिसते. भारतामध्ये रफाराचा लोप आणि ह ध्वनीचा जकार झालेला आहे. तसेच अंतिम तकारही शेष राहिलेला आहे. यावरून अर्हन्त, अर्हन्तक या शब्दापासून अजन्ता या स्थलनामाची व्युत्पत्ति सुसंगत व ऐतिहासिक दृष्टया सुगम्य वाटते. अजन्ता येथे प्राचीनतम लेणी बौद्धधर्मीय आहेत, ही गोष्ट महत्त्वपूर्ण व चिन्त्य आहे.

पर्वछ (पर्वचा)

पर्वच़ा हा मराठी शब्द जुन्या पिढीतील सर्वांच्या परिचयाचा आहे. शाळातून संध्याकाळी शाळा सुटण्यापूर्वी, प्रारम्भिक वर्गातील मुलांनी पाठ केलेले उजळणीचे पाडे तोंडपाठ म्हणवून घेण्याची ही पद्धति. पर्वच़ा चालीवर व मोठ्याने म्हणण्यात येई. पर्वच़ा शब्दाचे अन्य रूप पर्वता असे देखील रूढ आहे. नवीन शिक्षणपद्धतीत पर्वच़ाला खो मिळालेला आहे. व्युत्पत्ति कोशात (कुलकर्णी) परवच़ा, –वज़ा असा पाठ नोंदून त्याच्या व्युत्पत्त्यर्थ प्रवचन आणि परावृत्ति शब्दांचा उल्लेख केलेला आहे. परंतु या दोन्ही शब्दांचा पर्वच़ा शब्दाशी काही संबन्ध जुळत नाही. खोतनी शक भाषेत (बेली, खण्ड ६, पर्वछ) पर्वछ शब्दाचा अर्थ परिपक्व करणारा Maturand असा दिलेला आहे. समान्तर संस्कृत ग्रंथावरून, हे परि-पच्य धातूचे रूप आहे असे बेली याने म्हटलेले आहे. पर्वचि म्हणजे परिपक्वता असाही शब्द त्याने उल्लेखिला आहे. जुन्या खोतनी भाषेत हे रूप परिपाछ् असेही आढळते. या चर्चेवरून, मराठीतील पर्वचा शब्दाची व त्याच्या प्रथेची कुळीमुळी पाहातांना खोतनी शक भाषेतील पर्वच, परिपाछ् शब्दाचे अस्तित्व अत्युपयुक्त ठरावे. अर्थविन्यास ध्यानी घेतल्यास, पर्वच़ा शब्द शकांच्या साहचर्याने आला असे म्हणावे लागते.

पूस्तिय, पुस्तक

पुस्तक हा शब्द आजच्या संस्कृत साहित्यात वावरत असला तरी तो संस्कृतात अतिथिरूप व आगन्तुक आहे. वैदिक, ब्राह्मण आदि प्राचीन साहित्यात त्याचाआढळ नाही. तो महाभारतातही नाही असे कोशावरून वाटते. पुस्तकासाठी अस्सल सं. शब्द ग्रन्थ असा आहे. ग्रन्थ शब्दात मूळ ग्रथ् असा धातु असून त्याचा मौलिक अर्थ, गांठ बांधणे, गाठ बांधून जतन करणे, रचना करणे असा आहे. फुलाची जुळणी करून माळ बनविणे हा देखील ग्रन्थच. परंतु शब्दरचनेमुळे सुसंगत रचलेला तो ग्रन्थ, अशी ग्रंथ शब्दाची व्युत्पत्ति परम्परा आहे. हा शब्द वैदिक साहित्यातसुद्धा आढळतो. ग्रंथ हाच खरा वैदिक आर्यांचा शब्द होय. परंतु पुस्तक शब्दाचे तसे दिसत नाही. व्युत्पत्तिकोशात (कुलकर्णी) बरेच उल्लेख आहेत. द्राविड भाषात पुसु, पुस्त म्हणजे घासणे, लिहिणे आदि अर्थाचे शब्द दिले आहेत. तसेच खोतनी भाषेतील पूस्तिय व तुषारीय भाषेतील पोस्तक शब्दांचाही उल्लेख आलेला आहे. पण निश्चित असे मत व्यक्त केलेले नाही. खोतनी शक भाषेत (बेली, खण्ड ६, पल्शित, पुस्तिया) पुस्तकांसाठी पूस्तिय, पूस्त्य अशी शब्दरूपे प्रयुक्त झालेली आढळतात. तोखारी (तुषारीय) भाषांत पोस्तक, पोस्तिक असे शब्द येतात. प्राचीन फार्सी भाषेत पवस्ता (लखोटा) असा शब्द आढळतो. ऋग्वेदात (मण्डल १०.२७.७) पवस्ते (म्हणजे दोन लखोटे) असा प्रयोग आलेला आहे. पाली भाषेत पोत्थक शब्द आहे. हे पुस्तक शब्दाचे तद्भव रूप असावे. मध्यकालीन पारसीक भाषेत पोस्तग असे रूप ग्रंथासाठी प्रयुक्त आहे. सोग्दी भाषेत पोस्त, पोस्त्यच् अशी रूपे आढळतात. वरील पुराव्यावरून असा अंदाज वर्तविणे सुसंगत ठरावे की पुस्तक, पोस्तक हे रूप मध्यआशियात रूढ होते. मध्यआशियाचा वायव्य भारताशी नित्याचा संबन्ध राहिलेला आहेच.

खोतनी शक भाषेत पल्शित (बेली, खण्ड ६) म्हणजे पाठ, शरीराचा मागचा भाग असा शब्दही रूढ आहे. पश्ति असे रूपही आढ़ळते. सोग्दी भाषेत ते रूप पर्च्., पर्च्यं असे आढळते. वख़ी भाषेत पर्त म्हणजे जनावराची पाठ, यिदगा भाषेत पीश्चो, पिश्च्यो, पिश्च्य अशी रूपावली आढळते. ही रूपे अवेस्ता पर्शित, जरतुष्ट्रीय पहलवी पुश्त (पाठ), पुश्तक (पाठीवरील ओझे), नव ईराणी पुश्त (पाठ), संस्कृत पृष्ठ यांच्याशी समान्तर अशी आहेत.

या सर्व बाबींवरून पुस्तक या वस्तूचा मुख्य हेतु पाठीला, वस्तूच्या बाजूंना मिळालेला आधार हा होय. म्हणून भूर्जपत्र, चर्म, कागद आदीपासून बनलेल्या ज्या वस्तूला पाठ म्हणजे आधार मिळालेला असतो, ते पुस्तक होय. म्हणून पुस्तकाची कल्पना ग्रंथ वस्तूच्या मूळ कल्पनेहून पुष्कळच उत्तरकालीन दिसते. ईराणी भाषा-

कुलातील पुस्तक शब्दाचे प्राचीनत्व आणि संस्कृतातले त्याचे नवीनपण पाहाता, हा शब्द ईराणी भाषांतील उसनवारी असावी असे वाटते.

चंझ़ि - झिंज़ी

व्युत्पत्तिकोशात (कुलकर्णी) झिंझी शब्दाची चर्चा आहे. परंतु सं. झिण्टी म्हणजे झुडूप आणि देशी प्राकृत शब्द झंटी लघूर्ध्वकेशा: हे एकाच दावणीत बांधलेले आहेत. उद्धवगीतेतील झिंजी म्हणजे केस शब्दावरून हा शब्द महानुभावीय मराठीत होता असे आढळते. झंटी हा शब्द जट, जटा शब्दाचे अपभ्रष्ट रूप असावे. त्याचा झिंजी शब्दाशी सुतराम् संबन्ध नाही. झिंजी शब्दाची कुळी अन्यत्र पाहिली पाहिजे. खोतनी शकभाषेत चंझ़ि असा शब्द रूढ असल्याचे दिसून येते (बेली, खण्ड ६, चंझ़ि). लक्ष्य गोष्ट अशी की येथे च आणि झ या तालव्यांचा उच्चार दन्त्यवत्स्र्य आहे. या शब्दाचे मराठी झिंज़ी शब्दाशी साम्य न्याहाळून पाहाण्यासारखे आहे. ते ध्वन्यात्मक आणि आर्थवैन्यासिक असे दोन्हीप्रकारे आहे. शब्दाचा अर्थ आहे केस, बाल. खोतनी भाषेत या शब्दाचे चझ़ असेही रूप आहे. रूपान्तरित अन्य संस्कृत ग्रंथात या शब्दासाठी केस हा प्रतिशब्द वापरल्याचे आढळते. तो केस शब्दापासून आहे की काय हे सांगितलेले नाही.

बुळा

आजच्या मराठी भाषेत बुळा शब्द व तत्संबंधित इतर शब्द सर्वपरिचित आहेत. व्युत्तिकोशात (कुलकर्णी) या शब्दाच्या संबंधात सं. प्लुष् स्नेहने असा युत्पत्त्यर्थ उल्लेख आहे. परंतु हे अशक्य वाटते. महानुभवकालीन मराठीत बुळा शब्द आढळत नाही असे वाटते. खोतनी शक भाषेतील बकशौक्रअ (कोनौमे) या शब्दावरून मराठीतील या शब्दाचे मूळ मिळते की काय, हे विचार्य आहे असे वाटते. बकशौक्रअ या शब्दाचा अर्थ Whose semen (Skt. sukra) is reduced असा आढळतो. बकशौक्रअ शब्दाचे दुसरे रूप बव-हौव, बहौव असे असून त्याचा अर्थ गतशक्ति, दुबळा, निर्बळ असा आहे. बकशौक्रअ, बकशौक्र या रूपातील दुसरे पद संस्कृत शुक्र (वीर्य) शब्दाशी संबद्ध आहे. बक या प्रथम पदाचा अर्थ गत, गेलेला, विहीन असा आहे. यावरून सांकेतिक संस्कृत शब्द *विकलशुक्र, *विगतशुक्र असा असू शकेल. विकलशुक्र याचे खोतनी शक बकशौक्र रूप शक्य आहे. अर्थविन्यास अगदी सुसंगत असा आहे. खोतनीतील बव-हौव व बहौव ही अन्य रूपे बकशौक्र या शब्दाची अधिक अपभ्रष्ट व तभ्दव रूपे होत. बकशौक्रअ शब्दाचे बुळा शब्दात रूपान्तर शक्य आहे असे वाटते. बअओरअ, बोरा, बुला, बुळा ही रूपान्तरप्रक्रिया शक्य अशी वाटते.

बक या प्रथम पदाची रूपान्तरे पत, बव अशीही आढळतात (कोनौमे). शब्दाचा अर्थ क्षुद्र, क्षीण, क्षुल्लक असा आढळतो. बेली याने (बेली, खण्ड ६, वत) या शब्दाचे वत असे रूप चर्चिले आहे. येथे ब, बक, बकलक अशी खोतनीतील रूपेही उध्दृत आहेत. बकशौक्र, बक, ब्वाक, ब-हौव या रूपांचाही उल्लेख आहे. बेली यांनी वक व वत यांची अभिन्नता मानलेली आहे. **बक**, पत या या रूपावरून आधुनिक ईराणीतील बद म्हणजे वाईट, क्षुद्र, दुष्ट हा शब्द व्युत्पादिला आहे. पुष्कळ वेळा क्षुद्र, निर्बल याचाच अर्थ पुढे चालून वाईट, दुष्ट असा होतो. वद या ईराणी शब्दाचे जुने गणगोत पाश्चात्य ईराणी वत, जोरष्ट्रीय पहलवी वत्, वत्तर; खुरी गोद; बलोची ग्वत् असे नोंदविलेले आहेत. हाच शब्द ऋग्वेदात (१०.१०.१३) **बतो बतासि यम** यात आलेला आहे असेही म्हटले आहे. क ध्वनीचे त रूपांतर होण्याची चर्चा पुढे तास शब्दाच्या चर्चेत केलेली आहे.

ईराणीच्या संपर्काने बद हा शब्द नव्य मराठीत नित्य प्रयुक्त आहे. बदमाश, बदफैली, बदनिय्यत असे अनेक शब्द मराठीत येतात.

तास

मराठीत रूढ असलेल्या तासगाव, चास आदि शब्दातील तास, चास शब्दांची चर्चा मी पूर्वी एके ठिकाणी केलेली आहे (चौहान, पृ. २). ईराणी भाषात क ध्वनीचे त ध्वनीत रूपान्तर होण्याची प्रक्रिया दिसून येते. तसेच क ध्वनी च ध्वनीत रूपांतरित होतो. परिणामरूपाने कृष्, कृष्ट शब्दाची रूपे तास आणि चास अशी निष्पन्न होतात. हे दोन्ही शब्द मराठी आदि भाषात आगन्तूक रूपाने वावरतांना दिसतात. हे शक लोकांच्या पश्चिम भारतातील संचाराचे फलित होय.

क ध्वनीचे त ध्वनीत रूपान्तर होण्याची अन्य उदाहरणे खोतनी शक भाषेतही सापडतात (बेली, खण्ड ६, आताशीय). येथे मूळ शब्द आताश असून आताशीय हे त्याचे विशेषण रूप होय. आताश हे सं. आकाश शब्दाचे रूपान्तर होय.

च अव्यय

मराठीतील च या अव्ययाची चर्चा मी कै. वि. का. राजवाडे यांच्या या अव्ययासंबंधीच्या मताचा विचार करतांना या पूर्वी केलेली आहे (चौहान, पृ. १९७). मराठी च हे अव्यय संस्कृत एव या अव्ययाचे तभ्दव रूप आहे. महाराष्ट्री प्राकृतात त्याचे रूप चिअ, च्चिअ, चेअ, च्चेअ असे असून (गाथा-सप्तशती), गुजराती भाषेत त्याचे रूप ज असे आहे. ब्लोकने हा शब्द चैव शब्दापासून व्युत्पादिला आहे (ब्लोक). पण ते योग्य दिसत नाही.

गुजराती भाषेतील ज हे रूप प्राकृत रूपाशी व आर्य-भारतीय परम्परेशी

अगदी सुसंगत असे आहे. वैदिक परम्परेत य ध्वनीचे य आणि ज उच्चार होत, हे यजुर्वेद व जजुर्वेद या प्राचीन परम्परेवरूनही स्पष्ट आहे. सं. यत् (सर्वनाम आणि अव्यय) याची प्राकृत रूपे जं, जअ अशी होतात. ती नियमानुसारीच आहेत (पिशल, पारा § २५२). परंतु य ध्वनीचा शुद्ध प्राकृतात च ध्वनि बनत नाही. य ध्वनीचा च बनण्याची प्रक्रिया पैशाची प्राकृतात, विशेषत: चूलिका पैशाचीत घडून येते. नियोजित शब्दाचे चूलिका पैशाचीतील रूप नियोचित असे आहे. चूलिका पैशाचीच्या चर्चेत याची आणखीही उदाहरणे आहेत (पिशल, पारा § १९१). चात (सं. जात), चीमूत (सं. जीमूत), छच्छर (सं. झर्झर), छंकाल (सं. झंकार), राच (सं. राजन्), चचन (प्रा. जजण, सं. यजन), चच्चर (सं. जर्जर), निच्छर (सं. निर्झर) इत्यादि रूपे लक्ष्य होत. येथे ही गोष्ट ध्यानात येते की सं. य ध्वनीचे च ध्वनीत रूपान्तर होण्याची परम्परा फक्त चूलिका पैशाचीत आढळते. गाथासप्तशतीत सं. एव शब्दाची चिअ, चेअ ही आढळणारी रूपे चूलिका पैशाचीच्या महाराष्ट्री प्राकृतावरील प्रभावाचे द्योतक आहेत. चूलिका ही सोग्दी लोकांची, Transoxonian किंवा मावराउन्नहर या प्रदेशात राहाणाऱ्या प्राचीन लोकांची भाषा. शक आणि चूलिक लोक पश्चिम भारतात स्वैरपणे वावरत होते. या लोकांनी वापरलेली प्राकृत भाषा म्हणजेच पैशाची प्राकृत होय. चूलिका पैशाचीचे भाषिक विशेष एके काळी सर्वच पश्चिम भारतात नांदत असावेत. माळवा, पारियात्र येथील लोकांची, राजशेखरच्या साक्षीनुसार, पैशाची भाषाच होती. म्हणून माझे गृहीत असे आहे की जुन्या गुजराती, सिंधी, पंजाबी, राजस्थानी, माळवी भाषांत पैशाचीचे अवशेष होते. पण आर्य-भारतीय परम्परेच्या सतताघाताने हे अवशेष घासून पुसून गेले. मराठी भाषाक्षेत्र हे अन्य आर्य भारतीय भाषांपासून विंध्य, सातपुडा, सह्याद्रि या पर्वतराजींनी वियुक्त झालेले आहे. म्हणून मराठी भाषाक्षेत्रातील पैशाची प्रभाव कमी घासून पुसून गेलेला आहे. मराठीत हे अवशेष बरेच सापडतात.

या प्रस्तावनेचा हेतु असा की सं. एव अव्ययाचे गुजराती रूप ज असे आणि मराठी रूप च असे का व्हावे. ज या प्राकृत रूपाचे मराठी च हे अव्यय पैशाचीच्या कुशीतून जन्मलेले आहे. च असे रूप अन्य भाषात आढळत नाही. ते दक्खिनी हिन्दी या अरबी-ईराणीलिपिगत भाषेत मराठीतूनच गेलेले आहे. गाथासप्तशतीतील चिअ चेअ आणि मराठीतील च या अव्ययांचा वारसा केवळ पैशाची प्रभावाचे फलित आहे.

खोतनी शक भाषेचा शब्दकोश डॉ. हारोल्ड बेली रचीत आहेत. सं. यत (सर्वनाम आणि अव्यय) शब्दाची रूपे चहूंकडे आढळतात. सं. यत् याची खोतनी शक भाषेतील रूपे ची (बेली, खण्ड ६, ची), चु (अव्यय–बेली, खण्ड ६, त्वेर; तसेच ड्रेस्डन, चु, चुए; तसेच कोनौप्रा, चु, चू, चूडे, चे), चू, चे इत्यादि होतात.

यावरून अपभ्रंशकालीन व जुन्या मराठी आदि भाषातील जु, जे आदि रूपे वरील रूपाशी सहेतुकपणे तुलनीय ठरतात. चु, चू, चि–चिह ही रूपे पष्तो भाषेतदेखील रूढ आहेत.

फुशारी-भुशारी

फुशारी, फुशारकी असा शब्द मराठीत रूढ आहे. तुळजापूर, लातूरकडील ग्रामीण भागात भुशारी असा शब्दही रूढ आहे. फुशारी शब्दाचेच हे प्रादेशिक रूप आहे. दोन्ही शब्दांचा अर्थ मात्र एकच आहे. व्युत्पत्तिकोशात (कुलकर्णी) याची दखल आहे. व्युत्पत्त्यर्थ अरबी-फार्सी फुशार लिहून पुढे प्रश्नचिन्ह आढळते. या दोन्ही भाषात मराठीतील रूढ शब्द कोठेच सापडत नाही. कोशात सं. प्रोत्साह आणि प्रश्नांकित प्राकृत पोस्साह यांचे उल्लेख आहेत. हे दोन्ही प्रयत्न यशस्वी आहेत असे वाटत नाही. ज्हूल् ब्लोक यांनी बुळा, फुशारी या सारख्या शब्दांचा उल्लेख केलेला नाही. खोतनी शक भाषेत बूश, बूशि असा शब्द असून (बेली खण्ड ६, बूशि) त्याचा अर्थ थट्टा, मस्करी, क्रीडा असा आहे. तसेच बूशरा म्हणजे थट्टेखोर असा प्रयोगही नोंदलेला आढळतो. बूशरा शब्दाची गृहीत व्युत्पत्ति बूश-करक अशी सुचविलेली आहे. मराठीतील फुशारी (शेखी मारणारा, बढाईखोर) शब्दाची या खोतनी शब्दाशी, तुलना करता येण्यासारखी आहे. मराठी आणि खोतनी भाषेतील या दोन्ही शब्दात अर्थभेद असला तरी मराठीतील अर्थ खोतनी शब्दाला प्राप्त होणे शक्य आहे. आर्थवैन्यासिक बदलाची अनेक उदाहरणे सापडतात. शिवाय ग्रामीण भागातील रूढ शब्दाचे खोतनी शब्दाशी बरेच ध्वन्यात्मक साम्य आढळते. अनेक वेळा महाप्राणत्व आगन्तुकपणे अंगात शिरते.

ओझें

मराठी ओझें आणि गुजराती ओझो हा शब्द सं. वह्य शब्दापासून ब्लोक आणि कुलकर्णी व्युत्पादिलेला आहे. ते योग्य असेच आहे. मराठी आणि गुजराती या भाषांखेरीज, हिंदी आदि भाषात या शब्दाचे रूप बोझ, प्राकृत वोज्झ असे आहे. खोतनी शक भाषेत बज़ि (म्हणजे ओझे) असे या शब्दाचे रूप आहे. तो सं. वह्य शब्दापासून व्युत्पन्न आहे असे सहज कळते. येथे ह ध्वनीचा, ईराणी परम्परेनुसार, ज़ झालेला दिसून येतो. बज़ि (बेली, खण्ड ६) शब्दाची आस्सेती भावंडे लक्ष्य आहेत. ऑस्सेती ही शक भाषेची बोलीच आहे. ऑस्सेतीच्या दिगोर बोलीत, बज़ि शब्दाचे रूप उइज़ि आणि इरोन बोलीत उइज़ (ओझें) व उइज़्जौ (वजनदार) असे आहे. याची यग्ज़ बोलीत वेज़, शुग्नी बोलीत वीज़, रोशानी बोलीत वेज़, अवेस्ता भाषेत वज़्य अशी रूपे आढळतात. ऑस्सेती भाषेतील रूपे लक्ष्य आहेत.

हमरू, हिमरू

हिमरू नावाचे जरीकाठी उत्तम प्रकारचे कापड औरंगाबाद येथे बनत असल्याचे सर्वपरिचित आहे. ते मुस्लिमकालापासून येथे बनत आहे. असे आढळते. खोतनी शक भाषेत हंद्रु या रूपात एक शब्द असून त्याचा अर्थ Sewn cloth असा आहे. (बेली, खण्ड ६). यावरून हंद्रु हे एक विशिष्ट प्रकारचे कापड आहे, हे उघड होते. डॉ बेली यांनी केलेल्या चर्चेवरून कशिदा काढलेले, वेलबुट्टीचे कापड असा या शब्दाचा अर्थबोध होतो. बेली यांनी हा शब्द हन्दर, हन्दर्ब या मूळापासून व्युत्पादिला आहे. हन्दर्ब या शब्दात दोन शब्द हन् आणि दर्ब मिसळलेले आहेत. दर्ब या धातूचा अर्थ विणणे असा होतो. पूर्व ईराणी भाषात हा धातु सर्वत्र आढळतो. खोतनी व ईराणी हन् हे संस्कृत सम् या उपसर्गाचे तद्भव रूप होय. तेच यूरोपीय भाषांत Con–रूपाने वावरते. दर्ब धातूचा अर्थ शिवणे, कशिदा काढणे असा होतो. दर्ब क्रियापदाची रूपे, वख़ी बोलीत द्रोव, द्राव्द; खुरी बोलीत दुर, दुरुफ्त; कुर्द भाषेत (किर्मानशाही) दुर्– अशी आढळतात. हंदर्ब शब्दाची रूपे पराची बोलीत अंदर्फ, अंदुर्फी, अंदोफ्, अंदोफी आणि ओर्मुडी बोलीत अन्दरव अशी आढळतात. अवेस्ता भाषेत दरञ्च (स्नायूंचा संच) असा शब्द आहे. तसेच दर्भ, दृभ शब्द वैदिक साहित्यात असल्याचा उल्लेख बेली यानेच केलेला आहे. शतपथब्राह्मणात दृभ-दर्भति (ओवणे, गुंफणे, माला बनविणे) आलेला आहे असे कोशावरून कळते. हन्दर, हन्द्रु याचा बौद्ध संस्कृत साहित्यात सुवर्णसूत्र असा अनुवाद केलेला आढळतो.

वरील चर्चेवरून औरंगाबादच्या हमरू, हिमरू कापडाच्या मूळ निर्मितिक्षेत्राचा बोध होतो. डॉ. बेली यांनी आधुनिक ईराणीतील या शब्दाचे समीकृत रूप दिलेले नाही. यावरून हमरू ही वस्तु व त्याचा शब्द ही ईराणातून आलेली नसून अफगाणिस्तान, पामीर, खोतन या प्रदेशातून भारतात आयात झाली हे स्पष्ट होते. या शब्दावरून भारतातील सांस्कृतिक प्रभावाची एक वेगळी दिशा दिसून येते.

हिमरू असा शब्द फार्सी शब्दकोशात सापडत नाही. परंतु अन्दरूद असा शब्द स्टीनगासच्या व इतर कोशात असून त्याचा अर्थ Incrustation, decoration असा आढळतो. सं. दृभ् धातूचे भूतकालवाचक धातुसाधित दृब्ध असे आहे. यावरून ईराणी अन्दरूब हा शब्द सं. सन्दृब्ध या शब्दाचा अपभ्रंश आहे, हे स्पष्ट होते. दाते यांच्या मराठी कोशात या शब्दाचा उल्लेख हमरू असा नोंदलेला असून त्याचा ईराणी पर्याय अमरू आहे असे म्हटले आहे. दुसरा ईराणी शब्द अन्दूद असा असून त्याचा अर्थही, नकशी केलेला, वेलबुट्टीचा असा आहे. ज़र-अन्दूदन असा सामासिक शब्दही रूढ असून त्याचा अर्थ जरीची नकशी केलेला असा आहे. तसेच अन्दूदन धातुही ईराणीत रूढ आहे.

वरील चर्चेवरून ही गोष्ट ध्यानी येते की या शब्दाचा खरा उच्चार हमरू

असून हिमरू हा उच्चार अनैतिहासिक व चुकीचा आहे. तो लोकरूढ असावा. या उच्चारावरूनही, हा शब्द पश्चिम-ईराणीतील नसून तो पूर्व-ईराणी भाषांतील म्हणजे पष्तो, खोतनी शक आदि भाषातील होय.

मार्गशीर्ष ६, १८९२.

संक्षेप व संदर्भसूची

एमिरिक – आर्. ई. एमिरिक : सक ग्रॅमॅटिक स्टडीज, लंदन १९६८.
कुलकर्णी – कृ. पां. कुलकर्णी : मराठी व्युत्पत्तिकोश, पुणे शक १८८५.
कोनौप्रा – स्टेन कोनौ : प्रायमर ऑफ खोतनीस सक, ऑस्लो, १९४९.
कोनौमे – स्टेन कोनौ : ए मेडिकल टेक्स्ट इन खोतनीज, ऑस्लो, १९४१.
कोनौस – स्टेन कोनौ : सक स्टडीज, आस्लो, १९३२,
चित्राव – सिद्धेश्वरशास्त्री चित्राव : प्राचीन स्थलकोश, पुणे १८९१.
चौहान – दे. व्यं. चौहान : मराठी आणि दक्खिनी हिंदी, पुणे १८९२.
ट्रम्प् – ई. ट्रम्प् : ए ग्रामर ऑफ दि पष्तो लँग्वेज, तुमिंजेन १८७३.
पिशल – पिशलकृत प्राकृत भाषाओं का व्याकरण, हे. जोशी, पटना श १८८०.
बरो – टी. बरो : लँग्वेज ऑफ दि खरोष्ठी डाक्युमेंटस, लंदन १९३७.
बुलेटिनई – बुलेटिन ऑफ दि ईरानियन कल्चर फाउंडेशन, तिहरान, सायरस स्मारक खण्ड, सौर हिजरी १३४८ (इ. १९६९)
बुलेटिनओ – बुलेटिन स्कूल ऑफ ओरिएंटल अँड आफ्रिकन स्टटीज, लंदन
बेली – एच्. डब्ल्यू. बेली : इंडो-सिथियन स्टडीज, खोतनीज टेक्स्ट्स्.
ब्लोक – ज़्हूल् ब्लोककृत मराठी भाषेचा विकास, वा. गो. परांजपे, पुणे १८६२,
मसापत्रिका – महाराष्ट्र साहित्य पत्रिका, डॉ. इरावती कर्वे, पुणे क्र १७४ शक १८९२.

सरकार – दीनेशचंद्र सरकार : सिलेक्ट इन्क्रिप्शन्स, कलकत्ता, १९६५.

२१ : शब्दांची संस्कृति

शब्दांनाही इतिहास असतो. ज्याप्रमाणे मनुष्य स्थल आणि काल यांच्या प्रवाहातून मार्गक्रमणा करीत आलेला आहे, त्याचप्रमाणे शब्ददेखील निरनिराळ्या भूमीतून व शतकावधींच्या कालप्रवाहातून पर्यटन करीत आलेले असतात. काही शब्द स्थानीय अथवा एकाच देशात वावरणारे दिसतात, तर काहींचा संचार अनेक देशांतून असतो. काही शब्द अलीकडील असतात तर काही प्राचीन, अतिप्राचीनही असतात. मराठी भाषेत वावरणाऱ्या अनेक शब्दांना असा इतिहास आहे. तो प्रत्येक भाषेतील शब्दांना असतो. येथे काही शब्दांचा मागोवा घेण्याचा विचार आहे.

तुरुंग हा शब्द मराठीत सर्वतोमुखी आहे. तो मराठीच आहे असे वाटते. स्व. कुलकर्णी यांनी कारागृह असा अर्थ देऊन कंसात पोर्च्युगीज, डच असे शब्द लिहिले आहे. हा शब्द तद्भाषीय असावा असे सुचविण्याचा हेतु असावा. अधिक उल्लेख वा चर्चा नाही. ईराणी (म्हणजेच पार्सी, फार्सी) भाषेत तुरंग म्हणजे कारागृह असा शब्द आहे. या शिवाय तरंजीदन म्हणजे पिळणे, रस काढणे, दाबणे या अर्थाचे क्रियापदही आहे. त्यापासून ईराणी भाषानियमानुसार बनणारे दुसरे शब्दही आहेत. मराठीत हा शब्द मुसलमानांच्या सम्पर्काने आला हे उघड आहे. तो ईराणीतूनच आला हेही उघड आहे. तो महानुभावकालीन मराठीत नाही.

तुरंग या ईराणी शब्दाचे मूळ पाहाता, हा मूलतः उद्रंग शब्द असावा असे दिसते. द्रंग असा शब्द शक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व भारताला सुपरिचित असलेल्या लोकांच्या खोतनी शकभाषेत रूढ होता. या द्रंग शब्दाची छाननी करीत असताना डॉ. बरो यांनी या द्रंग शब्दाचे मूळ किंवा संस्कृत पर्याय उद्रंग असा दिलेला आहे.)[1] त्याचा अर्थ उंच ठिकाण असा दिलेला आहे. हा शब्द राजतरंगिणीत आला असून अर्थ स्पष्ट नाही असे त्यांनी म्हटले आहे. कुट्टिनीमत ग्रंथात तो उद्रंग रूपात आल्याचेही त्यांनी सांगितले आहे. त्यांनी अवेस्ता भाषेतील या शब्दाचे रूप थ्रख़्त असे दिलेले आहे. द्रंग शब्दाचे अर्थ सीमेवरील ठाणे, करवसूलीचे ठिकाण असा केलेला आहे.

ईराणीत दज़्ह, दिज़्ह म्हणजे गड, पहाडी किल्ला असा शब्द आहे. हा दज़्ह शब्द या द्रंग शब्दाचाच अवतार होय. हा शब्द अफगाणिस्तानात विशेष रूढ आहे. हा शब्द या देशातील अनेक स्थलनामांत प्रविष्ट झालेला आहे. दज़्ह नावाची

१. खरोष्ठी प्रत्नलेखांची भाषा : टी. बरो १९३७, पृ. ९८

अनेक गावे असलेली आजदेखील आढळतात. कुन्दूज़्ह नावाचे नगर उत्तर
अफगाणिस्तानातील तुख़ारिस्तान प्रदेशात आहे. तुख़ारिस्तान म्हणजे संस्कृत
साहित्यातील तुषार देश अथवा लोक होत. हा शब्द मार्कण्डेय पुराण (२०० ते
३०० इ. स. सुमारातील रचना) आणि वराहमिहिराची बृहत्संहिता (सुमारे
इ. ५५०) आदि ग्रंथात आलेला आहे. असो. या तुषारदेशात कुन्दूज़्ह नगर कुन्दूज़्ह
नदीच्या काठी बसलेले आजही उपलब्ध आहे. या कुन्दूज़्ह शब्दाची फोड मिनोर्स्की
याने केलेली आहे).[२] कुन्दूज़्ह म्हणजे कुहन अधिक दूज़्ह होय. वरील दज़्ह शब्दाचा
उच्चार दु-दूज़्ह असाही होता असे दिसते. कुहन या ईराणी शब्दाचा अर्थ जुना,
पुराण असा आहे. आणि कुन्दूज़्ह म्हणजे प्राचीन गड. या नावावरून नदीचे नाव
ही पडलेले आहे असे दिसते. या कुन्दूज़्ह शब्दाची दुसरी व्युत्पत्ति लावणे सहज शक्य
आहे. मूळ संस्कृत उद्रंग या शब्दाचे अफगाणी पष्तो भाषेत कुन्दूज़्ह होणेही शक्य
आहे. कारण सं. उ, व या ध्वनीचे पष्तो व अन्य पूर्व ईराणी भाषात क ध्वनीत
रूपान्तर होते. सं. वृक शब्दाचे गुर्ग असे रूप होते. ईराणात गुर्गिस्तान हा प्रसिद्ध
प्रदेश आहे. सं. वृत् धातूपासून गर्दी-दन हे क्रियापद ईराणीत होते. क, ग आणि
ज ध्वनी स्थान-बोलीपरत्वे एकाच मूळाकडे संकेत करतात. म्हणून कुन्दूज़्ह हा शब्द
मूळ उद्रंग शब्दाचे उत्तरकालीन रूपान्तर आहे असे दिसते. या कुन्दूज़्ह नदीच्या
परिसरात प्रसिद्ध बगलान हे नगर वसलेले आहे. ते प्राचीन आहे.

वरील चर्चेवरून द्रंग किंवा उद्रंग म्हणजे गड, इंग्रजी फोर्ट, किंवा पर्वतस्थ
ठिकाण असा अर्थ होतो. द्रंग या रूपावरून तुरंग असा शब्द निघाला. शक आणि
पष्तो भाषांत सं. द ध्वनीचे त ध्वनीत रूपांतर होते. शक भाषेत वेद शब्दाचे रूप
वेत असे आहे. हाच प्रभाव व नियम पैशाची प्राकृतात दिसतो. प्राचीन काली द्रंग,
तुरंग म्हणजे गड, पर्वतस्थ किल्ले. संस्कृत दुर्ग हा शब्द देखील या द्रंग शब्दापासून
व्युत्पन्न आहे. कुलकर्णी यांनी)[३] दुर्गम शब्दाशी याचे नाते जोडण्याचा संकेत
केलेला आहे. ते योग्य नव्हे. द्रंग, दुर्ग हेच पूर्वी कारागृहाचे कार्य करीत. परवा
पुण्याच्या नाना फडणिसाने तुरुंगासाठी द्रंग, दुर्ग अशा गडाचाच उपयोग केला
होता. नित्याच्या वापरावरून ईराणीत तुरंग म्हणजे कारागृह असा अर्थ रूढ झाला.
त्यावरून धातुही बनविण्यात आला, वगैरे.

टी. बरो यांनी चर्चिलेली शकभाषा इ. सनाच्या तिसऱ्या शतकाअखेरची
खोतनमधील आहे. द्रंग शब्द तेथेच प्रथम कालोलेखासह आलेला आहे असे दिसते.
तेथे द्रंग शब्दाला गडाचा अधिकारी, कर वसूल करणारा, टॅक्स कलेक्टर असेही
अर्थ प्राप्त झालेले आढळते. हे तिसऱ्या शतकातील अर्थसंधारणेतील बदल होत.

२. हुदूद-इ-आलम, संपा. मिनोर्स्की, लंदन १९७०, पृ. ३४०.
३. मराठी व्युत्पत्तिकोश. कृ. पां. कुलकर्णी, मुंबई, १९६४.

म्हणजे हा शब्द मूलतः शकांच्या भाषेत बऱ्याच काळापासून रूढ होता असे म्हणावे लागते. ज्यांनी इतिहास घडविला व संस्कृतीची पावले मागे ठेवली असे शक या आर्यलोकांचे दोन प्रभावी गट होते. एकाने सईस्तान, सजिस्थान, शकस्थान निर्माण केले व दुसऱ्याने खोतनी संस्कृति (खोतन शहर, स्थान ८०° ५′ पूर्व व ३७° १०′ उत्तर) इतिहासपृष्ठांवर सोडली.

खोतनी शक भाषेत षोथंग असाही शब्द आहे. (पाहा वरील बरोक्त ग्रंथ पृष्ठ ९८). ह्याचा संस्कृत पर्याय सोद्रंग असावा. हा स अधिक उद्रंग याचा समास. उद्रंग शब्दापासून औद्रङ्गिक असे रूप बंगाल्यातील ताम्रलेखात इ. ५०७ च्या सुमारास संस्कृत भाषेत वापरले गेल्याचे डॉ. दीनेशचंद्र सरकार यानी सांगितले आहे.)[४] औद्रङ्गिक शब्दाचा अर्थ कर, बलि, टॅक्स असा त्यांनी दिलेला आहे. हा अर्थ खोतनी शकभाषेतील अर्थाशी सुसंगत असाच आहे. मागाहूनच्या शिलाताम्रलेखातून सोद्रंग ग्रामदान असे उल्लेख अनेक आलेले आहेत. गांव अग्रहार द्यावयाचे ते सोद्रंग म्हणजे कर बसविण्याच्या अधिकारासह असा अर्थ होतो. त्या गावी चालू असलेले कर दान मिळालेल्या ब्राह्मणाने घ्यावयाचे असे. असे दान म्हणजे सोद्रंग, म्हणजे उद्रंग याचा अर्थ कर, टॅक्स याच्यासह. परंतु असा अर्थ मो. वुइल्यम्सच्या कोशात नाही. उद्रंग म्हणजे नगर असा अर्थ मिळतो. डेक्कन कॉलेजतर्फे तयार होत असलेल्या संस्कृत कोशात याचा मागोवा येईल.

दुर्ग शब्द मनुस्मृति (इसवी पूर्व २ रे ते इ. २ रे शक) आणि महाभारत (इसवी पूर्व ४ थे ते इ. ४ थे शतक) ग्रंथात दुर्ग म्हणजे गड, किल्ला असा शब्द येतो. संस्कृतातील ही टीप फार उत्तरकालीन वाटते. द्रंग शब्दाच्या अर्थसंधारणा-विकासावरून हा शक, पष्तो आदि भाषातून आलेला ऋणशब्द असावा असे वाटते.

जमीन हा दुसरा शब्द पाहू. जमीन शब्दाच्या व्युत्पत्तीकडे स्व. कुलकर्णी यांनी उत्तम संकेत केलेला आहे. वैदिक संस्कृत–ग्मः, ज्मः, क्षमः, ज्मान्त; संस्कृत ज्मा, क्ष्मा, धातु-क्षम् अशी भारतीय परम्परा नोंदून फार्सी झमीन अशी नोंद केलेली आहे. भारोपीय भाषांतील शब्दही दिलेले आहेत. हा शब्द भारतीय भाषांत व मराठीत मुस्लिम काळात आला. अन्त्य न-विरहित जमी असे रूप भारतात आधुनिक भाषांत कधीही वापरले गेले नाही. महानुभाव मराठीत हा शब्द कोठेच आढळत नाही. जमीन शब्द ज़मी (झमी नव्हे) हा शब्द इ. सनाच्या ७ व्या शतकातील पष्तो भाषेत रूढ होता याची चर्चा डॉ. अब्दुलहय्य हबीबी यांनी एका ईराणी भाषेतील पुस्तकात केलेली आहे.)[५] लवीक राजांच्या जुन्या भाषेत ज़मी असे या शब्दाचे ध्वन्यात्मक स्वरूप होते असे हबीबी यांनी प्रतिपादिले आहे. फार्सी (ईराणी)

४. इण्डियन एपिग्राफी, दीनेशचंद्र सरकार, कलकत्ता १९६५, पृ. ३६०

५. पष्तो व लवीकान-इ-गज़्ना, अब्दुलहय्य् हबीबी, काबूल, १९६२, पृ. ८९

भाषेत शब्दारम्भी जोडाक्षर कधीही येत नाही. हा त्या भाषेचा एक नियम आहे. उलट पश्तो भाषेत संयुक्ताक्षराने आरम्भी होणारे हजारो शब्द आहेत. ते ग्रांथिक भाषेतीलच नव्हे, तर लोकभाषेतीलही आहेत. पश्तोचे हे ईराणीहून वेगळेपण आणि संस्कृतादि भाषांशी साधर्म्य लक्षणीय आहे. ज़मी हा प्राचीन पश्तोतील शब्द सहज समजण्यासारखा आहे. परंतु प्राचीन ईराणीत याचे वास्तव्य ज़मी असे होते. तो इ. सनाच्या दहाव्या शतकापर्यंत या रूपात वापरात होता. शाहनामा ग्रंथात (रचना इ. स. १०१० त पूर्ण) तो सर्रास वापरात आहे. अवेस्ता भाषेत त्याचे रूप ज़मी, ज़मीक असे आढळते. पश्तो भाषेत त्याचे रूप ज़मक असेही आहे. आधुनिक फार्सी भाषेत ज़मीक हा शब्द फक्त कोशगतच आहे. तो पहलवी काळा-तील आहे. त्याचे एक रूप स्थानभेदाने दमीक असे आढळते. ज़ ध्वनीचे द ध्वनीत रूपान्तर करणे हा प्राचीन फार्सीचा स्वभाव होता. खोतनी शक भाषेत ज़म, ज़म अशी रूपे रूढ आहेत. तसेच उज़्म असे स्वरागमयुक्त रूपही त्या भाषेत आहे. यावरून असे आढळते की अवेस्ता, शक आणि पश्तो भाषांनी वैदिक संस्कृत भाषेची परम्परा अधिक प्रामाणिकपणे पाळलेली आहे. ही परम्परा भारतीय आर्यात मूळ स्वरूपात राहिली नाही हा विद्वानांनी काढलेला निष्कर्ष येथेही दिसून येतो. ज़मीन हे रूप मात्र ईराणी भाषेतच आहे. ते मागाहून पश्तो भाषेत शिरले.

शक जमातीच्या भाषेत ज़म शब्द भूमि, पृथ्वी या अर्थाने फारच जुना आहे. परंतु डॉ. बरो यांनी सम्पादिलेल्या दस्ताऐवजांच्या खोतनी शक भाषेत तो आलेला दिसत नाही. या कागदांचा काल इ. ३०० च्या सुमाराचा आहे. परंतु खोतनी शक भाषेतील अन्य मागाहूनच्या साहित्यांत हा शब्द आढळतो. याचा काळ इ. सन ८०० च्या सुमाराचा आहे. या शक खोतनीत ज़म म्हणजे जमीन, भूमि असा आहे. येथे ज़ ध्वनीचा उच्चार, केवळ मराठी ज (जागा सारखा) किंवा संस्कृत ज (जगत्) ध्वनीसारखाही नाही. तो गज़ल शब्दातल्या ज़ ध्वनीचा आहे. हा ज़ शक खोतनीत लिहिण्याची तऱ्हाही वेगळी आहे. खरोष्ठी लिपी किंवा ब्राह्मीतून हा शब्द य्स असा या साहित्यात लिहिला गेलेला आहे. इंग्रजी लिपीत तो ysa असा लिहितात. हॅरोल्ड बेली याने शक खोतनीच्या शब्दकोशात)[६] व इतरांनी असाच लिहिलेला आहे. बली यांनी ज़मबस्त या पुस्तकातील शब्दकोश व्युत्पत्तीसह दिलेला आहे. यात ज़म-सन्दइ शब्दाची चर्चा केलेली आहे. येथे ज़म म्हणजे भूमि होय. डॉ. बेली याने ज़म-बस्ति म्हणजे लसून असा अर्थ दिलेला आहे. हा ज़म शब्द वैदिक ज्मा, क्ष्मा शब्दाचे रूपान्तर आहे, हे उघड आहे. शक लोकांच्या बोलीत वैदिक संस्कृतमधील शब्दांची तद्भव रूपे आहेत असे विधान करण्याचा येथे मोह होतो; परंतु ते कितपत सत्याधिष्ठित होईल याचा आत्मविश्वास मला नाही. असो.

६. इण्डो-सिथियन स्टडीज, खण्ड ६, एच्. डब्ल्यू. बेली, लंदन १९६७, पृ. २८८

बेली याने ज़मसन्दै या शब्दाने बुद्धधर्मीय शक जमातीने भारतीय बुद्धधर्मीय 'लोक' या धार्मिक शब्दाचा अनुवाद केला आहे, असे प्रतिपादिले आहे.

ज़मसन्दै शब्दावर डॉ. बेली याने अलीकडे एक चर्चा प्रस्तुत केली आहे).[७] या प्रबन्धात त्यांनी वैदिक क्षम् न्द्यौस्, द्यावा ह क्षामा, द्यावाक्षामा या धार्मिक कल्पनेसाठी शक खोतनीत ज़मसन्दै हा सामासिक शब्द आला आहे, असे प्रतिपादिले आहे. द्यावाक्षामा याचे अवेस्ता भाषेतील समान रूप स्पन्त-आरमैतिस आहे असे म्हटले आहे. हा आरमैतिस शब्द सन्दै शब्दास मिळून सन्द्रामत शब्द तयार झाला असे त्याचे प्रतिपादन आहे. म्हणजे ज़मसन्दै, ज़मसन्दा हा शब्द शक खोतनीत भूमातेसाठी प्रयुक्त आहे.

शक गणांच्या भारतातील इतिहासात चष्टण महाक्षत्रपाचे महत्त्व सर्वज्ञात आहे. चष्टण शब्दाचा अर्थ बलशाली असा आहे. त्या चष्टणाच्या बापाचे नाव य्सामोतिक असे आलेले आहे).[८] शक खोतनी भाषेच्या अनध्ययनामुळे या शब्दाचे वैशिष्ट्य, भाषावैज्ञानिक रूप व सांस्कृतिक पार्श्वभूमि लक्षात घेतली गेली नाही असे म्हणावे लागते. य्स हा शक खोतनीतला ज़ ध्वनि वा वर्ण आहे. वस्तुतः हा शब्द नागरी लिपीत ज़ामोतिक असा लिहावयास पाहिजे होता. हा उच्चार ध्यानी घेतला तर ज़ामोतिक हा शब्द ज़म आणि आरमैतिस् या शब्दांचा सामासिक विकास असावा असे वाटते. कारण आरमैतिस शब्दाचा रूपान्तरित आकार आपणाला सन्द्रामत शब्दात दिसतो. ज़म आणि आरमैतिस् या शब्दापासून ज़ामोतिक शब्द बनलेला आहे असे सुचवावेसे वाटते. ज़ामोतिक शब्दासारख्याच आणखीन् किती तरी संज्ञा वरील सारख्या शककुषाणांच्या प्रत्नलेखात आढळतात. त्यांच्यावर आधुनिक संशोधनाच्या निर्वाळ्याचा हात पुनश्च फिरणे आवश्यक आहे असे दिसून येते.

शक गण आणि त्यांची, कामापुरते विपुल साहित्य असलेली खोतनी शकभाषा ही भारतीय इतिहास व संस्कृति यांच्या दृष्टीने अभ्यसनीय आहेत. वरील झालेल्या चर्चेवरून त्यांचा भारतीय इतिहासाशी कसा जवळचा संबंध पोचतो हे दिसून येते. वरील द्रंग, उद्रंग, तुरुंग आणि ज़म, ज़मी, ज़मीन हे शब्द या इतिहासाशी संबद्ध आहेत. जेथे लिखित साधार इतिहास अनुपलब्ध असतो तेथे भाषावैज्ञानिक पुरावा महत्त्वाचा ठरतो, उपयुक्त होतो. जेथे इतिहासाचा पुरावा उपलब्ध असतो तेथेही भाषाविज्ञान अत्यंत उपयुक्त कामगिरी बजावते. साधे शब्ददेखील सांस्कृतिक साक्षीदाराचे काम बजावतात. वरील शब्दांचे हे इतिवृत्त या दृष्टीने लक्ष्य वाटावे.

---

७. मुंबई कामा संस्था, सुवर्ण महोत्सवी ग्रंथ, १९६९, पृ. १

८. सिलेक्ट इन्स्क्रिप्शन्स, दीनेशचंद्र सरकार, कलकत्ता १९६५, पृ. १७४

दीनिक-पुत्र हे विशेषण उषवदात)[९] (ऋषभदत्त) याच्या नावाशी सदैव चिकटलेले आहे. उषवदात हा नहपानाचा जावई आहे. त्याचे शककाल ४१, ४२ व ४५ वर्षातील नासिक लेण्यातील उत्कीर्ण लेख उपलब्ध आहेत. नहपानकन्या दखमिता (दक्षमित्रा) हिचा हा नवरा. उषवदाताचे विशेषण म्हणून दीनिकपुत्र हा शब्द वावरतो. दीनिकपुत्र या सामासिक शब्दातील दीनिक या पदाकडे आपणाला लक्ष वळवायचे आहे. वराहद्दिन असा शब्द शक ४३४ च्या खोह येथील सार्वनाथाच्या ताम्रपत्रात आलेला आहे).[१०] सौर आश्विन २८, शक १८९२ च्या महाराष्ट्र टाइम्समध्ये विद्वान डॉ. शां. भा. देव यांनी भंडारा जिल्ह्यातील पवनी येथील स्तूपाच्या उत्खननाची माहिती देणारा लेख प्रकाशित केला आहे. त्यात यखदिन असे एक बौद्धधर्मीय भक्ताचे नाव आलेले आहे. उट्टंकित लेखांचा व पवनी अवशेषांचा काल साधारणतः इ. स. पूर्व शेदोनशे वर्षे असावा असे डॉ. देव यांचे मत आहे. दोन सहस्रकांपासून भारतात रूढ असलेल्या दीनिक अथवा दिन शब्दाकडे जावे तसे आपले लक्ष गेलेले दिसत नाही. दीनिकपुत्र, वराहद्दिन या शब्दांवर कसलीही टिपणी आढळत नाही. डॉ. देव यांनी यखदिन शब्दाची छाया यक्षदत्त अशी दिलेली आहे. परंतु ते योग्य दिसत नाही दिन आणि दत्त या शब्दांचा, ध्वनि आणि अर्थविन्यास या दोन्ही दृष्टींनी काहीही संबंध जुळत नाही. हा शब्द यक्षदिन होय.

नव्य ईराणी भाषेतील दीन हा शब्द अवेस्ता दयेना आणि पहलवी, पाज़ंद आदि अवस्थांतील दीन या शब्दाचा सगोत्र प्रतिनिधि आहे. कमी सुसंस्कृत अरब जेत्यांनी ईराण जिंकले (शक ५७४ त) तेव्हा त्यांनी अनेक प्रकारे संपन्न ईराणी संस्कृतीतून उसणवारी केली. अल्लासाठी ख़ुदा (वैदिक स्वधा) आणि त्यांच्या वंदनासाठी नमाज़ (संस्कृत नमः, नमस्) यांचा स्वीकार केला. मज़्हब-धर्म यासाठी अरबांनी दीन शब्दाचा अंगीकार, वापर केला. अवेस्ता भाषेतील दएना शब्दाचा संस्कृत ध्यान हा सगोत्र शब्द आहे. पोकोर्नी (भारोपीय भाषांचा व्युत्पत्ति-कोश इ. १९५९) यांनी पृ. २४३ वर या शब्दाची चर्चा केलेली आहे. डॉ. सुनीति-कुमार चाटुर्ज्या यांनी आपल्या बाल्ट्स आणि आर्य (इ. १९६८) या पुस्तकात बाल्टिक (लॅट्व्हिया आणि लिथ्वेनिया) देशांतील धर्म, भाषाशास्त्र आदींची चर्चा केलेली आहे. बाल्टिक देशात, महाराष्ट्रीय अभंग या धार्मिक साहित्यप्रकारा-सारखा, दएना साहित्याचा प्रकार सर्वरूढ आहे. हा दएना शब्द, अवेस्तातील दएना आणि आधुनिक ईराणी दीन हे एक व सगोत्र असल्याची चर्चा तेथे आलेली आहे. ईराणात दीन हे ध्वनिरूप फारच प्राचीन आहे. ईराणावरील सिकंदरच्या

९. तथैव, उपरोक्त पृ. १६४

१०. तथैव, उपरोक्त, पृ. ३९३

हल्ल्यानंतर अवेस्ताचे पहलवीत रूपान्तर होण्यास आरम्भ झाला होता. मूलतः हा शब्द ध्यै-ध्यायति या वैदिक धातूपासून निघालेला आहे. त्याचा अर्थ-चिन्तन, आत्मचिन्तन असा होतो. हा शब्द अखिल आर्य-भाषीय जगात दिसतो. भारत, पूर्व व उत्तर आशिया व युरोप हे त्याचे संचार क्षेत्र आहे.

दीनिकपुत्र शब्दातील दीनिक हे दीन शब्दाचे भाव-रूप होय. संस्कृतप्रमाणेच येथे दीन शब्दाला इक प्रत्यय लागून दीनिक हे रूप सिध्द झालेले आहे. दीन हा शब्द सइस्तान, शकस्थान देशातील शकांच्या माध्यमाने भारतात आला. अरब मुसलमानाला वराह म्हणजे सूकर शब्दाचे वावडे आहे, तसे ईराणी लोकांना वावडे नव्हते. तेथे वराह हा शब्द अनेक व्यक्तिनामात आढळतो. वराहमिहिर, वराहदीन इत्यादि प्रत्नलेखातून येणारी नावे याची साक्षी होत. म्हणून वराहदिन हा उपरोक्त शब्द लक्ष्य आहे. वराह शब्दाचे ईराणी रूप वराज़ असे आहे. त्यावरून वराज़ूद्दीन असे व्यक्तिनामही नव्य ईराणीत प्रचारात आहे. वराहदीन याचा अर्थ धर्माचा वराह, त्राता असा अर्थ होतो. दीनिकपुत्र म्हणजे प्रत्यक्ष धर्माचा पुत्र अर्थात धार्मिक मनुष्य. आपल्याकडील धर्मदत्त, धर्मदेव, धर्मपाल आदि नावांचा तो ईराणी पर्याय होय.

ईराणात अरब येऊन देश इस्लाममय झाल्यावर दीन शब्द व्यक्तिनामात सम्मीलित करण्याची नवमुस्लिमात मोहीम निघाल्यास आश्चर्य नव्हे. अरबी भाषेतील अल् अथवा अलीफ-लाम या प्रत्ययाने दोन शब्द जोडून, दीन शब्दासह, सामासिक व्यक्तिनामे रूढ झाली. जलाल-अल्-दीन हे सम्राट् अकबराचे नाव. उच्चार जलालूद्दीन. अर्थ होतो-धर्माचा मोठा, विख्यात. त्याचा आजा नूरूद्दीन बाबूर. नूरूद्दीन म्हणजे धर्माचा प्रकाश. अशाप्रकारे दीन शब्द जोडणे हे भारतीय मुसलमानात तर वेडच आहे.

इ. स. च्या पाचव्या, सहाव्या शतकापर्यंत पश्चिम भारतात शकगणाचा वावर होता. प्रत्नलेख साहित्यात ईराणी नावे संज्ञा व पारिभाषिक शब्द बरेच आढळून येतात. परंतु त्यांचा इस्लामशी काही सम्बन्ध नाही. उत्तर प्रदेशातील काही राजपूतादि गटात दीनशब्दयुक्त व्यक्तिनामे आजही पाहावयास मिळतात. उत्तरप्रदेशीय भगवानदीन नावाचा भय्या पुण्यातील एका कार्यालयात कामास आहे. भगवान शब्दातील दीन शब्दाचा अर्थ धर्म हाच आहे. अन्य अर्थ अशक्य आहेत. महिकावतीच्या बखरीत (लेखनकाल शक १३७०) एक कमळादीन चुरी या गृहस्थाचा नामोल्लेख आढळतो. तुरळक का होईना पण हा ईराणी प्रभाव आजपर्यंतदेखील दिसून येतो.

धर्मासाठी प्रयुक्त दीन हा शब्द सइस्तानातील, अथवा साधारणपणे अफगणिस्तानातील शकगणात विशेष रूढ दिसतो. याच्या उलट खोतनमधील शकगणात या शब्दाचा वापर विशेष आढळत नाही. खोतनी शक भाषातले अनेक ग्रंथ आता

प्रकाशात आले आहेत. तेथील शकव्यक्तिनामात वा अन्यतःही दीन शब्दाचा वापर आढळात येत नाही. खोतनमधील शकांनी बौद्धधर्म इ. स. च्या आरम्भापासून स्वीकारलेला होता. म्हणून त्यांच्यात भारतीय सांस्कृतीक परम्परेचा वरचष्मा दिसून येतो. हे शक ईराणीवंशीय असले तरी ईराणी धार्मिक प्रवृत्तींच्या जागी तेथे बौद्ध प्रवृत्ति दिसून येतात.

बहुतेक फार्सी कोशात दीन शब्दाची कुळी चुकीची देण्यात येते. स्टीनगासने तो अरबी शब्द असल्याचे सांगितले आहे. बेल्लियू याच्या पश्तो कोशात (इ. स. १९०१) हाच प्रकार आहे. परंतु **प्लॅट्स्** याने आपल्या उर्दू-हिंदी-इंग्रजी कोशात (इ. १८८४) मात्र हा शब्द अवेस्ता, पहलवीतून आला असे नोंदविले आहे. दीन हा शब्द अरबी भाषेत रूढ आहे. तो अखिल मुस्लिम जगात वावरतो. त्र्यक्षरी शब्द असल्याने त्याचे सहज असे अरबी अनेकवचन अदयान असे केलेले आहे. यामुळे याच्या अरबीकुळाचा भ्रम अधिकच बळावतो.

दबीर, डबीर हा शब्द मराठी माणसाला चांगला परिचयाचा आहे. शिवाजी राजांच्या अधिकारी वर्गातही कोणी दबीर हुद्यावर होता. हा दबीर शब्द ईराणी असून त्याचा उच्चार दबीर व दिबिर असा दोन्ही प्रकारे होतो. हाच शब्द भारतीय जीवनात प्रत्नलेखापर्यंत पोचलेला आहे. तो शब्द शक ३१६ मध्ये खोह येथील ताम्रपटात दिविर रूपाने वापरलेला आहे. उत्तरकालात तो अनेक प्रत्नलेखातून आढळतो. कल्हणाच्या राजतरंगिणीत या शब्दचा उल्लेख आलेला आहे. दबीर या शब्दाला अधिकारपदाची प्राप्ति ईराण देशात झालेली असली तरी या शब्दाचा पूर्वप्रवास पाहाण्यासारखा आहे. दबीर हा शब्द लिपिकर या शब्दा-पासून आला असे म्हणणे फार कठीण आहे. कारण लिपि हा शब्द फारच उशीरा रूढ झालेला आहे. प्राचीन ग्रंथात तो या अर्थाने सापडत नाही. आता भाषा-विज्ञानाच्या क्षेत्रात हा शब्द पिश्–पिंशति, पिंशते या धातूला नि हा उपसर्ग लागून बनलेला आहे असे मानतात).[११] मूलतः पिश् धातूचा अर्थ ओरबडणे, खरचटणे, रेघ मारणे, चित्र काढणे, रंगविणे असा आहे. लेखनकलेचा उगम या प्रवृत्तीतून झाला असे मानण्यात येते. निपिश् या धातूपासून प्राचीन ईराणीत (इ. स. ५०० वर्षे) निपिश्तनैय्, जरथुष्ट्र पहलवीत निपेश्, निपिश्त असे शब्द लेखनासाठी प्रयुक्त आहेत. निबिश्तन–लिहिणे असा धातू ईराणीत आज रूढ आहे. प्राचीन साक्सन व प्राचीन आंग्लभाषात व्रीतन म्हणजे लिहिणे हा शब्द होता. जुन्या नॉर्स भाषेत ते रूप व्रैत असे होते. या मूळ इंग्रजी व्रीतन शब्दापासून आजचा इंग्रजीतील राइट्-लिहिणे–हा शब्द बनला हे उघड आहे. राइट् शब्दातील अनुच्चारित डब्लू वर्णाचा उच्चार केला तर व्राइत-व्रीत हे प्राचीन रूप हाती येते. येथे इंग्रज लोकांनी राइट म्हणजे लिहिणे शब्दाचे हेंगाडे स्पेलिंग, लेखन का चालू ठेवले याचा बोध होतो.

११. बेली - खोतनी ग्रंथ, खण्ड, ६ (पृ. १९४, पीर्–२)

डॉटर शब्दातील अनुचारित जीएच् हे वर्ण चालत आले आहेत याचेही कारण प्रबल आहे. डॉटर हा शब्द दुहितर शब्दाचा पर्याय आहे. ह ध्वनीचा, सर्वत्र व भारतात, संस्कृतातही काळवेळ पाहून, घ ध्वनि बनतो. हेच नेमके डॉटर शब्दात झालेले आहे. दॉहतर, दोघतर शब्द ईराणी दुख़्तर व भारतीय दुहितर शब्दांचा सगोत्र आहे. जीएच साबूत ठेवल्याने या शब्दाचा पदर व कुळी कायम राहिलेली आहे. मराठीच्या शुद्धलेखनाची शुद्धि करणाऱ्या पंडित महामहोपाध्यायांना हा गवस राहिलेला नसावा हे दुर्दैव होय. पांच म्हणजे पञ्च शब्दातील अनुस्वार, सर्व भारोपीय भाषाकुलात सुरक्षित असतांना मराठीत मात्र त्याची हत्या व्हावी, हा दैव-दुर्विलासच होय. असो.

खोतनी शक भाषेत पीर् व पीड हे दोन पर्यायी शब्द लिहिणे शब्दासाठी आहेत. पीर्)[१२] हा शब्द अधिक जुन्या पेर धातूपासून व्युत्पन्न असावा, असे मानण्यात येते. पेर हे रूप पिश् पासून निघालेले आहे. कास्पियन समुद्राच्या पश्चिमेस नांदत असलेल्या शक गणाच्या ऑस्सेती या उपभाषेतही पेर व पीर ही दोन्ही रूपे उपलब्ध आहेत. अशा प्रकारे या निपिश् मूळ धातूपासून दबीर, दिबीर, या मराठी शब्दाचा उगम झालेला आहे.

भाषा व भाषाविज्ञान ही मानवी इतिहास संस्कृतीच्या अभ्यासात अतिशय उपयोगी आहेत. अलीकडील ज्ञात इतिहासात यांचा उपयोग थोडा कमी असला तरी प्राचीन इतिहासाध्ययनात ही आवश्यक आहेत. लिखित व उपलब्ध इतिहासात अनुल्लेखित अशा अनेक घटनांचा उलगडा भाषाविज्ञानाने होतो. जसजसे आपण प्रागैतिहासिक कालात जाऊ त्याप्रमाणे भाषाविज्ञानाचे हत्यार अधिक उपयोगी ठरते. समाजांची भ्रमणे व त्यांचे सांस्कृतिक धागेदोरे हाती येण्यास तौलनिक भाषाविज्ञान अमोघ असे हत्यार आहे. या साधनाच्या सहायाने अनेक समाजाचे इतिहास हाती आलेले आहेत. यातूनच आर्थवैन्यासिक पुरासमाजशास्त्राचा उगम झालेला दिसून येतो. भारोपीय भाषासमूहाच्या तौलनिक अभ्यासाने मूल आर्य-भाषिकांची मायभूमी, हंगेरी देशाच्या इशान्येस आणि, काळा समुद्र व कास्पियन समुद्रांच्या उत्तरेस असल्याचे मत आता विद्वानांनी निश्चितसे केलेले आहे. प्रागैतिहासिक कालातील समाजजीवनाची अनेक अंगोपांगे आता उजेडात आलेली आहेत. एखाद्या भाषेतील एखाद्या शब्दाने परदेश मुसाफरी केलेली असली तर तो शब्द त्या त्या देशाच्या भाषिक व सांस्कृतिक रंगात रंगलेला असतो. त्या शब्दाच्या स्थलकालनिष्ठ अवस्थांचा विचार केला तर त्यामुळे आपणाला निरनिराळ्या संस्कृतीचा परस्पर संपर्क व देवाणघेवाणीची कल्पना बांधता येते. या लेखात तुरुंग, जमीन, दीन आणि दबीर या चार शब्दांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. यावरून शब्दांनादेखील सांस्कृतिक पुटे चढलेली असतात, हे ध्यानी येते. ती त्या शब्दांची संस्कृति होय.

मुंबई, आश्विन २६, १८९२

---

१२. तथैव, उपरोक्त. पृ. १९३, १९४.

◆◆◆

२२ : चंदी आणि चंदावर—भाषिक विचार

गौड आणि गौडबंगाल या शब्दांचा मराठी जीवनातील वापर दिल्लीच्या इस्लामी साम्राज्य सत्तेमुळे घडून आला. मुसलमान आणि ते वापरीत असलेली दक्खिनी हिंदी भाषा यांच्या माध्यमाने हे घडून आले (पाहा-चौहान, पृ. २६७.) त्याचप्रमाणे चंदी आणि चंदावर हे शब्द महाराष्ट्रातील जुन्या अर्थात महानुभावीय मराठीला अपरिचित आहेत. जेव्हा विजापूरच्या आदिलशाही इस्लामी सत्तेने जिंजी व तंजावुर ही राजकीय महत्त्वाची नगरे हस्तगत केली, तेव्हा मराठी नेते व भाषा या शब्दाशी परिचित झाली. परंतु जेव्हा शक १५९८-९९ मध्ये छत्रपति शिवाजीने दक्षिणदिग्विजय केला, तेव्हा ही नगरे शिवाजीच्या आधिपत्याखाली आली आणि हे शब्द मराठी भाषेत वावरू लागले.

या दोन शब्दाचे मूल तमिलभाषीय उच्चार जिंजी आणि तंजाउर किंवा तंजावुर असे आहेत. परंतु हे उच्चार आरम्भीच्या कालात मराठी भाषेत आलेले नाहीत, असे आढळून येते. जिंजी या गडनामाचे मराठी रूप चंदी असे वापरलेले कृष्णाजी अनंत सभासद याच्या शिवचरित्ररूप बखरीवरून म्हणजें इतिहासावरून आढळते. तेथे हे रूप चंदी असे आहे (पाहा-जोशी-अनुच्छेद ९७, ९९, १०१, १०४ आणि १०९). तसेच तंजावुर शब्दाचे रूप चंदावर असे आढळते, (पाहा-जोशी, अनु० १०० व १०२). जेधे शकावली या बऱ्याच जुन्या साधनग्रंथात चंदी (पाहा-आपटे, पृ. ३५, ३६, ३७ व ३८) आणि चंजी (पाहा-आपटे, पृ. २८, २९ व ३९) अशी जिंजी गावाची नावे आढळतात. तंजाउर नगराचे रूप चंदाउर (पाहा-आपटे, पृ. ३५ व ३७), चंदावर (आपटे, पृ. ३७) आणि चंचावर (पाहा-आपटे, पृ. ३७) असे तीन प्रकाराने लिहिलेले आढळते. उत्तर कालात चंजी आणि चंदी अशी नेहमीच वैकल्पिक रूपे वापरलेली दिसून येतात (पाहा-पवार, जिंजी शब्दाचे उल्लेख, सूची, पृ. ५८२); चंदी (पाहा- पवार २, ११३, २४०-४१-४३-६२; ४७३-७५-७६-७७-८४-८६) आणि चंजी (पाहा-पवार, ९७, ९९, १०१-६६-८०-९१-९२-९६-९७-९८, २०१, ३७७-७८, ४२२, ४७६, ५१६-४९).

चंदी, चंजी म्हणजे जिंजी आणि चंदावर म्हणजे तंजाउर हे मराठी माणसाच्या अगदी अंगवळणी पडलेले आहे. ही गोष्ट डॉ. पवारांच्या सूचीवरून स्वच्छ दिसून येते. ग्रंथात जिंजी शब्द आलेला नसताही चंदी, चंजी शब्दाच्या नोंदी जिंजी शब्दाखाली दिलेल्या आहेत. तीच गत तंजावर, चंदावर शब्दांची आहे.

चंदी किंवा जिंजी शब्दाचे आणखी एक रूप माझ्या आढळात आले. धरणगाव (जि. जळगाव) येथील अहिराणी भाषेचे एक सापेक्षी अभ्यासक, कवि व संशोधक माझे मित्र श्री. गोपालप्रसाद गंगाधरप्रसाद बाजपेई यांनी जिंजी शब्दाचे अहिराणी बोलीत चिंधी असे रूप असल्याचे मला सांगितले. त्यांनी खालील अहिराणी गीत मला दिले.

> " जोहार जी जोहार " " कोन गाँवना महार "
> " चिंधीना महार " " कसा करता उना "
> " राजानी बायको पोटाशी शे, ते एक डांगर मांग।
> मना डांगर ले पानी घालूं
> शिपाईनं तंगडं तोडू ॥
> " हाई डांगर -- कच्चं शे -- का पक्कं शे '
> लई ग्या रे लई ग्या। डांगर लई ग्या।

जोहार केल्यावर, कोणा गावचा महार म्हणून विचारल्यावर, त्याने उत्तर दिले, 'मी चिंधीचा महार' म्हणजे मी जिंजी नगराचा महार आहे. या शब्दाच्या वापरावरून हा वापर छत्रपति राजाराम कालीन किंवा तदुत्तरकालीन आहे. हे लक्षात येते. डांगर म्हणजे एक प्रकारचे खरबूज. ते कां पाहिजे याचे उत्तर असे की (जिंजीच्या) राजाची बायको पोटीशी आहे. अर्थात तिचे डोहाळे पुरविण्यासाठी डांगर त्याने नेले.

येथे आपणाला चिंधी शब्दाचाच विचार कर्तव्य आहे. या चर्चेने आपणाला चंदी, चंजी आणि चंदावर या शब्दाच्या भाषावैज्ञानिक प्रकृतीची विचारपूस करणे आहे. पहिल्यांदा चंदावर शब्दाचा विचार करू. मूळ तमिलदेशीय शब्द तंजाउर आहे. तञ्जक नावाचा राक्षस होता. त्याचा वध झाल्यानंतर या ठिकाणास तञ्जकपुर असे नांव प्राप्त झाले. असे तंजापुरच्या इतिहासचिकित्सेत उल्लेखिलेले आहे. तंजाउर या मूळ शब्दावरून चंदावर रूप कसे व्युत्पन्न झाले असा प्रश्न आहे. संस्कृत शब्दातील– त्य ध्वनीचा मराठी च होतो असे ब्लोक याने सांगून, त्याची उदाहरणेही सं. कृत्या शब्दापासून काच, नृत्-नाचणे, सत्य – साच, सच्च्; अर्धतृत्य अडीच अशी उदाहरणे ब्लोकने नोंदविली आहेत (पाहा परांजपे, पृ. १३९). हिंदी भाषेतही अशी प्रक्रिया नित्य परिचयाची आहे. हिंदीतील चाचा, चाची (काका, काकी) हे शब्द सं. तात शब्दापासून व्युत्पन्न आहेत, असे प्लॅट्स् याच्या उर्दू-इंग्रजी कोशात नोंदविलेले आहे. या नियमाचा आधार घेऊन तंजावर शब्दातील त या आद्य ध्वनीचे रूपांतर च ध्वनीत होणे शक्य आहे. म्हणून तंजावर शब्दाचे चंजावर असे रूप बनले. ते नियमानुसारीच गणावे लागेल. परंतु खरा पर्याय चंदावर असा आहे, हे लक्ष्य. तसेच दुसरे एक रूप चंचावर असे जेथे

शकावलीत नोंदलेले आहे (पाहा,- आपटे, पृ. ३७). हे रूप चुकीचे म्हणणे धाष्टर्याचे होईल. कारण या शकावलीच्या पूर्वी लिहिल्या गेलेल्या नुस्रतीच्या अलीनामा या इतिहास ग्रंथातही (लेखनकाल शक १५८७ – हिजरी १०७६) चंचावर असे तंजावरचे नामान्तर प्रयुक्त झालेले आहे. तो वापर असा :

हुए यक सिपहदार के सात अटल
किया था ओ फतहे– चंचावर बदल । ११.४
चंचावर तो था दो महीन्यां की बाट
लिख्या यूं तो यां काम आ नेट पाट । ११.५

यावरून चंचावर हा पाठ चुकलेला आहे असे म्हणणे कठीण आहे. म्हणून वरील नियमानुसार चंजावर हे रूप सिद्ध होते. पण खरे रूप चंचावर आहे. याचा उलगडा होणे आहे.

तंजावराकडून हा शब्द महाराष्ट्रात मुसलमानांकरवी आला, हे उघड सत्य आहे. या मुसलमानात अफगाणिस्थान, ईराण, मध्य-आशिया या प्रदेशातील लोक बहुसंख्येने कसे होते, याचे वर्णन अमीर खुस्रौ आणि नुस्रती या दोघांनीही केलेले आहे. अलीनाम्यातील उल्लेख पाहा.

कता हूं अता फौज दिहलीकी बात
चली थी दखिन पो किस धात सात । २८·१०२
मगूलां किते मुल्क व कै शहर के
किते हिंद व कुइ मावराउन्नहर के । २८·१०८
चग़ाती क़िज़िलबाश उज़बक बली
कंधारी किते बलख़ हौर काबुली । २८·१०९
खुरासानियां इस्पहानी किते
दमावंदी हौर दामग़ानी किते । २८·११७
कितिक सब्ज़वारी बुख़ारी किते
हराती व तूसी व लारी किते । २८·११८
कितिक तुर्क व गुर्जी किते रूमियां
समरकंद व शीराज व झुरोमियां ।
हुवीजाइ व हरवी व हिमकरी
सजिस्तानियां अस्ल व नस्ल-आज़री । २८·१२०

खुस्रौ यानेही अशाच गटांचा उल्लेख केलेला आहे. त्यात उपरोक्त देशातील मुगल, चगताई, किजिलबाश, उजबक, कंधारी, बल्ख, काबुली अशा अनेक गटांचा समावेश होता. हे सगळे गट पख्तो, सोग्दी म्हणजे चूलिक-शूलिक, इत्यादि

भाषाक्षेत्रातील आहेत. काही गट बाहेरील असले तरी ते काही शतके या भाषाक्षेत्रात राहून मागाहून भारतात उतरलेले आहेत, हे ध्यानात बाळगले पाहिजे. सोग्दी, खोतनी शक आणि पष्तो भाषात संस्कृतादि अन्य भाषातील ज ध्वनीचे रूपान्तर च ध्वनीत होते ही गोष्ट आम्ही मराठी वाचकासमोर मांडलेली आहे (पाहा-पत्रिका पृ. ३५). मराठी भाषेत मशीद शब्दासाठी मिजिगिति असा शब्द वापरलेला आहे. मिजिगिति हे मस्जिद या अरबी शब्दाचे सारूप्यीकृत रूप आहे. हे सारूप्यीकरण सर्वप्रथम पष्तोभाषीय अफगाण लोकांकरवी झाले असे आढळते. येथे अंत्य द ध्वनीत झालेले रूपान्तर लक्ष्य आहे. हा शब्द याच रूपात अफगाणिस्तानात शक ९०४ व तत्पूर्वी आढळतो. शिवाय याच गटाच्या सम्पर्काने बनलेल्या पैशाची प्राकृतातही हाच नियम कार्यप्रवण आहे. वरील लेखात ज ध्वनीचा च ध्वनि बनत असल्याची अनेक उदाहरणे दिलेली आहेत. त्या नियमानुसार तंजावर या शब्दातील ज ध्वनीचे च ध्वनीत रूपांतर झालेले आढळून येते. चंचावर हा उच्चार काबूल, कंदहार, बलख, मावराउन्नहर या प्रदेशात राहाणाऱ्या ईराण-अफगानी पठाण, रोहिल्याचा आहे, हे उघड होते. तंजावुर शहराची रूढी नव्याने येत असल्याने मराठी माणसानेही आरम्भी हा उच्चार योग्य मानिला. तोच शेष राहिल्याची ही नोंद आहे, असे म्हणावे लागते.

आता तंजावर या शब्दाचे चंदावर हे होणारे रूप लक्ष्य आहे. त ध्वनीच्या च ध्वनीत होणाऱ्या रूपान्तराची चर्चा वरती आलेलीच आहे. आता तंजावर शब्दातील ज ध्वनीचे द ध्वनीत झालेले रूपान्तर विचारणीय आहे. भारतीय भाषा वैज्ञानिक परम्परेतही ज ध्वनीचा द होण्याची नोंद मिळते. (पाहा-पिशल, अनुच्छेद § २१५). या नियमाने जुगुच्छा शब्दाचे रूप दुगुंछण, ज्योत्स्ना-दोसिणा, युग्म-जुग्म-दोग्ग (मराठी दोघे) अशी रूपे प्राकृतातून शेषमात्र सापडतात. प्राचीन फार्सी या ईराणातील अवेस्ताच्या वैकल्पिक भाषेत संस्कृतादीतील ज ध्वनीचा द होतो. सं. हस्त, अवेस्ता-ज़स्त, प्राचीन फार्सी दस्त (हात) आणि सं. अहम्. अवेस्ता-अज़म्, प्रा. फार्सी-अदम् अशी रूपे ईराणी भाषाविज्ञानात नोंदलेली आहेत. जुन्या मराठीतही विदेशीय शब्दातील ज ध्वनीचे द ध्वनीत रूपान्तर झालेले आढळून येते. महिकावतीच्या बखरीत अरबी जफरखान याचे रूप दफरखान, डफरखान (पाहा- राजवाडे, पृ. ६३·१८ १९, २०,) मुजफर शब्दाचे मुदफर (राजवाडे, पृ. ६३·२५,) मजलिस शब्दाचे मदलिस (राजवाडे, पृ. ६७·३०, ३२, ६८·२) झालेले आढळते. तुळजा, तुकाई भवानीच्या वर्णनात गुर्ज़ (खड्ग) शब्दाचे तद्भव रूप गर्द असे रामदासस्वामींनी वापरलेले आहे.

ज, द ध्वनीच्या रूपांतराची ही प्राचीन व नवी परम्परा लक्षात घेतली तर चंजाबर या शब्दाचे मराठीने केलेले चंदावर हे रूपांतर स्पष्ट होण्यासारखे आहे.

ज ध्वनीच्या द ध्वनीत होणाऱ्या रूपांतराची प्रक्रिया प्राकृत, फार्सी भाषांत रूढ होती. तिचाच आविर्भाव येथे मराठीत दिसून येत आहे. परंतु या परिवर्तनाचे निमित्त कारण पष्तो आणि तत्सम लोक आहेत. परंतु ज ध्वनीचे च ध्वनीत होणारे रूपांतर मात्र, पष्तो, खोतनी शक आदि पूर्व ईराणी भाषा आणि पैशाची प्राकृत यांचाच विशेष होय. ही प्रथा भारतीय परम्परेत दिसून येत नाही.

वरील चर्चेवरून जिंजी या शब्दाची चंदी, चंजी ही दोन्ही रूपांतरे सहज गम्य होतात. चंजी शब्दात आरम्भीचा इकार लोप पावलेला आहे, तसेच पहिल्या ज ध्वनीचे कठोर वर्णात रूपांतर झालेले आहे. झालेले हे आधुनिक रूपांतर पैशाची-तील या नियमाचे स्मारक आहे. पूर्व ईराणातून- काबूल, कंधार, बल्ख़, बामियान, मावराउन्नहर अर्थातच प्राचीन सोग्दिया अथवा चूलिक देश या प्रदेशातून आलेल्या पष्तो, चूलिक, दरद, खोतनी शक आदि भाषिकांचा हा प्रभाव आहे, ही गोष्ट पुढे येते.

पैशाची प्राकृत, शक भाषांची जन्मकथा हीच आहे. इ. स. पूर्व १५० च्या सुमारास शक या ईराणी आर्यांनी हलमंद (सरस्वती) नदीच्या मुखाजवळील प्रदेशात वसति करून शकस्थान आधुनिक सइस्तान निर्माण केले. कुषाण वंशीय कनिष्काची सत्ता पेशावर-पुरुषपुर येथून शक वर्ष एकमध्ये स्थापन होऊन शतक दोन शतके टिकली. गिरनार व एरण, मंदसौर येथून त्यांच्या क्षत्रपाचे राजकीय वर्चस्व या पुढेही टिकले. सूर्योपासक औलिकरांची सत्ता शककालाच्या पांचव्या शतकापर्यंत टिकली. या अखण्डित अशा ईराणी लोकांच्या सम्पर्काने पैशाची प्राकृत बोली अस्तित्वात आली. पैशाची भाषेत संस्कृत भाषेतील मृदुवर्णाचे कठोर वर्ण बनण्याची प्रक्रिया प्रकर्षाने दिसून येते. हा पष्तो, चूलिक (सोग्दियन) भाषांचाही विशेष होय.

इस्लामी काळातील उपरोक्त प्रदेशातील ईराणी आर्यांच्या सम्पर्काने अरबी, पार्सी लिपीतील, दिल्लीच्या परिसरातील खडीबोलीचा उर्दूच्या रूपाने विकास झाला. या उर्दूलाच आरम्भी दक्खिनी हिंदी असे नाव मिळाले होते. या दक्खिनी हिंदीच्या स्वरूपाबद्दल आणि तिच्यावरील मराठीच्या प्रभावाबद्दल आम्ही अनेक वेळा चर्चा केलेली आहे (पाहा-चौहान). ईराणी आर्यांच्या इतिहासकालातील या दोन प्रमुख सम्पर्काचे फलित म्हणजे पैशाची आणि दक्खिनी हिंदी भाषांचा विकास होय. या दुसऱ्या सम्पर्क कालातील एक महत्त्वाची घटना म्हणजे मध्ययुगीन कालात ज या मृदु वर्णाचे तद्वर्गीय कठोर वर्णात झालेले रूपान्तर होय. जिंजीचे चंदी आणि तंजावरचे चंचावर हे झालेले रूपान्तर होण्यामागे वरील सांस्कृतिक व भाषिक सूत्र कार्यप्रवण झालेले आढळते.

चंजी शब्दात द्वितीय ध्वनी मूळानुसारच शेष राहिलेला आहे. चंदी या या शब्दात, वरती चर्चिलेला, ज ध्वनीचे द ध्वनीत रूपान्तरित होण्याचा नियम

कार्यप्रवण झाल्याचे दिसून येते. अहिराणीत प्रयुक्त असलेल्या चिन्धी शब्दाचे खरे रूप चिन्दी असावे. चिंधी हे मराठीकरण आहे. चिंदी या शब्दात जिजी शब्दातील पहिल्या ज ध्वनीचा च ध्वनी आणि दुसऱ्या ज ध्वनीचा द ध्वनी बनलेला आहे. म्हणजे मूळ शब्दातील स्वरोच्चार कायम राहून व्यंजनोच्चार वरील दोन नियमाच्या अनुरोधाने बदललेले आहेत. एकूण चंदी आणि चंदावर हे शब्द ऐतिहासिक व भाषावैज्ञानिक परम्परेचे द्योतक आहेत, असे म्हणावयास हरकत नाही. महाराष्ट्रात चंदावर नावाचे गाव नाही. कर्नाटकातील कारवार जिल्ह्यात एक चंदावर गाव आहे. परंतु त्याशी मराठ्यांचा कधीही संबंध आलेला नाही. आदिलशाही इतिहासातही हा गाव उल्लेखिलेला आढळत नाही.

संक्षेप आणि संदर्भ

आपटे – शिवचरित्रप्रदीप, द. वा. आपटे, पुणे १८४७
चौहान – मराठी आणि दक्खिनी हिंदी, दे. व्यं. चौहान, पुणे १८९३
जोशी – सभासदकृत शिवाजीची बखर, शं. ना. जोशी, पुणे १८८३
पत्रिका – महाराट्र साहित्य पत्रिका (दे. व्यं. चौहान), क्रमांक १७४, श्रावण १८९२
पवार – ताराबाईकालीन पत्रव्यवहार खं. १, डॉ. अ. पवार, कोल्हापूर, १८९१
पिशल – पिशलकृत प्राकृत व्याकरण, अनु. हेमचंद्र जोशी, पटना १८८०
राजवाडे – महिकावतीची बखर, वि. का. राजवाडे, पुणे १८४६
सिद्दीकी – नुस्रतीकृत अलीनामा, अ. म. सिद्दीकी, हैद्राबाद १९५९

✦✦✦

२३ : मिजिगिति म्हणजे मशीद

जुन्या मराठी भाषेत मशीद शब्दासाठी मिजिगिति शब्द वापरलेला आहे. हे सर्व विदित आहे. हा मिजिगिति शब्द एका संस्कृत शिलालेखात शक ९७५ वर्षी पहिल्यांदा वापरण्यात आलेला आढळतो. हा लेख कदम्बवंशीय प्रथम जयकेशी याचा असून तो गोवा प्रांतात राज्य करीत होता. हा लेख स्व. पिसुर्लेकर यांनी पोर्चुगीज भाषेत प्रकाशित केलेला आहे (पाहा ओरिएंट, पृ. ३८७). या लेखात मिजिगिति हा शब्द पाच वेळा वापरलेला आहे. जयकेशी याचा महामंत्री ताजियवंशी छदम याने एक मशीद बांधलेली होती. तो श्लोक असा:—

अतो मिजिगित्यत्र प्रासादो गोपकेऽमुना ।
कारितो मन्त्रिमुख्येन स्वधर्मायापि कीर्त्तये ॥ २० ॥

हा लेख शरतुरगनन्द म्हणजे ९७५ शकवर्षी, जय संवत्सर, वैशाख मास अक्षय्य् तृतीया गुरुवारी लिहिला गेला. भारतामध्ये संस्कृत वा अन्य भारतीय भाषांत वापरलेला मिजिगिति हा शब्द सर्वप्रथम येथेच आढळतो.

संस्कृत प्रस्तरलेखातील या शब्दाचा तदनंतरचा उल्लेख सौराष्ट्रातील वेरावल (सोमनाथ) येथील चालुक्य वाघेलवंशीय अर्जुनदेव याच्या काली शक ११८५ मध्ये पीरोज या नाखू, नाखवा व्यापाऱ्याने उभारलेल्या मशिदीत सापडतो. हाच लेख अरबी भाषेतही ६६२ हिजरीमध्ये कोरलेला आहे. मिजिगिति शब्दाचा उल्लेख असा (पाहा–एइं, पृ. १४१–१५०).

ततः नाखूपीरोजेन स्वधर्म्मशास्त्राभिप्रायेण परमधार्म्मिकेण भूत्वा…… आत्मनः श्रेयोऽर्थं……मिजिगितिधर्म्मस्थानं धर्म्मबान्धवेन कारितम् ।

या शिलालेखात हा शब्द आणखीन् ७ वेळा वापरलेला आहे.

यानंतर ३४ वर्षानी ठाणे जिल्ह्यातील कोपराड (वसईजवळ) गावी यादव नरेश रामदेवराव याच्या कान्हरदेव या सरदाराच्या सम्मतीने मुहुमद प्रोस्त्राहि या मुसलमान व्यक्तीने उभारलेल्या मशिदीविषयीच्या मराठी शिलालेखात मिजिगिति शब्द आलेला आहे (पाहा – दीक्षित, पृ. ३३). इस्लामी राजसत्तेच्या आश्रयाने महाराष्ट्रात उभारलेली ही पहिली मशीद होय. "**श्री मिजिगिति प्रतिबधु केला**" म्हणजे दोन गावातील करांचे उत्पन्न या मशिदीसाठी राखून ठेविले. अलाउद्दीन याने यादव रामदेवाचा पराभव शक १२१६ मध्ये केला आणि अवघ्या तीन वर्षात ही मिजिगिति उभारली गेली.

यानंतर मिजिगिति उभारल्याचा उल्लेख ठाणे जिल्ह्यातील नागाव येथील मराठी शिलालेखात आलेला आहे. हा लेख शक १२८९ आणि हिजरी ७६९ मध्ये कोरलेला असून त्यात हा शब्द दोन वेळा वापरलेला आहे (पाहा-अब्दुल हक, पृ. २१). या वेळी महाराष्ट्रात बहमनी साम्राज्य येऊन २० वर्षे लोटलेली होती.

फार्सी व अरबी भाषातील इतिहासाच्या साधन ग्रंथाचे अवलोकन केल्यानंतर असे आढळून येते की मिज़्गित हा शब्द ईराणी लोकांनी भारतीयांपूर्वी बराच काळ वापरलेला होता. मला या शब्दाचा सर्वप्रथम वापर हुदूद-इ आलम या ग्रंथात पाहावयास सापडला. हा अज्ञातलेखक ग्रंथ हिजरी ३७२ म्हणजे शक ९०४ मध्ये लिहिलेला आहे. हा मध्य आशियाच्या भूगोलासंबंधी असून, अत्यंत प्रमाणभूत मानला जातो. या ग्रंथाच्या इंग्रजी अनुवादात या मज़्गित शब्दाचा उल्लेख परिच्छेद २३·१४, २०; २८·१६ आणि २९·२ मध्ये असा चार वेळा आलेला आढळला (पाहा-मिनोर्स्की). येथे ही गोष्ट सांगितली पाहिजे की मिनोर्स्की याने मूळ अरबी-फार्सी लिपीतील या शब्दाचा उच्चार मज़्गित असा दिलेला आहे, परंतु ते बरोबर दिसत नाही. कारण हा उच्चार फार्सी कोशातून मिज़्गित व मराठी प्रत्नलेखातून मिजिगिति आहे असे प्रत्ययास येते.

डॉ. अब्दुलहय्य् हबीबी याने पष्तो व लवीकान-इ ग़ज़ना असे एक छोटेसे पुस्तक लवीक या अफगाणिस्तानातील हिंदु किंवा बौद्ध राजवंशाविषयी लिहिलेले आहे. या ग्रंथात दुसऱ्या एका शक ११२६ च्या (हिजरी ६००) सुमारास लिहिल्या गेलेल्या जुन्या पष्तो-भाषीय ग्रंथातील काही भागाची चर्चा आहे. त्यात हबीबी यांनी मिज़्गित शब्दाच्या पाठस्थापनेची चर्चा केलेली आहे (पाहा-पृ. ५१). मिज़्गित हा शब्द या जुन्या उताऱ्यात वापरला गेलेला आहे.

असदी तूसी (मृत्यू साधारणतः शक १००२ - हिजरी ४७३) याने फार्सी भाषेतील आर्ष आणि दुर्मिळ शब्दांचा कोश रचिलेला आहे. हा फार्सी भाषेतील पहिला कोश होय. त्याने गर्शास्प-नामा हे महाकाव्य शक ९७८ (हिजरी ४४७) मध्ये पूर्ण केले होते. विशेष हे की आज उपलब्ध असलेल्या फार्सी हस्तलिखितांपैकी असदीच्या या ग्रंथाचे कालदृष्टचा प्राप्त असलेले सर्वात जुने हस्तलिखित होय. असदी तूसीने मिज़्गित म्हणजे मस्जिद होय असा अर्थ आपल्या केशात दिलेला आहे (पाहा-हबीबी, पृ. ५१). ते वाक्य असे— "मिज़्गित ब-पार्सी मस्जिद बाशद" या ग्रंथाचे नाव लुग़ात-इ फ़र्स असे आहे. तबरी या प्रसिद्ध इतिहास लेखकाच्या अरबी ग्रंथाचा फार्सी अनुवाद करणारा धाकटा बलअमी शक ९१८ मध्ये दिवंगत झाला. त्याने शक ८८६ मध्ये तबरीच्या अरबी ग्रंथाचा सारांश रूपाने फार्सी भाषेत अनुवाद केला. हबीबी याने अशी नोंद केली आहे की बलअमीच्या या अनुवादात मिज़्गित असा शब्द अनेक वेळा वापरलेला आहे. हबीबी याने असेही नोंदले आहे की, अफगाणिस्तानातील सुशिक्षित व प्रतिष्ठित

लोक आजदेखील मिज़्दिक (म्हणजे मशीद) शब्द मशिदीसाठी वापरीत असतात (पाहा – हबीबी, पृ. ५१). मिज़्दिक शब्दातील अंत्य क, लघुत्व अथवा प्रतिष्ठावाचक प्रत्यय आहे असे हबीबींनीच सांगितलेले आहे. स्टीनगासच्या फार्सी–इंग्रजी कोशात मज़्गित म्हणजे मशीद असा अर्थ देऊन या शब्दाचे मूळ अरबी मस्जिद शब्द होय असे सांगितलेले आहे. या शब्दाच्या उच्चारासंबंधी मिनोर्स्कीबद्दल वरती जे म्हटले आहे तेच स्टीनगास यालाही लागू आहे. लुग़ात-इ किशोरी या फार्सी–उर्दू कोशातही हा शब्द दिलेला आहे. तसेच ग़ियासूल लुग़ात व मुन्तख़बूल-लुग़ात या (नवलकिशोर, लखनौ) या कोशातही मिज़गित असा शब्द दिलेला आहे. हा शब्द अरबी आहे असे मोघमपणे म्हटलेले आहे. गमतीची गोष्ट ही की खरा उच्चार मिज़गित आहे असे आवर्जून सांगितले आहे, आणि त्याला फर्हंग-इ जहांगीरी या कोशाचा आधार दिलेला आहे. म्हणजे ईराण, अफगाणिस्तानादि देशात हाच उच्चार रूढ होता. आश्चर्य हे की हाच उच्चार भारतात आरम्भापासून संस्कृत-मराठी आदि भाषात रूढ झालेला आढळतो. याचा अर्थ असा की, भारतातील इस्लाम सम्पर्क ईराणी मुसलमानांच्या माध्यमाने आला.

भाषावैज्ञानिक चर्चा

मस्‌जिद या अरबी शब्दाचे सारूप्यीकृत (Assimilated) मिज़्गित रूप फार्सी भाषेत शक ८८६ मध्ये नोंदलेले आहे, तर त्याचा भारतीय अवतार मिजिगिति असा शक ९७५ मध्ये वापरलेला आढळून येतो. भारतीय रूप एका दृष्टीने फार्सीकृत रूपाची केवळ प्रतिकृति आहे व हे सहज दिसून येण्यासारखे आहे. मिजिगिति हा शब्द भारतीय भाषिक परम्परेत घोळलेला आहे एवढेच. शब्द स्त्रीलिंगी वापरलेला आहे म्हणून मति, गति आदि शब्दाप्रमाणे शब्दाला इकारान्त स्त्रीलिंगी रूप दिलेले आहे. ज या हलन्ताला इकारयुक्त बनविले आहे. शेवटच्या दोन ध्वनींच्या अनुषंगाने आद्यध्वनीलाही इकार प्राप्त झालेला असावा. परंतु हाच उच्चार सातत्याने तीन शतके पार्सी, संस्कृत, मराठी आदीत प्रयुक्त आहे, हे विशेष उल्लेखनीय आहे.

डॉ. हबीबी यांनी पष्तो आणि फार्सीत रूढ असलेल्या उपर्युक्त रूपांवरून मिज़्दिक हा शब्द पष्तो धातूपासून व्युत्पादण्याचा प्रयत्न केलेला आहे, परंतु तो अगदी न पटण्यासारखा आहे. कारण अरबी भाषेत सजद हा मूळ त्र्यक्षरी धातू अरबी भाषेच्या मूळ प्रकृतिनुसार, आढळून येतो. या धातूची नियमानुसारी अनेक रूपे व शब्द अरबी फार्सीत आजही रूढ आहेत. म्हणून मस्‌जिद हा शब्द स्थान-

फार्सी भाषेतील मिज़्गित हा शब्द मस्जिद शब्दाचे खुरासनात झालेले सरळ सरळ सारूप्यीकृत रूप आहे, हे उघड आहे. येथे मस्जिद शब्दातील स ध्वनीचे ज ध्वनीत, मूळ ज ध्वनीचे ग ध्वनीत आणि अत्यं द ध्वनीचे त ध्वनीत रूपान्तर झालेले आहे. पूर्व ईराणीतील भाषा सोग्दियन, पष्तो, खोतनी आदिच्या मूळ प्रकृतीकड़े पाहिल्यास हे रूपान्तर सरळच आहे, असे दिसून येते. अन्यभाषीय ज ध्वनींचा पष्तो आदीत ग उच्चार होतो. अंत्य द ध्वनीचे त ध्वनीत झालेले रूपान्तर तर सोगदी चूलिका भाषेची गुरुकिल्ली आहे असे म्हणता येईल. पैशाची प्राकृत-मध्ये हाच नियम प्राचीन कालापासून रूढ आहे. तो येथे कार्यप्रवण झालेला आढळतो.

सारूप्यीकरणाची प्रक्रिया कोठे घडून आली ? भारतात का खुरासानमध्यें ? भारतामध्ये मिजिगिति शब्द वापरला जाण्यापूर्वी निदान ८९ वर्षे मिज़गित हा शब्द खुरासान व अफगाणिस्तानमध्ये वापरात होता, हे वरील चर्चेवरून स्पष्टतया दिसून येते. म्हणून मिजिगिति हा शब्द भारतात घडवून घेतला असे म्हणणे कठीण आहे. तो मूलतः अफगाणिस्तानात घडलेला मिज़गित शब्द होय, हेच योग्य वाटते. ईराण, खुरासानने शब्द घडविला, तो तेथील इस्लामधर्मीयांबरोबर भारतात आला व तोच संस्कृतात रूढ झाला असा निष्कर्ष काढणे योग्य आहे.

ताजी, ताजीय, ताजिक हे शब्द अरब देश, भाषा व लोक यांचे दर्शक आहेत. परंतु संस्कृत भाषेत ताजिक शब्द दिसल्याबरोबर तो अरबांशी संबंधीत करण्याची भारतीयांना सवय जडलेली आहे. परंतु हे वंशदृष्टचा व भाषिक दृष्टचाही तितकेसे खरे नाही. अरब अथवा इस्लामी संस्कृतीचा आत्मा ईराणी संस्कृतीने घडविलेला आहे. भारतात अहमद, मुहम्मद, महमूद आदि नावाने आलेल्या व्यक्ति, वंश व भाषा दृष्टचा अरबच होत्या असे मुळीच नाही. ईराणी लोकांनी अशी नावे धारण करून पुष्कळ अरबी साहित्य निर्माण केलेले आहे, याची चर्चा गोल्डज़िहर, ब्राऊन आदींनी आपल्या ग्रंथातून केलेली आहे. अशी नावे धारण करणाऱ्या व भारतात नाखवा, नवाईत आदि नावे धारण करून मशिदी उभारणाऱ्या, व्यक्ति बऱ्याच प्रमाणात ईराणी होत्या हीही गोष्ट आता विद्वानांनी उजेडात आणलेली आहे (पाहा देसाई, पृ. २.). या संबंधात वाचकांनी आमचा लेखही पाहावा (चौहान, पृ. ४३).

सारांश रूपाने सांगावयाचे झाल्यास, असे म्हणता येईल की –

(१) मिजिगिति शब्दाची सारूप्यीकरण प्रक्रिया पूर्व ईराण व अफगाणि-स्तानात घडून आलेली आहे असे आढळते. हे रूप मराठीने घडविलेले नाही.

(२) मराठीत रूढ होण्याच्या शतक दीड शतक अगोदरपासून मिजिगिति शब्द मिज़गित रूपाने त्या प्रदेशात वापरात आलेला होता.

(३) ईस्लामी राज्यसत्ता भारतात व महाराष्ट्रात स्थिर होण्याच्या अगोदर, येथे अरबांचाच संबंध आला हे तितकेसे खरे नाही. या सम्पर्कात ईराणी लोकांचा सिंहभाग होता. हा शब्द या सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या प्रतीकरूप आहे.

(४) अरब अथवा इस्लामी संस्कृतीवरील ईराणी संस्कृतीची पुटे या शब्दावरून दिसून येतात.

श्रावण २४, १८९३.

(विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक, नागपूर, शक १८९३.)

संक्षेप आणि संदर्भ

एइं – एपिग्राफिया इण्डिका, खण्ड ३४, दीनेशचंद्र सरकार
चौहान – इतिहास आणि संस्कृति, त्रैमासिक, पु. २८, १९७१ (दे. व्यं. चौहान)
दीक्षित – मराठी शिलालेख– नवे पाठ, मोरेश्वर दीक्षित, मुंबई १९६३.
देसाई – एपिग्राफीया इण्डिका, अरबी फार्सी परिशिष्ट, १९६५, (जि. देसाई)
पिसुर्लेकर – ओरिएंट पोर्तुगीज, मासिक खण्ड २२, १९३८ (पिसुर्लेकर)
मिनोर्स्की – हुदूद-इ आलम, मिनोर्स्की, लंदन १९७०.
हबीबी – पष्तो व लवीकान-इ गज़ना, अब्दुल-हय्य् हबीबी, काबूल, सौर १३४१ (१९६२).

◆◆◆

२४ : दातीं तृण धरणे

स्व. डॉ. पी. के. गोडे मोठे साक्षेपी व सूक्ष्मदर्शी संशोधक होते. संशोधन क्षेत्रात त्यांनी एक आपला नवा मार्ग काढला, एक नवीन पायंडा पाडला. बंदुकीची दारू यासारखी एखादी नवीन अस्तित्वात आलेली वस्तू असो किंवा आपल्या देशात नव्याने आलेला मका, तम्बाकू सारखा शेतीतील एखादा पदार्थ असो, त्या वस्तूचा प्रमाणसिद्ध सूत्रबद्ध इतिहास निर्माण करण्यात त्यांचा हातखंडा होता. एस्. के. बेलवलकर सम्पादित महाभारताच्या राजधर्म या खण्डात (पृ. ४६६) त्यांना खालील श्लोक पाहायला मिळाला.

वृद्धं बालं न हन्तव्यं नैव स्त्री न च वै द्विजः ।
तृणपूर्णमुखश्चैव तवास्मीति च यो वदेत् ॥ ९९·४७

या श्लोकात तोंडात गवताची काडी धरणाऱ्या व्यक्तीला मारू नये असा नीतिशास्त्राने घालून दिलेला दण्डक उल्लेखिलेला आहे. या मूळ सूत्राचा आधार घेऊन या नीतिमूल्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न डॉ. गोडे यांनी केलेला आहे. या उल्लेखानंतर त्यांनी इटली देशात इ. स. २३ ते ७९ या कालात जीवित असलेल्या प्लिनीच्या नॅचरल हिस्टरी मधील तृण देणे म्हणजे स्वतःला जित म्हणून मान्य करणे, अशा अर्थाच्या लॅटिन म्हणीचा आधार निर्माण केलेला आहे. यानंतर शक ५५२ वर्षाखाली बाणभट्टाच्या हर्षचरितातील, आपण पराभूत झालो असे घोषित करण्यासाठी भेकडांनी दातीं तृण धरले, या गोष्टीचा उल्लेख केला आहे. क्षेमेश्वर (जीवितकाल शक ७७२ ते ८७२) या कनौजनगरस्थ विद्वानाच्या चण्डकौशिक नाटक ग्रंथातील, हरिश्चंद्र राजा स्वतःला गुलाम म्हणून विकू इच्छितो. त्या अर्थी त्याच्या डोक्यावर गवत ठेवावे, अशा नाटकात उल्लेखिलेल्या सूचनेची नोंद करण्यात आली आहे. तदनंतर गुजरात प्रदेशातील मेरुतुंग याच्या प्रबन्धचिन्तामरणी या ग्रंथातील शक १२२७ मधील शरणागतिदर्शक दाती तृण धरण्याच्या दोन उल्लेखांची नोंद केलेली आहे. अफगाण लोकांनी आपण शरण आलो म्हणून दाती तृण धरले होते असा, आपल्या तुर्की भाषेतील आत्मचरित्रात बाबराने (जीवितकाल शक १४०५ ते १४५२) उल्लेख केल्याची नोंद केलेली आहे. यानंतर महाराष्ट्रांतील रुद्र कवीने (शक १५१८) आपल्या राष्ट्रौढवंश महाकाव्यात जव्हारचा राजा बागलाणच्या राजाला शरण आला, याचे चिन्ह म्हणून त्याने दाती तृण आणि मानेवर कुऱ्हाड धारण केली होती या घटनेचा उल्लेख आलेला आहे. रुद्र कवीचे खालील उल्लेख असे आहेत.

शेषेषु केचिद्द्विधिरे परतेतां परे पलायन्त नितान्तकातराः ।
तृणानि दन्तेषु निधाय चेतरे नरेश्वरं ते शरणं प्रपेदिरे ॥ ७·५५
मुखे तृणं कण्ठतटे कुठारं कृत्वा जवारिक्षितिपः सकम्पः ।
दयासमुद्रं शरणं शरण्यं नारायणं भूपतिमाजगाम ॥ १२·६१

आंध्र प्रदेशातील वेंकटाध्वरीच्या विश्वगुणादर्शात (शक १५७२) दाती तृण धरणे या रीतीचा उल्लेख असल्याची नोंद आलेली असून सर्वात शेवटी महाराष्ट्रातील कृष्णाजी अनंत सभासदाने (शक १६१९) दाती तृण धरून शत्रू शरण आला, असा दोनदा केलेला उल्लेख नोंदविला आहे. " भांडते लोकांनी **तोंडी तृण धरून शरण आले** त्यांसि व बायका मुले, भट, ब्राह्मण गोरगरीब असे अनात करून सोडन दिले (शं. ना. जोशी, पृ. १८) आणि " रायबाघीण कोंडली. तिणे **दाती तृण धरून** लेक राजियाची म्हणून बोलून कौल घेतला " (जोशी, पृ. ६१)

आमच्यासमोर आणखी काही माहिती आली; ती येथे वाचकांना सादर करावयाची आहे. जरासंधाचा पराभव झाल्यानंतर त्याच्या सेनापतींनी दाती तृण धरून शरणागती पत्करिली असे एकनाथ महाराजांनी आपल्या रुक्मिणी स्वयंवरात (लेखनकाल शक १४९३) वर्णिले आहे (पाहा-जोशी). संबंधित ओव्या अशा—

पळता न पळवे निश्चित । म्हणोनि बैसिले ध्यानस्त ।
पूजा लोकांची वांछित । भोगीं चित्त ठेवूनि ॥ ११·६४
दांतीं तृण तोडि पाही । येक म्हणती आम्ही गाई ।
पशु जाले मनुष्यदेहीं । अभक्ष पाही भक्षीती ॥ ११·६५

नाथाच्या भावार्थ रामायणातही (लेखनकाल शक १५२१ च्या सुमारास) या संकेताचा वापर केलेला दिसून येतो. नाथांना हा ग्रंथ वार्धक्यामुळे पुरा करता आला नाही. गावबाने उर्वरित तृतीयांश रामायण पूर्ण केले. युद्धकांडाच्या ४४ व्या अध्यायोत्तर भाग गावबाने लिहिलेला आहे. गावबाने हा संकेत असा वापरलेला आहे.

एक सांडिती लेणीं लुगडीं । एक तृण धरिती तोंडीं ।
एकाची वळली बोबडी । पडली मुरकुंडी एकाची । ६·६·४५
(भावार्थ रामायण– न. वि. पणशीकर, पुणे श. १८९०)

मुल्ला नुस्रती हा आदिलशाही दरबारातील दक्खिनी हिंदी भाषेचा महाकवि होता. त्याला राजकवि अशी पदवी होती. त्याच्या अलीनामा (लेखनकाल शक १५८७) या महाकाव्यात दातीं तृण धरणे या प्रथेचा तीन वेळा उपयोग केलेला आहे (पाहा–नुस्रती). सीद्दी जौहर याच्या अभेद्य वेढ्यातून शिवाजीने पन्हाळगडातून आपली सुटका करून घेतल्यानंतर, मागे राहिलेल्या शिवाजीच्या सेनेचे वर्णन करताना, नुस्रती म्हणतो—

यूं अलामां की हांक सब चौं–घिर ते गडपर ते उठी
आजिज़ हो काडी मुक पकड धर नाला दिल–अफ़गारका १२·१४९

नुस्रती हा द्वितीय अली आदिलशाह याचा आश्रित. अलीचे शौर्य वर्णन करताना एका कसीद्यात कवि म्हणतो—

बरछयां को रजपूतां अपस दांतां में काडी कर धरै
हम्ला करे जिस सफ़ पो तू जब मार नारा हैदरी १५·२९

शक १५८७ मध्ये मीर्जा राजा जयसिंगाने विजापुरावर स्वारी केली होती. ही मुगलांची धाड अली आदिलशाह याच्या सेनेने प्राणपणाने परतविली. विजापुरी सेनेने जयसिंगाला पराभूत केले. त्यावेळी नुस्रती म्हणतो—

बिसर रज कुं रजपूत बरच्यां कु हार
धरन आये दांतां में काडी के ठार २८·३९९

वरील तीन श्लोकात मुख में काडी पकडना, दांतां में काडी पकडना आणि दांतां में काडी पकडना या प्रयोगांनी नुस्रतीने दांती तृण धरणे या मूळ कल्पनेचा वापर केलेला आहे.

फार्सीच्या ग्रंथांतून ही प्रथा नोंदविल्याचे माझ्या पाहाण्यात आले नाही. परंतु ती फार्सी साहित्यातही आहे असे दिसते. कारण स्टीनगास या फार्सी-इंग्लिश कोशकाराने (चौथे मुद्रण, १९५७) **काह दर दहन गिरिफ़्तन** हा वाक्यप्रयोग नोंदवून त्याचा अर्थ क्षमेची–अभयाची याचना करणे असा दिलेला आहे. यावरून ईराणी लोकात हा संकेत रूढ होता असे निश्चयाने म्हणता येते. अफगाण लोकात ही प्रथा रूढ होती हे स्व. डॉ. गोडे यांनी नोंदविलेले आहेच.

शक १२२७ मधला दातांत काडी धरण्याचा उल्लेख वरती आलेला आहे. साडे सहाशे वर्षानंतर देखील ही प्रथा ओरिसा प्रदेशात जीवित व चालू आहे. हे महात्मा गांधीच्या एका आठवणीवरून कळून येते. माझे मित्र श्री. ल. स. वैद्य, एम्. ए., संचालक महाराष्ट्र राष्ट्रभाषा, औरंगाबाद विभाग, यांनी चर्चेच्या समयी ही आठवण मला सांगितली व ग्रंथसंदर्भही दिला. याबद्दल मी त्यांचा आभारी आहे (पाहा-गांधी, पृ. ७६-७७). ही आठवण बोलकी असल्याने जशीच्या तशी देत आहे.

—" ता. ११ डिसेम्बर १९२७ सालची गोष्ट. मी दीनबंधु अँड्र्युज बरोबर बोलत बसलो होतो. तोच एक माणूस वाकत वाकत आमच्या जवळ आला. त्याची पाठ अर्धी वाकलेली होती. त्याच्या अंगावरील कपडे म्हणजे त्याने कमरेभोंवती गुंडाळलेले एक घाणेरडे फडके.

त्याने आपल्या तोंडात गवताची एक काडी धरली आणि आमच्या पायाशी लोटांगण घातले. नंतर तो उठून उभा राहिला. त्याने हात जोडले, मान हलविली आणि तोंडातील काडी काढून ती आपल्या डोक्याच्या केसांत खोवली व तो परत जावू लागला.

हे दृश्य पाहत असताना माझ्या जीवाची तडफड होत होती. एका दुभाष्याला बोलावून मी त्या माणसाची विचारपूस केली. तेव्हा मला कळले की, सहा मैल अंतरावरील एका खेड्यात राहणारा तो अस्पृश्य आहे. बोलगड येथे सरपण विकण्यासाठी तो आला होता. तेथे माझी माहिती कळल्यावर तो मला भेटावयास आला. " मग तोंडात ही काडी का धरली ? " " आपला मान करण्यासाठी " लज्जेने माझे शिर खाली लवले. माझ्या मानाची ती किंमत मला असह्य झाली. माझी हिंदुधर्म भावना फार दुखावली गेली.

मी त्याच्याजवळ हरिजन कार्यासाठी देणगी मागितली. तो आपली कमर चाचपूं लागला. एखादे तोळ्याचे नाणें निघते का पाहू लागला. मला पैसा नको तुझा, त्याहून मोलाची वस्तू मला पाहिजे आहे. मी म्हणालो. " देतो मागा " तो पुटपुटला.

जनरूढीप्रमाणे तो मांसाहार करीत होता—मद्यपानही करीत होता. हे सर्व त्याच्याकडून कळले, तेव्हा मी त्याला म्हटले, " जगातल्या कोणत्याही माणसाकडे जाताना यापुढे तोंडात काडी धरूं नकोस – माणुसकीला कमीपणा आणणारी ती गोष्ट आहे. यापुढे कधी दारू पिऊं नकोस – कारण माणसाला पशूच्या अवस्थेला नेणारे ते व्यसन आहे. तसेच कधीही मुर्दाड मांस खाऊं नकोस कारण ते हिंदुधर्माच्या विरुद्ध आहे. कोणताही सुसंस्कृत मनुष्य मांस खात नाही. या तीन गोष्टी सोडून दे—तीच मला मोठी देणगी. "

" माझे जातभाई मला वाळीत टाकतील, मी मद्य-मांस सोडले तर " बिचारा कुरकुरला. " तो बहिष्कार सहन कर — जरूर तर गांव सोड पण ही तीन व्यसने सोड. " " सोडतो " असे अभिवचन त्या दलित मानवाने दिले. ते त्याने पाळले, तर लक्ष्मीपुत्रांनी मला दिलेल्या द्रव्यराशीपेक्षा त्याची देणगी मी अधिक मोलाची मानीन. अस्पृश्यता आम्हांला लज्जास्पद आहे. "

वरील आठवणीतील संबंधित भाग असा की आजदेखील दाती तृण धरण्याची प्रथा समाजात मूळ धरून राहिलेली आहे. ऐतिहासिक दृष्टीने तिच्या व्यवहारात आता बदल झालेला आहे. (१) पूर्वकालात राजकीय व्यवहारात पराभव झाला तर जीव वाचविण्यासाठी, अभय मिळविण्यासाठी काही क्षणाकरिता दातात काडी धरली जात असे; परंतु आजच्या काळात या प्रथेने सामाजिक रूप धारण केलेले

आहे. आपले चिरकालीन पराभूतत्व, आपणाला सदैव चिटकलेला नीच दर्जा, व्यक्त करण्यासाठी दातांत काडी धरण्याच्या. (२) या प्राचीन परम्परेविषयी दुसरी सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे ही परम्परा भारोपीय भाषा बोलणाऱ्या निरनिराळ्या देशांतील लोकसमूहांत चालत आलेली आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

(युगवाणी मासिक, नागपूर, मे–जून १९७२)

संक्षेप आणि संदर्भ

गांधी – गांधी विचारदर्शन, खण्ड ३, जीवनसाधना पुणे, १९५९
गोडे – स्टडीज इन इण्डियन कल्चरल हिस्टरी, खण्ड ३, भाग २, पुणे १९६९
जोशी – एकनाथकृत रुक्मिणी स्वयंवर, न. ग. जोशी, मुंबई – १९३३
नुस्रती – नुस्रतीकृत अलीनामा, अब्दुल-मजीद सिद्दीकी, हैद्राबाद, १९५९

◆◆◆

२५ : बाणाचे अन्तर

१.१ बाणाचे अन्तर ही संकल्पना महाराष्ट्रात व त्याच्या आसमंतात शिवकालात चांगलीच परिचित व रूढ होती असे इतिहास साधनांवरून दिसून येते. शिवाजी व अफजलखानाच्या झालेल्या घटनाप्रसंगी **बाणाचे अंतर** या संकल्पनेचा कोणातरी मुत्सद्याने वापर केलेला होता असे निश्चयाने म्हणता येते. कारण अफजल-शवाजी भेटीत फक्त दोन शरीररक्षक प्रत्येकाच्या बरोबर असावेत अशी भेटीच्या अटींपैकी एक अट होती. या अटीचा भंग झालेला होता. ही गोष्ट पंताजी अर्थात् गोपीनाथ रंगनाथ बोकील हिवरेकर या खानाच्या वकिलाच्या कानावर घातल्याने त्याने खानास तशी सूचना केली. हा प्रसंग सभासदाने असा वर्णिला आहे (पाहा - जोशी, पृ. १५). इतक्यात पंताजीपंत पुढे होऊन अर्ज केला कीं, इतका जमाव घेऊन गेलियानें राजा धाशत खाईल. माघारा गडावरि जाईल. भेटी होणार नाही. शिवाजी म्हणजे काय ? यास इतका सामान काय करावा ? राजा दोघा माणसांनिशी तिकडोन येईल. तुम्ही इकडोन दोघांनिशी चलावे. दोघे बैसोन भेटावें. तेथे तजवीज करणें ते करा. असें सांगितल्यावरि अवघा जमाव दूर **बाणाचे टपियावरि** उभे राहून खासा खान ...... पुढे चालिले.

१.२ सभासदाने आपले बखररूपी शिवचरित्र शक १६१९ मध्यें लिहिलेले आहे. म्हणजे **बाणाच्या टपियावरि** हा उलेल्ख याच सालातील आहे. ही घटना मात्र मार्गशीर्ष शुक्ल ७, शक १५८१ रोजी घडलेली आहे. बाणाच्या अन्तराचा दुसरा उल्लेख शिवाजीचा चरित्रकार कवीन्द्र परमानन्दने केलेला आहे. कवीन्द्राने आपला संस्कृत शिवभारत ग्रंथ शक १५९२ च्या पूर्वी लिहिलेला आहे. शिवाजी अफजल प्रसंगातच परमानन्दाने वरील संकल्पतेचा वापर केलेला आहे. तो असा (पाहा – दिवेकर)

तिष्ठन्तु दंशिताः शूराः पृष्ठे दश दश स्थिराः

शरस्यान्तरमासाद्य रक्षणाय द्वयोरपि ॥ २१.७

दोहोंपेक्षा अधिक असलेली दहा-दहा माणसे **बाणाच्या** अन्तरावर उभी केली, असा हा परमानन्दाचा उल्लेखही लक्ष्य आहे. म्हणजे बाणाच्या अन्तरावर इतर माणसे उभी करावीत असे उल्लेखपूर्व ठरलेले होते, असा निष्कर्ष निघतो. ज्या अर्थी बाणाच्या अन्तरावर माणसे हटविण्याची अट ठरली होती, त्या अर्थी बाणाच्या अन्तराची संकल्पना निश्चित स्वरूपाची होती, हाही निष्कर्ष अनिवार्य आहे. हे अन्तर किती असावे याचा सुगावा मागाहून घ्यावयाचा आहे.

१·३ संस्कृत साहित्यातही बाणाच्या टप्प्याची संकल्पना बद्धमूल झालेली होती असे दिसून येते. तूर्त मला मूळ उतारे काढता आलेले नाहीत. परंतु महाभारतात शरपात असा शब्द बाणाच्या अन्तरासाठी वापरलेला आहे, असे संस्कृत कोशावरून कळते. तसेच दशकुमार-चरितात याच संकल्पनेसाठी शरक्षेप शब्द वापरल्याचे कोशावरुन कळते. हे दोन्ही शब्द फार्सी तीर-रस शब्दाशी कसे समानार्थक आहेत याची कल्पना करता येते. म्हणजे भारतीय व ईराणी आर्यांत ही संकल्पना रूढ होती असे कळते.

१·४ शिवकालातील इतिहास लेखकांच्या डोक्यात बाणाच्या अन्तराची संकल्पना चांगलीच रुजली होती असे आढळून येते. छत्रपति शिवाजीच्या ९१ व्या कलमी बखरीत देखील ही कल्पना अफजलखान प्रसंगीच आलेली आहे. परन्तु वेगळ्या संदर्भात. ही संदर्भचूक या बखरीच्या उत्तरकालीनत्वाचीही खूण होय. हा संदर्भ असा–" पूर्वेकडून खान येताच पालखीखाले उतरले तीराचे खासेहून (फासलेहून) पायी चालत आले " (पाहा वाकसकर, पृ. २६). येथे तीराचा फासला म्हणजे अन्तर उपरोक्त दोन्ही संदर्भाहून वेगळ्या संदर्भात वापरलेले आहे. मुख्य मुद्दा संकल्पनेच्या अस्तित्वाचा आहे. दत्तो त्रिमल हा शिवकालीन मुत्सद्दीही या संकल्पनेशी परिचित होता.

२.१ मुल्ला नुस्रती हा द्वितीय अ़ली आ़दिल याचा मलिकुशुअ़रा म्हणजे राजकवि. त्याने आपल्या अलीनामा ग्रंथात (लेखनकाल शक १५८७–हिजरी १०७६) बाणाचे अन्तर या संकल्पनेचा वापर दोनदा केलेला आहे (पाहा– सिद्दीक़ी, पृ. ५४ व २९८). त्यापैकी प्रथम उल्लेख असा—

गया जब अ़ली मुर्तजाबाद लग
पनाला रहया जां ते यक तीर लग । १२·२७

सीदी जौहर सलाबत खानाने शिवाजीला पन्हाळगडात कोंडले होते (शक १५८२). त्यावेळी अ़ली स्वत: मिरजेपर्यंत आला होता, त्या वेळचे हे वर्णन आहे. मिरजेहून पन्हाळा अगदी जवळ आहे असा या संदर्भाचा मोघम अर्थ आहे. नुस्रतीने केलेला दुसरा वापर असा आहे (पृ. २९८).—

चल्या ज्यूं मुग़ल जां ते सौ तीर लग
खिदेडे च हुलका उसे कोट लग । २८·४१४

येथे 'सौ तीर लगे' म्हणजे शंभर बाणाच्या अंतरावर कोटाकडे मुगल सेनेला हुसकून लावले, असा याचा अर्थ आहे. सौ तीर लग म्हणजे खूप दूरपर्यंत हुसकावले, असा या वापराचा देखील मोघम अर्थ होतो.

संस्कृत साहित्यात धनु म्हणजे धनुष्य हे देखील अंतर मोजण्याचे परिमाण आहे. येथे धनु म्हणजे धनुष्याची लांबी. धनु या परिमाणाचा वापर याज्ञवल्क्य

स्मृतीत (२. १६७) केलेला आढळतो. त्यावर विज्ञानेश्वराने टीपाही दिलेल्या आहेत. परंतु धनु हे परिमाणच भिन्न असल्याने आपणाला येथे थांबण्याचे कारण नाही.

३·१ फार्सी आणि खोतनी शक भाषेतही या संकल्पनेचा सुगावा लागतो. फ़ार्सीत बाणासाठी तीर हा शब्द सर्रास वापरला जातो. तीर शब्द मूलतः फार्सी, पहलवी, अवेस्ता भाषेतील होय. तो मागाहून भारतीय संस्कृतादि भाषांत प्रविष्ट झाला. तो संस्कृत कोशातही सापडतो. पण संस्कृतात तो ऋण शब्द आहे. स्टीनगास याने तो शब्द कदाचित जंद भाषेतील तिघ्य शब्दापासून व्युत्पन्न असावा असे म्हटले आहे. परंतु हे म्हणणे योग्य नव्हे; कारण खोतनी शक भाषेत या शब्दाचे मूळ तिग्रि शब्दापासून सापडते. याची चर्चा पुढे येत आहे. बाणाच्या अंतराची संकल्पना फार्सी साहित्यातही आढळून येते. फार्सी भाषेतील तीर-रस या शब्दाचा अर्थ असाच दिलेला आढळतो. येथे रस शब्द रसीदन-पोंचणे या धातूचे रूप आहे. तीर-रस शब्दांचा अर्थ होतो जेथपर्यंत मारलेला बाण जाऊन पडतो, पोंचतो ते अंतर. या शब्दावरून मारलेला बाण एका विशिष्ट अंतरापर्यंत जातो ही संकल्पना ईराणी लोकात प्रसृत होती, हे स्पष्टतया दिसून येते. डब्लू हारोल्ड बेली हे आंग्ल पंडित खोतनी शक भाषेचे मोठे अभ्यासक आहेत. शक भाषा व शक गण यांचा भारताशी जिव्हाळ्याचा संबंध आलेला आहे. हा संबंध शकपूर्व कालापासूनचा असून शक कालगणना या शक गणांची निर्मिती आहे, हे आता विद्वन्मान्यता पावत आहे. शक गणाच्या खोतनी शक भाषेत ज़म्बस्त नावाचा ग्रंथ असून तो संपादित होऊन आता प्रकाशात आलेला आहे. या ज़म्बस्त ग्रंथातील १५०० शब्दांचा व्युत्पत्तिकोश हारोल्ड बेली याने तयार केला आहे. या ग्रंथात दुराह या शब्दाची व्युत्पत्तिचर्चा करीत असताना (पाहा – बेली, दुराह) बाणाच्या अंतराचा उल्लेख केलेला आहे. दुराह या शब्दाचा अर्थही बाणाच्या अंतरावर असाच आहे. दुराह शब्दातील प्रथमांश द्रव, दूर्ण म्हणजे तीर, बाण असा आहे. हज्जियाबाद येथील सासानवंशकालीन पहलवी भाषेतील एका प्रस्तर-लेखात Wtiwny म्हणजे अंतर असा शब्द वापरल्याचे बेली याने उल्लेखिले आहे. अर्मेनियन भाषेत Vteuan, Vtauan, Ter'hy असे शब्द आल्याचेही त्याने सांगितले आहे. शेवटचा शब्द तिग्रि-आह शब्दापासून व्युपत्न्न आहे, असे बेलीने प्रतिपादिले आहे. तिग्रि, तिग्र या शब्दापासून तीर शब्द व्युत्पन्न असावा, असे दिसते.

बेलीने सम्पादिलेली व अन्य विद्वानांनी अभ्यासिलेली खोतनी शक भाषेतील साहित्यसामग्री शक ९ शेच्या अगोदरची आहे. कारण खोतनचे बौद्ध राज्य याच सुमारास मुसलमानांच्या आक्रमणास बळी पडले. या वाङ्मयात बाणाचे अंतर या संकल्पनेचा आढळ एका दृष्टीने लक्ष्य आहे. सासान साम्राज्य शक कालच्या

पाचव्या शतकात आपल्या उत्कर्षाच्या शिखरास पोचलेले होते. सासानवंशीय प्रत्नलेख या व पूर्वीच्या कालातील होत. म्हणजे बाणाच्या अन्तराची संकल्पना ईराण देशात किमान चौदाशे वर्षे इतकी जुनी आहे. खोतनमध्ये हा काल निदान एका हजाराचा येतो. शक लोक मूलतः ईराणी होत. शक गणाच्या अन्य बोली-प्रमाणे खोतनी शक भाषादेखील ईराणी भाषेची एक संपन्न शाखा आहे. बाणाचे अंतरवाचक शब्द व त्याचे पर्याय सोग्दिया (चूलिक, शूलिक), ईराण व अफगाणिस्तान या प्रदेशात रूढ होते. म्हणजे बाणाच्या अन्तराची संकल्पना आर्य गणाच्या या भूप्रदेशात रूढ होती असे म्हणण्यास प्रत्यवाय असू नये.

३·२ बुर्हान-ई क़ातिअ् हा फार्सी कोश मुहम्मद हुसेन तबरीज़ी या ईराणी विद्वानाने हिजरी १०६२ (शक १५७४) मध्ये गोवलकोंडा येथे अब्दुल्ला कुतुबशाह याच्या सूचनेनुसार लिहिला. बुर्हान हे लेखकाचे कविनाम. या कोशाची चिकित्सक आवृत्ति डॉ. मुहम्मद मुअ़यिन या विद्वानाने पाच खण्डात सौर हिजरी १३४२ (शक १८८६) साली प्रकाशित केली आहे. या कोशात तीरगान आणि तीर या दोन शब्दांच्यावर दिलेल्या टीपा लक्ष्य आहेत. तीरगान हा ईराणी लोकात नौरोजसारखाच राष्ट्रीय सण आहे. या तीरगानच्या उत्पत्तिची एक पौराणिक कथा इस्तख़री, बलअ़मी, बेरूनी आदि इतिहास लेखकांनी दिलेली आहे. ती कथा अशी – अफरासियाब आणि मिनूचिहर या दोन प्रतिद्वंद्वी राजात तह ठरला. त्यात एक अट अशी होती की मिनूचिहर याच्या कोण्या एकाने मारलेल्या बाणापर्यंत मिनूचिहरच्या राज्याची सीमा राहावी. शहाण्या लोकांनी विशेष कलापूर्ण असा एक तीर बनविला. "हुकमां तीरे साख़्तंद अज़ रूए हिकमत" दुसरे दिवशी सूर्योदय समयी आरश् नावाच्या धनुर्धाऱ्याने हा तीर मारला (भारतीय अर्जुनासारखीच याची धनुर्धारी म्हणून ख्याति आहे). तो माजंदरान म्हणजे कास्पियन समुद्राच्या तट प्रदेशात होता तेथून आरश् याचा तीर अमू दर्या– (ऑक्सस) नदीच्या काठी जाऊन पडला या विजयानिमित्त हा तीरगान उत्सव करण्यात येतो. या पुराणकथेत अन्य गोष्टी, बरोबर बाण किती अंतरावर जाऊन पडला, ही अत्यंत महत्त्वाची घटना होय (पाहा मुअ़यिन, तीर व तीरगान).

३·३ तीर-ई परताब या सामासिक शब्दाचा अर्थ (स्टीनगास) कोशात परि-सीमेला पोंचणारा तीर असा दिलेला आहे. परताब हा शब्दही काहीसा अस्पष्ट असाच आहे. याचाही अर्थ तीर असाच दिलेला आढळतो. परंतु तीर-ई परताब हे मारलेल्या बाणाचे अंतर होय असा एक वापर आढळतो. **अरबों की जहाजरानी** या उर्दू ग्रंथात सुलेमान नदवी यांनी इस्तख़री याच्या किताबुल् मसालिक या ग्रंथातील (लेखनकाल हिजरी ३४०-शक ८७४) एक मूळ उतारा भाषांतरित करून दिलेला आहे. हे बसरा शहराचे वर्णन असून या नगराच्या परिसरात जहाजे

येण्यासाठी नदीचे कालवे काढलेले होते असा सन्दर्भ आहे. मूळ अनुवाद असा– " अहले-सैर (प्रवासी) के इस बयान का कि हुदूदे–(सीमा) बसरा में इस क़द्र नहरें थीं, मुझे यक़ीन (विश्वास) न था. लेकिन जब मैंने बसरा देखा तो यक़ीन आ गया. क्यों कि एक-एक **तीरे-परताब** पर ऐसी नहरें देखीं जिनमें छोटी किश्तियां चल रही थीं. " येथे **तीरे-परताब** हा शब्द लक्ष्य आहे. येथे हा शब्द अंतराचे परिमाण आहे, हे उघड आहे. एकंदरीनें पाहाता, एखाद्या कुशल धनुर्धाऱ्याने मारलेल्या बाणाचे अधिकाधिक अन्तर म्हणजे **तीरे-परताब** होय, असे दिसून येते (पाहा नदवी, पृ. ५७).

४·१ बाणाचे अन्तर किती असावे हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. बाणाचे अन्तर हा परिमाणभूत संकेत, संस्कृत, मराठी, दक्खिनी हिंदी व तसेच पहलवी, खोतनी शक व फार्सी भाषात शतकानुशतकें रूढ होता. धनुर्विद्या वापरणाऱ्या या आर्य गणात, या लांबीचे प्रमाण, मोघम रूपात का होईना, निश्चितपणे ठरलेले होते असे दिसून येते. या ठराविक अन्तरावर माणसे उभे करण्याची अट शिवाजी-अफजल भेटीत ठरलेली होती. पण हे अंतर किती होते हे सांगणे कठीण आहे. आर्यविन् याच्या ग्रंथावरून अलीकडील विशेषतः इसवीच्या सतराव्या अठराव्या शतकातील, बाणाच्या अन्तराची कल्पना येते (पाहा-आर्यविन, पृ. १०२, १०३) रिसालए-तीरो-कमान या फार्सी ग्रंथाच्या आधारे नेम कसा धरावा याची माहिती दिली आहे. लक्ष्य योध्यापासून धनुर्धारी घोडेस्वार २०० यार्डाच्या अंतरावर असेल तर त्याने लक्ष्याच्या शिरस्त्राणावर नेम धरावा, जर तो १०० पावलांच्या अंतरावर असल्यास, त्याच्या तोंडावर आणि लक्ष्य ५० पावलावर असेल तर त्याच्या घोडयाच्या खोगिरावर नेम धरावा. असे केल्यास बाण प्रतिस्पर्ध्याच्या छातीस लागेल.

आर्यविन याने पुढे (पृ. १०३) अशी माहिती दिलेली आहे की, भारतीय बाणधारी ५० किंवा ७० यार्डाच्या अंतरावर असलेल्या चहाच्या प्याल्याचा नेम कधीही चुकत नाहीत. एका धनुर्धाऱ्याने या अंतरावरील उभ्या केलेल्या काठीचे बिनचूक छेदन केले असे त्याने नोंदविले आहे. आसामातील गिरिवासी या विद्येत फार पटाईत होते असे त्याने म्हटले आहे. ते २०० किंवा ३०० यार्डाच्या अंतरावरून एक फूट परिघाच्या भांडयाचे बिनचूक छेदन करीत, असे दिसून आले. आकाशातून भ्रमण करणाऱ्या पक्षांची हे लोक बिनचूकपणे शिकार करीत. त्यांचा नेम सहसा चुकत नसे.

४·२ गेल्या दोन तीन शतकात नोंदलेल्या माहितीच्या बारकाव्यावरून बाणाचे अन्तर किमान २०० ते ३०० यार्डाचे होते असे दिसून येते. हे नेम मारण्याचे अन्तर आहे आणि बाणाचे संकल्पित अन्तर हेच असणे बुद्धिगम्य व व्यवहार्य वाटते. जास्तीत जास्त किती अंतरावर जाऊन बाण भूमीवर पडतो हेही

महत्त्वाचे आहे असे वाटते. अंतराळात मारलेल्या दगड किंवा बाणाच्या मार्गक्रमणाचा मार्ग प्यारावोलाच्या आकृतीचा असतो. लक्ष्यबिन्दु हा केंद्र बिन्दु ठरतो. बाणाचे जमिनीवर पडण्याचे पुढील अंतरदेखील मागच्या अंतराइतकेच असावयास पाहिजे. या दृष्टीने पाहाता, अंतराळात बाण मारिला असता, तो पडण्याचे स्थान लक्ष्यान्तराच्या दुप्पट असावे लागेल. म्हणून अंतराळात बाण मारला तर तो किमान ६०० यार्ड जाईल, असे म्हणता येते. म्हणजे बाणाचा अधिकाधिक टप्पा ६-७ शे यार्डांचा होईल.

४·३ वरती आलेल्या उल्लेखांवरून, धनुर्विद्या भारतातील लोकात आणि सोग्दिया (चूलिक, शूलिक), ईराण आणि अफगाणिस्तानातील आर्यभाषीयांमध्ये प्रचलित होती असे आढळून येते. म्हणून बाणाच्या अंतरवाचक शब्द तेथील भाषांत सापडतात.

(भा. इतिहास आणि संस्कृति, त्रैमासिक, मुंबई, पु. ३२, श. १८९४)

संक्षेप व संदर्भ

आर्यविन – द आर्मी ऑफ द इंडियन मुग़ल्स, वुइल्यम आर्यविन, दिल्ली १९६२.
जोशी – सभासदकृत शिवाजीची बखर, शं. ना. जोशी, पुणे. श. १८८२.
दिवेकर – परमानन्दकृत शिवभारत, स. म. दिवेकर, पुणे, श. १८४९.
नदवी – अरबोंकी जहाज़रानी, सुलेमान नदवी, मुंबई १९६५.
बेली – इण्डो-सिथियन स्टडीज, खोतनीज टेक्स्ट्स्, खण्ड ६, हारोल्ड बेली, लंदन १९६३.
मुअ़यिन – बुर्हान-ई क़ातिअ़, संपा, मु. मुअ़यिन, तिहरान, सौर १३४२ (शक १८८६)
वाकसकर – दत्तो त्रिमलकृत ९१ कलमी बखर, वि. स. वाकसकर, पुणे १९६२.
सिद्दीकी – नुस्रतीकृत अ़लीनामा, अ. म. सिद्दीक़ी, हैद्राबाद १९५९.

✦✦✦

भारत-ईराणी संश्लेष

शब्दकोश

शब्दकोश

सूचना :– १. येथे खालील संक्षेप वापरलेले आहेत.

अ – अरबी भाषा
ई – ईराणी = फार्सी
प – पहलवी
प्रा – प्राकृत
म – मराठी

अवे – अवेस्ता भाषा
खो – खोतनी शक
पै – पैशाची प्रा.
प्रा. फा – प्राचीन फार्सी
सं – संस्कृत
हिं – हिन्दी

२. अंक पृष्ठाचे आहेत.

अ

च

ह

०००

व्यक्ति-स्थल-सूची

सूचना:– १. या सूचीत ग्रंथनामे जाड ठशात दिलेली आहेत.

२. अंक पृष्ठाचे आहेत.

त

० ● ०

श्री देवीसिंग चौहान यांचे

प्रकाशित साहित्य

मराठी ग्रंथ (लेख-संग्रह)

१. मराठी आणि दक्खिनी हिंदी, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे, शक १८९३

२. दक्खिनी हिंदीतील इतिहास : इतिहास संशोधन मंडल मुंबई, १८९५

३. भारत ईराणी संश्लेष : महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे, १८९५

ग्रंथ-संपादन

१. इब्न निशातीकृत फूलबन (हिंदी), महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे, शक १८८७

२. गज़नफ़र हुसेनकृत जंगनामए आलिम अ़लीख़ान (हिंदी), महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे, शक १८९०

३. नुस्रतीकृत तारीखे इस्कंदरी (हिंदी), पुणे, शक १८९१

४. जयराम पिंड्येकृत पर्णालपर्वतग्रहणाख्यान (हिंदी), महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे, शक १८९२

५. अब्दुलकृत इब्राहीम नामा (हिंदी), मुंबई शासकीय पुरालेख विभाग, १८९५

६. नुस्रतीकृत अलीनामा (हिंदी, अप्रकाशित)

७. शाह तुराबकृत मन समझावन (मराठी), (अप्रकाशित)

८. बालाघाटावरील शाहिरी सम्पत्ति (मराठी, अप्रकाशित)

९. तारीखे इस्कंदरी, मराठी अनुवाद, श्री मु. मा. जगताप, एम. ए. पुणे, शक १८९४

अनुसंधान लेख उर्दू

१. फूलबन के कुछ शब्द : नवाए अदब, बम्बई इ. १९६५

२. इब्राहीम नामे का लेखन वर्ष : नवाए अदब, त्रैमासिक बम्बई, इ. १९६५

३. नूरूल्ला और नुस्रती : नवाए अदब, त्रैमासिक बम्बई अप्रैल १९६६

४. मीराजल आशिकैन : भाषिक पहलू, नवाए अदब, बम्बई, सप्टेंबर १९६६

५. मैना सतवंती : भाषिक पहलू, नवाए अदब, सप्टेंबर इ. १९६७

६. पिरतनामा : लिसानी पहलू, नवाए अदब, त्रैमासिक बम्बई, दिसम्बर १९६७

७. पिरतनामा : एक किरआत, नवाए अदब, बम्बई, जनवरी १९६८
८. कलमतुल हकायक : नवाए अदब, बम्बई, जुलाई १९६८
९. शाह तुराब का काल : सुबहे–उम्मीद, जुलाई १९६५
१०. दक्खिनी हिंदी में हुब्बुल्-वतनी : शाअिर, बम्बई, जून सन १९७०
११. उर्दू के इर्तका में हिंदुओं का हिस्सा : हिंदुस्तानी ज़बान, (वार्षिक), बम्बई, सन १९६९
१२. 'गरती' शब्द का पाठ : नवाए अदब, त्रैमासिक बम्बई, अप्रैल १९६९
१३. दक्खिनी की लुग़ात : समीक्षण, नवाए अदब, त्रैमासिक बम्बई, १९७०
१४. उद्देश्यवाचक जे और किह, नवाए-अदब, मुंबई, अक्तूबर १९७३

अनुसंधान लेख हिंदी

१. मराठी का दक्खिनी हिंदी पर प्रभाव : राष्ट्रवाणी पुणे, ज्येष्ठ शक १८८५
२. दक्खिनी और हिंदी : राष्ट्रवाणी, पुणे, भाद्रपद, १८८७
३. द्वितीय अली आदिलशाह का काव्य : सम्मेलन पत्रिका, प्रयाग, भाग ५१, ज्येष्ठ १८८७
४. सबरस की भाषा : विवेचन, सम्मेलन पत्रिका, प्रयाग भाग ५४, ज्येष्ठ १८९०
५. ग़वासी का चरित्र : राष्ट्रवाणी, मार्गशीर्ष शक १८८७
६. ग़वासी : काव्य और व्यक्तित्व, राष्ट्रवाणी, पौष, शक १८८७
७. महाकवि नुस्रती : व्यक्तित्व, राष्ट्रवाणी, माघ, शक १८८७
८. अब्दुल्ला कुतुबशाह : चरित्र, राष्ट्रवाणी, ज्येष्ठ, शक १८८८
९. अब्दुल्ला कुतुबशाह : काव्य और भाषा, राष्ट्रवाणी, आषाढ शक १८८८
१०. गजनफ़र हुसेनकृत जंगनामाए आलिम अली ख़ान राष्ट्रवाणी, आश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष १८८९
११. दक्खिनी का कवि फ़ायज़ : सम्मेलन पत्रिका, प्रयाग भाग ५२, शक १८८८
१२. डॉ. अब्दुल हक़ और दक्खिनी : राष्ट्रवाणी, ज्येष्ठ शक १८८९

१३. फीरोज़ का पिरतनामा : भाषिक पहलू, राष्ट्रवाणी, फाल्गुन शक १८८८
१४. फीरोज़ का पिरतनामा : संहिता, राष्ट्रवाणी, चैत्र शक १८८९
१५. मयूर : खुस्रौ के शब्दों में, राष्ट्रवाणी, श्रावण शक १८८८
१६. सबरस के कुछ शब्द : सम्मेलन पत्रिका, प्रयाग, भाग ५३, शक १८८९
१७. अमीर खुस्रौ का भाषा-सर्वेक्षण :
१. डॉ. पवार स्मारक ग्रंथ, कोल्हापुर, शक १८८९
२. सम्मेलन पत्रिका, प्रयाग, भाग ५३ शक १८९०
१८. दक्खिनी हिंदी : भाषा और साहित्य : पंजाबी साहित्य कोश, चंडीगढ़
१९. दक्खिनी हिंदी की भारतीयता : २५ कार्तिक १८९०
२०. द्वितीय इब्राहीम आदिलशाह : राष्ट्रवाणी ज्येष्ठ १८९०

अनुसंधान लेख मराठी

१. नामदेवाची छंदोरचना : नामदेव दर्शन, स्मारक ग्रंथ आळंदी, मार्गशीर्ष ३, शक १८९२
२. नाणे, नाणक, नानासाहेब यांचा मागोवा (अप्रकाशित)
३. महाराष्ट्रातील घासलेटचा वापर इतिहास आणि संस्कृति, मुंबई, पु. ३८, आक्टोबर, १९७३
४. सोमेश्वराचे विक्रमाङ्काभ्युदय इतिहास आणि संस्कृति, मुंबई, पु. ३६, जाने. १९७३
५. गारा, कऱ्हेर व करक (अप्रकाशित)
६. वाणारसी व पारापत (अप्रकाशित)
७. मराठीतील पैशाची अवशेष, विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक, नागपूर १९७२
८. चालुक्यराज अय्यणवंशचरित, समीक्षण, इतिहास आणि संस्कृत, पु ३७, एप्रिल १९७३

९. जुना अकर्मक कर्मणिभावे प्रयोग, म. सं. पत्रिका, मुंबई, जानेवारी १९७३

१०. नगरवेशींच्या नामकरणाची चूलिक पद्धति (अप्रकाशित)

११. जनार्दनकृत जानकी-सैंवर : भाषिक दृष्टिक्षेप, केतकर पत्रिका नांदेड, १९७२

१२. उर्दू : भाषा व साहित्य, मराठी विश्वकोश, वाई, महाराष्ट्र.

१३. फार्सी : भाषा, मराठी विश्वकोश, वाई, महाराष्ट्र.

Papers in English

1. *Sidi Jauhar at Panhala :* Proceedings of Indian History Congress, Poona, 1963.
2. *Ali-Namah* : A Review, Marathwada University Journal, 1963.
3. *Influence of Marathi on the Dakkhini Hindi* : Read in the All India Oriental Conference, Gauhati, 1964.
4. *Walah* : Marathwada University Journal, 1965.
5. *Dating of Ali-Namah* : the S. K. Bhuyan Memorial Vol., Gauhati. 1966.
6. *Instrumental 'ne' in the Dakkhini Hinddi* A. I. O. Conf. Aligarh, 1966. (Published in the Proceedings Volume, 1969.)
7. *Date of collecting shahi's Poetry* : I. H. Congress, Mysore, Proceedings 1966.
8. *Sanskrit roots in the Persian Language* : Published in the Bharat Jyoti, Bombay, 11th September 1966.
9. *Sources of History in the Dakkhini Hindi:* I. H. Congress, Allahabad, 1965 (Published in the Proceedings.)

10. *Dating of Shouqi's Fateh-Namah Nizam shah* : I.H. Congress proceedings, 1967.

11. *Arab Horses in India* : Published in the Annals of BORI, Golden Jubilee number, Poona, Vol. 48 & 49., 1968.

12. *Shahanshah Group of Persian Words* : Published in I. H. Congress Proceedings, Bhagalpur, 1968.

13. *A Note on the Devnimori Inscription of Saka 127* : Read in B. I. S. M., Poona. 4th Jyestha 1890.

14. *Amir Khusrau's Abyat-i-Silsila* : Read in A. I. O. Conf., Varanasi, 1968.

15. *The Kasarshirsi Copperplates of Rashtrakuta Dhruvaraja, Saka 705* : Journal of the Asiatic Society, Bombay 1969.

16. *Dating the Installation of the Idol of Vithoba* : the Maharashtra Itihas Parishad Proccedings, Kolhapur 1969.

17. *Sanskrit Influence on Amir Khusrau* : The Annals of the Bhandarkar O. R. Institute, vol 51, Poona, 1969.

18. *The Aulikar Dynasty is Iranian* : Read in the B. I. S. Mandal, Poona, 1969.

19. *Influence of the Bhakti Cult on Sufism* : Read in the Maratha History Seminar. Deccan College, Poona 1969.

20. *Further light on 'ne' in the Dakkhin. Hindi* : Proceedings, A. I. O. Conference, Calcutta, 1969.

21. *Jaubla, Zabol and Plaksha* : Read in the A. I. O. Conference, Calcutta, 1969.

22. *Eran, Azagana, Afghan and Hariana* : Proceedings, the I. H. Congress, Varanasi 1969.

23 *Origin of the Consecutive Conjunction 'ki' in Marathi* : An Historical Search – published in Indian Linguistics, Dr. S. M. Katre, vol, Part 2, Poona, 1970.

24. *The Problem of Navaits in India* : Journal of the Oriental Institute, Baroda, Vol. XXI, 1972

25. *The al-Djummal and Decimal Notation in Indo-Muslim Epigraphy* : Annals of B.O. R. I. Vol. 52, 1971

26. *Maharashtra Dharma : Concept and Origin* : Proceeings, Maratha History Seminar, 1970, Shivaji University, Kolhapur.

27. *Persian Version of the Bhagavata Purana* : Read, I. H. Congress, Jabalapur, 1970.

28. *Contemporaneity of Namdeva and jnaneshvara* : Read, Seminar on Maratha History, University of Bombay, 1971.

29. *Tradition of Naming the City-gates* : Read, A. I. O. Conference, Ujjain, 1971

30. *Bhaskaracharya's Vijjala-vida is Beed town* : Prof G. H. Khare felicitation Volume, Poona, 1973.

31. *Identificatiom of some Rgvedic rivers in Afghanistam*

32. *What is Hamun? Read in the B I S Mandala, Poona, 1894*

33. *Paishachi element in the Tajuzbeki Hind*

34. *Baglan Rathars, a Hinduised Saka Clan*

राष्ट्रभाषा हिन्दी राष्ट्र की एकात्मता का महत्त्वपूर्ण साधन है।

श्री देवीसिंग चौहान : संक्षिप्त परिचय

जन्म २ मार्च सन् १९११. मुंबई विद्यापीठाची मॅट्रिक परीक्षा १९३१. सन् १९३८ गणित घेऊन बी. ए. (ऑनर्स) ची पदवी. पुण्याच्या गोखले इन्स्टिटयूटमध्ये एम्. ए. चा अभ्यास व मराठवाडा साप्ताहिकात उपसंपादकीय काम. शिक्षण सोडून सन् १९३८ च्या हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या सत्याग्रहाची उस्मानाबाद जिल्ह्यातील संघटना. सन् १९३९ मध्ये डॉ. सोहोनी यांच्या सहकार्याने हैद्राबाद राज्यातील जागिरीतील जबर सारा-कर यांची माहिती गोळा करून Feudal oppression in Hyderabad या पुस्तिकेचे प्रकाशन. नागपूर येथून १९४१ मध्ये विधी पदवी. जुलै १९४१ मध्ये भारत विद्यालयाची उमरगा येथे, आपले सहकारी श्री. तात्याराव मोरे, वि. ना. हराळकर, रामराव राजेश्वरकर यांच्या साहाय्याने स्थापना. सन् १९४७ च्या ऑगस्टात स्टेट कॉंग्रेस सत्याग्रहात कारावास. मराठवाडा प्रदेश कॉंग्रेसचे चिटणीस १९४९ ते १९५२. मंत्री सन १९५२–१९५४. मराठवाड्याच्या संयुक्त महाराष्ट्रातील विलिनीकरणाचे आंदोलन कार्य. नागपूर कराराचे मराठवाड्याचे प्रतिनिधी. १९५७ च्या मुंबई मंत्रिमंडळात उपमंत्री. सन १९५७ पासून संशोधनावर विशेष लक्ष. १९६४ ते १९७० पर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य. मराठी, उर्दू, हिन्दी, फार्सी, संस्कृत आदि भाषांचे भाषाशास्त्रीय दृष्टिकोणातून सखोल अभ्यासक. भारतीय इतिहास कॉंग्रेस व अखिल भारतीय प्राच्य परिषदेच्या इतिवृत्तांतून अनेक लेखांचे प्रकाशन. पुण्याची भांडारकर संस्था पत्रिका, मुंबई रॉयल एशियाटिक इत्यादी त्रैमासिक पत्रिकांतून अनेक इंग्रजी, मराठी, हिन्दी, उर्दू लेखांचे प्रकाशन. त्यांनी सुमारे १५० संशोधनात्मक लेख प्रकाशित केले आहेत.



मराठी आणि दक्खिनी हिंदी या त्यांच्या पुस्तकास महाराष्ट्र सरकारच्या, व्याकरण आणि भाषाविज्ञान विभागातील प्रथम श्रेणीचा पुरस्कार मिळाला आहे.

राजकारणात आयुष्य वेचूनही, संशोधन क्षेत्रात एवढी मोलाची कामगिरी करणारी व्यक्ति क्वचितच सापडते.